# हिंदुराष्ट्रदर्शन

## वि.दा.सावरकर



# हिंदुराष्ट्रदर्शन

लेखक: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

**इंटरनेट अधिकार**

**स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक**

**स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८**

प्रकल्प समन्वयक: रणजित विक्रम सावरकर

# हिंदुराष्ट्रदर्शन

## अखिल भारतीय हिंदुमहासभा
## १९ वे वार्षिक अधिवेशन, कर्णावती
## अध्यक्षीय भाषण
## विक्रम संवत् १९९४ : सन १९३७

सभ्य स्त्री पुरुष हो! अखिल भारतीय 'हिंदू महासभे'च्या, ह्या १९ व्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावर माझी निवड नि नेमणूक करून आपण मजवर जो विशेष विश्वास टाकला आहे; त्याकरिता प्रथमच मी आपले अत्यंत मनापासून आभार मानतो. हा माझा सन्मान मी गतकाळात केलेल्या देशसेवेच्या कारणाने माझ्यावर महाराष्ट्राने केलेला अनुग्रह आहे; असे न मानता, माझ्या अंगी अद्यापीही उर्वरित असलेली सर्व शक्ती अखिल हिंदुजगत् नि हिंदुस्थान-आपणा सर्वांची समान मातृभू नि समान पुण्यभू यांच्या संरक्षणाच्या आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा नेटाने नि निकराने पुढे रेटण्याच्या पवित्र कार्यी अर्पिण्याची ही आज्ञा आहे असेच मी मानतो. नुसते हिंदुपुरतेच सांगावयाचे झाले; तर आमच्या जातीय नि राष्ट्रीय या दोन्ही प्रकारच्या कर्तव्यात रतिमात्रही भेद किंवा विरोध असणे शक्य नाही. कारण हिंदुजगाचे सारे हितसंबंध अखिल हिंदुस्थानच्या हितसंबंधांशी पूर्णतः एकरूपच आहेत. जोपर्यंत आपली मातृभूमी स्वतंत्र झालेली नाही; जोपर्यंत एका प्रबल हिंदी राज्याच्या रूपाची स्थिरता तिला लाभलेली नाही आणि ते हिंदी राज्यही असे की, ज्यात आपले सर्व देशबांधव मग ते कोणत्याही धर्माचे वा पंथाचे वा वंशाचे असोत; पूर्ण समानतेने वागविले जातील आणि प्रत्येकजण संपूर्ण हिंदी राष्ट्राच्या संबंधीचे आपापले सर्वसामान्य ऋण नि कर्तव्ये बजावीत आहे; तोवर त्यापैकी कोणाचेही स्वतंत्र नागरिकत्वाचे न्याय्य नि समान अधिकार ज्यात हिरावले जाणार नाहीत किंवा कोणालाही दुसऱ्या कोणावर अन्याय्य अतिक्रमण करू दिले जाणार नाही. तोपर्यंत, हिंदुजगाला, आपल्या आयुष्याचे नियतकार्य, प्रगत किंवा परिपूर्ण करताच येत नाही. यास्तव कोणताही हिंदू, हिंदू म्हणून स्वतःशी जितका प्रामाणिक असेल तितकेच त्याला राष्ट्रीय म्हणूनही प्रामाणिक राहिल्यावाचून गत्यंतरच नाही. माझ्या या भाषणात पुढे ही गोष्ट मी सिद्ध करणारच आहे.

ह्या दृष्टीने निश्चयात्मक विचारसरणीला अनुसरूनच हिंदू संघटनेच्या चळवळीच्या काही मूलभूत गोष्टीचे ह्या महासभेने विशद केल्याप्रमाणे तद्विषयक माझ्या समजुतीप्रमाणे मी माझ्या ह्या अध्यक्षीय भाषणात मुख्यतः विवेचन करणार असून, इतर संकीर्ण विषय नि

अनुषंगिक प्रसंगोपात चालू प्रश्नांचा साधकबाधक विचार नि निर्णय या अधिवेशनाला जमलेल्या प्रतिनिधींवरच सोपविणार आहे.

**नेपाळच्या स्वतंत्र हिंदू राजाला अभिवादन**

परंतु आणखी पुढे जाण्याच्या आधी अखिल हिंदूंच्या वतीने, नेपाळचे परमपूज्य राजे, नेपाळचे मुख्य प्रधान श्री. युद्धसमशेर राणाजी आणि तत्रस्थ आपले सकळ धर्मबंधू नि देशबांधव ह्यांना एकनिष्ठ नि प्रेमळ अभिवादन करून अभिनदनपर संदेश पाठविणे हे मी माझे महत्वाचे विहित कर्तव्य मानतो. केवळ त्यानीच आपल्या इतिहासातील ह्या पराकाष्ठेच्या अवनतीच्या काळातही एक हिंदू राज्यसत्ता म्हणून टिकाव धरून राहण्यात आणि हिंदू स्वांतत्र्याचा ध्वज हिमराजाच्या प्रोत्तुंग शिखरांवर निष्कलंकपणे फडकत ठेवण्यात महनीय यश संपादिलेले आहे. ह्या जगात आज एकमेव हिंदुराज्य असे काय ते एक नेपाळचेच राज्य टिकून आहे. त्याचे स्वातंत्र्य इंग्लंड, फ्रान्स, इटली नि अशीच इतर बलाढ्य राष्ट्रे यांच्याकडून मान्यता पावले आहे. आपल्या या पिढीत उण्यापुऱ्या पंचवीस कोटी हिंदूमध्ये नेपाळचे परमपूज्य राजे, हेच काय ते एकमेव प्रथम सर्वोत्तम असे हिंदू आहेत की ज्यांना जगातील स्वतंत्र राष्ट्रांचे राजे, सम्राट नि अध्यक्ष त्यांच्या मेळाव्यांत, आपले मस्तक न हलविता न लवविता समसमानतेच्या नात्याने प्रवेशिता येते. प्रसंगोपात्त चालू राजकीय परिस्थिती कशीही असो, दोघांचीही मातृभूमी नि पुण्यभूमी एकच असल्यामुळे एकवंश, एकधर्म, एकभाषा नि एकसंस्कृति ह्या सर्व प्रियतम अशा बंधनांनी नेपाळ हा समग्र हिंदुस्थानाशी बांधलाच गेलेला आहे. आपणा उभयतांचे जीवित एकच आहे. जी जी गोष्ट समग्र हिंदुजगाचे सामर्थ्य वर्धमान करील; ती ती गोष्ट, नेपाळचे सामर्थ्य वाढवीलच वाढवील आणि जी, जी प्रगती नेपाळ साधील, तिने तिने, हिंदुजगतही उन्नत झाल्यावाचून राहणारच नाही. ह्यास्तव हे एकमेव स्वतंत्र हिंदुराज्य आपणा सभोवती सर्वत्र अस्तित्वासाठी चालू असलेल्या राष्ट्राराष्ट्रांच्या जीवनसंघर्षात आपले स्थान अढळ राखण्याला आणि तसेच पुढे पुढे जात, जीवन संघर्षांत त्याची वाट पाहत असलेले पुढील, महनीय नि वैभवशाली भवितव्य, पूर्णपणे गाठण्याला, समर्थ होण्याच्या दृष्टीने त्याची राजकीय, समाजिक नि सैनिक नि वैमानिक साधनसिद्धता झपाट्याने अद्ययावत स्वरुपाची झालेली पाहण्याचीच सर्व संघटनवादी हिंदूंची प्रबळ आकांक्षा आहे.

www.savarkarsmarak.com

## बृहत्त् हिंदूंना सहानुभूतीचा संदेश

त्याचप्रमाणे आपल्या सहधर्मीय देशबांधवांपैकी जे आफ्रिका, अमेरिका, मॉरिशस नि असेच जगाचे इतर भाग यातून जाऊन तेथे कसलाही गाजावाजा न करता महत्तर हिंदुस्थानची उभारणी करीत आहेत; आणि तसेच, जे, बलिद्वीपातल्याप्रमाणे, अद्यापही आपल्या हिंदुजातीच्या प्राचीन जागतिक साम्राज्याचे अभिमानास्पद अवशेष टिकवून धरून राहिलेले आहेत, त्या सर्वांना सहानुभूतीचा नि प्रेमळ स्मृतीचा संदेश पाठविण्यास, हिंदू महासभेची ही बैठक विसरू शकत नाही. त्यांची भाग्येसुद्धा समग्र हिंदुजगाची 'पितृभू' नि 'पुण्यभू' असे जे हे आपले भारतवर्ष, त्याची स्वतंत्रता, सामर्थ्य नि महत्ता, यांच्याशीच अविमोच्य रीतीने बद्ध झालेली आहेत.

## हिदुस्थान हे सतत एक नि अविभाज्यच राहिले पाहिजे

तद्वतच हिंदुस्थानातील तथाकथित 'फ्रेंच हिंदुस्थान' नि 'पोर्तुगीज हिंदुस्थान' ह्या भागात रहात असलेल्या हिंदूंचाही हिंदू महासभेला विसर पडणे शक्य नाही. खरोखर त्यांच्या त्या भागांची नावे आमच्या कानांना धडधडीत मूर्खपणाची नि अत्यंत अपमानास्पद  लागतात. आजच्या ह्या कृत्रिम नि बलात्कृत, राजकीय विभागणीचा विचार एकीकडे ठेवला तर आपण सर्व रक्त, धर्म नि देश यांच्या टिकाऊ बंधांनी अविभाज्य रीतीने एकत्र बांधलेलेच आहोत. काही झाले तरी आपण, आपले ध्येय म्हणून निश्चयपूर्वक घोषित केलेच पाहिजे की उद्याचा हिंदुस्थान, हा काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत नि सिंधुपासून आसामपर्यंत केवळ संयुक्त म्हणून नव्हे; तर अभिन्न राखू म्हणून एक नि अविभाज्यच राहिला पाहिजे. मी अशी आशा करतो की एकटी हिंदू महासभा'च नव्हे तर 'हिंदी राष्ट्रसभा' नि हिंदुस्थानातील इतरही तशाच राष्ट्रीय संस्था ह्यांना गोमांतक, पांडेचरी नि तत्सम हिंदुस्थानचे इतर विभाग हे महाराष्ट्र वा बंगाल वा पंजाब ह्यांच्यासारखेच आपल्या राष्ट्राचे दुसऱ्या कोणासही तोडून देता न येण्याजोगे नि अत्यंत महत्वाचे आवश्यक अंश भाग आहेत, असे अधिकारवाणीने सांगण्याला यत्किंचितही लाजणार नाही.

## ‘हिंदू‘ शब्दाची व्याख्या

‘हिंदू महासभेच्या नियत नि अधिकृत कार्याचे सर्व वरचे बांधकाम, ज्या अर्थी ‘हिंदू‘ ह्या शब्दाच्या अचूक व्याख्येवरच आधारून आहे; त्या अर्थी प्रथमतः आपण ‘हिंदुत्व‘ म्हणजे काय? तेच स्पष्ट केले पाहिजे. एकदा त्या शब्दाचा अर्थ नि व्याप्ति ही व्याख्यापिली गेली. नि नीट आकलन झाली; म्हणजे, आपल्या स्वकीय पक्षातील पुष्कळशा शंका सुलभतेने निराकृत होतील आणि आपल्या विरोधकांच्या पक्षाकडून आपल्याविरुद्ध उठविल्या जाणाऱ्या आक्षेपांना नि गैरसमजानांही योग्य उत्तर मिळून तेही शांतविले जातील. आपल्या सद्भाग्याने म्हणा, पण बरेचसे रान तुडविल्यानंतर, ‘हिंदू‘ या शब्दाची अशी एक व्याख्या या पूर्वीच आपल्याला नेमकी गवसली आहे. अशा व्यापक संज्ञांच्या संबंधात ऐतिहासिक नि तार्किक दृष्ट्या इतकी समर्पक व्याख्या करता येणे शक्य असते. तितकी तर ती व्याख्या समर्पक आहेच आहे; पण त्या व्यतिरिक्त, तात्कालिन उपयोगक्षम अशीही ती आहे. ‘हिंदू‘ शब्दांची ती व्याख्या---

**‘‘आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका।**
**पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिदुरिती स्मृतः।।‘‘**

ही होय (‘‘जो जो कोणी, सिंधूपासून समुद्रापर्यंत पसरलेली ही भारतभूमी आपली पितृभू नि पुण्यभू म्हणून मानतो नि अधिकाराने तसे सांगू शकतो तो तो ‘हिंदू‘ होय.‘‘) येथेच मला हे दाखवून दिले पाहिजे, की हिंदुस्थानात उगम पावलेल्या कोणत्याही धर्माचा अनुयायी म्हणविणाऱ्या कोणाही मनुष्याला हिंदू म्हणून लेखणे हे बव्हंशी, भोंगळ किंवा असंबद्धच होईल. कारण, हिंदुत्वाचे ते केवळ एक अंग किंवा लक्षण आहे. पण आपल्याला जर आपली ती व्याख्या झाकळून जावयाला किंवा मिथ्या ठरावयाला नको असेल तर ‘हिंदुत्वा‘तील संकेताचा दुसरा नि तितकाच महत्वाचा घटक अवगणिता किंवा दुलक्ष्यिताच येणार नाही. एखाद्या मनुष्याने हिंदुस्थानात उगम पावलेल्या कोणत्याही धर्माचा अनुयायी म्हणून म्हणविणे--- म्हणजेच त्याने हिंदुस्थान ही आपली नुसती ‘पुण्यभू‘च मानणे एवढीच गोष्ट पुरेशी नाही, तर त्याने ह्या देशाला आपली ‘पितृभू‘ म्हणून मानणे अवश्य आहे. ह्या प्रश्नाची अंगोपांगासह, संपूर्ण चर्चा करण्याचे हे स्थळ नसल्यामुळे त्याकरिता सर्वस्वी मी माझ्या ‘हिंदुत्व‘ ह्या इंग्रजी पुस्तकाकडेच बोट दाखवितो, त्या पुस्तकात ह्यासंबंधी सर्व विधाने नीट पुढे मांडलेली असून ह्या प्रश्नाचे अतिशय विस्तारपूर्वक विवेचन केलेले आहे. सध्या इतकेच सांगितले असता मला पुरे वाटते की, जेथे त्यांचा धर्म जन्मास आला, त्या एकाच पुण्यभूमीच्या एकट्या एका बंधानेच केवळ नव्हे - तर एकसंस्कृति, एकभाषा, एक इतिहास नि सर्वात विशेष म्हणजे एक ‘पितृभू‘सुद्धा यांच्या बंधानी हिंदुजगत् हे स्वयमेव निबद्ध झालेले असून त्यांच्या योगानेच ते एक स्वयंसिद्ध राष्ट्र नि स्वतंत्र

www.savarkarsmarak.com

लोकसमाज ठरते. हे दोन घटक एकत्र मिळूनच आपले हिंदुत्व घडते आणि त्या घटकांच्या योगानेच आपण जगातील दुसऱ्या कोणत्याही लोकांपासून निराळे ठरतो. उदाहरणार्थ जपानी नि चिनी लोक स्वतःला हिंदूंशी पूर्ण एकात्म असलेले मानीत नाहीत नि त्यांना तसे मानताही येणार नाही ते ह्या कारणामुळेच. ते दोघेही त्यांच्या धर्माचे जन्मस्थान असलेला आपला हा हिंदुस्थान देश आपली पूण्यभू म्हणून मानतात. पण ते ह्याच हिंदुस्थानाला आपली पितृभू म्हणून मात्र मानीत नाहीत. नि त्यांना तसे मानताही येण्यासारखे नाही. ते आपले सहधर्मीय आहेत. पण आपले स्वदेशबंधू मात्र नाहीत नि होऊ शकणार नाहीत. आपण हिंदू मात्र नुसते सहधर्मीच नव्हे. तर, परस्परांचे स्वदेशबंधूही आहोत. वंशपरंपरा, भाषा, संस्कृति इतिहास नि देश ह्या गोष्टी जपानी नि चिनी यांना त्यांच्या स्वतःच्या भिन्न अशा आहेत आणि त्या आपले नि त्यांचे एकराष्ट्रीय जीवन बनण्याअतक्या पूर्णांशाने आपल्याशी निबद्ध झालेल्या नाहीत. हिंदूंच्या धार्मिक मेळाव्यात एखाद्या हिंदुधर्म महासभेत-पूण्यभूमीच्या एकत्वामुळे ते आपले धर्मबांधव ह्या नात्याने आपल्याशी मिळू शकतील. परंतु सर्व हिंदूंना एकत्र जोडणाऱ्या नि त्यांच्या राष्ट्रीय जीवनाचे प्रतिनिधित्व संपादणाऱ्या एखाद्या 'हिंदू महासभे'विषयी मात्र त्यांना समान आस्था असणार नाही, की तीत ते समानतेने भागही घेणार नाहीत. किंबहुना त्यांना तसे करताही येणार नाही.

व्याख्या ही मुख्यत्वेकरून वस्तुस्थितीशी जुळती अशीच असली पाहिजे. 'अनन्य पितृभू असणे' ह्या हिंदुत्वाच्या पहिल्या घटकानुसार हिंदुस्थानातील मुसलमान, ज्यू, ख्रिस्ती, पारसी हे जसे हिंदुस्थान हीच आपली पितृभूमी म्हणून मानीत असूनसुद्धा स्वतःला हिंदू म्हणून म्हणविण्याच्या अधिकाराबाहेर पडतात; तद्‍वतच दुसऱ्या पक्षी आपल्या व्याख्येचा 'अनन्य पुण्यभू असणे' हा दुसरा घटक जपानी, चिनी इत्यादींनाही त्यांची नि आपली पुण्यभू एकच असूनसुद्धा हिंदू गटाच्या बाहेरच टाकतो. ही वरील व्याख्या नागपूर, पुणे, रत्नागिरी इत्यादी ठिकाणच्या 'हिंदुसभां'प्रमाणे पुष्कळ प्रमुख 'हिंदुसभां'नी यापूर्वीच, स्वीकारलीही आहे. 'हिंदू महासभे'च्या प्रचलित घटनेत 'हिंदुस्थानात जन्म पावलेल्या कोणत्याही धर्माचा अनुयायी म्हणविणारा कोणीही असे 'हिंदू' शब्दाचे ढिले किंवा असंबद्ध विशदीकरण करण्यात आले. त्यावेळी तिच्याही दृष्टीपुढे ही वरील व्याख्या होतीच. परंतु आपण अधिक तंतोतंत किंवा अचूक बनले पाहिजे. अशी वेळ आता आली आहे. यास्तव ती एकांगी व्याख्या टाकून तिच्या स्थली, व्यवस्थित नि समर्पक अशी व्याख्या आपल्याला बसविली पाहिजे आणि म्हणूनच वर दिल्याप्रमाणे स्वयमेव स्पष्टार्थबोधक असणारा वरील सबंध श्लोकच जशाचा तसा आपल्या घटनेत समाविष्ट केला पाहिजे, असे मी आपल्यापुढे मांडतो.

## ‘हिंदू‘ शब्दाचा ढिला नि अपायकारक अपप्रयोग टाळा.

‘हिंदू‘ शब्दाच्या अचूक व्याख्येनुसार हे अवश्यच ठरते की, ‘हिंदू शब्दाचा उपयोग, त्याच्या त्या व्याख्यांत नि निर्णित अशा सामान्य अर्थाला धरूनच करण्याची आणि कोणत्याही पंथविशिष्ट अर्थाने त्याचा दुरुपयोग होऊ न देण्याची, शक्य तितकी सर्व दक्षता आपण घेतली पाहिजे. आपल्यातील अवैदिक धार्मिक सांप्रदायिकतेतच समान हिंदुबंधुतेतच समाविष्ट होतात, असे एकीकडे मोठ्या आस्थापूर्वक, प्रतिपादन करणारे, आपले मोठमोठे नामांकित पुढारी नि ग्रंथकारसुद्धा, दुसरीकडे सामान्य भाषणांतून मात्र, ‘हिंदु नि शीख‘, ‘हिंदू नि जैन‘ अशांसारखे शब्दप्रयोग करण्याची भयंकर चूक करीत असतात. पण त्यामुळे वैदिक किंवा सनातनी तेवढेच काय ते हिंदू ठरू लागतात; हे त्यांच्या लक्षात येत नाही. त्यायोगे, अर्थातच धार्मिक बंधुतेच्या निरनिराळ्या घटकांच्या मनातून विभक्तपणाचे प्राणघातक विष कालविले जाण्याला आणि त्यामुळे त्या सर्वांचा सुसंघटित नि एकजीव असा गट साधण्याच्या आपल्या प्रबळ आकांक्षेचा नाश करण्याला ते अगदी नकळतच पण कारणीभूत होत असतात.

आपल्या लोकांपैकी बहुसंख्य असणाऱ्या वैदिक सांप्रदायिकांपुरतीच ‘हिंदू‘ ह्या संज्ञेची व्याप्ति होऊ न देण्याची योग्य ती काळजी जर आपण घेऊ तर शीख, जैन, इत्यादींसारख्या आपल्या अवैदिक बंधूंनाही स्वतःच्या संबंधात ‘हिंदू‘ हा शब्द लावण्याविषयी उद्वेग वाटण्याला कोणतेच संयुक्तिक असे कारण उरणार नाही.

आमची पुण्यभू नि पितृभू ह्या दोन्हीही नात्यांनी जे ह्या भरतभूमीला, आपली म्हणून मानतात त्या सर्वांचा वाचक असा अगदी नेमकाच जर ‘हिंदू‘ ह्या शब्दाचा उपयोग होऊ लागला तर हिंदू बंधुतेचे घटक असणारे शीख जैन नि असेच इतर धर्म हे वेदांचे शाखारूप किंवा तद्संभूत, असे धर्म नसून, ते स्वयमेव नि स्वतंत्र असेच, धर्म आहेत, अशा मताच्या लोकांनासुद्धा स्वतःला ‘हिंदू‘ म्हणविताना आपले धर्मसंप्रदाय विशिष्ट स्वातंत्र्य, गमावण्याविषयीची भीती किंवा शंका बाळगण्याचे कारणच राहणार नाही. जेव्हा जेव्हा समग्र हिंदुजगताच्या ह्या घटकावयवांचा भेदच दाखवावयाचा असेल तेव्हा ‘वैदिक नि शीख‘, ‘वैदिक नि जैन‘ इत्यादी अशा पकारे आपण त्यांचा नामनिर्देश करावा. पण ‘हिंदू नि शीख‘ ‘हिंदू नि जैन‘ असे म्हणणे, हे ‘हिंदू नि ब्राह्मण‘ किंवा ‘जैन नि दिगंबर‘ किंवा ‘शीख नि अकाली‘ असे म्हणण्याइतकेच स्वयंविरोधी नि दिशाभूल करणारे आहे. ‘हिंदू‘ ह्या शब्दाचा अशा प्रकारचा हानिकारक अपप्रयोग, विशेषतः आपल्या ‘हिंदू महासभे‘च्या भाषणांतून, ठरावांतून नि कागदपत्रांतून लक्षपूर्वक टाळण्यात यावा.

## ‘हिंदू शब्दाचा उगम वैदिकच आहे‘

येथेच जाता जाता हेही सांगावेसे वाटते की, 'हिंदू' हा शब्द काही आपल्याला तिरस्काराने वा तुच्छतेने लेखण्याकरिता परकीयांनी दिलेले नामाभिधान नाही. तर हिंदू हा शब्द आपल्या वेदातील सप्तसिंधू ह्या संकेतापासून या विषयाचे साकल्यपूर्ण विवेचन मी माझ्या 'हिंदुत्व' ह्या पुस्तकात केलेले आहे. सिंधुनदीच्या तीरावरील आपल्या एका प्रांताच्या नि लोकांच्या नावावरूनच ह्या गोष्टीच्या सत्यतेची साक्ष पटणारी आहे. आजच्या घटकेपर्यंतही त्यांची ती सिंध नि सिंधी हीच नावे प्रचलित आहेत.

## 'हिंदू महासभा', ही मुख्यतः, धार्मिक नव्हे; तर राष्ट्रीय संस्था

येथवरच्या ह्या ऊहापोहावरून हे साहजिकच ठरते की, 'हिंदुत्व' (हिंदूपणा) ह्या संज्ञेचा, आशय 'हिंदुइझम' (हिंदुधर्म) ह्या शब्दाहून, किती तरी, व्यापक आहे. ह्या भेदाकडे कटाक्षपूर्वक लक्ष वेधावे एवढ्याकरिता 'हिंदू' शब्दाची व्याख्या रचितेवेळी हिंदुत्व' 'निखिल हिंदू' (pan Hindu) नि हिंदू जगत (Hindudom) असे शब्द मी बनविले. 'हिंदुइझम्' (हिंदुधर्म) ह्या शब्दात हिंदूंची धार्मिक व्यवहारपद्धती. त्यांचे अध्यात्मशास्त्र नि त्यांची तदंगभूत श्रद्धातत्त्वे ह्याच गोष्टींचा काय तो संबंध येतो, परंतु हा भाग स्पष्टपणे, असा आहे; की 'हिंदू महासभा' तो पूर्णत्वाने, ज्या त्या व्यक्तीच्या वा समुदायाच्या, विवेकबुद्धीवर नि विश्वासपूर्ण धर्मश्रद्धेवरच सोपविते. 'हिंदू महासभे'ची भूमिका, कोणत्याही धार्मिक श्रद्धातत्वांवर किंवा कोणत्याही विवक्षित धर्म ग्रंथावर किंवा सर्वेश्वरवादी वा एकेश्वरवादी वा निरीश्वरवादी यासारख्या कोणत्याही तत्वज्ञानाच्या संप्रदायावर आधारलेली नाही. कोणत्याही 'इझम (पंथा) शी तिचा संबंध असलाच; तरी तो सर्व म्हणजे हिंदुस्थानाला आपली पुण्यभूमी, आपल्या धार्मिकश्रद्धेचे उत्पत्तीस्थान नि पूजाअर्चा प्रार्थना एक हिंदूमंदिर मानणे, ह्या सामान्य लक्षणापुरताच होय आणि हे लक्षण प्रत्येक हिंदूच्या संबंधात तो अनुयायी असणाऱ्या कोणत्याही धर्माचा किंवा पंथाचा हिंदुस्थानातच उगम झालेला आहे. ह्या गोष्टीवरूनच, अवश्यमेव आहे.

अशा रीतीने 'हिंदुत्वा'च्या अनेक उपांगांपैकी केवळ एकाच उपांगापुरता 'हिंदू महासभे'चा 'हिंदुइझम'शी अप्रत्यक्षतः संबंध येत असून तिचा खरा संबंध मुख्यत्वेकरून, 'हिंदुत्वा'च्या इतर उपांगांशीच आहे आणि ती उपांगे अनन्य पितृभू असण्याच्या दुसऱ्या घटकापासूनच, निष्पन्न झालेली आहेत. तर ती प्राधान्येकरून, 'हिंदू राष्ट्रसभा' आहे--- सामाजिक, राजकीय नि सांस्कृतिक अशा सर्वच अंगानी, हिंदुराष्ट्राच्या भवितव्याला आकार देणारी, ती एक 'अखिल हिंदू संघटना' (पॅन हिंदू ऑर्गनिझेशन)च आहे. जे कोणी 'हिंदू महासभे'ला केवळ एक धार्मिक संस्था

म्हणून, लेखण्याची भयंकर चूक करीत असतील किंवा करीत आहेत त्यांनी हा भेद इतःपर नीट ध्यानात धरावा.

## हिंदू हे स्वयमेवच राष्ट्र आहे

'हिंदू महासभे'चे वैशिष्ट्यपूर्ण महत्कार्य (मिशन) जे मी समजतो त्याप्रमाणे ती मुख्यतः एक राष्ट्रीय सभाच आहे. ह्या माझ्या भूमिकेला काहीजण उगाच क्षुल्लक दोष देतील आणि 'जीवनाच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीतही ज्यांच्यात अतीव भेद आहेत; त्या हिंदूंना मुळी राष्ट्र म्हणून संबोधिताच कसे येईल? असा प्रश्नही आव्हानपूर्वक मला विचारतील! त्यांना माझे सरळ उत्तर असे आहे की भाषा, संस्कृती वंश नि धर्म याविषयीची संपूर्ण एकात्मता आढळेल इतकी समानता, पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याच लोकांत नाही. कोणतेही लोक त्यांच्या आपापसातील विसंवादी भेदांच्या अभावामुळे राष्ट्र ह्या संज्ञेला, तितकेसे कधीच पात्र होत नाहीत, की जितके आपापसातील भेदांपेक्षाही इतर लोकांशी, अधिक ठळक स्वरूपात असणाऱ्या त्यांच्या भिन्नतेच्या योगे ते पात्र ठरतात.

हिंदूंना, राष्ट्र म्हणून संबोधण्याचे जे अमान्य करतात; तेच ग्रेट ब्रिटन, युनायटेड स्टेट्स, रशिया, जर्मनी नि इतर लोक यांना मात्र राष्ट्रे म्हणून मानतातच! त्यांना मी विचारतो की, त्या लोकांना तरी जे स्वयमेव राष्ट्रे म्हणून लेखण्यात येते, ते तरी कोणत्या कसोटीने हो?' उदाहरणार्थ 'ग्रेट ब्रिटन'च घ्या त्यांच्यामध्ये काही झाले तरी तीन तरी भिन्न भाषा आहेत, त्यांच्यात गतकाली आपापसातच भयंकर रणकंदने झालेली आहेत. त्यांच्यात बीजांची, रक्तांची नि जातींची भिन्नता असल्याच्या पदचिन्हांचा मागमूस लागतो; नि लागेलही. त्यांना सध्या असे सगळं असूनही देश, भाषा, संस्कृति, समान नि अनन्य अशी पितृभूमी आहे; एवढ्याच कारणाकरिता, जर तुम्ही त्यांना राष्ट्र म्हणून मानता; तर मग हिंदूंनासुद्धा हिंदुस्थान ह्या स्पष्टार्थवाचक नावाची अनन्य अशी पितृभूमी आहे; जिच्यापासून त्यांच्या सर्व प्रचलित भाषा उगम पावल्या नि पुष्ट होत आहेत, जी आजही त्यांच्या धर्मग्रंथांची नि वाङ्मयाची सर्वसाधारण भाषा म्हणून गणली जाते आणि प्राचीन धर्मशास्त्राचा नि त्यांच्या पूर्वजांच्या उक्तींचा पवित्रतम ठेवा, म्हणून जिचा गौरव होत असतो ती संस्कृत ही सामाईक अशी भाषा त्यांच्यापाशी आहे; अनुलोम नि प्रतिलोम विवाहांच्या योगाने त्यांचे बीज नि रक्त, मनूच्या कालापासून सतत परस्परांत संमिश्र होत आलेले आहे. त्यांचे सामाजिक उत्सव नि संस्कारविधी इंग्लंडात आढळतात, त्यापेक्षा यत्किंचितही समानतेत उणे नाहीत; वैदिक ऋषी हा त्यांचा समान अभिमानविषय आहे. पाणिनी नि पतंजली हे त्यांचे व्याकरणकार, भवभूती नि कालिदास हे त्यांचे कवी, श्रीराम नि श्रीकृष्ण शिवाजी नि प्रताप, गुरू गोविंद नि बंदा या त्यांच्या वीरविभूती ही सर्व त्यांची सामाइक स्फूर्तिस्थाने आहेत. बुद्ध नि महावीर, कणाद नि शंकराचार्य हे त्यांचे प्रासादिक पुरुष नि तत्ववेत्ते समानतेने सन्मानिले

जातात; संस्कृत ह्या त्यांच्या प्राचीन नि पवित्र भाषेप्रमाणेच त्यांच्या लिपीही एकाच मूळानुसार वळविलेल्या आहेत; नि ती त्यांची नागरी लिपी गतकालातील कित्येक शतकांपासून त्यांच्या पवित्र लिखिताचे समान साधन, होऊन राहिलेली आहे; त्यांचा प्राचीन नि अर्वाचीन इतिहासही एकच आहे. त्यांचे मित्र नि त्यांचे शत्रूही एकच आहेत. त्यांनी एकाच आपत्तीशी टकरी दिलेल्या आहेत नि एकत्रच विजयही मिळविलेले आहेत; राष्ट्रीय वैभवातही एक नि राष्ट्रीय उत्पातांतही एकच. राष्ट्रीय निराशांतही एक नि राष्ट्रीय आशा-आकांक्षातही एकच. अनिश्चित दीर्घातिदीर्घ कालावधीपर्यंत समाज जीवन (पद्धती) नि सामाजिक जन्मभूमी त्यांनी हिंदूंना जोडून एकात्म एकजीव बनविले आहे. पण या सर्वांतही महत्वाची गोष्ट ही की, सामाइक पितृभू नि समाईक पुण्यभू या प्रियतम पवित्रतम नि सर्वात चिरकालिक अशा बंधांनी हिंदू हे एकमेकांशी बांधले गेलेले आहेत आणि ते दोन्हीही बंध एका नि एकाच देशावरून म्हणजेच आपला भारतवर्ष! -आपला हा हिंदुस्थान म्हणूनच ओळखले जातात म्हणून, हिंदूंचे राष्ट्रीय ऐक्य नि एकजिनसीपणा निःसंशय द्विगुणीत होतात.

निग्रो नि जर्मन नि अँग्लो-सॅक्सन, त्यांच्या एकमेकांशी सतत झगडणाऱ्या, जमावांनी वसलेली नि अवघ्या चारपाच शतकांच्या पलिकडे समान असा भूतकाल नसलेली अमेरिकेतील संयुक्त संस्थाने जर समवायाने एक राष्ट्र म्हणून संबोधिली जाऊ शकतात. तर हिंदू हे त्यांच्या उत्कृष्ट गुणांमुळेच राष्ट्र म्हणून संबोधिण्यास पात्र ठरतात.

खरोखरच! एक लोकसमाज ह्या दृष्टीने हिंदू हे त्यांच्या आपापसातील भेदांपेक्षाही जगातील दुसऱ्या कोणत्याही लोकसमाजापासून अत्यंत ठळकपणे भिन्न आहेत. एक सामाइक देश, जाती, धर्म आणि भाषा यापैकी ज्या ज्या कसोट्यांनी कोणताही लोकसमाज राष्ट्र बनण्याला पात्र ठरतो, त्या सर्व कसोट्या, हिंदूंना राष्ट्र म्हणवून घेण्याचा, अधिकार, कोणापेक्षाही निश्चितच अधिक प्रभावपूर्ण प्रत्ययी आहे आणि तशांत हिंदूंची आपापसातील फाटाफूट करणारे आजवरचे भेदभावसुद्धा राष्ट्रीय जाणिवेची पुनर्जागृती नि आजकालच्या संघटनांच्या नि सामाजिक सुधारणेच्या चळवळी यांच्या योगाने झपाट्याने मावळतच चालले आहेत.

अतएव ज्या 'हिंदू महासभे'ने स्वतःची प्रचलित घटनेत सूसुत्रपणे अचूक विधान करून ''हिंदू राष्ट्राची प्रगती नि वैभवोत्कर्ष साधण्याकरिता हिंदू जाती, हिंदू संस्कृती नि हिंदू सभ्यता ह्यांचा योगक्षेम चालविणे नि ह्यांचे संरक्षण नि संवर्धन करणे हे नेमून दिलेले कार्य जिने आपल्यापुढे ठेवले आहे ती ही 'हिंदू महासभा' ही अखिल हिंदुराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारी अशी एक सर्वोत्कृष्ट इंग्रगण्य राष्ट्रीय संस्थाच आहे.

## हिंदू महासभेचे विशिष्टमहत्कार्य, कोते,
## हिंदीविरोधी नि संकुचित ध्येयाचे आहे का?

सद्धेतु असणाऱ्या पण विचारशीलता नसणाऱ्या वर्गातले आमचे काही हिंदी देशभक्त 'हिंदू महासभा' ही हिंदुजगाचे प्रतिनिधित्व संपादिते नि त्याच्या न्याय्य अधिकाराच्या रक्षणार्थ झटते. याच कारणास्तव तिला जातिनिष्ठ आकुंचित नि हिंदी-विरोधी, म्हणून तुच्छ लेखतात. पण त्याच वेळी ते ही गोष्ट विसरतात की 'जातिनिष्ठ' नि 'क्षेत्रनिष्ठ' या केवळ सापेक्ष संज्ञा असून त्यांच्यात 'निषेध' किंवा 'शाप'पर असा कोणताच अर्थ, स्वतः गर्भित नाही. जे वेळी अवेळी, हिंदी राष्ट्रीयत्वा'च्या नावाने आणाभाका करीत असतात, ते स्वतःसुद्धा ह्याच क्षेत्रनिष्ठेच्या आरोपाला पात्र नाहीत काय? 'हिंदू महासभा' जर केवळ हिंदुराष्ट्राचीच प्रतिनिधी असेल, तर तेसुद्धा आपण केवळ हिंदी राष्ट्राचेच प्रतिनिधी असल्याचे सांगत असतात.

पण 'मानव राज्या'चा विचार करता, हिंदी राष्ट्र' हा संकेत सुद्धा एक क्षेत्रनिष्ठ संकेतच ठरत नाही काय? खरे बोलावयाचे तर पृथ्वी हीच आपली मातृभूमी नि मानवजाती हेच आपले राष्ट्र होय. छेः! वेदान्ती तर ह्याच्याही फार पुढे जातो आणि ''हे विश्व हाच आपला देश नि ताऱ्यांपासून दगडांपर्यंतचे सर्व दृश्यजात हा आपलाच स्वतः- 'वास' ।।'' असेच आमचे तुकोबा म्हणतात. मग इतर मानवजातीपासून आपल्याला तोडणारी हिमालयाची मर्यादा घालून घ्याच का? आपल्याला 'हिंदी' म्हणून एक निराळे राष्ट्र मानाच का? आणि जे सर्वथा आपले मानव बंधूच आहेत त्या प्रत्येक इतर देशीयांशी नि विशेषतः इंग्रज लोकांशी संघर्ष कराच का? मग विशालतर असा राजकीय संघ असलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या हितसंबंधाना हिंदी हितसंबंधाची आहुतिच का न द्या? पण ह्यातील खरी गोष्टच अशी आहे; की कोणताही देशाभिमान हाच मुळात उण्या-अधिक प्रमाणात क्षेत्रनिष्ठ नि जातिनिष्ठ असून तोच भयंकर युद्धांनाही उत्तरदायी असल्याचे सबंध मानवी इतिहासावरून प्रत्ययास येते. अतएव जे हिंदी देशभक्त एखाद्या वैश्विक राज्याची कोणती चळवळ चालू करण्याचे नि तिला मिळण्याचे सोडून त्याच्या आतच थबकतात; नि एखाद्या 'हिंदी' चळवळीलाच मिळून 'हिंदू संघटना' ची मात्र आकुंचित नि जातिनिष्ठ नि क्षेत्रनिष्ठ, म्हणून टवाळी करण्याचे चालूच ठेवतात ते केवळ स्वतःचीच टवाळी करण्यात नेमके यशस्वी ठरतात!

परंतु हिंदी देशाभिमानाच्या समर्थनार्थ जर असे सांगितले जात असेल किंवा सांगितले जात असते की हिंदुस्थान देशात वसति करून असलेले लोक हे एक पूर्वपीठिका एक भाषा, एक संस्कृति एक इतिहास इत्यादी बंधांनी बांधलेले असल्यामुळे हिंदुस्थाना-बाहेरील दुसऱ्या कोणत्याही लोकांपेक्षा अधिक जवळचे वा आप्त आहेत आणि त्याकरिताच दुसऱ्या अहिंदी राष्ट्रांच्या वर्चस्वापासून नि अतिक्रमणापासून आमच्या राष्ट्राचे रक्षण करणे आम्हा हिंदी लोकांना आमचे पहिले कर्तव्य वाटते तर तेच कारण हिंदू संघटनाच्या चळवळीच्या समर्थनाकरिताही तंतोतंत लागू पडतेच.

### राष्ट्रीय, जातीय किंवा संकुचित चळवळी मानवतेला केव्हा हानिकारक असतात?

नुसती एका विभागापुरतीच आहे; एवढ्याच कारणाकरिता काही कोणतीही चळवळ, निषिद्ध ठरत नसते; जोपर्यंत ती चळवळ विशिष्ट राष्ट्राच्या वा लोकांच्या वा जातीच्या न्याय्य नि मूलभूत अधिकारांचे दुसऱ्या लोकांच्या नि दुसऱ्या मानवी संघांच्या बलात्कारी नि उद्दाम अतिक्रमणापासून रक्षण करण्याकरिताच झटत असते. आणि दुसऱ्यांच्या समान नि न्याय्य अधिकाराचे नि स्वातंत्र्याचे उल्लंघन करीत नाही तोपर्यंत ते राष्ट्र किंवा ती जाती हा एकंदरीतच लहानसा संघ आहे; एवढ्याच निव्वळ कारणाकरिता त्याला निषेधिता वा तुच्छ लेखता येत नाही. जेव्हा एखादे राष्ट्र वा जाति दुसऱ्या बंधुराष्ट्रांचे वा बंधुजातीचे अधिकार तुडविते आणि मानवजातीचे अधिक मोठाले गट नि संघ बनविण्यांच्या मार्गात उद्दाम आगळिकीने बाध आणते- तेव्हांच त्यांचा राष्ट्रवाद किंवा जातीवाद मानवतेच्या दृष्टीने धिक्कारार्ह ठरतो. राष्ट्रवाद किंवा जातीवाद समर्थनीय कोणता नि असमर्थनीय कोणता हे ठरविण्याची हीच कसोटी आहे. हिंदू संघटनाची चळवळ राष्ट्रनिष्ठ वा जातिनिष्ठ वा क्षेत्रनिष्ठ तुमच्या इच्छेनुसार कशीही म्हणा; ह्या खऱ्या कसोटीवर पारखली असता ती हिंदी देशाभिमानाइतकीच समर्थनीय ठरते.

## हिंदु महासभा तिच्या विचार प्रणालीने पूर्णपणे राष्ट्रीयच आहे

कारण हिंदू महासभेचे ध्येय, उद्दिष्ट तरी काय आहे? हिंदुजगाची राष्ट्रीय प्रतिनिधिभूत संस्था ह्या नात्याने हिंदू लोकांचे सर्वांगीण पुनरुज्जीवन किंवा पुनर्घटना करणे; हेच तिचे साध्य आहे. परंतु हिंदुजगाचे ते सर्वांगीण पुनःरुज्जीवन घडवून आणावयाला हिंदुस्थानच्या निर्भेळ राजकीय स्वातंत्र्याची अपरिहार्य,  आवश्यकता आहे. आम्हा हिंदूंचे भाग्य नि भवितव्य ह्या हिंदुस्थान देशाशी, आमच्या दुसऱ्या कोणत्याही अहिंदू वर्गातील देशबांधवांपेक्षा अधिक अविमोच्य रीतीने निगडित झालेली आहेत. सर्व दृष्टीनी विचार करता ज्याच्या वर स्वतंत्र हिंदी राज्याची उभारणी करता येणे शक्य आहे, तो पायाचा खडक केवळ हिंदू हेच आहेत पुढे काही शतकानी काय व्हायचे असेल ते होवो. आज तरी हिंदुस्थानातील लोकांच्या मनावर धर्माचा प्रबळ पगडा वर्तत आहे आणि विशेषतः मुसलमानांच्या संबंधात तर धर्मविषयक जिव्हाळा अगदी नाही तर वारंवार माथेफिरूपणाच्याच मर्यादेला पोहचतो ही धडधडीत असणारी वस्तुस्थिती विचाराआड करून चालावयाचेच नाही. मातृभूमी ह्या नात्याने हिंदुस्थानविषयी मुसलमानांना वाटणारे प्रेम, हे हिंदुस्थानाबाहेर असणाऱ्या त्यांच्या पुण्यभूमीविषयी त्यांना वाटत असलेल्या प्रेमाच्या केवळ एका बटीकीसारखेच आहे. मुसलमानांची तोंडे सर्वदा मक्का आणि मदिनेकडे असतात. परंतु, हिंदुस्थान ही हिंदूंची मात्र पुण्यभूइतकीच पितृभूही असल्यामुळे त्यांच्याठायी हिदुस्थानविषयी वसणारे प्रेम, हे अखंडित नि अनिर्बंध असेच आहे. हिंदी लोकसंख्येत त्यांची फार मोठी बहुसंख्या आहे. इतकेच नव्हे तर तेच सर्वथा देशकार्याचे खरे खरे नि फार काळापासूनच विश्वसनीय असे कैवारी वीर

आहेत. कोणताही एखादा मुसलमान घेतला तर त्याच्या ठायी बहिर्देशीय राज्यनिष्ठाच वारंवार वागत असलेली आढळून येते. राष्ट्र ह्या नात्याने हिंदुस्थानशी संबंध असणाऱ्या गोष्टीपेक्षाही पॅलेस्टाईनमधील घडामोडींनी तो अधिक विचलित होतो. हिंदुस्थानातील आपल्या शेजाऱ्यांच्या नि देशबांधवांच्या कल्याणा-पेक्षाही अरबांच्या कल्याणाविषयींच्या चिंतेत नि चिंतनानेच तो अधिक त्रस्त होतो! ह्या भूमीत मुसलमानी राज्यसत्ता जर तेणेकरून प्रस्थापित होण्याची शक्यताच असेल तर सहस्रो मुसलमान हिंदुस्थानावर परकीय स्वारी आणण्याच्या उद्देशाने तुर्कस्थानातील खिलाफतवाले नि अफगाण ह्यांच्याशी गुप्त कट रचीत असलेले आढळणे; अगदी शक्य आहे. परंतु तोच कोणताही हिंदू मात्र हिंदुस्थान हेच सर्वतोपरी आपले राष्ट्रीय अस्तित्व मानतो. ह्या देशावरील इंग्लंडचे राजकीय अधिराज्य झुगारून देण्याकरिता चाललेल्या संघर्षात हिंदूंचेच जे प्रामुख्य आहे, त्याचे हेच कारण होय. हिंदुस्थानच्या बंधमोचनाच्या लढ्यात जे जे फासावर गेले; ज्या शेकडोंनी अंदमानातील काळ्यापाण्याला तोंड दिले आणि ज्या सहत्रांनी कारावास पत्करिला ते सारे हिंदूच होते. प्रत्यक्ष 'हिंदी राष्ट्रीय सभे'चा उगमही हिंदू मेंदूतूनच झालेला आहे; तिची वाढही हिंदूंच्याच आहुतीनी झालेली आहे. आणि तिची प्रस्तुतची प्रतिष्ठासुद्धा मुख्यत्वेकरून हिंदूंच्याच सायासांनी प्राप्त झालेली आहे. कोणताही खराखुरा हिंदू देशभक्त हा केव्हाही हिंदी देशभक्तही असल्यावाचून असूच शकणार नाही. ह्या अर्थाने पाहिले असता हिंदू राष्ट्राचे दृढीकरण नि स्वतंत्रता ही केवळ समग्र, हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याचेच दुसरे नाव किंवा पर्यायशब्द ठरतात.

कारण आपली पितृभू नि पुण्यभू जे हिंदुस्थान त्याला स्वराज्य नि स्वातंत्र्य प्राप्त केल्यावाचून हिंदुजगाचे पुनरुज्जीवन घडवून आणणे आणि हिंदू राष्ट्राला जगातील इतर राष्ट्रांमध्ये सन्मानाचे नि समान नात्याचे स्थान साध्य करून घेणे ह्या गोष्टी शक्यच नाहीत; हे हिंदू संघटना पुरेपूर ओळखून आहेत.

पण हिंदुस्थानचे अनवलम्बन (Independence) हे 'स्वराज्य' किंवा 'स्वातंत्र्य' म्हणजे तरी काय?

साधारण बोलण्यातून 'स्वराज्य' ह्या शब्दाचा अर्थ आपल्या देशाची आपल्या भूमीची राजकीय मुक्तता. 'हिंदुस्थान' ह्या नावाने संबोधिल्या जाणाऱ्या एका भौगोलिक परिणामाचे स्वातंत्र्य असा समजण्यात येत असतो. परंतु ह्या वाक्यांचे पूर्ण पृथक्करण करून त्यांचा योग्य अर्थ समजून घेण्याचा समय, आता प्राप्त झाला आहे. कोणताही देश किंवा भौगोलिक परिमाण हे काही स्वयमेव राष्ट्र बनत नसते. आपला देश हा आपल्या जातीचे, आपल्या लोकांचे, आपल्या प्रियतम नि जवळच्या अशा आप्तस्वकीयांचे निवासस्थान असतो; म्हणूनच तो आपल्यास प्रिय असतो; आणि त्याच दृष्टीने केवळ अलंकारिक भाषेत त्याचा आपण, 'आपले राष्ट्रीय अस्तित्व' ह्या शब्दांनी निर्देश करीत असतो. अर्थात हिंदुस्थानचे स्वातंत्र्य, ह्याचा अर्थ, आमच्या लोकांचे, आमच्या जातीचे, आमच्या राष्ट्राचे, स्वातंत्र्य असाच असतो. अर्थातच 'हिंदी स्वराज्य' किंवा

‘हिंदी स्वातंत्र्य‘  याचा अर्थ हिंदू राष्ट्रांच्या संबंधापुरता तरी हिंदूंचे राजकीय स्वातंत्र्य--- हिंदूंना त्यांच्या पूर्ण उत्कर्षाला नि विकासाला समर्थ करील अशी मुक्तता हाच होतो.

नुसते भौगोलिक दृष्ट्याच बोलावयाचे तर एखाद्या अल्लाउद्दीन खिलजीचे किंवा औरंगजेबाचे राज्य चालू असतेवेळी ही दुसऱ्या कोणत्याही अहिंदु सत्तेपासून भूमी नि राज्य ह्या नात्यानी हिंदुस्थान पूर्णपणे स्वतंत्रच होते. परंतु हिंदुस्थानचे त्या प्रकारचे स्वातंत्र्य हे हिंदू राष्ट्राला खरे-खुरे मृत्यूचेच आज्ञापत्र ठरले. संग आणि प्रताप, गुरू गोविंदसिंह नि वीर बंदा, शिवाजी नि बाजीराव हे जे आपल्या मातृभूमीत सर्वत्र लढले नि पडले नि अंती जयही पावून मराठ्यांच्या नि रजपूतांच्या नि शीखांच्या नि गुरख्यांच्या सत्तेखाली हिंदू साम्राज्याची प्रस्थापना करते झाले; आणि अहिंदू अतिक्रमणाच्या मुठीतून आपले हिंदुजगत् रक्षिते झाले; ते ह्या कारणाने, होत. ह्यावरून हिंदुस्थानचे निव्वळ भौगोलिक स्वातंत्र्य किंवा स्वराज्य म्हणजे काही हिंदू राष्ट्राचे स्वातंत्र्य नव्हे इतकेच नव्हे, तर उलट केव्हा केव्हा त्यांच्या जातीला ते दारूण शापच ठरले असेच स्पष्ट सिद्ध होत नाही काय?

हिंदुस्थान हे हिंदुजातीचे आरंभापासून आजपर्यंतचे निवासस्थान आहे. ती आपल्या धर्मप्रवर्तक ऋषीमुनींची नि वीरपुरुषांची देवांची नि संतमहंतांची जन्मभूमी आहे. ह्याच कारणाने ती आम्हाला प्रिय आहे. नाहीतर, केवळ भूमीस भूमी एवढ्यापुरताच, विचार करावयाचा तर पृथ्वीच्या पाठीवर सोन्या-रुप्याने इतकेच संपन्न असलेले पुष्कळ देश असतील. नुसते नदीला नदी इतकेच पाहावयाचे तर मिसिसिपी हीही जवळजवळ गंगेइतकीच निर्मळ आहे. तिचे पाणी काही एकंदरीने कडवट नाहीच. हिंदुस्थानातील दगड, झाडे नि हिरवळी ही इतर देशांतल्या त्या त्या जातीच्या दगड, झाडे नि हिरवळी इतकीच उत्कृष्ट वा निकृष्ट ठरतील.

हिंदुस्थान जी आमची पितृभू नि पुण्यभू आहे; ती काही ती पृथ्वीतल्या दुसऱ्या कोणत्या भूमीहून पूर्णपणे विसदृश भूमी आहे. म्हणून नव्हे तर तिचा आमच्या इतिहासाशी जिव्हाळ्याचा संबंध आहे आणि ती आमच्या वाड-वडिलांचे पिढ्यानपिढ्याचे घर आहे--- की, ज्यात आमच्या मातांनी पिढीपिढीला आपल्या हृदयांशी धरून आम्हाला पहिले स्तन्य पाजले; नि आमच्या पित्यानी आपल्या मांड्यांवर घेऊन आम्हांला थोपटले-ह्या कारणामुळेच होय.

जेथे आपली प्रिय माणसे राहतात ती झोपडी इतर ठिकाणच्या एखाद्या राजवाड्यापेक्षाही आपल्या दृष्टीला अधिक आवडती वाटते. पण तीच तेथली प्रिय मुखकमले, तेथून दिसेनाशी होऊ द्यात नि तेथून दुसरीकडे कोठे राहावयास जाऊ द्यात की पूर्वीची तीच झोपडी लागलीच एक उजाड खोपटे भासू लागते. आपण तत्काळ तिचा त्याग  करतो नि आपल्या प्रिय माणसांचा माग काढीत त्यांच्या नवीन निवासस्थानाकडे चालू लागतो. हीच गोष्ट राष्ट्रांची. ज्यू किंवा पारशी यांचेच उदाहरण पहा. जेव्हा अरबांनी त्यांच्यावर चाल केली आणि आपली भूमी किंवा आपली वांशिक नि सांस्कृतिक आत्मीयता यातला कशाचा त्याग पत्करावयाचा एवढेच ठरविणे त्यांच्या हाती उरले तेव्हा आपल्या धार्मिक नि वांशिक आत्मीयतेपेक्षा भूमीचाच त्याग करून ते आपला

धर्मग्रंथ नि आपली संस्कृति यांसह एखाद्या अधिक हितकर, निवासस्थानाच्या शोधार्थ बाहेर निघून गेले. निव्वळ एका पेजेच्या खापराकरिता नुसत्या निर्जीव मातीच्या एका तुकड्याकरिता त्यांनी आपल्या वांशिक आत्म्याची देवाण करण्याचे साफ नाकारले!

एवढेच निव्वळ भूगोलावरील हिंदुस्थान नावाच्या एका मातीच्या तुकड्याचे स्वातंत्र्य हा काही स्वराज्याचा खरा अर्थ नव्हे; तर हिंदूंना त्यांचे हिंदुत्व त्यांची धार्मिक नि वांशिक नि सांस्कृतिक एकात्मता अबाधित राहण्याची शाश्वती जर त्यात असेल तर तेच हिंदुस्थानचे स्वातंत्र्य काय ते मोलाचे वाटू शकेल. आमच्या 'स्वत्वा'चे, आमच्या साक्षात हिंदुत्वा'चे मोल देऊनच जे मिळणे शक्य असेल, त्या तसल्या 'स्वराज्या'-करिता संघर्षाला नि मरण्याला आम्ही सिद्ध नाही!

## संयुक्त हिंदी राज्य आणि अल्पसंख्याकांची सहकारिता.

ह्या योग्य नि खऱ्या अर्थाचे स्वराज्य जर अभिप्रेत असेल तर हिंदी स्वातंत्र्याकरिता चाललेल्या चळवळीत नि संघर्षात आणि एक संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या कार्यात हिंदू सर्वांच्या पुढे आघाडीवरच रहात आले आहेत. संयुक्त हिंदी राज्याचे स्वप्न जर पहिल्याने कोणाला पडले असेल तर ते त्यांनाच होय. आपल्या त्यागांनी नि संघर्षांनी ते राज्य कोणी आजच्या व्यवहार्य राजकारणाच्या कक्षेत आणले असेल, तर तेही पुन्हा हिंदूनीच होय. आपल्या बलाबलाचा योग्य विचार करून हिंदू हे एक समान नि संयुक्त हिंदी राज्य स्थापण्याच्या हेतूने चाललेल्या ह्या सार्वलौकिक संघर्षात आपल्या अहिंदु वर्गातील देशबांधवांची सहकारिता मिळविण्याला केव्हाही अनुकूलच होते नि आहेत. हिंदुस्थानात आपली प्रचंड बहुसंख्या आहे तर अहिंदु वर्ग नि विशेषतः मुसलमान हे राष्ट्रीय संघर्ष चालू असताना कोठेच आढळत नाहीत नि त्या संघर्षाची फळे तोडण्याच्या वेळी मात्र नेमके आघाडीस असलेले आढळतात आणि आपण एकटेच आजवर सर्व लढा लढत नि त्यातले आघात, सोशीत आलो आहोत. या सर्व गोष्टीची जाणीव असूनसुद्धा ते एकीकडे ठेवून हिंदू हे सर्वांचे संयुक्त हिंदी राष्ट्र बनविण्यास समुत्सुक आहेत आणि आपले कोणतेही राखून ठेविलेले असे स्वतंत्र हक्क वा सत्ता वा अधिकार हिंदुस्थानातील अहिंदु वर्गावर मुळीच लादू इच्छित नाहीत.

पण ते हिंदी राज्य मात्र, निर्भेळ हिंदीच असू द्या. त्या राज्याने मताधिकार नोकऱ्या, अधिकाराची स्थाने, कर, यांच्या संबंधात धर्माच्या नि जातीच्या तत्वांवर कसल्याही मत्सरोत्तेजक भेदाभेदांना मुळीच थारा देऊ नये. कोणताही मनुष्य हिंदू आहे की मुसलमान आहे की ख्रिस्ती आहे की ज्यू आहे; इकडे लक्षच दिले जाऊ नये. त्या हिंदी राज्यातील सर्व नागरिक सर्वसामान्य लोकसंख्येतील त्यांची धार्मिक किंवा जातीय शेकडेवारी विचारात घेतली न जाता

त्यांच्या त्यांच्या वैयक्तिक गुणावगुणानुसार वागविले जाऊ द्यात, इंग्लंड किंवा अमेरिकेतील संयुक्त संस्थाने यासारख्या जगातील इतर प्रत्येक राष्ट्रात असल्याप्रमाणे देशातील प्रचंड बहुसंख्य लोकांना समजत असेल तीच भाषा, नि तीच लिपि त्या हिंदी राज्याची राष्ट्रीय भाषा नि राष्ट्रीय लिपी होऊ द्या. आणि कोणत्याही लादलेल्या नि वेड्या वाकड्या संस्काराने ती भाषा नि ती लिपी भ्रष्ट करण्याला कोणत्याही धार्मिक कारणाला मोकळीक न मिळू द्या. कोणतीही जाती किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारात न घेता एक मनुष्य एक मत असा सर्व सामान्य नियम होऊ द्या. अशा स्वरूपाचे हिंदी राज्य जर दृष्टीपुढे धरावयाचे असेल, तर हिंदू संघटनावादी स्वतः हिंदू-संघटनाच्याच हितार्थ त्या राज्याला अंतःकरणपूर्वक पहिल्याने आपली निष्ठा अर्पितील. मी स्वतः आणि मजप्रमाणेच सहस्रो 'हिंदु महासभा'वाले यांनी आपल्या राजकीय चरिताच्या प्रारंभापासून अशा हिंदी राज्याचा आदर्श आमचे राजकीय साध्य म्हणून सतत दृष्टीपुढे ठेविलेला आहे. आणि आमच्या जीविताच्या अंतापर्यंत त्याच्या परिपूर्तीकरताच, संघर्ष करणे आम्ही चालूच ठेवणार. हिंदी राज्यासंबंधीची ह्याहून अधिक राष्ट्रीय अशी कोणती कल्पना असू शकेल काय?

सत्यप्रतिपादनाच्या कर्तव्यास अनुसरून मी असे स्वच्छपणे घोषित करतो की, हिंदी राज्यासंबंधीचे 'हिंदुमहासभे'चे वैशिष्टपूर्ण महत्कार्य नि धोरण ही प्रत्यक्ष हिंदी 'राष्ट्रीय सभे'च्या सद्यःकालीन धोरणाहून अधिक राष्ट्रीय आहेत!

आपण हिंदू आहो; किंवा हिंदी लोकसंख्येमध्ये इतर अहिंदू वर्गातील देशबांधवांपेक्षा केवढी तरी आपली बहुसंख्या आहे. ह्या विशेष कारणांच्या बळावर हिंदी नागरिक ह्या नात्याने प्राप्तव्य असेल त्याहून काहीही अधिक हिंदू मागत नाहीत. आपण हिंदू नसून मुसलमान आहो; हा विशेष गुण, आपल्या ठिकाणी आहे; असले धर्मपिसाटपणाचे कारण पुढे करून त्याकरिता विशेष लाभ किंवा संरक्षण किंवा मताधिक्य न मागता ह्या खऱ्या- खुऱ्या राष्ट्रीय हिंदी राज्याला मिळण्यास मुसलमान सिद्ध आहेत काय?

## मुसलमानांचे राष्ट्रद्रोही संकल्प

हिंदूंच्या सद्भाग्याने म्हणा, मि. जिना नि इतर 'मुस्लिम लीग'वाले यांनी ह्या वर्षी 'मुस्लीम लीग'च्या लखनौ येथील बैठकीत जाणून बुजूनच आपले खरे अंतःस्थ हेतू ह्यापूर्वीपेक्षा अधिक अधिकृतरित्या अधिक उघडपणे नि अधिक धिटाईने बोलून दाखविले आहेत नि त्याकरिता मी त्यांचे आभार मानतो. संगतीत वागताना एखाद्या, संशयास्पद मित्रापेक्षा उघड शत्रू अधिक पुरवतो. लखनौस झालेले त्यांचे ठराव वस्तुतः आम्हांला काही नव्या वार्तेसारखे वाटणारे नाहीत. पण मुसलमानांची अराष्ट्रीय प्रवृत्ति नि त्यांच्या 'इस्लामच्या जागतिक संघटने (Pan Islam)`च्या आकांक्षा सिद्ध करण्याचा भार, आतापर्यंत उणा-अधिक हिंदूंवरच जो होता; त्याचे आयतेच काम झाले. आता मुसलमानांच्या त्या सर्व हिंदुविरोधी हिंदी-विरोधी नि बहिर्देशीय कारवाया, स्पष्ट करून सांगण्याकरिता नुसते, लखनौच्या बैठकीत करण्यात आलेल्या लीगच्या अधिकृत भाषणांकडे नि ठरावांकडे बोट दाखविले की झाले. त्यापेक्षा आपल्याला अधिक काहीच करावयाला नको. त्यांना निर्भेळ उर्दू हीच हिंदी राज्याच्या, राष्ट्रभाषेच्या पदवीला चढविली जावयाला पाहिजे आहे. दोन कोटीहून अधिक मुसलमानांकडून स्वतःही मातृभाषा म्हणून ती बोलली जात नाही; मुसलमान धरूनसुद्धा हिंदुस्थानातील सुमारे वीस कोटी लोकांना ती समजत नाही; आणि सुमारे दहा कोटी लोकांना सुलभतेने समजत असलेल्या हिंदीपेक्षा वाङ्मयीन गुणसुद्धा तिच्यात कोणतेच अधिक नाहीत. इत्यादींपैकी कोणतीच गोष्ट ते विचारात घेऊ इच्छित नाहीत! उर्दू ही जिच्यावर पोसली जाते ती प्रत्यक्ष अरबी भाषा तिकडे साक्षात खलिफांच्याच भूमीत केमालने नि तुर्कांनी बहिष्कृत ठरविली असताना इकडे मात्र सुमारे पंचवीस कोटी हिंदूंनी उर्दू शिकावी नि आपली राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारावी अशी मुसलमान अपेक्षा धरीत आहेत! राष्ट्रीय लिपीच्या संबंधातही उर्दू लिपिच स्वीकारण्याविषयी मुसलमानांचा आग्रह आहे आणि काही झाले तरी नागरी लिपीशी मात्र त्यांना कर्तव्य नाही! असे का? आजच्या गरजेला लागू न पडणारी म्हणून केमालने प्रत्यक्ष अरबी लिपीचा त्याग केलेला असो; नागरी अधिक सशास्त्र नि अधिक मुद्रणक्षम असो; ती शिकावयाला अधिक सोपी असो; हिंदुस्थानातील सुमारे पंचवीस कोटी लोकांत ती आधीच प्रचलित असो किंवा त्यांना आधीच ती समजत असो; तरीसुद्धा मुसलमान आपली सांस्कृतिक मत्ता म्हणून मानतात एवढ्याच एका गुणाकरिता उर्दू लिपी हीच राष्ट्रलिपी नि उर्दू भाषा हीच राष्ट्र-भाषा झाली पाहिजे! आणि म्हणून त्यांना ते स्थान देण्याकरिता हिंदुस्थानातील हिंदू नि अन्य मुसलमानेतर वर्ग यांच्या संस्कृति खड्ड्यातच गेल्या पाहिजेत!

मुसलमान 'वंदे मातरम्' गीतही सहन करणार नाहीत. बिचारे ऐक्याचे आशाळभूत हिंदू! त्यांनी लागलीच ते गीत तोडून आखूड करण्याची सुद्धा त्वरा केली! पण आज्ञेप्रमाणे काटाकाट करून ठेवलेला त्याचा भागही मुसलमान सहन करतील असे नाही. तुम्ही ते सबंध गीत गाळून टाका; की लागलीच नुसते 'वंदे मातरम्', हे शब्दसुद्धा मुसलमान आपला मूर्तिमंत अपमान

असल्याची हाकाटी करताना तुम्हाला आढळतील! एखाद्या अत्युदार अशा रविंद्राकडूनही एखादे नवीन गीत रचून घ्या. पण तरीही मुसलमानांचा त्यांच्याशी काहीही संबंध असणार नाही. कारण किती झाले तरी रविंद्र हा हिंदू माणूस पडल्यामुळे कौमच्या ठिकाणी 'जाती' किंवा 'पाकिस्तान'च्या ठिकाणी 'भारत' वा 'हिंदुस्थान', असे काही संस्कृत शब्द उपयोजिण्याचा घृणास्पद अपराध तो केल्यावाचून राहणे शक्य नाही! एखाद्या अक्बालने किंवा जिनानेच, स्वतः निर्भेळ उर्दूत रचिलेले नि हिंदुस्थानला एक 'पाकिस्तान' मुस्लीम अधिराज्याला अर्पिलेली भूमी- म्हणून जयजयकार करणार असे एखादे राष्ट्रगीत सिद्ध झाल्यावाचून त्यांचे समाधान होणे शक्य नाही!

मुसलमानाच्या ह्या असंतोषाच्या मुळाशी असलेला खरा प्रश्न इकडचा एखादा शब्द किंवा तिकडचे एखादे गीत अशा प्रकारचा नाही हे, आमच्या ऐक्यबुभुक्षितांना पटणार तरी केव्हा? हिंदुस्थानच्या ऐक्यात नि वीरवृत्तीत जर त्यायोगे आमच्याकडून खरी खरी भर पडू शकती तर, आम्ही बारा गीते नि शंभर शब्दांचा आपण होऊन त्याग केला असता पण हा दिसतो तितका साधासुधा प्रश्न नाही हे आम्ही ओळखतो.

दोन विभिन्न संस्कृति नि वंश राष्ट्रे यांच्यातला हा लढा आहे; आणि या क्षुल्लक गोष्टी म्हणजे मुसलमानांच्या मनात खोल मुरलेल्या त्या रोगाची केवळ वरवरची नि ओझरती लक्षणे आहेत. त्यांना हिंदुजगत् नि हिंदुस्थानातील इतर मुसलमानेतर वर्ग यांच्या कपाळावर आत्मशरणागतीची नि मुस्लिम वर्चस्वाची तप्तमुद्राच ठोकावयाची आहे. पण आम्ही हिंदू केवळ हिंदुजगाच्या हितार्थ नव्हे तर हिंदी राष्ट्राच्या हितार्थसुद्धा ती गोष्ट यापुढे यत्किंचितही सहन करणार नाही.

पण आम्ही ती गोष्ट सहन केली नाही तर आमचे काय होईल ते नामदार फझलूल हक्कांनी लखनौलाच तेथल्या तेथे सांगून टाकिले! 'मुख्यमंत्र्याच्या गादीच्या उच्च उंचीवरून त्यांनी उघडपणे आश्वासन दिले आहे की, जर इतर हिंदूंनी इतर कोठे, 'मुस्लिम लीग'च्या आज्ञा प्रतिधिटाईने धाब्यावर बसविल्याचे आढळले तर आपण बंगाल्यातल्या हिंदूंना 'सतावू'! ('मै हिंदुओंको सताऊंगा') वास्तविक बंगालमधील मुख्यमंत्र्याची ती गादी म्हणजे बंगालमधील हिंदू देशभक्तांनीच आपल्या हौतात्म्याने नि त्यागाने इंग्रजांच्या हातातून संघर्ष करून घेतलेल्या सुधारणांचेच फल आहे. इतर ठिकाणच्या प्रमाणेच तेथील मुसलमानांनी हालअपेष्टात नि त्यागात काही विशेष भाग किंवा भार उचललेला नाही. पण सुधारणा येऊन प्राप्त होताच मुख्यमंत्र्याच्या गादीला मात्र कोण पात्र ठरू शकला नि ती बळकावू शकला तर, नामदार फजलूल हक्क! आणि जे सर्वात अधिक संघर्ष करते झाले नि ज्यांनी सर्वात अधिक हालअपेष्टा सहन केल्या नि खरोखरच एकुलत्या एकट्या मि. हक्कांची गादीही ज्यांच्या हालअपेष्टांचेच ऋण आहे, त्या बंगाल्यातल्या हिंदूनाच आता ते मि. हक्क सध्या त्रास देण्यापासून तो पूर्ण दमन करण्यापर्यंत ह्या शब्दाच्या सर्व अर्थ-छटांनिशी सतावू ('सताऊंगा') म्हणून धमकी घालीत आहेत! नामदार फझलूल हक्क त्यांना

मी असे निश्चितीने सांगू इच्छितो की बंगालमधील हिंदू फुटण्याला फार कठीण कवचीचे ठरतील. मि. हक्क तुमचे काम फार बिकट आहे. त्यांनी वेळोवेळी बलाढ्य ब्रिटिश साम्राज्याच्या डौलाने मिरवणाऱ्या लॉर्ड कर्झनसारख्या चढेल प्रांताधिकाऱ्यांनासुद्धा खाली उतरण्यास भाग पाडलेले आहे. पण जर फझलुल हक्कांनी बंगाली हिंदूंचा कधी छळवाद आरंभिलाच तर आम्ही हिंदूही महाराष्ट्रात नि इतरत्रही पुरते काठोकाठ नि हलवून भरलेले मापास माप ह्या न्यायाने त्यांच्या मुस्लिम दोस्तांना, सोबत्यांना तसेच वागवू शकू हे त्यांनी कदापि विसरू नये!

'जातीय निवाडा' (कम्युनल अवॉर्ड) नि 'संयुक्त राज्यघटना' (फेडरेशन) यांच्या संबंधाच्या मुसलमानांच्या प्रवृत्तीचा मला येथे निर्देश करण्याची आवश्यकता नाही. त्या संबंधातही हिंदूंची मानखण्डना करण्याचा त्यांचा विचार आहे. नि शायलॉकसारखा पौंडभर मांसाचा ते हट्ट धरीत आहेत! मी तुम्हांला आणखी याउपरही अतिरिक्त सांडलेल्या रक्तरंजित प्रतिमा तुमच्यापुढे ठेवून तुम्हांला आणखी रंजीस आणू इच्छित नाही. कारण हेलावणाऱ्या अंतःकरणांनी तुम्हांला ते चांगले माहीत आहे. काश्मीर, पंजाब, पेशावर, नि सिंध या प्रांताचा मिळून 'पाकिस्तान' नावाचा एक निराळा मुसलमानी देश बनविण्याच्या हेतूने मुसलमानी हिंदुस्थान नि हिंदू हिंदुस्थान असे आपल्या मातृभूमीच्या राज्य संस्थेचेच दोन तुकडे पाडण्याच्या मुसलमानांच्या मागणीसंबंधीच्या निलर्ज्ज नि धाष्ट्याच्र्या सूचनेवर 'मुस्लिम लीग'मध्ये जो वादविवाद झाला त्याचीच तुम्हाला आठवण करून दिली की पुरे आहे.

**हात आवरा, मुस्लिमांनो, हात आवरा!**

अशारीतीने हिंदूंना त्यांच्याच देशांत दासांच्या पदवीला आणून सोडण्याची जर तुम्ही आकांक्षा धरीत असाल तर येथे साम्राज्यसत्ता वहिवाटीत असतांच्या काळातही औरंगजेबांच्या अनेक वारसदारांस सुद्धा ते अचाट कृत्य करण्यात अपयश आले आणि तो बेत तडीस नेण्याच्या प्रयत्नात त्यांनी केवळ आपल्या स्वतःकरिता थडगी खणण्याचेच यश मिळविले हे चांगले स्मरणात असू द्या! अनेक औरंगजेब जे साध्य करताना अपेशी ठरले ते अनेक 'जिना' नि अनेक 'हक्क' निःसंशयच साध्य करू शकणार नाहीत!

## **खरी एकी तेव्हांच होईल, जेव्हा मुसलमानांना तिची आवश्यकता भासेल!**

हिंदूंच्या हे ध्यानात येऊ द्या की ह्या खोडसाळपणाचे खरे कारण दुसरे तिसरे कोणतेही नसून हिंदू मुस्लीम ऐक्यरूपी पिशाच्च दीपिकेच्या 'चकव्याच्या' (वुइलो-द-विस्प) मागे, लागण्याचा हिंदुनाच लागलेला सोस, हेच होय; हे हिंदूंनी लक्षात ठेवले पाहिजे. ज्या दिवशी ''आपण, मुसलमानांनी हिंदूंशी सहकार्य करण्याचा उपकार केल्यावाचून स्वराज्य मिळू शकणार नाही'', अशी मुसलमानांची समजूत करून दिली; त्याच दिवसापासून आपण सन्मान्य ऐक्य, अशक्य करून बसलो आहोत. जेव्हा कोणत्याही देशातील एकादी प्रचंड बहुसंख्या मुसलमानांच्या सारख्या विरोधी अल्पसंख्यांकापुढे, गुढघे टेकून विनवणीपूर्वक सहाय्याची याचना करू लागते नि त्यावाचून आपली बहुसंख्यांक जाती निश्चित मरणार असल्याविषयाची तिला ग्वाही देते; त्यावेळी जर त्या अल्पसंख्यांक जातीने आपले सहाय्य शक्य तितक्या अधिकात अधिक भारी मोलाने विकले नाही; त्या बहुसंख्यांक जातीचे ते ठरलेले नष्टचर्य, त्वरेने ओढवून आणले नाही नि त्या देशात आपले सार्वभौमत्व प्रस्थापित केले नाही; तर ते एक आश्चर्यच ठरेल. मुसलमान नेहमीच, हिंदूंच्या पुढे जे प्रतिपादन करतात; नि धमकावून सांगतात की, त्यांच्या राष्ट्रद्रोही नि धर्मवेडेपणाच्या पिसाट, मागण्या जागच्या जागी मान्य केल्या गेल्या नाहीत तर, ते हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्यात हिंदूंच्या बरोबर सामील होणार नाहीत. त्यांचा तो धमकीचा स्वर नित्याचा बंद करण्यासाठी म्हणून, हिंदूंनी त्यांना एकदाच आणि अंतिमतःच निक्षून सांगावे की, ''मित्र हो! ज्यांत सर्व नागरिकांना 'एक माणूस, एक मत'; ह्या तत्वान्वये, समानतेने, वागविले जाईल असे हिंदी राज्य निर्माण करण्यासाठीच काय ती, आम्हाला आपल्याशी एकी हवी होती, नि हवी आहेही! की जिच्या योगाने, त्या राज्यात जाती वा पंथ, वा वंश वा धर्म; यांचा विचार केला जाणार नाही. आम्ही हिंदू ह्या देशात यद्यपि, प्रचंड बहुसंख्येने आहोत; तथापि हिंदुजगतासाठी, म्हणून आम्ही कोणतेही विशेषाधिकार भागत नाही. इतकेच नव्हे तर जर आपापल्या घरातून आपापले पंथानुरूप वसणाऱ्या हिंदुस्थानातील इतर जातींच्या समान स्वातंत्र्याच्या अधिकारांचे उल्लंघन करणार नाही आणि हिंदूंची मानखण्डना करणार नाही किंवा त्यांच्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करणार नाही, असे वचन मुसलमान देतील तर, त्यांची भाषा, संस्कृति नि धर्म यांच्या विशेष संरक्षणासंबंधात, निश्चित विश्वास देण्यासही आम्ही अनुकूल आहोत. परंतु, अगदी अलिकडे, आक्रमक नि संरक्षक संधींनी परस्परांशी, बांधल्या गेलेल्या अरबस्थानापासून अफगाणिस्थाना-पर्यंतच्या, मुसलमान राष्ट्रांनी साखळी जोडून सर्व मुस्लिम जगताच्या (Pan Islam) चळवळीच्या चालू असलेल्या हिंदुस्थानविरोधी योजना आणि धार्मिक नि सांस्कृतिक द्वेषाने हिंदूंना चिरडण्याच्या वायव्य सीमोवरील टोळ्यांच्या क्रूर प्रवृति; आम्ही हिंदू पुरेपूर ओळखून असल्यामुळे आम्ही इतःपर केव्हाही तुमच्यावर विश्वास टाकून आणखी कोणते, कोरे

धनादेश तुम्हाला देणार नाही. इतर सर्व घटकांच्या ‘स्वत्वा‘ सवेच आमचे ‘स्वत्व‘ ही ज्यात सुरक्षित राहिल, ते स्वराज्य जिंकून घेण्याला आम्ही सन्नद्ध झालो आहोत.

केवळ एक धनी जाऊन दुसरा धनी यावा, म्हणून काही इंग्लंडशी झुंज खेळण्याला आम्ही उद्युक्त झालेलो नाही. तर आमच्या स्वतःच्या घराचे आम्ही स्वतःच धनी झालो पाहिजे. हाच आम्हा हिंदूंचा रोख आहे. आमच्या शरणागतीवर नि स्वतः हिंदुत्वाचेच मोल देऊन जे मिळू शकणार असेल ते तसले स्वराज्य आम्हा हिंदूंना आमच्या आत्महत्येसारखे आहे.

परकीय अधिराज्यातून जर हिंदुस्थान स्वतंत्र झाला नाही तर हिंदी मुसलमानांना स्वतः दास होण्यावाचून गत्यंतर नाही. जर त्यांना या गोष्टीची सत्यता पटेल, जर नि जेव्हा हिंदूंच्या सहाय्यावाचून नि सदिच्छेवाचून आपले चालणार नाही. हेही त्यांना कळून येईल तर, नि तेव्हा त्यांनांच त्या वेळी ऐक्याची मागणी करण्याला नि तेही हिंदूवर उपकार करण्याकरिता म्हणून नव्हे; तर, स्वतःच्याच उपकाराकरिता येऊ द्या. अशा पकारे जे हिंदू-मुस्लिम ऐक्य घडून येईल तेच खरे मोलाचे होय. मुस्लिमांचे पाय चाटून मागे लागून ऐक्य मिळविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे ते गमावणेच होय. हे या पकरणात हिंदूंना पुरेपूर मोल देऊन पटलेले आहे.

यापुढे हिंदू-मुस्लिम एक्यासंबंधीचे हिंदूंचे सूत्र हेच राहणार की, ‘‘याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून, विरोधाल तर तुमची भीती--- तमा न बाळगता हिंदू राष्ट्र आपले भवितव्य बनेल तसे घडवील!‘‘

## हिदुस्थानांतील निर्मुस्लिम अल्पसंख्यांक

हिंदुस्थानातील इतर अल्पसंख्यांकाच्या संबंधात हिंदी राष्ट्राच्या एकीकरणाला फारशी अडचण येऊ शकत नाही. इंग्रजी सत्तेच्या विरुद्ध पारसी हे हिंदूंच्या खांद्याला खांदा भिडवूनच सतत काम करीत आहेत. ते धर्मपिसाट किंवा माथेफिरू नाहीत. महनीय दादाभाई नौरोजींपासून तो प्रख्यात कुलीन क्रांतिकारक महिला, कामाबाईपर्यंत पारश्यांनी आपला हिंदी देशभक्तीचा वाटा उचललेला आहे. त्यांच्या वंशाचे खरे खरे तारणहार ठरलेल्या, हिंदू राष्ट्राविषयी केवळ सदिच्छेवाचून दुसरी कोणतीच वृत्ती त्यांनी कधी प्रकट केलेली नाही. सांस्कृतिक दृष्ट्याही ते आपले सर्वात निकटचे आप्तसंबंधी आहेत. हिंदी ख्रिस्त्यांच्या विषयीही थोड्या अल्प अंशाने तेच म्हणता येईल. जरी आजवर राष्ट्रीय लढ्यात त्यांनी फार थोडा भाग घेतलेला असला तरी आमच्या गळ्यात धोंड होतील असे तरी ते वागलेले नाहीत. ते थोडे कमी धर्मपिसे असूनही राजकीय तकर्बुद्धीला अधिक मान तुकविणारे आहेत. ज्यू हे तर संख्येने फारच अल्प आहेत. नि ते आमच्या राष्ट्रीय आकांक्षांच्या विरुद्धही नाहीत. आमचे हे सर्व अल्पसंख्यांक देशबांधव हिंदी राज्यामध्ये प्रामाणिक नि देशभक्त नागरिक म्हणूनच वागतील याविषयी निश्चिती आहे.

'हिंदूं'वर नि 'हिंदू महासभे'वर जातिनिष्ठतेचे जे आरोप करतात, त्यांनी ही गोष्ट, नीट विचारात घ्यावी की, हिंदूंनी या मुस्लिम नसलेल्या अल्पसंख्यांकाशी मित्रत्वभावनांच्या देवाणीची कधीही वाण केलेली आढळणार नाही किंवा आपल्या त्या देशबांधवांच्या न्याय्य प्राप्तव्याविषयी त्यांनी कधीही कुरकूर केली नाही.

आंग्ल- हिंदी (अँग्लो-इंडियन) लोकांच्या संबंधात हे स्पष्ट आहे की त्यांचा सध्याचा उद्दामपणा नि प्रचलित 'सुधारणा निर्बंधा' (रिफॉर्म अ‍ॅक्ट) न्वये मताधिकारांत त्यांना मिळालेला वारेमाप झुकता वाटा (Lion's Share) ह्या गोष्टी इंग्लंडचे वर्चस्व दूर होताच एका क्षणात नाहीशा होतील. त्यांची धड असणारी राजकीय उपजतबुद्धी लवकरच त्यांना इतर हिंदी नागरिकांच्या ओळीत आणील नाहीपेक्षा त्यांना सहज शुद्धीवर आणता येईल.

परंतु मुसलमानांचे प्रकरण मात्र अगदी निराळे आहे. मी हिंदूंना बजावून सांगतो की जर नि जेव्हा इंग्लंडची सत्ता निघून जाईल तर नि तेव्हाही मुसलमान हे आपल्या हिंदू राष्ट्राला नि समान हिंदी राष्ट्राच्या अस्तित्वाला मोठेच धोक्याचे ठरण्याचा संभव आहे. हिंदुस्थानात मुस्लिम राज्य स्थापण्याच्या धर्मवेड्या योजना मनात काळजीपूर्वक पोसण्याचे त्यांचे सबंध जातीचेच धोरण, अद्यापीही चालूच आहे. ह्या वस्तुस्थितीची आपण आंधळे दगड बनून उपेक्षा करता कामा नये. आपण सुसंवाद साधण्याकरिता झटू या, आपण उत्कट उत्तमाचीच आशा धरू या, पण त्याच वेळी आपण आपल्या सुरक्षेविषयी सावधही असू या!

## हिंदुस्थानात दोन विरोधक राष्ट्रे एकत्र रहात आहेत

यथार्थत्वाने, (As it is) हिंदुस्थानात दोन विरोधक राष्ट्रे एकत्र रहात आहेत. ते कित्येक बालिश राजकारणी, ''हिंदुस्थान हे पूर्वीच सुसंवादाने साधलेले राष्ट्र आहे किंवा तशी, नुसती इच्छा करताच, ते तसे होणारे आहे.'' असे मानण्यात भयंकर चूक करीत असतात. हे आमचे सद्धेतुप्रेरित पण अविचारी मित्र आपली स्वप्ने सत्यच समजून असतात. ह्याच कारणाने, जातीय गुंताड्यांनी ते गोंधळून जातात, आणि त्या गुंताड्यांचे कारण जातीय संघटनांच्या माथी मारतात. परंतु खरी गोष्ट अशी आहे की जातीय म्हणून म्हटले जाणारे प्रश्न हा हिंदू आणि मुसलमान यांच्यामधील सांस्कृतिक, धार्मिक नि राष्ट्रीय विरोधाचा शतकानुशतके चालत आलेला केवळ, वारसा आहे. योग्य काल येताच तुम्ही ते प्रश्न सोडवू शकाल; पण त्यांचे अस्तित्व मुळात नाकारून तुम्ही ते दडपून टाकू शकणार नाही. कोणत्याही खोलवर मुरलेल्या रोगाकडे दुलर्क्ष करण्यापेक्षा त्याचे निदान करून, अवश्य ती परिचर्या करणेच अधिक सुरक्षितपणाचे असते. जी असेल तशा त्या अप्रिय वस्तुस्थितीला आपण धैर्याने तोंड देऊ या. हिंदुस्थान हे एकात्म नि एकजिनसी राष्ट्र आहे असे आज गृहीत धरता येणे शक्य नाही. मात्र उलटपक्षी हिंदुस्थानात हिंदू आणि मुसलमान अशी मुख्यतः दोन राष्ट्रे विद्यमान आहेत. आणि ह्यापकारच्या परिस्थितीत जगातील अनेक देशात जे

घडून आले आहे. त्यास अनुसरून प्रस्तुतकाली आपण अधिकांत अधिक जे काय करू शकू ते म्हणजे ज्यात कोणालाही काही विशेष मताधिक्य किंवा विशेष प्रतिनिधित्व मिळणार नाही आणि कोणालाही वाजवीहून अधिक मोल देऊन आपली राज्यनिष्ठा विकत घ्यावी लागणार नाही. असे हिंदी राष्ट्र बनविणे हेच होय. मातृभूमीच्या रक्षणार्थ लढण्याकरिता भाडोत्री बजारबुणगे मोलाने विकत घेतले जातात. तिचे पुत्र नव्हेत! हिंदू हे एक राष्ट्र ह्या नात्याने, समान भूमिकेवरून समान हिंदी राष्ट्राविषयीचे आपले कर्तव्य बजावण्याला सिद्ध आहेत. परंतु जर आमचे मुसलमान देशबांधव हिंदूंना जातीय संघर्ष करून भोसकू पाहतील आणि हिंदूस्थानात मुसलमानी राज्य किंवा सार्वभौमत्व प्रस्थापित करण्याच्या हिंदी-विरोधी नि बाह्य देशांशी संगनमत करून योजना रचीत असतील तर हिंदूंनी स्वतःपुरताच विचार करावा; आपल्या स्वतःच्या पायावर उभे रहावे आणि इंग्रजांच्या वा मुसलमानांच्या वा इतर कोणी असो, कोणत्याही अहिंदू जोखडापासून हिंदुस्थानची मुक्तता करण्याकरिता, आपल्या सर्व शक्तिनिशी एकाकीच लढावे.

## हिंदुत्वाच्या रक्षणाची प्रतिज्ञा करणाऱ्या
## विश्वसनीय हिंदू संघटनवाद्यांनाच मते द्या

हे अंतिम ध्येय दृष्टीपुढे ठेवून मी तुम्हा सर्वांना बजावून सांगतो की, तुम्ही स्वतः आपण हिंदू आहो असेच सांगत चला! क्षमायाचकाची वा शरमिंधेपणाचा मनाचा कल पार नाहीसा करून टाका; कारण त्याच्या योगाने आपल्यापैकी कित्येकांना हिंदू म्हणून सांगण्याची लाज वाटते, जणू काय हिंदू म्हणविणे म्हणजे काही अराष्ट्रीय गोष्ट आहे; किंवा श्रीराम नि श्रीकृष्ण, शिवाजी नि प्रताप नि गोविंदसिंग यांच्या परंपरेत जन्मास येणे म्हणजे मोठा कलंकच आहे! आपणा हिंदूंनासुद्धा ह्या सूर्यमालिकेत आपला स्वतःचा असा देश असलाच पाहिजे आणि त्यात हिंदू म्हणून-एका बलाढ्य नि प्रतापी लोकांचे वंशज म्हणून-अविच्छिन्नपणे आपण नांदलेच पाहिजे. त्या मागून 'शुद्धी'चा पुरस्कार करा, शुद्धीचे केवळ धार्मिक दृष्ट्याच महत्व आहे असे नाही. तर राजकीय दृष्ट्याही ती तितकीच महत्वाची आहे! संघटनाला उचलून धरा. ते साधण्याकरता, आपल्या गतकालातील प्रयत्नांनी जी काही राजकीय सत्ता प्रचलित सुधारणा निर्बंधांच्या रूपाने आपण देण्यास भाग पाडले आहे. ती हस्तगत करणे, आपणा हिंदूंचे केवळ कर्तव्यच आहे. मुसलमान लोक, जे उघडपणे नि धिटाईने, त्यांच्या रक्षणाची आणि मुसलमानांकरिता, अतिक्रमण करूनसुद्धा अधिक अधिकार मिळवून देण्याची, हमी देतात त्यांनाच मते देतात. पण आम्ही हिंदू मात्र जे आपण हिंदू नाही; मुसलमान नाही; असे उघडपणे घोषित करतातच; नि तरीसुद्धा मुसलमानांच्या संघटनांना मान्यता देऊन त्यांच्याशी व्यवहार करताना, कधीही त्रासत नाहीत आणि हिंदूंच्या नावाने हिंदूंच्या हितसंबंधाना नित्य विघातक अशा तडजोडी करून हिंदूंची असह्य मानखंडना करतात; त्यानाच मते देण्याची, आत्मघातकी घोडचूक करतो! तुम्ही पुढे आपल्या

मतांचा दुरुपयोग करता कामा नये. तुम्ही यापुढे त्यांनाच मते दिली पाहिजेत, की ज्यांना आपण हिंदू असल्याविषयी लाज वाटणार नाही. जे उघडउघड हिंदूंकरिताच उभे राहतील आणि हिंदूंच्या पदराला खार लावून, एखाद्या अपमानास्पद ऐक्य-भक्तीच्या मंतरलेल्या अंधश्रद्धेच्या मूर्तीपुढे धूप जाळणार नाही; अशा प्रतिज्ञेने बांधून घेतील.

'वर्णाश्रम स्वराज्य संघ', 'हिंदू महासभा', 'शिरोमणी शीख सभा', तसेच आर्यसमाजी, महाराष्ट्रातल्या लोकशाही स्वराज्य पक्षासारख्या, सन्मान्य, ऐक्य नि खरेखुरे, राष्ट्रीय हिंदी राज्य त्यांचा पक्ष घेणाऱ्या राजकीय संस्था आणि हिंदुत्वावर अधिष्ठित असलेले मोठमोठे आश्रम नि संघ; नि जातीय सभा; या सर्वांचा मिळून विधिमंडळात एक संयुक्त हिंदू पक्ष उभारला जाऊ द्या आणि एकाही हिंदूचे मत संघटनवादी नसणाऱ्या माणसाला कदापीही मिळू देऊ नका. असे झाले, म्हणजे मुसलमान मंत्रिमंडळे, ज्याप्रमाणे त्यांच्या हिताकरिता झटत आहेत, तशी तुमचीही मंत्रीमंडळे हिंदू राष्ट्राच्या न्याय्य कार्याचा कैवार घेऊन उठू लागलेली, तुम्हाला आढळतील. यामुळे केवळ आपले हिंदुराष्ट्रच नव्हे तर येऊ घातलेले हिंदू राज्यसुद्धा वाचविता येईल. कारण खरोखर हिंदू हेच आपल्या हिंदी राज्याचे मुख्य आधार आहेत नि तसे झाल्यावाचून राहूंच शकत नाहीत. अल्पसंख्यांकाचा धर्म, संस्कृति नि भाषा त्यांच्या संरक्षणाची हमी आम्ही त्यांना केव्हाही देऊ पण तद्वतच आपलाही धर्म, संस्कृति भाषा रक्षिण्याच्या हिंदूंच्या समान स्वातंत्र्यावर त्यांचे होणारे कोणतेही अतिक्रमण आम्ही यापुढे सहन करणार नाही. जर अहिंदू अल्पसंख्याकांचे रक्षण व्हावयाला पाहिजे. तर हिंदुस्थानातील कोणत्याही अतिक्रामक अल्पसंख्यांकांपासून बहुसंख्य हिंदूंचेही रक्षण निश्चितपणे झालेच पाहिजे.

आता सरतेशेवटी, अहो हिंदुबांधवहो! मी तुम्हाला निश्चितीने सांगतो की, जर तुम्ही आपल्या ठिकाणचा आत्मविश्वास गमावला नाहीत; आणि वेळी उठून कामाला लागाल, तर तुमचे गमावलेले सर्व काही अजूनही तुम्हाला पुन्हा परत मिळेल. तुमच्या वंशांत आनुवंशिकच असे काही पौरुष नि टिकून राहण्यासाठी लागणारी समर्थ सहनशीलता आहे की जगाच्या प्रतिवार्षिक वृत्तांतामधून - (बखर ग्रंथांतून) क्वचितच काही थोडी समांतरे आढळतील. तुमच्या ऐतिहासिक बखरींच्या काळापूर्वी पौराणिक नि प्रागैतिहासिक काळात तुम्ही जिंकलेले, पराभूत केलेले दैत्य नि असुर बाजूला राहू द्या. पण तरीसुद्धा तुमचा दिनांकित इतिहास, ख्रिस्तपूर्व, सुमारे दोन सहस्र वर्षापासून आहे. अस्तित्वासाठीच्या भयानक भीषण संघर्षातून जो सृष्टिमध्ये नित्य अविरत चालूच असतो. त्यामधून सर्वोत्कृष्ट योग्य तोच मागे जिवंत उरतो हा नियम आहे. अंकास नि फाराव्ह नि नेबुझडनेरझार यांच्यासारख्या बलाढ्याची राष्ट्रे, केव्हांच धुळीस मिळाली; नि पाठिमागे मागमूससुद्धा राहिला नाही.

परंतु तुम्ही जे त्या राष्ट्रीय प्रळयातून टिकून, अद्यापपर्यंत जिवंत राहिला आहा. ते तुम्ही टिकण्याला सर्वोत्कृष्ट योग्य होतात म्हणून होय. प्रत्येक राष्ट्राच्या आयुष्यक्रमात चढ नि उतार हे असतातच. आज जे एका साम्राज्यावर सत्ता चालवीत आहे; ते प्रत्यक्ष इंग्लंड हे अनेक वेळा रोमन,

डेन्स, डच नि नॉर्मन यांच्या सहज भक्ष्यस्थानी पडलेले होते. आपणाला मोठमोठ्या राष्ट्रीय उत्पातांना तोंड द्यावे लागलेले आहे. पण प्रत्येक वेळी आपण वर उठलो आणि त्या उत्पातांना मागे हटविले. प्रतापी शिकंदराच्या अधिपत्याखाली ग्रीक लोक सर्व जग पादाक्रांत करीत आले. पण हिंदुस्थान काही ते जिंकू शकले नाहीत. तेव्हा चंद्रगुप्त उठला आणि सामरिक नि सांस्कृतिक असे दोन प्रकारचे पुरेपूर पराभव देऊन आम्ही ग्रीकांना मागे हाकून लावले. पुढे तीन शतकांनी एखाद्या हिमलोटाप्रमाणे हूण, आमच्यावर चालून आले. सर्व युरोप नि अर्धा आशिया, त्यांच्या पायांशी नम्र होता; त्यांनी रोमन साम्राज्यांचे तुकडे तुकडे केले. पण सुमारे दोन शतके त्यांच्यांशी निकराची झुंज करून शेवटी महाराज विक्रमादित्यांच्या आधिपत्याखाली आम्ही त्यांचा पूर्ण पाडाव केला. शकानां काही अधिक चांगला अनुभव आला नाही. शालिवाहन आणि यशोधर्मन यांच्या पराक्रमी बाहूंनी त्यांना पुरे पिचून काढले. ते हूण नि ते पार्थियन नि ते शक, हे आपले तेव्हाचे शत्रू आज कोठे आहेत? त्यांची नावे विसरली गेली आहेत! गेले; हिंदुस्थानच्या नि जगाच्याही दृष्टीपुढून पार पुसून गेले! आमच्या वंशाचे पौरुष नि दाढ्यर्, ही मात्र त्या सर्वांवर विजय मिळविती झाली.

त्यानंतर काही शतकांनी मुसलमानानी हिंदुस्थानावर आक्रमण केले आणि सर्व देश त्यांनी पादाक्रांत केला. त्यांची राज्ये नि साम्राज्ये यांची अप्रतिहत सत्ता येथे चालू झाली. पण पुन्हा आम्ही एकत्र झालो, आणि शिवाजीराजांच्या जन्मापासून पुढे सतत प्रत्यक्ष समर-देवताच, आमची कैपक्षी झाली. लढायामागून लढाया देऊन आम्ही मुसलमानांना शेकडो रणक्षेत्रांतून मार दिला. त्यांची राज्ये नि साम्राज्ये त्यांचे नबाब नि शहा नि बादशहा यांना आमच्या वीर योद्ध्यांनी गुढघे टेकीत शरण आणले आणि शेवटी हिंदूंचे मुख्य सेनापती भाऊसाहेब यांनी जणू काय प्रतीकार्थच आपला घण उचलला आणि दिल्लीतील मोगलाच्या बादशाही तख्तावर घाव घालून त्यांचा अक्षरशः चुराडा केला. महादजी शिंद्यांनी दुबळ्या मनाच्या बुद्धिहीन मोंगल बादशहांना बंदिवान नि वेतनी अंकित करून आपल्या रखवालीत आणले आणि सर्व देशभर हिंदूंचे सर्वसत्ताधीशत्व पुन्हा एकदा प्रस्थापित केले.

इतक्यात मुसलमानांशी झालेल्या शेकडो वर्षांच्या लढ्यांतून आम्ही पुन्हा तरतरीत होण्याच्या पूर्वीच इंग्रज आमच्यापुढे ठाकले नि त्यांनी आम्हांला सर्व बाजूंनी जिंकले. त्यांच्या विजयाकरिता आम्ही त्यांच्यावर कुरकुरत नाही; की त्यांचा हेवादावा करीत नाही. कारण जरी काल आम्ही रणांगणावर पराभूत झालेलो असतो; तरी युद्धाची रग आजही आमच्यात उरलेली आहेत. हरलो, म्हणून काही आम्ही लढा टाकून दिलेला नाही. छे, यापूर्वीच परत हल्याकरिता पुन्हा रणात उतरलोही आहोत!

कोणाला माहित? ह्याच आपल्या 'हिंदुमहासभे'चा पुढील काळातील एखादा अधिक भाग्यशाली अध्यक्ष ह्या पिढीत नाही तरी आपल्या मुलांच्या पिढीतच त्या वेळच्या भावी अधिवेशनापुढे उभा राहून अशी विजयाची वार्ता, उंच रवाने घोषित करण्याला समर्थ होणार नाही, म्हणून की- ''हूण नि ग्रीक नि शक यांची मागे जी गत झाली तद्वतच ब्रिटिश वर्चस्वाचा ह्या

देशात आता मागमूसही उरला नाही! हिंदू जगाचा ध्वज हिमालयाच्या प्रोत्तुंग शिखरावर उंच फडकत आहे! हिंदु पुनश्च स्वतंत्र नि हिंदुजगत् विजयशाली झाले आहे!!‘‘

---------------------

# अखिल भारतीय हिंदुमहासभा
# २० वे वार्षिक अधिवेशन, नागपूर
# अध्यक्षीय भाषण
# विक्रम संवत् १९९६ : सन १९३८

सभ्य स्त्री पुरुष हो!

अखिल भारतीय ‘हिंदू महासभे‘च्या, ह्या २० व्या अधिवेशनाचे अध्यक्ष होण्याकरिता पाचारण करून आपण मजवर जो विश्वास टाकिला आहे, त्याची जाणीव मी अत्यंत कृतज्ञतापूर्वक व्यक्त करतो आणि त्यासवेच अंतःकरणापासून असे अभिवचन देतो की, मजसारख्या व्यक्तीच्या ठायी असू शकणारे मर्यादित सामर्थ्य संपूर्णपणे कामी लावून आपण मजवर टाकिलेल्या विश्वासाला पात्र होण्याचा शक्य तो सर्व प्रयत्न मी अवश्य करीन.

पण, ज्याअर्थी मी आपणास विनम्रपणे आणि सर्वस्वी शालीनतेने आवाहन करीत आहे त्याअर्थी, आपण मला क्षमा कराल. ध्यानात ठेवा की, आपण मजवर जो विश्वास टाकला आहांत तो यथायोग्यच आहे. अनाठायी नाही हे सप्रमाण दाखविण्यासाठी आपणांपुढे मात्र खडतर आणि दिव्यदाहक असा एकमेव मार्ग आहे. त्या मार्गाने जाण्यासाठी स्वरक्षणासाठी आणि ‘हिंदू‘ तितुका मेळवून एकसंघ उभा करण्यासाठी आपल्याला पूर्णतया प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल, अतिशय शौर्याने वीरोचित अशी निकराची, शर्थीची, झुंज घ्यावी लागेल. आणि सद्यःकाली स्मशानात मारून पुरलेल्या हिंदुराष्ट्राला बाहेर काढून पुनरुज्जीवित करावयाचे आहे आणि पूर्वी चंद्रगुप्त, विक्रमादित्य किंवा पुण्याचे पंतप्रधान (पेशवे) यांच्या काळात होते त्यापेक्षा  कितीतरी अधिक महत्तर (विशाल भव्योत्कट) (सामर्थ्यसंपन्न)  बलशाली आणि दैदीप्यमान (वैभवसंपन्न) असे हिंदुराष्ट्राचे पुनरुत्थान घडले असल्याविषयींची उद्घोषणा करण्यास (द्वाही फिरविण्यास), निकटच्या भावीकाळाला, इंग्रदूत बनवून भाग पाडण्यासाठी बद्धपरिकर होण्यावाचून आता आपणास गत्यंतरच नाही. अद्भुतरम्यतेपेक्षा कमी नसलेले अद्भूत चमत्कारच असे हे दिव्य राजकीय कार्य सिद्धीस नेणे हे ह्या पिढीतील आपणा हिंदूंना जे आव्हान आहे ते जर आणि जोपर्यंत, अखिल हिंदू जगत् एकवटून प्रत्यक्ष कृति करण्यासाठी धैर्याने उभे ठाकत नाही; आणि राष्ट्रांच्या पुनरुत्थानाच्या अंतिम यशस्वितेकडे विजयोत्सवाकडे घेऊन जाण्यास कारण होणाऱ्या अपरिहार्य नि अटळ अशा दारुण नैराश्याच्या आणि वीरोचित मरणांच्या दऱ्यांमधूनच जाणाऱ्या

एकमेव मार्गाने अप्रतिद्‌वंद्‌व; अप्रतिहतपणे कूच करीत नाही, तर आणि तोपर्यंत, कोणीही एक व्यक्ती मग ती कितीही का मोठी असेना पेलू शकणार नाही; हे कार्य पार पाडू शकणार नाही. जर का आपण कच खाल्लीत तर आपण सर्वस्व गमावलेच मग मुक्तता, विमुक्तता दूरच. पण जर आपण साहस करून धीर धरला तर मग, आपण जिंकल्यातच जमा आहोत (विजय आपलाच आहे) कारण आपण शक्ती बाळगून आहोत, ज्वालामुखी सदृश वन्ही आपल्या अंतरात वास करीत आहे. आपल्याला त्याची जाण (जाणीव) मात्र नाही. निश्चयाने निःशंकपणे त्याला चेतवा म्हणजे आपल्या  हिंदू जातीच्या आर्य (श्रेष्ठ) आदरणीय कुलपतींना विजयांमागून विजयांच्या वाटेने नेणाऱ्या यज्ञीय अग्निप्रमाणे तो प्रस्फुटित होऊन आगडोंब उसळेल.

सद्‌यःकाली स्मशानात मारून पुरलेल्या हिंदुराष्ट्राला पुनरुज्जीवित करावयाचे आहे आणि त्याचे पुनरुत्थान घडवावयाचे आहे म्हणून मी जेव्हा म्हणालो तेव्हा ते बुद्धिपुरस्सर एवढ्यासाठीच म्हणालो की, आज ज्या अति प्रबल घोर संकटांना आपणांस तोंड द्‌यावयाचे आहे त्यांना न्यून (किंवा गौण) लेखल्याचा दोष मला दिला जाऊ नये. स्वतःच स्वयमेव राष्ट्र असल्याचे ठामपणे निर्धारपूर्वक सांगण्याचा अपराध केल्याच्या कारणासाठी त्यांनी, आपल्या हिंदुराष्ट्राला, खरोखरच अगदी यथार्थत्वाने स्मशानभूमित पुरून टाकले आहे हे वर्तमान आहे; सद्‌यःस्थिती आहे.

बंधु-भगिनींनो, आपणा हिंदूंना पेशावरापासून रामेश्वरपर्यंत प्रत्यही ज्या भयंकर आपत्तीशी झगडावे लागत आहे, त्याचे भेसूर चित्र, यथातथ्य नि साकल्याने रेखाटण्याकरिताच आपण सर्व ह्या अधिवेशनाला आलेले असल्यामुळे ते चित्र मी तुमच्यापुढे रेखाटण्याचे कारणच नाही. निव्वळ देखावा बघणाऱ्यांना किंवा स्वार्थसाधू कार्यकर्त्यांना येथे येण्याचा मोह पाडील; असे कोणतेच विलोभन येथे नाही. त्या दृष्टीने 'हिंदू महासभे'च्या अधिवेशनाचा आज शेवटचाच क्रम लागेल. सत्ता, संपत्ति नि लोकप्रियता यांचे सारे प्रवेशमार्ग दुसरीकडे जात आहेत. हिंदू संघटनवादी होणे हा काही आज लाभकारक व्यवसाय नाही. आज आपण होऊन हिंदू महासभेचा प्रतिनिधी होणे, म्हणजे विद्‌यमान सत्ताधाऱ्यांचा क्रोध ओढवून घेणे आहे; एखाद्‌या अहिंदु मारेकऱ्याच्या, एखाद्‌या भाई अब्दुल रशीदच्या खंजीराला पाचारण करणे आहे. 'शूर मोपला देशभक्तांपैकी' कोणाकडून काटले जाणे आहे, किंवा एखाद्‌या अहिंदू मारेकऱ्याच्या खंजीरापेक्षाही हृदयाला अधिक घरे पाडणारे नि असह्य म्हणजे इंग्रज लोक इंग्रज जातीवर, जर्मन लोक जर्मन कार्यावर, जपानी लोक जपानी आत्म्यावर, मुसलमान लोक मुसलमान धर्मावर नि समाजावर करतात तशाच मनुष्यबुद्धीने नि तशाच एकनिष्ठेने हिंदू लोकांवर, प्रेम करण्याच्या नि त्यांचे रक्षण करण्यास, धजल्याच्या, अनन्य अपराधाकरिता आपल्याच हिंदू-हाडामांसाच्या लाखोजणांकडून पाठलाग केले जाणे नि बहिष्कृत केले जाणे आहे! हिंदू ध्वज उंच उभारून फडकावणे हे हिंदुस्थानात, ह्या साक्षात हिंदूंच्याच भूमीत आज भयंकर राष्ट्राद्रोहाचे कृत्य झाले आहे; स्वतःला हिंदू म्हणून म्हणवून घेणे हे स्वतःला लक्षावधी हिंदूंकडूनच क्षुद्रपणाचे लेखले जात आहे! अशा परिस्थितीतही आपण सर्व 'हिंदुसभे'च्या ह्या अधिवेशनाचे प्रतिनिधी म्हणून येथे आला आहा, नि

ह्या हिंदवी ध्वजाभोवती गोळा होण्यासही सर्वजण धजला आहा. ही गोष्ट निर्विवाद हेच सिद्ध करते की आपण कर्तव्याच्या बलवत्तर जाणिवेने भारले गेल्यावाचून काही हे घडलेले नाही. आपल्या हिंदुजातीची दिवसेंदिवस करण्यात येत असलेली असह्य मानखंडना आपल्याला पूर्ण कळलेली असून ती आपल्या हृदयाला वेदना करीत आहे आणि हिंदू ह्या नात्याचे- स्वकीय राष्ट्र ह्या नात्याचे- आपले साक्षात अस्तित्वच गुदमरून मारू पाहणाऱ्या तथाकथित हिंदी देशभक्तीच्या उद्दाम अपेक्षांचा प्रतिकार करण्यासही आपण पूर्णपणे सज्ज आहा.

ह्यास्तव अर्थात्च हिंदू हितसंबंधांना बाधक होणाऱ्या प्रचलित दुःखांचा नि स्थानिक प्रश्नांचा सविस्तर पाढा न वाचता त्या गोष्टींचा विचार यानंतर ह्या अधिवेशनात स्वतंत्रपणे संमत होणाऱ्या ठरावांवर नि केल्याजाणाऱ्या भाषणांवरच मी सोपविणार आहे.

आजवर प्रामुख्याने विचार न झालेल्या दोनच प्रश्नांची मी माझ्या भाषणाला मर्यादा घालून घेणार आहे. आपल्या हिंदू राष्ट्राचा, जीवनविकास खुंटून त्याचा झपाट्याने ऱ्हास करीत असलेली, सध्याची दुःस्थिती जी हिंदूवर ओढवली आहे. तिचे मूळ कारण काय? आणि अद्यापही हिंदू कार्य दुःसाध्य होण्यापासून निश्चितपणे वाचवू शकेल. असा तात्कालिक उपाय कोणता? हे ते दोन प्रश्न होत.

तथापि अद्यापीही जे 'हिंदू महासभे'च्या आवाराच्या बाहेर आहेत; सामन्यतः हिंदुत्वावर अढळ श्रद्धा असूनही ज्यांना त्यावर आजकाल सर्व अंगानी कोसळलेल्या संकटांची पुरेशी कल्पना नाही आणि म्हणूनच ज्यांना 'हिंदुसभा'वाद्यानी निष्कारण किंवा फारच अल्प कारणांकरिता एवढे अकांड तांडव का करावे? याचे आश्चर्य वाटते; अशाही लक्षावधी हिंदूंना ज्या अर्थी हे भाषण उद्देशून असावयाचे आहे; त्या अर्थी त्यांना परिस्थितीच्या खऱ्याखुऱ्या भीषणतेची-निदान त्यांना विचाराला प्रवृत्त करून मी ह्या आपल्या भाषणांत पुढे जे काही सांगणार आहे, त्याचे महत्व पटण्याच्या मनःस्थितीत आणून सोडण्यापुरेशी तरी ओळख करून देण्याकरिता काही थोड्या गोष्टीचे येथे ओझरते दर्शन घडविणे; माझे कर्तव्यच आहे; असे वाटते. उदाहरणाकरिता सध्या प्रचलित असलेली राज्यघटनाच आपण घेऊ.

त्या घटनेच्या द्वारे, एकीकडून हिंदूंना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याचे नाकारून आणि दुसरीकडून मुसलमान, ख्रिश्चन, युरोपियन यांना न्यायतः प्राप्त असलेल्यापेक्षाही अमापपणे अधिक अशी राजकीय सत्ता मिळेल अशा रीतीने स्वतंत्र मतदारसंघ, विशिष्ट मताधिकार, तारणे इत्यादी अत्यादिंचा वर्षाव करून हिंदुस्थानातील प्रचंड बहुसंख्यत्वामुळे हिंदूंचे मूलतःच प्राप्त असलेले, राजकीय वर्चस्व ब्रिटिशांनी बुद्धिपुरःसरच नष्ट करून टाकले आहे. त्यांनी हिंदूंच्या राजकीय एकात्मतेची वाढ खुंटविण्याच्या दृष्टीने हिंदू मतदारसंघ फोडून त्याचे त्यांच्यातच निमूर (वॉटर टाइट) विभाग केले आहेत. इतकेच काय, पण आपल्या देशाच्या मतगणतीच्या योजनेत स्वतंत्र, एकजिनसी मतदारसंघ ह्या नात्याने हिंदूंना न्याय्य नि अवश्य ती मान्यताच त्यांनी बुद्धिपुरःसर, मुळीच दिलेली नाही. भरपूर सोयीने नि

सवलतींनी परिपूर्ण आणि सन्मानपूर्वक नाव घातलेले विस्तृत महाल अल्पसंख्यांकाकरिता राखून ठेवण्यात आले आहेत. बहुसंख्य नि प्रत्यक्ष यजमान असे जे हिंदू ते सर्व-सामान्य मतदारसंघ ह्या नाव न घातलेल्या नि नोंद न केलेल्या अडगळीच्या खोलीत खच्चून भरण्यात आले आहेत, हिंदूमधले, सामायिक गुण नष्ट करण्याच्या निश्चित हेतूने ब्रिटिश सरकार त्यांची सैन्यातील नि नगररक्षका (पोलिसा) तील भरती सारखी घटवीत आहे आणि त्याच्यायोगे साहजिकच राष्ट्राच्या त्या दोन्ही जिव्हाळ्याच्या शक्तिकेंद्रात अल्पसंख्य मुसलमानांचे प्राबल्य वाढत आहे. पंजाबात नि इतर काही प्रांतात 'भूसत्तांतरण निर्बंधा (लँड-ॲलिएनेशन ॲक्ट) सारखे, उपाय हिंदूंना आर्थिक दृष्ट्या चिरडून टाकीत आहेत; तर सरकारी नोकऱ्यात मुसलमानांकरिता शेकडा साठ जागा राखून ठेवणारा दुसराच निलर्ज्जपणाचा निर्बंध बंगालमध्ये संमत करण्यात येत आहे.

हैद्राबाद, भोपाळ आदि मुसलमान संस्थांनांतून हिंदूंचा धार्मिक नि सांस्कृतिक छळ, इतक्या निष्ठुरपणे चालविण्यात येत आहे, की तो पाहून औरंगजेबाच्या किंवा अल्लाउद्दिनाच्या दिवसांची कोणालाही आठवण व्हावी. सर्व हिंदुस्थानभर नगरांतून नि ग्रामांतून, मुसलमान जमावांची उन्मत्त वृत्ति भागविण्याकरिता हिंदूंचे नागरिक नि धार्मिक अधिकार प्रत्यही पायाखाली तुडविले जात आहेत. मलबारात नि कोहट येथे मुसलमान माथेफिरूंकडून हिंदूंना सहन करावे लागले; तसे रक्तपातकारक दंगे नि धिंगाणे सर्व हिंदुस्थानभर प्रांतांच्या राजधान्यांतूनही वारंवार करण्यात येत आहेत. सीमा प्रांतांतील मुसलमानी टोळ्या त्या प्रदेशांतील काफीरांना उखडून टाकण्याच्याच निश्चित उद्देशाने तेथील हिंदू लोकांवर स्वाऱ्या नि अनन्वित अत्याचार करीत आहेत. केवळ, हिंदू व्यापाऱ्यांनाच लुटण्यात येते; केवळ हिंदूंचीच कापाकाप करण्यात येते आणि केवळ हिंदू स्त्रिया नि मुलेच पळवून नेऊन दंड उकळण्यात येतो किंवा त्यांना बलात्काराने बाटवून मुसलमान करण्यात येते.

## काँग्रेसवाल्यांचा ढोंगी राष्ट्रीयवाद

ह्या सर्वांवर कळस करण्याकरिता म्हणून की काय पुढे येतो. हे काँग्रेसवाले या सर्व मुसलमानी अत्याचारांना व्यवहार्यतः क्षमा करतात! या मुसलमानी हल्ल्यात हिंदू विरोधी असे काहीच नाही! त्या टोळ्यांची आर्थिक नि लैंगिक उपासमारच त्यांना ते अपराध करण्याला उद्युक्त करते. त्या उपाशी जीवांची क्षुधा आपण भागवू या म्हणजे ते उत्तम नागरिक होतील!'' अशी धादांत असत्य नि फसवी कारणमीमांसा शोधून काढून ते त्या अत्याचारांची उपपत्ती लावीत असतात! ही कारणमीमांसा खरी असती; तर या बिचाऱ्या बुभुक्षित दरोडेखोरांनी सीमाप्रांतीय नगरांतील श्रीमंत मुसलमानांना मात्र नेमकेच लुटल्यावाचून ठेवावे; तरूण मुसलमान सुंदरी मात्र त्यांना पळवून नेण्यास सापडू नयेत. मुसलमानांचीच घरे तेवढी त्यांनी जाळू नयेत आणि हिंदू काफिराला आश्रय दिला नसेल, तर कोणाही मुसलमानांच्या केसासही धक्का लावण्यात येणार

नाही, अशा उघड उघड दवंड्या पिटून मुसलमानांना आश्वासने देत फिरावे, हे सर्व विलक्षण नव्हे काय? त्याची संगती कशी लावणार? सिंध प्रांतातील दादू जिल्ह्यात अगदी अलीकडेच घडलेली गोष्ट पहा. तेथे श्री. मुजुमदार यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण निरुपद्रवी अशा पुराणवस्तु-संशोधकांच्या एका टोळीवर या मुसलमान हल्लेखोरांनी धाड घातली. ''तू हिंदू आहेस काय?'' असे त्यांनी प्रत्येकास विचारले, होय म्हणताच त्या प्रत्येकास तत्क्षणी गोळी घालून मारण्यात आले. त्यांतील एका हिंदूने लटकेच आपण मुसलमान असल्याचे सांगितले आणि त्यामुळे त्याला धक्का न लावता जिवंत जाऊ देण्यात आले. ही गोष्ट म्हणजे, सर्व हिंदुस्थानभर असेच जे सहस्रो प्रकार घडत आहेत; त्यातलीच एक केवळ उदाहरणभूत अशी आहे.

मलबारपासून पेशावरापर्यंत सिंधूपासून आसामपर्यंत आणि वर्षानुवर्षे येणाऱ्या नि संपणाऱ्या वर्षात होणाऱ्या मुसलमानी दंग्यातून नि हल्ल्यातून हाच नित्याचा क्रम असतो. ह्यातच आणखी ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या अखिल भारतीय संघटना आणि आगाखानी, हसन निझामी, पीर मोतामीये यांच्यापासून तो अगदी, खेड्यातील मुसलमान गुंडांपर्यंतच्या विविध मुसलमानी संघटना या चळवळी मिळवा, या सर्व चळवळी सर्व हिंदुस्थानभर शांततेच्या किंवा लबाडीच्या किंवा बलात्काराच्याही उपायांनी लाखो हिंदूंना परधर्मात ओढून नेऊन हिंदूंच्या धार्मिक वांशिक, सांस्कृतिक नि राजकीय सामर्थ्याखाली जणू काय सुरुंगच घालू पाहणाऱ्या नि त्यात यशस्वीही होत असलेल्या अशा आहेत. ह्या सर्व गोष्टींच्या जोडीला पुन्हा आणखी 'मुस्लिम लीग' वाल्यांच्या नि मुसलमानी संस्थानांच्या राजकीय चळवळीही मिळवा. या दोघांनी तर प्रथम हिंदुस्थानचे मुसलमानी संघशासन नि हिंदू संघशासन असे दोन विभाग करून, नंतर त्यातील दुसऱ्याला म्हणजे हिंदू शासनसंघाला हिंदुस्थानाबाहेरील कोणातरी परक्या मुसलमानी राष्ट्रांच्या स्वाऱ्या आणून पुरते लोळविण्याविषयी उघडउघड ठरावच केले आहेत आणि सर्वांवर कळस चढविला आहे! अशा प्रकारची सांप्रत हिंदूंची हिंदुस्थानात त्यांच्या स्वतःच्या देशातच-स्थिती झालेली आहे. पण हे काहीच नव्हे.

अद्यापीही सर्वांत वाईट असा मोठा भाग सांगावयाचा राहिलाच आहे कारण हिंदू नित्यशः ज्यांना बळी पडत आहे; त्या या आपत्तीचा नुसता निर्देश करणे हे सुद्धा स्वतःला अहिंदी राष्ट्रवादी' म्हणविणाऱ्या एका नव्या संप्रदायाकडून राष्ट्रीय पातक म्हणून धिक्कारले जात आहे आणि ह्या संप्रदायाकडेच मुसलमानांना एका हाताने कोरा धनादेश अर्पिणाऱ्या आणि दुसऱ्या हाताने हिंदूंना मात्र- ''लुटले जा, पण कोठे वार्ता देऊ नका; भोसकले जा पण किंचाळू नका; हिंदू म्हणून दडपले जा, पण हिंदू म्हणून त्याच्या प्रतिकारार्थ संघटना करू नका; नाहीतर, आमच्या 'हिंदी राष्ट्रीयत्वा'च्या कार्याचे, तुम्ही द्रोही म्हणून धिक्कारले जाल!'' -असे निर्वाणपत्र देणाऱ्या 'हिंदी राष्ट्रीय सभे'चे- काँग्रेसचे -आजकाल पुढारीपण गेलेले आहे!!!

या सर्व गोष्टी धडधडीत पुढे असताना 'हिंदू महासभा' ही अवास्तव अकांडतांडव करीत आहे, मुळात नसलेली दुःखे कल्पनेतून काढीत आहे; किंवा उगीचच काहीतरी भ्रांतिमय नि

अर्धशून्य, अशी धार्मिक वा जातीय घोषवाक्ये बडबडत आहे; अशा प्रकारचा आरोप, तिच्यावर, एक मूर्ख तरी किंवा दुसरा शत्रू तरी यावाचून तिसरा कोण करू शकेल?

परंतु ही सर्व वस्तुस्थिती असतांनासुद्धा जे हिंदूमध्ये आपली गणना होऊ देण्याचे चालू ठेवतात पण ज्यांची हृदये मात्र त्यांच्या हिंदूपणाकरिता धावून येईनाशी झाली आहेत; किंवा जे उघडपणेच हिंदुजगाशी आपला कसलाही संबंध नाकारतात; अशाना विचारातून एका अंगास सोडल्यावर ज्यांच्या जीविताचा तंतून्तंतू, जाणिवेने आंदोलन पावतो; असेही सबंध हिंदुस्थानात कोटींनी असलेले हिंदू आपली हिंदू जाती या सर्व आपत्तीखाली सापडलेली नि अशा असह्य मानखंडनेला पात्र झालेली पाहून, अत्यंत व्यथित होताना आढळावेत. ह्यातही आश्चर्य कोणते? अशा या कोट्यवधी हिंदूंकडून आज सर्व ठिकाणाहून मोठ्या उत्कंठेने प्रश्न विचारण्यात येत आहेत की,- ''ही दुःस्थिती आता आता आपण कशी सुधारावयाची? आपण पडलो; हेच आधी कसे काय घडले? आपण हिंदू आता हिंदू म्हणूनच पुन्हा कसे वर उठावयाचे! आणि जगातल्या राष्ट्रांमधले एक महान राष्ट्र अशी प्रतिष्ठा पुनश्च आपण कशी प्राप्त करून घ्यावयाची?'' मुख्य हृदयच शोधून काढण्याचा नुकताच चालू झालेला हा उपक्रम हे एक अत्यंत उत्साहवर्धक असेच लक्षण म्हटले पाहिजे. आपल्या हिंदू जातीचा आत्मा आत्मविस्मृतीच्या मरणप्राय मूर्च्छेतून, पुनश्च जागा झाल्याचेच ते दर्शवीत आहे. आत्मस्मृतीचा पुनलार्भ झाल्यावर स्वतःच्या स्थानासंबंधीचे भांबावून नि भंडावून सोडणारे हे प्रश्न त्याने उत्पन्न करावे हे अगदी स्वाभाविक आहे.

सर्व ठिकाणाहून प्रत्यही वर्षाव होत असलेल्या या उत्सुकतेच्या प्रश्नांचा सविस्तर उहापोह करणे प्रस्तुतसारख्या भाषणाच्या मर्यादित कक्षेत जरी शक्य नसले तरी आपल्या ह्या दुःखकारक दुर्दशेत आणून सोडणारे मूळ कारण आणि त्या दुर्दशेतून बाहेर येण्याच्या दृष्टीने जो आपल्याला केलाच पाहिजे; नि सुदैवाने जो आपल्याला शक्यही होईल असा तात्कालिक उपाय एवढेच जरी नेमके दाखवून देण्यात मी यशस्वी होऊ शकलो तरीसुद्धा माझ्या ह्या भाषणाचे उद्दिष्ट उत्तम साध्य झाले असे मला वाटते.

ते मूळ कारण अर्थात जिने तिजपासून उत्पन्न झालेल्या पुढील सर्व चुकांच्या मालिकेत नेऊन सोडून आपल्याला काहीतरी स्वतंत्र असे राष्ट्रीय अस्तित्व आहे या गोष्टीविषयीची आपणा हिंदूंची जाणीव पार नष्ट करून टाकली; ती पहिली मूलभूत चूक हुडकून काढण्याकरिता पहिल्याने आपल्याला आपल्या वांशिक इतिहासांतच ओझरता तरी दृष्टीक्षेप करणे अवश्य आहे.

## आपल्या इतिहासाचे क्षणिक अपांगदर्शन

आपल्या ह्या हिंदू राष्ट्राचा निदान ५००० (पाच सहस्र) वर्षापूर्वी पर्यंत- त्या वैदिक काळापर्यंत - ऐतिहासिक नि निरपवादरीत्या, माग काढता येतो. आपले राष्ट्रीय पूर्वज त्या वेळी सप्तसिंधूच्या तटाकी वसत; नि उत्कर्ष पावत असून वाढता वाढता पुढे बलाढ्य हिंदू राष्ट्र म्हणून

सुनिश्चितपणे विख्यात होणार असलेल्या एका राष्ट्राची प्राणप्रतिष्ठा करीत होते. वांशिक नि सांस्कृतिक दृष्ट्या ते आर्य म्हणून संबोधिले जात; प्रादेशिक दृष्ट्या ते सिंधूंचे वा सप्तसिंधूंचे नाव धारण करीत. आपल्या आजच्या प्रांतापैकी सिंधू नदीच्या काठचा एक प्रांत नि तेथील लोक हे थेट आज मितीपर्यंत तेच नाव धारण करीत आहेत. 'सिंध' नि 'सिंधू' याच नावानी ते अनुक्रमे संबोधिले जातात. ते आपले पूर्वज, गंगा, विन्ध्य, गोदावरी ओलांडून धडाडीने नि शौर्याने वसाहती करीत नि विजय संपादित ह्या हिंदुस्थानच्या दक्षिण नि पूर्व नि पश्चिम सीमापर्यंत येऊन पोहचले. राजकीय, वांशिक नि सांस्कृतिक दृष्टीच्या संग्रहणाच्या व्यवच्छेदनाच्या नि दृढीकरणाच्या प्रशंसनीय पद्धतीने त्यांनी सिंधपासून पूर्व समुद्रापर्यंतच्या नि हिमालयापासून दक्षिण समुद्रा-पर्यंतच्या आपल्या ह्या भूमीतील प्रसरणाच्या क्रमात संबंध आलेल्या नि संघर्ष झालेल्या यच्चयावत् इतर अनार्य आत्मसात करून सर्वांचे मिळून एक स्वतंत्र राष्ट्र बनविले. शेवटी एक धर्म, एक भाषा, एक संस्कृति, एक पितृभू नि एक पुण्यभू या समान बंधनांनी बांधले गेलेले असे सर्वांचे मिळून राष्ट्रीय स्वरूपाचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचे निश्चित धोरण ठेवूनच राजकारण नि धर्म यांनी त्या वेळी परस्परांशी स्पर्धा केली.

'चार धामां'चेच उदाहरण पहा. बद्रिकेदार, द्वारका, रामेश्वर नि जगन्नाथ ही आपल्या पुण्यभूमीच्या ठोकळ रीतीने चतुःसीमा दाखविणारी तीर्थक्षेत्रे त्या काळातल्या शक्यतेप्रमाणे, आपल्या पितृभूमीच्या चतुःसीमांशीही उत्तम पकारे मिळती आहेत. तो पौराणिक काळ सोडल्यास आपल्या निश्चित इतिहासाच्या काळातसुद्धा चंद्रगुप्त, मौर्य, द्वितीय चंद्रगुप्त, विक्रमादित्य, यशोवर्धन, पुलकेशी, श्रीहर्ष आणि असेच इतर मोठमोठाले सम्राट नि चक्रवर्ती यांच्या केंद्रीभूत बलाढ्य साम्राज्याची, आपल्या लोकांची दृढता अधिकाधिक वाढविलीच असून त्यांना एका समान राजकीय नि राष्ट्रीय अस्तित्वाच्या प्रबळ चेतनेने आंदोलित केले आहे. एका समान संकटाच्या भयाने, आपल्या लोकांना घाबरवून सोडणाऱ्या अशा ग्रीक, शक, हूण इत्यादींच्या प्रचंड स्वाऱ्या आणि त्या संकटाचा धुव्वा उडविण्याकरिता आपल्या लोकांना केव्हा केव्हा शतकावरही एकमुखाने करावी लागलेली महत्तर युद्धे ह्यांच्या योगाने अंतर्गत भेदभाव असताही इतर अहिंदु राष्ट्रांच्या तोडीस तोड करणारे, असे आपणही एक स्वतंत्र राष्ट्र असल्याचे योग्य रितीने प्रकट होऊन आपल्या सांस्कृतिक, राजकीय, वांशिक नि धार्मिक एकत्वाविषयीची त्यांची जाणीव अधिकच संवर्धित झाली. हूणांवरील हिंदूंचा अंतिम विजय आणि मुसलमानांची हिंदुस्थानावरील स्वारी ह्यांच्यामध्ये बाहेरच्या राजकीय संकटापासून अबाधित असा जो शांततेचा प्रदीर्घ कालखंड गेला; त्याचा प्रामुख्याने आपल्या लोकांच्या पुढील दृढीकरणाकडेच विनियोग झाला; आणि त्यांची धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक नि राजकीय एकता इतकी शास्त्रशुद्ध, निश्चित नि जागृत स्वरूपाची झाली की, मुसलमान येथे आले; त्या वेळी, त्यांना हिंदुस्थान हे पूर्ण परिणत होत्साते एकात्म हिंदू राष्ट्र म्हणून विलसत असलेले आढळले.

मुसलमानी स्वाऱ्या नि त्यातूनच बनत गेलेले दिल्ली येथील बलाढ्य मुसलमानी साम्राज्य ह्यांच्या रेट्यामुळे तर काश्मीर ते रामेश्वर नि सिंध ते बंगालपर्यंतच्या हिंदूंचे राजकीय ऐक्य त्याहूनही दृढतर झाले आणि वैदिक सप्तसिंधुपासून निघालेले 'हिंदू' हे नाव पृथ्वीराजाच्या पूर्वीच्याही काळापासून पुढे आपल्या जातीचे एक सन्मान्य नि प्रिय असे समान अभिधान होऊन राहिले. आपल्या सहस्रो हुतात्म्यांनी हिंदू धर्माचा मान राखण्याकरिता 'हिंदू' म्हणून मरण कवटाळले सहस्रोसहस्र राजे नि शेतकरी, सर्वच 'हिंदू' ह्या नात्याने हिंदू ध्वजाखाली एकत्र होऊन बंड करून उठले आणि आपल्या अहिंदु शत्रूंशी लढले; नि लढता लढता कामास आले. शेवटी शिवाजी महाराज जन्मास आले. हिंदू विजयाचा तास वाजला आणि मुसलमानी वर्चस्वाचा दिवस भरला. 'हिंदू' ह्या एकाच नावाने, 'हिंदुध्वज' ह्या एकाच ध्वजाखाली, एकमेव हिंदू नेतृत्वाखाली, 'हिंदुपदपादशाही'ची प्रस्थापना ह्या एकाच ध्येयाने आणि 'हिंदुस्थाना'चे राजकीय- बंधमोचन- आपल्या समान मातृभूची नि पुण्यभूची दास्यमुक्ती- हे एकच साध्य दृष्टीपुढे ठेवून प्रांतोप्रांतीचे हिंदू उठले, आणि सरतेशेवटी मराठ्यांचे साम्राज्य मुसलमानांच्या नबाबांना अन् निजामांना अन् बादशहांना नि पादशहांना, शेकडो रणक्षेत्रांवर, झोडून काढण्यात नि त्यांची मुंडकी उडविण्यात पूर्ण विजयी झाले. मराठे, पूर्व-पश्चिम- उत्तर-दक्षिण चारी दिशांना जे विजय फडकवीत चालले ते मार्गात तंजावर, गुंती, कोल्हापूर, बडोदे, धार, ग्वाल्हेर, अंदूर, झांशी अशा ठिकठिकाणी उपराजधान्या स्थापीत थेट अटकेस जाऊन पोहचले. त्यांनी दिल्लीसही राज्य केले आणि मुसलमान मोंगल बादशहांना आपल्या शिबिरात बंदिवान, निवृत्तभृतिक नि भिक्षेकरीही करून ठेविले. शीख हिंदूंनी पंजाबात, गुरखा हिंदूंनी नेपाळात, राजपूत हिंदूंनी राजपुतान्यात आणि मराठा हिंदूंनी दिल्ली ते तंजावर नि द्वारका ते जगन्नाथ अशी राज्ये गाजविली. अशा पकारे ते वैदिक सिंधु वाढता वाढता बलाढ्य हिंदू लोकसमाज, स्वतंत्र हिंदू राष्ट्र 'हिंदुपदपादशाही'- असे परिणत रूप पावले.

ह्यातला हिंदुपदपादशाही हा शब्द स्वतः पहिल्या बाजी-बाजीरावानेच योजिलेला आहे. ते प्रचंड आंदोलन हिंदुत्वाच्या उत्कट जाणीवेने कसे पूर्ण भारलेले होते; पृथ्वीराज, प्रताप, शिवाजी, गुरुगोविंद, बंदा यांच्यापासून तो नाना फडणवीस नि महादजी शिंदे यांच्या काळापर्यंतचे आपले सर्व हुतात्मे नि वीर नि विजेते 'हिंदू' ह्या नात्याच्या आपल्या राष्ट्रीय नि धार्मिक एकत्वातच कसे भूषण नि अभिमान मानीत, हे आपल्याला समजून नि पटवून घ्यावयाचे असेल, तर एखादा अधिक चांगला ग्रंथ निघेपर्यंत तरी आपण 'हिंदुपदपादशाही' हे माझे ऐतिहासिक पुस्तक अवश्य वाचावे.

येथील मर्यादित जागेमुळे मी केवळ निजामाकडील गोविंदराव काळे ह्या मराठाप्रतिनिधीने अगदी परवा परवा म्हणजे ख्रिस्ताब्द १७९३ त नाना फडणवीसला लिहिलेल्या एका पत्रातील एक छेदकच उदाहरण म्हणून येथे उद्धृत करतो; म्हणजे त्यांच्याच शब्दांत त्यांचे विचार नि भावना, आपल्या कानी पडतील.

''अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्रापावेतो हिंदूंचे स्थान! तुर्कस्थान नव्हे! हे आपली सीमा पांडवांपासून विक्रमादित्यापावेतो त्यांनी राखून उपभोग घेतला. त्यामागे राज्यकर्ते नादान निघाले यवनांचे प्राबल्य झाले. परंतु, आता श्रीमंत पेशव्यांचे पुण्यप्रतापे नि महादजी शिंद्यांचे बुद्धी नि तरवारीचे पराक्रमे सर्व घरास आले. ज्यांनी ज्यांनी, हिंदुस्थानात शिरे उचलली त्यांची शिंद्यांनी फोडली. यात सार्वभौमत्व हाती लागणे, यशकीर्ती यांचे नगारे वाजणे इतक्या गोष्टी आहेत.''

## हिंदू राष्ट्र ही सुव्यवस्थित क्रमिक संघटनात्मक चैतन्यशील समृद्धि आहे; कागदी कलाकुसरीचा तकलादू ताबूत नव्हे!

आपल्या इतिहासाच्या ह्या क्षणिक अपांग दर्शनेकरून (ओझरत्या दृष्टिक्षेपावरून) आता हे स्पष्ट झाले असेल की, वैदिक काळापासून निदान ५००० (पाच सहस्र) वर्षे तरी आपले पूर्वज आपल्या लोकांचा धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक नि राजकीय एकात्मतेचा, स्वतंत्र गट घडवून आकारात आणीत होते. ती क्रिया स्वाभाविक विकास पावता पावता तिला जे परिणत फल आले ते म्हणजेच वैदिक काळातील त्या सिंधूचेच आज सबंध हिंदुस्थानभर पसरलेले आणि हिंदुस्थानलाच आपली एकमेव पितृभू नि पुण्यभू मानीत असलेले असे जे हिंदू राष्ट्र बनून राहिले आहे; ते होय, कदाचित चिनी राष्ट्र वर्ज्य केल्यास जगातील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राला आपल्या हिंदू राष्ट्रासारखे आपल्या जीवनाचे नि विकासाचे इतके अखंडित सातत्य अधिकारता येणार नाही. हिंदू-राष्ट्र हे काही पावसाळ्यातल्या कुत्र्याच्या छत्रीसारखे उगवलेले नाही. ते एखाद्या समेटातूनही उत्पन्न झालेले किंवा उत्पन्न केलेले, राष्ट्र नाही, तो काही निव्वळ कागदाचा बनविलेला खेळ नव्हे; एखाद्या मालासारखे ते मागणीप्रमाणे कधी घडविलेलेच नव्हते; किंवा ते म्हणजे परप्रदेशातली चालचलाऊ करून घेतलेली सोयही पण नव्हे. ते ह्याच भूमीतून वर आलेले आहे नि ह्या भूमीतच खोल नि दूरवर, त्याची मुळे पसरलेली आहेत. मुसलमानांचा किंवा जगातील अन्य कोणाचा द्वेष करण्याकरिता म्हणून काहीतरी हुडकून काढलेले किंवा रचलेले ते थोतांड नाही; तर आपली उत्तर सीमा सांभाळणाऱ्या हिमालयाप्रमाणे भव्य नि भक्कम असे ते एक सत्य घटित आहे.

चिंता नाही. आपल्या ह्या राष्ट्रात घरातल्या घरातच अनेक पंथ नि वर्ग आणि अनेक वैसदृश्ये नि भेद होते नि आहेतही. पण त्यात विशेषसे ते काय? कोणते राष्ट्र खरोखर त्यापासून अलिप्त आहे? कोणत्याही राष्ट्राचे राष्ट्रत्व हे त्यातील लोकांत आपापसातले पोटभेद नि भिन्नभाव नाहीत; यावरून मुळी ठरविलेच जात नसते. तर त्या लोकांचे - त्यांचे त्यांच्यातच इतर सर्व विदेशी राष्ट्रांपेक्षा अधिक असे जे एकात्म स्वरूपाचे एकत्व दिसून येत असते; त्यावरून नि त्यांच्या आपापसातल्या भेदांपेक्षाही त्यांची जगातल्या इतर सर्व लोकांपासून जी ठळक नि फार मोठ्या प्रमाणात भिन्नता असते; तीमुळेच त्यांचे स्वतंत्र राष्ट्रीयत्व ठरविण्यात येत असते. जगातील

राष्ट्रे ठरविणारी ही एकच एक कसोटी आहे. हिंदूंना एकच समान पितृभू नि एकच समान पुण्यभू असल्यामुळे आणि त्या दोन्हीही वस्तू एकरूपच असल्यामुळे त्यांचे राष्ट्रीयत्व दुप्पट निश्चित आहे नि ते त्या कसोटीलाही दुहेरीपणेच चांगले उतरते. आपल्या इतिहासाच्या येथवर रेखाटलेल्या धावत्या रूपरेषेच्या योगाने हे अचूक कळून येत आहे की सहस्रो वर्षे आपल्या हिंदू लोकांना स्वकीय असा एक स्वतंत्र लोकसमाज- स्वकीय असे एक राष्ट्र या नात्याने आपल्या धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय नि देशाभिमानात्मक अशा, एकात्मतेची निश्चित जाणीव होती. प्रस्तुत स्थली विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, थेट मराठी साम्राज्याचे पतन होईपर्यंत राजे, राष्ट्रभक्त, महंत, कवी, राजकारणी, अशा आपल्या सर्व लोकांनी 'हिंदू राष्ट्रा'ची कल्पना वृद्धिंगत नि दृढ करण्याकरिता पूर्ण जाणिवेने नि सतत झटून हिंदूंची प्रत्यक्ष 'हिंदुपदपादशाही' -स्वतंत्र हिंदू साम्राज्य-स्थापण्याकरिता, जिवापाड परिश्रम केले.

माझ्या प्रतिपादनाचा हा धागा तूर्त तरी येथेच सोडणार असून, आपल्याला सांप्रत तोंड द्यावयाच्या असलेल्या प्रश्नांच्या संबंधात त्याचे विशेष महत्व जेव्हा मला दाखवावे लागणार आहे; तेव्हा पुढे तो मी पुन्हा हातात घेऊन पुढे चालविणार आहे.

## 'हिंदी राष्ट्र' ह्या संकल्पनेचा उदय

आपल्या हिंदू राष्ट्राच्या स्वाभाविक विकासाचा नि परिणतीचा आढावा मराठी साम्राज्याचे ख्रिस्ताब्द १८१८ तील पतन नि त्यायोगेच हिंदुस्थानात ब्रिटिश राज्याचे आगमन येथपर्यंतचा आपण घेतला. पंजाबातील आपल्या शीख हिंदू राज्याचे पतनसुद्धा ब्रिटिशांना आपल्या सर्व देशभर अप्रतिहत वर्चस्व स्थापण्याला समर्थ करते झाले. जिंकण्याच्या क्रमांत लढावी लागत असलेली सर्व घनघोर युद्धे हिंदू राजांशींच लढावी लागत आहेत. हे ब्रिटिशांना पूर्ण आढळून आलेले होते. राजकीय घटक ह्या नात्याने मुसलमानांशी त्यांना कोठेच तोंड द्यावे लागले नाही. राजकीय सत्ता ह्या नात्याने मुसलमानांचा मराठ्यांनीच धुव्वा उडविला होता. एकच एक लढाई ब्रिटिशांना एकट्यानेच अशी मुसलमानांशी द्यावी लागली. ती प्लासीची तेवढीच होय. पण ते सुद्धा इतके सोपे कर्म होते की, ब्रिटिश सेनाधिकाऱ्याने झोपलेला असतानाच ती जिंकली; असे म्हणतात! यामुळे अर्थातच ब्रिटिशांची पहिली चिंता हिंदू राष्ट्राच्या खाली, कसाही पण सुरुंग भरलाच पाहिजे; त्याची धार्मिक नि राजकीय गट ह्या दृष्टीची दृढता कशीही पण फोडलीच पाहिजे हीच होती. मुसलमानांचा ह्या रंगपटावरील प्रवेश हा ब्रिटिशांच्या हातातले त्यांचीच योजनाकृति रेखाटण्यास उपयोगी पडणारे केवळ एक सोयीस्कर उपकरण किंवा साधन ह्या नात्यानेच झाला. हिंदुस्थानातील ख्रिस्ती धर्मप्रचारक संस्थांना राज्यसत्तेचा राजकीय पाठिंबा अर्थात प्रत्यक्ष साहाय्य पुरवून हिंदूंना ख्रिस्ती करण्याचा उघड उपायही ब्रिटिशांनी चोखाळून पाहिला. परंतु ख्रिस्ताब्द १८५७ तील बव्हंशी हिंदू नेत्यानीच घडवून आणलेल्या क्रांती उत्थानाने, ब्रिटिशांचे डोळे

उघडून हिंदूंच्या नि मुसलमानांच्याही धर्मावर उघड हल्ला करण्यात केवढी आपत्ती आहे ते चांगलेच निदर्शनास आणल्यामुळे तेव्हा पासून ब्रिटिश राज्याचे ख्रिस्ती मिशनला उघड सहाय्य देण्याचे बंद झाले. त्यानंतर हिंदुस्थानास अराष्ट्रीय बनविणारी पाश्चिमात्य शिक्षणाची योजना प्रविष्ट करून हिंदू तरुणांच्या उगवत्या पिढीच्या मनातील साक्षात हिंदुराष्ट्राविषयीच्या कल्पनेखालीच सुरुंग लावण्याचे धोरण त्यांनी चालू केले. स्वतः मेकॉलेचेच उद्‌गार त्याविषयी आहेत. आपल्या लिहिलेल्या एका घरगुती पत्रातच ''आपली पाश्चिमात्य शिक्षणाची योजना चालू केल्यास हिंदू तरुणांना, आपण होऊनच ख्रिस्ती होणे, अंतर्बाह्य पाश्चिमात्य बनणे आणि शेवटी ब्रिटिश लोकांशी संलग्न नि समरस होणे; प्रिय वाटू लागेल,'' असे मेकॉलेने स्पष्ट दाखवून दिले आहे. हिंदूंच्या दुर्दैवाने, त्यांच्या त्या अपेक्षा एकूण मुळीच विफल ठरल्या नाहीत; तर हिंदू तरुणांच्या ज्या पहिल्या पहिल्या पिढ्यांनी आधाशीपणाने ते पाश्चिमात्य शिक्षण घेतले. त्या सर्व हिंदुपणाच्या-हिंदुत्वाच्या पूर्वीच्या ध्येयापासून खरोखरच तोडल्या गेल्या. हिंदू इतिहास 'हिंदू धर्म' - 'हिंदू संस्कृती' याविषयी त्यांना जवळजवळ काहीच माहीत नाहीसे झाले. हिंदुत्वाविषयी त्यांना जे काय माहीत झाले. किंवा माहीत असे ते म्हणजे हिंदू असल्याविषयीची त्यांना लाज वाटावयाला लावतील; अशा धूर्ततेने त्याची सारभूत तत्त्वे म्हणून बुद्धिपुरःसर दाखवून देण्यात आलेली त्यांची केवळ वैगुण्ये तेवढीच होत. उलटपक्षी मुसलमानांना ह्या शिक्षणापासून एक हात दूर ठेवण्यात आले आणि त्यामुळे त्यांच्या जातीय दृढतेचा पाया, मुळीच ढासळला नाही.

तथापि, हिंदुस्थानातला तो पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रवेश, निर्भेळ अपायच, असा ठरला नाही. त्याच्या मूळ पुरस्कर्त्यांच्या अपेक्षेविरुद्ध त्याचे उद्दिष्ट कार्य फोल ठरवून शेवटी हिंदूंच्या सामर्थ्यात भर पाडतील अशा काही नवीन प्रेरणाही त्याच्या योगाने, लवकरच प्रचलित झाल्या. तथापि येथे आपण त्याच्या तात्कालिक परिणामांचाच तेवढा विचार करीत आहोत आणि तो पाश्चिमात्य शिक्षणाचा तात्कालिक परिणाम, असा घडून आलेला दिसला की, त्या शिक्षणाने भारलेल्या हिंदूंच्या पहिल्या दोन पिढ्या समूळ वाहवल्याच; पाश्चिमात्य ते ते सारेच त्यांना प्रिय वाटू लागले. ब्रिटिश राज्य हे त्या ईश्वरप्रेरितच मानू लागल्या. त्यांनी त्याच्या चिरस्थायित्वासाठीच प्रार्थना केल्या. पाश्चिमात्य वाङ्मय नि पाश्चिमात्य इतिहास यानीच पुष्ट झाल्यामुळे आणि हिंदू तत्वज्ञान नि हिंदू राजनीति यांचा संबंधच तोडला गेल्यामुळे साहजिकपणेच त्यांनी असा सुगम निर्णय ठाम करून टाकला की वैयक्तिक नि सामुदायिक जीवनातल्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीतही आपण पाश्चिमात्यांचे नि त्यातही विशेषेकरून इंग्रजांचे अनुकरण करू- तरच आपल्या ह्या देशाचे खरेखुरे हित नि रक्षण होईल.

वर सांगितलेल्या ह्या लोकांना सार्वजनिक कळकळ नव्हती किंवा ते बुद्धिमान नव्हते असे नाही. उलटपक्षी आंग्लशिक्षित हिंदूंच्या ह्या पहिल्या पिढीतल्या लोकांना इंग्रजांकडून सामाजिक नि सरकारी मान्यतेच्या उच्च स्थानी आरूढ होण्याची चांगलीच मोकळीक देण्यात येऊन हिंदुस्थानातील लोकांनी 'नेटिवां'नी बुद्धिपुरस्सर' पुढे ब्रिटिश लोकांची स्तुतिस्तोत्रे गावीत; आणि

ब्रिटिश राज्याविषयीच्या आपल्या एकनिष्ठेचे प्रदर्शन करावे; एवढ्याकरिता त्यांना प्रत्येक प्रकारची सुखसोय नि सवलत मिळून, आपल्या लोकांवर प्रचंड वजन बसविता येण्याची उत्तम व्यवस्था झाली.

त्यांनी स्वतःला सुद्धा त्यांच्यापरीने आपल्या लोकांचे नि आपल्या राष्ट्राचे हित करावे असेच मनापासूनच वाटत होते.

परंतु त्या हिताविषयीची त्यांची कल्पना आणि आपले राष्ट्र म्हणजे काय ह्या विषयीचे त्यांचे मत ही दोन्हीही पूर्णपणे परकी- ब्रिटिश असून, त्यांचा हिंदुस्थानातील साक्षात वस्तुस्थितीशी काहीच संबंध नसे!

आपल्या देशालाच साहजिकपणे, ते आपले राष्ट्र म्हणून मानीत; त्याचे तेच कारण होय. त्यांच्या इतर सर्व कल्पना नि भावनांप्रमाणेच त्यांची राष्ट्राभिमानाची कल्पनाही आयती इंग्लंडहून बनून आलेली, तीच उस्नी घेतलेली असे. त्यांना असे आढळले की, इंग्रज हे राष्ट्ाrभिमान म्हणजे स्वतःच्या देशावरील ते वसत असलेल्या भौगोलिक भूपरिमाणावरील भक्तीच समजतात. इंग्लंडमध्ये जे जे राहतात. त्या सर्वांचेच मिळून धर्म, वंश, संस्कृति इत्यादी निरपेक्ष असे एक संयुक्त राष्ट्र झाले आहे आणि म्हणूनच इंग्लंड हे भक्कम नि बलिष्ठ राष्ट्र बनले आहे. असाच त्यांचा समज असे. ही त्यांची तुलना जितकी आकर्षक तितकीच सोपीही पण होती. अर्थात आपल्यालासुद्धा जर वंश, धर्म, संस्कृति जाती, पंथ यांच्या निरपेक्ष असे हिंदुस्थानचे एकीकरण करता आले तर आपले लोकसुद्धा भक्कम नि बलिष्ठ अशा 'हिंदी राष्ट्रा'च्या प्रतिष्ठेला पोहचतील असे त्यांना वाटे. तत्कालीन युरोपातही राष्ट्रीय परिणाम म्हणजे प्रादेशिक परिमाणात ते वास्तव्य करून राहिले ते सारे फ्रेंच, जर्मनीत राहिले ते जर्मन, स्पेनमध्ये राहिले ते स्पॅनिश, इंग्लंडमध्ये राहिले ते इंग्लिश आणि ह्याच अनुक्रमाने प्रत्येक देशातील लोकांचे ते ते लोकराष्ट्र समजले जाई त्यावरून त्यांना वाटले, किंबहुना विचार न करताच ते निश्चित धरून चालले की, प्रादेशिक एकता एवढा एकच बंध, एकाच भौगोलिक परिमाणात वास्तव्य करणे एवढी एकच गोष्ट त्या त्या लोकांना स्वतंत्र राष्ट्र ठरविण्यास सर्वात अगत्याची होय; -नव्हे तीच एक अगत्य घटकभूत होय!

''ठीक! तर मग, हिंदुस्थानातले हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, पारसी इत्यादी सर्व लोक हिंदुस्थान नावाच्या प्रादेशिक परिमाणात अनेक शतके एकत्र वसत आले आहेत; अर्थात हे सर्व लोक म्हणजे स्वयमेव, एक राष्ट्रच असले पाहिजेत. धर्म, भाषा, संस्कृति, वंश आणि ऐतिहासिक विकास ह्या गोष्टीत त्यांच्यात काहीच संबंध नाही. प्रादेशिक एकता, एक समान देश हाच तो एकराष्ट्रत्व सिद्ध नि पुष्ट करण्यास आवश्यक असा पाया होय. प्रादेशिक परिमाण हेच, राष्ट्रीयत्वाचे परिमाण असले पाहिजे. इंग्लंडकडे पहा, फ्रान्सकडे पहा, अमेरिकेकडे पहा. ''---असे त्याचे समर्थन असे.

ह्या गृहीत कृत्यापासून निघणारा उपसिद्धान्तही अपरिहार्य होता. हिंदुस्थान हा एक प्रादेशिक परिमाण असल्यामुळे नि देश ह्या संज्ञेलाही पात्र असल्यामुळे तो राष्ट्रीय परिमाणही

असलाच पाहिजे. म्हणून आपण सर्व केवळ हिंदीच असलो; किंवा झालो पाहिजे आणि हिंदू अथवा मुसलमान अथवा ख्रिस्ती किंवा पारशी असण्याचे बंद झाले पाहिजे. अर्थातच आंग्लशिक्षित लोकांच्या ह्या पहिल्या पिढ्यांच्या पुढाऱ्यांनी स्वतः बहुतेक सर्व हिंदू असताही हिंदू असण्याचे सोडून देण्याचा, आटोकाट प्रयत्न केला आणि हिंदू नि मुसलमान अशा भेदांची जाणीवसुद्धा ठेवणे हीन प्रतिष्ठेचे मानून ते एकदम 'हिंदी देशभक्त'च मात्र बनले.

हिंदू असण्याचे सोडून देणे; त्यांना अतिशय सोपेही गेले. त्यांना दुसरे कोणतेच शिक्षण मिळालेले नव्हते आणि जे पाश्चिमात्य शिक्षण त्यांना मिळाले होते. त्याने त्यांना 'हिंदुत्व' म्हणजे हिंदुधर्माव्यतिरिक्त दुसरे काहीच नसून तो धर्मही म्हणजे निव्वळ भ्रामक समजुतीचा एक जुडगाच होय; एवढेच शिकविले होते. थोडेसे थांबण्याचा आणि वांशिक, सांस्कृतिक नि ऐतिहासिक अशा सर्व दृष्टिकोनातून हिंदुत्वाच्या - हिंदुपणाच्या इतर नि सर्वात मूलभूत अशा विषयासंबंधी विचार करण्याचा त्यांना प्रसंगच कधी आला नाही.

त्यांना स्वतःला ज्या अर्थी आपला हिंदुपणा सोडून देणे नि आपण हिंदी नि केवळ हिंदीच असल्याच्या विचारात निमग्न होणे सोपे असल्याचे आढळून आले त्या अर्थी मुसलमानांनाही आपण मुसलमान असल्याचे विसरणे नि हिंदी लोकांत -हिंदी राष्ट्रात- पूर्णांशांनी मिसळून जाणे तितकेच सोपे वाटेल अशी त्यांची अपेक्षा होती. ती गोष्ट त्या 'हिंदी' देशभक्तांना हिंदुस्थान ह्या प्रादेशिक परिमाणाप्रमाणे आधीच ठरून गेली असल्यासारखी वाटत होती.

येथे हे सांगणे आवश्यक आहे की आमची ही सारी टीका केवळ सामुदायिक अर्थानेच लागू आहे. वैय्यक्तिक वा कृतिविषयक सविस्तर नि सापवाद ऊहापोह करणे; ह्या अल्पमर्यादित भाषणात शक्य नाही.

ते पाश्चिमात्य शिक्षण हिंदूंमध्ये जसजसे झपाट्याने पसरत चालले; तसतशी 'हिंदी राष्ट्रीयत्वा'च्या कल्पनेलाही अनुयायांची अधिकाधिक मोठी संख्या मिळण्याचे चालू राहिले. अर्थात त्याच्या उलट हिंदूंच्या हिंदू ह्या नात्याने, राजकीय परिमाणाच्या नात्याने स्वयमेव राष्ट्र ह्या नात्याने, असणारा एकात्मपणा अधिकाधिक क्षीण क्षीण होत चालला आणि शेवटी निव्वळ अनास्थारूपी उपासमारीमुळे त्याला स्वतःची शुद्धीच राहिली नाही.

परिस्थितीला मिळालेल्या ह्या कलाटणीमुळे ब्रिटिशांना मनातून फार आनंद झाला. (अशा स्थितीत हिंदू राष्ट्राच्या राजकीय जाणिवेचे पुनरुज्जीवन नि हिंदू सार्वभौमत्वाच्या ध्येयाचा पुनरुदय होईल तर त्यापासून काय ते आपल्या राजकीय वर्चस्वाला धोका येण्याचे भय आहे हे ब्रिटिश लोक पूर्णपणे जाणून होते. पण हिंदू असल्याचा राजकीय दृष्ट्याही अभिमान वाटणारा हिंदू ख्रिस्ताब्द १८५७ नंतरही संशयास्पद मनुष्य समजला जात असे; हे सत्य आहे. कारण, तो आपल्या हिंदू राज्याच्या हानीविषयी नित्य चिंतन करी आणि म्हणून प्राथमिक क्रांतिकारक म्हणून त्याच्यावर पाळत ठेविली जाई.) १८५७ मधल्या क्रांतियुद्धातील पराभवानंतरही पंजाबात, रामसिंग

कुका आणि महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी केलेल्या सशस्त्र उत्थानांच्या योगाने, ब्रिटिशांना येत असलेला तो संशय केवळ दृढतरच झाला.

## ‘हिंदी राष्ट्रीय सभे‘चा जन्म

शिवाजीच्या प्रमाणे स्वतंत्र हिंदू राज्याचे पुनरुज्जीवन करण्याच्या आकांक्षेने वासुदेव बळवंत फडके ह्यांनी केलेले उत्थान मोडून काढले गेल्यानंतर, तत्काळच ‘हिंदी राष्ट्रीय सभे‘चा अर्थात् काँग्रेसचा जन्म झाला.

येथे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की, ब्रिटिश सरकार काँग्रेसच्या स्थापनेला अनुकूल होते आणि एका व्हाअसरॉयनेच ती आत्मीयभावाने पुरस्कारिली होती. ह्यूम, वेडरबर्न इत्यादींसारख्या अनेक प्रमुख ब्रिटिश सनदी नोकरां (सिव्हिलियन्स) कडेच बरीच वर्षे तिचे नेतृत्व चालू होते.

मोठमोठ्या हिंदू पुढाऱ्यांनी अत्यंतिक लोकहितबुद्धिने प्रेरित होऊन तिची जोपासना केली आणि त्यामुळेच ‘हिंदी‘ देशभक्तांच्या त्या नव्या संप्रदायाची ती संघटित नि अधिकृत प्रतिनिधी बनली.

ब्रिटिश हे ज्या अर्थी हिंदुराष्ट्राभिमानाच्या संभाव्य पुनरुज्जीवनावरील तोडगा ह्या दृष्टीने ह्या हिंदी उपक्रमाला अनुकूलच होते; त्या अर्थी या नव्या हिंदी राष्ट्रवादी संप्रदायाच्या संसर्गाने मुसलमानाचा मुसलमान ह्या नात्याचा एकजिनसीपणा बाधित होणार नाही. अशी काळजीही ते (ब्रिटिश) दक्षतेने घेतच होते. कारण मुसलमानसुद्धा जर त्या संप्रदायात हिंदूंप्रमाणे पूर्ण मनोभावाने जाऊन मिळाले; तर खरोखरीच, संयुक्त हिंदी- राष्ट्र अस्तित्वात येईल आणि ती घटना हिंदुस्थानातील ब्रिटिश वर्चस्वाला हिंदूंच्या एकाकी पुनरुज्जीवनापेक्षाही कदाचित अधिक घातक ठरेल. हे ब्रिटिश लोक पुरेपूर जाणून होते. हिंदी राष्ट्राभिमानाच्या खऱ्या, प्रामाणिक नि फलदायी हिंदू-राष्ट्राभिमानाच्या पुनरुज्जीवनाहून अधिक नसली; तरी तितकी तरी, ब्रिटिशांना भीती वाटत होती. नि ते त्याचा द्वेष करीत होते. त्यामुळे एकीकडून त्यांनी ‘हिंदुराष्ट्रा‘विषयी मुसलमानांच्या ठिकाणी असलेल्या माथेफिरूपणाच्या द्वेषाला वैराला नि अविश्वासाला चोरून उत्तेजन नि साहाय्य देऊन कोणत्याही प्रकारचे खरे हिंदी राष्ट्रीय ऐक्य मृगजळाप्रमाणे भ्रामक करून टाकले आणि दुसरीकडून निर्भेळ हिंदुराष्ट्राच्या उदयाचा विचार व्यावहारिक राजकारणाच्या कक्षेबाहेरच रहावा याकरिता हिंदूंना मात्र निदान प्रारंभी तरी ‘राष्ट्रवाद‘रूपी मृगजळाच्या मागे हावरेपणाने धाव घेण्याला प्रोत्साहन दिले. अर्थात ‘हिंदी राष्ट्रवादा‘ला उत्तेजन देण्याच्या ब्रिटिशांच्या त्या धोरणाचे परिणाम आरंभी आरंभीच्या त्यांच्या अपेक्षा मुळीच पूर्ण करणारे नव्हते; नि त्यामुळे

त्यांना ते धोरण पुढे पालटावे लागले; ही गोष्ट निराळी. परंतु त्यावरून मी वर निर्देशिलेली गोष्ट खोटी ठरत नाही.

### ‘हिंदी राष्ट्रवादा‘चे ध्येय वस्तुतः उदात्तच होते

सर्व हिंदुस्थानची एकजूट करून एक सुसंघटित असे, राजकीय परिमाण बनविण्याच्या ध्येयात, हिंदूंना आक्षेपार्ह असे काहीच आढळले नाही; आणि ते अगदी, साहजिक होते. कारण नित्य, विश्वव्यापक दृष्टीने, तत्वविचार करणाऱ्या नि लोकसंग्रहाकडेच कल असलेल्या हिंदूंच्या मनोवृत्तीशी ते मिळतेच होते.

हेही खरेच आहे; की एकच मानवी राज्य, सर्व मनुष्यजात हे त्यातील नागरिक नि पृथ्वी ही त्यांची मातृभूमी असेच ध्येय राजकारणाचे असावयास पाहिजे. अखिल मानवजातीच्या एक पंचमांशाने बसलेला हा सर्व हिंदुस्थान धार्मिक, वांशिक नि सांस्कृतिक भिन्नभावांचा विचार न करता त्या सर्वांना एकाच एकात्म गटात बुडवून एक झाला; तर ते सर्व मानवी राजकीय ध्येय प्रत्यक्ष गाठण्याच्या दिशेने मानवजातीने एक मोठेच पाऊल टाकले असे होईल; ह्या कल्पनेच्या भाषेपुरता नि चित्रापुरता विचार केला तर ‘सर्वं खल्विदं ब्रह्म‘- हे सर्व केवळ एक नि अविभाज्य ब्रह्म आहे असे धार्मिक नि सांस्कृतिक तत्वज्ञान प्रतिपादणाऱ्या हिंदूसारख्या लोकांना ते आकर्षक वाटल्यावाचून कसे राहावे? परंतु त्या ब्रह्म्यालाही तत्वज्ञानाच्या दृष्टीप्रमाणे राजकीय दृष्टीनेही ‘माया‘ ह्या विभाजक तत्वाचे दुसरे अंग आहे. पण, त्या ध्येयाविषयीच्या उत्साहभरात त्या हिंदू देशभक्तांचे त्याच गोष्टीकडे नेमके दुलर्क्ष झाले! जर सर्व हिंदुस्थान एक झाला! -होय; पण त्या ‘जर‘नेच सर्वात मोठा घोटाळा केला! ‘हिंदी राष्ट्र‘ ही नवी कल्पना, हिंदुस्थानच्या प्रादेशिक ऐक्याच्या एकट्याच समान बंधावर उभारलेली होती. एकजात कोणाच हिंदूंना त्यांच्या अत्युत्कट अशा धर्मविषयक वा संस्कृतिविषयक वा वंशविषयक भावनांना विरोधी असे त्या गृहीत कल्पनेत काहीच आढळले नाही. कारण त्यांचे राष्ट्रीय अस्तित्व हिंदुस्थान ह्या प्रादेशिक परिमाणाशी पूर्वीच एकरूप होऊन गेलेले होते. हिंदुस्थान ही त्यांची केवळ निवासभूमीच नव्हती; तर साक्षात घरच, पितृभूच मातृभूच आणि एकमेव पुण्यभूही होती! ‘हिंदी देशभक्ती‘, हा त्यांना ‘हिंदू राष्ट्रभक्ती‘चाच केवळ, एक दुसरा पर्यायशब्द होता. प्रादेशिक परिमाणसुद्धा त्यांच्या वांशिक, धार्मिक नि सांस्कृतिक परिमाणांशी इतके पूर्णत्वाने एकरूप झालेले होते; की त्यांच्या दृष्टीने ‘हिंदी राष्ट्र‘ ही ‘हिंदू राष्ट्रा‘चीच केवळ प्रादेशिक संज्ञा होती. हिंदुस्थानला, ‘हिंदुस्थान‘ (इंडिया)

म्हणून संबोधिले तरी तो 'हिंदुस्थान'च राहिला असता; तत्वतः त्याच्यात काहीच अंतर पडले नसते आणि म्हणून व्यवहाराकरिता ती गोष्ट दुलर्क्षिलीही गेली असती.

पाश्चिमात्य शिक्षणात पारंगत असतानाही जे हिंदुपणाच्या भावनेने रसरसले होते नि धर्माने वंशाने नि संस्कृतिने हिंदू असल्याविषयी जे अभिमान धरीत होते; ते हिंदू पुढारीसुद्धा त्या हिंदी राष्ट्रीय चळवळीला जे मिळते झाले; अंतःकरणपूर्वक काँग्रेसच्या कार्यात जे सहभागी झाले आणि हिंदुस्थानातील इतर अहिदु अल्पसंख्याकांशी न्याय्य पायावर नि सन्मान्य सहवासी म्हणून समानता राखणारे, असे खरे हिंदी संयुक्त राज्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारच्या हातून राजकीय सत्ता हिसकावून घेण्याकरिता चिकाटीने झगडणाऱ्या अशा संपूर्ण राजकीय संस्थेचे- काँग्रेसचे नेतृत्वही त्यांनी जे चालविले त्या सर्वांचे मी वर सांगितले आहे तेच कारण होय.

परंतु जरी सर्व हिंदू, संशयरहित उत्साहाने, त्या 'हिंदी राष्ट्रीय सभे'च्या भोवती, गोळा झाले आणि तिच्या बुडाशी असलेल्या प्रादेशिक (Geographical Nationality) राष्ट्रीयत्वाच्या तत्वाला जरी त्यांनी आपली प्रामाणिक निष्ठा अर्पिली तरी, हिंदुस्थानातील मुसलमानांच्या गळी उतरण्याच्या संबंधात ते तत्व अत्यंत अपेशीच झाल्याचे दिसून आले. त्यांचा सबंध समाज, पहिल्यापासूनच तिच्यापासून पाय मागे घेऊन होता आणि पुढे पुढे तर तो तिच्यावर पुरा संतप्तच होऊ लागला. कशाही रितीने राजकीय एकगट बनविण्याकरिता आपापले वांशिक नि धार्मिक व्यक्तित्व 'हिंदी राष्ट्रा'त, विलीन करण्याविषयीची मागणी सर्व हिंदी लोकांना काँग्रेसकडून जसजशी अधिकाधिक आग्रहाने होऊ लागली तसतसे मुसलमान अधिकाधिकच अविश्वासू नि अनावर होत चालले. कारण, 'हिंदी देशभक्ती'ची काँग्रेसने जी व्याख्या केली होती; तिच्या योगाने वांशिक धार्मिक नि सांस्कृतिक आकांक्षांचे प्राणसर्वस्वच असणाऱ्या त्यांच्या मुसलमानी राष्ट्राभिमानाला प्राणांतिक टोला बसणार असे त्यांना स्वभावतःच वाटत होते. ब्रिटिश सरकारने आपले उद्दिष्ट साधण्याकरिता त्यांच्या त्या काँग्रेसविरोधक प्रवृत्तीला उत्तेजन दिले.

आपल्या हिंदू देशभक्तांच्या चिकाटीच्या प्रयत्नांनी काँग्रेसचे राजकीय महत्व जो जो अधिकाधिक वाढत चालले तिच्या मागण्या जसजशा अधिकाधिक आग्रहाच्या होत चालल्या नि त्या मागण्यांचा पाठपुरावा करण्याची तिची शक्तीही जसजशी प्रबलत्तर होत चालली तो तो आणि तसतसा मुसलमानांचा विरोध तिला अधिकाधिक स्पष्ट शब्दांत नि निश्चित असा होऊ लागला; आणि 'हिंदी राष्ट्रीय सभे'ची चळवळ निर्माण करण्यातले धोरण सरतेशेवटी पुरते अपेशी होऊन आपल्या अपेक्षा फार मोठ्या प्रमाणात फोल ठरल्या असल्याचे निराश झालेल्या ब्रिटिश सरकारला पटून ब्रिटिश सरकारचेही मुसलमानांत अधिकाधिक आग्रहाचे उत्तेजन नि अधिकाधिक चोरून असे सहाय्य मिळत गेले.

'हिंदी राष्ट्रीय सभे'च्या चळवळीपासून हिंदू दृष्टीनेही आपणा हिंदूंना जे लाभ झाले आहेत; ते न ओळखणारा मनुष्य मी मुळीच नाही. मूळचा विशिष्ट उद्देश नसतानासुद्धा केवळ आपाततःच

असले; तरी पण प्रांतिक भाषिक नि पंथविशिष्ट कुढेपणा, भेद नि भिन्नत्व घासून काढून सबंध हिंदू- जगाचे सामग्ऱ्याने दृढीकरण घडवून आणण्यात तिने फार मोठा भाग घेतला आहे. एक सार्वजनिक राजकीय पीठ तिने त्यांना पुरविले आहे; संयुक्त नि मध्यवर्ती राज्याच्या निश्चित ध्येयासह समान राष्ट्रीय अस्तित्वाच्या जाणिवेने तिने, त्यांना सचेतनही केले आहे. जे दोष मध्ये घुसले असतील ते काढून सुधारता येतील; पण जे चांगले निष्पन्न झाले आहे ते नाकारण्याचे कारण नाही. हिंदुस्थानात चालू करण्यात आलेल्या पाश्चिमात्य शिक्षणाच्या नावानेही मी खडे फोडीत नाही. ते तेथे चालू करण्यातले ब्रिटिशांचे हेतु जरी कितीही शंकनीय असले; तरी सरतेशेवटी आपण हिंदू तो डाव उलटविण्यात यशस्वीच झालो असून पश्चिमेशी आपल्या त्यायोगे आलेल्या संबंधापासून आपला लाभ नि हितच झाल्याचे दाखविता येण्याच्या स्थितीतच सध्या आपण आहो. तथापि पश्चिमेशी आलेल्या आपल्या संबंधापासून नि सरकारी विश्वविद्यालयातील इंग्रजी शिक्षणाच्या पुनरुज्जीवनापासून आपण हिंदूनी मिळविलेला लाभ हा ज्याप्रमाणे ब्रिटिश सरकारच्या दुष्ट हेतूला न जुमानता मिळविलेला होता. तद्वतच, आपल्या हिंदुराष्ट्राच्या पुढील दृढीकरणाऱ्या रूपानेही जे हित आपणा हिंदूंचे झाले ते सुद्धा 'हिंदी राष्ट्रीयत्वाच्या त्या नव्या संप्रदायाच्या किंवा 'हिंदी राष्ट्रीय सभे'च्या घोषित उद्देशाच्या बळावर झालेले नाही; तर हिंदू ह्या नात्याची आपली वांशिक नि धार्मिक जाणीव दडपून टाकण्याच्या तिच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रयत्नांना न जुमानताच ते झालेले आहे. प्रादेशिक देशभक्तांना आम्ही हिंदू असण्याचे निदान राष्ट्रीय नि राजकीय गट ह्या नात्याने तरी बंद होणेच पाहिजे होते. त्यांच्यातल्या काहीना तर आपण हिंदू असल्याचे नाकारण्यातच साक्षात भूषण वाटले. ते केवळ 'हिंदी' (इंडियन) च होते. तसे करण्यात आपण देशभक्तीचे एक मोठेच उदाहरण घालून देत आहो; असे मानून त्यायोगे मुसलमानांनासुद्धा त्यांचे जातीय अस्तित्व सोडून देण्याविषयी नि त्या प्रादेशिक हिंदी राष्ट्रामध्ये, नामनिर्देशातील रीतीने विलीन होण्याविषयी आपण वळवू अशी त्यांची कल्पना करून घेतली.

परंतु मुसलमान हे आधीही मुसलमान नि अंतीही मुसलमानच राहिले. 'हिंदी' केव्हाच झाले नाहीत! भुरळ पडलेले हिंदु लाखोनी बंदिगृहात जाऊन सहस्रांनी अंदमानला जाऊन आणि शेकडोंनी फासावर जाऊन सर्व 'हिंदी' लोकांसाठी समान राजकीय अधिकार हिसकून घेण्याच्या हेतूने ब्रिटिशांशी झगडत होते. तोपर्यंत मुसलमान कुंपणावर बसूनच निव्वळ मौज पहात राहिले! परंतु एकीकडून काँग्रेसनिष्ठ हिंदूंनी चालविलेली निःशस्त्र प्रतिकार चळवळ नि दुसरीकडून सशस्त्र हिंदू क्रांतिकारकांनी चालविलेली अधिक भयंकर नि अधिक परिणामकारक सशस्त्र चळवळीचा प्राणपणाचा संघर्ष यांनी ब्रिटिश सरकारवर पुरेसे दडपण आणून हिंदी लोकांच्या हाती काहीतरी भरीव सत्ता देणे, त्याला हिंदूंनी भाग पडताक्षणीच मात्र, मुसलमान पटापट धावत आले; आणि ''आम्ही हिंदी आहो; आम्हाला आमचा प्राप्त वाटा पुरेपूर पाहिजे'' असा अधिकार सांगू लागले!!

शेवटी, गोष्टी या थरावर आल्या की, साक्षात 'मुस्लीम लीग'सारख्या प्रतिनिधिभूत मुसुलमानी संस्थेकडून हिंदुस्थानची 'मुसलमानी हिंदुस्थान' नि 'हिंदू हिंदुस्थान' अशी दोन

छकले करण्याची सूचना निलर्ज्जपणे पुढे करण्यात आली आणि हिंदूविरुद्ध अहिंदी मुसलमानी राष्ट्रांशीही संगनमत करण्याची सिद्धता, उघडपणे घोषित करण्यात आली! अत्यंत शुद्ध हेतूने, पण विवेकशून्य श्रद्धेने नि आंधळ्या धोरणाने धर्म, जाति नि संस्कृति ह्यांनी निरपेक्ष नि केवळ प्रादेशिक एकतेच्या एकाच समान बंधावर आधारलेले असे सर्व हिंदी लोकांचे मिळून एकच अविभक्त नि अविभाज्य हिंदी राष्ट्र बनविण्याकरिता ज्यांनी अट्टाहासपूर्वक परिश्रम केले त्या उपर्युक्त हिंदू देश भक्तांच्या सर्व आशांचे हे असे शोचनीय भवितव्य होते!

## प्रादेशिक एकता हा एकराष्ट्रीयत्वाचा एकमेव घटक नाही

तर मग संयुक्त हिंदी राष्ट्रांत मुसलमानांनी आपण विलीन होण्याला अनुकूल व्हावे; याकरिता त्यांची आराधना करण्याच्या, काही झाले तरी प्रथम हिंदी नि नंतर मुसलमान असण्याकरता त्यांना वळविण्याच्या काँग्रेसने गेली पुरेपूर पन्नास वर्षे चालविलेल्या सर्व प्रयत्नांना जे दारुण अपयश आले; त्याचे मूळ कारण कोणते? एक संयुक्त हिंदी राष्ट्र बनविणे; मुसलमानांनाही रुचत नाही किंवा नको आहे; असे नाही. परंतु ऐक्याविषयीची अर्थात हिंदुस्थानच्या राष्ट्रीय ऐक्याविषयीची त्यांची कल्पना त्यांच्या प्रादेशिक एकतेवर मात्र मुळीच आधारलेली नाही. जर कोणा मुसलमानाने आपले खरे हृद्‌गत तेही शक्य तितक्या स्पष्ट शब्दांनी आजवर प्रकट केले असेल तर ते मोपल्यांच्या बंडाचा पुढारी अल्ली मुसलियार ह्यानेच होय.सहस्रावधी हिंदूंना बलात्काराने बाटविण्याच्या किंवा पुरुष स्त्रिया-मुले सर्वांनाच एकदम खड्गाला बळी देण्याच्या आपल्या अत्याचारांच्या कांडाचे समर्थन करताना त्याने असेच घोषित केले; की सर्व हिदुस्थान एक होऊन एकराष्ट्र व्हावयाला पाहिजे असेल तर त्याकरिता टिकाऊ असे हिंदू मुसलमानांचे ऐक्य घडवून आणण्याचा एकच एक अनन्य मार्ग म्हणजे सर्व हिंदूंनी मुसलमान होणे हाच आहे. जे हिंदू तसे करण्याचे नाकारतील ते हिंदी ऐक्याच्या कार्याचे द्रोही होत नि ते मरणालाच पात्र होत!!

अल्ली मुसलियार हा खणखणीतपणे सरधोपट आपल्या खऱ्या (इस्लामी) मातृभाषेतच बोलला. महमदअल्ली नि इतर काहीजण यांच्यासारख्या, शिष्टाचारी मुसलमानांची भाषा, सुरेख सालंकृत लॅटिन नि ग्रीक जशी असते; इतकेच, पण सर्वांना अभिप्रेत अर्थ एकच!

केवळ प्रादेशिक एकता नव्हे; तर धार्मिक, वांशिक नि सांस्कृतिक एकता हीच एकात्म राष्ट्र घडविण्याच्या कार्यात खरी महत्वाची होय. हे नेमके ओळखण्याला काँग्रेस चुकली; आणि तेच तिच्या ह्या संबंधातल्या अपयशाचे मूळ कारण होय.

राष्ट्रांच्या जडणघडणीत प्रादेशिक एकता अर्थात एकच समान निवासभूमी असणे ह्या गोष्टीपेक्षाही धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक नि ऐतिहासिक आप्तसंबंधाचेच केवढे तरी मोठे महत्व

असते. ह्या मूलभूत सामाजिक नि राजकीय तत्वाकडे दुलर्क्ष करण्याची काँग्रेसने प्रारंभीच फार गंभीर अशी घोडचूक केली. प्रादेशिक एकता हा सुद्धा त्या घटकांतलाच एक घटक असतो. पण बहुधा सर्वच ठिकाणी, तो एकच एक घटक मात्र होऊ शकत नाही. इंग्लंड नि इतर काही युरोपियन राष्ट्रे यांची उदाहरणे घ्या. या उदाहरणानीच 'हिंदी राष्ट्रीय सभे'च्या हिंदू संस्थापकांना चुकीच्या मार्गावर नेले. प्रस्तुत भाषणाच्या वरील परिच्छेदात विशद केल्याप्रमाणे ती मुळी योग्य रितीने समजलीच गेली नाहीत. इंग्लंड आज जे एक एकसंघ राष्ट्र बनलेले दिसत आहे; ते काही ते एक अगदी तंतोतंत असे प्रादेशिक परिमाण आहे, ह्या एकाच कारणामुळे नव्हे. तेथील लोकांचा प्रादेशिक देशाभिमान हे काही कारण नाही; तर तो त्यांच्या इतर सामाजिक नि राजकीय, आप्तसंबंधांचे कार्य, अर्थात परिमाण आहे. उदाहरणार्थ, इंग्लंड हे पूर्वीच्या काळीही असेच तंतोतंत प्रादेशिक परिमाण होते. परंतु जेव्हा, त्यांच्या धार्मिक संवेदनशीलता अतिशय डिवचल्या गेल्या तेव्हा आंग्ल- कॅथॉलिक नि प्रॉटेस्टंट यांना आपल्या देशांतर्गत बांधवांपेक्षा अनुक्रमे, आपापल्या बाह्यदेशीय सहधर्मीयांकडेच अधिक ओढले, जात असल्याचा अनुभव आला. आंग्ल-कॅथॉलिकांनी इंग्लंडमधील आपल्या आंग्लच पण प्रॉटेस्टंट असलेल्या सार्वभौम राजापेक्षाही रोममधील पोपचीच अधिक काळजी घेतली. आंग्ल प्रॉटेस्टंटनी, रोमन कॅथॉलिक मताच्या, आंग्ल राजाच्या स्थली हॉलंडमधून वुअल्यमलाच, आपल्यावर राज्य करण्याकरिता पाचारण केले. तशीच पुन्हा हॉलंडचीही गोष्ट पहा. हॉलंडचे लोक हे एकच सामाईक भूप्रदेश असूनसुद्धा पूर्वइतिहासातील आपल्या धार्मिक बाजूनेच साभिमान प्रभावित झाल्यामुळे एकसंघ राष्ट्र म्हणून ते एक होऊ शकले नाहीत. तेथील कॅथॉलिक हॉलंडर हे आपल्या स्वतःच्याच प्रॉटेस्टंट असलेल्या वुअल्यम्स ऑफ ऑरेंज ह्या राजाविरुद्ध स्पेनला मिळाले. ऑस्ट्रिया- हंगेरीचेही उदाहरण घ्या. तेथील लोकांना प्रादेशिकरीत्या विभागणारी कोणतीच ठळक गोष्ट नव्हती, ते सर्वजण एकत्रित होऊन त्यांचे एक साम्राज्यच बनलेले होते. आणि एकाच शासनाखाली ते एक स्वतंत्र राजकीय गट म्हणून कित्येक शतके, नांदलेही परंतु, त्यांच्या अंतःकरणातून त्यांना परस्परांकडे ओढणारे असे वांशिक, सांस्कृतिक, भाषिक वा ऐतिहासिक स्वरूपाचे कोणतेच आप्तबंध नव्हते. त्यायोगे, अनुकूल संधिप्राप्त होताच, त्यांचे राष्ट्रीय नि राजकीय ऐक्य तत्काळ फुटले! अथवा असेही म्हणता येणार नाही की, ''अहो! ही तुमची वांशिक नि धार्मिक प्रौढी ही आता कधीच गतकाळातली गोष्ट होऊन गेलेली आहे! त्यानंतर जग आता अधिक शहाणे झाले आहे! कोणताही अद्ययावत् मनुष्य आजकाल त्यांच्याकडे ढुंकूनसुद्धा पाहात नाही!'' ह्या सर्वसाधारणपणे घोषात आम्ही आमचा असा सूर आणखी मिळवितो. ''हिंदी मुसलमान, इंडियन, हे आजकालच्या जर्मन किंवा आयरिश लोकांहून अधिक अद्ययावत आहेत काय? जर्मन किंवा आयरिश हे जगातल्या सर्वांत पुढारलेल्या सुशिक्षित नि अद्ययावत् अशा राष्ट्रांत गणले जाणार नाहीत काय? पण तरीसुद्धा ते जर्मन किंवा आयरिश आजच्या काळातही समान वंश, भाषा, संस्कृति वा इतिहास त्यांच्यापेक्षा प्रादेशिक एकतेला अधिक महत्व देत असल्याचे आढळत आहे काय?

## सुडेटन जर्मन नि अल्स्टेराअट यांची सर्वांत अलीकडची उदाहरणे

सुडेटन जर्मन नि म्हटल्यास प्रशियन जर्मनही यांना बराच काळापर्यंत राजकीय एकराष्ट्रच ठाऊक नव्हते. ते एका राज्यात अंतर्भूत नव्हते. जर्मनच्या युद्धात जर्मनीला जर्जर करणारा प्रहार केल्यानंतर जर्मनीच्या शत्रूनी त्यांचे तुकडे पाडले. गोधडीवजा एक राष्ट्र निर्मिण्याचा गोंधळ घातला. प्रादेशिक परिमाणाच्या परिघात बसविले आणि झेकोस्लोव्हाकिया हे नाव देऊन सुडेटन जर्मन, पोल, हंगेरियन, झेक, स्लोव्हाक यांची खिचडी केली. पण त्यांनी राष्ट्र म्हणून काय घडविले? सुडेटन जर्मनांना, प्रादेशिक ऐक्याच्या भ्रामक आलेख्यांवर प्रशियन जर्मनांच्या बाहेर काढून टाकण्यात आले होते तरीसुद्धा त्याला न जुमानता ते प्रशियन जर्मनीशीच एक होण्याची उत्कटतेने आशा धरून होते आणि प्रादेशिक नि राजकीय एकत्वाच्या नात्याने आलेख्यात ते एकत्र रेखाटले असतानासुद्धा ते न मानून पुढच्या दारी सडणाऱ्या आणि निकृष्टपणाच्या झेकांविरुद्ध बंड करून उठले अन् प्राणसंकटाचीही क्षिती न बाळगता प्रशियनांमध्येच जाऊन मिळते झाले. असे त्या सुडेटन जर्मनांनी खरोखर का करावे? झेकांपेक्षा किंवा स्लोव्हाकांपेक्षा प्रशियनांशी त्या सुडेटन जर्मनांचा अधिक निश्चित असा प्रादेशिक लागाबांधा होता म्हणून  खचितच नव्हे; तर, जर्मनीतील जर्मनांशी भाषिक, सांस्कृतिक, वांशिक नि ऐतिहासिक स्वरूपाचे जे त्यांचे जिव्हाळ्याचे आप्तबंध होते; आणि जर्मन लोकांचाच अवयव होण्यात; त्यांना जे भूषण वाटत होते; त्यामुळेच होय.

उलटपक्षी, जर्मन ज्यूंचा प्रकार पहा. हे जर्मन ज्यू प्रादेशिक एकतेच्या बंधाने जर्मनांशी निगडित झालेले असल्यामुळे जर्मन भूमीत, अनेक शतके, जर्मनांसह वसत आलेले होते; इतकेच नव्हे तर जर्मन राज्यात ते प्रत्यक्ष समाविष्ट केले गेलेले होते. राजकारणी भाषेतही  ते साक्षात् जर्मन म्हणूनच लेखले जात; जर्मनीतले नागरिक अधिकार, समानतेने उपभोगीत; छेः राष्ट्रीय जर्मन विधिशासनातले, घटक ह्या नात्याने जर्मन राज्यावरही वर्चस्व गाजवीत म्हटले तरी चालेल.

तसेच आणखी आयरिश उदाहरण पाहा. आयलर्‌ंड नि इंग्लंड, दोन्ही मिळून एकच राजकीय गट असून कित्येक शतके, दोघांचेही एकच राज्य नि एकच पालर्मेंट चालत आलेले होते. अंग्लिश लोक,

पिढ्यानिपढ्या आयलरंडात बेटीव्यवहार, रोटीव्यवहार  नि एकाच अंग्लिश भाषेतून वाग्व्यवहार करीत बसत आले होते. अल्स्टेराअट अंग्लिश लोक आणि आयरिश लोक यांचा दोघांचाही प्रादेशिक बंध एकच आहे आणि दोघांची भूमीही स्पष्टपणे रेखाटली गेलेली आयलरंड ही एकच आहे. त्यांचा धर्मसुद्धा एकच आहे. अथवा आयलरंड हा काही महाद्वीपावरील एखादा फार मोठा प्रदेश नाही. तो हिंदुस्थानातल्या एखाद्या प्रांताएवढासुद्धा जेमतेमच मोठा असेल. परंतु हे सारे सामान्य घटक नि इतके निकटचे वास्तव्य या गोष्टींनी अंग्लिश आणि आयरिश लोकांचे एक राज्य बनले आहे काय? छेः! आयलरंडातही नाही; की, ग्रेट ब्रिटनमध्येही नाहीच. आयरिश लोक बंड करून उठले. त्यांना अंग्लिशांसारख्या मिळत असलेल्या बादशाही सवलती त्यांनी तुच्छ मानल्या; मृतप्राय झालेली आपली स्वतःची आयरिश भाषा पुन्हा जिवंत केली आणि आपले स्वतंत्र आयरिश राष्ट्रीय राज्य प्रस्थापित केले. उलटपक्षी अल्स्टेराअट अंग्लिशही ज्यांच्याशी तो अनेक शतके वसत आला; त्या आपल्या अगदी दाराशेजारचे आयरिश मनुष्याशी कसलाही राष्ट्रीय संबंध ठेवण्याचे नाकारतो आणि ज्यांचे त्याने कधी तोंडसुद्धा पाहिले नसेल नि जे त्यांच्यापासून फार दूरवर समुद्रापलिकडे राहतात, त्या आपल्या अंग्लिश बांधवांशी संयुक्त होण्याकरिता झुरतो! हे तरी का घडावे? कारण एकच.

आयरिश आणि अंग्लिश ह्यांचे निव्वळ प्रादेशिक ऐक्य त्यांना जितके आकर्षू शकते. त्याच्यापेक्षाही त्यांच्यामधला वांशिक सांस्कृतिक नि ऐतिहासिक आप्तबंधांचा, एकत्वाचा अभाव, त्यांना एकमेकांपासून अधिक दूर लोटतो.

## राजकीय वास्तवच केवळ नव्हे; तर माणुसकीही!

अद्ययावत् राष्ट्रांच्याच अशा या थोड्याशा उदाहरणांवरून असेच दिसून येईल की, धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक नि असेच इतर आप्तसंबंध भिन्न असणाऱ्या लोकांना, केवळ प्रादेशिक एकत्व किंवा वसतिस्थानाचे एकत्व, एवढीच एक गोष्ट प्रायः कोठेच एकराष्ट्रीय बनवू शकत नाहीत.

धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक, भाषिक किंवा ऐतिहासिक, आप्तसंबंध हेच मनुष्यांना त्यांचे वाटावयाला लावतात; हे सत्य केवळ राजकीय नव्हे; तर, मुख्यतः मानवीयच आहे. ते त्यांचे एकत्र वास्तव्य, जर त्या इतर आप्तसंबंधात भर म्हणून असेल तर मात्र गोष्ट निराळी. एकगट किंवा एकराष्ट्र बनण्याला, निव्वळ आलेख्यावर (नकाशावर) रेखाटले जाणे एवढेच न पुरता ते आप्तबंध लागावेत ह्या लोकप्रवृतीची मुळे, मानवाच्या-किंबहुना प्राण्यांच्याही-स्वभावातच, अगदी खोलवर गेलेली अशी आहेत. परंतु येथे आपल्याला त्या विषयी मानसशास्त्रीय विवेचनात शिरण्याचे प्रयोजन नाही.

इतके सांगितले असता पुरे की, लोकांना स्वभावसिद्ध राष्ट्र बनावयास लागणारा सर्वांत महत्वाचा घटक, म्हणजे एकात्म एकराष्ट्र बनण्याची त्यांची इच्छा हाच होय.
आणि ही इच्छा आम्ही येथवर निर्देशिलेल्या त्या प्रकारच्या जिव्हाळ्याच्या आप्तसंबंधानीच निव्वळ एकाच देशातील वास्तवापेक्षा कितीतरी प्रामुख्याने नि कितीतरी उमाळ्याने चेतविली जाते.

## पण हिंदूंशी एक होण्याची ती इच्छाच
## हिंदी मुसलमानांच्या ठायी आहे काय?

प्रश्नाचा प्रश्न, परात्पर प्रश्न (कळीचा प्रश्न) तो हाच की, हिंदूंशी एक होण्याविषयी ती तशी इच्छा हिंदी मुसलमानांच्या ठायी आहे काय? आणि काँग्रेसनिष्ठ हिंदू, हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या प्रारंभी एक क्षणभरही त्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी थांबले नाहीत. अथवा आजही मुसलमानांच्या प्रार्थनांच्या वेळांशी जुळते घेण्याकरिता ते, तो प्रश्न आपल्या डोक्यात आणीत नाहीत. 'मुस्लिम लीग' जातिनिष्ठ आहे; असे नुसते घोषित करून, काहीच उपयोग नाही. ती काही नव्याने कळलेली वार्ता नव्हे. खरी गोष्ट अशी आहे; की काँग्रेसवाल्या मुसलमानातसुद्धा सबंधच्या सबंध मुसलमान समाजच जातिनिष्ठ आहे. जो प्रश्न समजून घेतला पाहिजे; तो हा की, ते इतके जातिनिष्ठ का आहेत?' काँग्रेसनिष्ठ हिंदू अगदी पहिल्यापासून त्या प्रश्नाचा अभ्यास करण्याला धजतच नाहीत. कारण तशा प्रकारचा अभ्यास, त्यांच्या प्रादेशिक राष्ट्रीयत्वाच्या ते समजतात

त्या अर्थाने हिंदी ऐक्याच्या- वेडाला, शेवटचा श्वास सोडावयाला भाग पाडील असेच त्यांना भय वाटते! 'धर्मवेड! माथेफिरूपणा!' असे तुम्ही ओरडता? पण धर्मवेड किंवा माथेफिरूपणा ही मुसलमानांना तर भरीव नि तथ्यपूर्ण गोष्ट आहे. तिला नावे ठेवून तुम्ही, तिचे निवारण करू शकणार नाही, तर तुम्हाला तिला समोरासमोर तोंडच दिले पाहिजे. मुसलमानांचा इतिहास, त्यांचे तत्वज्ञान नि त्यांची राजकीय मनःप्रवृत्ति ह्याविषयी सामान्यतः पूर्णपणे अज्ञानी असलेल्या काँग्रेसवाल्यांनी जे प्रादेशिक राष्ट्रच कल्पिले आहे; त्याच्याविषयी मुसलमान स्वभावतःच उदासीन असणे, वर निर्देशिलेल्या कारणांकरिता माझ्या मते अगदी, मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. तुम्ही निदान पुढील गोष्टी लक्षात ठेवाल; तर हिंदी मुसलमानांची ही विरोधी वृत्ती तुम्हाला दुर्बिणीतून पाहिल्याप्रमाणे खऱ्या खऱ्या स्वरूपात स्पष्ट दिसू लागेल-

अ) अतिरेकी धर्मनिष्ठा नि राज्याविषयीची देवभोळी कल्पना, यांना सोडण्याइतकी सामान्यतः, सर्वच आणि विशेषेकरून हिंदी-मुसलमानांची अद्यापि वाढच झालेली नाही.

ब) त्यांचे धार्मिक तत्वज्ञान आणि कुराणनिष्ठ राजकारण यांच्या योगाने मानवी जगाचे केवळ दोनच विभाग पडतात. एक मुसलमानी भूमी आणि दुसरी शत्रूंची भूमी. मुसलमानांची पूर्णपणे वसलेले किंवा मुसलमानांकडून शासिले जाणारे, असे सर्व प्रदेश ही मुसलमानी भूमी होय. बव्हंशी मुसलमानांकडून शासिले जाणारे असे सर्व प्रदेश ही मुसलमानी भूमी होय. बव्हंशी मुसलमानेतरांनी वसलेले; अथवा मुसलमानेतर सत्तेकडून शासिले जाणारे असे सर्व प्रदेश ही शत्रूंची भूमी असून कोणत्याही निष्ठावंत मुसलमानाने ह्या भूमीविषयी कोणत्याही प्रकारची निष्ठा, ठेविता कामा नये. इतकेच नव्हे तर त्याने आपल्या शक्तीप्रमाणे युक्तीने बलात्काराने वा लबाडीने वाटेल ते करून तेथील मुसलमानेतरांना मुसलमान धर्मात आणण्याविषयी आणि एखाद्या मुसलमानी राष्ट्राकडून त्या प्रदेशावर राजकीय स्वारी आणवून तो जिंकण्याविषयीही आव्हानच केलेले आहे. ह्या म्हणण्याच्या विरुद्ध म्हणून मुसलमानी पुस्तकातली अकडची तिकडची वाक्ये पुढे टाकण्यात अर्थ नाही. सबंध कुराण ग्रंथच वाचा; म्हणजे त्यांची एकूण प्रवृत्ति कळेल आणि त्यातूनही पुस्तकांशी आम्हाला येथे काही कर्तव्य नाही; तर त्या पुस्तकांचे अनुयायी आणि ते आपल्या वर्तनात त्यांचे कसे अनुकरण करीत आहेत; तोच येथे प्रश्न आहे. तुम्हाला नंतर कळून येईल की समग्र मुसलमानी इतिहास आणि त्यांची नित्याची कृत्ये ही सर्व मी इतरत्र रेखाटलेल्या आकृतीनुसारच रचिली गेलेली आहेत. अर्थात् मुसलमानी धर्मावर ती आधारलेली नसतील; तर प्रादेशिक राष्ट्रभक्ती ह्या शब्दाचा मुसलमानांना अर्थच कळत नाही. अफगाण हे राष्ट्रभक्त असू किंवा होऊ शकतात. कारण अफगाणिस्थान आजही एक मुसलमानी प्रदेश आहे. पण कोणताही मुसलमान जर तो खरा मुसलमान असेल आणि समाज ह्या नात्याने ते सर्वच आत्यंतिक धर्मश्रद्धाळू असतातच; तर देश म्हणून वा राष्ट्र म्हणून वा राज्य म्हणून हिंदुस्थानाविषयी त्याला धर्मानेच एकनिष्ठ धरता येणार नाही. कारण, आज तो त्याचा शत्रुदेश आहे आणि येथे मुसलमानेतरांची बहुसंख्या असल्यामुळे नि त्यातूनही त्यावर एखाद्या

मुसलमानी राष्ट्राचे वा मुसलमानी राजाचे राज्य चालू नसल्यामुळे तो त्याला दुहेरी अंतरलेला आहे.

क) ह्याच्याच जोडीला हेही मिळवा की ह्या सर्व मुसलमानेतरांत हिंदू हेच मुसलमानी तत्वज्ञान्यांनी सर्वात अधिक धिक्काराई मानलेले आहेत. कारण ख्रिस्ती नि ज्यू हे कसेही झाले तरी- कुराणाशी अंशतः समान असलेले असे धर्मग्रंथ त्यांना असल्यामुळे 'किताबी' आहेत. पण हिंदू मात्र संपूर्णच 'काफिर' आहेत! अर्थात 'हिंदुस्थान' ही त्यांची भूमी-जोवर, तिजवर मुसलमानांचे राज्य चालू झालेले नाही किंवा सर्व हिंदूंनी इस्लामला कवटाळले नाही तोवर- प्रामुख्याने 'शत्रुभूमी'च होय! अद्यापही वेड्या धर्मनिष्ठेतच वावरत असणाऱ्या हिंदी मुसलमानांची हीच धार्मिक मनोवृत्ती आहे. त्यांच्यातील महंमदअल्ली आदिकरून सर्वचजण ती प्रवृत्ती चेतवीत असतात. अर्थातच मुस्लिम संघशासन घडविण्याकरिता 'हिंदी हिंदू' पेक्षा बाहेरच्या अहिंदी मुसलमानी देशांशी सख्य करण्याचा आपला हेतु 'मुस्लिम लीग'ने उघडपणे घोषित करावा; यात आश्चर्य काय? त्यांच्या दृष्टीने पाहता त्यांच्यावर हिंदुस्थानच्या द्रोहाचा आरोप त्यांच्या निष्ठेप्रमाणेच ठेवता येणार नाही. कारण त्यांनी आपल्या आजच्या ह्या 'हिंदुस्थाना'ला स्वदेश किंवा स्वराष्ट्र कधीच मानिलेले नाही. त्यांना ही पूर्वीपासून एक परकी भूमी अर्थात शत्रुभूमिच वाटत आहे. 'दार-उल्- हर्ब!' 'दार उल्-इस्लाम नव्हे!

ड) ही मुसलमानांची धार्मिक नि जिवंत असलेली मनःप्रवृत्ती झाली. अर्थात तिला अनुसरून त्यांची राजकीय नि सांस्कृतिक मनःप्रवृत्तीही, मुख्यतः हिंदुविरोधीच आहेः आणि जोवर ते मुसलमान असणार नि 'निष्ठावंत' असणार- तोपर्यंत ती तशीच असावयाची हे निश्चित आहे. ते हिंदुस्थानात शिरले ते विजेते म्हणून शिरले आणि त्यांनी हिंदूंना आपल्या राजसत्तेखालीही आणले. ह्या गोष्टीची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. त्यांना अशा विलक्षण स्मरणशक्तीचीही देणगी लाभलेली आहे की, जी नेमकीच त्यांच्या पराभवाचे नि धूळधाणीचे स्मरण करून देणाऱ्या एकूण एक गोष्टी पूर्णत्वाने विसरून जाते! प्रस्तुत भाषणाच्या आधीच्या परिच्छेदत दाखविल्याप्रमाणे हिंदूंनी त्यांना शेकडो रणक्षेत्रांवर चांगले झोडून काढून त्यांचा धुव्वा उडविला आणि सर्व हिंदुस्थान मुसलमानांच्या जोखडापासून मुक्त करून 'हिंदुपदपादशाही'ची पुन्हा स्थापना केली ही गोष्ट त्यना कदापि आठवणार नाही. हिंदुस्थानात आपले प्रभावी अल्पमत आहे. हे त्यांना माहीत आहे. त्यांची लोकसंख्या प्रत्येक शिरगणतीच्या प्रतिवृत्तात सारखी वाढती आहे. हिंदुसंघटनावादयांनी विशेषत्वाने, ध्यानात ठेवावयास पाहिजे; ती गोष्ट ही की अस्पृश्यता, शुद्धीवरील बंदी, विधवाविवाहावरील बंदी यासारख्या आपणा हिंदूंच्या काही धर्मभोळ्या नि आत्मघातकी सामाजिक चालींच्या योगाने त्यांना बाटवाबाटवीला नि मुसलमानी धर्मांतराला चांगलेच सुपिक क्षेत्र मिळते. तेव्हा अशा वर्तमान परिस्थितीत त्यांनी सारख्याच झपाट्याने स्वतःची लोकसंख्या वाढविण्याची आणि हिंदूंची घटविण्याची आशा धरावी हे साहजिकच आहे. हिंदूंच्या उदयाची नि राजकीय आकांक्षांची ब्रिटिशांना भीती वाटत असल्यामुळे हिंदूंच्याविरुद्ध

आपली फळी बळकट करण्याला त्यांच्याकडून फार काळपर्यंत प्रत्येक सवलत नि प्रत्येक प्रकारचे सहाय्य निश्चितपणे मिळत राहणार हे मुसलमानांना चांगले माहीत आहे. तसेच, केवळ प्रादेशिक एकतेच्या अव्यवहार्य अशा समान बंधावर आधारलेले हिंदू-मुसलमान ऐक्य घडवून आणण्याच्या खुळचट नादाच्या मागे लागलेले काँग्रेसनिष्ठ हिंदू हे मुसलमानांचे विशिष्ट नि प्रमाणबाह्य प्रतिनिधित्व इत्यादी संबंधातल्या आणि मुख्यतः आपल्याला सध्या टोचत असलेल्या हिंदू-संघटनेच्या चळवळीला दडपून टाकण्याविषयीच्या आपल्या धमकावण्याचे पाठबळ असलेल्या आपल्या मागण्यांना निश्चित वश होतील; हे सुद्धा त्यांना पुरते ठाऊक आहे. ते अल्पसंख्य असतानासुद्धा हिंदी सैन्यात नि सशस्त्र पोलिसात त्यांना शेकडा ६० जागा मिळाल्या असल्यामुळे त्यांचा तो वर्चस्वाचा घटक त्यांच्या आधीच प्रत्ययास आलेला आहे. या सर्व गोष्टी अनुकूल अशाच असल्यामुळे जाणून वा अजाणता पण त्यांचा असा पूर्ण विश्वास आहे की एखाद्या मोठ्या जागतिक युद्धात जर ब्रिटिशांचा पराभव झाला तर हिंदुस्थानच्या सीमेवर असलेल्या अहिंदी मुसलमानी राष्ट्राच्या सहाय्याने मुसलमान हेच कदाचित ब्रिटिशांच्या हातून हिंदुस्थानची सार्वभौम सत्ता हिसकावून घेतील. आणि तेथे, पुन्हा मुसलमानी साम्राज्य प्रस्थापित करतील. मग तेव्हाच मात्र त्यांना 'मुसलमानी भूमी' म्हणून- स्वदेश म्हणून हिंदुस्थानावर प्रेम करता येईल नि ते करतील; आणि 'भारत हमारा देश है!' किंवा 'हिंदुस्थान हमारा' अशी गाणी मनापासून गातील!!'' परंतु तोपर्यंत मात्र, मुसलमानाला खऱ्या अतिरेकी धर्मनिष्ठ मुसलमानाला हा देश केवळ 'शत्रुभूमी' म्हणून असणार!

मला वाटते ब्रिटिशांनीही ह्या छेदकांच्या शेवटी निर्देशिलेल्या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावे आणि मुसलमानांना त्यांच्या हिंदुविरोधी चळवळीत फाजील उत्तेजन देण्याच्या आपल्या धोरणाला, वेळीच आळा घालावा. हिंदुस्थानचे दोन तुकडे पाडणे मुस्लीम संघशासन घडवून आणण्याकरिता हिंदुस्थानाबाहेर परक्या मुसलमानी राष्ट्राला पाचारण करणे आणि हिंदुस्थानात एक स्वतंत्र मुसलमानी राज्य स्थापणे याविषयीची 'मुस्लिम लीग'ची उघड घोषणा विचारात घेता ब्रिटिशांनी सुद्धा हिंदूंना उखडण्याकरिता आपल्या ह्या 'लाडक्या बायकोवर' अधिक विश्वास टाकताना दोनदा विचार करावा. मुसलमानी इतिहासातील पडद्यातली कारस्थाने सुप्रसिद्ध आणि न जाणो हिंदूंना उखडण्याकरिता म्हणून मुसलमानी विभक्तीकरणाला दिलेले उत्तेजन स्वतःलाच उखडून घेण्याला उपयोगी पडल्याचेही कदाचित ब्रिटिशांना शेवटी आढळून येईल. तथापि तो ब्रिटिशांचा प्रश्न आहे. तो नि त्यांची, ते योग्य ती काळजी घेऊ शकतीलच.

आपणा हिंदुंपुढे जो प्रश्न आहे तो हाच की, आपल्याला ब्रिटिशांची किंवा मुसलमानांची बटीक होऊन राहावयाचे नसून आपल्या ह्या स्वतःच्या घराचे ह्या हिंदुस्थानचे हिंदूंच्या भूमीचे खरेखुरे स्वामी व्हावयाचे आहे. असा आपण निर्धार केला पाहिजे.

**हे ध्येय लक्षात घेऊन**

**आपला तात्कालिक कार्यक्रम काय असावा?**

प्रादेशिक एकतेच्या एकाच समान बंधावर आधारलेले असे हिंदुस्थानात समान भूमिकेवरचे कोणतेही राजकीय एकराष्ट्र बनविण्याच्या कामात, हिंदी मुसलमान केवळ प्रादेशिक हिंदी राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन हिंदूंशी सहकार्य करतील हे कधीच शक्य नाही. हे निश्चितपणे जाणून आपण हिंदुसंघटनवादी प्रथम आपली मूळची चूक- आपले मूळचे पातक-सुधारू या. प्रादेशिक 'हिंदी' राष्ट्ररूपी मृगजळाच्या मागे धावत जाणे आणि त्या निष्फळ पाठलागामधला व्यत्यय समजून स्वभावसिद्ध हिंदुराष्ट्राचा विकास मारून टाकू पाहणे ही ती चूक होय. आपल्या हिंदू काँग्रेसवाद्यांनी 'हिंदी राष्ट्रीय सभे'च्या प्रारंभी ते पातक अनिच्छेने केले. आणि अद्यापही ते नेटाने करीत राहिले आहेत. मी प्रस्तुत भाषणाच्या पूर्वीच्या छेदकात दाखविल्याप्रमाणे आपल्या पितामहांनी मराठा नि शीख हिंदू साम्राज्याच्या पतनाच्या वेळी जो तेथेच सोडून दिला तो आपल्या राष्ट्रीय जीवनाचा धागा आपण हिंदू आता पुन्हा उचलून हातात धरू या. आत्मविस्मृतिरूपी झिजणीने आकस्मिकपणे खुंटवून टाकलेले आपल्या आत्मजागृत हिंदू राष्ट्राचे जीवित आणि त्याचा स्वाभाविक विकास आपण पुन्हा उज्जीवित केला पाहिजे; समाधीतून पुन्हा वर उठविला पाहिजे.

त्याकरिता मी यापूर्वीच्या परिच्छेदात उद्धृत केलेल्या गोविंदराव काळे यांच्या १७९३ मधल्या पत्रांतील त्या शब्दांतच आपण धैर्याने घोषित करू याः- ''सिंधपासून दक्षिण समुद्रापर्यंत पसरलेली भूमी हे हिंदुस्थान हिंदूंचे स्थान आहे आणि आम्ही हिंदू हे त्या भूमीचे स्वामित्व असलेले राष्ट्र आहोत. तुम्ही त्याला 'हिंदी राष्ट्र' म्हणून म्हणाल, तर तो 'हिंदू राष्ट्र' या शब्दाचा केवळ एक इंग्रजी पर्याय होईल. आम्हा हिंदूंना 'हिंदुस्थान' आणि 'हिंदीस्थान' (इंडिया) ही एकच वस्तू आहे. आम्ही हिंदू आहोत. म्हणूनच आम्ही हिंदी (इंडियन) आहोत. आणि हिंदी आहोत म्हणून हिंदू आहोत.

होय! आम्ही हिंदू हे स्वयमेवच एक राष्ट्र आहोत. कारण धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक अशा साऱ्या आप्तबंधानी, आम्ही, एकात्म एकराष्ट्र बनलो असून त्याच्या जोडीला, प्रादेशिक एकतेचीही देणगी, आम्हाला नित्याची लाभलेली आहे. आमचे वांशिक अस्तित्व हिंदुस्थानशी आमच्या प्रिय अशा पितृभूमी, नि पुण्यभूशी-एकरूपता पावलेले आहे.

पण या सर्वांहूनही महत्वाची अशी गोष्ट म्हणजे आमची इच्छा ‘आम्ही हिंदू राष्ट्र आहोत‘, अशी आहे ही होय. आणि म्हणूनच आम्ही राष्ट्र आहोत.‘‘

आपण तीस कोटी हिंदू जेव्हा तशी इच्छा करीत आहोत; त्यावेळी आमच्या त्या एकराष्ट्रीयत्वाला आव्हान देण्याचा किंवा त्याचा पुरावा मागण्याचा कोणालाच अधिकार नाही.

हिंदुस्थानात आम्हाला एक जाती (Community) म्हणून संबोधणे विपरीतच ठरेल. जर्मन हे जर्मनीत राष्ट्र आहे. आणि ज्यू हे एक ‘जाति‘ (Community) आहेत. तुर्की हे तर्कस्थानात राष्ट्र आहे आणि तेथील अल्पसंख्य अरब; किंवा आर्मेनियन हे तेथे एक जाती आहेत. त्याप्रमाणे हिंदू हे हिंदुस्थानात राष्ट्रच आहेत; आणि अल्पसंख्य मुसलमान हे एक जाती (Community) होत.

हे जर्मनीचेच उदाहरण उचलून ‘मुस्लीम लीग‘च्या पुढाऱ्यांनी त्यांच्या कराची, येथील अधिवेशनात नुकतीच परवा अशी धमकी दिली की, हिंदूंवर अतिक्रमण करणाऱ्या त्यांच्या मागण्या जर हिंदुस्थानात पुरवल्या गेल्या नाहीत तर सुडेटन जर्मनांचे अनुकरण करून सुडेटन जर्मनांनी जर्मनीतील जर्मनांना सुडेटनमध्ये बोलावून आणले, त्याप्रमाणे तेही सीमेबाहेरील मुसलमानी राष्ट्रांना हिंदुस्थानात आपल्या सहाय्यार्थ अवश्य बोलावतील. परंतु ‘मुस्लीम लीग‘मधल्या आमच्या मित्रांनी रानातून बाहेर येण्याच्या पूर्वीच  तशी ओरड करू नये, त्यांनी लक्षात घ्यावे की, हे त्यांचे उदाहरण उभयपक्षी लागू पडणारे आहे.

मुस्लिम बलिष्ठ होतील, तर सुडेटन जर्मनांची भूमिका योग्य पकारे वठवून दाखवितील; पण जर का हिंदू हेच योग्य वेळी, बलिष्ठ झाले तर मात्र आमच्या या ‘लीग‘वाल्या मित्रांवर उलट जर्मन ज्यूचीच भूमिका वठविण्याची पाळी आल्यावाचून खचितच राहणार नाही! आम्ही हिंदूंनी शकांना आणि हूणांना गतकालात ह्यापूर्वीच ती भूमिका उत्तम शिकविलेली आहे. तेव्हा, प्रसंग येईपर्यंत नुसते शब्द उधळण्यात काहीच साधणार नाही. खिचडीची चव ती भक्षण करण्यातच असते.

## मानवतेच्या संबंधात सापेक्षतः
## ‘हिंदीराष्ट्र‘वादसुद्धा जातीयवादच होय!

‘हिंदुराष्ट्र‘वाद्यांच्या ह्या भूमिकेवर काँग्रेस छापाचा, एखादा ‘हिंदी राष्ट्र‘वादी जर ‘‘हिंदू आणि मुसलमान ही जाती किंवा हा धर्म अशा विभक्त भावनेने विचार करणे किती कोतेपणाचेच नाही काय? मनुष्य तेवढे आपण सर्व एक; आपण एक विश्वबंधुत्वाचाच मात्र विचार करू या!‘‘ - असा चोखंदळ आक्षेप घेईल तर उलट त्यालाच असे विचारा की ‘‘बंधो, विश्वबंधुत्व, आम्ही हिंदू, तो दोष ठरेपर्यंत पूजीतच आहोत. पण अहो, ‘हिंदी राष्ट्रवादी‘! तुम्हीही तसाच ह्या ना त्या राष्ट्रापुरताच हिंदी राष्ट्रीयत्वाचाच - त्याच भेदवृत्तीने का विचार चालविता? हिंदुस्थान हे एक प्रादेशिक परिमाण आहे म्हणून! पण मग जगात दुसरीही प्रादेशिक परिमाणे आहेतच! मग तुम्ही हिंदी राष्ट्रभक्तच का होता? ॲबिसिनियन राष्ट्रभक्तच होऊन तेथे त्यांच्या स्वातंत्र्यार्थ

लढण्याकरिता का धावून जात नाही? कारण जन्म सहवास नि शिक्षण, यांच्या योगाने, तुम्हाला तुमचे वांशिक वा धार्मिक वा संस्कृतिच्या आप्तसंबंधातले नाते हिंदी लोकांशीच अतरांहून अधिक जवळचे वाटते म्हणूनच ना? कदाचित तुम्हाला ह्या कारणाची जाणीवही नसेल? खरोखर, तुम्हाला ज्याचे ज्ञान नाही, असा देव तुम्ही पूजीत आहा; अथवा हिंदी वा इतर कोणताही राष्ट्राभिमान हाही अखिल मानवतेच्या दृष्टीने केवळ जातीयच ठरतो; हे तुम्हांला माहीतही नसावे; कारण राष्ट्रीयत्व हे सुद्धा वांशिक वा धार्मिक वा सांस्कृतिक जातीइतकेच अखिल मानवतेची विभागणी करणारे प्रबळ तत्व नाही काय?''

हिंदूराष्ट्रवाद्यांनी त्यांना हिदुजातीयवादी म्हटले गेल्यास अगदी मुळीसुद्धा क्षमायाचक बनू नये

वस्तुस्थिती अशी आहे की, राष्ट्रवाद आणि जातीयवाद या दोन्ही गोष्टी तत्वतः असल्या तर सारख्याच समर्थनीय आणि मानवी स्वभावोचित आहेत. आणि त्या नसल्या तर, दोन्हीही तशा नाहीत. राष्ट्रवाद आक्रमक स्वरूपाचा असेल तर मानवी संबंधाच्या विषयात तो जितका अनैतिक तितकाच दुसऱ्यांच्या न्याय्य अधिकारावर आक्रमण करून ते बळकावू पाहणारा जातीयवादही अनैतिक आहे! पण जातीयवाद जर केवळ संरक्षणशील असेल, तर तो न्याय्य नि योग्य राष्ट्रवादाअतकाच समर्थनीय नि मानवी स्वभावोचितही असतो.

हिंदू राष्ट्रवादी, हे ज्याचे स्वामित्व दुसऱ्याकडे आहे, अशा कशाचेही अपहरण करण्याचे किंवा बळकावण्याचे मनात आणीत नाहीत. यास्तव त्यांना कोणी हिंदू जातीयवादी म्हटले तरीसुद्धा त्यांचा जातीयवाद समर्थनीय असाच असून, खरे हिंदी राष्ट्रवादी कोणी असतील तर तेच होत. कारण हिंदी राष्ट्राच्या घटकभूत अशा सर्व जातींकडे न्याय्य नि योग्य रीतीने वागणे हाच खरा न्याय्य हिंदी राष्ट्रवाद होय. पण याच कारणास्तव केवळ मुसलमान हेच काय ते अन्याय्य, राष्ट्रविरोधी आणि राष्ट्रद्रोही या सर्व अर्थांनी जातीयवादी आहेत. कारण अतरांचे सर्वस्व बळकावून बसण्याची हाव त्यानीच धरली आहे. हिंदुमहासभा आणि मुस्लिम लीग ह्या दोन्ही संस्थांना एकाच दमात जातीयता या संज्ञेच्या विश्वासघातकी, धोकादायक नि दोषास्पद अर्थांनी जेव्हा सारखेच जातीयवादी ठरविले; तेव्हाच, हिंदी राष्ट्रीय सभेने (काँग्रेसने) स्वतःलाच राष्ट्रद्रोही असल्याचा दोष पदरात घेऊन स्वतः आपण निरुपयोगी असल्याची कबुली दिली आहे.

यास्तव हिंदूंनी स्वतःच्या न्याय्य नि योग्य अधिकारांचे स्वतःच्याच भूमीत संरक्षण करणे हा जर जातीयवाद असेल; तर जातीयवादी असण्याचा तो सर्वोत्कृष्ट गुण आमचे ठायी आहेच आहे. आणि म्हणून सर्वाधिक निष्ठावंत हिंदू जातीयवादी असणे आम्हाला भूषणच आहे, कारण आमच्या मते असा जातीयवाद म्हणजेच खरा आणि अत्यंत न्याय्य अशी राष्ट्रीयता होय.

ह्याप्रमाणे सुसंघटित हिंदू-राष्ट्राच्या कल्पनेचे एकदाचे पुनरुज्जीवन करून त्यांच्या जीवनक्रमात नव चैतन्य आणणे हे आपल्या पुढील कार्यक्रमातील तात्कालिक पहिले कार्य म्हणून

ठरविल्यावर त्या अनुषंगाने दुसरा आवश्यक विषय म्हणजे सामाजिक जीवनातील प्रत्येक कार्य नि प्रसंग केवळ हिंदुहितसंबंधीच्या भूमिकेतून गुळमुळीत न बोलता पुनःर्निरीक्षण करावयासच हवे. मशिदीपुढील वाद्यवादनासारख्या स्थानिक स्वरूपाच्या बारीकसारीक प्रश्नापासून तो थेट अगदी हिंदी संघराज्याच्या घटनेपर्यंतच्या प्रश्नांपर्यंत आणि हिंदुस्थानातील अंतर्गत राजकीय धोरणापासून तो अगदी विदेशी नि राजनैतिक नि आंतरराष्ट्रीय संबंधविषयक धोरणापर्यंतच्या सर्व विषयात आम्ही उघडपणे नि स्वतंत्रपणे हिंदू म्हणून आपली भूमिका मांडणार आणि हिंदुजगताच्या हितसंबंधाच्या योजनेला पाठिंबा देऊ, विरोध करू किंवा कोणतेही पाऊल उचलू ते केवळ हिंदू म्हणूनच. आमचे यापुढील राजकारण म्हणजे निर्भेळ राजनीतीचे हिंदुकरणच असेल आणि ते सहाय्यभूत होईल अशाच मार्गाने बनेल. त्याचा अर्थ आमच्या लेखी तरी सर्वाधिक प्रामाणिक आणि सर्वाधिक न्याय्य नि योग्य हिंदी राष्ट्रवादी असाच आहे.

**असे असेल तरच 'हिंदी राज्य' खरे!**

आपल्यापुढील तात्कालिक कार्यक्रमांतील तिसरी गोष्ट म्हणजे देशातील भिन्नभिन्न, समाजांच्या ऐक्याविषयीचे आपले मत पुनः उद्घोषित करणे ही होय. हिंदू-राष्ट्र, हे संयुक्त हिंदी राष्ट्राच्या शक्यतेचा मार्ग बंद करण्याचा विचार स्वतःच्या हिताकडे पाहूनच कधी मनात आणीत नाही; मात्र ते संयुक्त हिंदी राष्ट्र न्याय्यतेच्या आणि समानतेच्या पायांवरच उभारले असले पाहिजे. हिंदुस्थानातील सर्व अल्पसंख्य समाजांना विधिमंडळे नोकऱ्या सामाजिक आणि राजकीय अधिकार इत्यादी संबंधात लोकसंख्या आणि गुणवत्तेनुसार अर्हता त्यांच्या प्रमाणात मताधिकार आणि प्रतिनिधित्व देण्यास हिंदुराष्ट्र केव्हाही सिद्ध असेल. हिंदुसमाज देशात प्रचंड प्रमाणात बहुसंख्य असताही स्वतःसाठी कोणतेही विशेष अधिकार अथवा स्वतंत्र सवलत मागण्याचा आपला अधिकारही सोडून देईल. इतर प्रत्येक राष्ट्रात अशा बहुसंख्य समाजाला स्वतंत्र सवलती नि विशेष अधिकार असतात.

पण अल्पसंख्यांक समाजाची बहुसंख्य समाजाला नसलेल्या सवलतींची आणि भरताडाच्या मताधिकाराची वेडगळ आणि कोठेही ऐकण्यात न आलेली मागणी मात्र हिंदुसमाज यापुढे सहन करणार नाही. संयुक्त हिंदी राष्ट्राच्या बनावाच्या सिद्ध्यर्थ, धर्म, वंश आणि संस्कृति यांचा विचार न करता 'माणसागणिक मत' या राष्ट्रीय तत्वाचा अंगीकार करण्याअतका, पुढे, हिंदू समाज जाईल पण 'एका मुसलमानास तीन मते' आणि उलट 'तीन हिंदू मिळून एक मत' अशा प्रकारची राजकीय अधिकाराची मागणी किंवा दुसरी कसलीही संस्कृति-विषयक मागणी हिंदू-संस्कृतीचा इतिहास, भाषा, वंश नि धर्म या विषयांत विरोधक, अपमानकारक नि दडपून टाकणारीच! अशा प्रकारची मागणी यांचा शिरच्छेदच करील.

अल्पसंख्यांकाना आपला धर्म पाळावयाचे, आपली भाषा बोलावयाचे नि स्वतःपुरती आपली संस्कृती विकसित करण्याचे स्वातंत्र्य राहील; मात्र त्यामुळे दुसऱ्या समाजाच्या तशाच प्रकारच्या अधिकारांचे अतिक्रमण अथवा सार्वजनिक शांततेचा आणि नीतिमत्तेचा भंग होता कामा नये. या न्याय्य अटीवर मुसलमान आम्हाला मिळत असतील आणि हिंदी राष्ट्रावर अविभक्त निष्ठा ठेवावयास सिद्ध असतील; तर उत्तमच. तसे न झाल्यास आमचा सिद्धान्त अर्थपूर्ण ठरतो. तो म्हणजे ''याल तर तुमच्यासह, तुम्ही न याल तर तुमच्यावाचून; पण जर तुम्ही विरोधाल तर तुम्हांला न जुमानता आम्ही हिंदू हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य प्राप्तीचा लढा यश येईतो लढत राहू नि चांगली झुंज देऊ.''

आमचे परराष्ट्रीय धोरणही स्पष्ट निर्भेळ अशा हिंदू दृष्टीनेच ठरविण्यात येईल. जी राष्ट्रे हिंदू राष्ट्राशी मित्रत्वाने वागतील आणि जी त्याला सहाय्यभूत होण्यासारखी असतील ती सर्व आम्ही आमचे मित्र आणि सहकारी समजू. उलट जी हिंदू राष्ट्राला विरोध करतील; अथवा जी हिंदूंच्या हितसंबंधाला घातक होण्यासारखी असतील त्या सर्वांना आम्ही विरोध करू, यापैकी काहीच न करता जी तटस्थ असतील, त्यांच्याशी आम्हीही तटस्थपणाचे धोरण ठेवू. मग त्यांनी स्वतःपुरता कोणत्याही राजकीय तत्वाचा अंगीकार केलेला असो. आमचे परराष्ट्रीय धोरण, ठरविताना लोकशाही किंवा राष्ट्रीय समाज-सत्तावाद; अर्थात् नाझिझम, फॅसिझम् इत्यादी पोकळ गर्जनांचा विचार आम्ही करणार नाही. हिंदूंचे हित, हीच आमची कसोटी. खिलाफत, पॅलेस्टाईनमधील अरबांचा प्रश्न, इत्यादी भ्रमोत्पादक गोष्टीत, निरर्थक लक्ष घालून आणि त्यांच्याशी सहानुभूती दाखवून, आम्ही आत्मघातकीपणा करणार नाही; इंग्लंड देशाशी येणारे आमचे संबंध हिंदुहितांच्या धोरणाने म्हणजे 'हिंदुराष्ट्राचे पूर्ण राजकीय स्वातंत्र्य', दृष्टीपुढे ठेवूनच ठरविले जातील.

अल्पसंख्य समाजासंबंधाने आमची वागणूक प्रस्तुत परिस्थितीचा विचार करता, भिन्न भिन्न भावाची राहील. मुसलमान ख्रिस्ती अथवा हिंदवासी युरोपियन लोक यापैकी आम्ही कोणाचाही द्वेष करीत नाही; असे निश्चित आश्वासन हिंदू त्यांना देतील, पण त्याबरोबरच या अल्पसंख्य समाजात हिंदूनाही कोणी हीन लेखण्यास किंवा त्रास देण्यास धजत नाहीना; हेही हिंदू समाज यापुढे चांगला, जागरूक राहून पाहील.

पारशी लोक हे वंश, धर्म, भाषा, संस्कृति या दृष्टीनी आम्हाला जवळचे आहेत. ते हिंदुस्थानाशी कृतज्ञतापूर्वक, एकनिष्ठ राहिले आहेत नि हिदुस्थान हेच त्यांनी आपले एकमेव घर म्हणून मानिले आहे. दादाभाई नौरोजीसारखे सर्वश्रेष्ठ हिंदी देशभक्त, त्याचप्रमाणे कामाबाईसारखे क्रांतिवादीही त्यांच्यात निर्माण झाले आहेत. त्यांना सामाईक हिंदी राष्ट्रामध्ये म्हणूनच सामावून घ्यावं लागेल; आणि पूर्ण समान अधिकार देऊन तसे अवश्य समाविष्ट करून घेण्यात येईलही. खिस्ती अल्पसंख्य समाज सभ्य सौजन्यशील असून देशाबाहेरील लोकांशी संबंध ठेवून हिंदुस्थानाविरुद्ध राजकीय डाव तो खेळत नाही. भाषा नि संस्कृति ह्या दृष्टीनी तो हिंदू

www.savarkarsmarak.com

विरोधी नाही. यास्तव त्यालाही आमच्यात राजकीय दृष्ट्या समाविष्ट करून घ्यावे लागेल; त्यांचा आमचा भेद धर्मातच आहे. आणि त्यांचा धर्म इतर धर्मीयांना बाटविणारा आहे. तेव्हा धर्माच्या विषयात हिंदूंनी सावध राहून त्यांच्या धर्म-प्रचारकांना आपली चळवळ चालवावयास, आंधळेपणे, वाव देता कामा नये. अर्थात विचारपूर्वक होणाऱ्या धर्मान्तराचा प्रश्न स्वतंत्र आहे; पण त्याच तत्वाखाली त्याला अनुसरून हिंदूंनीही बाटून ख्रिस्ती झालेल्यांचे पुनः हिंदुकरण करण्याचे कार्य चालू ठेवून शुद्धि चळवळ चालविली पाहिजे. ख्रिस्ती लोकांनी हिंदू राज्याविरुद्ध डाव लढविण्याचा प्रकार त्रावणकोर संस्थानात मात्र दिसून येत आहे. म्हणून तेथे मात्र हिंदूंनी त्यांना राजकीय दृष्ट्या पूर्ण विश्वासाने वागू देता कामा नये, म्हणजे इतर प्रांतातील ख्रिस्त्यांप्रमाणे तेही हिंदू दृष्टीने संशयातीत होईपर्यंत त्यांना राज्यकारभारात भलताच वाव देता कामा नये.

यहुदी लोकांचा विचार करता प्रथम त्यांची संख्या अत्यल्प आहे. त्यांनी राजकीय दृष्ट्या किंवा सांस्कृतिक दृष्ट्या हिंदूंना आजवर कधी त्रास दिलेला नाही. आणि ते प्रामुख्याने धर्मांतर करविणारेही नाहीत. ते निराश्रित असता, हिंदूंनी त्यांना जो आश्रय दिला. तो स्मरून ते हिंदूंशी स्नेहभावानेच राहू इच्छितात; अर्थात त्यांना संयुक्त हिंदी राष्ट्रात सहज समाविष्ट करून घेता येईल. पण या विषयात आपल्या पूर्वजांनी अहिंदी समाजाच्या वसाहती, तेथे करून देण्यात जी पूर्वी चूक केली; तिची पुनरावृत्ती मात्र होऊ नये. हिंदुस्थानाबाहेरील यहुद्यांशी शक्य ती सहानुभूती बाळगूनही हिंदुस्थानात यहुद्यांच्या नवीन वसाहती वसवू देण्याच्या काँग्रेसी चालू धोरणाला हिंदूंनी विरोधच केला पाहिजे. हिंदुस्थान हिंदूंचीच भूमी राहिली पाहिजे. हिंदूंच्या वाढत्या लोकसंख्येला हिंदुस्थानात कित्येक ठिकाणी पुरेसा वाव मिळत नाही; अशा स्थितीत बाहेरील अहिंदु लोकांना बोलावून त्यांच्या वसाहती विरळ वस्तीच्या भागात, वसविण्याची कल्पना किती असमंजस मूर्खपणाची आहे. बरे! लोकसंख्येला आळा घालावा; म्हणून एकीकडून संतती-नियमनाचे धडे समाजाला देत; दुसरीकडून हिंदुस्थानात कित्येक ठिकाणी वसाहत करण्यासाठी बाहेरील यहुदी लोकांना निमंत्रण देणाऱ्या कित्येक राष्ट्रीय सभावाल्यांच्या शहाणपणाची वाहवा करावी तेवढी थोडीच! तेव्हा कोचीन संस्थानाच्या सन्मान्य दिवाणांना आपण आग्रहपूर्वक सांगितले पाहिजे की, ‘महाराज त्रावणकोर इतिहासापासून योग्य तो धडा घ्या आणि परकी यहुदी लोकांना कोचीनच्या भूमीत वसाहतीसाठी बोलावण्याच्या योजनेचा त्या विषयात बाहेरून होणाऱ्या आग्रहाचा स्पष्ट विरोध करा.‘

जसा आणि जिथवर मुसलमानी अल्पसंख्य समाजाचा संबंध येतो त्याविषयी सविस्तर विवेचन पूर्वीच मी केले आहे. थोडक्यात पुनः सांगावयाचे तर त्या समाजाकडे आपण सर्व विषयात शक्य तेवढ्या संशयी दृष्टीनेच नीट लक्ष ठेविले पाहिजे. कोणत्याही समाजातील कोणत्याही व्यक्तीला समानतेच्या भूमिकेला धरून जी वागणूक मिळण्याचा अधिकार आहे; तेवढीच त्यांना देणे; जसे एका बाजूने अवश्य आहे; तसे दुसऱ्या बाजूने कोणत्याही प्रकारची अतरांना नसलेली सवलत राजकीय, धार्मिक वा सामाजिक अशा कोणत्याही संबंधात त्यांना देण्याचे कठोरपणे

नाकारणेही अवश्यच आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या लढ्यात आपण गुंतलेले असतानाच केवळ नव्हे; तर ते स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरही आपण त्यांना संशयातीत मानता कामा नये. हिंदुस्थानच्या वायव्य सीमेवरील प्रांतांचे संरक्षण कट्टर नि बलवान हिंदू सैनिकांकडून नीट होत आहे ना? असे काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. नाहीतर, हिंदी-मुसलमान सिंधु नदीपलीकडील परकीय मुसलमानी राष्ट्रांशी संगनमत करून विश्वासघाताने हिंदुस्थानला पुनः अहिंदु शत्रूंच्या फासात अडकविण्याचा, संकटाचा, प्रसंग यावयाचा!

### पण मांजराच्या गळ्यात घंटा कशी बांधायची?

माझे हे म्हणणे एकून घेत असताना आणि यापुढे हिंदू समाजाने ठेवावयाच्या धोरणाच्या परिणामकारकपणाविषयी माझ्याशी सर्वस्वी एकमत होत असताना येथे उपस्थित असलेल्या हिंदुसंघटनवाद्यांच्या मनात एक महत्वाचा प्रश्न मोठे काहूर उसळून देत असेल; तो असा की ''पण, मग मांजराच्या गळ्यात घंटा कशी बांधावयाची? ते हिंदुदृष्टीचे धोरण, कृतीत आणण्याचे मार्ग आणि साधने कशी अवलंबावयाची? आमच्या प्रस्तुतच्या संघटन चळवळीच्या दौर्बल्यावस्थेत आणि दडपून टाकणाऱ्या परिस्थितीत आमच्या मताप्रमाणे जेणेकरून गोष्टी घडून येतील; अशी सबल स्थिती निर्माण करण्याचे सामर्थ्य आम्हाला कसे यावयाचे? पण मित्र हो! या विषयात तुम्ही विषण्ण होण्याचे मुळीच कारण नाही. तसे सामर्थ्य मिळविण्याचे अगदी परिणामकारक हत्यार आपल्या हाताशी आहे. पहा. जरा योग्य दिशेने आपला हात पुढे सरकवा म्हणजे तुमच्या हातातच ते सापडेल तर मग आता मुळापासून आरंभ करू या आणि  आज हिंदुस्थानात उपलब्ध असलेली राजकीय सत्ता हस्तगत करा.

चालू राज्यघटनेनुसार नगरपालिका, जिल्हामंडळे आणि विधिमंडळे यात आपणा हिंदूंना उपलब्ध साऱ्या जागा जर आपण हिंदुसंघटनवाल्यांनी हस्तगत केल्या तर हिंदू चळवळ एकदम एवढी उंच उचलली जाईल की, आपल्या आजच्या सर्वतोपरी अगतिक अवस्थेतून ती कल्पनातीत अशा बलिष्ठ स्थितीला जाऊन पोहोचेल. आता तुम्ही हे ऐकून ओरडून म्हणाल; की, ''ही तर तुम्ही आणखीच उंच उडी मारावयास सांगता! हिंदूंना मिळालेली सारी राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे काम तरी आम्ही कसे काय करणार? '' पण महाराज, या प्रश्नाचे उत्तर हेच की, -आपणा हिंदूंना जी सत्ता मिळाली; ती आपणच नाही का आत्मविस्मरणाच्या झटक्याच्या भरात काँग्रेसवाल्यांच्या हाती देऊ केली. आपण हिंदूनीच खरोखर! काँग्रेसला तिचे आजचे स्वरुप आणून दिले नाही का? पण ज्या आपण हिंदूनी काँग्रेसला हिंदुस्थानात सात प्रांतात सत्ताधारी पदवी मिळवून दिली; त्या हिंदूंच्या विरुद्ध ती आता एकाएकी उलटली असून हिंदुराष्ट्राची नुसती कल्पनाही तिच्या नाकाकानांना झोंबू लागली आहे! हिंदू महासभा ही जातीय अतएव दोषास्पद

संस्था म्हणून तिने उद्घोषित केले असून काँग्रेसनिष्ठ लक्षावधी हिंदूंनी तिच्याशी कसलाही संबंध ठेवू नये; असे आज्ञापत्रकही काढले आहे. आणि कोणी सांगावे, एखाद्या दिवशी ती असेही घोषित करील की, हिंदुसंघटनांची चळवळच मुळी, काँग्रेसची आवडती कल्पना, आवडता वाद, जो हिंदी प्रादेशिक राष्ट्रवाद त्याच्या विरोधी म्हणजे राष्ट्रद्रोही विश्वासघात होय. पण, आता काँग्रेस ही आपल्या दृष्टीने फारच बलिष्ठ झाली असून जी राजकीय सत्ता वास्तविक आपल्या हिंदूंच्याच स्वामित्वाची होती; ती तिच्यापासून हिसकून आपल्या हाती पुनः घेण्याचे काम फार कठीण झाले आहे.

साऱ्या हिंदुस्थानभर प्रत्येक हिंदुसंघटन-वाल्यांच्या पुढे ही अडचण दत्त म्हणून उभी आहे. हे मला माहीत आहे. काँग्रेसला आज हिंदुविरोधी अशा भक्कम बालेकिल्ल्याचे स्वरूप आलेले दिसते ही गोष्ट खरी. पण मी आपल्याला निश्चयाने सांगतो की हे किल्ल्याचे केवळ चित्र असून तो पडदा फाटताच ते चित्रही फाटून जाईल!

**हिंदुसंघटनवाद्यांनी काँग्रेसवर बहिष्कार घालावा म्हणजे विनाविलंब तिची बुद्धी ठिकाणावर येईल.**

काँग्रेसच्या हाती असलेली राजकीय सत्ता हिसकावून घेऊन हिंदुसंघटनाला विरोध नि उपद्रव करण्याचे तिचे सामर्थ्य नष्ट करण्याचा सर्वांत सोपा मार्ग दाखवून देण्यापूर्वी आपण निःसंदिग्ध शब्दांनी असे घोषित करू या की, आम्ही जे बाहेर आहोत ते राष्ट्रीय सभा ह्या संस्थेचा किंवा तिच्या पुढाऱ्यांचा वा अनुयायांचा द्वेष नि हेवादावा करण्याचा विडा आम्ही उचललेला नाही. काँग्रेस ही संस्था हिंदूंची बुद्धिमत्ता, हिंदूंचे द्रव्य, हिंदूंचा स्वार्थत्याग नि केवळ हिंदूंचाच भरणा असलेली हिंदुसंस्थाच राहिलेली आहे, असे जे महमद अल्ली जिना म्हणतात. ते अगदी खरे आहे. आजही काँग्रेसचे काही पुढारी थोर राष्ट्राभिमानीच आहेत. ते चुकत आहेत तरी त्यांना दुष्ट बुद्धीचे म्हणता येणार नाही आणि त्यापैकी बहुतेक सारे आपलेच आप्तेष्ट, सगे-सोयरे आहेत. काँग्रेसमध्ये जे थोडेसे मुसलमान आहेत त्यांना हिंदू पुढाऱ्यांच्या आत्मघातकी मूर्खपणामुळे काँग्रेसच्या धोरणावर अंमल गाजविण्यासाठी जरी वेळी अवेळी मुभा दिली जाते. तरी ती यःकश्चित माणसे केवळ नामधारी पुढारीच असून; संयुक्त हिंदी राष्ट्राचा क्षुद्र दळभद्री देखावा चालू ठेवण्यासाठीच मात्र त्यांना तेथे स्थान देण्यात आलेले आहे. आम्ही जे काही आहोत ते संस्था म्हणून काँग्रेसचा द्वेष करण्यासाठी नसून तिच्या हिंदुविरोधी धोरणासाठी तिला शिक्षा करून सत्य-निर्भेळ सत्य-एकमेवाद्वितीय सत्य- नि त्याप्रमाणेच अनत्याचाराबरोबरच लाठीचे नि अंग्लिश संगिनीचे हल्ले चालवून कायावाचामनाने अंगीकारलेल्या आत्यंतिक अहिंसेचा तोरा मिरवीत काँग्रेसने त्या मुखवट्याखाली जो असत्य हानिकारक अपायकारक दंभ माजविला आहे; त्यापासूनही तिला ताळ्यावर आणण्यासाठी होय.

आजच्या परिस्थितीत काँग्रेस ही आपली नव्हे; अन् म्हणून हिंदूंच्या प्रतिनिधित्वाचे तिचे सर्व अधिकार मग ते कोणतेही असोत, काढून घेतले पाहिजेत. ही पाळी, तिनेच आमच्यावर आणिली आहे. तिच्या पुढाऱ्यांनी हिंदू समाज आणि हिंदू महासभा यांना जे आव्हान मूर्खपणाने दिले आहे; त्याचा स्वीकार करणे आपल्याला भागच आहे.

माझे हिंदुसंघटनावादी बंधू हो! जरा योग्य विचार करा. काँग्रेस एवढी मोठी झाली आहे. ती कोणत्या अन्नावर पोसल्यामुळे हो? लक्षात घ्या; की काँग्रेसला माणसे पैसा नि मते यांचा सारा पुरवठा हिंदूंकडूनच होत आहे. हा पुरवठा बंद करा. म्हणजे काँग्रेसने जो हिंदुविरोधी पवित्रा घेतला आहे नि जी दुर्धर काँग्रेस अजिंक्य अशी दिसत आहे, ती काँग्रेस थोडक्याच वेळात, अरक्षणीय नि असमर्थनीय ठरून टिकणारच नाही.

आज मितीस हिंदुस्थानात विधिमंडळातील आणि प्रधानमंडळातील बहुमतांच्या शक्तीवर काँग्रेसला जे महत्व अन् राजकीय सत्ताही प्राप्त झाली आहे; ती केवळ हिंदुमतदारसंघाच्या पाठिंब्यामुळेच होत. काँग्रेसनिष्ठ हिंदूंना एकही मत मुसलमानांकडून मिळण्याचा संभव नाही. कारण ही राज्यघटनाच मुळी जातिनिष्ठ आहे. तीत मुसलमानच मुसलमानास मत देऊ शकतो. ख्रिस्ती ख्रिस्त्यास आणि कोणत्याही जातीचा मतदार आपल्या जातबंधूसच! काँग्रेसनिष्ठ लोक आणि हे बहुतेक हिंदुच आहेत- हिंदू मतदारांच्या मतानीच विधिमंडळे, नगर-पालिका, जिल्हामंडळे इत्यादी संस्थांत निवडून येऊ शकतात. तेव्हा काँग्रेस गटातील कोणालाही आपले मत द्यावयाचे नाही, असा निर्धार हिंदूंनी केल्यास काँग्रेसनिष्ठ एकही माणूस विधिमंडळादि संस्थेत निवडून येऊ शकणार नाही. काँग्रेसनिष्ठ हे सद्गृहस्थ, हिंदू म्हणूनच, हिंदूंच्या खांद्यावर उभे राहून, त्या मंडळातील उच्च जागा पटकावितात आणि एकदा त्यांचे हात त्या जागांना पोचले की लगेच ते हिंदूंना लाथाडून दूर लोटतात. ते आपले नव्हेतच असे म्हणतात आणि हिंदूंच्या संस्थांना जातिनिष्ठ आणि त्यामुळे आक्षेपार्ह ठरवितात. ते प्रत्येक वळणावर हिंदूंच्या हितसंबंधाचा विश्वासघात करतात आणि मुस्लिम लीगच्या तालावर मात्र नाचत नाचत राहतात. पण आपण हिंदूंनी त्यांना दिलेला आपल्या खांद्याचा आधार जर काढून घेतला तर? काँग्रेसची राजकीय सत्ता आणि तिचे सार्वजनिक महत्व, दारावर ठोकलेल्या खिळ्याप्रमाणेच गंजून जाईल; मृतवत होईल. स्वतःला हिंदीराष्ट्रवादी म्हणवितात; पण ते टाकतात ते प्रत्येक पाऊल मात्र जातिनिष्ठ असते. मुसलमान, ख्रिस्ती, युरोपियन इत्यादी अल्पसंख्यांकाना विशिष्ट संरक्षणाची त्यांनी हमी दिलेली आहे! हा काय, हिंदी राष्ट्रवाद झाला? खरा हिंदी राष्ट्रवाद तोच; की जो मुसलमान किंवा हिंदू मुसलमान किंवा हिंदू म्हणून जाणत नाही नि अल्पसंख्य बहुसंख्य असलेही काही जाणत नाही. त्याच्या लेखी सारे हिंदीच असले पाहिजेत. पण मग हिंदुस्थानात धर्मबद्ध किंवा जातिबद्ध समाजाची माहिती किंवा त्यांचे ज्ञान ते कशासाठी मिळवतात? जातीयवादी आणि जर ते जातीय अल्पसंख्यांकाची माहिती घेऊ शकतात तर मग, बहुसंख्य असलेल्या हिंदू समाजाची माहिती घेण्याचे का टाळतात? अन् तसे करणाऱ्यांना दोषास्पद म्हणून का म्हणतात? नव्हे नव्हे, खरे तर,

हिंदी राष्ट्राभिमानी जर हाडाचा प्रामाणिक असेल; तर तो मुसलमानेतर, ख्रिस्तीतर इत्यादी जातीय नावांची संबोधलेल्या मतदारसंघाकडे, मतयाचना करण्यासाठी कधीच जाणार नाही. कारण असला मतदारसंघ 'हिंदी राष्ट्रीय' नसणारच! खऱ्या हिंदी राष्ट्रीय मतदारसंघाचे मुसलमानसंघ, मुसलमानेतर संघ, ख्रिस्तीसंघ, ख्रिस्तीतर संघ, सामान्येतर संघ, विशिष्ट संघ, असे भागच पाडता येणार नाहीत. खऱ्या हिंदी राष्ट्रीय मतदारसंघाला अराष्ट्रीय अशा जातिनिष्ठतेचा वा धर्मनिष्ठतेचा वासही लागता कामा नाही. राष्ट्रीय सभावाले, जर खरोखरीचे 'हिंदी राष्ट्रीय' असतील; तर, प्रस्तुतच्या जातिनिष्ठ मतदारसंघांतून निवडणुकीला उभे राहण्याचेच त्यांनी नाकारले पाहिजे आणि जातिनिष्ठतेच्या नावाचा डाग लागलेल्या जागाही त्यांनी तात्काळ सोडून दिल्या पाहिजेत. अशा रीतीने आपल्या जातिदुष्ट जागा सोडून देऊन दिव्य करणारा एखादा तरी राष्ट्रीयसभावाला प्रमुख मंत्री किंवा सभासद दिसून येतो काय? छेः! कुणीच नाही.

पुढील निवडणुकीच्या वेळी जेव्हा हे सद्गृहस्थ तुमच्या हिंदु घरी, मतयाचना करण्यास येतील तेव्हा अगदी सोज्वळ अन् विनम्र प्रामाणिकपणाने, त्यांना तुम्ही सांगा की हे क्रांग्रेसनिष्ठ महाभाग हो, आपण हिंदी राष्ट्रवादी आहात आणि मी तर, हिंदु असून माझा मतदारसंघही हिंदूच आहे. तेव्हा असले माझे जातिनिष्ठेचा डाग लागलेले मत आपण कसे घेऊ शकाल बरे? आपण, कृपा करून खऱ्या हिंदी राष्ट्रवादी मतदारसंघाकडेच जा; अन् त्यांच्याशी जगात तो कोठेच मिळाला नाही; तर तसा खराखुरा हिंदी राष्ट्रीय मतदारसंघ अस्तित्वात येईपर्यंत कृपा करून वाट पाहा. अशी वाट पाहणारे प्रामाणिक काँग्रेसभक्त हाताच्या बोटांनी मोजण्याइतके तरी तुम्हाला आढळतील काय? छेः एकही नाही! त्यात पुन्हा असे की, आजच्या घटनेप्रमाणे पाहता, निवडणुकीस उभे राहणाऱ्या प्रत्येकाला आपला धर्म आणि जात ही लिहून द्यावी लागतात. तेव्हाच त्याचे नाव हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादी वेगवेगळ्या मतदार संघात घालण्यात येते. काँग्रेसनिष्ठ हिंदु अच्छुक निवडणुकीच्या हंगामात हिंदु म्हणून आपली जात गुपचुपपणे लिहून देतात. आणि हिंदु घरांनाही ब्राह्मण, मराठा, भंगी, असे काय असेल ते जातिवाचक नाव देऊन त्यांचेकडे जातवारीने अच्छुकांची पाठवणी करतात. उद्देश असा की, जातीच्या नावावर भरपूर मते मिळावी. जातीचा अभिमान नि इतर जातींचा द्वेष इत्यादी भावनांचाही ते यथावकाश उपयोग करतात.

म्हणजे निवडणुकीच्या हंगामात ते अगदी कडवे जातिनिष्ठ असतात. पण एकदा का निवडणुका संपल्या म्हणजे हे काँग्रेसभक्त हिंदी राष्ट्रीयत्वाचा झगा पुनश्च अंगावर चढवून हिंदूने स्वतःला हिंदु म्हणवून घेणे; ही केवढी लज्जास्पद गोष्ट, असे म्हणून ज्या हिंदूने हिंदू म्हणून त्याला मत दिले त्याचीच हिंदुसभेचा सभासद झाल्याविषयी त्याला उलटा टोला मारतात.

पण एकदा का तुम्ही जर त्यांना स्पष्टपणे सांगितले की तुम्ही हिंदू या नात्याने आपले मत त्यांना देण्यास मुळीच सिद्ध नाही. अन् ते तुम्ही हिंदु म्हणून जन्मलेल्या नि वाढलेल्या आणि हिंदु

समाजाशी निवडणुकीच्या मोसमानंतरही प्रामाणिकपणे हिंदुत्वाच्या नात्याने वागू इच्छिणाऱ्याला देऊ पाहता आणि जर का या सद्गृहस्थांना एकदांचे निश्‍चितपणे कळून आले की, हिंदुमहासभेचा सभासद झाल्याविना आपण हिंदूंच्या मतांनी केव्हाही निवडून येणे शक्य नाही. तर काय विचित्र घटना घडून येईलसे तुम्हांला वाटते? मी तुम्हाला निश्‍चित सांगतो की, तसे झाल्यास त्या काँग्रेसनिष्ठ हिंदी राष्ट्राभिमान्यांतील निदान शंभरात पाउणशे गृहस्थ तरी स्वतःला हिंदु महासभेचे सभासद म्हणून नोंदून घेण्यास रातोरात पळत सुटतील. आणि जन्मभर हिंदू म्हणवून घेण्याची प्रतिज्ञा चढाओढीने करतील; कारण मंत्रिमंडळाचे सभासद किंवा शासकीय सचिवालयामध्ये कोणीतरी होण्याची संधी गमावणे त्यांना कधीही परवडणार नाही.

तर मग काँग्रेसी राष्ट्रवादाच्या छंदाला शिक्षा करूनच केवळ नव्हे, तर हिंदुजगताला अगणित शक्तीसामर्थ्यांने सुप्रतिष्ठित करून त्याचे उत्थान करण्याचा विश्‍वास बसू शकणार नाही अतका सोपा नि एकच एक असा उपाय चालू परिस्थितीत हाच आहे कीः-

१) काँग्रेसवर बहिष्कार घाला,

२) काँग्रेसच्या दर्शिकेला मुळीच मते देऊ नका,

३) कट्ट्या, योग्य आणि गुणी अशा हिंदु राष्ट्रवाद्यालाच केवळ मत द्या.

एकाही हिंदुसंघटनवाद्याने काँग्रेसदर्शिकेसाठी एक छदामही देऊ नये; एकही सभासद पुरवू नये आणि एकही मत देऊ नये. कारण आपल्याला आता अनुभवानेच कळून आले आहे की, हिंदु अगदी कट्टर असला तरीही काँग्रेसच्या गोटांत दर्शिकेसाठी शिरल्याबरोबर त्याला हिंदुविरोधी व्हावे लागते; आणि आपली जागा जाईल या भीतीने शिस्तीच्या कडक धारेखाली राहून हिंदुहिताला विरोध करावा लागतो. पण हिंदूंच्या हाटात काँग्रेसी टोपीला किंवा दर्शिकेला गंभीर वटणावळ द्यावी लागते. हे एकदा काँग्रेसनिष्ठांना समजून आले. आणि विधिमंडळाचे किंवा स्थानिकसंस्थांचे सभासद होण्यास काँग्रेसमुद्रा हाच काय तो राजमार्ग नाही; अशी त्यांची निश्‍चिती झाली; की हिंदू टोप्यांचीही गरमागरम केकप्रमाणेच विक्रमी विक्री होईल आणि हिंदुसभेच्या दर्शिकेलाही पुरी पाडता न येण्याइतकी भरमसाट मागणी येऊ लागल्याचे तुम्हास दिसून येईल.

थोडक्यात सांगावयाचे तर परिस्थिती अशी आहेः- मुसलमानांच्या हितसंरक्षणार्थ, मुसलमानी मतदारसंघ आहे. तसे पाहिले तर खरोखरच हिंदू मतदारसंघही आहेच, पण हिंदूंना डिवचण्यासाठीच की काय, त्याला सामान्य संघ असे नाव देण्यात आले आहे. तरी त्याचा उपयोग हिंदूंच्या हितसंरक्षणार्थ करता येण्यासारखा आहे. तीन प्रांतात मुसलमानी बहुमत असल्यामुळे त्यांनी जे मुसलमान, मुसलमानी हितसंबंधाचेच रक्षण करण्याचे मान्य करणारे होते; त्यांनाच निवडून देण्याची काळजी घेतली. आपण हिंदू लोक सात प्रांतात बहुसंख्याक आहो. पण आपण आपली मते हिंदूंच्या न्याय्य हितसंबंधाचेही रक्षण करण्याचे वचन न देणाऱ्या उघडपणे हिंदुविरोधी - अशांनाच वेडेपणामुळे दिली. त्याचा परिणाम असा झाला की, आपली बहुसंख्या असलेल्या सात

प्रांतातही इतर तीन मुसलमानी प्रांतांप्रमाणेच हिंदुस्थानात सर्वत्र हिंदू लोकांना दास होण्याची पाळी आली असून बंगाल आणि सीमाप्रांता-सारख्या ठिकाणी तर हिंदूंच्या जीविताला आणि वित्तमत्तेला क्षणोक्षणी धोक्याचा संभव उत्पन्न झाला आहे. आणि स्त्रियांची मानमर्यादा असुरक्षित झाली आहे; अशा रितीने गेली पन्नास वर्षे निकराचा लढा लढून अन् स्वार्थत्याग करून हिंदु देशभक्तांनी जी काही राजकीय सत्ता मिळविली आणि जी काही अगदीच थोडथोडकी नाही; ती सारी आम्ही हिंदूंनी वाऱ्यावर सोडून दिली. मुस्लिम दिवाण, मुस्लिम लीगचे सभासद उघडपणे होऊ शकतात. इतकेच नव्हे; तर पुढारीही ते होऊ शकतात; आणि मुसलमानांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याची हमीही देऊ शकतात. फार काय, पण हिंदूंना सतावून सोडण्याची धमकीही ते देऊ शकतात. नि बंगालमध्ये शेकडा ६० शासकीय सेवा, मुसलमानांसाठी राखून ठेवण्यासाठी ठरावही त्यांना करता येतात. पण हिंदु-हित संरक्षणार्थ, हिंदु मतदारसंघांनी निवडून विधिमंडळात पाठविलेल्या काँग्रेसनिष्ठ हिंदु मंत्र्यांनी नि सभासदांनी काय केले ते पहा! त्यांनी बंगालमधील मुसलमानी राखीव प्रमाणाला संमती दिली. मुसलमानांचा पक्षपाती अशा जातीय निवाड्याला मान तुकवली नि त्या निवाड्याविरुद्ध चळवळ करणाऱ्या हिंदुसभेचा निषेध केला! हिंदु-हितसंबंधावर मुसलमानांनी आघात करण्याच्या प्रत्येक प्रसंगी त्यांनी मुसलमानांचीच बाजू धरली; आणि एवढे सोंग कशासाठी? तर आपण देशभक्त- 'हिंदी- आहो, 'हिंदू' नाही हे दाखविण्यासाठी!

पण असले अराष्ट्रीय नि मुसलमान पक्षपाती धोरण नि वृत्ती ही जातीनिष्ठेचे लक्षण नव्हे काय? हिंदूंच्या मतांनी निवडून आलेल्या काँग्रेसनिष्ठाला तर हे वर्तन फारच गर्ह्य होय; नव्हे, तो केवळ विश्वासघातच होय.

## भरभक्कम अशी हिंदूंची आघाडी बनवा

काँग्रेसच्या ह्या हिंदू विरोधी नि अराष्ट्रीय वृत्तीला पूर्ण आळा घालावयाचा तर त्याला उत्तम उपाय, ह्या चालू परिस्थितीचा विचार करता हिंदू राष्ट्रीय आघाडी बनविणे हाच आहे. आपण सर्वांनी म्हणजे साधु, सनातनी, आर्यसमाजी, संघटनावाले, संघ इत्यादी सगळ्यांनी काँग्रेसनिष्ठाला मत न देता हिंदू राष्ट्रवाद्यालाच ते देण्याचा निर्धार करू या. आज ह्या पक्षाचे मतदार सामर्थ्य एकवटल्यास ते दशलक्षांनी तरी मोजावे लागेल. तेव्हां, हिंदूंचे बहुमत असलेल्या सर्व प्रातांत आपल्याला विधिमंडळात हिंदूंचे बहुमत निःसंशय निर्माण करता येईल. काही ठिकाणी हिंदूंच्या मूर्खपणामुळे तसे नच झाल्यास निदान भक्कम अशी हिंदूंची अल्पसंख्या तरी करता येईलच म्हणजे हिंदूंच्या पाठबळावाचून कोठल्याही पक्षाला कारभार चालविणे दुष्कर होईल.

असे जर आपल्याला करता आले; तर आपल्याजवळ खरोखरीची हिंदू प्रधानमंडळे- म्हणजे राष्ट्रीय हिंदूंची प्रधानमंडळे- सिद्ध होऊन सात प्रांतात तरी हिंदू- हितसंबंधांचे रक्षण करण्याचा मार्ग मोकळा होईल.

असे झाले म्हणजे हिंदूंच्या कार्याची महती वाढून हिंदू महासभेला देशांतील सर्वसमर्थ अशा राजकीय सभेचे स्थान एकदम प्राप्त होईल. मग हिंदुत्वाचा खरा लाभ झाल्याचे तुम्हाला आढळून येईल. हिंदुसभेचे आजचे हेळसांडीचे स्वरूप जाऊन तिला हिंदुस्थानाचे भवितव्य ठरविणाऱ्या महत्वाच्या संस्थेचे उच्च स्थान प्राप्त होईल. आपल्या महत्वाची जाणीव झाल्यामुळे प्रत्येक हिंदु मस्तक उंच करून नि छाती पुढे काढून चालू लागेल; कारण, त्याला आपल्यामागे सरकारी सत्तेचे पाठबळ आहे; ही जाणीव असेल. त्यामुळे त्याला आपल्या धार्मिक, जातिविषयक आणि सांस्कृतिक अशा सर्व प्रकारच्या योग्य अधिकारांचे रक्षण अन बजावणी करता येईल.

एखाद्या हिंदु मुलीला कोणत्याही ठिकाणी मुसलमानी गुंडाकडून उपद्रव झाल्यास त्याला लगेच अशी कडक शिक्षा देण्यात येईल की दुसऱ्या कोठेही हिंदु मुलीला स्पर्श करण्यास कोणताही मुसलमान गुंड धजणार नाही. इंग्रज मुलीला हात लावण्यास जसा तो घाबरेल; तसेच हिंदु मुलीसंबंधाने त्याला घाबरावे लागेल. मुसलमानी धर्मवेड्यांकडून, हिंदूवर जुलूम होऊन; नागरिक अधिकारांना मुकण्याचा त्यावर प्रसंग येईल. तेव्हा सशस्त्र पोलीस नि सैन्य ह्यांची त्या दंगेखोरांवर इतक्या तातडीने योजना होईल की मुसलमानी दंगा म्हणजे केवळ जुनी ऐतिहासिक गोष्ट होऊन बसेल; आणि राजमार्गावरील मशिदीपुढील वाद्यवादन, मुसलमान लोक, इतक्या संथपणे सहन करतील; की जणू काय ते इंग्रजी किंवा सरकारी मिरवणुकीतील बॅन्डवादनच!

शेतकरी आणि कामकरी ह्यांना राष्ट्रीय जीवनाचा उद्योगधंद्याचा नि व्यापाराचा आधारस्तंभ म्हणून जे काही मिळणे योग्य आहे ते सर्व मिळू लागेल. हिंदूंची भाषा सुरक्षित राहील. हिंदूंची लिपिही सुरक्षित राहील. हिंदूंचा धर्मही सुरक्षित राहून हिंदूंवर अहिंदूकडून होणारा धर्मांतराचा जुलमी प्रयत्न केव्हाही क्षणभर सहन केला जाणार नाही. ऐक्यासाठी हिंदूना मुसलमानांपुढे पदर पसरून याचना करण्याचा प्रसंगही उद्भवणार नाही. कारण स्वतःच्या स्वार्थत्यागाने हिंदी स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याइतके सामर्थ्य हिंदूंत आहे. या विश्वासाने हिंदुराष्ट्रीय संस्था स्वातंत्र्याच्या मार्गात अडचण उत्पन्न करणाऱ्या कोणाही अहिंदु समाजाला दूर करण्यास पुढे येतील. बलाढ्य अशा हिंदुराष्ट्राच्या कल्पनेनेच हिंदुसमाजातील शौर्यादी गुणांचा विकास होऊन दुसऱ्या कशानेही होणार नाही, असे कर्तृत्व त्यांच्यात उत्पन्न होईल. मुसलमानांनी बंगालमध्ये शेकडा ६० जागा मुसलमानांसाठी राखून ठेवण्याचा निर्बंध केला; तर इतर प्रांतांतील राष्ट्रीय हिंदु प्रधानमंडळे त्यांचा प्रतिकार म्हणून हिंदूंची वसती शेकडा ८० असली तरी शेकडा ९० जागा हिंदूंसाठी राखून ठेवण्याचा नियम करतील. अशी प्रतिकारक्षमता हिंदूंत आली; असा प्रतिकार ते करू लागले, म्हणजे हिंदू प्रांतातच नव्हे; तर मुसलमानी प्रांतातही मुसलमान लोक ताळ्यावर येतील. हिंदूंच्या अधिकाराचे नि शीलाचे रक्षण होऊ लागेल.

हिंदूंवर होणाऱ्या जुलुमाची प्रतिक्रिया शेवटी आपल्यावरच होते; असे मुसलमानांस कळून आल्याने ते नीट वागू लागतील आणि मग ते स्वतःच ऐक्यासाठी हिंदूंशी बोलणे करावयास पुढे येतील. आपण खरोखरच हिंदुस्थानात अल्पसंख्य आहो; नि ह्यापुढे आपला समाजचे समाज,

जबरीने बाटविण्याची सुखस्वप्ने सोडून दिली पाहिजेत; ही त्यांची निश्चिती झाली. म्हणजे आपोआपच त्यांची मनःस्थिती बदलेल आणि हिंदूंच्या न्याय्य अधिकारांना बाध न येईल अशा रीतीने हिंदू-मुस्लिम ऐक्याचा करार करण्यास ते सिद्ध होतील.

पंजाब आणि सीमाप्रांत येथे आपला हिंदूंच्या बगलेतील शिखांबरोबर मित्र पक्ष सिद्ध होईल. आज शीखांना स्वतंत्र मतदार संघ असून आजच्या परिस्थितीत ते योग्यही आहे.शीख संस्कृती आणि प्रतिष्ठा यांचे रक्षण करण्याइतके ते समर्थही आहेत. त्यांची आणि आपली संस्कृती एकच असून एकमेक हातात हात घालून सीमेपलीकडील, अहिंदूंच्या अतिक्रमणाला तोंड देऊ. जर आपण पुरेसे हिंदू, राष्ट्रीय मध्यवर्ती विधिमंडळात पाठविले; तर मध्यवर्ती सरकारलाही कठोर उपाययोजना करून सीमेवरील मुसलमान जातीचा बंदोबस्त करावा लागेल; आणि मग तेथेही थोड्याशा मूठभर युरोपियनांना जसे सुरक्षितपणे राहता येते; तसे हिंदूनाही राहता येईल. महाराष्ट्रामध्ये आपण लोकशाहीपक्षाशी सहकार्य करू. त्या पक्षाचे आणि राष्ट्रीय धोरणाचे आधारस्तंभ श्री. जम्नादास मेहता हे सांप्रत मुंबईच्या विधिमंडळातील सरकारविरोधी पक्षाचे पुढारी आहेत. तसेच डॉ. आंबेडकरांशी आम्ही सहकार्य करू. इतर प्रांतांतही जो जो पक्ष राष्ट्रीय दृष्टीने हिंदूंच्या हितसंबंधांस जागेल त्याशी आम्ही सहकार्य करू.

ही राष्ट्रीय संयुक्त आघाडी ब्रिटिश साम्राज्यशाहीपुढे कोलमडून पडेल; अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. आजची काँग्रेसची संयुक्त आघाडी केवळ दिखाऊ आहे; केवळ पत्त्यांचे घर आहे! पण हिंदूंची संयुक्त आघाडी ही खरोखरीची संयुक्त एकसंघ नि जिवंत अशीच असेल आणि तिच्या बळावर हिंदुराष्ट्राचेच हितसंबंध सुरक्षित राहतील असे नव्हे, तर मी ह्या भाषणात पूर्वी स्पष्ट केलेल्या रूपरेषेप्रमाणे हिंदी राष्ट्रीय धोरणही तसेच सुरक्षित राहील. सशस्त्र सैन्य दूर करून कार्यकर्त्या मुलींच्या, स्वयंसेविकेच्या हातात चरखे देऊन ह्या प्रांताचे रक्षण करू पाहणाऱ्या आजच्या अत्यंत अव्यवहारी काँग्रेसी धोरणाने साधणार नाही; म्हणूनच असल्या विक्षिप्त धोरणाच्या नित्याचेच सोडून देऊन वस्तुस्थिती-निदर्शक नि निष्ठ हिंदी राजकारणाला आणि म्हणूनच हिंदु संयुक्त राष्ट्रीय आघाडीलाही उचलून धरा.

हिंदू बंधूनो, लक्षात ठेवा की हिंदु राष्ट्रीय आघाडीच्या ध्वजाची उभारणी करतांना तुम्ही आपल्या न्याय्य अधिकारांचाच उपयोग करीत आहा. आणि त्यामुळे कोणाचाही अपमान करीत नाही. प्रत्येक हिंदूला वाटेल त्याला मत देण्याचा अधिकार राज्यघटनेनेच दिला असल्यामुळे जोपर्यंत संगिनीच्या माऱ्याने तुमच्याच जवळून तुमच्या अच्छेविरुद्ध मते गोळा करण्याचा प्रयत्न होत नाही; तोपर्यंत राष्ट्रीय हिंदूला मत देणे ही गोष्ट अगदी सोपी नि पूर्णपणे नियमानुसार आहे. जर प्रत्येक हिंदूने ही नियमानुसारी गोष्ट केली तर हिंदुत्वाचे रक्षणच होणार आहे.

पण जर हिंदूंनीच आत्मघातकी वृत्ती स्वीकारून हिंदुविरोधी माणसांना मते दिली, तर ब्रह्मदेवालाही तुमचे रक्षण करवणार नाही.

मग निदान हिंदु संघटनवाल्या बंधूंनो जर हिंदुत्वाने आपले पाऊल पुढे टाकावे असे तुम्हाला निश्चितपणे वाटते आहे, तर मुळापासून कार्याला आरंभ करा. संयुक्त हिंदु आघाडीची योजना करून आज जी राजकीय सत्ता उपलब्ध आहे ती हस्तगत करून घ्या. केवळ राष्ट्रीय हिंदूंना मत द्या. म्हणजे सात प्रांतातील नि मध्यवर्ती सरकारांतील हिंदू प्रधानमंडळांच्या दर्शनानेच तुमची स्थानिक गाऱ्हाणी धुक्याप्रमाणे उडून गेलेली तुम्हांला आढळून येतील. एवढे तुम्ही केल्यावर आणखीही तुमच्या पदरात पडेल. असा एक दिवस येईल की तेव्हा, तुम्ही बलशाली आणि स्वतंत्र अशा हिंदुराष्ट्राच्या आगमनाचा घोष कराल. असे राष्ट्र म्हणजे पूर्ण समतेच्या पायावर उभारलेले नि सिंधु नदीपासून तो पूर्वसमुद्रापर्यंत सर्व प्रामाणिक नागरिकांना धर्म नि वंश ह्यांचा विचार न करिता सारखे अधिकार देणारे; बलाढ्य असे हिंदी राष्ट्रच होय. क्राअस्ट म्हणतो, ''ज्यांच्याजवळ थोडेसे आहे; त्यांच्या पदरात आणखी पडेल. पण ज्यांच्याजवळ नाही; त्यांच्यापासून जे असेल; तेही हिरावून घेतले जाईल.'' ह्या व्यवहारिक जगाचा हा अबाध्य नियमच आहे. म्हणून ज्या आहे त्या राजकीय सत्तेला हस्तगत करून; तिचा उपयोग करून घ्या. हिंदुराष्ट्राचा ध्वज उभारा. हिंदुस्थान म्हणजे नित्य हिंदचे राष्ट्र राहिले पाहिजे. पाकिस्तान नव्हे! अंग्लिशस्थान तर नव्हेच नव्हे! आणि अखिल हिंदुस्थान पुन्हा एकदा निनादू देत-

**हिंदुधर्म की जय ! हिंदुराष्ट्र की जय !!**

**वंदे मातरम् !!!**

---------------------

# अखिल भारतीय हिंदुमहासभा
# २१ वे अधिवेशन - कलकत्ता
# अध्यक्षीय भाषण
# विक्रम संवत् १९९६ : सन १९३९

हिंदु महासभेचे प्रतिनिधी आणि सदस्य हो,

लागोपाठ तिसऱ्यांदा ह्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान मला देऊन गेल्या दोन वर्षात मी जे काही हिंदूंच्या हिताचे कार्य करू शकलो, त्याचा आपण गौरव केला आहे; तो मी कृतज्ञतेने आदरीत आहे. आपल्या महान आकांक्षा पूर्णपणे साध्य करून घेण्यासाठी केवढे तरी कार्य करावयास पाहिजे. त्या मानाने आपण केलेल्या कार्याचे प्रमाण किती अत्यल्प आहे. याची जाणीव माझे मनास इतकी व्यग्र करीत आहे की, हिंदुत्वाच्या आंदोलनाची धुरा दुसऱ्या एखाद्या बलिष्ठ भीमतुल्य स्कंधावर ठेवून सामान्य सैनिकाचे ओळीत प्रविष्ट व्हावे; ही माझी इच्छा असते, हे तुम्हां सर्वास विदित आहेच. परंतु नेता हाही अंशतः सैनिकच असतो; नि त्याला सार्वत्रिक अच्छाशक्तीच्या आज्ञा मानाव्या लागतात; हा एक विचार; आणि प्रचंड उणीवेच्या मानाने, आपले झालेले कार्य, अल्पच झाले, ह्या गोष्टीमुळेही आज, आपल्या पिढीला अत्यंत विरोधी परिस्थितीच्या आक्रमणापुढे उभे राहून, आपापली स्थाने न सोडता जे काही अल्प - स्वल्प करीत राहता येईल ते करीत राहणे आवश्यक ठरते, हा दुसरा विचार. तसेच चालू पिढीचे आयुष्यांतच हिंदूंचे ध्येय प्राप्त करून घेण्यासाठी राणाप्रतापाचे निष्ठेने कार्य करू असे मला आश्वासन देणारे सहस्त्रावधी प्रमुख, शूर, नि जिव्हाळ्याचे नवे कार्यकर्ते, कार्यक्षेत्रांत प्रवेश करीत आहेत आणि त्याचे प्रत्यंतर निजाम निःशस्त्रप्रतिकाराचे युद्धांत प्रगट झालेल्या दृढ निश्चयाचे रूपाने प्रत्यक्षच लाभले आहे. हा तिसरा विचार मनांत आणून प्रकृतिक्षीणता न मानता, तुमच्या प्रेमाच्या नि भाग पाडणाऱ्या आग्रहास वश होऊन तिसऱ्या वेळेला हिंदू महासभेचे अध्यक्षस्थान मी स्वीकारीत आहे.

सिंधपासून आसामपर्यंतच्या ह्या वर्षातील स्थानिक प्रांतिक नि सर्वसाधारण स्वरूपाच्या अशा एक सहस्रावर एक घटनांना, प्रश्नांना हिंदुजगताला जे तोंड द्यावे लागले; त्यांचा अगदी वरवरचा उल्लेखसुद्धा, ह्यासारख्या मर्यादित अध्यक्षीय अभिभाषणात, स्थलाभावी करता येणे दुरापास्त आहे. अगदी नुकतीच, सिंध प्रांतात सक्कर येथे आणि अन्य स्थळी, हिंदूंच्या विरोधात, दारू ढोसून नि मेजवान्या झोडून, हिंदूंवर हिंसक हल्ले चढवून नि त्यातच आनंद संतोष मानणाऱ्या आडदांड नीच मुस्लिमांची दुष्कृत्ये; वायव्यसरसीमा प्रांतातील हिंदूंचे जीवित वित्त, ह्यांना दैनंदिन आपत्तीत लोटणारी मुस्लिमांची सततची धाडसत्र मोहीम, -''कुणाही मुस्लिमाला त्रास देण्याचे काही, प्रयोजन नाही, आम्ही मात्र, हिंदूंनाच लुटत आहोत,'' अशा ढोल बडवून एकसारख्या

सर्वकाळ, दवंड्या पिटीत, शहराशहरांतून नि खेड्यापाड्यांतून मुस्लिम टोळ्यांनी चालविलेली लुटालूट, संयुक्त प्रांत (उत्तर प्रदेश), बिहार आणि बंगाल यामधील ज्या कित्येक स्थळी, शेकडो, हिंदूविरोधी दंगे नि बलात्कारी अत्याचार ह्यासारखे, धर्मवेड्या मुस्लिमांनी केलेले दुराचार, ही मुस्लिम गुंडगिरी एका बाजूने; तर सभ्य (?) नि शिष्टाचारी संसदीय मुस्लिम लीग दुसऱ्या बाजूने - आणि जे सिंध पंजाब आणि बंगालमधील हिंदू अल्पसंख्यांकांच्या विषयात, वर निर्देशिल्याप्रमाणे, 'अभिजात कुलीन मुस्लिम' दाक्षिण्यपूर्ण नि सौजन्यशील वागणूक देतात तेच, सात्त्विक संतापयुक्त क्रोधाने गाऱ्हाणे गातात; की, साऱ्या विश्वभरात केवळ, संतसज्जनच असे काय ते असणाऱ्या अशा मुस्लिम अल्पसंख्यांकांना मात्र दुःखेच भोगावी लागत आहेत; नंतरच्या काँग्रेस-लीग-सरकार यांच्यातील वाटाघाटी (मुसलमानांना वाटा आणि हिंदूंना नित्याचाच घाटा!) कुविख्यात जातवार निवाडे, जे हिंदूंच्या हितसंबंधांच्या विषयांत हानिकारकच ठरले होते. त्यापेक्षा कितीतरी अधिकच अंशात्मक प्रमाणात, हिंदूंच्या हितसंबंधांना हानिकारकच ठरतील अशा आकस्मित रीतीने भेडसावीत आहेत; आणि ह्या सर्वांपेक्षा कडी करणारी सर्वोपरी (भयानक) युद्धपरिस्थिती; जिने सरकारच्या हाती, सांविधानिक प्रगतीच्या घड्याळाचे काटे उलटे फिरवून पुरी ५० वर्षे मागे ढकलून (ढकलून ठेवून), अनियंत्रित एकसत्ताक राज्यपद्धतीची, तिच्या प्राचीन गौरवासह पुनःस्थापना करून, संधी दिलेली आहे. ह्या सर्व आणि अन्य निराळ्या घडामोडींचा सविस्तर परामर्श घेणे आवश्यक आहे. पण, त्यासाठी स्थानिक संपर्कातून ज्यांनी, सविस्तर विवरणे (आणि माहिती) मिळविलेली आहेत अशा आणि हाताळलेल्या प्रश्नांचा, विषयांचा, पांडित्यपूर्ण अशा व्यासंगामुळे नि अधिकतर विशेष अधिकारवाणीने त्यांचा ऊहापोह, विवेचन, विश्लेषण करून, परामर्श घेऊन प्रतिपादन करून चर्चेचा व्यवहार करू शकतील अशा प्रमुख वक्त्यांवरच त्या घडामोडींसंबंधात कित्येक निरनिराळे ठराव प्रस्तावित करून त्यांचे प्रतिपादन करावयाची अनुज्ञा मी त्यांना द्यावयासच हवी; कारण त्यामुळे, आपल्या आंदोलनांचे मार्गदर्शन ज्या काही मूलभूत तत्वांनुसार, धोरण नि कार्यक्रम ह्यांस अनुसरूनच व्हावयाचे आहे; आणि ज्यांवर, किमान येती २ वर्षे तरी, आपले लक्ष नि प्रयत्न एकाग्रपणे केंद्रित केलेच पाहिजेत; अशा विषयांसाठी, मला उपलब्ध असलेल्या या अभिभाषणातील थोडक्या जागेचा विनियोग सुयोग्य रीतीने करता येईल. तथापि ह्या विषयांचा परामर्श घेत असताना, मी अर्थातच (ओघाओघाने योग्य) अवसर परत्वे, काही वैशिष्ट्यपूर्ण, ठळक महत्वाच्या चालू घडामोडींचे उचित दृष्टांतांसह प्रतिपादन करून, त्यांचा गर्भित अर्थ (ध्वन्यर्थ) उकलून दाखवीत, सामान्यतः हिंदूंच्या आंदोलनाशी (चळवळीशी) त्यांचा सापेक्ष संबंधही दाखवून देईन.

## निजाम निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ

चालू वर्षात झालेल्या सर्व घटनांमध्ये हिंदूंचे दृष्टीने सर्वोच्च आणि आपल्या आगामी कार्यक्रमात नि धोरणांत नित्य ध्येयरूपाने नांदणारी अशी घटना, कोणती असेल तर ती अर्थात या वर्षातील पूर्ण सहा मासापर्यंत निजामी राज्यांतील हिंदुविरोधी धोरणास तोंड देण्यास्तव आपणास

कराव्या लागलेल्या; निःशस्त्र प्रतिकाराचे चळवळीची! ते एक धर्मयुद्ध (क्रुसेड) होते! तितकेच पवित्र नि वीरतेचे होते. आपल्या आर्यसमाजी बंधूंना या युद्धांतील आघाडीचे आघात, सहन करावे लागले. दहा सहस्रांवर आर्य ह्या युद्धांत प्रविष्ट झाले. आणि धैर्याने ते युद्ध चालवून त्यांनी सिद्ध केले की, आपल्या कालांतील पहिले नि इंग्रगण्य हिंदुसंघटक श्री. महर्षि दयानंद सरस्वती यांनी प्रज्वलित केलेला यज्ञीय अग्नि दिनप्रतिदिन अधिकच प्रज्वलित होत असून त्यांचे अंगीकृत कार्य योग्य अशांचेच हाती पडलेले आहे. हिंदुमहासभेची फळी घेतल्यास, तिचे वतीने, पाच सहस्र प्रतिकारकांनी निजामनिर्मित हिंदुविरोधी निर्बंधाचा भंग करून अविचलित धैर्याने नि प्रशंसनीय धोरणीपणाने झुंज चालू ठेवली. अशा रीतीने आर्यसमाज नि हिंदु महासभा ह्यांनी युद्धाचा मुख्यतः भार उचलला असला; तरी व्यापक हिंदुत्वाचे दृष्टीने, विशेष उल्हसित करणारी अशी गोष्ट ही की, केवळ आर्यसमाज वा हिंदुमहासभाच नव्हे; तर सर्वच्या सर्व हिंदुत्वनिष्ठ हिंदूंनी हिंदुध्वजाखाली संमीलित होऊन जिव्हाळ्याने ह्या युद्धांत भाग घेतला. या अखिल भारतांतल्या हिंदुमात्रांची त्यागबुद्धी नि सहानुभूती आपल्या मागे नसती तर हे युद्ध आपल्याला असे चालविता आलेच नसते. हिंदुसंघटन-वाद्यांनी निजामी सत्तेला ज्या मागण्या मान्य करावयास भाग पाडले; त्याव्यतिरिक्त वर निर्दिशिलेली घटना, हीच माझ्या मते निर्देशयोग्य नि स्थायी अशी आपली यश किंवा सिद्धी होय. कारण पवित्र हिंदु कार्यार्थ चालविलेल्या या धर्मयुद्धाने हे प्रात्यक्षिक पटविले की जाति नि पंथ, सांप्रदाय नि मार्ग, भिन्न असूनही सर्वव्यापक हिंदुत्वयुक्त समाज, सामान्य राष्ट्रीय जीवनाने अद्यापही धगधगतो आहे.

ज्यांना, ज्यांना कदाचित व्यक्तिशः पाहिले नसेल, वा ज्यांचा परिचयही नसेल, अशा निजामीतील आपल्या स्वधर्मीय नि स्वराष्ट्रीय लोकांस सोडविण्यासाठी आपले जीवितही संकटात घालून आपली घरेदारे नि आप्तस्वकीय ह्यांचा त्याग करून सहस्र-सहस्र हिंदु धावून गेले. पंजाबी नि सिंधी, बंगाली नि बिहारी, मराठे नि मद्रासी, ब्राहमण नि भंगी, सनातनी, आर्यसमाजी, शीख, जैन, लिंगायत, धनिक नि निर्धन, असे 'हिंदू' म्हणून अभिमान मानणारे सर्व लोक एकाच समान हिंदुध्वजाखाली हिंदूंचा मान राखण्यासाठी पुढे सरसावले आणि असंख्यात आपत्ती, भयानक दंगली, लाठीमार नि संगिनी, उपासमार नि शोष आणि प्रत्यक्ष मरण यांनाही न जुमानता शेवटच्या श्वासापर्यंत ''हिंदू धर्म की जय'', ''हिंदुस्थान हिंदुओंका''चा घोष करीत राहिले.

उदाहरणार्थ ''वंदेमातरम्'' किंवा ''हिंदुस्थान हिंदुओंका'' ह्या घोषणा करण्यास्तव ज्यांना फटके वा वेत मारण्यात आले; ते श्री. रेड्डी किंवा इतर हिंदू संघटक यांची गोष्ट घ्या. प्रत्येक फटक्यागणिक वा वेताच्या आघातासरशी ते 'वंदेमातरम्' नि 'हिंदुस्थान हिंदुओंका' ह्या घोषणांचा पुनरुच्चार करीत गेले. जे अनेक शूर युवक छळ सोशीत मेले; त्यांच्यात कुमार सदाशिव पाठक नावाचा सोळा वर्षांच्या आतील एक महाराष्ट्रीय युवक होता. छातीत भयंकर कळा येत असल्याविषयी तो विव्हलतेने सांगत असताही त्याला जड दगड, प्रत्यही वहावयास लावले. तरीही त्याने शरणागती लिहून देण्याचे नाकारून आपले प्राण सोडले. आर्य समाज नि हिंदुसभा या

उभयतांकडून लवकरच त्या संघर्षाचे विश्वसनीय इतिहास प्रसिद्धिले जाणार आहेत. त्यांतून धैर्ययुक्त नेटाची अशी अनेक उदाहरणे आपल्याला वाचावयास मिळतील. दूर कशाला, या मंडपातच असे कित्येक निष्कलंक चारित्र्याचे पुढारी नि सद्‌गृहस्थ उपस्थित आहेत, की जे ह्या हिंदु धर्मनिष्ठेचे, हिंदु-मानाचे नि स्वातंत्र्याचे रक्षणार्थ चालविलेल्या धर्मसंग्रामांतल्या क्रूसेडमध्ये-सेनानी वा सैनिक या नात्याने भाग घेऊन निजामी बंदिवासात असता स्वतः प्रत्यक्ष या दिव्यांतून गेलेले आहेत.

ह्या धर्मयोद्ध्यांना कोणतेही वेतन मिळाले नाही; किंवा त्यांच्या कुटुंबियांना निवृत्तिवेतन मिळण्याचेही आश्वासन कोणी दिले नव्हते. ह्यातील कित्येकांनी क्वचित सहस्रांहूनही अधिक मासिक वेतन वा प्राप्ति असणाऱ्या उद्‌योगाचा वा अधिकाराचा त्याग केला होता. या सर्वांना विदित होते की, त्यांना स्वतः शस्त्रहीन राहून सशस्त्र बळापुढे उभे रहावे लागणार होते. आणि पूर्वी पुढे गेलेल्यांच्या अनुभवांवरून, त्यांना हेही कळून चुकले होते; की, त्यांना छळ उपासमार लाठीमार नि संगिनी ह्यांना तोंड द्यावे लागणार. तरीही स्वेच्छेने ते पुढे चालले होते. त्यांच्यावर नैतिक नियोजनाव्यतिरिक्त दुसरे कोणतेही नियोजन नव्हते. आपल्याला ऐकून आश्चर्य वाटेल की औरंगाबाद  येथील हिंदुसंघटक बंद्यांवरली भयंकर लाठीमाराचे वृत्त आल्यावरही आपल्या शिबिरांतून प्रविष्ट होण्यास अधिकाअधिक संख्येने स्वयंसैनिक येत होते; एकवार प्रतिकार करून, निजामी बंदिवासांत शिक्षाकाल संपवून परत आल्यावर, त्वरित पुनः निजामीतील, हिंदुविरोधी निर्बंधाचा भंग करण्यास पुनः धाडा; असा आग्रह कित्येक करीत होते. हिंदु-संघटन-पक्षाने, शिंग फुंकतांक्षणी पहिल्या निनादासरशी चौदापंधरा सहस्र प्रतिकारकांचे हे हिंदु बल उभे राहू शकले, त्यावरून आपल्याला नि जे आपल्या मागण्यांना अवमानतात त्यांनाही बोध घेण्यासारखा आहे. नैतिक धैर्याचे दृष्टीने हे पंधरा सहस्र हिंदु संघटकांचे बल, आज, युरोपमध्ये झुंजणाऱ्या इंग्रजांच्या वा जर्मनांच्या सैन्यबलापेक्षा उच्च प्रतीचे होय. ही केवळ निःशस्त्रच अशा प्रतिकाराची चळवळ नसती नि आम्हांस प्रतिपक्षीयांच्या संगिनीला संगीन नि रायफलीला रायफल रोखता आली असती; तर आम्ही सशस्त्र प्रतिकारांतही युरोपीय सैनिकांहून सरस ठरलो असतो असा संभव आहे.परंतु संभवनीय गोष्टी सोडून दिल्या तरी; केवळ प्रत्यक्ष घडलेल्या घटनाही हिदुस्थानांतील हिंदुसंघटनवादी पक्षांमध्ये आत्मविश्वास नि नैतिक जय मिळविल्याची प्रोत्साहक जाणीव निर्माण  करण्यास पुरेशा आहेत; की, मागे, हिंदुमहासभेचे ठराव जसे कःपदार्थ मानीत आलो; तसे आता मानण्याआधी तीनदा विचारच केला पाहिजे. गेल्या वर्षी नागपूर नि सोलापूर येथे ठराव रूपाने आपण जे शूरत्वाचे शब्द उच्चारले ते आज पुनः कलकत्त्यास नव-वर्षापूर्वी एकत्रित होण्याचे आधीच शूरत्वाच्या कृतीच्या रूपाने परिणत झालेले आहेत.

ह्या युद्धसंबंधीचा आणखी एक अंश विशेष उल्लेखनीय आहे; कारण, त्यायोगे हिंदू आंदोलनाच्या भावी क्रमावर विशुद्धीकारक, परिणाम होणार आहे. गेल्या वीस वर्षात एक घातक

मूढ ग्रह हिंदूंच्या अंगभूत गुणांनी, हिंदूंच्या मनाला ग्रासून राहिला आहे. तो असा की, एखादे कार्य, अंगभूतगुणांनी हिदूंच्या दृष्टीने कितीही उदात्त असले तरी काँग्रेसने त्या कार्याला ''राष्ट्रीय'' म्हणून मान्यतापत्र देण्याची लहर प्रगट केली नाही; तोपर्यंत ते कार्य योग्य मानावयाचे नाही आणि या संबंधात शंभरांत नव्याण्णव वेळा 'राष्ट्रीय शब्दाचा अर्थ, नेमका 'हिंदुविरोधी' असा ठरावयाचा; त्याचप्रमाणे सर्व हिंदुस्थानव्यापी चळवळ यशस्वीपणे चालवावयाची तर, ती काँग्रेसच्या ध्वजाखालीच, चालविली पाहिजे! निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीने, हा भ्रम दूर केला आहे. कोहाट येथे पूर्वी मुसलमानांनी जे हत्याकांड माजवले; त्या वेळी किंवा मलबारांतील गावागावांतून मोपल्यांनी, हिंदूंची सरसकट हत्या कली; त्या वेळी देखील अखिल भारतीय - अखिल हिंदू भूमिकेवरून, या मुसलमानी धर्मवेडाचा, धिःकार करण्यास, हिंदु धजले नाहीत. कारण, तसे करणे 'राष्ट्रीय' ठरते; असे काँग्रेसचे आज्ञापत्र नव्हते! तोच खेळ, निजामी चळवळीचे वेळी, चालविण्याचे काँग्रेसच्या मनात होते; आणि तिने निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीला; सर्वाधिकारत्वाच्या आविर्भावाने जातीय नि अराष्ट्रीय ठरविले. पण या वेळी, हिंदुसंघटन-पक्षाशी आपली स्वतःची स्वतंत्र तत्वनिष्ठा होती. तर्कशुद्धपणे, राष्ट्रीय काय किंवा अराष्ट्रीय काय ह्यांची योग्य कल्पना ह्या पक्षाला आलेली होती. त्याचप्रमाणे हिमालयाएवढ्या चुकांस निश्चयेकरून ज्यांत अवसर राहतो; असे स्वतःच मान्य करणारा, 'आतला आवाज', अंधःकारदेखील, पुरेसा, उजळ न करू शकणारा, 'नवा पकाश' किंवा काँग्रेसरूपी चर्चच्या पोपने काढलेली आज्ञापत्रे, अत्यादिकांना आंधळेपणाने आणि हूं का चूं न करता मान नमविण्याचे वृत्तीतून, हिंदु -संघटन-पक्ष, मुक्त झालेला होता आणि म्हणूनच तो निजामी संस्थानांतील आपल्या धर्मबांधवांना आणि राष्ट्रबांधवांना सोडविण्यासाठी, हिंदु-ध्वजाखाली पुढे सरसावला. पेशावरपासून मद्रासपर्यंत, सर्व देशभर सर्व दिशांनी ही चळवळ त्वरेने पसरली. उदा-हरणार्थ, एकाच दिवशी हिंदुसंघटन पक्षाच्या आज्ञेला अनुसरून प्रांतोप्रांतीच्या मुख्य गावांत आणि नगरांमध्येही सर्वत्र मिळून, निजाम-निषेधदिन नि हिंदुराष्ट्रदिन-पाळण्यासाठी, कोटीहून अधिक हिंदु, एकत्रित झाले होते. त्यांनी पुरस्कारिलेली हिंदुत्वाची चळवळ, जो जो काँग्रेसने जातीय नि अराष्ट्रीय म्हणून विरोधावी वा शापावी तो तो जणू काय त्या योगेच ती वाढत चालली!

**काँग्रेसने त्या चळवळीला विरोध का केला?**

काँग्रेस संस्थानांची सुधारणा इच्छिते ना? ठीक, तर मग, हैद्राबाद हे सर्व हिंदुस्थानांतील मोठे संस्थान असून, सर्वांत अधिक दुर्व्यवस्थेचे नि अनियंत्रित संस्थान नव्हते काय? निदान तालुक्याएवढा राजकोट संस्थानांत, जितक्या निकडीने घटनात्मक सुधारणा प्रस्थापित करणे नि नागरिक स्वातंत्र्य मिळवून देणे; अवश्य होते, तितकेच निजामी संस्थानांतही होते हे निश्चित! क्षुद्र राजकोट संस्थान, सुधारण्याच्या चळवळीने अखिल भारतीय प्रश्नाचे, प्रचंड रूप धारण केले; आणि वीरावाल्याच्या अल्पशा, चहाच्या प्यालांत समग्र हिंदी महासागराला आग लागली; असे गांधीनी आपल्याला भासविले नाही काय? आणि तरीही निजामी संस्थानांतील सुमारे एक कोट

प्रजाजनांसाठी, घटनात्मक सुधारणा- मागणीच्या प्रश्नावर हिंदुमहासभेने हाती घेऊन लढविलेली चळवळ, गांधीना हिंदी प्रश्नापासून इतकी दूरची नि असंबद्ध वाटली; की आफ्रिकेतील हबशी आणि युरोपमधले स्पॅनिश वा झेक यांच्या प्रीत्यर्थ गांधीना जितकी सहानुभूती वा आत्मीयता वाटली; तितकीही या चळवळी संबंधाने त्यांना दाखवावीशी वाटली नाही. केवळ गांधीजीच नव्हे; तर, प्रतिगामी वा पुरोगामी वा अंतर्गामी गटांपैकी, कोणीही कॉंग्रेसवाले गट वा त्यांचे म्होरके, औरंगाबाद बंदीगृहांतील अमानुष लाठीहल्ल्यानंतर वा हैद्राबादच्या रक्तपातमय दंग्यानंतर देखील, निषेध करण्यास पुढे आला नाही. त्याचप्रमाणे कॉंग्रेसने नागरिक अधिकाराचा पुरस्कार केला आहे ना? आणि निजामी राज्यात लक्षावधी हिंदूंचे जीवित नि वित्त प्रतिदिनी, संकटांत होते आणि कोणत्याही पकारे भाषण, पूजा वा संघ यांचे स्वातंत्र्यही तेथे अस्तित्वांत नव्हते; ही वस्तुस्थिती सत्य नाही काय? मग ह्या संस्थानात नागरिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जी प्राणपणाची झुंज हिंदुसंघटनवादी लोकांनी चालविली होती. त्यात कॉंग्रेसने सहकारिता का केली नाही? निदान त्यांच्या मागण्यांच्या न्याय्यतेला पुष्टी देणारे ठरावही का केले नाहीत? हिंदुसंघटनवादी लोक हिंदी म्हणून नव्हे; तर हिंदू म्हणून रणक्षेत्रांत उतरले म्हणूनच ना? ठीक, हिंदु या नात्याने पुण्यकर्म करणे, हे देखील हिंदूंचे पाप असेल; मात्र, निवडणुकीचे दिवशी मात्र, आपल्याला हिंदू म्हणून लिहून देणाऱ्या आणि हिंदू मतदार संघाचा घटक म्हणून उभा राहिलेल्या कॉंग्रेसवाल्याला मात्र हिंदूने मत द्यावे! उलट ज्यावेळी काश्मीरांतील मुसलमान बाहेरच्या मुसलमानांच्या सहाय्याने तेथील हिंदू राजाविरुद्ध सशस्त्र विद्रोह करून उठले नि मुसलमानांना मुसलमान म्हणूनच, प्रतिनिधित्व मागू लागले; त्यावेळी लोकसत्तेचे जन्मजात, पुरस्कर्ते म्हणविणारे गांधीजी लिहिते झाले की, ''जर शेकडा ८५ असलेल्या आपल्या मुसलमान प्रजेचा असंतोष दूर करून; त्यांचे समाधान करणे काश्मीरच्या हिंदुराजाला शक्य होत नसेल; तर त्याला राज्य करण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही आणि त्याने राज्यत्याग करून त्वरीत काशीवास करावा!'' मग निजामी प्रजेतही शेकडा ८५ हून अधिक हिंदु आहेत; आणि त्यांनी आपल्या बाहेरच्या धर्मबांधवांच्या सहाय्याने आपल्याला असह्य झालेल्या धार्मिक, सांस्कृतिक नि राजकीय छळाचा प्रतिकार करण्यासाठी, केवळ निःशस्त्र अशी चळवळ चालू केली होती. पण ह्याच जन्मजात, लोकसत्तावादी गांधीनी, निजामाला राज्यत्याग करून, निवृत्त होऊन मक्केला जाण्याचा उपदेश, केला काय? मुळीच नाही, उलट त्यांनी स्पष्ट शब्दांत लिहिले की, निःशस्त्र प्रतिकार चळवळीच्या प्रारंभापासून अंतापर्यंत त्यांची एकमेव सर्वतोपरी काळजी, ''अला हजरत निजाम यांना उपद्रव न पोचावा'' एवढीच काय ती होती!

निजामी राज्याच्या हिंदुविरोधी धोरणास तोंड देण्यासाठी हिंदुसंघटनवाद्यांनी चालविलेल्या चळवळीचा पराभव व्हावा ह्या हेतूने राष्ट्रीयछाप कॉंग्रेसवाल्यांनी जे अनेक उपद्व्याप केले ते मला येथे मांडता येतील, परंतु तो माझा प्रस्तुत उद्दिष्टविषय नव्हे.

मी केवळ इतकेच म्हणतो की, हिंदुमहासभेला अंग्लिश पालर्मेंटच्या काही सभासदांची देखील, सहानुभूती मिळवता आली. औरंगाबाद बंदिगृहात नि भागानगरच्या दंग्यात, हिंदूंना जो छळ सोसावा लागला; त्यासंबंधी निषेध प्रकट करण्यासही ते प्रवृत्त झाले. पण सातही प्रांतांपैकी कोठल्याही काँग्रेसवाल्या मंत्र्यांनी या विषयाला दुरून देखील, स्पर्श केला नाही. विधिमंडळात वा काँग्रेसमध्ये हा प्रश्न चर्चेला कोणी काढला नाही किंवा निजामी सत्तेविरुद्ध नि हिंदूंच्यावतीन एकही शब्द उच्चारला नाही आणि क्षुद्रतम, अशा राजकोट पकरणात मात्र एकदम त्यागपत्रे देण्याची भीति हेच काँग्रेसचे मंत्री दाखवू शकले.

याचे तात्पर्य उघड असून ते स्पष्टपणे सांगितले पाहिजे. जोवर आजच्याप्रमाणे काँग्रेस मिथ्या राष्ट्रीय तत्वनिष्ठेस, उराशी बाळगीत आहे. तोपर्यंत तिचे धोरण हिंदुविरोधीच राहणार आणि कितीही न्याय्य वा योग्य असले तरी हिंदूंच्या हिताची वंचनाच करणार हे निश्चित. क्षणभर मनाशी विचार करा; की हिंदु मतदारसंघाने हिंदुसंघटनवादी प्रतिनिधीनाच मते दिली असती आणि अशा रीतीने मुंबईत, मद्रासेत नि इतरत्र हिंदुसभेची मंत्रिमंडळे असती तर निजामी राज्यांत जो हिंदूंना छळ सोसावा लागला; त्याविषयी ती पूर्ण उदासीन राहिली असती काय? निजामी राजसत्तेवर त्यांनी केवढे तरी दडपण आणून त्याचा छळक हात थांबविला असता.

काँग्रेसपासून स्वतंत्र अशा हिंदुध्वजाखाली, हिदुसंघटनवादी पुढाऱ्यांनी, निजामी निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीत हात घातला, त्यातला मुख्य हेतु हे स्पष्ट करण्याचा होता की जेव्हा विशेषतः मुसलमानांकडून हिंदूंचा छळ होतो अशा प्रसंगी हिंदूंच्या संरक्षणार्थ काँग्रेस ही रतिमात्रही प्रयत्न करणार नाही आणि म्हणून हिंदुसंघटनवाद्यांनी हिंदूंच्या रक्षणाचे काम आपल्याच शिरावर घेतले पाहिजे आणि त्यांनी मनात आणले तर काँग्रेसचा विरोध किंवा उदासीनपणा ह्यांना न जुमानता ते ती गोष्ट करू शकतील. भावी हिंदु- संग्राहक- चळवळीचे पहिले प्रत्यंतर म्हणूनच हा भागानगरचा संघर्ष होता आणि त्यात आमचे ‘राजकोट‘ झाले नाही; तर उलट आम्ही या अग्निदिव्यांतून विजयपताका घेऊन बाहेर पडलो. कारण गेल्या शंभर वर्षांत आत्मविस्मृतीच्या मोहाने जी आपली शुद्ध राष्ट्रीय आत्मनिष्ठा आणि आमची सांस्कृतिक नि जातीय एकजीवता नष्टप्राय झाली होती. ती आम्ही या लढ्याच्या योगाने पुनरुज्जीवित करून साक्षात अनुभवाला आणली. निजाम सरकारने जे राजकीय अधिकार घोषित केले आणि हिंदूंना नागरिक सांस्कृतिक नि धार्मिक स्वातंत्र्य देण्याचे जे आश्वासन दिले; त्याचा विचार करून आणि निजाम सरकारने आपल्या प्रसिद्धिपत्रकांत, ज्या प्रतियोगी सहकारितेच्या नि सहानुभूतीच्या धोरणाची मागणी केली; त्या धोरणास अनुसरून, हिंदु महासभेने, आपली निशस्त्र-प्रतिकाराची चळवळ स्थगित केली. यासंबंधी दोन गोष्टी सांगणे, अवश्य आहे. हिंदु प्रतिकारकांची निजामी सरकारने सार्वत्रिक मुक्तता केली. याविषयी हिंदुमहासभा त्यांचे आभार मानते. कारण ती गोष्ट योग्य अशीच झाली. परंतु ज्या अर्थी मुळांत अपुऱ्या नि अर्धवट सुधारणाही प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याच्या दृष्टीने आणि संस्थानात हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये स्थायी सलोखा निर्माण होण्याच्या दृष्टीने

काही मार्ग निघावा यासंबंधी हिंदु महासभेस काळजी वाटते; त्याअर्थी, निजाम सरकारच्या ती ध्यानी आणू इच्छिते की त्यांनी वेळ न गमावता ही संधी घालवली नाही; तर ठीक. एरवी जर सुधारणा व्यवहारांत आणण्याच्या कामी अक्षम्य चालढकल झाली; तर त्याचे अनिष्ट परिणाम होऊन तीव्र असंतोष उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाही; आणि दुसरी नितांत आवश्यक असलेली गोष्ट अशी की जे धर्मवेडे मुसलमान अधिकारी मध्यवर्ती सत्तेकडून आपल्याला पाठिंबाच मिळेल; या निश्चितीने अद्यापही मधून मधून हिंदूंना छळीत आहेत. अशा अधिकाऱ्यांवर निजामी सरकारने बंधन घालावे. स्थानिक मुसलमान गुंड आणि वरीलपकारचे अधिकारी यांना निजाम सरकारने सर्व संस्थानभर कडक रीतीने आळा घातल्यास धर्म वेडे मुसलमान ताळ्यावर येतील. ज्या सामोपचाराच्या हेतूने या सूचना मी करीत आहे, त्यांचा तशाच बुद्धीने निजाम सरकार विचार करील अशी मी आशा करतो.

## दिल्लीतील शिवमंदिर सत्याग्रह

शिवमंदिर पकरणी दिल्ली येथील हिंदूनी उत्कट तितिक्षेने चालविलेल्या लढ्यासंबंधी त्यांना सर्व हिंदुस्थानांतून धन्यवादच दिले पाहिजेत. अहिंदूंच्या आक्रमणापासून हिंदुहिताचे संरक्षण काँग्रेस करीत नाही; करणार नाही नि करण्यास समर्थही नाही; हाच बोध याही घटनेतून निघत आहे. काही झाले तरी दिल्ली नगरपालिकेतील प्रतिनिधी निवडतांना जर हिंदु हितसंबंधाचे रक्षण करण्याचे वचन देणारे आणि काँग्रेस तिकिटाने बांधले न जाता हिंदुसंघटन तिकीटाने बद्ध असलेले प्रतिनिधीच हिंदूंनी निवडले तरच दिल्ली शिवमंदिर- पकरणी हिंदूंनी केलेला द्रव्यबळाचा आणि मनुष्यबळाचा व्यय नि त्याग व्यर्थ न जाता सत्कारणी लागला; असे म्हणता येईल या लढ्याने उत्पन्न केलेली अखिल हिंदूंच्या ऐक्याची जाणीव हीच साक्षात शिवस्वरूपी ठरेल. ज्या स्थानावर कुडाची झोपडी होती; जी अत्यंत उन्मत्तपणाने उच्छेदण्यात आली; त्या स्थानावर पुन्हा भव्य शिवमंदिर उठून सहस्रावधी यात्रिकजन पूजेसाठी संमिलित होतील; असे चित्र मला मनःचक्षूंसमोर दिसत आहे. आपल्या न्याय्य अधिकारांचे रक्षणासाठी खामगाव, महाड, भागलपूर इत्यादी अनेक ठिकाणी हिंदूंनी जे यशस्वीपणे प्रतिकार केले; तेही महत्वपूर्ण होत आणि त्यायोगे हे सिद्ध झाले की, हिंदु महासभेच्या नेतृत्वाखाली हिंदु एकजीव होऊन त्यांच्यात आत्मप्रत्ययाची निष्ठा निर्माण झाली आहे. पण या संकीर्ण घटनांच्या वर्णनांत अधिक न गुंतता या भाषणांत मी जो मुख्य प्रतिपाद्य विषय योजला आहे त्याचेकडे मला वळले पाहिजे. हा विषय म्हणजे येत्या वर्ष दोन वर्षांत आपण सर्वांनी ज्या मूलभूत पायावर, सर्वसामान्य धोरणावर नि कार्यक्रमावर आपले लक्ष केंद्रित करणे माझ्या मते अवश्य आहे.

## हिंदु आंदोलनाची काही मूलतत्त्वे नि सिद्धान्त

काँग्रेसचे गोटांत प्रचलित असलेल्या मिथ्या राष्ट्रीयत्वाच्या ध्येयनिष्ठेचे (Pseudo Nationality) कक्षेतच पूर्ववयापासून जे वाढले आणि त्यायोगे ज्यांचे मनांत हिंदुत्वाविषयीच्या कोणत्याही गोष्टीसंबंधांने इतके विपरीत ग्रह झाले की हिंदू शब्द म्हटला की त्यात लोकभ्रमात्मक, मागासलेपणाचे नि प्रगतिपर देशभक्ताला न शोभणारे असे काहीतरी आहे. या कल्पनेने त्या शब्दाचेच जे विरोधी बनले असे सहस्रावधी लोक आज हिंदु महासभा, तिचे धोरण नि प्रत्यक्ष कार्यक्रम समजून घेण्याची प्रामाणिक इच्छा व्यक्त करीत आहेत; ही उत्साहवर्धक गोष्ट होय. दोनच महिन्यांपूर्वी ज्यांच्या शोचनीय मृत्यूनिमित्त, अखिल मुंबापुरीने दुःख प्रगट केले; त्या श्री. तेरसींचे उदाहरण सांगण्यासारखे आहे. ते मुंबईच्या प्रमुखांत प्रमुख नागरिकांमध्ये गणले जात होते. तसेच ते बुद्धिवाद्यांमध्ये नि काँग्रेसनिष्ठांमध्येही प्रमुख होते. परंतु माझ्या नागपूरच्या अध्यक्षीय भाषणात प्रतिपादिलेली हिंदुसंघटनविषयक तत्वनिष्ठा मी त्यांना ओघाओघाने समजून सांगितल्यानंतर त्यांनी प्रसिद्धपणे घोषित केले की, जो 'हिंदू' शब्द नि 'हिंदुसंघटन' म्हणजे हिंदू भोळसटपणा म्हणून त्याज्य होय असे ज्या बुद्धिवादामुळे त्यांस वाटले तो 'बुद्धिवाद' हाच एक गाढा भोळसरपणा होता. ते आमच्या पक्षांत प्रविष्ट झाले. इतकेच नव्हे तर त्यांनी मुंबई प्रांतिक हिंदुसभेचे अध्यक्षपदही अभिमानपूर्वक स्वीकारले. माझ्या दूरदूरच्या प्रवासात सर्वत्र मला बुद्धिमान वर्गातील असे सहस्रावधी लोक भेटले की, हिंदु कल्पनेचा उच्चार केल्याक्षणीच ते विरोध प्रगट करीत; पण तीच कल्पना परिणामकारकरीत्या पुनः मांडली म्हणजे संशयग्रस्त होऊन डोळे चोळीत आणि अशांपैकी अर्धे या कल्पनेचे अधिक आकलन करण्याचा आग्रह प्रगट करीत; तर उरलेले अर्धे केवळ तिसऱ्या उल्लेखाचे क्षणीच वश होत. हिंदुमहासभा, तिचे उद्देश आणि कार्यक्रम यासंबंधी कांहीना काही जाणण्याची इच्छा सर्व देशभर अलीकडे वाढत्या प्रमाणांत दिसून येत आहे; आणि ही जिज्ञासा कधीकधी परदेशांतूनही प्रगट होते. म्हणूनच मी या भाषणांत मुख्यतः ज्या प्रमुख तत्वांवर नि सूत्रांवर हिंदुत्वाची चळवळ आधारलेली आहे ती तत्त्वे क्रमशः मांडून, तिच्या सर्वसामान्य धोरणाचे दिग्दर्शन करून तिच्या कार्यक्रमाची मुख्य सूत्रे सांगणार आहे. या विवेचनाचा उपयोग आपल्या प्रश्नाचे परिणामकारक समर्थन करणाऱ्या पत्रकाप्रमाणे होईल. त्याचप्रमाणे विधिमंडळातील भावी संघटित हिंदुपक्षाला निवडणुकीत घोषणेसाठी आधारभूत म्हणूनही या विवेचनाचा उपयोग होईल. तसेच वृतपत्रांतून नि व्यासपीठावरून प्रचार करणारांनाही ते सुलभ मार्गदर्शक होईल.

यामध्ये काही पुनरुक्ती होईलच परंतु सर्व लोकसमुदायाच्या मनोवृत्तीला आपल्याला पाहिजे; असे रूप द्यावयाचे तर एखाद्या सत्याचा अगणित वेळा पुनरुच्चार हेच साधन होय असे म्हणता येईल. जोपर्यंत प्रचाराचे क्षेत्राला, असत्याने ग्रासलेले आहे; तोपर्यंत त्या असत्याला निरुत्तर करण्यासाठी त्या असत्याचा जितका पुनरुच्चार होतो; तितकाच उलट सत्याचाही पुनरुच्चार करीत राहिले पाहिजे.

हिंदुत्वाच्या चळवळीची काही मूलतत्त्वे नि चळवळीच्या काही बाजू नि चळवळीचा दृष्टिकोन पुढीलप्रमाणे :-

अ) तो प्रत्येक मनुष्य हिंदु होय की, जो ही भारतभूमी, सिंधूपासून समुद्रापर्यंतची ही भूमी, आपली 'पितृभू' नि 'पुण्यभू' मानतो; पुण्यभूमी म्हणजे ज्या भूमीत त्याचा धर्म निर्माण झाला नि वाढला ती भूमी. म्हणून वैदिक, सनातनी, जैन, लिंगायत, बौद्ध नि शीख धर्म आणि आर्य, ब्रह्मो, देव नि प्रार्थना समाज हे आणि असेच हिंदुस्थानात उत्पन्न झालेले इतर धर्म यांचे अनुयायी हे सर्व हिंदु होत. या सर्वांचा मिळून संकलितपणे हिंदुसमाज होतो. अर्थातच मूळचे रहिवाशी वा वन्यजाती म्हणून गणले गेलेले ते सर्व हिंदूच होत. कारण कोणत्याही प्रकारचा धर्म वा पूजाविधी ते मानीत असले तरी त्यांची पितृभूमी नि पुण्यभूमी हिंदुस्थान हीच आहे. म्हणून हीच व्याख्या सरकारने मान्य केली पाहिजे; आणि येत्या शिरगणतीचे वेळी हिंदूंची लोकसंख्या मोजतांना हिंदुत्वाचे गमक म्हणून हीच व्याख्या मानली पाहिजे. ही व्याख्या संस्कृतमध्ये पुढीलप्रमाणे मांडली आहेः-

**आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका।**
**पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृतः।।**

आ) 'हिंदु' हा शब्द मूळ परकीय नाही; किंवा हिंदुस्थानांतील मुसलमानांचे आगमनाशी त्याचा काहीएक संबंध नाही - काही, क्षुद्र परकीय लेखकांच्या खोडसाळ प्रतिपादनामुळे काही काळ तसा चुकीचा समज झाला होता; पण आपल्या वैदिक ऋषींनी देखील, कधीकधी, आपल्या ह्या भूमीला सिधु किंवा सप्तसिंधु म्हटले आहे. उदाहरणार्थ ऋग्वेदांतीलच पुढील ऋचा ही गोष्ट पूर्णपणे सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

**आऋक्षादंहसोमुचद्यो वार्यात्सप्त सिंधुषु।**
**वधर्दासस्य तुविनृम्ण नीनमः ।**

(ऋग्वेद ६-८-२४)

मुसलमानी पैगंबर महंमद जन्मण्यापूर्वी सहस्रावधी वर्षे प्राचीन बाबिलोनियन लोक आपल्याला 'सिंधु' असे म्हणत. आणि प्राचीन झेदावेस्तामध्ये, 'सिंधु' असा आमचा उल्लेख केलेला आहे. सिंधुनदीच्या अलीकडील आपला एक प्रांत अजून या नावानेच संबोधिला जातो. त्या प्रांताला आजपर्यंत 'सिंधु देश' असे नाव आणि तेथील लोकांना सिंधु (सिंधी) असे नाव प्रचलित आहे. आपल्या अर्वाचीन भाषांमध्ये संस्कृतांतल्या 'स' चे पुष्कळदा 'ह' मध्ये, रूपांतर हते. जसे केसरी किंवा कृष्ण या संस्कृत शब्दांचे हिंदी प्राकृतांत 'केहरी' आणि 'कान्हा' असे रूपांतर झाले. तसेच सिंधु या शब्दाचे अर्वाचीन प्राकृतांत हिंदु असे रूपांतर झाले. ज्या कोणाला यापेक्षा अधिक

संगोपांग नि परिपूर्ण असे या विषयाचे विवेचन पाहिजे असेल त्यांनी माझे ‘हिंदुत्व‘ हे पुस्तक वाचावे.

इ) हिंदुधर्म, हिंदुत्व आणि हिंदुजगत :- हिंदु चळवळीचा ध्येयवाद, विशद करतांना या तीन शब्दांनी व्यक्त केले जाणारे यथातथ्य, अर्थ समजणे नितांत आवश्यक आहे. हिंदु या शब्दापासून इंग्रजीमध्ये हिंदुइझम (हिंदुधर्म) हा शब्द बनविला आहे. त्याचा अर्थ हिंदु लोक ज्या धार्मिक पंथांना वा मार्गांना अनुसरतात ते पंथ वा मार्ग, दुसरा शब्द ‘हिंदुत्व‘ हा त्यापेक्षा अतिशय व्यापक नि संग्राहक आहे. हिंदुधर्म या शब्दाप्रमाणे केवळ हिंदु लोकांचा धार्मिक दृष्टीचा विचार त्यात नसून सांस्कृतिक, ‘भाषिक‘ सामाजिक आणि राजकीय या दृष्टीचाही त्यामध्ये अंतर्भाव होतो. तो बहुतांशी Hindu Polity या इंग्रजी शब्दांशी समानार्थक आहे. आणि त्याचे पुष्कळसे तंतोतंत भाषांतर इंग्रजीत Hinduness असे होईल. तिसरा शब्द हिंदुजगत् Hindudom याचा अर्थ संकलितपणे हिंदु म्हणून संबोधिले जाणारे सर्व लोक. हिंदु जगताचा संकलितरीत्या निर्देश करणारे ते एक नाव आहे, ज्याप्रमाणे ‘इस्लाम‘ शब्दाने मुसलमानी जगताचा बोध होतो त्याप्रमाणे.

ई) आम्ही हिंदु स्वयमेव एकराष्ट्र आहोत :- प्रादेशिक एकता, म्हणजे, सर्वसाधारण वस्ती, हेच एकमेव, राष्ट्रीयत्वाचे घटक म्हणून मानण्यात राष्ट्रीय सभेच्या ध्येयवादामध्ये मुळारंभीच दोष उत्पन्न झाला आहे. ही गोष्ट हिंदुस्थानाच्या अर्वाचीन राजकीय इतिहासांत प्रथमच ठळकपणे माझ्या नागपूरच्या भाषणांत मी मांडली. ज्या युरोपमधून ह्या भौगोलिक राष्ट्रीयत्वा (Geographical Nationality) च्या संकल्पनेला हिंदुस्थानात जशीच्या तशी उचलून आणली; तेथेच, त्यानंतर त्या संकल्पनेवर महान आघात पडला आहे; आणि सध्यांच्या युद्धामुळे माझे प्रतिपादनालाच सत्य ठरविले असून त्या संकल्पनेचा पूर्णपणे उच्छेद केला आहे. प्रादेशिक एकतेमुळे मारून मुटकून ज्या राष्ट्रांची मोट बांधण्यात आली; ती उद्ध्वस्त झाली असून पत्त्यांच्या घरांप्रमाणे ढासळली आहेत. सांस्कृतिक, वांशिक, किंवा ऐतिहासिक नातेसंबंध आणि त्या अनुषंगाने एका राष्ट्ररूपाने संकलित राहण्याची सामान्य प्रेरणा, त्याच्या अभावी केवळ प्रादेशिक राष्ट्रसंकल्पनेच्या भुसभुशीत नि लटपटीच्या वाळूच्या आधारावर विभिन्न समाजांची, खिचडीप्रमाणे राष्ट्रे बनविण्याचा उद्योग करणाऱ्यांना, पोलंड नि झेकोस्लोव्हाकिया ह्यांच्या उदारहणाने खडबडून सावध केले आहे. ही केवळ, युद्धोत्तर संधीचे वेळी निर्मिलेली राष्ट्रे, त्यांना मिळालेल्या पहिल्याच संधीला फुटली; जर्मनीचा भाग मात्र जर्मनीकडे गेला; तसेच रशियन रशियाकडे, झेक झेकांकडे नि पोल पोलांकडे गेले; सांस्कृतिक, भाषिक, ऐतिहासिक नि तत्सदृश नातेसंबंधांसारखी व्यवस्थेची बंधने ही प्रादेशिक बंधनापेक्षा अधिक प्रभावी ठरली. युरोपमध्ये गेल्या तीन चार शतकांत, ज्या राष्ट्रांमध्ये, प्रादेशिक एकसंधपणाचे जोडीला किंवा तो नसताही वंश, भाषा, संस्कृति नि तत्सदृश इतर बंधनांची परिणती होऊन एकजीव होण्याची अच्छाशक्ती

निर्माण झाली, तीच राष्ट्रे गेल्या तीन चार शतकांत आपले स्वतंत्र राष्ट्रीय अस्तित्व नि एकजीवपण सतत राखू शकली; उदाहरणार्थ इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, पोर्तुगाल इत्यादी. एकजीव नि स्वयंभू राष्ट्रनिर्मितीसाठी एकेरी वा संयुक्तरीत्या उपयोगी पडणारी वरील लक्षणे विचारात घेता, हिंदुस्थानांत आपण हिंदु लोक स्वयंभू नि स्थायी राष्ट्रच आहोत. आपल्याला एक समान पितृभूमी नि प्रादेशिक एकसंधपणा तर लाभली आहेतच; पण त्याव्यतिरिक्त जगांत इतरत्र क्वचितच आढळणारी अशी भूमी आपल्याला पितृभूमी म्हणून लाभली आहे, की त्यासवेच ती पुण्यभूमी म्हणूनही ओळखली जाते. ही भारतभूमी, हा हिंदुस्थान (इंडिया) दोन्ही एकच पितृभू आणि पुण्यभू आहेत. म्हणून आमची स्वदेशभक्ति निश्चितच द्विगुणित होते. सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक, भाषिक नि वांशिक यासारख्या आपल्या नातेसंबंधांनी नि स्नेहबंधांनी, अगणित, शतकोशतकीच्या सहवास्तव्यांतून नि संमिश्रणाच्या प्रक्रियेतून साकारलेले सुव्यवस्थित, सुसंघटित, एकजिनसी, स्वयंभू, असे हे राष्ट्र! अत्यंत महत्वाची गोष्ट, म्हणजे समाजाला एकत्र, समान राष्ट्रजीवनाकडे नेण्याची नि तसे जगण्याची अच्छाशक्ती उत्पन्न झाली, हिंदूंचे हे केवळ, युद्धोत्तर संधीतून रचलेले राष्ट्र नसून सुव्यवस्थित सुसंघटित राष्ट्रीय अस्तित्व आहे. आणखी एका विशिष्ट कोटिक्रमाचा परामर्श येथे घेतला पाहिजे; कारण त्यायोगे विशेषतः आमच्या काँग्रेसनिष्ठ बंधूंची दिशाभूल होत असते. राष्ट्रीय अस्तित्व सिद्ध करण्यास जी एकजीवता कारणीभूत होते; तिचा अर्थ काही असा नाही; की, तीत असलेल्या पंथोपंथांत भाषा नि वंश यांचे अंतर्गत भेदांचा सर्वस्वी अभाव असला पाहिजे. तिचा अर्थ अतकाच की त्यांची राष्ट्रीय घटक या नात्याने अतरांपासून असलेली भिन्नता त्यांच्या अंतर्गत भेदांपेक्षा कितीतरी मोठी असते. ब्रिटन, फ्रान्स यांसारखी आजची एकजीव असलेली राष्ट्रे घेतली तरीही ती कोणत्याही धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक, वांशिक नि इतर पोटभेदांपासून किंवा आपसांतील विरोधापासून सर्वस्वी मुक्त असू शकत नाहीत. सामुदायिकरीत्या इतर कोणत्याही लोकसमुदायापासून दिसून येणाऱ्या एखाद्या लोकसमुदायाच्या विभिन्नतेच्या उलट तुलनेने दिसून येणारी, त्यांची एकता म्हणजेच राष्ट्रीय एकजीवपणा होय.

आम्हा हिंदूंमध्ये, सहस्रावधी अंतर्गत भेद असले; तरीही आम्ही, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, वांशिक, भाषिक नि इतर अनेक एकजीवतेच्या बंधनांनी इतके बांधलेलो आहो; की इंग्रज, जपानी किंवा हिंदुस्थानातले मुसलमान घेतले तरी अशा कोणत्याही अहिंदु लोकांच्या तुलनेने निश्चितपणे स्वतंत्र नि एकजीवतेने निवडून पडतो. आज काश्मीरपासून मद्रासपर्यंत, सिंधपासून आसामपर्यंत, आम्ही हिंदु स्वयमेव राष्ट्र म्हणून नांदण्याची इच्छा प्रकट करतो; ते ह्यामुळेच. उलट जर्मनीतील ज्यूंप्रमाणे हिंदुस्थानांतील मुसलमान सामान्यतः हिंदुस्थाना-बाहेरच्या मुसलमानांशी नि त्यांच्या हितसंबंधांशी जितक्या आत्मीयतेने राहतात; तशी आत्मीयता शेजारी राहणाऱ्या हिंदूसंबंधानेही त्यांची नसते.

काही प्रामाणिक परंतु भोळसर हिंदू अशा सुखाशेत निमग्न आहेत की, ''हिंदुस्थानांतील मुसलमानांपैकी बहुसंख्य वंश नि भाषा या दृष्टीनी आपल्याशी एकरूपच आहेत; काही तर या पिढींचे स्मृतींतच, मुस्लिम धर्म स्वीकारले असे आहेत, त्यांना हिंदूंशी रक्तसंबंध नि एकजीवता मान्य करण्यास नि एका राष्ट्रीय जीवनात संमीलित होण्यास प्रवृत्त करता येईल. आपण केवळ त्यांना या बंधनांची आठवण करून त्यांच्या आधारे, त्यांना विनविले की झाले!'' या दुधखुळ्या जीवांची वस्तुतः कींवच केली पाहिजे. जणू काय मुसलमानांना ही सर्व वस्तुस्थिती विदितच नाही! पण सत्य गोष्ट अशी आहे की, मुसलमानांना ही बंधने पुरेपूर विदित आहेत. पण लक्षात घेण्यासारखा, भेद अतकाच की, इकडे हिंदुहिंदूंना एकत्रित करणाऱ्या या बंधनांचा जिव्हाळा हिंदु मानतात नि अभिमान बाळगतात तर उलट मुसलमान लोक मात्र ह्या बंधनांचा निर्देश करताच त्यांचा तिरस्कार व्यक्त करतात आणि त्यांची स्मृति देखील, आमूलाग्र नष्ट व्हावी असा यत्न त्यांनी चालविला आहे. त्यांचेपैकी काही काल्पनिक इतिहास नि वंशवृक्ष पुढे करून आपला अरब वा तुर्क यांच्याशी संबंध दाखवितात. आपले म्हणून मुसलमानांच्या गळी पडावयाला तुम्ही खूप जाल, पण तुमच्यातलेच म्हणावयाला ते कुठे सिद्ध आहेत? आपली स्वतंत्रच भाषा निर्माण करण्याचे, त्यांचे प्रयत्न चालू असून, बांडगुळाप्रमाणे आरबी भाषेच्या खोडाला, ते ती कशी तरी चिकटवू पाहात आहेत. कोकणासारख्या प्रांतामध्ये धर्मांतरीत मुसलमानांची 'तांबे, मोडक' अत्यादिकांसारखी नावे प्रचलित आहेत. ती काढून टाकून, अरबी नावे आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अशा रीतीने त्यांचा हिंदुवंशाशी एकेकाळी कधीतरी समानत्वाचा संबंध होता त्याचे प्रत्येक स्मृतिचिन्ह नाहीसे करून ते हिंदुमुसलमानांतील भेदभाव, अधिक विस्तृत करीत आहेत.

हिंदु काफर, हे एक तर धर्मांतर करून मुसलमान झाले पाहिजेत; किंवा या देशांत मुसलमानी राजसत्ता प्रस्थापित होऊन, तिला, 'जिझिया' कर देणारे, दास बनले पाहिजेत. असे होईपर्यंत हिंदुस्थान देशाला 'दार उल् इस्लाम' म्हणजे, इस्लामियांनी प्रेम करण्यासारखा, देश असे म्हणता येणार नाही. ही गोष्ट मुसलमानांच्या मनावर, त्यांच्या धार्मिक आणि परंपरागत कल्पनांचे योगाने ठसविली जात आहे. 'हिंदुस्थान' हा शब्द देखील, त्यांना शल्याप्रमाणे बोचू लागला आहे. मी या गोष्टी येथे सांगत आहे; त्या समर्थनासाठी नव्हे; किंवा निषेधासाठीही नव्हे. कोणाही मुसलमानाला सरळपणे नाकारता यावयाची नाही; अशी साधी वस्तुस्थितीच मी सांगत आहे.

हिंदूंशी कोणत्याही रीतीचे, सामान्य बंधन नसणारे त्यांच्याहून विभिन्न असे हिंदुस्थानांतील स्वतंत्र राष्ट्र म्हणून पुढे येण्याचा मुसलमानांचा जाणून बुजून योजनापूर्वक प्रयत्न आहे. तेव्हा प्रामाणिक नि भोळसर, अशा हिंदूंच्या हे स्पष्ट ध्यानांत आले पाहिजे की एका सर्वसामान्य राष्ट्रीय जीवनाशी मुसलमानांनी समरस होण्याचे नाकारले म्हणजे आपोआपच उरलेल्या हिंदूंचे एक स्वयंभू राष्ट्र उत्पन्न होते.

उ) हिंदुस्थानच्या प्रदेशांत राहाणाऱ्या किंवा बाहेरच्या अशा कोणत्याही अहिंदु लोकांचे वर्चस्व न चालता ज्यांत स्वत्व, म्हणजेच आपले हिंदुत्व प्रभावाने स्थापित करता येईल, तेच एकमेव हिंदूंचे 'स्वराज्य' होय. हिंदुस्थानात जन्मल्यामुळे काही इंग्रज हे हिंदी आहेत; नि पुढेही होतील; पण म्हणून अशा अँग्लो अंडियनांचे वर्चस्वाला हिंदूंचे स्वराज्य म्हणता येईल काय? औरंगजेब आणि टिप्पू हे जन्मजात हिंदीच होते; इतकेच नव्हे तर बाटलेल्या हिंदु आयांचे ते मुलगे होते. पण त्यायोगे औरंगजेबाचे नि टिपूचे राज्य हे हिंदूंचे स्वराज्य ठरले काय? मुळीच नाही. प्रादेशिकदृष्ट्या ते हिंदी असले तरी ते हिंदुसमाजाचे सर्वांत घातक शत्रू ठरले आणि म्हणून शिवाजी, गुरुगोविंदसिंग, राणाप्रताप नि पेशवे यांना मुसलमानांच्या वर्चस्वाविरुद्ध युद्ध करून हिंदूंचे स्वराज्य यथार्थ रीतीने प्रस्थापित करावे लागले. म्हणून सद्यःपरिस्थितीत देखील, 'हिंदी राष्ट्रीय राज्य' घेतले, तरी त्याचा अर्थ अतकाच होईल की, हिंदुस्थानातील मुसलमान अल्पसंख्याकांना समान नागरिकत्वाचे अधिकार राहतील; समान संरक्षण मिळेल आणि संख्येच्या प्रमाणात नागरिक जीवनात अधिकार मिळतील. कोणत्याही अहिंदु अल्पसंख्याकांचे, न्याय्य अधिकारांवर, बहुसंख्यांक हिंदु अतिक्रमण करणार नाहीत. पण कोणत्याही परिस्थितीत लोकसत्ताक आणि न्याय्यबद्ध घटनेत बहुसंख्य या नात्याने जे अधिकार चालविण्याची सत्ता हिंदूंना लाभते ते अधिकार हिंदु सोडणार नाहीत. मुसलमान अल्पसंख्य राहिले; हा काही त्यांनी हिंदूवर उपकार केला नाही. म्हणून राजकीय नि नागरिक अधिकारांचा प्रमाणशीर नि न्याय्य वाटा घेऊन आपले जे योग्य स्थान आहे; तेवढ्यांतच त्यांनी संतुष्ट राहिले पाहिजे. बहुसंख्यांकांच्या न्याय्य अधिकारावर नि सत्तेवर एक पकारे बोळा फिरविण्याचा अधिकार अल्पसंख्य मुसलमानांना देऊन टाकून त्या घटनेला स्वराज्य म्हणणे हे सर्वस्वी विपरीत होय. एक धनी जाऊन दुसरा यावा, अशी हिंदूंची इच्छा नाही. हिंदुस्थानच्या प्रदेशात जन्माला आला म्हणून एडवर्डचे स्थानी औरंगजेब आणून ठेवावा; एवढ्यासाठी युद्ध करून प्राण देण्यास, हिंदु, सिद्ध झालेले नाहीत. आपल्या देशात आपल्या स्वतःचे स्वामित्व चालवावे हीच एकमेव गोष्ट यापुढे हिंदूंना पाहिजे आहे.

ऊ) म्हणूनच आपल्या देशाला हिंदुस्थान हेच नाव चालू राहिले पाहिजे- मूळ सिंध शब्दापासून उत्पन्न झालेले 'इंडिया' किंवा 'हिंद' असे शब्द, वापरण्यास प्रत्यवाय नाही, पण तेही हिंदूंचा देश, हिंदू राष्ट्राचे वसतिस्थान ह्याच अर्थाने वापरता येतील. आर्यावर्त, भारतभूमी अत्यादि आपल्या मायभूमीची आपणास प्रिय असलेली प्राचीन नावे, अर्थात्च सुसंस्कृत लोकांना प्रिय राहतील. आमच्या मायभूमीला 'हिंदुस्थान' याच नावाने संबोधले पाहिजे. हा आग्रह धरण्यात अहिंदु अशा आमच्या देशबंधूंवर कोणत्याही पकारे अतिक्रमण वा मानहानि करण्याचा आपला उद्देश नाही. आपले पारशी नि ख्रिश्चन देशबंधु हे आजच आमच्याशी सांस्कृतिक दृष्ट्या इतके समानशील आहेत; इतके स्वदेशभक्त आहेत आणि अँग्लोइंडियन इतके समंजस आहेत की, ते या हिंदूंच्या न्याय्य भूमिकेशी मिळते घेण्याचे मुळीच नाकारणार नाहीत. आपल्या मुसलमान देशबांधवांसंबंधी

बोलावयाचे तर हिंदुस्थान या नावाची हिंदू मुसलमान ऐक्याचे मार्गात दुलर्ंघ्य पर्वतासारखी अडचण आहे असे मानणारे त्यांच्यात कित्येक आहेत, ही वस्तुस्थिती लपविण्यात अर्थ नाही. पण त्यांनी हे ध्यानात आणावे की मुसलमान हे काही एकट्या हिंदुस्थानातच आहेत असे नाही किंवा मुसलमानी जगतात काही हिंदी मुसलमानच केवळ निष्ठावान मुसलमान अवशिष्ट राहिलेले नाहीत. चीनमध्ये कोट्यवधी मुसलमान आहेत. तद्वत्च ग्रीस, पॅलेस्टाईन आणि हंगेरी नि पोलंडमध्ये देखील त्यांच्या राष्ट्रघटकात सहस्रावधी मुसलमान समाविष्ट आहेत पण तेथे ते अल्पसंख्य असल्याने केवळ एक जाति म्हणून नांदत आहेत आणि या देशांना त्यातील मोठ्या बहुसंख्येने असलेल्या वंशांची वसतिस्थाने म्हणून रूढ झालेली; प्राचीन नावे काढण्यासाठी तेथे कोणी या अल्पसंख्य जातीच्या अस्तित्वाचे कारण पुढे करीत वा आणीत नाही; तर पोल लोकांच्या देशाचे नाव पोलंड नि ग्रीकांच्या देशाचे नाव ग्रीस हेच चालू आहे. तेथील मुसलमानानी ही नावे विकृत केली नाहीत किंवा करण्यास धजले नाहीत. तर उलट तसा प्रसंग येताच पोलिश मुसलमान ग्रीक मुसलमान किंवा चिनी मुसलमान अशा नावांनी संबोधले जाण्यात ते समाधान मानतात तसेच आपल्या मुसलमान देशबांधवानी राष्ट्रीय नि प्रादेशिक दृष्ट्या आपला निर्देश करण्याचे वेळी हिंदुस्थानी मुसलमान या नावात समाधान मानावे; असे करण्यात त्यांच्या धार्मिक नि सांस्कृतिक स्वतंत्र अस्तित्वाला मुळीच बाध येत नाही आणि हिंदुस्थानात आल्यापासून येथील मुसलमान आपणांस हिंदुस्थानी असेच म्हणत आले आहेत. पण ह्या सर्व गोष्टी न मानता, आपल्या देशबांधवांतील काही दुराराध्य मुसलमान गट आपल्या या देशाच्या नावालाच बाध आणतात. एवढ्या वरूनच आपणही आपला विवेक सोडून, आत्मप्रत्ययहीन बनण्याचे कारण नाही. हिंदुस्थान या सर्वत्र रूढ झालेल्या आपल्या मायभूमीच्या नावाने, ऋग्वेदकालातील सिंधूपासून आपल्या पिढीतील हिंदू शब्दापर्यंत जी अखंड राष्ट्रीय परंपरा, व्यक्त होते; ती विच्छेदिण्यास वा तिच्याशी प्रतारणा करण्यास हिंदूंनी सिद्ध होऊ नये. जर्मनांचा देश जसा जर्मनी, इंग्रजांचा अंग्लड, तुर्कांचा तुर्कस्थान नि अफगाणांचा अफगाणिस्थान. त्याचप्रमाणे हिंदूंचा देश म्हणून हिंदुस्थान या नावानेच आपण आपले स्थान जगाच्या आलेख्यात (नकाशात) चिरंतन खोदून ठेवले पाहिजे.

ए) अखिल हिंदुध्वज- कुंडलिनी कृपाणांकित भगवा ध्वज हाच हिंदू राष्ट्राचा ध्वज होईल. त्यावरील ॐ, स्वस्तिक कृपाणादि चिन्हांमुळे वैदिक कालापासून चालत आलेल्या आपल्या हिंदू जातीच्या भावनांचे पोषण होते. ज्यांना या ध्वजातील अंगभूत हेतू नि त्याचेवरील आकृति नि प्रतीके यांची आवश्यकता ही समजून घ्यावयाची असतील त्यांनी त्यासंबंधाने लिहून प्रसिद्ध केलेली ‘अखिल हिंदुध्वज‘ ही पुस्तिका पहावी.

या संबंधात ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, या ध्वजाव्यतिरिक्त हिंदूंमध्ये इतर ध्वज प्रचलित आहेत. अखिल हिंदू जातीचे सनातनी, जैन, शीख, आर्यादी जे घटक आहेत; त्यांचे प्रतिक म्हणून हे ध्वज आहेत आणि त्यांनाही प्रत्येक हिंदूने मान दिला पाहिजे. कारण त्यामध्ये देखील, सामान्यतः अखिल हिदुस्थानच्या भावनेचाच पकर्ष झालेला आहे.

आपल्या अहिंदु देशबांधवांचे जे वेगळ्या रंगांचे ध्वज आहेत; त्यांना प्रतिस्पर्धी, विरोधक म्हणून हा हिंदू ध्वज आहे असे मानण्याचे काही एक कारण नाही. पण अखिल हिंदूराष्ट्राचे प्रातिनिधिक प्रतिक असा हा हिंदुध्वज आहे.

या देशाचे विभाग म्हणून असणाऱ्या आपल्या देशबांधवांच्या कोणत्याही गटांच्या धार्मिक वा राजकीय ध्वजासंबंधी आमचा आदरच राहील. मग तो मुस्लिम लीगचा ध्वज असो; काँग्रेसचा तिरंगी ध्वज असो वा रक्तध्वज असो. जोपर्यंत हे गट उलट आमच्या अखिल हिंदू ध्वजासंबंधी आदर दर्शवतील नि द्वेष न करता सहकारी ध्वज म्हणून त्यास मानतील तोपर्यंत आमचाही त्यांचे ध्वजासंबंधी आदरभाव राहील, पण अखिल हिंदू जातीचे प्रातिनिधिक प्रतिक म्हणून मात्र हिंदुध्वज हाच एकमेव राहील.

ऐ) संस्कृत ही आमची देवभाषा किंवा पवित्र भाषा आणि संस्कृतनिष्ठ म्हणजे संस्कृतापासून निर्माण झालेली नि संस्कृतामधूनच वाढलेली हिंदी भाषा हीच आमची प्रचलित राष्ट्रभाषा होय - जगातील प्राचीन भाषांमध्ये संस्कृत ही सर्वांत अधिक संपन्न नि सुसंस्कृत असून आम्हा हिंदूंना तर ती पूज्यात पूज्य भाषा होय. आमचे धर्मग्रंथ, इतिहास, तत्वज्ञान नि वाङ्मय यांची मुळे या भाषेत इतकी खोल रुतलेली आहेत की ती भाषा, म्हणजे हिंदुवंशाचे उत्तमांग होय. आमच्या प्रचलित मातृभाषांपैकी अधिकांत अधिक मातृभाषांची ती माता असून तिने आपले स्तनदुग्ध पाजून त्या भाषांचे पोषण केले आहे. आज हिंदूमध्ये ज्या ज्या भाषा प्रचलित आहेत; त्या संस्कृतपासून निर्माण झालेल्या किंवा संस्कृताशी संलग्न असलेल्या किंवा त्यांची वाढ नि उत्कर्षसुद्धा, संस्कृत भाषेपासून घेतलेल्या जीवनरसावरच पोसल्यामुळेच झालेला आहे. म्हणून हिंदू तरुणांच्या उच्च अभ्यासक्रमांत संस्कृत भाषेचा अंतर्भाव एक अपरिहार्य घटक म्हणून, चिरकाल नि अनिवार्यपणे असलाच पाहिजे.

हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून, अंगीकार करण्यात कोणत्याही इतर प्रांतिक भाषांचा अवमान वा अधिक्षेप अभिप्रेत नाही. हिंदीप्रमाणेच, आपापल्या प्रांतिक भाषाही आम्हांस प्रियच असून आपापल्या क्षेत्रात त्यांचे संवर्धन नि प्रगति चालणारच. त्यापैकी, काही प्रांतिक भाषा तर आजही हिंदीपेक्षा अधिक प्रगत आणि वाङ्मयसंपन्न आहेत. पण सर्व दृष्टीनी विचार केल्यास, सर्व हिंदूंची राष्ट्रीय भाषा होण्यास हिंदीची पात्रता सर्वांहून अधिक आहे. हेही ध्यानात घेणे अवश्य आहे की, हिंदी ही काही मागणीनुसार कृत्रिम सिद्ध केलेली राष्ट्रभाषा नाही. वस्तुतः इंग्रज किंवा मुसलमान देखील, हिंदुस्थानात येण्यापूर्वीपासूनच सर्व हिंदुस्थानात सामान्य स्वरूपाच्या हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान प्राप्त झाले होते. हिंदू यात्रिक, प्रवासी, व्यापारी, सैनिक वा पंडित जेव्हा बंगाल ते सिंध वा काश्मिर ते रामेश्वर संचार करीत; तेव्हा ते भिन्न भिन्न प्रदेशांत हिंदी भाषेच्या साहाय्याने आपला आशय व्यक्त करीत. ज्याप्रमाणे सुबुद्ध हिंदू क्षेत्रात संस्कृत, तद्वतच सामान्य हिंदू जातींमध्ये गेली सहस्र वर्ष तरी हिंदी हीच हिंदुस्थानची राष्ट्रीय भाषा म्हणून, प्रचलित आहे. त्याचाच परिणाम म्हणून त्यांचे भरीला आज देखील दुसऱ्या कोणत्याही हिंदू भाषेपेक्षा, संख्येने

पुष्कळच अधिक लोकांमध्ये मातृभाषा म्हणून हिंदी हीच रूढ नि प्रचलित आहे. म्हणून प्रांतिक भाषांच्या अभ्यासाकडे दुलर्क्ष न करता, दुय्यम शिक्षणांत हिंदू विद्यार्थ्यांस अखिल हिंदूंची राष्ट्रभाषा ह्या नात्याने हिंदीचे शिक्षण आवश्यक विषय म्हणून दिले पाहिजे.आम्हाला अभिप्रेत असलेली हिंदी म्हणजे अर्थात शुद्ध संस्कृतनिष्ठ हिंदी भाषाच होय. जी भाषा उदाहरणार्थ महर्षि दयानंदानी लिहिलेल्या सत्यार्थ-पकाशात दिसून येते त्यापकारची तशी हिंदी हीच खरी हिंदी असेच आम्ही मानतो. ही हिंदी भाषा किती साधी अनावश्यक परकीय शब्दांपासून अलिप्त नि इतकेही करून कितीतरी अर्थवाहक आहे. हिंदुस्थानातील अखिल हिंदूंची राष्ट्रभाषा हिंदी असावी या मताचा हेतुपूर्वक, नि निश्चितपणे पुरस्कार करणारे, पहिले हिंदू पुढारी, स्वामी दयानंदजी हेच होत. या गोष्टीचा येथे ओघाने निर्देश करणे योग्य ठरेल.

वर्धा येथील भटारखान्यांतल्या तथाकथित हिंदुस्थानीच्या खिचडीशी संस्कृतनिष्ठ हिंदीचा काही एक संबंध नाही. ती हिंदुस्थानी म्हणजे एक भाषिक विघटनेचा अत्याचार असून तो निष्ठुरपणे नामशेष करून टाकला पाहिजे, इतकेच नव्हे; तर प्रांतिक वा प्रादेशिक अशा प्रत्येक भाषेतून इंग्रजी वा अरबी अनावश्यक परकीय शब्द निष्ठुरपणे उच्छेदले पाहिजेत. आम्ही इंग्रजीच्या वा कोणत्याही भाषेच्या विरुद्ध नाही; इतकेच नव्हे तर, जागतिक वाङ्मय परिचयाचे सुलभ साधन म्हणून नि अनिवार्य आवश्यकता म्हणून इंग्रजी भाषा अभ्यासली पाहिजे; असे आम्ही आग्रहपूर्वक प्रतिपादन करतो. परकीय शब्दांना त्यांचे मूल्य पारखल्याविना नि त्यांची अनिवार्यता सिद्ध झाल्याविना आपल्या भाषेवर आक्रमण करू देता उपयोगी नाही. आपल्या बंगाली हिंदू बांधवांना विशेषच धन्यवाद दिले पाहिजेत. कारण असल्या अनावश्यक परकीय शब्दांच्या अशुद्ध मिश्रणापासून बंगाली वाङ्मयाने प्रशंसनीय अलिप्तता राखली आहे. इतर प्रांतिक भाषासंबंधी नि वाङ्मयासंबंधी असे म्हणता येणार नाही.

ऐ) नागरी लिपी हीच हिंदू जगताची राष्ट्रीय लिपी होय- आपला संस्कृतमधील मुळाक्षर संघ, हा ध्वनिशास्त्रदृष्ट्या, आजवर जगतात निर्माण झालेल्या, कोणत्याही मुळाक्षरांच्या अपेक्षेने अतिशय पूर्णत्वास पोचलेला आहे आणि आज हिंदुस्थानात प्रचलित असलेल्या बहुतेक सर्व लिप्यांनी तिचेच अनुकरण केलेले आहे. नागरी लिपीत हाच मुळाक्षर संघ घेतलेला आहे. आज दोन सहस्र वर्षपावेतो शतकानुशतके सर्व हिंदुस्थानभर हिंदू साहित्य क्षेत्रात हिंदी भाषेप्रमाणेच नागरी लिपीही प्रचलित आहे. आपल्या हिंदुधर्मग्रंथांची लिपी म्हणून ''शास्त्री लिपी'' असे नामाभिधानही तिला प्राप्त झाले आहे. काही काही ठिकाणी अल्पस्वल्प सुधारणा केल्यास रोमन लिपीप्रमाणेच तिलाही आधुनिक यांत्रिक मुद्रणाची सुलभता प्राप्त करून देता येईल.

श्री. वैद्य आदिकरून गृहस्थांनी महाराष्ट्रात चाळीस वर्षांपूर्वी ही, लिपी-सुधारणेची चळवळ हाती घेतली त्यानंतर माझे प्रेरणेने संघटित चळवळ होऊन तिला प्रत्यक्ष व्यवहारात ही

सुधारणा प्रचलित करण्याचे श्रेय पुष्कळांशी लाभले आहे. नागरी ही आपली राष्ट्रीय लिपी सर्वत्र रूढ करण्याची पहिली पायरी म्हणून, प्रांतोप्रांतीच्या हिंदू वृत्तपत्रांनी प्रत्येक अंकात नित्य दोन स्तंभ प्रांतिक भाषा, नागरी लिपीमध्ये मुद्रित करावी; अशी माझी आग्रहपूर्वक सूचना आहे. बंगाली नि गुजराथी या भाषा, नागरी लिपीत मुद्रित केल्या; तर कित्येक प्रांतात त्यांचे न्यूनाधिक्याने वाचकांना आकलन करता येईल. सर्व हिदुस्थानभर एकमेव भाषा करणे अव्यवहार्य नि अजाणतेपणाचे होईल. पण सर्व हिंदुस्थानात सर्व सामान्य अशी एकमेव लिपी म्हणून नागरीला मान्यता देणे त्यापेक्षा पुष्कळच अधिक व्यवहार्य होईल. परंतु ही गोष्ट लक्षात ठेवावी की, निरनिराळ्या प्रांतात प्रचलित असलेल्या हिंदुलिप्यांना भविष्य काळात स्थान राहील आणि नागरी समवेतच त्याही नांदू शकतील, हिंदू जगताचे सार्वत्रिक हिताचे दृष्टीने तत्काल करण्यासारखी गोष्ट हीच की, हिंदी भाषेच्या समवेत प्रत्येक शाळेत हिंदू विद्यार्थ्यांना नागरी लिपी हाही आवश्यक विषय केला पाहिजे.राष्ट्रभाषा आणि राष्ट्रलिपी हा प्रश्न सोडविण्यास दोन विख्यात काँग्रेस अध्यक्षांनी कोणता उपाय सुचविला; ह्याची आठवण तुमचे चांगले मनोरंजन करील. अथे तुमच्या करमणुकीचा विषय होईल. मौलाना अबुल कलम आझाद हे हिंदुस्थानी भाषा सुचवितात. आणि ती म्हणजे उर्दुच असा निर्वाळा देतात, पण पं. नेहरू त्यांच्याही पुढे जाऊन म्हणतात की, २८ कोटी हिंदू असलेल्या हिंदुस्थानची राष्ट्रीय भाषा होण्यास उस्मानिया वा अलिगड विद्यापीठातील अत्यंत अरबीप्रचुर अशी उर्दूभाषा हीच सर्वांत अधिक पात्र आहे. देशगौरव सुभाषबाबूंनी पंडितजींची ही कल्पकतेची पोकळी भरून काढून परिस्थितीत सुधारणा करण्याची हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाच्या खुर्चीतून प्रस्तावित केले; की रोमन लिपी हीच हिंदुस्थानची सुलभ राष्ट्रीय लिपी म्हणून सर्वोत्कृष्ट ठरेल. हिंदुस्थानची, म्हणे, रोमन ही राष्ट्रलिपी! काय या सूचनेची व्यवहार्यता? बसुमती, आनंद बझार पत्रिका आणि तुमची इतर बंगाली वृत्तपत्रे प्रतिदिनी रोमन लिपीत प्रगट व्हावयाची. या नव्या शैलीत वंदेमातरम् गीत, ''TOMARI PROTIMA GODI MONDIRE, MONDIRE'' आणि पुढील आकर्षक मांडणीत गीतेचा प्रारंभ होणार ''Dharmakshettre Kurukshettre shamavetha yuyustavah'' इत्यादी. अरबी लिपी, मुद्रणास सुलभ नसल्याने केमाल पाशाने ती नष्ट करून रोमन लिपी स्वीकारली असे सुभाषबाबूंनी सांगितले ते यथार्थ होय. पण त्या योगे, उर्दू लिपीचा उमाळा प्रगट करणाऱ्या आमच्या मुसलमानांनीच बोध घ्यावयास पाहिजे. कारण तेथे तर हिंदूंशी काही एक संबंध नसलेली अशी लिपी परिपूर्ण राष्ट्र लिपी म्हणून ते हिंदूंच्या माथी मारीत आहेत. केमाल पाशानी रोमन लिपी उचलली याचे कारण तुर्कांना दुसरा कसलाच जुना आधार घेण्यासारखा नव्हता.

अंदमानी लोक कवड्या गोळा करून त्यांचा हार करतात. पण म्हणून कुबेरानेही तसेच करावे काय? उलट अरबस्थानला आणि युरोपला आम्ही हिंदूंनीच नागरी लिपी आणि हिंदू भाषा अनुसरण्याचा उपदेश करण्यासारखा आहे.सर्व आर्यसमाजी गुरुकुलात वेदांचा रोमन लिपीतून अभ्यास व्हावा; आणि सर्व मराठ्यांची उर्दू ही राष्ट्रभाषा बनवावी अशा रीतीची सूचना गंभीरपणे

www.savarkarsmarak.com

अत्यंत व्यवहार्य म्हणून पुढे करणाऱ्या आमच्या येथील गाढ्या आशावादी लोकांना तरी, निदान माझी वरील सूचना अव्यवहार्य वाटण्याचे कारण नाही.

ओ) हिंदुमहासभा ही हिंदू जगताची राष्ट्रीय संघटना आहेः- एखाद्या ख्रिस्ती मिशनसारखी हिंदुसभा ही केवळ धार्मिक संघटना आहे; अशा भ्रांत कल्पनेने इंग्रजी शिक्षण घेतलेल्या हिंदूंचा एक मोठा वर्ग हिंदुमहासभेपासून अलिप्त राहतो आणि हिंदुस्थानातील नि बाहेरील राजकारणी मंडळीत हिंदुमहासभेविषयी उदासिनता असते असे माझ्या प्रत्ययास आले आहे; पण ही कल्पना वस्तुस्थितीस अगदी सोडून आहे. हिंदुमहासभा म्हणजे काही हिंदू मिशन नव्हे. ईश्वरी, एकेश्वरी, सर्वेश्वरी वा निरीश्वरी अशा प्रकारचे धार्मिक प्रश्न, भिन्न भिन्न हिंदू संप्रदायांवरच हिंदुमहासभा सोपविते.

ती काही हिंदुधर्म महासभा नव्हे; तर हिंदू राष्ट्रीय महासभा आहे म्हणून तिच्या घटनेनुसारच हिंदूमधल्या देखील कोणत्याही विशिष्ट पंथाची वा संप्रदायाची पक्षपाती म्हणून पुढे येण्यास हिंदुसभेला प्रतिबंध आहे. हिंदुस्थानात निर्माण झालेल्या सर्व धर्मांचा समावेश करणारे राष्ट्रीय हिंदुधर्म पीठ (चर्च) त्याचे अहिंदूंच्या आघातांपासून नि आक्रमणांपासून संरक्षण करणे नि त्याचा प्रसार करणे ही कार्ये हिंदूंची राष्ट्रीय संस्था, म्हणूनच, अर्थातच, हिंदुमहासभा करील. पण केवळ धार्मिक अशा संस्थेहून तिचे कार्यक्षेत्र अतिशयच व्यापक नि संग्राहक आहे. हिंदू जगताचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि या सर्वांवरील राजकीय क्षेत्रांसह हिंदू जगताच्या समग्र राष्ट्रीय जीवनाशी हिंदुमहासभा तादात्म्य मानते. हिंदुराष्ट्राचे स्वतंत्र बल नि वैभव यांचे ज्या योगे संवर्धन होईल, त्या सर्व गोष्टींचे रक्षण आणि प्रवर्तन करण्यास, हिंदुमहासभा बांधलेली आहे आणि हे ध्येय साध्य होण्यासाठी सर्व न्याय्य नि योग्य मार्गांनी, हिंदुस्थानचे निर्भेळ राजकीय स्वातंत्र्य किंवा पूर्ण स्वराज्य हिंदुमहासभेला, प्राप्त करून घ्यावयाचे आहे.

औ) हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्यानंतरसुद्धा हिंदुमहासभेने आपले विशिष्ट महत्कार्य चालू ठेवलेच पाहिजे. पुष्कळशा, उथळ बुद्धीच्या टीकाकारांची अशी कल्पना दिसते की, मुस्लिम लीगचे, किंवा काँग्रेस पुढाऱ्यांचे सध्याचे हिंदुविरोधी धोरण यांना प्रतियोगित्वाने, प्रतिरोधक शक्ती म्हणून केवळ योजण्यासाठी हिंदुमहासभा उभी करण्यात आली आहे; आणि हे तिचे आगंतुक समर्थक बाह्य कारण निघून गेले म्हणजे ती निर्माल्यवत् होऊन आपोआपच विराम पावेल. परंतु या सभेचे ध्येय आणि उद्देश यांचा जर काही अर्थ असेल तर ह स्पष्ट होईल की केवळ एखाद्या तात्कालिक पक्षाला विरोधण्यासाठी किंवा एखादे गाऱ्हाणे दूर करण्यासाठी क्षणिक उत्साहाच्या उद्रेकामुळे ती निर्माण झाली नाही. वस्तुस्थिती अशी आहे की कोणतीही व्यक्ती वा संस्था जीवमान नि जगण्यायोग्य असेल तर बदलत्या परिस्थितीच्या विरोधी आवरणात ती उभी राहिली असता तिची संरक्षक आणि आक्रमक अशी उभयविध अंगे, उपस्थित होतात; तद्वतच,

हिंदुराष्ट्रदेखील काँग्रेसछाप भ्रांत राष्ट्रकल्पनेच्या गुदमरविणाऱ्या कोंडीतून आपली मुक्तता करून घेऊन आपल्या पायांवर उभे राहिले; तेव्हा, आधुनिक कालांच्या भिन्न परिस्थितीत जीवनसंग्रामात झुंजण्यासाठी त्याने नवे साधन निर्माण केले आणि तीच ही हिंदुमहासभा होय. ती क्षणिक प्रसंगाने निर्माण झाली नसून, राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत आवश्यकतेतून उद्भवली आहे. तिच्या उद्देशाची आणि ध्येयाची विविध अंगे पाहिली तर हे स्पष्ट होईल की राष्ट्राच्या जीवनाइतकेच तिचे कार्य चिरस्थायी आहे. पण ते असो. नित्य अस्थिर राजकीय घडामोडींना तोंड देण्यासाठी आपले धोरण ठरविण्याची दैनंदिन आवश्यकता घेतली, तरी देखील हिंदुहितसंबंधास जपण्यासाठी नि संकटापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी हिंदू जगताला अशी एक स्वतंत्र नि केवळ हिंदूंची एक संघटना आवश्यक आहे की ती कोणत्याही अहिंदू वा उभयान्वयी संस्थेच्या नैतिक नि बौद्धिक वर्चस्वाखाली जाता कामा नये. सध्याच्या हिंदुस्थानच्या परतंत्र राजकीय परिस्थितीपुरतीच ही आवश्यकता नाही; तर हिंदुस्थान हे पूर्णपणे वा अंशतः स्वतंत्र होऊन आपल्या राजकीय भवितव्याचे नियंत्रण राष्ट्रीय विधिमंडळाचेद्वारे करू लागल्यावर देखील हिंदुमहासभेसारखी केवळ हिंदूंची अशी संघटना निदान दोन शतकेपर्यंत तरी हिंदू जगताच्या द्वाररक्षक दुर्गाप्रमाणे उभी असणे; अधिकच आवश्यक आहे. मग ती सध्याच्या हिंदुसभेचीच असो; वा इतर कोणतीही असो.

कारण काहीतरी सर्वस्वी अघटित अशी, व्यवहार्य राजकारणाच्या दृष्टिपथांत, न पडणारी घटना होऊन जगाच्या राजकारणाच्या चालू घडीची आमूलाग्र विघटना झाली नाही तोपर्यंत निकटच्या भविष्यकालात अनुमानाने संभाव्य वाटणारी अपेक्षा अशी की, आम्ही हिंदू इंग्रजांवर प्रभाव पाडून वेस्टमिनिस्टरच्या दंडकाच्या कक्षेत अभिप्रेत असलेली स्वयंशासित घटकाप्रमाणे हिंदुस्थानची योग्यता मानणे; इंग्रजांना अनिवार्य करू शकू. अशा स्वायत्त हिंदुस्थानच्या राष्ट्रीय विधिमंडळात आज आहे तसेच मतदार संघाचे स्वरूप प्रतिबिंबित होईल म्हणजे त्यात हिंदू नि मुसलमान हे आज आहेत; तसेच राहतील. कदाचित त्यांचे संबंध अधिक सुधारतील किंवा कदाचित अल्प प्रमाणात बिघडतील. मुसलमानांची देशबाह्य कारस्थाने आणि हिंदुस्थानचे मुसलमानी राज्यात परिवर्तन करण्याची त्यांची गुप्तप्रेरणा यामुळे स्वराज्या-नंतरच्या हिंदुस्थानी राज्यालाही केव्हाना केव्हा, मुसलमानांकडून परकीय आक्रमकांना देशघातकी पाचारण किंवा अंतःस्थ युद्ध प्रसंग अनुपस्थित होणारच. कोणीही व्यवहारदर्शी मनुष्य ही संभवनीयता दृष्टीआड करू शकत नाही. आपण दूरदर्शीपणा राखावयाचा तर स्वायत्त राष्ट्राच्या मालेत हिंदुस्थान बसल्यावर देखील आपल्या दृष्टीपुढे वरील संभाव्य संकट नित्य ठेवले पाहिजे. या संकटास तोंड देण्यासाठी, हिंदुमहासभेसारखी केवळ हिंदू जगताचीच बलिष्ठ संघटना, आपल्याला सबळ करण्यास निश्चित उपयोगी पडेल. केव्हाही आधारासाठी अवलंबण्याची राखीव शक्ती म्हणून तिचा उपयोग होईल. संयुक्त विधिमंडळापेक्षा अधिक परिणामकारक रीतीने हिंदूंच्या दुःखाची वाच्यता करण्यासाठी

भावी संकट वेळीच ओळखून हिंदूना योग्य वेळी सावधपणाची सूचना देण्यासाठी आणि संयुक्त राज्य अभावितपणे एखाद्या राष्ट्रघातकी व्यूहास बळी पडू लागल्यास त्या व्यूहाचा प्रतिरोध करण्यासाठी अशा संस्थेची आवश्यकता राहील.

कॅनडा काय किंवा पॅलेस्टाईन काय अथवा तरुण तुर्कांची चळवळ काय याचा इतिहास तुम्हाला हेच दाखवून देईल की जेथे एखाद्या राज्यात हिदुस्थानातील हिंदुमुसलमानाप्रमाणे दोन वा अधिक परस्परविरोधी घटक नांदत असतील; त्या ठिकाणी त्यातल्या अधिक चाणाक्ष शहाण्या घटकाने बलिष्ठ विरोधी गटाचे राज्यावरील आक्रमणाचे वा प्रतारणेचे प्रयत्न हाणून पाडण्यास सबळ नि दक्ष असणारी आपली स्वतंत्र संघटना राखली पाहिजे. विशेषतः ज्या वेळी त्या विरोधी घटकाचे संबंध देशाबाहेर सीमेपलीकडील, परकीय राष्ट्रांशी असतील अशा वेळी तर ही संघटना राखलीच पाहिजे. असे विरोधी गट, संयुक्त राष्ट्र देशभक्तीच्या भावनेचे पोषण करून संयुक्त राष्ट्रात विलीन होण्यास कधी काळी हळूहळू शिकले; तर शिकतील; तोपर्यंत अशा संयुक्त राज्यातील घटकांचे द्वंद चालूच राहणार. हिंदूंनी हे व्यवहारिक सत्य, हृदयाशी बाळगले; तर हिंदू मनोभूमिकेत जी आजच खोलवर बद्धमूल झाली असून सबळ होत आहे; अशा अखिल हिंदुसंघटनेला भरीव नि सन्नद्ध करण्याचा ते हिंदू अधिकात अधिक प्रयत्न करतील. स्वराज्याच्या तुम्ही जसजसे सान्निध जाल, तसतशी बलिष्ठ आणि एकजीव अशा अखिल हिंदुसंघटन संस्थेची अनिवार्य आवश्यकता, अधिकच प्रतीत होत जाईल किंवा अखिल हिंदूची संघटना जसजशी प्रबलतर होत जाईल तसतसे तुम्ही खऱ्या स्वराज्याच्या सन्निध जाल!

## हिंदू चळवळीचे व्यावहारिक धोरण

हिंदुसंघटन चळवळीचा राष्ट्रीय नि राजकीय ध्येयवाद आणि त्या चळवळीची काही मूलतत्वे नि प्रमेये; आतापर्यंत मी यथामति माझ्या उत्तम समजुतीप्रमाणे विशद केली. पण अजूनही आम्हाला हिंदू चळवळीची ही ध्येयनिष्ठा नि संकल्पनाच व्यवस्थित मांडून तिचा हा आदर्शवाद प्रभावपूर्ण परिचायक होईल अशा रितीने प्रचारावयाचा आहे. आणि शिवाय भरीत भर म्हणून, त्यातच हिंदी राज्याची संकल्पना आणि ते साकार करण्यासाठी हिदुलोकांच्या सार्वजनिक जीवनात संपूर्णतया आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे, हाच त्या ध्येयाचा अर्थ आहे आणि इतके करून आपण हे पहिलेच पाऊल टाकीत आहोत यावरून पाहता आमच्या व्याख्येप्रमाणे स्वतंत्र हिंदुस्थान निर्माण करण्याचे आमचे ध्येय प्राप्त करून घेणे शक्य होण्यापूर्वी आपल्याला किती सातत्याने नि परिश्रमाने झुंजावे लागेल; हे दिसून येईल. एकदा ध्येय निश्चित झाल्यावर या संघर्षाकडेच सर्वतोपरी लक्ष वेधले पाहिजे आणि म्हणून हा संघर्ष अधिकात अधिक

परिणामकारकरित्या कसा चालविता येईल आणि होणारा विरोध शक्य तितका मर्यादित कसा करता येईल या संबंधीच्या धोरणाची आखणी, आपण शक्य त्या त्वरेने केली पाहिजे.
आणि हेही ध्यानात घेतले पाहिजे की ध्येय अचल राहिले; तरी ते गाठण्याचा मार्ग सरळ रेषेप्रमाणे क्वचितच चालू शकेल. कधी आपणास विरोध करावा लागेल तर कधी समन्वय करावा लागेल, कधी संघर्ष चालू ठेवावा लागेल तर, कधी माघार घेऊन योग्य वेळेची प्रतीक्षा करावी लागेल.
एखाद्या वेळी, आपल्या प्रतिपक्षीयांतल्या एकाशी विशिष्ट विधेयापुरते, संगनमत करावे लागेल; तर पुढे त्याच सांगात्याला विरोधावेही लागेल; एकंदरीने पाहता अष्टसिद्धीच्या दृष्टीने जर ह्या क्रमाने आपण पुढेपुढेच जात राहू तर आपल्या ध्येयाला पोचण्याच्या दीर्घकालीन जीवनमरणाच्या ह्या संघर्षात तात्कालिक अंगामधील विसंगतता हीच संगती होईल. मी आपल्यापुढे जे धोरण मांडणार आहे त्याकडे वरील व्यवहार-चातुर्याच्या दृष्टीने आपण पाहा. हे धोरण केवळ आपल्या प्राप्त परिस्थितीशी संबद्ध आहे. त्रिकालाबाधित निश्चितीने ते घेऊ नये. आपली ही चळवळ अशीच चालून कधीकाळी अशा स्थानावर येईल की, जेव्हा प्रचंड राक्षसी बलाने अप्रतिहतपणे पुढे सरसावून अधिकारवाणीने नि अमर्याद वीरतेने अशा इच्छित गोष्टी करण्यास समर्थ होईल की ज्या आजच्या आपल्या अल्प आरंभाच्या वेळी आपण कल्पिण्यास वा व्यक्तविण्यास देखील धजणार नाही.
मला हेही स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, ह्या व्यवहार्य धोरणाची रूपरेषा माझ्या व्यक्तिगत अनुभूतीचा आविष्कार असून तो माझा वैयक्तिक दृष्टिकोन आहे. जो मी प्रकट करीत आहे. हा माझा व्यक्तिगत अभिप्राय हिंदुमहासभेने सामुदायिक ठरावाने मान्यता दिल्यावाचून तिच्यावर बंधनकारक होणार नाही.

१) हिंदुस्थानची अविभाज्यता राखणे हे आपल्या राजकीय कार्यामध्ये पहिले आणि मुख्य, लक्ष्य असले पाहिजे. हिंदुस्थान, म्हणजे केवळ, तथाकथित ब्रिटिश हिंदुस्थान असा अर्थ नसून, त्यामध्ये फ्रेंच नि पोर्तुगीज अधिकाराखाली असलेल्या विभागांचाही अंतर्भाव होतो. महाराष्ट्र नि बंगाल तसेच गोमांतक नि पाँडेचरी हे आमच्या मायभूमीचे अविभाज्य अवयव आहेत. सिंधु ते हिमालय तेथून पुढे तिबेट पुढे ब्रह्मदेश नि ब्रह्मदेशापासून दक्षिण आणि पश्चिम समुद्र यावरून या आमच्या देशाची सीमारेषा जात आहे. काश्मिर आणि नेपाळ, गोमांतक आणि पाँडेचरी नि फ्रेंच प्रदेश हे सर्व मिळून आमचा राष्ट्रीय भौगोलिक विभाग होतो आणि तो सर्वच्या सर्व एका स्वतंत्र केंद्रित सत्तेच्या राज्यात संघटितपणे, समाविष्ट झाला पाहिजे. तो चिरंतन अविभाज्य नि अविभाज्यच राहिला पाहिजे. हिंदुस्थानचे हे प्रादेशिक नि राष्ट्रीय अविभाज्यत्व तोडण्याचा कोणताही प्रयत्न, उदाहरणार्थ हिंदू नि मुसलमान अशा अधिकार कक्षेमध्ये तुकडे पाडण्याचा आजचा प्रयत्न या सर्वांच्या प्रवर्तकांस आपले सामर्थ्य एकवटून प्रतिरोध करणे आणि राष्ट्रघातक नि राष्ट्रवंचक म्हणून त्यास शासन करणे आवश्यक आहे.

२) पूर्वेकडील सीमेवरील ब्रह्मदेश आणि ईशान्य सीमेवरील तिबेट या आमच्या पार्श्वनिवासी राज्यांविषयी आमचे धोरण, शक्य तो मित्रत्वाचे आणि त्यांची इच्छा असेल तर राजकीय संगनमताचेही राहील. ते आमचे धर्मबांधव असून आमचे राजकीय हितसंबंधही मूलतः विरोधी नाहीत. इतकेच नव्हे तर आम्ही राजकीय संगनमत करून राहिलो तर आमच्या परस्पर राजकीय शक्तीत सामान्यतः भरच पडलेली दिसून येईल.

३) पण, वायव्यसीमेवर असलेल्या मुसलमान राज्यासंबंधी नि जातीसंबंधी, आम्ही सावधानतेचे धोरण ठेविल्याविना चालणार नाही. गेली कित्येक शतके त्यांची प्रवृत्ती हिंदूंशी धर्मवेड्या शत्रुत्वाची आहे आणि पुढे एक शतकभर तरी ती तशीच चालण्याचा संभव दिसतो.

ही वायव्य सीमा, मुसलमानी सैन्यावर कधीही अवलंबून न ठेवता अधिकतम हिंदू सैन्याने संरक्षित असली पाहिजे; असा हिंदुसंघटक पक्षाचा नित्याचा कटाक्ष राहणे अवश्य आहे.

त्या सीमावर्ती राज्यांशी मित्रत्वाचे संबंध जोडण्यास आम्ही सदैव सिद्ध असावे नि अनावश्यक वितुष्टाला निमित्त पुरवू नये. परंतु त्या मुसलमानी जातीकडून होणाऱ्या आकस्मिक नि आक्रमक उत्थानास नि त्या खिंडीतून येऊ पाहणाऱ्या कोणाही हिंदुविरोधी परकीयाचे अपहारक हस्तक्षेपास प्रतिरोधण्यासाठी आमची, तेथील हिंदू सैन्ये, नित्य दक्ष नि युद्धकालिक सिद्धतेत असली पाहिजेत.

४) नेपाळच्या स्वतंत्र हिंदू राज्याशी सर्व हिंदुजगत् अतिशय निष्ठेने निगडीत आहे आणि त्या राज्याचे अखंडत्व नि मान राखण्यासाठी हिंदुजगत् सर्वशक्ति एकवटून यत्न करील. अवमानकारक अशा परकीय नि अहिंदू ध्वजाने कधीही कलंकित न झालेले खरे धर्मक्षेत्र असे ज्यास म्हणता येईल असा आमच्या मातृभूमीचा तो एकमेव विभाग आजवर राहिला आहे. एका पराक्रमशाली हिंदु जातीचे निवासस्थान असलेल्या नेपाळी हिंदुराज्याच्या स्वातंत्र्यामध्ये हिंदूंची आशा नि अभिमान ही केंद्रित झाली आहेत.

नेपाळच्या सामर्थ्याला वाढविणारा प्रत्येक शक्तिकण अखिल हिंदुजगताचा मान नि भूमिका उंचावून सबळ करतो. उलट हिंदुस्थानात इतरत्र कोठेही हिंदू जगताला दुर्बल वा अवमानित करणाऱ्या कोणत्याही घटनेने, पर्यायाने, नेपाळच्या बळास न्यून पडणे, अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ वायव्य सीमेवरील मुसलमानांचे उत्थान हे नेपाळातील हिंदुराज्याच्या स्वातंत्र्याला देखील एक सततचे संकटच होय. हिंदू इतिहासापासून अतकाही दूरदर्शीपणा आपल्याला प्राप्त झाला नसेल तर गझनी आणि घोरी यांच्या आक्रमणांचे योगाने विधिघटनेचे मनातून जे बोध तुम्हास द्यावयाचे होते ते तुमचेपुढे व्यर्थ गेले असेच म्हटले पाहिजे.

तरीही ब्रिटिश राज्यातील हिंदुस्थानच्या प्रदेशातील संकीर्ण नि भ्रमग्रस्त राजकारणाने केलेल्या विकृतीत नेपाळला ओढण्यासारखी कोणतीही गोष्ट आपण करू गेल्यास ते मूर्खपणाचे होईल. नेपाळसारख्या सुस्थित, स्वतंत्र असलेल्या राज्याच्या निकडीच्या प्रसंगात, पराधीन जित दासांच्या राजनीतीचे मार्गदर्शक होणे हे शक्यच नाही. हिंदुस्थानला दुसऱ्या कोणत्याही अहिंदु आक्रमणापासून सुरक्षित ठेवण्यासाठी नेपाळच्या शासनाने ब्रिटिशांशी राजकीय संधी करून हितैक्य बुद्धीने ब्रिटिश राज्याशी मित्रत्वाचे संबंध राखण्याचे जे धोरण आज ठेवले आहे त्याचे समर्थन करण्यास मला काडीमात्र दिक्कत वाटत नाही. म्हणूनच आपली स्वतःची सुरक्षितता नि सामर्थ्य अबाधित ठेवून जितके नेपाळी सैनिक हिंदी सैन्यास देता येतील तितके पुरवण्याचे नेपाळचे धोरण अत्यंत शहाणपणाचे आहे. युरोपमध्ये नि अतिपूर्वेकडे राजकीय गुंतागुंती; ह्या बव्हंशी; हिंदुस्थानच्या संरक्षणाची हमी मिळावी; म्हणून नेपाळकडून अधिकात अधिक सैनिकी सहाय्य मिळविण्यासाठी नेपाळशी चढती वाढती मित्रता राखण्यात ब्रिटिश राजसत्तेला भाग पाडतील अशी निश्चिती आहे.

ह्या संबंधात आणखी एका गोष्टीवर भर दिला पाहिजे. नेपाळच्या सीमेवरील जे काही प्रदेश गतकालात ब्रिटिशांनी हस्तगत केले; त्यापैकी काही प्रदेश ब्रिटिशानी नेपाळचे महाराजास परत द्यावेत. दुसऱ्या कोणत्याही कृत्याने होणार नाही; इतकी या दोन राष्ट्रांतील मैत्रीची दृढता वरील कृत्याने होईल.

उदयशाली राष्ट्राला आवश्यक असणारी भविष्यभेदी दूरदृष्टी, नेपाळला असेल आणि ते वेळीच सावध होईल तर नेपाळचा भविष्यकाळ निःसंशय उज्ज्वलच आहे. नेपाळने आपले सैन्यबळ अद्यावत युरोपियन सैन्याप्रमाणे कार्यक्षम करावे. जमिनीवरच नव्हे; तर आकाशमार्गे होणाऱ्या आक्रमणास तोंड देण्यासाठी त्या देशाने प्रबळ वैमानिक दल संपादन करावे. नेपाळचे सामर्थ्य म्हणजे एका मित्रराष्ट्राचेच सामर्थ्य असल्यामुळे सद्यःपरिस्थितीत ब्रिटिश सरकार त्यायोगे, अस्वस्थ होऊन नेपाळचे प्रयत्नास बाध न आणता उलट त्यास ह्या योजनेस सहाय्यच करील. नेपाळसंबंधी प्रचंड ग्रंथ लिहिणाऱ्या मि. पर्सिव्हल लँग्डन या प्रख्यात ग्रंथकाराचे शब्दांनी नेपाळचे भावी काळात हिंदी राजकारणावर कसे परिणाम घडण्याचा संभव आहे हे दिसून येईल.
मि. लँग्डन म्हणतातः- ''सद्यःकाळी, नेपाळला जे महत्व प्राप्त झाले आहे त्याकडे दुलर्क्ष करणे, मूर्खपणाचे ठरेल. सर्वोच्च भूमिका आणि हिंदुस्थानाला सद्यःस्थितीत ग्रासणारे प्रश्न सोडविताना भावी काळात नेपाळला प्राप्त होणार वाढते महत्व ह्या गोष्टी समजून घेण्यासाठी इंग्रजांनी प्रयत्न केला पाहिजे. नेपाळ आज उदयाच्या सन्निध उभे आहे. त्याचा भविष्यकाळ त्यास एकाच दिशेने पाचारीत आहे. हिंदी राजकारणाच्या विभिन्न मंचाकडे पाहता नेपाळच्या अंतिम भवितव्याहून अधिक लक्ष वेधणारी, दुसरी कोणतीच गोष्ट आढळणार नाही.

हिंदुस्थानातील ब्रिटिशांचा प्रभाव कमी कमी करीत नेण्याचे सध्याचे धोरण असेच टिकून राहिल्याने नेपाळचे महत्व उत्तरोत्तर वाढत जाणे हे अवश्यंभावी आहे. हिंदुस्थानच्या

भवितव्यावर देखील नियंत्रण चालविण्यास नेपाळला पाचारण करावे लागणे ही गोष्टही अशक्य कोटीतील नाही.

## हिंदुस्थानची राज्य घटना

५) हिंदुसंघटनवादी पक्षाच्या ध्येयधोरणानुसार सर्व नागरिकांना समान अधिकार नि कर्तव्ये राहतील. मग त्यांची जात, पंथ, वंश वा धर्म कोणतेही असोत मात्र त्यांनी ह्या हिंदुस्थानी राज्याशी पूर्णपणे एकनिष्ठ आणि कृतज्ञ राहण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. भाषण, विचार, धर्म नि संघ इत्यादी संबंधीचे स्वातंत्र्याचे मूलभूत अधिकार सर्व नागरिकांना सारखेच उपभोगता येतील. हिंदुस्थानची भावी राज्यघटना ह्या व्यापक तत्वांवर आधारण्यात येईल.सार्वजनिक शांतता सुव्यवस्था नि राष्ट्रीय निकडीचे संकटप्रसंग या हितसंबंधांच्या रक्षणार्थ त्या अधिकारांवर जी काही बंधने घालावी लागतील. ती कोणत्याही धार्मिक जातीय विचारांचे आधारे नव्हे; तर सर्वसामान्यतः राष्ट्रीय कारणासाठीच घालण्यात येतील.

प्रादेशिक दृष्टीने देखील या धोरणापेक्षा अधिक राष्ट्रीय असे धोरण कोणतेच असू शकणार नाही आणि हेच धोरण एका मनुष्याला एक मत या सूत्रात तुसडेपणाने थोडक्यात दर्शविले जाते. यावरून हे लक्षात येईल की, सामान्य हिंदी राष्ट्राच्या वाढीशी हिंदू राष्ट्राची कल्पना कोणत्याही पकारे विसंगत नाही.कारण या हिंदी राष्ट्रात सर्व पंथ, उपपंथ, वंश, जाती, धर्म नि सांप्रदाय हिंदू, मुसलमान, अँग्लोइंडियन, ख्रिश्चन इत्यादी सर्वांना एका राजकीय घटनेत, समानतेने नि सलगपणाने एकत्रित करता येईल*अशा प्रकारचे संयुक्त हिंदुस्थानी राज्य हे हिंदी राष्ट्र होय.

हिंदुस्थानी राष्ट्रीय राज्य घटनेसंबंधाचे हिंदुमहासभेचे हे धोरण निश्चितपणे नि अर्थपूर्णतेने मुस्लिम लीग किंवा हिंदी राष्ट्रीय सभा (कॉंग्रेस) यांच्या धोरणापेक्षा अधिक राष्ट्रीय आहे. आपल्याला राष्ट्रीय म्हणविणारी कॉंग्रेस देखील जितके ठणठणीत राष्ट्रीय धोरण मांडू शकत नाही; तितके ठणठणीत राष्ट्रीय धोरण, 'अराष्ट्रीय', 'दुराग्रही' जातीय, अशा रीतीने जिची हिंदुराष्ट्रसंकल्पना कॉंग्रेसने नि लीगने डावलली आहे त्या हिंदुमहासभेचे आहे. वस्तुतः कॉंग्रेस हीच सरळ अर्थाने जातीय आहे; इतकेच नव्हे तर विपरीतपणे जातीय आहे. कारण हिंदू बहुसंख्य नि मुसलमान अल्पसंख्य या विभागांना मान्यता देऊन पुनः सांस्कृतिक अधिकार, मतदान नि राज्ययंत्रातील घटक यामध्ये बहुसंख्याकांचा न्याय्य प्रमाणांत अंश द्यावयाचा तो काढून घेऊन धार्मिक दृष्ट्या अल्पसंख्य मुसलमानांना द्यावयास कॉंग्रेस भाग पाडीत असते; आणि हे मूल्य देऊन, मुसलमानांकडून देशभक्ती नि संयुक्त-राष्ट्रीय राज्यातील निष्ठा विकत घेऊ पाहते. दुसरीकडे मुस्लिम लीग, राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवर जे न्याय्य अधिकार मिळतील; त्यापेक्षा अतोनात अधिक अधिकार हिंदूंच्या हिताचा, विघात करून स्वतंत्र घटक म्हणून मागते आणि असे न केल्यास आततायीपणाने फुटून जाऊन परकीय सत्तेशी संगनमत करण्याच्या शस्त्राचा धाक

दाखविते. एवंच, मुस्लीम लीगच्या राष्ट्रद्रोही भूमीकेची सीमा कपटी विश्वासघातापर्यंत पोहोचली आहे.

एका मुसलमानास तीन मते याप्रमाणे मागणी करून मुस्लीम लीग भयंकर आक्रमक जातीयताच प्रगट करते; तर तीन हिंदूंना एकच मत देण्याच्या सूचनेला मान्यता देऊन शरणागती स्वीकारल्याने काँग्रेस भित्रेपणाची जातीयताच प्रगट करते. भाकरीच्या एखाद्या तुकड्यासाठी किंवा सागुतीच्या तुकड्यासाठी आपला जन्मसिद्ध अधिकार टाकून देणे हिंदुसंघटनावादी पक्षाला मुळीच मान्य नाही; तो पक्ष मुस्लीम लीगची साथ करून, 'री' ओढीत नाही; नि काँग्रेसकडून मिळणाऱ्या कुचकामी 'राष्ट्रीय'त्वाच्या प्रशस्तिपत्राची अपेक्षा करीत नाही, एवढ्या साध्या कारणासाठी ह्याच दोन संस्था एक 'मिथ्या-राष्ट्रीय' काँग्रेस नि दुसरी उजळ माथ्याने राष्टद्रोही असणारी मुस्लिम लीग, उलट हिंदुसंघटनवादी पक्षाला जातीयवादी नि राष्ट्रद्रोही असणारी मुस्लिम लीग उलट हिंदुसंघटनवादी पक्षाला जातीवादी नि राष्ट्रद्रोही म्हणून निंदण्याचे धाष्ट्यर् करतात.

६) अहिंदू अल्पसंख्यांकाचे अधिकार- जेव्हा एकदा हिंदुमहासभेने 'एका माणसास एक मत' आणि 'गुणवत्तेनुसार सार्वजनिक सेवांमध्ये प्रवश' ह्या तत्वांचा स्वीकारच केवळ केला असे नव्हे; तर त्याला समर्थन ही दिले आणि मूलभूत अधिकार नि कर्तव्ये, जाति (वंश) किंवा धर्म ह्या पकारे कसलाच भेदभाव न करता समानच (समतेच्या तत्वावर) मानल्यानंतर, आता पुन्हा, अल्पसंख्याकांच्या अधिकारांचा उल्लेख करणेही तत्वतः अनावश्यकच केवळ आहे असे नव्हे; तर आत्मविसंगतही आहे. कारण, तसे करणे; हे जातीच्या आधारावर अल्पसंख्यांक नि बहुसंख्यांक या दोघांचेही अहंकार चेतविण्यास प्रवृत्त करील. व्यावहारिक राजकीय धोरणीपणाची आवश्यकता म्हणून आणि आपल्या अहिंदु देशबांधवांचाी संशयपिशाच्चाच्या पकडीतूनसुद्धा मुक्तता व्हावी, अशी हिंदुसंघटन वाद्यांची इच्छा असल्यामुळे अल्पसंख्यांकांच्या धर्मिक, सांस्कृतिक नि भाषिक न्याय्य अधिकारांची प्रत्याभूति निःसंदिग्ध स्पष्टपणे देण्यासही आम्ही सिद्ध आहोत मात्र अट इतकीच की काही झाले तरी, कशाही नि कोणत्याही परिस्थितीत बहुसंख्याकांच्या अशाच न्याय्य समान अधिकारांवर आक्रमण किंवा त्यांचा संकोच किंवा त्यांची निराकृति खंडन- ही होताच कामा नयेत. प्रत्येक अल्पसंख्यांकांना, आपापल्या मुलांना, स्वतःच्या मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी वेगळ्या शाळा काढता येतील, धार्मिक किंवा सांस्कृतिक संस्था काढता येतील आणि त्यासाठी शासकीय अनुदाने घेता येतील- पण असे अनुदान सामाइक कोषागारात त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या करांच्या प्रमाणातच नेहमी मिळू शकेल. नि हेच तत्व बहुसंख्यांकाच्या विषयातसुद्धा अर्थातच अशाच रीतीने लागू असेल.

ह्याच्याही भरीला प्रत्येकी एक मत' या निर्भेळ राष्ट्रीय तत्वावर असलेली संयुक्त मतदार संघ असलेली राज्यघटना न आधारता, जातवार विभागणीचे तत्व मानले तरी ज्या

अल्पसंख्याकाच्या विभक्त मतदारसंघ नि राखीव प्रतिनिधी-संख्या पाहिजे असेल त्यांना ती मिळेल; मात्र केवळ त्यांच्या संख्येच्या प्रमाणात आणि ह्याच अटीवर की लोकसंख्येच्या प्रमाणात यथाप्रमाण प्रतिनिधीत्वाच्या बहुसंख्यांकांच्या अधिकारांची हानि होणार नाही.

वरीलप्रमाणे औदार्यपूर्ण तत्वाधिष्ठित रूपरेखा असलेली घटना बनविल्यास मुसलमाना-व्यतिरिक्त ख्रिस्ती, पारशी, ज्यू नि इतर अल्पसंख्यांकांचे पूर्णसमाधान होईल असा मला विश्वास वाटतो. कारण ख्रिश्चन नि ज्यू आणि विशेषतः पारशी हे सांस्कृतिक दृष्ट्या अतिशय संलग्न नि देशाभिमानी आहेत नि अँग्लोइंडियन समंजस आहेत, त्यांना हे पटल्यावाचून राहणार नाही की राष्ट्र सुरक्षित राखण्यासाठी राष्ट्रीय सार्वभौमता, एकात्मता नि राष्ट्रीय सामर्थ्य या विषयात कोणतीही घटना घेतली तरी ती वरील मर्यादांपलीकडे जाऊ शकत नाही. बहुसंख्यांकांहून भिन्न असे अल्पसंख्यांकांचे विशेष अधिकार संरक्षणासाठी वर निर्दिष्ट केलेल्या सूचना पुरेशा आहेत हेही या इतर अल्पसंख्यांकाना समजेल, पण जी अल्पसंख्य जाति राज्यात फूट पाडण्याचे गुप्त हेतु बाळगते. राज्याचे पोटात दुसरे स्वतंत्र राज्य करू इच्छिते किंवा राष्ट्रीय राज्य उलथून टाकून इतर सर्वांवर वर्चस्व गाजवू पाहते; त्या जातीकडून एकावर एक वाढत्या मागण्या, मांसाचा अगदी शेवटचा रत्तल मागण्यापर्यंत सारख्या येत राहणार हे निश्चित. सुदैवाने मुसलमानांव्यतिरिक्त इतर आताच निर्देश केलेल्या अहिंदू अल्पसंख्य जातींपैकी कोणीही आपले देशबांधव असले राष्ट्रघातकी व्यूह मनात बाळगीत नाहीत वा त्यांना थारा देत नाहीत. मुसलमानांसंबंधी मात्र असा विश्वास बाळगता येत नाही. आणि म्हणून त्या विषयात वेगळा व्यवहार कसा करावयाचा हे मागाहून पाहीन.

ख्रिस्ती ज्यू आणि पार्शी लोकांच्या हितसंबंधांशी जिचा गंभीर अशा प्रकारचा ‘संबंध‘ विशेषेकरून निगडित आहे; अशा, ह्या संबंधातील महत्वपूर्ण गोष्टीचा उल्लेख (त्यांना) साह्यभूत होण्यासाठी धीटपणे करणे भागच आहे. मुस्लिम अल्पसंख्यांकांनी आखलेल्या राष्ट्रद्रोही आणि आक्रमक संकल्पित योजना, केवळ हिंदूनाच नव्हे, तर सर्वच मुस्लिम नसलेल्या जनतेला भयानक हानिकारक आहेत हे इतके उघड आणि स्पष्ट आहे की ह्यासाठी वेगळ्या स्पष्टीकरणाची आवश्यकताच उरत नाही. हिंदुस्थानातील राजकीय नि सांविधानिक सुधारणा आणखी प्रगति होऊ नये एतदर्थ, ब्रिटिशांनी रोखून धराव्यात किंवा अडवून ठेवाव्यात म्हणून त्यांना तशी संधी देण्यासाठीच, केवळ, मुस्लिम अल्पसंख्यांकांचाच, राष्ट्रघातकी कारवाया करण्याकडे रोख असतो. पण त्या अपराधाचे विशेषत्वे त्यांचेच असलेले उत्तरदायित्व झटकून टाकण्यासाठी शत्रूची दिशाभूल करण्यासाठी जशा छलकपटपूर्ण योजना आखतात त्याप्रमाणेच, मुस्लिम, नेहमीच इतर अल्पसंख्यांकांना, त्यांनी पाठिंबा द्यावा म्हणून आपल्याबरोबर फरपटत नेण्याचा प्रयत्न करतात आणि सर्व अल्पसंख्यांक मुस्लिम लीगने पुढे मांडलेल्या राष्ट्रद्रोही मागण्यांच्या विषयात तडजोड न स्वीकारण्यासंबंधात मुस्लिमांच्या इतकेच हट्टाग्रही निश्चयी आहेत ह्यावर जगाने विश्वास ठेवावा अशी कांक्षा बाळगतात. साऱ्या अहिंदु अल्पसंख्याकांचे आपणच काय ते रक्षणकर्ते कैवारी

आहोत अशी बतावणी लीग नेहमीच करू इच्छिते परंतु ख्रिस्ती, ज्यू ह्यांचे आणि त्याहीपेक्षा सर्वाधिक पार्शी बांधवांचे आम्हां हिंदूंशी शतकानुशतके अत्यंत प्रेमाचे सौहार्दपूर्ण सलोख्याचे संबंध आहेत; ही वस्तुस्थिती आहे आणि ह्या मुस्लिम नसलेल्या अल्पसंख्यांकांनी कधी राष्ट्रविरोधी किंवा अवाजवी अयोग्य अधिकार मागितले नाहीत किंवा आपले राजकीय महत्व ठसविण्यासाठी त्यांनी कधी धर्मवेडापायी दंगे करणे किंवा राजकीय गुंडगिरी करणे असले थेर आणि चाळे केले नाहीत. म्हणून ख्रिस्ती, ज्यू, पार्शी आणि अशाच अन्य, मुस्लिम नसलेल्या अल्पसंख्यांकांना माझी आस्थेवाईक सूचना अशी असेल की, त्यांनी उघडपणे आणि निश्चितपणे लीगच्या संकल्पना ह्या आमच्या नव्हेत असे सांगांवे; त्या स्वीकारू नयेत. 'अल्पसंख्य' ह्या परिभाषेची आवई उठवून, भ्रमात टाकून, दिशाभूल करणाऱ्या खोडसाळ मुस्लिम लीगबरोबर एकत्र गोवले जाण्यास विरोध करावा; आणि मुस्लिम लीगला सांगून टाकावे की, मुस्लिम लीगने त्यांच्या वतीने सर्वसाधारणपणे काहीही बोलू नये आणि सर्वोपरी त्यांनी आपापल्या संबंधित राजकीय संघटनांच्या द्वारा, निश्चितपणे, घोषित करावे की पूर्णपणे आणि समाधानपूर्वक हिंदूंबरोबर, उपर्युक्त शर्तींवर एक समाईक राष्ट्रीय आघाडी बनविण्याची त्यांची इच्छा आहे. जर मात्र, ख्रिस्ती, ज्यू, पार्शी आणि अन्य मुस्लिम नसलेले अल्पसंख्यांक आणि हिंदू, हे एकाच समान जाणिवेने, एकच समाईक आघाडी, कोणतीही भावी वर्तुळ परिषद किंवा घटनात्मक सभा, जी काय बनविली जाईल, तिचा स्वीकार करतील, तर मुस्लिमांना ते अगदी एकटे एकाकी पडल्याचे दिसेल आणि मग अल्पसंख्यांकांच्या प्रश्नाविषयी त्यांचे बोलणेच खुंटून जाईल; मात्र, त्यांचे राष्ट्रघातकी आणि धर्मोन्मादाने दृढतापूर्वक अधिकारांविषयी केलेल्या मागण्यांच्या विषयातले उत्तरदायित्व त्यांचे त्यांनाच घ्यावे लागेल. निवडक अल्पसंख्य असण्याविषयींच्या वल्गना आणि त्यांच्या राजकीय महत्वाविषयीची तसेच सामान्यतः हिंदी लोकांमध्ये, ऐतिहासिक परंपरा प्राप्त, अप्रतिम सर्वश्रेष्ठत्वाविषयीची त्यांची भयसूचक संकेत देणारी दर्पोक्ति ही आमच्या ख्रिस्ती, ज्यू, पार्शी ह्यांना आणि अन्य देशबांधवांनासुद्धा, त्यांचा उपमर्द करून दिलेले आव्हानच होय.

## हिंदुमहासभा आणि काँग्रेस

७) आता ही वेळ नाही, स्थलही नाही आणि माझा तसा विचारही नाही की, खिलाफतीच्या आंदोलनापासून गांधीनी आणि त्यांच्या संप्रदायातील त्यांच्या तालावर नाचणाऱ्या कच्छपी लागलेल्या अन्य पुढाऱ्यांनी त्यांच्या एकतंत्री एककल्ली अधिसत्तेखालील हुकूमशाही, काँग्रेसने जे भयंकर दुस्सह प्रमाद केले; त्याविषयीचे तिच्याविरुद्ध आरोपपत्र मी सादर करावे जे कस्पटासमान लेखले गेले; उपेक्षिले गेले; ज्यांच्या विरोधात निषेधही केले गेले अशा लो. टिळक, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद प्रभृति हिंदूंच्या प्रमुख नेत्यांनी पदोपदी ज्या चुका केल्या त्यामुळे हिंदु जगत् अधिकाअधिक दुर्बल आणि अवमानित होत आलेले आहे, त्यांच्या अपराधांची तीव्रता नि

त्या चुकांचे गांभीर्य लक्षात घेता, त्यांची कठोर शब्दात निर्भत्सना करणेच खरे तर आवश्यक आहे. तथापि तसे करण्याकडे माझा कल नाही. कारण आपल्या मातृभूमीची निरतिशय सेवा, त्यांच्यापैकी काहीजणांनी केलेली आहे आणि त्यांचा हेतु शुद्ध होता हे मी जाणून आहे. दुराग्रही अट्टाहासाने त्यांनी, जे पुन्हा पुन्हा सांगितले, त्या भ्रान्तिमूल चुकीच्या धोरणाचे उत्तरदायित्व त्यांच्या हेतूकडे नव्हे, तर त्यांच्या निर्णयशक्तीकडे आणि तो एकच एक दुराग्रह कवटाळणाऱ्या वेडाने झपाटलेल्या त्यांच्या चक्रमपणाकडे आणि त्यामुळे अंगीभूत अपात्रता ह्यांच्याकडे जाते. त्या धोरणाने हिंदूंच्या हितकारणांची अगणित हानीच केलेली आहे. आणि त्या धोरणाला शह देऊन त्यावर मात केली गेली नाही तर मात्र ते हिंदुजगताचे वैधानिक हितसंबंध उद्ध्वस्त करूनच नव्हे तर 'हिंदी राष्ट्रा'चे अत्यंत महत्वाचे हितसंबंध नि ज्यांविषयी काँग्रेसला प्रेम आहे. आणि जे काँग्रेसच काय ते समजू शकते तेही उद्ध्वस्त करून; हिंदु जगताला अभूतपूर्व भयानक अशा संकटाच्या खाईत लोटेल आणि हिंदी राष्ट्रालाही!

म्हणून खिलाफतीच्या चळवळीचे यथार्थत्व रंगरूप आणि ती 'का, काय नि कशी' हे जाणण्यात काँग्रेसवाल्यांनी केलेल्या अत्यंत भीषण दुस्सह चुकांच्या स्मृतींचे व्यर्थ सूक्ष्म निरीक्षण करण्यासाठी नव्हे; तर येऊन ठेपलेल्या अशाच प्रकारच्या संकटाच्या विरोधात सावधानतेची सूचना देण्यासाठीच काय तो त्या दुर्दैवी चळवळीच्या अनुषंगाने, गांधीवादी राजकारण्यांच्या प्रवृत्तिसंबंधीच्या प्रत्यक्षात घडलेल्या काही गोष्टींचा उल्लेख केलाच पाहिजे. महनीय टिळकांनी पूर्वसूचना दिलेली असतांनासुद्धा मुस्लिमांचे सांत्वन विशुद्ध जातीय, धर्म पंथीय आणि राष्ट्राच्या भूप्रदेशांपलिकडील खिलाफतीच्या विवाद वादंगात काँग्रेसला गांधीजींनी सोपवून दिली आणि 'स्वराज्या'चा प्रश्न खिलाफत पकरणापेक्षा गौण मानला पाहिजे, इतकेच सांगून ते थांबले नाहीत तर खलिफाला सहाय्य करणे हे हिंदूंचे धार्मिक कर्तव्य आहे असे प्रतिपादन करण्यापर्यंत त्यांनी  मजल मारली; आणि तरीसुद्धा त्याच काँग्रेसच्या नेत्यांनी निझाम नागरी प्रतिकार आंदोलनाचा प्रतिषेधच केला; असे नाही तर त्या आंदोलनाला स्पर्श करण्यापासूनही काँग्रेसवाल्यांना रोखले; का तर ते आंदोलन म्हणे अपवित्र होते आणि हिंदूंच्या धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकारांविषयीच्या मागण्या घेऊन उभे होते म्हणून ते जातीय आहे असा उघडउघड दोष देऊन तद्विरोधात बोलत राहिले! तेवढ्यानेच भागले नाही तर आपले शब्द खरे करण्यासाठी काँग्रेसी हिंदु पुढारी केवळ खिलाफत पकरणात स्वराज्याचा प्रश्न त्यापेक्षा गौण आहे हे भाषालंकाराच्या बाजू पुरतेच नव्हे; तर अमीर अमानुल्लाखानाने हिंदुस्थानवर चाल करून यावे (आणि तसा तो चाल करून आलाही!) म्हणून ज्यांनी आग्रह धरला त्या मुस्लिमांशी अगदी हात आणि मोजाइतके घनिष्ट संबंध बाळगून होते. स्वामी श्रद्धानंदांचा शब्दच आमच्याकडे आहे. स्वामीजींनी आपल्या 'लिबरेटर' ह्या नियतकालिकामध्ये उघड उघड त्यांचा निषेध करण्यासाठी लिहून त्यासोबत, अमीराला पाठविलेल्या तारेचे गांधींच्या हस्ताक्षरातील प्रारूप- जे स्वामीजींना, मौ. महंमद अलींनी पाठविले होते ते- आणि इतर कागदोपत्री पुरावा पकाशित केला. स्वतःच्या

'यंग इंडिया'त गांधींनी मान्यच केले की अफगाण जर यशस्वी झाले, तर हिंदुस्थानात, ते त्यांचे राज्य निश्चित स्थापन करणार पहाः यंग इंडिया- (१|६|१६९२१) आणि तरीही ह्या काँग्रेसवाल्या हिंदू नेत्यांनी आपण होऊन अफगाण स्वारीला उत्तेजन देण्याच्या उघड उघड आणि गुप्त कार्यात मुस्लिम नेत्यांची संगत सोडली नाही; तर उलट ह्या घातकी अफत्यास पाठिंबा देण्याचे वचन दिले. गांधीजी त्यांच्या 'यंग इंडियात (४|५|१९२१) लिहितात- अफगाणचा अमीर जर ब्रिटिशांच्या विरुद्ध युद्ध छेडणार असेल तर मी निश्चितपणे त्याला अर्थ पूर्ण सहाय्य करीन- माझ्या देशबांधवांना सांगत राहीन की सरकारला केलेले सहाय्य हा अपराधच होय! इत्यादी ह्या भानगडीत त्यांनी किती लांबचा पल्ला गाठला होता; हे तुम्हाला पहायचे झाले; तर पुण्याच्या श्री. करंदीकरांनी नुकतीच पकाशित केलेली पुस्तिका अवश्य वाचा; जी त्यावेळचे काँग्रेसचे पुढारी आणि गांधीजी ह्यांच्या भाषणांच्या आणि 'यंग इंडिया'तील लेखांच्या मुळातील वेच्यानी, परिपूर्ण आहे. अत्यंत थक्क करणारी लक्षणीय नोंद घेण्यायोग्य वस्तुस्थिती म्हणजे ह्या हिंदू नेत्यांनी, ''जर अमीर दिल्ली सर करण्यात यशस्वी झाला तर ते आम्हीच जिंकलेले स्वराज्यच होय'' असे प्रतिपादन करण्यात अलीबंधू, 'राष्ट्रीय' मौलाना आझाद आणि अन्य मुस्लिम नेते ह्या सर्वांवरही अगदी कडी केली आहे. कारण त्यांनी निश्चितपणे असे विशेषत्वाने सांगितले आहे की 'अफगाणांचे 'ते' राज्यच 'स्वराज्य' होय! -''आम्ही हिंदू मुसलमान एक आहोत- एक अविभाज्य अभेद्य राष्ट्र!'' गांधींच्या पंथातील हिंदू नेते मला भेटण्यासाठी जेव्हा कारागृहात येत तेव्हा त्यांच्याशी झालेले वार्तालाप मला चांगले स्पष्टपणे आठवतात. लाहोर हस्तगत करण्यासाठी स्वारी करणाऱ्या अमीराच्या सेनांची ते किती आशाळभूतपणे वाट पहात होते! एवढं सगळं करूनही तुर्कांनी स्वतःच खिलाफतीचे यथायोग्य शिरकाण केले! फारच छान! आणि दिल्लीचा बादशहा सम्राट होण्याच्या स्थली एका 'बच्चा साकू' ने अमीर अमानुल्लाला, सिंहासनावरून खेचून काढले. त्या तिथे! काबूल मध्येच! ...आणि खिलाफतीच्या आंदोलनाचे हिंदुस्थानला जे फळ भोगावे लागले; ते होते- अखिल हिंदुस्थानातील 'हिंदी' मुसलमानांमध्ये तीव्रतेने उफाळून आलेले अखिल मुस्लिमजगताची धर्मांधता- 'धर्म' वेड! ज्याला हिंदूंनीच, आपण होऊन, चिथाविले, मथविले; सहाय्य दिले, -खतपाणी घातले; त्या ह्या त्यांच्या मूर्खपणाचे, प्रेमाचे, अपार मूल्य, त्यांना मलबार, कोहट, पंजाब, बंगाल मध्ये, त्याचवेळी नि तिथल्या तिथेच, चुकते करावे लागले आणि ते जर नि जोपर्यंत प्रतिकार करणे शिकणार नाहीत; तर नि तोपर्यंत आणखी पुढेही चुकते करावेच लागेल! गांधीजींची भावनाशीलता नि विचारशक्ती ह्यांचे जे केंद्रस्थान तेच, खिलाफतीने ग्रासले असतांना, लंडनच्या दि डेली एक्स्प्रेस'च्या वार्ताहराला दिलेल्या उत्तरात, ''अफगाणांचे धर्मवेड्या दंगलखोर अफगाणांचे शांतिपूर्ण नागरिकांमध्ये परिवर्तन करण्यासाठी'' गांधीजींनी आपली योजना उघड करून सांगितली ती अशी की, ''मी चरख्याची ओळख अफगाणी जाती-जमातींना करवून देऊन तो त्यांच्यात घुसडून देईन; म्हणजे तो त्यांना हिंदी भूप्रदेशावर हल्ले करण्यास

प्रतिरोधील. त्या जनजातिजमातीतील माणसेही त्यांच्या स्वतःच्या रीतीपद्धतीनुसार देवभीरु' माणसेच आहेत.''

होय, तर! ''त्यांच्या स्वतःच्या रीतीपद्धतीं-नुसार!! तेच तेच तर, तापदायक आहे. कारण 'देवभीरु'पणाची त्यांची रीत-पद्धत आम्ही, सिंधपासून काश्मीर पर्यंतच्या सीमान्त रेषेवरील, भूप्रदेशातील*त्यांनी पेटवून दिलेल्या हिंदूंच्या जळत्या वसतिस्थानांच्या अक्राळविक्राळ चितापकाशात मर्मज्ञतेने पाहू, जाणू शकतो; मात्र हिंदूंच लुटले गेले. केवळ हिंदूंनाच ठार मारण्यात आले. हिंदु स्त्री पुरुषांचेच, केवळ, अपहरण करण्यात आले!!! अपीचा फकीर हा सुद्धा त्याच्या रीतीपद्धतीनुसार देवभीरु माणूस नाही काय? आणि हिंदुस्थानावर त्यांनी हल्ले करु नयेत म्हणून त्यांचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी तो चरखा! किती शतकानंतर महाराज? आणि इतक्या मध्यंतरात आम्ही हिंदूंनी काय करायचे? आकर्षक चरखे हातात घेतलेल्या सुकुमार रमणींच्या झुंडी सीमांच्या परिरक्षणार्थ नियुक्त करावयाच्या का? जसे गांधीजींनी अगदी गंभीरपणे वर्तुळ परिषदेच्या एका बैठकीत सुचविले होते त्याप्रमाणे---!

बरे! तर सभ्य गृहस्थ हो! ह्या मोजक्याच गोष्टी ज्या मी उल्लेखिल्या त्या काही सहज आपले काहीतरी बोलायचे म्हणून बोललेल्या नाहीत; तर अजूनही जे कॉंग्रेसचे शिरोभागी आहेत; कॉंग्रेसचे नियंत्रक किंवा सुकाणूधारी कर्णधार आहेत अशा हिंदू नेत्यांची 'मानसिकता' नि 'तत्वप्रणाली' ह्यांची वास्तविकता, आपण जाणीवपूर्वक ओळखली पाहिजे; अशी माझी उत्कट अपेक्षा आहे. ना गांधी, ना नेहरू, छे! सुभाषबाबूही नव्हेत की रॉयही नव्हेत; तर ज्यांनी गांधीवादी विचार संप्रदायाच्या उपर्युक्त 'थेर, वेडं किंवा लहरी ह्यांपैकी कशालाही कोणच्याच पकारे हातभार लावला नाही की त्यात भर घातली नाही; पण जे अजूनही गांधीवादी संप्रदायाचे भाबडे भक्त अनुयायी आहेत त्यांना मी त्या विचारप्रणाली चे त्या संप्रदायाचे, बळी म्हणतो की जी विचारप्रणाली त्यांना त्या मुसलमानांना आणखी काही मागण्याची इच्छाच होणार नाही. इतके, भरभरून द्या; त्याचेच काय ते, पाल्हाळ लावतो. ती विचारसरणी हाच राष्ट्रवाद आणि पांडित्य चातुर्य ह्यांचा एक महत्वाचा गूढ विषय असल्याविषयी त्यांचा आस्थेवाअक विश्वास असेल! पण, ज्या तुम्हांला हिंदुमात्रांना दास्यत्वात ढकलून डोळे वटारून त्यांच्याकडे पाहात केलेली त्यांची मानखण्डना पाहण्याची इच्छा नाही, त्या तुम्हालाही तसाच विश्वास वाटतो काय? जर तसा निश्वास वाटत नसेल तर मग आपण ह्याच त्या सभ्य मंडळींना प्रतिनिधी म्हणून निर्वाचित करून, हिंदूंच्या नावाने येत्या वर्तुळ परिषदेत बोलण्यासाठी किंवा हिदूंच्या वतीने मुसलमानांशी एखादा नवा करार करण्यासाठी किंवा वायव्य सीमाप्रांताचे दैव, ही खान बंधूंच्या जे तिकडील कॉंग्रेसचे पूर्णाधिकारी आणि गांधीजीनी प्रशस्तिपत्र दिलेले त्यांचे सैन्याधिकारी -जसे एकदा 'अल्ली'बंधू होते! -त्यांच्या हाती सोपविण्यासाठी प्राधिकार देऊन पाठविणार आहात काय? ज्यांचे हिंदुत्व -हिंदुपण, लोप पावलेले नाही; तरी पण, जे आंधळेपणाने अंगवळणी पडलेल्या गुणदोष

विशेषांमुळे अजूनही काँग्रेसच्याच मागे जात आहेत, अशा सहस्रावधी हिंदूंनी सुद्धा ह्या प्रश्नांचा शक्यतो गांभीर्यपूर्वक विचार करावा असे आवाहन मी त्यांना करीत आहे.

खिलाफतीनंतर रिक्त धनादेश आले. नंतर जातीय निवाडे आले. स्मृतिभ्रंशाने पछाडलेले काँग्रेस नेते कधी कधी त्याविषयी उलटसुलट बोलत राहतात. पण 'ते' त्यांनी कधीच निश्चितपणे नाकारलेले नसते, तर सदैव 'ते' स्वीकारलेले वास्तवच असते जे त्यांनीच केलेले समाधान, 'तुष्टीकरण' असते. त्यानंतर मग सर्व प्रांतातील काँग्रेसी मंत्र्यांनी काढलेल्या परिपत्रकांचा पूर लोटला. उदाहरणार्थ श्री. पंत मुसलमानांना अन्य गोष्टीसंबंधीही आश्वस्त करीत असतांना जे काही म्हणाले ते त्यांच्याच शब्दात मी पुन्हा सांगतोः बाराबंकी येथे, मोहरमच्या संपूर्ण कालावधीत हिंदूंच्या मंदिरामंदिरातून केल्या जाणाऱ्या आरत्या थांबविल्या; फुंकल्या जाणाऱ्या शंखांचे निनाद थांबविले आणि अन्य कित्येक स्थळी, होळीमध्ये हिंदूंना रंग खेळण्यापासून त्या हिंदूमध्ये आपल्या आपल्यात एकमेकांवर जे रंगीत पाणी टाकले जाई ते टाकण्यापासूनही रोखण्यात आले. मंडळ, जिल्हा दंण्डाधिकाऱ्यांवर जौनपूर येथे मुसलमानांनी हल्ला केला पण दोषी अपराध्यांना मुस्लिम लीगच्या कार्यवाहाच्या प्रशस्तीमुळे सोडून दिले. काँग्रेस शासनाने मुसलमानांना दिलेले जागांचे प्रतिनिधित्व एकूण लोकसंख्येच्या १४ प्रतिशत इतकेच जेमतेम, मुसलमानांच्या संख्याबलाच्या प्रमाणात येते. तरी पण, काँग्रेस शासनाने नियुक्त केलेल्या ४ जिल्हाधिकाऱ्यांच्यापैकी ३ मुस्लिम आणि १२ उपजिल्हाधिकाऱ्यांपैकी ८ मुस्लिम'' इत्यादी इत्यादी...

प्रत्येक हिंदुमात्राने जे साकल्याने वाचलेच पाहिजे; असे हे संयुक्त प्रदेशाच्या काँग्रेस शासनाने निर्गमित केलेले परिपत्रक! परम आत्मनिंदेची केवढी ही उत्कृष्ट रचना!! नि घोर सुकृती!!! मात्र मुस्लिमांमध्येच अंतर्गत गुप्ततेने फिरविलेल्या त्या ह्या आमच्या स्वीकारोक्तीच्या परिपत्रकाच्या काही प्रती; ज्यांच्या नावे जातीयवादी विद्रोही विश्वासघातकी म्हणून बोटे मोडली जातात त्या हिंदुसभावाद्यांनी पकडून मिळविल्या आणि पुनर्मुद्रित करून ध्वनिक्षेपित केल्या. स्थळाभावी मला मध्यप्रदेश मद्रास अत्यादि प्रांतांच्या काँग्रेस शासनांनी निर्गमित केलेल्या अन्य परिपत्रकांकडे निर्देश करण्यावाचून बाध्य केले असले तरी ती सर्व एकाच नमुन्याची मासले-वाईक बनावटीची आहेत; जी मुस्लिम लीगच्या न्यायसभेला कळकळीची विनंती करतात. त्यांचा अत्यंभूत अत्यर्थ हाच की ''खाविंद! (महाराज) जे जे हिंदूंना देय आहे; मिळावयास हवे त्या त्या पासून आम्ही त्यांना वंचित केले आहे. आणि मुसलमानांच्या अच्छेनुरुप हिंदूंना सर्वाधिक छलवलाने दडपून टाकून, मुसलमानांनी जिथे जे आणि जितके, मागितले तिथे तिथे त्यांना जे देय म्हणून मिळावयाचे त्यापेक्षा कितीतरी प्रचंड प्रमाणात दिलेले आहे. तेव्हा खाविंद! लीगने म्हणून आता संतुष्ट होऊन असे प्रमाणित करावे की, ''काँग्रेसी मंत्रीमंडळे ही सत्यत्वेकरून निःपक्षपाती आणि पूर्णत्वेकरून 'राष्ट्रीय' आहेत!!!''

आणि शेवटी २ वर्षे इतक्या प्रदीर्घ चिरकाल टिकलेल्या आणि ज्या जुलमी काँग्रेसी राजवटीत मुसलमान अतिशय गांजून जाऊन कण्हू लागले. तेथून सुटकेचा दिवस पाळताना मुस्लिम लीगने प्रमाणित केले की, ती एका परीने क्रूर जुलमी अधिसत्ताच होती. का? तर, त्या सर्व प्रांतांमध्ये जिथे जिथे मुस्लिम लीगचे संख्याबळ केवळ ७ ते १२ प्रतिशत होते. तिथे तिथे काँग्रेसने त्यांना कंजूषपणाने केवळ ४० ते ७५ प्रतिशत अतक्याच काय त्या मर्यादित प्रमाणात शैक्षणिक, आरक्षी आणि अन्य प्रशासकीय विभागांमधून ज्या जागा दिल्या गेल्या त्या त्या ठिकाणी शत प्रतिशत जागा, त्यांना त्यांची ऐतिहासिक महत्ता लक्षात घेता, ते मोगल बादशहांचे (सम्राटांचे) सरळ जातीय वंशज असल्याकारणाने मिळावयास हव्या होत्या! अगदी लॉर्ड झेटलँडनेसुद्धा आता नुकतेच ह्या महिन्यात मुस्लिमांच्या संग्रामशील गुणवत्तेचा उल्लेख केलेला नाही काय? नि मुसलमान पातशहांनी एकेकाळी हिंदुस्थानवर राज्य केले असल्याची काँग्रेसवाल्या हिंदूंना आठवण करून देऊन त्याद्वारे असेच सुचविलेले नाही काय की मुसलमान हिंदूंपेक्षा म्हणूनच उच्च उत्तम दर्जाच्या स्थितीत होते!

लॉर्डसाहेबांना, भाग्यवशच, त्यांच्या किशोरावस्थेत कोणत्याच मराठी प्राथमिक शाळेत धाडले नव्हते. नाहीतर मुस्लिम पातशाहीच्या कर्मगतीची आणखी थोडी जाण त्यांना आली असती आणि प्रतिशोध घेणाऱ्या हिंदूंच्या झुंडींच्या झुंडीनी शेकडो रणक्षेत्रांवर ह्या रणशूर युद्धमान मुस्लिमांच्या संग्रामशील सैन्यांना कसकसे कापून काढून त्यांचे तुकडे तुकडे करून टाकले आणि ह्याच त्या मोगल पातशाहीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून कसा पूर्ण पाडाव केला आणि हिंदूंचे स्वतंत्र साम्राज्य वाढविले. मुसलमान अधिसत्तेच्या राखेवर आणि त्यांनी मोंगल पातशहाला पकडून बंदी म्हणून आणि निवृत्ती वेतनधारक म्हणून पदरी बाळगले.

तरी परंतु, मुस्लिम लीगच्या ह्या अगदी आत्ता-आत्ताच्या हालचालींच्या विरोधात गदारोळ उठविण्यासाठी  आमच्या ह्या काँग्रेसी मित्रांचा तरी काही उपयोग नाही. आजचा मुक्ती दिवस हा काँग्रेसवाल्यांनी काल मोठ्या दिमाखाने साजऱ्या केलेल्या खिलाफत दिनाचा अगदी अवश्यंभावी, अटळ, अपरिहार्य असा तर्कशुद्ध परिणाम होय!

‘ते जितके अधिकाधिक मागतील तितके अधिकाधिक तुम्ही त्यांना द्याल. कपाळाला आठ्या घालीत ते जितकी जितकी आणखी आणखी अप्रसन्नता दर्शवितील तितके तितके त्यांना आणखी संतुष्ट करण्यासाठी त्यांच्या नाकदुऱ्या काढीत रहाल. ते जितके जितके म्हणून खिशात घालतील तितके तितके आणखी तुम्ही त्यांना देऊ करण्याची सिद्धता ठेवाल; ते जसेजसे आणखी आणखी कृतघ्न होत जातील तसतसे त्यांनी तुम्हाला धन्यवाद द्यावेत म्हणून, तुम्ही अधिकाधिक दुःखी, चिंतित, कष्टी होऊन त्यांना विनवण्या करीत, आर्जवे करीत त्यांच्यापुढे लोटांगणे घालीत रहाल अशा ह्या विश्वासाची दीक्षा जी मुसलमानांना दिली ती देणारे तुम्हीच तर आहात! त्यांना ‘कोरे धनादेश!‘ तुम्हीच देऊ केले नाहीत काय? आणि मग, ते आता, मुक्तीच्या भरपाई प्रित्यर्थ मागतील तेवढे मोल त्या धनादेशांवर लिहून भरले जाण्यास प्रारंभ होताच तुम्ही जे

विस्मित भयचकित होताहात ते कशासाठी? खिलाफतींच्या धोरणाच्या विरोधात तुम्ही दिलेल्या ‘कोऱ्या धनादेशांच्या‘ विरोधात ‘ना स्वीकार-ना धिक्कार‘ ह्यासारख्या तुमच्या वेडगळ लहरींच्या विरोधात हिंदु महासभेचे, भाई परमानंद, डॉ. मुंजे आणि अन्य नेते आक्षेप घेत राहिले; मतप्रदर्शन करीत राहिले आणि निषेध करीत राहिले! पण तेव्हा, तुम्ही त्यांना उघड उघड दोष देऊन त्यांची संभावना ‘दुष्ट जातीयवादी‘ म्हणून करीत होतात. ‘शिवाजी‘ आणि ‘प्रताप‘ ह्यांना वाट चुकलेले देशभक्त म्हणून त्यांचा तिरस्कार करीत होतात. का? तर ते खड्गाच्या जोरावर जिंकले!.. आणि तुम्ही! जणू काही तुमच्या रुपाने, प्रेमाने ंजंकण्यासाठी कोणी एक विजिगीषु आलेले आहात नि आतल्या आवाजाने थेट परस्परसंबंध ठेवून जगाचे मार्गदर्शन करणारे आहात! असे तुम्हीच घोषित केलेत! प्रकट केलेत की आपण नवीन ‘मसीहा‘ आहात! तर मग, आता किती दयनीय, कींव करण्यायोग्य, किंकर्तव्य मूढ अशा आपल्याला किती केविलवाणेपणाने गाठले आहे! कांकी एकट्या एका व्यक्तीच्या लीगच्या अध्यक्षाच्या तुष्टीकरणासाठी त्याला मात्र प्रेमानेच जिंकण्याचा मार्ग शोधण्यासाठी आपण आपल्यालाच योग्य मार्गदर्शनाअभावी आपण दुःखी कष्टी व्यथित होऊन तडफडत आहात! आणि म्हणून (ह्यातून बाहेर काढण्यासाठी) ब्रिटिश राज्यपालांनी (गव्हर्नरांनी) नि भारतमंत्र्यांनी (व्हाईसरॉयनी) उपचारार्थ उपायांचा वरदहस्त द्यावा! एतदर्थ, त्यांच्या द्वारी, काकुळतीने विनवण्या करीत आपण तिष्ठत रहावेत! अं!!

आणखी असे की, पुढे जेव्हा जेव्हां ब्रिटिश प्राधिकरणांनी किंवा पुढाऱ्यांनी हिंदुमहासभेच्या धोरणांच्या संदर्भात किंवा त्यांस अनुलक्षून एखाद दुसऱ्या ह्या किंवा त्या विषयासंबंधात गुणग्राहकतेची चुणूक दाखविणाऱ्या घटना घडल्या; तेव्हा तेव्हा आमचे हे काँग्रेसी राष्ट्रवादी सात्त्विक संतापाने मोठ्याने फुसकारत फूत्कार टाकीत असत, की ‘‘ह्या किंवा त्या विषयासंबंधात ब्रिटिशांनी ह्या जातीयवादी हिंदुमहासभावाल्यांच्या धोरणांचे गोडवे गावेत ही वस्तुस्थितीच ह्यांच्या देशद्रोही अपराधांना उघडकीस आणते! आणखी कोणत्या पुराव्याची गरजच काय? आणि आता काँग्रेसची मंत्रिमंडळे, मंत्रालये कशीही असली तरी, तितकीशी वाईट नव्हती आणि त्यांनी ब्रिटिशांच्या पसंतीत उतरेल अशी सेवा केलेली होती; हे सिद्ध करण्यासाठी, ब्रिटिश राज्यपाल आणि भारतमंत्री ह्यांच्याकडून प्रशंसापत्रे मिळवून ती जगाच्या तोंडावर भिरकावून (जणू काही अहिंसेची) तलवार परजण्यासाठी आणि समृद्ध होऊन निर्धास्त होण्यासाठी ह्या राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांमध्ये अहिंसक झोंबाझोंबी चालू आहे! आणि शिवाय सीमाप्रान्त बंगाल किंवा मलबारमध्ये मुसलमानांकडून केल्या जाणाऱ्या बलात्कार, विनयभंगाविरुद्ध वैधानिक संरक्षणाचे अधिकार जेव्हा जेव्हा ब्रिटिशांकडे मागितले, तेव्हा तेव्हा त्या कारणासाठी, ज्या काँग्रेसी नेत्यांनी हिंदुमहासभा-वाल्यांना दोष दिला, त्यांची निंदा केली तेच हे काँग्रेसी नेते आता मुस्लिम लीगने त्यांच्या विरोधात सादर केलेल्या एका गंभीर स्वरूपाच्या अभियोगात आपल्याला दोषी ठरवून घोषित केले जाऊ नये म्हणून आणि काँग्रेसची पत वाचवावी म्हणून उत्कृष्ट न्यायाधीश म्हणून राज्यपालांनी, भारतमंत्र्यांनी पंच म्हणून काम करावे ह्यासाठी त्यांच्या मिनतवाऱ्या

करीत, त्यांना विनंती आर्जवे करण्यासाठी त्यांचे उंबरठे झिजविण्याची परस्परांतच एकमेकांशी स्पर्धा करीत असावे हा केवढा विनोद! किती चमत्कारिक आणि ''आम्ही'' आणि ''आमचे मुस्लिम देशबांधव'' ह्यांच्यामध्ये असलेल्या अंतर्गत मतभेदाचे निरसन करण्यासाठी उपाययोजना करावी म्हणून ब्रिटिशांची त्या तिसऱ्या त्रयस्थ पक्षाची बाहेरच्या तिऱ्हाअताची विनवणी काकुळतीने करीत राहणे हा राष्ट्रद्रोह नव्हे काय?

काँग्रेसच्या अनेकविध प्रमादांचे दायित्व जिच्याकडे जाते; त्या काँग्रेसच्या स्वभावजन्य भ्रान्त विचारसरणीतूनच तिसरा त्रयस्थ पक्ष ही उपपत्ती बनलेली आहे, हे सूचक, उद्‌बोधक सुद्धा आहे. आणि म्हणून येथेच ते स्पष्टपणे निदर्शिणे आवश्यकही आहे. ''जर मुसलमानांना त्यांच्या पुरतेच राहू दिले असते तर त्यांनी राष्ट्रद्रोही अंतःस्थ गुप्त योजना हिंदुहित विरोधातील कट ह्यांना कधीही कुरवाळले नसते. मुसलमान -सर्वश्री जिना, हक मनसुख हयातखान यांच्यासह मनाने सरळ स्वच्छ निर्व्याज निरागस लोक कोणत्याही राजकीय युक्त्या-प्रयुक्त्या नि पळवाटांच्या विषयात अपात्र, नेणते, असमर्थ, शांतिप्रिय नि अल्लाचे भक्त हिंदूंच्या विरोधात त्यांना कसलीही राजकीय महत्वाकांक्षा नव्हती; इतकेच नव्हे तर सीमाप्रांतातील 'जमाती,' 'शूर मोपले बंधू,' बंगाल किंवा सिंधमधील मुस्लिम वस्त्या ह्यांनी हिंदूंवर केलेले भयानक बलात्कार, विनयभंगांनी जी तृप्ति मिळविली तिची त्यांना अगदी मुळीच रुचि नव्हती जरी ती त्यांच्या त्यांच्यातच जोपासली होती; पण ''तिसऱ्या त्रयस्थ पक्षाने ब्रिटिशांनी त्यांना हिंदूंच्या विरुद्ध किळसवाणे वाटावेत असे विद्रोह करण्यास जवळजवळ भाग पाडले. जेव्हा ब्रिटिशांचा प्रवेश झाला नव्हता. तेव्हा आम्ही हिंदू आणि मुसलमान अगदी पूर्णपणे स्नेहभावाने बंधुभावाने गुण्यागोविंदाने एकत्र रहात होता! आणि हिंदू मुसलमानांचे दंगे ही गोष्ट केवळ कधीही ऐकिवात नसलेली अशीच होती.'' असे सांगणे काँग्रेसवाल्यांचा नित्याचा छंद होता.

असे सहस्रावधी काँग्रेसवाले हिंदू पाहण्यात आहेत की, जे ह्या मूढतम, भ्रामक राजनैतिक विश्वासाच्या मोहजालात फसले गेले आहेत. जसे काही सगळ्या महंमदकासीमांना गझनींना, घोरींना, अल्लाउद्दीनांना औरंगजेबांना सगळ्याना हिंदुस्थानावर त्वेषाने स्वाऱ्या करून त्यांचा नाश करण्यास त्या तिसऱ्या त्रयस्थ पक्षाने- ब्रिटिशांनी चिथावणी दिली. प्रोत्साहन दिले! गेल्या दहा शतकातील हिंदुमुसलमानांमधील चिरस्थायी युद्धाचा इतिहास हा जसा काही एक प्रक्षिप्त मजकूर आणि कल्पित कथा होय! जसे काही ब्रिटिश उडाणटप्पूंनी वर्गातल्या मुलांना साखरेच्या गोळ्या देऊ करून, त्यांच्या शेजाऱ्यांच्या घरांवर दगडफेक करण्यासाठी त्यांची मने वळवून त्यांना बिघडवावे अशी तो अल्ली किंवा श्री. जिना किंवा सर सिकंदर ही केवळ शाळकरी मुलं होती! ते (काँग्रेसवाले) म्हणतात, ''ब्रिटिश येण्यापूर्वी हिंदू मुस्लिम दंगे ही ऐकिवात नसलेली गोष्ट होती''. होय! पण कारण दंग्यांच्या ऐवजी हिंदुमुसलमानांच्या लढाया हाच नित्याचा दिनक्रम होता!

पण एकवेळ समजून चालू की, गांधीवादी समर्थन करतात त्याप्रमाणे ''मुसलमानांना मूच्छित करून त्यांच्यात हिंदुद्रोही आणि राष्ट्रद्रोही प्रवृत्तींचे संमोहन करणारा हा तिसरा त्रयस्थ

पक्ष ब्रिटिश हेच संपूर्णपणे उत्तरदायी आहेत'' तर गांधी आणि गांधीवादी काँग्रेसचे सेनाधिकारी मुस्लिम लीगने काँग्रेसविरुद्ध केलेल्या अभियोगातील दोषारोपांप्रमाणे काँग्रेस खरोखरच अपराधी होती किंवा कसे, ह्याचा न्यायनिर्णय करण्यासाठी त्याच त्या 'तिसऱ्या त्रयस्थ पक्षाला'- ब्रिटिश राज्यपालांना नि भारतमंत्र्यांना त्यांनी पंच व्हावे म्हणून, त्यांनाच आवाहन कसे काय करतात? अपराध्यास चिथावणी देणारा, प्रोत्साहन देणारा सह-अपराधी काय उत्कृष्ट पंच असतो? ''अपराधाला प्रोत्साहन देणारा मार्गदर्शन करणारा मुख्य अपराधी'' असा ज्याच्यावर तुम्ही दोषारोप करता त्यालाच त्या अपराधाचे अनुसंधान करण्याची विनंती करताहांत! जर काँग्रेसची श्रद्धा खरीच असेल; ती भ्रममूलक नसेल तर मग ब्रिटिश निश्चितच पंच म्हणून असाच निर्णय देतील की जेणेकरून काँग्रेस आणि मुसलमान यामधील वैमनस्य वाढतच जाईल आणि परस्पर विश्वासाला खो बसेल, आणि जेणेकरून हिंदुमुसलमानांचे सामंजस्य परस्पर सौहार्द आणि ऐक्य वाढण्याच्या पुढील संभाव्य संधींनांच सुरुंग लागेल. आणि म्हणून मग, एक तर तुमची तिसरा त्रयस्थ पक्ष ही उपपत्ती (कल्पना) चुकीची आणि भ्रममूलक अंधविश्वासच होती. किंवा वात्रटपणा करणाऱ्या ''तिसऱ्या त्रयस्थ पक्षालाच'' पंच नेमून जवळीक साधण्याचे दुष्कृत्य, अफत्य तुम्ही उघडउघड केले आहे.

इस्लामी धर्म, 'एकेश्वरी सत्तावादा'च्या परंपरा आणि इतिहास ही मुसलमानांना त्यांच्या मूळच्या स्वाभाविक राजकीय इस्लामी सार्वभौमत्वाच्या महत्वाकांक्षेला स्फूर्ति देतात. ह्या सरळ साध्या वास्तविकतेची नोंद काँग्रेसी हिंदू जर योग्यरीतीने यथार्थत्वाने जरी घेतील; तरीही ते स्वतःला अशा प्रकारच्या विसंगत अफत्यांच्या सोपान श्रेणींपासून वाचवू शकतील! वेळ येईल तसे नि तेव्हा, ब्रिटिशांच्या हितसंबंधांना जे सोयिस्कर होईल ते ब्रिटिशांचे धोरण अर्थातच आगकाडीचे काम करते; पण हे दारूचे स्फोटक कोठार अस्सलपणे मुसलमानच! त्याला नियंत्रणेकरून कह्यात ठेवता येणे शक्य होते; पण त्याचे अस्तित्वच दुलक्षित करणाऱ्या आणि आगकाडी हेच कोठार आहे. असा विश्वास बाळगणाऱ्या आत्मवंचकासाठी दुःख शोक! आगकाडी जरी ब्रिटिश बनावटीची नसली तरी दुसरी कोणाचीही आगकाडी तोच हेतू सिद्धिस नेईल! एवढेच नव्हे तर त्या कोठाराचे चमत्कारिक विशेष लक्षण ते हेच की, स्वयंप्रेरित आगीनेसुद्धा नाश करणे! दुसरे असे की मुसलमान नको इतके अतिरेकी व्यावहारिक राजकारणी आहेत.

म्हणून सर्वसाधारणपणे ते उपजत स्वभावानुसार त्यांच्यापेक्षा प्रबळ असणाऱ्यांच्या -जरी मग तो त्यांचा वाईटातला वाईट वैरी असला तरीही -अधीन होतात; त्यांच्याशी सख्यत्व जोडतात आणि त्यांच्यापेक्षा दुर्बलांना सतत दरडावीत राहतात. हिंदुस्थानात आणि अन्यत्रही कुठे कुठे इंग्लंडने त्यांना जिंकून त्यांचा वंश, जात ह्यांना आज्ञांकित प्रजाजन म्हणून बदलविले नाही काय? पण आज अग्लंड दोघांहून अधिक शक्तीशाली आहे. आणि म्हणून ते इंग्लंडचे लांगूलचालन करतील आणि हिंदूंच्या विरोधात आपली भरभराट करीत राहतील! जर उद्या हिंदू त्यांच्यापेक्षा सवाई शक्तिमान झाले तर ते हिंदूंची सुद्धा हाजी हाजी करतील! आणि बंधुभावाने वागतील; जसे ते

महाराष्ट्रात आणि पंजाबात पेशव्यांच्या काळात किंवा रणजितसिंगांच्या काळात वागले! आणि म्हणूनच तेव्हा काँग्रेसचीच घोषणा उद्धृत करून, सांगावयाची तर ''त्या विगत दिवसांमध्ये हिंदु मुस्लिम दंगे ही ऐकिवात न येणारी गोष्ट होती!''

## लीगचा रिहाई (मुक्ती) दिवस हा काँग्रेसने सुधारणा दिवस म्हणून पाळणे

हाच प्रत्युपायाचा सर्वोत्तम मार्ग- अगदी मनःपूर्वक मी आपल्या काँग्रेसी बंधूंना विनंती करतो की लीगच्या हालचालीविरुद्ध त्यांनी गर्जना करण्याऐवजी किंवा शक्यतेच्या दृष्टीने- गांधीवादी गट जास्तीत जास्त काय करू शकतील तर डोळे वटारून केल्या गेलेल्या त्यांच्या आणखी मानखण्डना करून घेतील. त्यापेक्षा त्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले गेले आहे असे मानून जो धोकादायक मार्ग ते तुडवीत होते, त्यावरून आपले पाय नेहमीसाठी रोखून धरून मुसलमानांशी 'मुसलमान' म्हणून, आणखी कोणतेही व्यवहार करण्यास सरळ नकार दिला पाहिजे. 'हिंदी राष्ट्रीय सभेने' आपली प्राथमिक मूलभूत चूक सुधारावी आणि ती जसा अधिकार सांगते त्याप्रमाणे खऱ्या अर्थाने तिने हिंदी राष्ट्रीय सभा व्हावे. प्रादेशिक राष्ट्रवादाच्या आपल्या उदात्त तत्वाशी तिने पूर्णपणे सुसंगत असेच असावे आणि पुन्हा स्वच्छ पाटी घेऊन पुनश्च श्रीगणेशा करावा. ह्या तत्वांवरच ती अधिष्ठित असल्याचे तिने एकदांचे निर्णायक रीतीने पकटपणे सांगावे. पहिल्याप्रथम ती कोणाही मुसलमानाला मुसलमान म्हणून ओळखत नाही, किंवा ख्रिश्चनाला ख्रिश्चन म्हणून अथवा हिंदूला हिंदू म्हणून पण त्या सगळ्यांनाच ते सर्व हिंदी आहेत म्हणून काय ते ती पाहते आणि त्याच्याबरोबर व्यवहार करते आणि म्हणून सर्व नागरिकांना समान प्रत्याभूत मूलभूत हितसंबंधांव्यतिरिक्त अन्य कोणच्याही विशेष जातीय धार्मिक किंवा वांशिक हितसंबंधाच्या विषयांत तिला काहीही गम्य नाही.

दुसरे असे की, मतदार संघांच्या संबंधात 'प्रत्येक माणशी एक मत' ह्या विना अन्य कोणतेही (घटना बाह्य) तत्व ती स्वीकारीत नाही. आणि सार्वजनिक सेवांमध्ये मात्र गुणवत्ताच स्वीकारते. हिंदुस्थानातील चमत्कारिक विशेष स्थिती लक्षात घेता जातवार प्रतिनिधित्वाचा आश्रय करावयास झाल्यास अनुग्रहच करावयाचा असेल तर गुणवत्तेशी सुसंगत असे लोकसंख्येशी असलेल्या जातिनिहाय संख्याबलाच्या प्रमाणातच ते काटेकोरपणे दिले जाऊ शकेल. सार्वजनिक सेवांमध्ये सुद्धा ते लोकसंख्येच्या प्रमाणाचे नाते सांभाळण्यात येईल; मात्र जेथवर नि जोपर्यंत ते गुणवत्तेशी सुसंगत असेल तेथवर आणि तोपर्यंतच; असे ती मान्य करते.

तिसरे सर्वोपरी महत्वाचे म्हणजे जोपर्यंत खऱ्या अर्थाने राष्ट्रीय आणि न्याय्य असे संविधान आपल्याकडे नाही; तोपर्यंत हिंदुस्थानच्या जनतेच्या एकात्मतेत, बुद्धि-पुरस्पर बाधा नि विभेद निर्माण करण्यासाठीच आणि केवळ जातवार विभागणीच नव्हे; तर जी बहुसंख्य समाजाला

अन्याय्य हानिकारक आहे; आणि अल्पसंख्य मुसल-मानांना अखिल राष्ट्राच्या विरोधात कारवाया करण्याची चिथावणी देणे हेच जिचे उद्दिष्ट आहे; अशा घटनेनुसार होणाऱ्या निवडणुका मग त्या कोणत्या का असेनात त्यात सहभागी होण्याचा मोह काँग्रेसने टाळावा. जोपर्यंत 'मुस्लिम' आणि सर्वसाधारण म्हणजे 'हिंदूंचाच एक' असे वेगळे मतदार संघ आहेत, तोपर्यंत मग मुस्लिम लीग आणि हिंदुमहासभा ह्यांना निवडणुकात भाग घेऊ द्यावा आणि काँग्रेसने निवडणुकांपासून ती सर्वश्रेष्ठ हिंदी राष्ट्रीय सभा असल्याकारणाने दूर रहावे. आणि आपल्या पदाच्या प्रतिष्ठेला कोणत्याही विशिष्ट जातीय मतदार संघाशी तिचा संबंध असल्याची ओळख देऊन उणेपणा आणू नये.

पण काँग्रेसने जर एकवटून धैर्य धरले (हिंदुविरोधी भूतकाळ पुसून टाकला) हिंदूंचा द्रोह करणाऱ्या पूर्वीच्या चुका सुधारल्या, हिंदुद्रोही आणि राष्टद्रोही दृष्टिकोन आणि वर्तन ह्यांचा त्याग केला आणि मी वर सुचविलेली भूमिका स्वीकारली तर खरीखुरी 'राष्ट्रीय संघटना' म्हणून काँग्रेसच्या प्रतिष्ठेत लगोलग, अधिकच भर पडेल. प्रतिष्ठा वाढलेली असेल. तसे झाले तर ती, काही झाले तरी हिंदुमहासभेचा अगदी मनपूर्वक विश्वास पुन्हा संपादन करील.

हिंदु मतदारसंघांच्या वतीने निवडणूक जिंकायची आणि राष्ट्रवादी म्हणून हिंदूंच्या वैधानिक न्याय्य हितसंबंधाची खिरापत शत्रूंच्या स्वाधीन करायची हा दुटप्पी खेळ ती कोणत्याही कारणाने चालू ठेवू शकत नाही. सशाची शिकार, करायची शिकारी कुत्र्याकडून आणि पळून जायचं तोच ससा घेऊन! हे फारकाळ शक्य नाही. अन्यथा तिच्याकडे ती हिंदूंची संस्था आहे. ह्याच दृष्टीने मुसलमानांना पहात राहणे भाग पडेल; नि तेही बरोबरच आहे म्हणा! पण त्याचवेळी ''हिंदुहितकारणाला तो जसा आणि जितका भयावह आणि हानिकारक; तसा नि तितकाच भयावह आणि हानिकारक असा हा एक कृत्रिम राष्ट्रवादी उपद्रव आहे म्हणून हिंदूही तिचा तिरस्कार करतील''.

काँग्रेस आपले डोळे उघडून पाहील नि वस्तुस्थितीची तिला खरीखुरी जाण येईल अशी आशा मी धरावी काय? अगदी आता जरी ती अजून तसे करील. तरीही काही तसा फारसा उशीर झालेला नाही! पुण्याच्या मराठामध्ये माझे मित्र श्री. केतकर ह्यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे काँग्रेसने प्रत्युपाय म्हणून लीगच्या रिहाई' दिवसाच्या ठायी, सुधारणा दिवस पाळावा. वर सुचविल्याप्रमाणे यथार्थत्वाने राष्ट्रीय अशी आपली राष्ट्राभिमुखता उद्घोषित करावी. आणि लीगबरोबरचा पुढील पत्रव्यवहार बंद करण्यासाठी त्यांना अंतिमोत्तर ह्या शब्दात लिहून धाडावे की महाशय 'याल तर तुमच्यासह' न याल तर तुमच्यावाचून आणि विरोधाल तर तुम्हाला न जुमानता आमचा हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी शक्यतेच्या कमाल मर्यादेपर्यंत चांगलीच झुंज तर आम्ही देतच राहू!'

आणि यदाकदाचित आमच्या मुस्लिम मित्रांना त्यांचे अधिकार निश्चित ठरवून घ्यायचे असतील आणि त्यासाठी त्यांना राजनियुक्त आयोग (रॉयल कमिशन) हवा असेल, तर मग

कसलीही तडजोड न स्वीकारता काँग्रेसने त्यांना सांगू द्या की, बाबांनो, जर तुम्हाला स्वतंत्र मध्यस्थाचाच आश्रय घेणे असेल तर त्यासाठी त्या प्रकारचे सर्वोच्च न्यायाधिकरण केवळ राष्ट्रसंघच असू शकते आणि त्यांनी साऱ्या विश्वासातील अल्पसंख्यांकांच्या अधिकारासंबंधीचा सार्वजनिक निर्बंध आधीच बनविलेला आहे. हिंदी अल्पसंख्यांकांचे पकरणसुद्धा त्या संघाकडे निर्णयार्थ पाठवावे. वास्तविक काँग्रेसने ही ठाम भूमिका, शक्यतो तडजोड न करता आणि डॉ. मुंजे ह्यांनी ह्याआधीच वर्तुळ परिषदेत सुचविल्यानुसार घेतली असती तर मग प्रवाहपतित व्हावे लागून, गोष्टी ह्या अक्राळ विक्राळ दारूण दुर्गती प्रत कधीच येऊ शकल्या नसत्या!

८) निवडणुकीचे घोषणापत्रक काढावयाच्या वेळी हिंदुमहासभेला आपल्या आर्थिक धोरणासंबंधाचा कार्यक्रम सविस्तर आखावा लागेल. सध्या मी काही सामान्य तत्त्वे सुचवून ठेवणे एवढेच काय ते करू शकतो. स्थलाभावामुळे अधिक विस्तार करीत नाही. प्रथम हे ध्यानात घेतले पाहिजे; की मनुष्य हा केवळ एक आर्थिक जीव नाही. 'मनुष्य हा केवळ भाकरीवर जगत नसतोच; असे ख्रिस्ताने म्हटले आहे ते समर्पक आहे. ते वचन जसे, आध्यात्मिक दृष्ट्या सत्य आहे; तसेच वांशिक सांस्कृतिक, राष्ट्रीय नि इतर अनेक मानवी स्वभावाच्या अंगांनाही ते लागू पडते. म्हणून सर्व मानवी व्यवहार नि इतिहास केवळ आर्थिक सूत्रात सामावू पाहणे हे सर्वस्वी एकांगीपणाचे आहे आणि त्याचा अर्थ असा होईल की, भुकेविना दुसरी कोणतीही जीवनाची प्रेरणा नाही.

भाकरीचा प्रश्न नि भूक ह्या व्यतिरिक्त तितक्याच मूलभूत अशा वैषयिक, बौद्धिक, भावनानिष्ठ इत्यादी अनेक इच्छा मनुष्याला आहेत. त्यातल्या, काही स्वाभाविक तर काही कृत्रिम, काही वैयक्तिक तर काही सामाजिक असून त्यायोगे मनुष्याचे जीवन नि तसाच इतिहास देखील संकीर्ण झाला आहे. मनुष्याला पोट आहे. पण पोट म्हणजेच केवळ मनुष्य नव्हे. म्हणून जगातील मनुष्यजातीस विभागणाऱ्या सर्व धार्मिक वंशविषयक राष्ट्रीय नि इतर वैरांचा निरास करण्यास आर्थिक हितसंबंधीचे बंधन हेच सर्वोत्तम साधन म्हणून कधी कधी सुचविण्यात येते ते केवळ वरवरचे नि अर्धवटपणाचे आहे. ज्या युरोपमध्ये या पंथाचे द्रष्टे निर्माण झाले आणि जेथे त्यांनी आपले उपदेशकार्य केले त्याचप्रमाणे जेथे सर्व मानवी संस्थांमध्ये क्रांती करून त्यांची आर्थिक साच्यात पुनर्घटना करण्यासाठी प्रचंड प्रयत्न झाले. तेथेही धार्मिक वंशविषयक नि राष्ट्रीय भेद विकोपास गेले आहेत. आणि शतकानुशतके आर्थिक हितसंबंधावर भर देऊन तेथे सतत प्रचार चालू असता, जर्मनी, इटली, फ्रान्स, पोलंड, इंग्लंड, स्पेन इत्यादी देशात हे धार्मिक वांशिक आणि राष्ट्रीय भेद दुर्दमनीयरीत्या पुढे येत आहेत. या एकाच गोष्टीवरून हे ध्यानात येईल की, सर्व धार्मिक वंशविषयक नि राष्ट्रीय घटक एका क्षणात नाहीसे करून टाकणे, तुम्हांस शक्य नाही. काही लोक असा सुलभ कोटिक्रम मांडतात की, ''सर्वांना एकाच आर्थिक भूमिकेवर एकत्रित करून वंश, संस्कृति इत्यादी भ्रममूलक भेद विसरून जाण्यास प्रवृत्त करणे जर शक्य झाले तर,'' इत्यादी पण हे लोक मुसलमानांचा विचार करीत नाहीत. तात्त्विक दृष्टि बाजूला ठेवून त्यांच्या

विधानातील ‘जर तर‘ या शब्दावरूनच व्यावहारिक दृष्ट्या ते व्यर्थ ठरते. यावरून सर्व हिंदुसंघटनावाद्यांनी ह्यास्तव साऱ्या हिंदुस्थानला भेडसावणाऱ्या सांस्कृतिक, वांशिक आणि राष्ट्रीय बिकट समस्या सोडविण्यासाठी केवळ आर्थिक कार्यक्रम पुरेसा पडेल या विश्वासाने मुळीच फसून जाऊ नये.

त्याचप्रमाणे त्यांनी हेही लक्षात ठेवावे की, हिंदुस्थानच्या सद्यःपरिस्थितीत आर्थिक प्रश्न देखील धार्मिक नि वंशविषयक विघटनांशी निगडीत झाले आहेत. हिंदुसंघटन क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या अनुभवावरून त्यास अशी सहस्रावधी उदाहरणे दिसून आली आहेत की, जे व्यवसाय मुसलमानांच्याच सर्वस्वी हाती आहेत. त्यात हिंदू प्रवेश करू गेल्यास त्यांचा छळ होतो. हिंदू पिंजारी किंवा टांगेवाला असेल तर त्याला मुस्लीमांकडून मारण्याचे भय दाखविण्यात येते. सीमाप्रांतातून मुसलमान लुटारू नगरे आणि गावे लुटतात तेथे नगारे वाजवून घोषणा करतात की, ‘‘आम्ही केवळ हिंदूनाच लुटणार. कोणा मुसलमान व्यापाऱ्याला वा सावकाराला हात लावणार नाही.‘‘ अशा प्रकारची शेकडो उदाहरणे दाखविता येतील. आता ह्या हिंदूंना तात्काळ संरक्षण नि साहाय्य करावयाचे तर हिंदू म्हणूनच त्यांची संघटना केल्यावाचून अन्य गती नाही. मुसलमान पोलीस हे मुसलमान म्हणून त्यांचे संरक्षण करीत नाहीत; हा एक धार्मिक, जातीय, वंशविषयक रोग आहे. अर्थवादी रामबाण गोळ्यांनी त्यांचे निवारण होणे शक्य नाही. ह्या लाखो धर्मवेड्यांना उदाहरणार्थ सक्कर विभागातील गुंडांना हिंदूंचे आर्थिक हितसंबंध एक आहेत. असा उपदेश करून त्यांच्यात बंधुभाव निर्माण करणे शक्य होईल काय? ज्यांना वाटेल, त्यांनी तो उपाय करून पहावा. पण तो यशस्वी होण्यास किती शतके लागणार? आणि मध्यंतरी हिंदूंची गत काय? चरख्यांच्या साधनाने सर्व जग, नित्य शस्त्रहीन करू पाहणाऱ्या गांधीजींच्या एकेरी भ्रमात्मक उपायाप्रमाणेच यांचा हा उपाय आहे! तरीही मांजराचे गळ्यात घंटा बांधण्याची नामी युक्ती व्यवहारात आणण्याचे काम ती सुचविणाऱ्या कल्पक उंदराकडे सोपवून द्यावे; आणि अतरांनी मात्र मध्यंतरी व्यावहारिक उपाय नि साधने यांच्यामागे लागावे!

सर्वांच्या आर्थिक हितसंबंधाच्या ऐक्यावर भर देऊन आणि निदान हिंदुस्थानातले सर्व लोक तरी एका आर्थिक भूमिकेवर एकत्रित केल्याने सर्व धार्मिक वंशविषयक राष्ट्रीय आणि सांस्कृतिक वैरभाव चुटकीसरशी नाहीसे होतील. असल्या हवेतील मनोजालांच्या, आशांच्या नादी न लागता आणि मानवी आर्थिक फळी उत्पन्न करण्याचे पुस्तकी शास्त्रीय उपाय सोडून देऊन आपण हिंदू संघटनवाद्यांनी व्यावहारिक राजकारणी धोरणाने केवळ हिंदुराष्ट्राच्या आर्थिक उन्नतीपुरताच आपला तात्कालिक आर्थिक कार्यक्रम मर्यादित ठेवावा.

हिंदुस्थानात असलेली विशिष्ट परिस्थिती आणि सामाजिक प्रगतीची आजची पायरी, लक्षात घेता जवळच्या भविष्यकाळात आपल्या आकांक्षाशी जुळणारा जर कोणता अर्थशास्त्र विषयक सांप्रदाय असेल तर तो राष्ट्रवादी अर्थशास्त्रज्ञांचा होय.

आमच्या आर्थिक धोरणांचे सर्वप्रमुख घटक ज्या एका सुलभ सूत्रात मांडता येतील ते म्हणजे 'वर्गहितांचा राष्ट्रीय समन्वय' असे मला म्हणावेसे वाटते. हिंदुसंघटनवाद्यांच्या अर्थनीतीची बाजू ही अशी आहे.

**आमचे तात्कालिक आर्थिक धोरण;**

**वर्गहितांचा राष्ट्रीय समन्वय**

अ) प्रथम आम्ही यंत्राचे स्वागतच करतो. कारण हे यंत्रयुग आहे. हस्तव्यवसायांना देखील एक स्थान आहे. आणि ते उत्तेजनार्हही आहे. परंतु राष्ट्रीय उत्पादन हे शक्य तितक्या अधिकतम विस्तृत यांत्रिक प्रमाणावरच चालेल.

आ) शेतकरी आणि कामकरी वर्ग हाच राष्ट्रीय संपन्नतेचा शक्तीचा आणि आरोग्याचा मुख्य पाया आहे. कारण देशाला आरोग्य आणि संपत्ती पुरवणाऱ्या ह्याच दोन वर्गांवर बलिष्ठ सैन्याच्या भरती नि भांडारे, संग्रहालये ह्यांची केंद्रे मुख्यतः अवलंबून असतात. म्हणून त्या वर्गांना नवीन शक्ती आणि चैतन्य देणे आणि त्यांची निवासस्थाने म्हणून खेडेगावांचे नूतनीकरण प्रयत्नपूर्वक झाले पाहिजे.

केवळ जीवनाला नितांत आवश्यक वस्तू त्यांना मिळाव्यात इतकेच नव्हे तर सर्वसामान्य सुखसोयींचा लाभ त्यांना व्हावा आणि तो लाभ करून घेण्यास त्यांना समर्थ करण्याअतका राष्ट्रीय संपत्तीच्या वितरणातील वाटा त्यांना मिळवता येईल अशी व्यवस्था झाली पाहिजे.
तरीही हे लक्षात ठेवले पाहिजे की, सर्वसामान्यपणे अखिल राष्ट्राचेच ते आवश्यक अंग आहेत आणि अर्थात् त्यांनी आपल्या कर्तव्याचा नि उत्तरदायित्वाचा वाटा उचलला पाहिजे. म्हणून राष्ट्रीय उद्योगधंदे, उत्पादन नि संपत्ती ह्यांची सुरक्षितता आणि सर्व समाजाची प्रगती यांच्याशी सुसंगत होईल, अशा रीतीनेच त्यांना त्यांचा अंशभाग मिळेल.

इ)राष्ट्रीय उद्योग आणि उत्पादन त्यांच्यासाठी राष्ट्रीय भांडवल असणे अपरिहार्य असल्याने आणि ते भांडवल सद्यःपरिस्थितीत, मुख्यतः वैयक्तिक असल्याने त्यालाही आजच्या परिस्थितीत उत्तेजन आणि भरपाई योग्यपकारे देण्यात येईल.

ई) परंतु भांडवल आणि श्रम ह्या दोहोंच्या हिंतसंबंधीचे स्थान अखिल राष्ट्राच्या आवश्यक त्या गरजांच्या संदर्भात गौणच मानण्यात येईल.

उ) एखादा उद्योग जर भरभराटीत असेल तर त्याच्या लाभांतून मोठा वाटा श्रमिकांना मिळेल. परंतु उलट जर तो उद्योग आर्थिक दृष्ट्या डळमळीत, (हानिकारक) होईल. तर केवळ भांडवलवाल्यालाच नव्हे तर काही अंशी श्रमिकालाही अल्पलाभावर घटत्या सीमान्त फलावरच संतुष्ट राहावे लागेल.

हेतु हा की, भांडवलवाले नि श्रमिक यांच्या स्वार्थी वर्गहिताच्या उद्दामपणाने राष्ट्रीय उद्योगांची सर्वस्वी वाताहात होऊ नये.

सारांश भांडवल नि श्रम यांच्या मागण्यांचा अभ्यर्थनांचा वेळोवेळी समन्वय करून अखिल राष्ट्राला राष्ट्रीय उद्योग आणि उत्पादन ह्यांचा विकास व्हावा म्हणून समर्थ बनविण्यात येईल.

ऊ) जे उद्योग व्यक्तिगत प्रयत्नांपेक्षा अधिक कार्यक्षमतेने चालवता येतील आणि जे उद्योग राष्ट्रीय राजसत्ता स्वतः चालवू शकेल अशा मुख्य उद्योगांचे नि व्यवसायांचे सर्वस्वी राष्ट्रीयीकरण करण्यात येईल.

ए) तेच तत्व शेतीलाही लागू पडेल. कूळ किंवा शेतकरी आणि शेताचे धनी यांच्या स्वार्थी वर्गविषयक हितसंबंधाचे द्वंद्व माजू न देता शेताचे धनी आणि शेतकरी यांच्या हितसंबंधाचा अशा रीतीने समन्वय करण्यात येईल की एकंदर राष्ट्रीय शेतीच्या उत्पन्नाचे संवर्धन व्हावे.

ऐ) मोठ्या यंत्रांच्या सहाय्याने, मोठ्या प्रमाणावर आणि शास्त्रीय पद्धतीने राज्याकडूनही शेती नि जमीन काढून घेऊन काही अंशी कसण्यात येईल. यात हेतू हा राहील की, ह्यांचा उपयोग शेतकऱ्यांना शेतीचे शिक्षण देण्याकडे व्हावा.

ओ) राष्ट्राची आर्थिक शक्ति ज्यायोगे क्षीण होईल आणि सामान्यतः राष्ट्रीय उद्योग नि उत्पादन यांची हानि होणे अपरिहार्य होईल. अशा रीतीने किंवा तशाच उद्देशाने जे संप किंवा टाळेबंद्या होतील; त्यांचा निकाल राष्ट्रीय पंचायतीद्वारा करण्यात येईल आणि गंभीर परिस्थिती उत्पन्न झाल्यास निग्रहाने त्यास प्रतिबंधही करण्यात येईल.

औ) व्यक्तिगत मत्ता ही सामान्यतः सुरक्षित मानण्यात येईल.

अं) कोणत्याही परिस्थितीत योग्य भरपाई दिल्यावाचून राजसत्ता अशा व्यक्तिगत मिळकतीचा अपहार करणार नाही.

अः) विरोधी परकीय उद्योगधंद्याच्या स्पर्धेपासून राष्ट्रीय उद्योगांच्या संरक्षणाचे कामी राज्याकडून आवश्यक नि योग्य तो प्रत्येक प्रयत्न केला जाईल.

ह्या वर दिलेल्या गोष्टी उदाहरण म्हणून जाता जाता दिल्या आहेत. राष्ट्राच्या आर्थिक शक्तीचे संवर्धन व्हावे; आणि ते आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे ह्या दोन मुख्य सूत्रांवर वरील सर्व धोरण आधारलेले आहे.

अहिंदूंच्या आर्थिक आक्रमणाची भीती जेव्हा जेव्हा हिंदू आर्थिक हितसंबंधांना निर्माण होईल; तेव्हा तेव्हा त्या हितसंबंधांचे संरक्षण करणे हे अर्थातच हिदुसंघटनवादी आर्थिक नीतीचे ठळक वैशिष्ट्य असेल.

निजामी संस्थान, पंजाब, भोपाळ, आसाम आणि हिंदुस्थानचे इतर अनेक विभाग ह्यामध्ये आज अशाच प्रकारचे हेतूपूर्वक आर्थिक आक्रमण घडत आहे. सर्व ठिकाणच्या हिंदुसभांनी असा कटाक्ष ठेवावा की हिंदू शेतकरी हिंदू व्यापारी, हिंदू श्रमिक ह्यांची अहिंदू आक्रमणाचे योगाने हानि होऊ नये; नि त्याचप्रमाणे हिंदूमधीलच परस्पर विरोधी होणारे आर्थिक हितसंबंध हे वर दिलेल्या सामान्य तत्वांचे अनुषंगाने सोडविण्यात यावेत.

**येत्या दोन वर्षांसाठी आमचा आजचा कार्यक्रम**

युरोपियन युद्ध - युरोपमधील युद्धासंबंधाने आपले काय धोरण असावे. यासंबंधी हिंदुमहासभेच्या कार्यकारी मंडळाने दोन स्पष्ट ठराव केलेले आहेत. आणि त्यानंतर नवी अशी घटना घडली नसल्यामुळे त्या विषयावर बोलण्याचे काही उरले नाही. मी ब्रिटिश राज्यसत्तेस पुन्हा आग्रहपूर्वक सांगतो की, वेस्टमिनिस्टरच्या निर्बंधाप्रमाणे स्वायत्त वसाहतीची प्रतिष्ठा नि स्थान युद्ध संपताच हिंदुस्थानला देण्याची घोषणा त्यांनी स्पष्टपणे आणि तात्काल करावी. हिंदू लोकांची सध्याच्या युद्धात इंग्लंडला अंतःकरणपूर्वक सहानुभूती मिळविण्याचा आणि स्वतंत्र हिंदुस्थानला देखील ब्रिटिश राष्ट्रसंघात समानतेने राहण्यास प्रवृत्त करण्याचा हाच एक मार्ग होय. त्वरित करण्याची गोष्ट म्हणून हिंदुस्थानचे अंतिम राजकीय ध्येयाचे दिशेने प्रगती करून घेण्यास हिंदुस्थानास समर्थ करण्यासाठी त्यास वसाहतीचे स्थान देण्यात विलंब झाल्यास ब्रिटिश राष्ट्रसंघाच्या ऐक्यभावनेसही तो घातक ठरेल. पूर्वेकडे जपानचा उदय आणि त्वरेने होणारी प्रगती आणि पश्चिमेकडे रशिया, इटली आणि जर्मनी यांची प्रगती या गोष्टी ब्रिटनला अनिष्ट सूचक असून एखाद्या ब्रिटनविरोधी राष्ट्रव्यूहाला तोंड देण्यासाठी सबळ अशी ब्रिटिशांची भूमिका व्हावी; ह्या दृष्टीने पाहता स्वतंत्र नि स्वायत्त हिंदुस्थान असणे हीच गोष्ट ब्रिटनला पोषक ठरेल परंतु कितीही राजकीय शब्दावडंबर माजविले; तरी हिंदुस्थानाचा असंतोष शमणार नाही. आणि ब्रिटिशांचे अंकित म्हणून राहण्याची अप्रतिष्ठा हिंदुस्थान ह्यापुढे सहन करणार नाही. ''हिंदुस्थानातील बहुसंख्य हिंदू नि अल्पसंख्य मुसलमान यांचेमध्ये प्रतिनिधित्वाचे प्रमाण इत्यादी उपांगभूत गोष्टीमध्ये एकमत होत नाही. एवढ्यावरून त्वरित वसाहतीचे स्थान देण्याचे विलंबावर टाकणे न्याय्य ठरते''. ह्या बोलण्यावर कोणत्याही प्रतारणेचे योगाने हिंदुस्थान विश्वास ठेवील. अशी आशा तुम्ही यापुढे करता काय?

ब्रिटिश राजकारणी पुढाऱ्यांनी अलिकडे असे उद्गार काढले आहेत. की ''हिंदुस्थानातील अल्पसंख्य म्हणजे मुसलमान यांचेविरुद्ध त्यांचेवर एकही समेटाची योजना लादणे त्यांच्या

विवेकास पटत नाही; आणि हिंदू नि मुसलमान ह्यांनी स्वयंप्रेरणेने संगनमत केल्याविना आणि प्रगतिपर घटनेची संयुक्त मागणी केल्यावाचून आपण रतिमात्र पुढे पाऊल टाकणार नाही. इंग्रज राजकारणी हे कोणत्याही लोकांवर त्यांच्या अच्छेविरुद्ध काही लादण्याची इच्छा करीत नाहीत इतके हे लोकसत्तेचे भोक्ते आणि पापभीरु, जणू काय एका रात्रीत झाले. ह एक नवलाचीच वार्ता होय! पण त्यांना असे विचारावेसे वाटते की तुम्ही, आपली अनियंत्रित राजकीय सत्ता हिंदुस्थानच्या शिरावर लादली त्यावेळी हिंदुस्थानाचे लोक मत कळण्यासाठी सार्वत्रिक मतांची गणती केली होती काय? आणि दोनच महिन्यापूर्वी एका लेखणीच्या फटकाऱ्याने प्रांतिक स्वायत्तता उडवून दिली; नि गव्हर्नरांना आपल्या मतांप्रमाणे नि अच्छेप्रमाणे राज्य चालविण्यास अधिकार दिले; त्यावेळी तुम्ही सार्वत्रिक लोकमताची गणती केली होती काय? किंवा अल्पसंख्य नि बहुसंख्य यांनी तुम्हापाशी संयुक्तपणे तशी विनंती केली होती काय? आणि हिंदुस्थानवर निर्भेळ अनियंत्रित सत्ता नि पारतंत्र्य जर तुम्ही लादू शकला; हिंदुस्थानला अंकित ठेवू शकला; तर तशाच रीतीने विशेषतः जेव्हा बहुसंख्य लोक तशी मागणी करीत आहेत अशावेळी अल्पसंख्यांच्या अनिच्छेला न मानता वसाहतीचे स्वराज्य तुम्ही का लादू शकणार नाही?

तुम्ही हिंदुस्थानच्या डोक्यावर शाप लादलेत तर तुम्हाला वरही लादता येणार नाहीत काय?

हिंदुस्थान राजकीय प्रगतीचा उत्क्रांती मार्गच जोवर आचरीत आहे; तोवर शक्य तितक्या लवकर हिंदुस्थानचा जन्मसिद्ध अधिकार देण्याची अनिच्छा झाकण्यास अल्पसंख्य मुसलमानांच्या निमित्तांचा उपयोग करणे आणि वरीलप्रणाणे पोकळ राजकीय छद्मीपणा चालविणे हे ब्रिटिश लोक थांबवितील तर ते ब्रिटिशांना नि हिंदुस्थानलाही हितावह होईल. सर्व सामान्य प्रगती थांबविण्यासारखा नकार देण्याचा निर्णायक अधिकार मुसलमानांस देऊन जर हिंदूंचा क्रममार्ग बंद करण्यात आला; तर पेचप्रसंग उत्पन्न होईल; पण तो अल्पकालच टिकेल. कारण निसर्ग हा अभाव (Vaccum) द्वेषी आहे. आणि क्रमशः प्रगति अशक्य केली; तर कालशक्तीच वाढते. सामर्थ्य हे दुसऱ्या अधिक भयानक अशा मार्गांचा अवलंब केल्यावाचून राहणार नाही.

हिंदू सभावाल्यांसाठी येत्या दोन वर्षांपुरता विधायक कार्यक्रम काही अनपेक्षित निकडीची आणि नितांत आवश्यक अशा कर्तव्याची वेळ प्राप्त न झाल्यास मध्यंतरीच्या वेळात प्राथमिक प्रांतिक हिंदुसभानी नि मध्यवर्ती हिंदुमहासभांने त्रिविध विधायक कार्यक्रम मुख्यतः आचरावा. आपल्यापरीने उपयुक्त नि आवश्यक अशी असंख्य कार्ये आपल्यापुढे आहेत. परंतु प्राथमिक गोष्टीपासून प्रारंभ करणे केव्हाही हिताचे असते. सर्व गोष्टी एकाच वेळी करू जाण्यात आणि अंती प्रत्येक गोष्ट अर्धवट अपुरी वा विकृत करून ठेवण्यात किंवा पुढे दिसेल; त्याप्रमाणे भाराभर कामे उचलीत जाण्यात नि उपांगातच गढून हतबुद्ध होण्यात अर्थ नाही. त्यापेक्षा केव्हाही तुलनेने सर्वांत अधिक मूलग्राही विशेष परिणामकारक आणि सध्याच्या आपल्या सामर्थ्याच्या नि

साधनसामुग्रीच्या कक्षेत पडणारे असे कार्यक्रम निवडावे आणि एवढ्या कार्यक्रमांवरच मुख्यतः आपल्या श्रमांचे केंद्रीकरण करण्याची योजना करावी हेच युक्त होय.

आपली शक्ती वाढली नाही; तोवर केवळ क्षोभ नि देखावा उत्पन्न करण्याचे हेतूने युद्ध ओढवून घेणे, सर्वकाली योग्य नाही.तसे केल्यास निष्कारण पराभवाचा अनिष्ट संभव उत्पन्न होतो. नाविक लोक, जलप्रवाहाचे कलानेच मार्गक्रमण करीत असतात. सिंह देखील, योग्य संधी पाहण्यासाठी दबा धरून राहतात. असंख्य मुखांतून गर्जनापूर्वक अग्निवर्षाव करून प्रतिपक्षाची वाताहात करणाऱ्या प्रचंड युद्धनौका ते कार्य करण्यापूर्वी शांत नि अज्ञात अशा स्थळी घडविल्या जात असतात.

पुढील विषय मी यदृच्छया सुचले तसे निवडलेले नाहीत. त्यांची निवड वरील सर्व कारणीभूत विचारांचा परामर्श घेऊन केली आहे. हे तीन कार्यक्रम अत्यंत मूलग्राही नि अत्यंत आवश्यक आहेत. आणि प्रसंगोपात्त आवश्यक गोष्ट करण्याची मनीषा असलेल्या प्रत्येक हिंदुसंघटनवाद्याच्या आटोक्यातीलसुद्धा आहेत. हे कार्यक्रम प्रथमारंभी विशेष आकर्षक दिसले नाहीत; तरी आपल्या मानाच्या रक्षणासाठी आणि स्वातंत्र्यासाठी जेव्हा वेळ येईल तेव्हा तोंड देण्यास अखिल हिंदू जगत् सिद्ध व्हावे, असे सामर्थ्य ते आपणास निश्चितपणे प्राप्त करून देतील. या कार्यक्रमासमवेत संघटनाची इतर अंगेही हाती घेणे ज्यांना शक्य असेल, त्यांनी अर्थात तसे करण्यास प्रत्यवाय नाही. परंतु येत्या दोन वर्षांत तरी पहिल्या प्रथम, आपले सर्व लक्ष ह्या तीन कार्यक्रमांवर केंद्रित व्हावयास पाहिजे. इतर प्रश्न आजच हाती घेण्यापेक्षा ह्या तीन कार्यक्रमांच्या दिशेने येत्या दोन वर्षांत आपण जी प्रगती करू, तिच्या योगाने आपणास अशी एक प्रभावी भूमिका प्राप्त होईल की ज्यामुळे आपण अधिक कार्यक्षमतेने इतर प्रश्न सोडविण्यास समर्थ होऊ. म्हणून प्रत्येक नगरात, उपनगरात आणि ग्रामात पुढील गोष्टींसाठी झंझावाती प्रचार करण्यास अत्यंत कसोशीचे निकडीचे प्रयत्न करावेत.

१) अस्पृश्यता दूर करा.

२) सर्व विद्यापीठे, शाळा, महाविद्यालये यांना सैनिकी शिक्षण विद्यार्थ्यांना देणे अनिवार्य करण्यास भाग पाडा आणि आपल्या तरुणांना साधेल त्या मार्गाने नाविक, वैमानिक आणि सैनिक दलांत प्रवेश मिळवून द्या.

३) हिंदूंचे मतदार संघ अशा रितीने अधिकात अधिक प्रवृत्त करा की, हिंदुहितसंबंध राखण्यासाठी उघडपणे आपणास बांधून घेणाऱ्या अशा हिंदुसंघटनी लोकांसच त्यांनी मते द्यावीत. काँग्रेसचे प्रतिनिधी जोपर्यंत काँग्रेसच्या शिस्तीने बांधले आहेत आणि काँग्रेस तिकीटाने अडकले आहेत. तोपर्यंत जरी त्यांची इच्छा असली तरी किंवा त्यांनी वचन दिले तरी, धैर्याने आणि स्वतंत्रतेने हिंदुहिताचे संगोपन त्यांना कदापीही करता येणार नाही. म्हणून काँग्रेसला मते देणार नाही; अशा निश्चयाने हिंदू मतदार संघ निर्माण करा.

हिंदू जगताच्या इतर कोणत्याही विभागाप्रमाणे जे आपले बांधव आणि धार्मिक सांस्कृतिक राष्ट्रीय नि इतर सर्व दृष्टींनी, आपलेच आहेत, अशा निदान दोन कोटी लोकांना आपल्या संघटनेत समाविष्ट करून घेण्याचे कार्य वरील पहिल्या कार्यक्रमाने होईल सार्वजनिक जीवनात सर्व नागरिकांना म्हणजे, अहिंदूंना देखील जे काही मूलभूत अधिकार उपभोगावयास मिळतात. ते सर्व आपल्या तथाकथित अस्पृश्य बंधूंना प्राप्त करून देऊन त्यांना तथाकथित स्पृश्यांच्या समान भूमिकेवर, तत्काळ आणण्याचा प्रयत्न प्रत्येक हिंदुसभेने आपआपल्या क्षेत्रात करावा. केवळ जन्मावर आधारलेल्या अस्पृश्यतेच्या आधारावर कोणत्याही रीतीने आपले अस्पृश्य बांधव कोठेही पीडले जात असतील; तर आपण त्यांचा पक्ष घेऊन विरोधास तोंड द्यावे; नि तसे करण्यास त्यांनाही प्रवृत्त करावे. आणि अवश्य तर न्यायालयापर्यंतही हा प्रश्न न्यावा. मात्र, आपल्या सनातनी बंधूंचे व्यक्तिगत स्वातंत्र्यास बाध आणून कोणत्याही रीतीने त्यांच्या भावनांचा अवमान वा अधिक्षेप केव्हाही करू नये. परंतु सार्वजनिक शाळा, वाहने, अधिकार स्थाने आणि सार्वजनिक जीवनाच्या प्रत्येक अंगात केवळ जातीने अस्पृश्य म्हणून कोणाही हिंदूला दुसऱ्या हिंदूच्या सार्वजनिक अधिकारास बाध आणता येऊ नये. मुसलमान नि इतर अहिंदू लोकांना आपण हिंदू ज्या सामाजिक समानतेने वागवितो. तितकीच समानता कोणत्याही जातीच्या आपल्या हिंदू बांधवास न्यायानेच प्राप्त झाली पाहिजे. याच्या विपरित वर्तन करणे म्हणजे वस्तुतः आपल्या सामान्य हिंदुत्वाचा अवमान करण्यासारखे आहे.

येथे हेही स्पष्ट उल्लेखिल्ले पाहिजे की, जे आज अस्पृश्य म्हणून गणले गेले आहेत, ते स्पृश्य मानल्या गलेल्या हिंदू इतकेच तंतोतंत हे पाप करण्यात दोषी आहेत. कारण अतरांकडून त्यांना जितकी निर्दयपणाची वागणूक दाखविली जाते; तितकीच प्रत्येक अस्पृश्य जात दुसऱ्या एखाद्या कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीला अस्पृश्य म्हणून दाखवीत असते, ते पाप आपणा सर्वांना सारखेच व्यापून बसले आहे आणि म्हणून आपण सर्वच उपायांनी हा भयंकर दोष काढून टाकण्याच्या निश्चयाने नि सहकारितेने प्रयत्न करूया.

मध्यंतरी आमच्या सनातनी बांधवांनी निश्चिंत राहावे की प्रत्येक नागरिकाला न्यायतः प्राप्त होणाऱ्या मूलभूत अधिकारांव्यतिरिक्त एखादी धार्मिक सुधारणा अस्पृश्यतेच्या संबंधाने देखील हिंदुत्वाच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही एखाद्या पंथांच्या गळी सत्तेच्या निर्बंधाने उतरविणार नाही. परंतु अस्पृश्यतेमुळे झालेल्या आणि होत असलेल्या अपरिमित हानीसंबंधाने ज्या हिंदुसंघटनवाद्यांची निश्चिती झाली आहे ते देखील आपल्या स्वतःच्या व्यवहारामध्ये आपल्या विवेकबुद्धीप्रमाणे वर्तन करण्यास स्वतंत्र राहतील.

अस्पृश्यता निवारणाची तीव्र चळवळ कोण-कोणत्या मार्गांनी चालववायाची हे वेळोवेळी स्पष्ट करण्यात येईल. या ठिकाणी व्यक्तिगत उल्लेखाचा दोष पत्करूनही सांगतो की ज्यांना शक्य असेल त्यांनी रत्नागिरी हिंदुसभेने गेल्या दहा वर्षात माझ्या प्रेरणेनुसार अस्पृश्यता निवारणाची तीव्र चळवळ करून जे यश मिळविले आहे; ते वृत्तांतावरून समजून घ्यावे. त्यावरून

हेही स्पष्ट होईल की गांधीनिष्ठ अस्पृश्यता निवारण्याची दृष्टि आणि हिंदुसंघटनवाद्यांची त्या प्रश्ना-संबंधांची दृष्टि यात मुळातच भेद आहे. आणि म्हणून जरी आम्ही त्यांच्याशी सहकार्य करण्यास प्रत्यवाय नसला तरी गांधीनिष्ठ चळवळीत आमची चळवळ एकरूप करता कामा नये. गेल्या २०० वर्षांत अस्पृश्यता निवारणाचे संबंधी झालेल्या कार्याहूनही अधिक कार्य हिंदुसभानिष्ठांनी येत्या दोन वर्षांत केले पाहिजे.

दुसऱ्या विधायक कार्यक्रमासंबंधाने महासभेच्या अखिलभारतीय समितीत नि कार्यकारी मंडळात वेळोवेळी योजना करण्यात येतील.

तिसरा कार्यक्रम मात्र त्या सर्व कार्यक्रमांच्या मेरुमण्यासारखा आहे. जोपर्यंत हिंदुमतदारसंघ विधि मंडळात नि स्थानिक संस्थांत केवळ हिंदुसंघटनवादी प्रतिनिधीच न पाठविता राजसत्तेपुढे आपले प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार काँग्रेसला देत आहे; तोपर्यंत हिंदू हे आपल्याच हिंदुस्थान देशात, राजकीय असहाय्यतेच्या अवस्थेतच राहणार. गतकालाप्रमाणे पुढेही मोठ्या प्रमाणात हिंदूच राजकीय अधिकारांकरिता झुंजतील; नि यशही मिळवतील. परंतु मतदानाचे वेळी त्या अधिकाराचे त्यागपत्र काँग्रेसच्या हाती देण्याच्या, आत्मघातकी मूर्खपणापासून हिंदू मुक्त होणार नाहीत. तोपर्यंत हिंदुस्थानात हिंदुजगताची न्याय्यभूमिका केव्हाही बलिष्ठ होणार नाही. उलट हिंदू निर्माल्यवत होऊन त्यांनी मिळविलेल्या अधिकाराचा लाभ मुसलमानच अधिक घेतील आणि त्यायोगे वाढलेल्या सामर्थ्यांने हिंदूंनाच अधिकाधिक मागे खेचतील.

आणि हेही लक्षात ठेवा की, जवळच्या भविष्यकाळात एखादी वर्तुळ परिषद किंवा एकपकारची घटनासमिती बोलावली जाणार आहे. आणि जोवर आपले प्रतिनिधि म्हणून काँग्रेसनिष्ठांनाच हिंदुलोक निवडतील तोपर्यंत राज्यकर्तेही काँग्रेसकडे न्यायतःच हिंदुमताचा प्रतिनिधी म्हणून पाहणार; मग काँग्रेसवाले स्वतः ती गोष्ट कितीही नाकारोत. आणि जरी काँग्रेसने सर्वराष्ट्रीय प्रतिनिधित्वाचा कितीही अधिकार सांगितला तरी काँग्रेस ही मुसलमानांची किंवा सर्वराष्ट्राची प्रतिनिधि आहे असे राज्यकर्ते कधीच मानणार नाहीत. कारण मुसलमान काँग्रेस तिकिटावर उभ्या राहिलेल्या मुसलमानाला बहुधा निवडून देत नाही.

काँग्रेस तिकिटावर उभे राहिले म्हणूनच डॉ. किश्वलू देखील मुस्लिम मतदार संघाच्या निवडणुकीत पराभव पावले. अशा परिस्थितीत, मुसलमानांच्या मागण्या पुरविण्यासाठी हिंदूंच्या अधिकारांचा अधिक मोठ्या प्रमाणावर ह्यापुढे बळी देण्यात येणार असे भय स्पष्ट दिसत आहे; आणि हिंदूंच्या प्रांतातदेखील आजच मुसलमान समसमान जागा मागू लागले आहेत.

काँग्रेस संस्थेचे हे धोरण व्यक्तिशः अमान्य असणाऱ्या काँग्रेसच्या कक्षेतील हिंदूंच्या गुप्तपणे चालणाऱ्या कुरकुरीचा नि जळफळटाचा काही एक उपयोग नाही आणि हिंदुसंघटनवाद्यांनी केवळ निषेध करूनही भागणार नाही. कारण घटना परिषदेत किंवा वर्तुळ परिषदेत मुस्लिम लीगचे प्रतिनिधी जसे स्वतंत्रपणे निःसंगपणे नि निर्भयपणे आपल्या

अधिकाराचे समर्थन करतील तसे हिंदूंच्या न्याय्य अधिकारांचे समर्थन करणारा (हिंदू मतदारसंघाकडून अधिकृत) असा पक्ष जोवर, नाही; तोवर काही एक होणार नाही.

परंतु जर हिंदूमतदारसंघ कधीकाळी भानावर येईल आणि काँग्रेसनिष्ठ प्रतिनिधि निवडण्याचे नाकारून केवळ हिंदुसंघटनवादी प्रतिनिधीस बहुमताने निवडून देईल तर पंजाब नि बंगाल इत्यादी प्रांतात जसे मुसलमानी राज्य आहे, तसे निदान सात प्रांतात तरी हिंदुसंघटनवाद्यांचे राज्य निर्माण होईल.

आणि असे झाले, म्हणजे संयुक्त प्रांतासारख्या हिंदू लोकमतांच्या प्रांतातदेखील काँग्रेस-राज्य असल्यामुळे हिंदू ज्या अन्यायाविरुद्ध आक्रोश करीत आहेत, तसले निदान शेकडा पंच्याहत्तर अन्याय तरी दूर करण्याची राजकीय सत्ता हिंदूंचे हाती येईल. प्रांतिक पोलीस आणि राज्याचे सर्वसेवक हे हिंदुसंघटनवादी मंत्रीमंडळाच्या नियंत्रणाखाली राहतील आणि त्यायोगे हिंदूंचे अधिकारांकडे दुर्लक्ष करून ते  दडपून टाकणे त्यांना अशक्य होईल. किंबहुना स्वतः मुसलमान आपण होऊनच हिंदू अधिकारांवर अतिक्रमण करण्याचे धाडसही करणार नाहीत. किंवा अक्षम्य हिंदुविरोधी नि राष्ट्रविरोधी मागण्याही पुढे मांडणार नाहीत आणि ज्याअर्थी अल्पसंख्य मुसलमानांचे न्याय्य अधिकार त्यांना देण्याविषयी हिंदू विरोधी नाहीत आणि हिंदुसंघटनी लोक सन्माननीय मित्रत्वाने, हिंदुस्थानातील देशबांधवांशी वागू इच्छितात त्याअर्थी अल्पसंख्य मुसलमानांना त्यांच्या न्याय्य अधिकारासंबंधी सर्वपकारे संरक्षण मिळेल.

म्हणून येत्या दोन तीन वर्षांत आपले सर्व प्रयत्न या गोष्टींवर तीव्रतेने एकवटले पाहिजेत. हिंदू मतदारांनी कोणत्याही निवडणुकीत काँग्रेसनिष्ठाला मत न देता केवळ हिंदुसंघटनवाल्यालाच मत दिले पाहिजे. ह्यासाठी हिंदुसंघटनकार्याला वाहिलेली दैनिक वृत्तपत्रे आणि मध्यवर्ती निधी यांची आवश्यकता आहे. परंतु या सर्वांचे आधी आपण हिदुपक्ष उभारला पाहिजे. जे हिंदुसभेच्या संघटनेमध्ये रीतसर संबद्ध नाहीत. परंतु जे हिंदुसभावाल्यांइतकेच हिंदुसंघटनवादी आहेत. अशा सनातनी, आर्यसमाजी नि इतर अनेक हिंदू पंथोपपंथाचा नि गटांचा समावेश ह्या हिंदुपक्षामध्ये होईल. हे सर्व कसे नि कोणत्या साधनांनी घडवून आणावयाचे याचा विचार नि योजना स्थानिक प्रांतिक नि मध्यवर्ती हिंदुसभा आणि विशेषतः सर्व हिंदुसंघटनवादी लोक ह्यांनी केला पाहिजे. मग ते हिंदुसभेचे नियमतः सभासद असोत वा नसोत.

पण जर आमच्या प्रयत्नांना न जुमानता काँग्रेसला मते देण्याच्या स्वतःच्या आत्मघातकी मूर्खपणाला हिंदुमतदार चिकटून राहिला; आणि आम्हाला मतदान प्रसंगी, बहुमत मिळाले नाही तरी मनाला लावून घेण्याचे कारण नाही. अल्पमतात येण्याअतपत आमचे प्रयत्न निश्चितच कारणी लागतील. महाराष्ट्रात आणि अन्यत्र काही ठिकाणी आम्हाला जे आढळून आले, ते असे की, हिंदु संघटनवादी अच्छुक अत्यंत चुरशीच्या तापदायक निवडणुकीत काँग्रेसच्या विरोधात केवळ, निवडूनच आले आहेत असे नसून मतदारसंघात काही ठिकाणी काही प्रभागात सर्वोच्च मते मिळवून काँग्रेसवर ताण केली आहे आणि विधिमंडळात नि स्थानिक स्वराज्य संस्थात

अल्पमतात असलेल्या निष्ठावंत हिंदुसंघटनवाद्यांची केवळ उपस्थिती सुद्धा बहुमतात असलेल्या पक्षाच्या स्वच्छंदीपणावर परिणामकारक दाब ठेवण्याचे कार्य करते. हिंदूंच्या गाऱ्हाण्यांची तड लागेपर्यंत वाचा फोडीत राहते आणि प्रगतीचा नि सत्तेचा पुढील मार्ग सुगम करते.

आणि समजा आपल्याला एकही स्थान न मिळता, आपण निवडणुकीत निःशेष पराभूत झालो तर? तरीही धीर धरा आम्ही आमचा पराजय मान्य करून, सार्वत्रिक अपमान सहन करू पण अभिमानाने स्वतःशी व्यक्तिशः आपण असे म्हणू शकू की प्रचंड प्रतिरोधी शक्तीपुढे असताही आम्ही आमच्या विवेकबुद्धीशी प्रतारणा केली नाही. निवडणुकीतील अल्प जय नि अवमान याचा दोष हिंदुमतदारसंघाचे शिरावर पडेल; हिंदुपक्षाला मत देणाऱ्यांचेवर तरी निदान हा दोष राहणार नाही. तसेच इतक्या न्याय्य प्रश्नाचे आधारे निवडणुकीत काँग्रेसच्या विरुद्ध स्पर्धा करण्यास एक पक्ष उभा राहण्याचे भय निर्माण झाल्याने मिथ्या राष्ट्रवादाच्या धुनीमध्ये भारलेल्या मूर्तीपुढे हिंदु हित संबंधाचा होम करण्यास काँग्रेस ही अधिकाधिक भयाकुल झाल्यावाचून राहणार नाही.
जय मिळत चालला आहे; अशाच वेळी राष्ट्रीय झुंजीमध्ये प्रविष्ट होणे हेही देशभक्तीचे लक्षण आहेच. परंतु ज्यावेळी एखादा न्याय्यपक्ष युद्धात जवळ जवळ पराभूत झालेला दिसत आहे. अशावेळी, आपल्या विवेक-बुद्धीशी प्रतारणा करण्याचे नाकारून अवमान नि पराभव यांची क्षिती न बाळगता, निग्रहाने स्वतःच्याच ध्वजाखाली उभे राहणे हेच धैर्यशालीपणाचे ठरेल; आणि प्रामाणिक सैनिक व्यक्तिशः एवढेच काय ते करू शकतो. त्याला जरी सार्वत्रिक विजयाचा आनंद उपभोगिता न आला तरी आपण आपले कर्तव्य केले; हे त्यांचे परमोच्च समाधान कशानेही नाहीसे होणार नाही. सध्याच्या स्थितीत हिंदुसंघटनवाद्यांनी अशाच प्रकारच्या निष्ठेने आपली झुंज चालविली पाहिजे; आणि काही झाले तरी पहिले हिंदुद्रोही ठरण्यापेक्षा शेवटचे निष्ठावान हिंदु-संघटनवाद्यांचे पथक होण्याचा आपण निर्धार करू या.

---------------------------

# अखिल भारतीय हिंदुमहासभा
## २१ वे वार्षिक अधिवेशन - मदुरा
## अध्यक्षीय भाषण
## विक्रम संवत् १९९७ : सन १९४०

सन्मान्य सभासद नि प्रतिनिधी बंधूंनो!

अखिल भारतीय 'हिंदूमहासभे'च्या अध्यक्ष-स्थानी यावर्षी लागोपाठ चौथ्यांदा मला निवडून आपण माझ्या ठिकाणी आपला विश्वास प्रकट केला. या विषयी मी कोणत्या शब्दांनी आपले उतराई व्हावे हे मला समजत नाही. मागील तिन्ही वर्षी ज्या ज्या वेळी आपण मला अध्यक्षस्थान स्वीकारण्याची आज्ञा केली त्या त्या प्रत्येकवेळी स्वीकारलेल्या उत्तरदायित्वा-संबंधात आपण माझी अध्यक्षस्थानी केलेली निवड योग्य झाल्याचे आपल्याला समाधान लाभावे आणि माझ्या बुद्धीलाही कर्तव्यपालनाचे समाधान प्राप्त व्हावे यासाठी अवश्य त्या सर्व कामगिऱ्या पार पाडण्याचा त्या वेळी, मला विश्वास वाटत असे, परंतु या वर्षी मी अंथरुणाला खिळून पडलो असल्यामुळे नि ह्या दुखण्यातून मी लवकर बरा होण्यासारखा नसल्यामुळे जेव्हा याही वर्षी पुन्हा माझी अध्यक्षस्थानी निवड करण्यात आल्याचे मला समजले; तेव्हा मात्र माझ्या मनाची चलबिचल सुरू झाली. आपले सन्मान्य पुढारी डॉ. पी. वरदराजुलू नायडू यांना मी ताबडतोब कळविले की, मी अध्यक्षपदाचे तारेनेच त्यागपत्र पाठवू इच्छितो याचे कारण माझ्या सध्याच्या दुखण्याच्या परिस्थितीत हिंदुमहासभेच्या अध्यक्षांची कामे जितक्या उत्साहाने आणि दक्षतेने पार पाडावयास पाहिजेत; तितकी ती माझ्या हातून होणार नाहीत. याची माझ्या मनाला सारखी टोचणी लागलेली होती. परंतु डॉ. वरदराजुलू नायडू यांनी उलट मला तारेनेच कळविले की अशा पकारे त्यागपत्र देण्याचा विचार मी करू नये.

माझ्या त्यागपत्राचा परिणाम येथे भरणाऱ्या अधिवेशनाच्या दृष्टीने घातक होईल असे त्यांना वाटत होते. त्यांनीच काय, पण आपल्या कित्येक माननीय पुढाऱ्यांनी आणि बांधवानी मला तारा करून कळविले की, मी त्यागपत्र देण्याचा विचार करू नये. हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाच्या जागी, हिंदुसंघटनेच्या कार्याच्यादृष्टीने मी असणे अवश्य आहे. असे सर्वांनी मला कळविल्यामुळे त्यांची इच्छा मला मोडवेना. आणखीही एक विचार माझ्यापुढे होता, जर मी अध्यक्षपद स्वीकारण्याचे आयत्यावेळी नाकारले; तर हे अधिवेशन यशस्वी रीतीने पार पाडण्याचे काम अधिक अवघड होऊन बसेल अशी डॉ. वरदराजुलू नायडू, त्यांचे हिंदुसंघटनवादी कार्यकर्ते, स्वागत मंडळाचे सन्मान्य अध्यक्ष नि सभासद या सर्वांना भीती वाटत होती. तामीळनाडू प्रांतात हिंदुमहासभेचे हे पहिलेच अधिवेशन असल्यामुळे ह्या सर्व मंडळीनी जिवापाड श्रम घेतले आहेत. तेव्हा या सर्व

गोष्टींचा विचार करून लोकमताला मोडता घालू नये; म्हणून ह्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास शेवटी संमती देण्यास मी सिद्ध झालो.

आता जर माझी प्रकृती सुधारली, तर सरळच आपण विश्वासाने मजवर टाकलेल्या कार्याला अणुमात्र कसर न करता, मी उत्साहाने लागेन; आणि अनुकूल वा प्रतिकूल परिस्थितीतून माझ्या शक्तीप्रमाणे हिंदुसभेची चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न करीन. पण जर माझी प्रकृती सुधारली नाही; तर मात्र अध्यक्षपदाला निष्कारण चिकटून राहण्याचा मोह मी मुळीसुद्धा बाळगणार नाही. नि ते कार्य उत्तम रीतीने पार पाडावे यासाठी माझ्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान नि योग्य प्रतिनिधीवर ते सोपवावे असे अच्छीन. ते कसेही असले तरी आपण हे गृहीतच धरून चालावे की मी हिंदुमहासभेचा अध्यक्ष नसलो तरी हिंदुसंघटनेच्या कार्याला आपल्या जीवितसर्वस्वाने वाहून घेणारा आपल्यापैकीच एक सैनिक या नात्याने मी सतत कार्य करीत राहणारच.

## महासभेच्या चळवळीची चौफेर घोडदौड

हिंदुमहासभेच्या कृपाछत्राखाली नि आश्रयाने हिंदुसंघटन कार्याचा व्याप नि पसारा ह्यांच्या वाढीची चौफेर घोडदौड या वर्षात उत्साहवर्धक अशीच झाली आहे; हे पाहून समाधान वाटते. महासभेच्या वार्षिक कार्य- अतिवृत्तातील प्रमुख नि सूचक विषयांवर ओझरता दृष्टीक्षेप केला. तरीही ह्या वस्तुस्थितीला पुरेसा दुजोरा मिळू शकतो.

केवळ एक वर्षापूर्वी ज्या ह्या मद्रास प्रांतात नाममात्र, क्वचितच एखादी मंडल (जिल्हा) हिंदुसभा असेल, नसेल; तो हा दुसरा मोठा प्रांत आमच्या आदर्शध्येयवादी विचारसाम्राज्याच्या प्रभावक्षेत्राखाली ह्या वर्षी प्रथमच आम्ही आणलेला आहे. हिंदुसंघटन कार्याची निकड नि तिचे महत्व ही ज्यांना पटलेली आहेत; असे सालेमचे पूजनीय कुलपती श्रीयुत विजय राघवाचरियर ह्यांच्यासारखे आदरणीय व्यक्तिमत्व आणि अकडची तिकडची काही थोडी मोजकी अशी, ह्या कार्यात पुढाकार घेणारी, प्रमुख पुढारी मंडळी, ह्यांच्या व्यतिरिक्त ह्या प्रांतातील लक्ष-लक्ष हिंदूंना हिंदूसंघटन कार्याची चळवळ किंवा ती चालविणारी हिंदुमहासभा ह्यांविषयी यत्किंचितही माहिती नव्हती; तर त्यावेळी हिंदुमधीलच एका राजकारणी वर्गाला त्यांची जरी माहिती होती; तरी ती केवळ एक तर त्यांचा उपहास, अधिक्षेप करण्यासाठी, नाही तर, पराकोटीचा द्वेष करण्यासाठीच काय ती होती. परंतु सुदैवाने हिंदुसंघटनकार्यासाठी सार्वजनिक चळवळीचे संचालन करण्यामध्ये अगदी निष्णात आणि गतकालातील काही दशके ज्यांनी ह्या प्रांताच्या राजकीय जीवनात उच्चपदे गौरवपूर्ण प्रतिष्ठेने भूषविली; असे अनुभवी लोकाग्रणी ह्या वर्षाच्या प्रारंभीच ह्या प्रांतात हिंदुध्वजाखाली हिंदुसमाज संघटित करण्यासाठी आणि हिंदुमहासभेच्या कार्याला सर्वस्वी वाहून घेण्यासाठी पुढे आले; ते म्हणजे डॉ. पी वरदराजुलु नायडु हे होत. अगदी थोड्याच वेळात, उत्साही लोकाग्रणी धुरीणांचा समूह त्यांच्या भोवती जमला; आणि ह्या पवित्र विशिष्ट कार्य हेतूसाठी

कित्येक मान्यवर प्रतिष्ठित सज्जनांनी सहकार्य देऊ केले. परिणामी उण्यापुऱ्या दहा महिन्यांच्या काळात तिरुवअनंतपुरापासून तो राजमहेंद्री पर्यंतच्या ह्या मद्रास प्रांताला हिंदुमहासभेच्या चढत्या वाढत्या शक्ती-सामर्थ्याची आणि प्रतिष्ठेची केवळ, जाणच काय ती आता आलेली आहे, असे नसून ह्या प्रांतातील लक्ष लक्ष हिंदूंना हिंदुसंघटन कार्याला आदर्श ध्येयवादाने भारून सुद्धा टाकले आहे. त्या अनुषंगाने, फलस्वरूप म्हणून ह्या प्रांतात सुद्धा राजकीय नि सामाजिक जीवनात, हिंदुमहासभा ह्या आधीच जिची अगत्याने गणना करणेच भाग आहे, अशी लक्षणीय प्रबलशक्ति बनलेली आहे.

एवढेच नव्हे; तर, आणखी असे की, 'सकल हिंदूंचे एकमेव निखिल हिंदु जगत्' असल्याविषयीची (हिंदु तितुका एक) अशी जाणीव होऊन, केवळ त्या प्रातांतील हिंदूंच्या मानसातच नव्हे; तर यच्चयावत् अखिल हिंदुस्थानभरच्या हिंदूंच्या मानसातही जी ऊर्जस्वल जागृति झाली आहे; तिचे गमक म्हणजेच हे तामीळनाडूमधील ह्या अगदी गर्भगृहातील- केंद्रस्थानातले अधिवेशन होय; जे त्या ऊर्जस्वल जागृतिचे प्रत्यक्ष प्रमाणच सादर करते. ह्या मदुरानगरीत सकल तीर्थातील पुण्यसलिले घेऊन त्यांची जी मिरवणूक आज सकाळी त्यांनी काढली, त्यावेळी सिधु आणि सरस्वती, यमुना आणि गंगा, कृष्णा आणि कावेरी प्रभृति हिंदुस्थानातील सकल नद्यांच्या प्रवाहांच्या मीलनाचाच काय तो संगम झाला असेच केवळ नसून अखिल हिंदुस्थानातील हिंदुजीवनाच्या सकल प्रवाहांचेसुद्धा आज येथे मीलन होऊन ते सारे प्रवाह एका निखिल हिंदुजगतात संगमून गेले आहेत. अथल्या ह्या विशाल जनसंमर्दातील प्रत्येक हिंदुमात्राच्या नाडीचा पडणारा प्रत्येक ठोका, हे आमच्या वांशिक, धार्मिक राजकीय, आणि राष्ट्रीय अस्तित्वाच्या ऐक्याचेच स्पंदन होय; आणि वीस कोटी हिंदूंच्या अंतःकरणातील ही चेतना ज्याने प्रज्वलित ठेवली आहे; आणि जो केवळ दीपशिखेचेच काय ते निदर्शन करतो; आणि हिंदुराष्ट्र हे स्वतःच्या आत्मविस्मृत मोहमयी निद्रासमाधीतून, पुनरुज्जीवित होऊन लवकरच दीप्तिमान प्रभावाने तळपत उदयास येत असल्या- विषयीच्या गोड वार्तेची द्वाही फिरवीत फडफडणारा तोच हा हिंदुध्वज ह्या मंडपावर विराजमान आहे.

ह्या वर्षातील कार्याचा आढावा घेत असतांना दुसरा लक्षात घेण्यायोग्य विषय, तो हाच; की अखिल हिंदुस्थानात सर्वदूर, सगळीकडे हिंदुमहासभेच्या सभासद- नोंदणीत सुनियंश्रित आणि नियामितपणे उल्लेखनीय वाढ झालेली आहे. त्यासंबंधात आवर्जून उल्लेख करण्यास योग्य म्हणजे महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा आणि बंगाल प्रांतिक हिंदुसभा! पाच एक वर्षापूर्वी महासभेच्या सभासदांची संख्या सहस्रांमध्ये गणली जाई; ह्या वर्षी आम्ही ती लक्षांमध्ये गणावी इतक्या स्थितीप्रत आलो आहोत; आणि आपण जर कुचराई न करता न कंटाळता साऱ्या शक्तीनिशी कामाला लागलो तर आणखी पाच एक वर्षांनी निःसंशयपणे तिची गणना आपणांस दशदश लक्षांमध्ये करता येणे सहज शक्य होईल. सभासद संख्येत ही उल्लेखनीय वाढ करीत असतांना आणखी एक जी गोष्ट आपण केली आहे ती हीच की ज्या ठिकाणी पूर्वी शाखाच अस्तित्वात

नव्हत्या अशा ठिकाणीही हिंदुमहासभेच्या संघटनेने यावर्षी आपल्या शाखा मोठ्या प्रमाणावर झोकून दिल्या आहेत. तदनुसार त्यातही पुनः असे की, हिंदुमहासभेला औपचारिकरीत्या ज्या हिंदुसभा जोडलेल्या आहेत त्यावाचून 'धोरण' आणि 'सोय' ह्या कारणासाठी म्हणूनच काय त्या रीतसर न जोडल्या गेलेल्या समान उद्दिष्टे आणि समान हेतूंच्या पूर्तीसाठी झटणाऱ्या हिंदुमहासभेच्या संघटनेशी सख्यत्व, तादात्म्य ठेवणाऱ्या अशा हिंदुसभा संस्थानांमधून वृद्धिंगत होत आलेल्या आहेत. ह्यांतील काही प्रमुख हिंदुसभांचा निर्देश कारायचा तर त्या म्हणजे त्रावणकोर संस्थान हिंदुसभा नि शुद्धिसभा, कोल्हापूर संस्थान हिंदुसभा नि शुद्धिसभा! भोपाळ संस्थान हिंदुसभा, निझाम संस्थान हिंदु मंडळ, ग्वाल्हेर संस्थान हिंदुसभा, कच्छ काठेवाड संस्थान हिंदुसभा आणि अशाच अन्यही ह्यातील पुष्कळशा तर आता नुकत्याच कार्यान्वित झाल्या आहेत. आणि ह्यांच्यापैकी  सर्वच्या सर्वही हिंदुसभांनी कमालीची प्रशंसनीय अशी प्रगती केली आहे. उत्साहवर्धक नि संतोषदायी अशी गोष्ट ही; की, हिंदुस्थानच्या बाहेरसुद्धा, हिंदुसभेच्या संघटना बांधल्या जात आहेत; आफ्रिका, जपान, त्रिनिदाद आणि अन्य काही देशांमध्ये त्रिनिदाद हिदुसभेची चांगली प्रगती होत असल्याचे वृत्तांतांवरून दिसून येते.

संस्थानातील हिंदुसभांपैकी विशेषतः निजाम हिंदुमंडळ या संस्थेच्या कार्याचा विशेष उल्लेख करणे अवश्य आहे. ह्या संस्थेच्या कार्यावरून्च काय पण तिच्या नुसत्या अस्तित्वावरूनदेखील एक गोष्ट सिद्ध होते. ती म्हणजे निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीपासून त्या संस्थानांतील हिदूंचे सामर्थ्य नैतिकदृष्ट्या नि प्रत्यक्ष व्यवहारातही पुष्कळच वाढले आहे. निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ होण्यापूर्वी नागरिक नि धार्मिक स्वातंत्र्याचे जे अधिकार तेथील हिंदू लोकांना पूर्वी नाकारले होते ते आता मर्यादित स्वरूपात का होईना पण त्यांना प्राप्त झाले असून त्यांच्या साह्याने तेथील हिंदू आपली चळवळ बळकट करू शकतील, स्वातंत्र्याचे अधिक अधिकार संपादन करू शकतील आणि आज संबंध संस्थानभर आततायी मुसलमान गुंडांनी जो धुमाकूळ माजविला आहे; त्यापासून ते आपले रक्षण करू शकतील. तेथील हिंदुमंडळाने मोठमोठ्या नगरांतून आपल्या शाखा स्थापन केल्या असून हिंदुसंघटनेचे कार्य त्वरेने चालविले आहे. निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीमुळे त्या संस्थानातील हिंदू लोकांमध्ये जी जागृती नि चेतना निर्माण झाली; ती निःसंशयपणे टिकली असून तेथील हिंदूंमध्ये आपण आपले संरक्षण करू शकू; असा पुरुषोचित आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

ह्या वर्षांत, हिंदूवर अनेक ठिकाणी आघात करण्यात आले. त्यापैकी पुष्कळांच्या संबंधात हिंदूंनीही प्रत्याघाताने ते परत उलटविले. एवढेच नव्हे तर जे मुसलमान गुंड हिंदूविरोधी दंगे नि लुटालूट करून पूर्वीच्या काळी साखसुरतपणे शिक्षेवाचून सुटून जात असत; त्यांस त्यांनी आपल्या प्रतिकारक चळवळीने शरण आणून त्यांचा कित्येक ठिकाणी बंदोबस्तही केला. अगदी ह्यावर्षीसुद्धा, हिंदूंच्या विरुद्ध संघटितपणे आणि बलात्कारी भयंकर राक्षसी अशा काही दंगली त्या संस्थानात करण्यात आल्या. उदाहरणार्थ नांदेडची दंगल! तिथे तर त्या संस्थानचे आरक्षी

(पोलीस) आणि प्राधिकारी चटसारे मुसलमान; त्यांनी हिंदूंचा अगदी मागेपुढे न पाहता, न कचरता छळवाद मांडला! पण अशा घटना सापेक्षतः काही वर्षापूर्वी जी स्थिती सामान्यतः सातत्याने होती; त्यामानाने थोड्याच म्हणावयाच्या तथाकथित 'ब्रिटिश इंडिया'मध्येसुद्धा फाजील उत्साही धर्मवेड्या मुसलमानांनी घडविलेले स्फोट, ज्यांची कशी ती माहितीच नाही अशातला ही भाग नव्हे; आपण पक्के लक्षात ठेवावयासच हवेत. जसा जितपत नि जोपर्यंत ह्या संस्थानांशी संबंध यावयाचा, तसा तितपत नि तोपर्यंत ह्या विषयात एक नवा पैलू (घटक) ध्यानात ठेवायलाच हवा तो म्हणजे, संस्थानातील हिंदूंची प्रत्याक्रमणशीलता! प्रथम त्यांच्यावर हल्ला झाल्यास वाढता प्रतिकार करून त्यावर प्रतिहल्ला चढवून निर्णायक मात करण्यासाठी अवसान एकवटून चढत्या वाढत्या श्रेणीने प्रतिकार सातत्याने करीत राहून, हिंदूंनी दाखविलेले नीतिधैर्य; चैतन्यशील प्रवृत्ती होय. जर ही चैत्यन्यशील प्रवृत्ती सतत वृद्धिंगत होत राहील; आणि हैदराबाद संस्थानातील हिंदू एका हिंदू आघाडीत एकसंघ एकवटतील; जे हिंदुहितकारणासाठीच प्रतिज्ञाबद्ध आहेत अशा प्रतिनिधींनाच मते देतील; तर अल्पावधीतच त्या संस्थानात असलेल्या हिंदूंच्या लोकसंख्याबळाच्या आधारे मागता येतील तितके अधिकांत अधिक, सांविधानिक अधिकार हिंदूना देण्यास बाध्य करण्याअतका पुरेसा प्रभाव निझाम शासनावर ते ठामपणे निश्तितच टाकू शकतील; आणि जसे अशाच प्रकारच्या बहुसंख्य जमात असण्याच्या युक्तिवादेकरून काश्मीरच्या मुसलमानांनी ह्यापूर्वीच अधिकार मिळविले आहेत.

ह्यावर्षी पूर्वीच्या कोणत्याही वर्षापेक्षा महासभेचे प्रचारकार्य अधिक व्यापक प्रमाणावर संबंध वर्षभर चालविण्यात आले. यासंबंधी आपले अनुभवी नेते धर्मवीर डॉ. मुंजे, यांना आपण धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांनी आपल्या उतारवयाची चिंता न बाळगता वर्षभर या प्रांतातून त्या प्रांतात सतत सारखे प्रचारकार्य चालू ठेविले. सर मन्मथनाथ मुखर्जी, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी, धर्मवीर भोपटकर यांच्यासारखे अत्यंत प्रभावशाली पुढारी आणि शेकडोशे प्रांतिक पुढारी नि संघटक यांनी धार्मिक सेवाभावी मिशनऱ्यांप्रमाणे अथवा तपस्व्याप्रमाणे स्वार्थ- निरपेक्षपणे निष्ठापूर्वक रात्रंदिवस झटून नि महासभेच्या कार्यासाठी मोठमोठे दौरे काढून प्रचार केला. त्या वर्षांत शंभराहून अधिक ठिकाणी प्रांतिक नि जिल्हा परिषदा केवळ नव्हे, तर तालुका परिषदाही झाल्या. स्थानिक सभांची संख्या तर सहस्रांनी मोजावी लागेल. हिंदुसंघटनेचे वाङ्मय गाडेच्या गाडे भरून महत्वाच्या केंद्रातून हिंदुस्थानभर विनामूल्य वितरित करण्यात आले.

निवडणुकीच्या क्षेत्रातही या वर्षी हिंदुमहासभेला काही ठिकाणी लक्षणीय यश प्राप्त झाले आहे. हिंदूंचे हित साधावयाचे असेल तर हिंदू समाजातील बुद्धिमान मतदारसंघाला ह्या सत्य स्थितीचे आकलन होऊ लागले आहे, की आता न चुकता, हिंदुसंघटनवादी प्रतिनिधींनाच, मते दिली; तर हिंदूंच्या हितसंबंधांची जपणूक ते उत्तम रीतीने करू शकतील; आणि जोपर्यंत काँग्रेसचा अच्छुक काँग्रेसच्या तत्वज्ञानाशी बांधला गेलेला आहे, तोपर्यंत त्याला मत देणे

आत्मघातकीपणाचे आहे. याला उदाहरण म्हणून कलकत्ता महापालिकेच्या निवडणुकीचे घेता येईल; ती अतिशय चुरशीची झाली.

वास्तविक हिंदुमहासभेने काँग्रेसच्या दीर्घकालीन आणि खंबीरपणे प्रस्थापित 'हिंदुमतदानाच्या' एकाधिकारशाहीला उघड उघड अगदी प्रथमतःच आव्हान दिले असताही बंगाल हिंदुसभेने कित्येक निर्वाचन अधिष्ठानामध्ये अगदी नेत्रदिपक यश मिळविले. परिणामी महापालिकेमध्ये काँग्रेसला काँग्रेसच्या दर्शिकेवर निवडून आलेल्या काँग्रेसवाल्यांचा स्वतःचा बहुमताचा पक्ष, बनविता आला नाही.

अनेक ठिकाणी अर्थातच हिंदुमहासभेला अपयशही सोसावे लागले, यात काही फारसे आश्चर्य नाही. किंबहुना आणखी काही वर्षेपर्यंत प्रत्येक निवडणुकीत आपणास तडाखे सोसावे लागतील; हे धरून चालून त्या सिद्धतेनेच आपण त्यात पडले पाहिजे. हिंदु मतदार संघाला अजून पुष्कळच जुन्या गोष्टी विसरावयास लावून नवीन शिकवावयाच्या आहेत. आजपर्यंत त्यांच्या मनावर एकाच गोष्टीचा पगडा बसलेला आहे ती म्हणजे डोळे मिटून, जिभा बांधून आणि कोणत्याही प्रकारचा विचार न करता काँग्रेस म्हटली की तिच्या बाजूने मत देणे; एवढेच आपले कर्तव्य आहे, असे आजपर्यंत ह्या मतदारसंघांच्या मनावर बिंबविण्यात आलेले आहे. त्यांचा ठसा इतक्या घाईने जाण्यासारखा नाही. तथापि या पराजयापासूनही आपण योग्य तो बोध काळजीपूर्वक घेतला पाहिजे. याचे उदाहरण म्हणजे कर्णावती (अहमदाबाद) येथील नगरपालिकेच्या या महिन्यात झालेल्या निवडणुकीत हिंदुसभेने उभे केलेले सर्व अच्छुक पडले हे होय.

ह्या संबंधात एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. काँग्रेसच्या निवडणुकीतील मिरासदारीस हिंदुसभेने या वेळी पहिल्या प्रथमच आव्हान दिले होते. काँग्रेस स्वतःला जरी केवळ 'राष्ट्रीय' म्हणून घेत असली तरी, तिने मुसलमान मतदारसंघातून आपला एकही प्रतिनिधी उभा केलेला नव्हता. निवडणुकीच्या दिवशी या सर्व काँग्रेसवाल्यांनी आपण हिंदू आहो; असेच स्वतःस म्हणवून घेतले; आणि केवळ हिंदूंचीच मते मागितली. या दिवशी आपण हिंदू आहोत; असे म्हणवून घेताना त्यांच्या 'राष्ट्रीयपणा'ला काही एक कमीपणा वाटला नाही. इतर वेळी हिंदू म्हणवून घेणे ही गोष्ट ज्यांच्या राष्ट्रीयपणाच्या प्रतिष्ठेला अत्यंत हानिकारक वाटते; तीच गोष्ट, जेव्हा निवडणुकीचा दिवस उगवतो त्या दिवशी मात्र ते विसरून जातात! हिंदुमहासभेने त्या निवडणुकीत इतक्या जोराची लढत केली की, काँग्रेस पक्षाला आपली होती नव्हती; तेवढी सर्व पुण्याई खर्च करावी लागली. देशभक्त वल्लभभाई पटेल यांची 'कारावासयात्रा' निवडणुकीच्या थोडे पूर्वी हेतुतः विचारपूर्वक कर्णावती येथेच घडवून आणण्यात आली. आणि त्यांना अटक होताच त्यांचा शेवटचा संदेश म्हणून सर्व नागरिकांना घोषित करण्यात आले की, कोणाही मतदाराने हिंदुसभेला एकही मत देऊ नये. जणू काय देशभक्त पटेल यांनी कारावास पत्करला तो केवळ याकरताच आणि जणू

काय हिंदुमहासभेला मत दिले नाही म्हणजे काँग्रेस सत्याग्रहीच्या कार्याची अतिकर्तव्यता झाली नि हिंदुस्थानला जे मिळवावयाचे तेही मिळाले.

तथापि या निवडणुकीचा हिंदुसभेच्या प्रचाराच्या दृष्टीने एक चांगला लाभ झाला. हिंदुसभेच्या तत्वज्ञानाचा प्रसार करण्यास ही चांगली संधी प्राप्त झाली; आणि जो जो काँग्रेसवाले बेताल होऊ लागले, तो तो हिंदुसभावाद्यांचे म्हणणे तरी काय आहे; हे समजून घेण्याकरता हिंदुसभांच्या सभांना, श्रोत्यांची गर्दी अधिकाधिक वाढू लागली. काही काही सभा तर फार मोठ्या झाल्या. श्री. चंद्रगुप्त वेदालंकार आणि प्रा. देशपांडे यांच्यासारखे महासभेचे लोकप्रिय वक्ते तेथे गेले; तेव्हा त्यांच्या सभेस काँग्रेसच्या कोणत्याही सभेपेक्षा अधिक श्रोत्यांची गर्दी जमली होती. शेवटी काँग्रेसवाल्यांनी आपल्या निर्वाणीच्या हत्याराचा की, ज्याचा प्रत्येक निवडणुकीच्या चळवळीत ते उपयोग करतात; त्याचा म्हणजे गुंडगिरीचा त्यांनी भरपूर उपयोग केला. हिंदुसभेच्या प्रकट सभा कित्येक ठिकाणी त्यांनी उधळून लावल्या; आणि सभेतील दंगल रोजचीच ठरून गेली. ती इतकी की निवडणुकीच्या वेळी हिंदुसभेच्या मतदारांना त्यांनी अतिशय उपद्रव दिला. एवढेच नव्हे; तर, अहिंसक धर्माचा सर्वांत श्रेष्ठ आचार म्हणून की काय काँग्रेसवाल्या गुंडांनी हिंदुमहासभेच्या कार्यालयावर हल्लाही केला. त्यात कित्येक लोकांना इतके भयंकर घाव झाले; की त्यांना शेवटी रुग्णालयात पोचवावे लागले; नि पोलिसांना मध्ये पडून हिंदुसभेचे कार्यालय आपल्या रक्षणाखाली घ्यावे लागले. निवडणुकीच्या दिवसानंतरही एखाद दुसरा दिवस त्या रस्त्यावर पोलिसांना पहारा ठेवावा लागला होता.

हा प्रसंग थोडीफार लांबण लावूनच जो उल्लेखिला आहे; त्याचे कारण हेच, की तो हिंदुमहासभावाद्यांसाठी एक नीतिपाठ (धडा) आहे. ''ब्रिटिश शासनाने, नाकारलेल्या भाषणस्वातंत्र्याचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी म्हणून, सत्याग्रहाचा आश्रय काँग्रेसने सध्या घेतला आहे'', असे काही काँग्रेसवाले म्हणतात. तर दुसऱ्या काही काँग्रेसवाल्यांचे म्हणणे असे की, ''साऱ्या जगात आत्यंतिक परिपूर्ण निरंकुश अहिंसेच्या राजवटीची उद्घोषणा करण्यासाठी तो आश्रय घेतला आहे.'' हा सत्याग्रह चालू असतानाच्या सप्ताहामध्येच कर्णावती येथील आधी सांगितलेल्या प्रसंगाच्या पकाशात आम्हाला असे विचारल्यावाचून राहवत नाही; की ब्रिटिशांकडून भाषणस्वातंत्र्याचा अधिकार जो काँग्रेसवाले मिळवू इच्छितात तो केवळ, स्वतःसाठीच की काय? आणि हिंदुसभेच्या कार्यालयावर नि सभांवर काँग्रेसवाल्यांच्या स्वतःच्या स्वैरपणे चालविल्या जाणाऱ्या, तुटून पडणाऱ्या लाठ्याकाठ्या नि शस्त्रास्त्रे यांवर बंदी घालणे हाच त्या परिपूर्ण निरंकुश अहिंसेच्या राजवटीचा अर्थ असेच नाही काय? आणि तसे असेल; तर काही झाले तरी भाषेची सत्यता प्रामाणिकभाषा अशी अपेक्षा करीत नाही काय, की काँग्रेसच्या ह्या मोहिमेला 'सत्याग्रहाचे ठायी 'असत्याग्रह' हेच नाव अधिक चांगले शोभून दिसावे?

परंतु काँग्रेसने निवडणुकीमध्ये गुंडगिरीचा जरी भरपूर उपयोग केलेला असला; तरी निवडणुकीत काँग्रेसला जे यश मिळते त्याचे श्रेय केवळ गुंडगिरीलाच आहे; असे मानण्याची चूक

आपण करता कामा नये. काँग्रेस ही संस्था फार जुनी आहे. एवढ्याच कारणाकरिता, तिच्यावर मताच्या वेळी भाळण्याचा आत्मघातकी मूर्खपणा दाखविण्याची वृत्ती अद्याप बऱ्याच मोठ्या हिंदू मतदारसंघात स्वतंत्रपणे नि जाणतेपणे नांदत असून ती अद्याप नाहीशी झालेली नाही. ती नाहीशी होण्यास अजून काही काळ जावा लागणार आहे.

म्हणून कर्णावती (अहमदाबाद) सारख्या ठिकाणी निवडणुकीत अपयश आले म्हणून निराशून न जाता किंवा सिंध प्रांतात कलकत्ता, दिल्ली, महाड यासारख्या ठिकाणी मिळालेल्या यशाने चढूनही न जाता; आपण हिंदुसंघटनवादी मंडळींनी निदान सध्या तरी यशापयशाची क्षिती न करता निवडणुका लढवीत राहिले पाहिजे. निवडणुकीत यश मिळणे किंवा न मिळणे ही गोष्ट मतदारसंघांच्या शहाणपणावर किंवा मूर्खपणावर अवलंबून असणारी आहे. आणि मतदार-संघाला योग्य मार्गावर आणावयाचे असेल; तर तुम्ही निवडणुका लढवीत राहिले पाहिजे. कारण आपल्या मतांचा प्रचार करण्याची ती एक मोठी संधि असते तिचा आपण लाभ घेतला पाहिजे. आजच्या काळातील मोठमोठे नि प्रबळ पक्षच नव्हेत, तर फॅसिस्ट किंवा बोल्शेव्हिक घेतले तरी; त्यांना सुद्धा, एका चुटकीसरशी निवडणुका जिंकता आलेल्या नाहीत. आरंभीच्या काळात त्यानासुद्धा अपयश घ्यावे लागले आहे. पण आपण जर सावधगिरी बाळगली; मोठमोठ्या ठिकाणच्या निवडणुकीच्या मोहिमा कशा चालविण्यात येतात; त्या तंत्राचा जर अभ्यास केला; आणि नंतर प्रत्यक्ष निवडणुकी लढविल्या; तर, आजच्याही परिस्थितीत आपणाला परिणामकारक असा अल्पसंख्यांकाचा गट ठिकठिकाणच्या विधिमंडळातून नि स्थानिक स्वराज्य संस्थांतून निर्माण करता येणे अगदी शक्य आहे. असा निष्ठावंत हिंदुसंघटनवाद्यांचा गट जरी अल्पसंख्यांक असला; तरी बहुमती काँग्रेसवाल्यांवर त्याला आपला दाब नक्की आणता येईल. त्याला हिंदूंच्या दुःखांना वाचा फोडता येईल आणि अधिक राजकीय सत्ता संपादन करण्याचा मार्ग मोकळा करता येईल. एवढेच काय पण जरी यदाकदाचित आपणाला निवडणुकीत एकही अच्छुक निवडून आणता आला नाही; तरी देखील निवडणूक लढविण्यानेच केवळ आपले त्याप्रीत्यर्थ होणारे श्रम भरून येणारे आहेत. त्यामुळे जो प्रचार होतो. त्यानेच काँग्रेसवाल्यांच्या उच्छृंखलपणाला आळा पडेल.

कारण निवडणूक न लढता जिंकली जाणे अशक्य आहे; या गोष्टीची त्यांना एकदा जाणीव झाली म्हणजे त्यायोगेच काँग्रेसवाल्यांना आपल्या मतदारसंघापुढे आपण हिंदुहितविरोधी कसे नाही; हे सिद्ध करून दाखविण्याची पाळी येईल; नि त्यांचा प्रतिस्पर्धी हिंदुसंघटनवादी त्यांचे वाभाडे काढू लागला म्हणजे निवडून येण्यासाठी का होईना, मिथ्या राष्ट्रवादाच्या कल्पनेने वाहवून गेलेल्या काँग्रेसवाल्यांची हिंदुहितविरोधी कृत्ये करण्याची छाती होणार नाही. जर हिंदसंघटनवादी पक्ष सतत निवडणुका लढवू लागला तर एक दिवस असा उजाडेल की जेव्हा हेच हिंदू काँग्रेसवाले कपाळावर गंधाचे टिळे लावून नि हातात तुळशीच्या माळा घेऊन मतदारसंघाकडे जाऊ लागतील नि संघटनवादी हिंदू कसे नास्तिक आहेत नि आपण काँग्रेसवाले हिंदू मात्र कसे धर्माचे पुतळे आहोत; याचे प्रदर्शन करू लागतील!

www.savarkarsmarak.com

ह्या कारणाकरता कर्णावती (अहमदाबाद) येथील हिंदूंनी इतक्या विरोधी परिस्थितीत देखील निवडणूक लढविली; याकरिता मी त्यांचे फार मनःपूर्वक अभिनंदन करतो. निवडणुकीत अपयश येईल या भीतीने निवडणूक लढविण्याचे त्यांनी टाळले नाही नि आपल्या विचारप्रणालीशी प्रतारणा न करता त्यांनी इतकी जोरकस लढत शेवटपर्यंत दिली; यात त्यांनी आपले कर्तव्य चोख केले. ज्या मतदारसंघाने हिंदुहिताच्या विरोधी असणाऱ्या काँग्रेसला आपली मते दिली त्याला आता आपल्या चुकीची लवकरच भरपाई करावी लागेल. मौज ही, की कर्णावती (अहमदाबाद) येथील निवडणुकीच्या आठवड्यातच या चुकीची भरपाई कशी करावी लागणार आहे. हे उघड झाले असून काँग्रेसवाल्यांमुळे तेथील हिंदुंना खाली मान घालण्याचा प्रसंग कसा ओढवला आहे हे स्पष्ट झाले. हा प्रसंग जरी आहे लहानसाच तरी पण शितावरून भाताची परीक्षा त्यायोगाने होणार आहे. कर्णावती (अहमदाबाद) येथील एका शिक्षणसंस्थेत सुमारे अकराशे हिंदू विद्यार्थी आहेत आणि सुमारे अैंशी मुसलमान विद्यार्थी आहेत. या शाळेत एका समारंभप्रसंगी 'वंदे मातरम्' या पदातील ज्या पहिल्या कडव्याला काँग्रेसवाल्यांनी मोठ्या शिकस्तीने ते अगदी निरुपद्रवी आहे; अशी संमती पूर्वीच दिली होती तेवढेच म्हणायचे होते. पण तेवढ्या 'वंदे मातरम्' पदालाच मुसलमान विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतला. झाले! काँग्रेस सरकार राज्यावर होते. त्यावेळी त्यांनी यासंबंधाने निर्गमित केलेले एक परिपत्रक शाळा चालकांनी आपल्या संचातून बाहेर काढले आणि जर मुसलमानांनी विरोध केला तर वंदे मातरम् हे पद किंवा त्याचा कोणताही भाग म्हणू नये; असा त्यातून आधार दाखवून त्यास अनुसरून वंदे मातरम् पद म्हणावयाचेच सोडून दिले. हिंदू विद्यार्थी संतापले तरी ते पद म्हणण्याचा भाग सर्वच्यासर्वच गाळून टाकण्यात आला! म्हणजे केवळ ८० मुसलमान विद्यार्थ्यांच्या मनोभावनांपुढे ११०० हिंदू विद्यार्थ्यांच्या मनोभावना या केवळ तुच्छ होत! याचे नाव काँग्रेसची लोकशाही पद्धती!

**सिंधमध्ये हिंदुहितरक्षणार्थ,**
**करता येणे जे जे शक्य ते ते सारे काही**
**हिंदुमहासभा करीत राहिली आहे.**

गेल्या वर्षातील हिंदू संघटनांच्या कार्याचा विचार करीत असता सर्वांमध्ये सिंध प्रांतातील हिंदुसभेच्या किंबहुना तेथील हिंदुसंघटनवादी पक्ष, हिंदीपंचायती धर्मसभा, अत्यादिकांचा विशेष प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. ही सर्व मंडळी खरोखर अभिमानास पात्र आहेत. सिंध प्रातांत खुनी प्रवृत्तीच्या मुसलमान धर्मवेड्यांनी सबंध वर्षभर हिंदूविरुद्ध जे हत्याकांड चालविले आहे; त्याला न डगमगता जे आपले मरण उघड्या डोळ्यांनी नित्य पाहात असताही, आपल्या धर्माला चिकटून राहिले ते खरोखर धन्य होत! आपण सिंधमधील हिंदूंना यापेक्षा अधिक काहीच सहाय्य देऊ शकत नाही. या आपल्या दुर्बल परिस्थितीची आपणाला किती दुःखद जाणीव आहे; हे सर्वांना माहीत आहे. पण आपण इतके समजा की सशस्त्र प्रतिकार सोडून बाकी सर्व प्रकारचा प्रतिकार हिंदुमहासभा; किंवा अगदी बरोबर बोलावयाचे म्हणजे हिंदुसंघटनवादी पक्ष प्राप्त परिस्थितीत करीत आहे. सिंधमधील हिंदूचे हितसंरक्षण करण्यासाठी म्हणून जे जे काही आणखी करणे शक्य आहे ते ते सर्व महासभा करीत आहे.

सुमारे दोन वर्षांपूर्वी मी सिंध प्रांतांत हैदराबाद कराची, सक्कर, शिकारपूर, रोहरी इत्यादी भागात गेलो होतो. नि तेथील स्थानिक परिस्थितीचा अभ्यास केला होता. सिंध प्रांतिक हिंदुसभेने सक्कर येथे भरविलेल्या प्रांतिक परिषदेचे मी अध्यक्षस्थान स्वीकारले होते. त्या परिषदेच्या वेळीच हिंदूंनी मंझलग्यावरील मुसलमानांच्या आक्रमणाला विरोध करण्याचे निश्चित ठरविले होते. त्याच वेळी आपली गाऱ्हाणी चव्हाट्यावर मांडण्याचे नि मुसलमानानी आक्रमणाला सिंध प्रांताचा बळी देण्याच्या काँग्रेसवाल्यांच्या कारवाईला तोंड देण्याकरिता हिंदुसंघटनवाद्यांची जोरकस फळी उभी करावयाचे त्यांनी ठरविले. प्रांतिक हिंदु सभेची पुनर्घटना करून तीत सनातन सभा, शीख, आर्यसमाजी नि इतर हिंदुसंघटनवादी पक्षांचा समावेश करण्यात आला; नि ह्या सर्वांचा मिळून एक हिंदुपक्ष, बनविण्यात आला. त्या वेळेपासून आपण हिंदूंचेही प्रतिनिधी आहो; असे दाखविण्याची काँग्रेसची कारवाई सिंध प्रांतिक हिंदुसभेने यत्किंचितही चालू न देता, हिंदुत्वाच्या भूमिकेवरून, प्रांतिक विधिमंडळात नि स्थानिक स्वराज्य संस्थांतून आपले प्रतिनिधि निवडून आणण्यासाठी निवडणुका लढविण्यास सुरवात केली. तेव्हांपासून त्यांनी काँग्रेसच्या अच्छुकांना कित्येक ठिकाणी निवडणुकात पराभूत केले असून, तेथील प्रांतिक विधिमंडळात स्थानिक स्वराज्य संस्थांतून हिंदुसंघटन-वाद्यांचा अल्पसंख्यांक पण अतका प्रबळ पक्ष केला की, त्यांच्या सहाय्यावाचून प्रांतातील मुसलमानी प्रधान-मंडळाचे आसनही स्थिर राहाणे कित्येकदा अशक्य झाले. यावाचून तेथील मंत्रिमंडळातील दोनतीन हिंदू मंत्री हिंदुत्वाच्या प्रतिनिधित्वाशी निगडीत झालेले आहेत. अशा रीतीने तेथील हिंदू अधिकाधिक संघटित होऊन मंझलग्याच्या

प्रश्नावर आपला जोरदार विरोध प्रकट करू लागले. तेव्हा मुसलमानांनी उघड उघड ठिकठिकाणी बंडे केली. आणि हिंदूंचे जिवीत नि मालमत्ता यांचे संरक्षण करणे अशक्यप्राय करून सोडले.

काँग्रेसवाल्यांनी सिंध प्रांतातील हिंदूंना प्रांत सोडून जा असा उघड उपदेश केला होता. परंतु त्याकडे हिंदुसंघटनवाद्यांनी तिरस्कारानेच पाहिले. त्यांनी आपल्या घरादाराचे नि मालमत्तेचे संरक्षण करण्याचा निश्चय केला आहे. काय वाटेल ती परिस्थिती प्राप्त होवो. जोपर्यंत सिंध प्रांतात एक तरी हिंदू जिवंत असेल; तोपर्यंत सिंधू नदीच्या तीरावर हिंदुत्वाचा ध्वज फडकत राहिलाच पाहिजे असा त्यांनी निर्धार केला आहे.

तेव्हापासून मुसलमानांतील खुनी प्रवृत्तीला चेतना मिळून त्यांनी गावोगाव दंगे सुरू केले. पण सिंध प्रांतिक हिंदुसभेच्या कार्यकर्त्यांनी आपले जिवीत तळहातावर घेऊन हिंदूंचे संरक्षण करण्याकरिता आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली. हिंदुसभावाद्यांचा त्यांच्या पुढाऱ्यांचा नि अनुयायांचा छळ करण्यात आला; त्यांच्यावर खटले भरण्यात आले. कित्येकांना सीमापारीची शिक्षा झाली. कित्येक तुरुंगात पडले, आणि कित्येक शस्त्रांच्या वारांनी घायाळ झाले. तथापि अशा प्रकारच्या परिस्थितीतही कोणत्या क्षणी आपल्या जिवितावर बेतेल याचा नेम नाही अशाही स्थितीत त्यांनी निर्धाराने आपली प्रतिकाराची चळवळ उभी केली; नि एक सशस्त्र प्रतिकार सोडून प्रतिकारांच्या सर्व मार्गांचा अवलंब करून मुसलमानांचे बंड त्यांनी मोडून काढून हिंदूंना धीर दिला. इतर प्रांतातील हिंदुसभांनी आपल्या सिंधप्रातीय धर्मबांधवांनाही, शक्य तितक्या, सर्व पकारे सहानुभूती दाखविली. त्यांनी त्यांच्याकरिता शेकडो ठिकाणी सभा भरविल्या. सहानुभूतीचे ठराव पास केले. आणि निधि उभारून सिंध प्रांतातील निराश्रित हिंदू लोकांच्या सहाय्यासाठी पैसे पाठविले. सरकारकडे शिष्टमंडळे धाडण्यात आली; आणि हिंदुसभेचे म्हणणे त्यांच्या कानांवर घालण्यात आले. मी स्वतः व्हाअसरॉयना आणि सिंधच्या गव्हर्नरांना आग्रहपूर्वक कळविले की, सिंध प्रांतातील प्रांतिक स्वायत्तता आणि मुसलमानी मंत्रिमंडळ यांचे विसर्जन करून टाकून तेथील सर्व राज्यकारभार गव्हर्नरने स्वतःच्या हाती घ्यावा. मी व्हाईसरॉयना असे लिहिले; की, सिंध प्रातांत ज्या पकाराने हिंदूंची आज हत्या नि लुटालूट होत आहे; तशा तऱ्हेची हत्या जर युरोपियन स्त्रीपुरुषांची तेथे झाली असती तर आज सरकार जसे हात जोडून स्वस्थ बसले आहे; तसे ते बसले असते काय? मुसलमानांनी केलेल्या ह्या खुनी कटाचा योग्य प्रतिकार म्हणून त्यांची घरे-दारे सरकारने जमीनदोस्त केली नसती काय?

सिंधमधील मुस्लिम अत्याचारांसंबंधात साद्यंत वृत्तांत हिंदुमहासभा का पकाशित करीत नाही असा प्रश्न काही लोक वारंवार जो विचारतात त्याची मला मोठी मौज वाटते! ज्या हिंदूंना यातना सहन कराव्या लागल्या; त्यांच्या नाव-पत्त्यांसह निवेदने आणि त्यांच्या झालेल्या हानीसंबंधीचा स्थानिक कार्यकर्त्यांनी जेथल्या तेथे चौकशी करून नियमितपणे सिंध हिंदुसभेने वेळोवेळी वृत्तांत पकाशित केलेले आहेत. ही तर वस्तुस्थिती आहे. दोन वृतांत तर शासनानेच राजहृत केले आहेत. वृत्तांत पकाशित केले; म्हणून हिंदुसंघटनवादी मुद्रकांना प्रतिभूचाही भूर्दंड

सोसावा लागला आहे. अखिल हिंदुस्थानातील बहुतेक सगळ्या हिंदुत्वनिष्ठ संघटनवादी वृत्तपत्रांनी ते सर्व वृत्तांत पुनः पुनः सविस्तर मुद्रित केले आहेत. वास्तविक केवळ, हिंदुमहासभेची सहाय्यकार्ये नि हिंदुसंघटनवादी मुद्रक पकाशक ह्यांच्यामुळे सिंधी हिदूंवर कोसळलेल्या संकटांची रामकहाणी नि त्यांची गाऱ्हाणी सगळ्या हिंदुस्थानभर माहिती तरी झाली.

हिंदुमहासभावाद्यांच्या प्रभावी चळवळीमुळेच तेथील सरकारला नमते घ्यावे लागले; आणि सिंधच्या गव्हर्नरने तेथील मुसलमान मंत्रिमंडळाला प्रमुख दंगेखोरांचे संबंधात कडक उपाय योजणे भाग पाडले. खेड्यापाड्यांतून राहणाऱ्या हिंदूंना संरक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली; नि मुसलमान गुंडांवर वचक बसविण्यात आला. त्याचाच परिणाम म्हणून मुसलमान माथेफिरूंच्या सिंधमधील हिंदुविरोधी चळवळींना तात्पुरता आळा तरी बसला आहे. वरील वस्तुस्थिती लक्षात घेऊन मी कोणताच संकोच न बाळगता हे स्पष्टच पुन्हा एकदा, सांगून टाकतो की अखिल भारतातील हिंदुसंघटनवादी सर्व सामान्य जनतेच्या सहाय्याने हिंदुमहासभेच्या स्थानिक नि प्रांतिक शाखांच्या सहकार्याने प्राप्त परिस्थितीत दहशतवादांचा सशस्त्र प्रतिकार नि प्रत्याघात ह्यांवाचून जे काही अधिकात अधिक करता येण्यासारखे होते; ते सर्व सहाय्य संकटग्रस्त नि यातनांनी होरपळलेल्या हिंदूपर्यंत पोहोचविण्याचे कार्य हिंदुमहासभेने केलेले आहे. जे करता आले नाही; अशा दुसऱ्या साधनांचा विचार येथे प्रस्तुत नाही. आपल्या चर्चेच्या क्षेत्रात केवळ, विधिसंमत विधिसंगत नि घटनात्मक तरतुदींनुसार आवश्यक उपाय योजना नि साधनांचा विचार, काय तो, करता येणे शक्य आहे. आम्हाला वाटते आम्ही जे केले, ह्यापेक्षा आणखी अधिक तरी काय करू शकलो असतो? आणि जर सिंधमधील परिस्थितीत लवकरच अनुकूल अंतर पडले नाही; तर, परिस्थितीचा रागरंग पाहून, आवश्यक ती अधिक कठोर पावले टाकण्यात येतील.

### सिंध प्रांतातील हिंदूवर कोसळलेल्या संकटांचे दायित्व प्रथमतः नि मुख्यत्वे काँग्रेसचेच!

अशा प्रकारची ही सारी वस्तुस्थिती असतांना हेच काँग्रेसवाले तोंड वर करून असा दोषारोप ठामपणे करतात; की सिंधमधील हिंदूंच्या सहाय्याकरिता हिंदुमहासभेने काहीही केलले नाही. तेव्हा त्या काँग्रेसवाल्यांना खडसावून विचारावेसे वाटते की, मुंबई अलाख्यातून सिंध प्रांत वेगळा तोडण्यासाठीची सर्व कार्यवाही करण्यासाठी अटीतटीने हटून तुम्हीच बसला नव्हतात काय? आणि हे सर्व घाईत घडवून आणले नाहीत काय? आधी मुळात हे पाप तुमचे नव्हे काय? हिंदुमहासभेने सिंधच्या विभक्तीकरणाला आपल्याकडून कसून विरोध केला होता. आणि काँग्रेसवाल्यांना बजावले होते, की तुम्ही हे जे करीत आहा त्यायोगे तेथील हिदूंवर कल्पनातीत आपत्ती ओढवणार आहे. सिंध प्रांत वेगळा करण्यात मुसलमानांच्या कटाचा एक मुख्य भाग साधत होता. सिंध वेगळा करणे म्हणजे त्यांच्या पाकिस्तानच्या योजनेचा पाया भरणे होते. सिंध वेगळा झाला म्हणजे त्याच्या सीमेवर दबा धरून राहणाऱ्या मुसलमान माथेफिरू मारेकऱ्यांची टोळी तेथील

अल्पसंख्यांक हिंदूंवर तुटून पडेल हे त्या वेळी दिसत होते. आणि तसे झाले म्हणजे हिंदुस्थानभर पसरलेले अगदी सुसंस्कृत असे मुसलमान सीमेवरील या रानदांडग्या टोळ्यांच्या विरुद्ध आपले बोटही उचलणार नाहीत. एवढेच काय पण त्या प्रांतातील हिंदू एकजात केव्हा बाहेर पळून जातील किंवा नामशेष होऊन जातील आणि तो सबंध प्रांत शुद्ध दार-उल् इस्लाम म्हणजे मुस्लिम प्रदेश होऊन जाईल त्या क्षणाची ते वाट पहात राहतील त्यात काही गुपित नव्हते. महासभेचा सिंध प्रांत तोडण्याला तीव्र विरोध असताही केवळ मुसलमानांना खूष करण्यासाठी काँग्रेसवाल्यांनी सिंध प्रांत वेगळा करण्यास आपली संमती दिली; आणि आता त्यांच्या अफत्याला फळे येऊ लागल्यानंतर हेच काँग्रेसवाले विचारू लागले आहेत; की सिंधी हिंदूंकरिता तुमची ती हिंदुमहासभा काय करीत आहे?

ज्याने गावाला प्रथम आग लावली त्यानेच गावकऱ्यांना विचारावे की, आग विझविण्यासाठी तुम्ही काय करीत आहा? सिंध प्रांतात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांच्या करुण कहाण्या जेव्हा रोजच्या रोज प्रसिद्ध होऊ लागल्या; तेव्हासुद्धा काँग्रेसच्या वर्किंग कमिटीने त्या अत्याचारांचा निषेध करण्याकरिता हूं की चू केले नाही!

सिंधमधील हिंदूंवर एवढे अत्याचार झाले, पण त्या अत्याचारांच्या निषेधार्थ सबंध हिंदुस्थानात त्यांनी कोठेही निषधाची एक सभाही भरविली नाही! शेवटी जेव्हा हिंदुमहासभेच्या चळवळीने सरकारवर दाब आणून मुसलमान गुंडांविरुद्ध कडक उपाय योजावयाचा आग्रह धरला आणि तेथील प्रांतिक स्वायत्ततेच्या राज्य-कारभाराचे विसर्जन करून गव्हर्नरने सर्व सत्ता आपल्या हातात घ्यावी म्हणून सारखी मागणी सुरू केली तेव्हा मात्र त्यांची धावपळ सुरू झाली. गांधीनी तात्काळ मौलाना आझाद यांना सिंध प्रांतात रवाना केले. पण कोणती प्रमुख उद्दिष्टे दृष्टीसमोर ठेवून?

### मौलाना आझाद सिंधांत का गेले?

परंतु मौलाना आझाद यांचा सिंधमध्ये जाण्याचा विशिष्ट कार्यहेतू म्हणजे तेथील हिंदूंना संरक्षण मिळावे; हा नसून तेथील मुस्लिम मंत्रिमंडळाचे स्थैर्य हाच प्रामुख्याने होता. हिंदूंच्या संरक्षणासाठी किंवा त्यांच्या आपत्तीच्या निवारणार्थ त्यांनी काही एक योजना केली नाही; किंवा मुसलमान गुंडांच्या निषेधाचा एक शब्दही तोंडावाटे काढला नाही. त्यांना जी काय काळजी लागली होती; ती केवळ तेथील मुसलमानी मंत्रिमंडळ स्थिर कसे राहील एवढीच होती; आणि गांधींच्या सांगण्यावरून त्यांनी तेवढीच गोष्ट तेथे केली. कारण, न जाणो, हिंदुमहासभेची चळवळ जोरावली आणि जर सिंधप्रांत परत मुंबई अलाख्याला जोडण्याचे सरकारला भाग पाडण्यात आले; किंवा सर्व सत्ता गव्हर्नरनेच आपल्या हाती घेतली तर काय करता? मुसलमानांना, जर सिंध प्रांतात स्थिर सरकार स्थापन करता आले नाही; तर ब्रिटिशांच्याप्रमाणे आपणही पाकिस्तानवर तितक्याच

कार्यक्षमतेने राज्य करू शकतो, ह्याचा ब्रिटिश सरकारला पुरावा कसा द्यावयाचा? एवढ्याकरिता मौलाना आझादांची सिंधला जाण्यांतील सारी तळमळ होती. कारण हे जर कारण नसते, तर ज्या मुसलमान पक्षांच्या हातात तेथील सरकार आल्याबरोबर त्यांनी हिंदूंचे जिवीत अशक्यप्राय करून सोडले; त्यांच्याच हातात पुन्हा तेथील सरकार स्थिर करण्याची खटपट हे मौलाना आझाद का करीत आहेत, आणि तसे ते झाल्यास तेथील अल्पसंख्यांक हिंदूंचे जीवित आणि मत्ता ह्यांचे संरक्षण कसे होणार? किंवा तेथील परिस्थितीही कशी सुधारेल?

उलट तेथे जर ह्या मुसलमान पक्षात जूट होऊन त्यांच्या हाती सरकार स्थिर झाले; तर तेथील हिंदूंच्या जीविताला ते अधिकच घातक होणार आहे. सध्या सिंध प्रांतात गुन्हेगारीची चळवळ, जी थोडीफार दबलेली दिसते; तिचे कारण तेथील गव्हर्नरांनी चालविलेली कडक उपाय योजना हीच आहे. मौलाना आझादांनी सिंध प्रांतात पाऊल टाकण्यापूर्वीच तेथील गव्हर्नरच्या दटावणीमुळे मुसलमान गुंडांची पकडापकड सुरू झाली होती. सिंध प्रांतात, मुसलमान मंत्रिमंडळ स्थिर होण्याने तेथील अल्पसंख्यांक हिंदूंच्या नैर्बंधिक अधिकारांचे योग्य संरक्षण होणे शक्य नाही. त्याला एकच मार्ग नि तो म्हणजे सिंधमधील मुस्लिम राज्यकारभार स्थगित करून, पुन्हा तो प्रांत, मुंबई अलाख्याला जोडणे हाच होय.

### अखिल हिंदू चळवळीने हिंदू संस्थानिकांनासुद्धा सचेतन केले आहे.

ह्या वर्षांतील कार्यांचा विचार करता आणखी एक महत्वाची गोष्ट विचारात घेण्यासारखी आहे. हिंदु संस्थानिक हिंदुमहासभेच्या चळवळीकडे सहानुभूतीने पाहू लागले आहेत. अखिल हिंदु तेवढा एक या कल्पनेने आता मूळ धरले असून आपल्या थोर नि वीर्यशाली पूर्वजांच्या पराक्रमाच्या ज्योतीच्या पकाशाने सबंध हिंदू समाज आणि त्यांचे थोर पूर्वजांचे वंशज, हल्लीचे संस्थानिक, हेही, खडबडून जागे झाले आहेत. हिंदु संस्थानिकांना हिंदू चळवळीविषयी सहानुभूती वाटू लागली असून त्यांस आपल्या कर्तव्याची जाणीव होऊ लागली आहे. त्यांच्यातील जे दूरदर्शी नि धोरणी मुत्सद्दी आहेत, त्यांना आता एक गोष्ट कळून चुकली आहे; ती ही की, देशांत अखिल हिंदुत्वाची जी चळवळ दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे; तिच्याशी एकरूप होण्यातच आपला आधुनिक आणि भविष्यकालीन भाग्योदय अवलंबून आहे. ज्याप्रमाणे मुसलमान संस्थानिक हिंदुस्थानातील मुसलमानांनी चालविलेल्या राजकीय चळवळीशी एकरूप झाले आणि अखिल मुसलमान तेवढे एक अशी महत्वाकांक्षा त्यांनी बाळगली; त्याप्रमाणे हिंदू संस्थानिकांनी आजपर्यंत तसे केले नाही; ह्याला केवळ हिंदु संस्थानिकच सर्वस्वी उत्तरदायी नाहीत. सर्वसामान्य हिंदु समाज आणि विशेषतः कॉंग्रेसवाले हिंदू यांनी हिंदुसंस्थानिकांविषयी कधीही मायेचा एक चकार शब्दही काढला नाही. किंवा त्यांचे महत्वही ध्यानात घेतले नाही. उलट देशाभिमानाचा सारा मक्ता केवळ आपणाकडेच आहे अशी शेखी मिरवली आणि हिंदू संस्थानिक हे देशाच्या प्रगतीच्या आड येणारी

एक धोंड आहेत, असे मानून ती जितक्या लवकर दूर होईल तितके बरे; असा ते आजवर प्रचार करीत आले.

पण त्याच्या उलट मुसलमान समाजाकडे पाहा. त्यांना राजकारणाच्या वास्तववादाची बरोबर दृष्टि असल्यामुळे हिंदुस्थानांत जी काय थोडीशी मुसलमानी संस्थाने आहेत. त्यांच्याविषयी ते केवढा अभिमान दाखवितात; आणि मुसलमानी सामर्थ्याचे संघटित केंद्रस्थान म्हणून त्यांकडे ते अभिमानाने पाहतात. आपले निजाम आणि नबाब यांचे सामर्थ्य नि दरारा वाढावा. यासाठी त्यांची कितीतरी खटपट चालू असते.

त्याचप्रमाणे हिंदुस्थानांतील राजकीय चळवळ करणाऱ्या मुसलमानांनी चालविलेल्या अखिल मुसलमान तेवढे एक या चळवळीच्या सामर्थ्यावरच आपले भवितव्य सर्वस्वी अवलंबून आहे. हे तेथील मुसलमानी संस्थानिकांनी देखील ओळखले असून त्यांच्या चळवळीशी ते एकरूप झाले आहेत.

पण जर हिंदुसंघटनवादी राजकीय पुढाऱ्यांना राजकारणाची खरीखुरी दृष्टि उत्पन्न झाली असेल; तर त्यांच्या हे चटकन लक्षात एईल; की देशातील हिंदू संस्थाने हीच काय ती संघटित स्वरूपाची; सैनिक सामर्थ्याची नि सत्तेची कैंद्रे असून हिंदूंच्या सामर्थ्याला एक प्रबळ आधार आहे; आणि भविष्यकाळात हिंदू राष्ट्रांचे पुनुरुत्थान करण्यात जोरदार नि परिणामकारक रीतीने ह्यांचाच काय तो उपयोग होऊ शकेल. कारण आजही आपल्या येथे राजकारणाची मिरास सांगणारे आणि वाचाळी तत्वज्ञानावर भर देणारे आपल्यांतील पुढारी देशांत सामाजिक औद्योगिक किंवा सैनिकी दृष्ट्या काय करू शकत आहेत?

बडोदा, म्हैसूर, त्रावणकोर किंवा ग्वाल्हेर यांनी ज्या प्रकारची प्रगती करून दाखविली; तशी काही तरी ह्या राजकीय पक्षांनी करून दाखविली आहे काय?

या विषयाचे विवेचन करण्याचे हे स्थळही नाही आणि हा प्रसंगही नाही. माझी इच्छा एवढीच आहे; की, हिंदुस्थानांतील सर्व हिंदुसंघटनवाद्यांनी एक गोष्ट यापुढे लक्षांत ठेवावी. हिंदू संस्थानिकांच्या अंतःकरणात अखिल हिंदुत्वाच्या विचाराचे तत्वज्ञान जे आज मान्यता पावत आहे त्याचे त्यांनी स्वागत करावे, कारण जो जो ही हिंदु संस्थाने बलवान नि सामर्थ्यसंपन्न होत जातील तो तो या देशात अराजकासारख्या समस्या या देशावरील हिदुंविरोधी आक्रमणे ह्यासारख भयप्रद गंडातरे कमी कमी होत जातील.

हिदुस्थानात एकसंध हिंदुराष्ट्र उभे करण्याच्या हिंदूंच्या पुनरुत्थानाची चळवळ करण्याला जी काही प्रभावी साधने उपलब्ध होण्यासारखी आहेत; त्यात हिंदु संस्थानिकाचा सहभाग फार मोठा असणार आहे.

हिंदुस्थानांत मुसलमानांची दोन-तीन काय ती, नाव घेण्यासारखी संस्थाने असून त्यांच्याविषयी मुसलमान, केवढी आशा बाळगून आहेत आणि जर त्यांच्या आक्रमणाचा हिंदूंकडून प्रतिकार केला गेला नाही, तर या मुसलमानी सत्तांच्या केंद्रांचा आधार घेऊन त्यांच्या सहाय्याने

हिंदुस्थानभर मुसलमान सत्ता प्रस्थापित करण्याची त्यांनी आशा धरली, तर ती अशक्य ठरणार नाही.

पण या दृष्टीने आपण हिंदू लोकांनी आजपर्यंत हिंदू संस्थानिकांकडे लक्षच दिले नाही. आज या देशांत सुमारे पन्नास हिंदू संस्थाने अशी आहेत; की त्यांच्याजवळ सैन्ये आहेत. पोलिसांचे बळ आहे; पैसा आहे; राज्ययंत्र आहे; नि हे सर्व असून या देशांतील मुसलमानी संस्थाने जितकी कार्यक्षम आहेत; तितकी तरी ही आहेतच आहेत आणि त्यांच्यापैकी कित्येकांच्या राज्यांचा विस्तार युरोपांतील स्वतंत्र राज्यांएवढा आहे. ज्या वेळी आपण अशी वार्ता ऐकतो की खाकसार मंडळी आणि सीमेवरील पठाण लोक निजामाच्या निशाणाभोवती गोळा होण्याचा कट करीत आहेत; आणि त्याला स्वतंत्र मुस्लिम राजाच्या पदवीला नेऊन पोचविण्याचा प्रयत्न करीत आहेत; त्यावेळी आपले मन दचकून जाते. आपल्याला भीती वाटते आणि आता या भयानक प्रसंगाला तोंड कसे द्यावे हे आपणास समजेनासे होते. पण ही गोष्ट मात्र आपल्या लक्षात येत नाही; की निजामाला स्वतंत्र राज्यावर बसविण्याचे हवेतील किल्ले मुसलमान बांधीत असले तरी त्याला विरोध करणारेही कोणी आहेतच. आजही स्वतंत्र असलेले नि एक लाख सैन्य पदरी बाळगणारे हिंदूंचे नेपाळांतील स्वतंत्र राज्य, हिंदुत्वाच्या रक्षणाकरिता खांद्यावर बंदूक घेऊन उभे आहे. आपणांजवळ स्वतःच्या रक्षणाकरिता साधने नाहीत; असे समजून आपण निराश आणि दीन होऊन जातो; परंतु ते खरे नाही. आपणांला राजकारणातील खरीखुरी व्यावहारिक दृष्टी आलेली नसल्यामुळे आपली साधने कोठे आहेत? नि आपण त्यांचा उपयोग कसा करावा? हेच आपणांस माहीत नाहीसे झाले आहे. खरोखर! आपली राजकारणाची दृष्टि नाहीशी झालेली आहे. विचार करा. आज सहस्रावधी काँग्रेसवाले हिंदु असून ते उघड रीतीने असे म्हणतात; की नेपाळी हिंदु हे आपले कोणी नसून ते परके आहेत; आणि उलट सीमेपलीकडे असलेल्या मुसलमानी पठाणांची दीनपणे याचना करण्याकरिता ते आपला जीव टाकीत आहेत; कारण हे पठाण लोक त्यांना स्वतःचे असे वाटतात!

थोड्याच दिवसांपूर्वी गांधीजींनी चक्क सांगितले; की सीमेवरील पठाणांच्या सहाय्याने निजाम जर स्वतंत्र हिंदुस्थानचा बादशहा बनला तर आपण त्याच्या राज्यास होमरूल म्हणजे शेकडा १०० टक्के स्वराज्य असे मानू!!

याचा अर्थ सीमेच्या पलीकडे असणारे पठाण लोकसुद्धा काँग्रेसच्या राष्ट्रवादाच्या कल्पनेस बाध आणू शकत नाहीत; पण नेपाळांतील हिंदू गुरखे मात्र छेः! त्यांचे नावच नको! जे गुरखे लोक राजपुतांचे प्रत्यक्ष वंशज आहेत; जे केवळ सुमारे तीनशेच वर्षापूर्वी नेपाळांत गेले; त्या गुरख्यांचा संबंध आला तर मात्र राष्ट्रवादाची पार राखरांगोळी झाली असे मानणे, ही वृत्ती काय दर्शविते? हे राजकीय खुळेपण आज काँग्रेसमधील हिंदूंना ग्रासून टाकीत असून आमच्यावर जी खरोखर आपत्ती आहे तिचे मूळ कारण हे आहे. यावर एकच तोडगा नि तो म्हणजे अखिल हिंदुत्वाच्या संकल्पनेचा विकास हाच होय. एकदा हे तत्वज्ञान मान्य झाले; तर आपल्या सर्व चळवळीत

जिवंतपणाचा हुंकार उत्पन्न होईल. मग आपल्याशी आजच्याही परिस्थितीत किती तरी विपुल साधने उपलब्ध आहेत, याची आपणास सहज जाणीव होईल. आणि ह्या हिंदु संस्थानिकांचे सामर्थ्य हे केवढे मोठे परिणामकारक साधन आहे हे आपणास दिसून येईल.

म्हणून मी ह्या महत्वाच्या गोष्टींवर भर देऊ इच्छितो. हिंदु संस्थानिकांनासुद्धा ही गोष्ट आता पटत चालली आहे. याचा मला आनंद होतो. हिंदुत्वाचे रक्षण करणे हे या संस्थानिकांचे कर्तव्यच असून केवळ स्वार्थासाठीसुद्धा त्यांनी हिंदु चळवळीची वाढ करणे आवश्यक आहे.
जर हिंदुत्वाचा नाश झाला; तर हिंदु संस्थानिकांची राज्येही कोलमडून पडतील; आणि मेलेल्या शरीराचे अवयव ज्याप्रमाणे कुजून जातात; त्याप्रमाणे या समाजातील हिंदुत्वच मेले, तर त्याच्या शरीरांचे अवयव जी ही संस्थाने तीही नामशेष होतील.

## हिदुमहासभेचे राजकारण-राजकीय मंच हस्तगत

गेल्या दोन वर्षाच्या काळात हिंदुमहासभेची चळवळ कशी विस्तार पावत चालली आहे; हे या वरील माहितीवरून येथील लोकांना नि ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही समजून चुकले असेल. या वर्षी सरकारने हिंदुमहासभेला राजकीय क्षेत्रात मुस्लिम लीग आणि काँग्रेस यांच्याशी बरोबरीच्या नात्याने महत्वाचे स्थान देऊन तिचा वेळोवेळी अभिप्राय घेतला जाईल असे आश्वासन दिले ही गोष्ट हिंदुमहासभेच्या इतिहासात फार महत्वाची मानली पाहिजे. आजपर्यंत काँग्रेस आणि मुस्लिम लीग या दोनच संस्था सरकारच्या दृष्टीपुढे होत्या नि त्यांचे मत म्हणजेच हिंदुस्थानचे मत असे मानले जात होते. सरकारने काँग्रेस + मुस्लिम लीग = सर्व हिंदुस्थान हे जणू समीकरण पाठ करून टाकले होते. यापैकी मुसलमानांचे मत मांडणारी संस्था म्हणजे लीग होय यात शंका नाही. कारण लीग उघड उघड असा प्रचार करते की, आपण मुसलमानांचे हितसंबंध सांभाळणारे नि वाढविणारे आहोत. म्हणून सरकारला हिंदूंचे मत काँग्रेसमध्ये पाहावयास मिळेल, असेच नेहमी वाटत असे. काँग्रेस आणि मुस्लिम लीग, मिळून सबंध हिंदुस्थानातील लोकमत असे गृहीत धरले; म्हणजे मुसलमानांचे मत जर मुस्लिम लीग मांडणार; तर उरलेली संस्था, जी काँग्रेस ती मुसलमानांव्यतिरिक्त समाजाचे मत सांगणारी होय. असे सरकारने मानणे, हे स्वाभाविक होते. पण आपण हिंदूंचे प्रतिनिधि आहोत या आरोपाचा काँग्रेसवालेच अगदी पकटपणे तिरस्कार करीत आहेत. आणि म्हणून आपला भ्रांत राष्ट्रवाद सिद्ध करण्याकरिता त्यांनी शेकडो वेळा, हिंदुहिताचा बळीही दिला आहे! सिंध विभक्तीकरणाच्या वेळी जातवार प्रतिनिधित्वाच्या पकरणी सीमेवरील राजकीय धोरण ठरविण्यात हिंदुस्थानी भाषेच्या संबंधात इत्यादी अनेक प्रसंगी त्यांनी हिंदुहिताचा विश्वासघात केला आहे. परंतु इतके झाले तरी सरकार असेच म्हणत राहिले की हिंदुस्थानातील हिंदुमुसलमानांचे प्रातिनिधिक मत म्हणजे काँग्रेस नि मुस्लिम लीग यांचे मत होय.

अशा रीतीने ज्या काँग्रसवाल्यांना हिंदुत्वाच्या प्रतिनिधित्वाचा मोठा तिटकारा वाटत होता; त्यांचे मत ते हिंदूंचेच मत असे सरकार धरून चालत होते!

त्याचा परिणाम अशा झाला; की हिंदूंचा हिंदू म्हणून कोणीच खरा प्रतिनिधि राहिला नाही. एवढेच नव्हे; तर, सरकारच्या सर्व घटनात्मक विचारविनिमयांत नि गोलमेज परिषदांतून हिंदूंची बाजू अगदी उघड उघडपणे विकृत करून मांडण्यात आली.

परंतु हिंदुमहासभेच्या दिवसेंदिवस वाढत्या चळवळीमुळे, महत्वामुळे नि परिणामकारक कार्यामुळे सरकारला एक गोष्ट अखेर आपण पटवू शकलो! ती ही की ह्यापुढे कांग्रेस ही हिंदूंची प्रातिनिधिक संस्था नसून हिंदुमहासभा हीच एकमेव, हिंदूंची प्रातिनिधिक संस्था आहे. आणि म्हणून हिंदुस्थानातील राजकीय प्रश्नांचा जेव्हा साकल्याने विचार करावयास हवा असेल; त्या त्या वेळी हिंदूंचे मत अजमावण्याकरिता हिंदुमहासभेचे मत विचारांत घेतले पाहिजे. सरकारने पूर्वी बसविलेले समीकरण म्हणजे

काँग्रेस + लीग = हिंदुस्थानचे प्रातिनिधिक मत

ते आता बदलले असून; आता :

हिंदुमहासभा + लीग + काँग्रेस = हिंदुस्थानचे एकूण प्रातिनिधिक मतांची बेरीज.

हे नवीन समीकरण सरकारने मान्य केले आहे. हिंदुस्थानच्या सध्यांच्या राजकीय परिस्थितीत हेच समीकरण, बरोबर असल्याने व्हाईसरॉयनी विचारपूर्वक आणि निश्चितपणाने हिंदुमहासभेला, हिंदूंची एकमेव नसली; तरी प्रमुख राजकीय संस्था अशी मान्यता दिली; म्हणून मी त्यांचे आभार मानतो.

मुस्लिम लीग ही मुसलमानांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करते; हिंदुमहासभा हिंदूंच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करते. नि काँग्रेस दुसऱ्या कोणाचे प्रतिनिधित्व करीत नसून ह्याचे थोडे, त्याचे थोडे नि धड कोणाचेच नाही; असे धेडगुजरी काँग्रेसवाल्यांचे प्रतिनिधित्व करते. परंतु आज जरी हिंदुस्थान सरकारने हे नवे समीकरण मान्य केले असले; तरी ह्या समीकरणांतील खरा तात्पर्यार्थ सरकारने अद्याप, पुरतेपणी लक्षात घेतला आहे; असे दिसत नाही. ह्यांचे एक प्रत्यंतर म्हणजे अजूनही भारतमंत्र्यांच्या तोंडी काँग्रेस आणि लीग किंवा लीग आणि काँग्रेस हीच भाषा खिळून राहिलेली दिसते. हिंदुस्थानातील लोकमता-संबंधांने बोलताना सरकारने मान्य केलेले नवे नि योग्य असे समीकरण त्यांच्या तोंडी अद्याप बसलेले नाही; तथापि, हळू हळू ते त्यांच्याही गळी उतरत चालले आहे. हिंदुस्थानातील लोकमतासंबंधाने पार्लमेंटात बोलताना गेल्या नोव्हेंबर महिन्यांत त्यांनी काँग्रेस लीग आणि महासभा या समीकरणाचा उपयोग केला खरा, परंतु त्यांचा खरा अर्थ त्यांच्या लक्षात न आल्यामुळे हिंदु महासभा या नव्या नावासंबंधांने पार्लमेंटात बोलताना

त्यांनी आपल्या मनाशी एक नवी उपपत्ती बसविली. मुस्लिम लीग ही मुसलमानांची प्रातिनिधिक संस्था आहे. हे भारतमंत्र्यांना बरोबर समजले.

पण हिंदूंची प्रातिनिधिक संस्था काँग्रेस आहे, असे ते धरून चालत होते. तेव्हा काँग्रेस जर हिंदूंची प्रातिनिधिक संस्था मानावयाची तर हिंदुसभा कोणाची प्रतिनिधि असा त्यांच्यापुढे स्वाभाविक पेच पडला. तेव्हा त्यांना जवळचे नि सोयीचे असे जे कारण जोडता आले; ते त्यांनी जोडून दिले. पार्लमेंटात त्यांनी असे सांगितले; की काँग्रेस ही सामान्यतः सुधारलेल्या हिंदूंची प्रातिनिधिक संस्था असून हिंदुमहासभा ही मुख्यतः सनातनी वृत्तीच्या हिंदूंची संस्था आहे! 'सनातन हिंदूंची संस्था' अशा प्रकारची ब्रिटिश पार्लमेंटला हिंदुमहासभेची पहिल्या प्रथमच ओळख करून देण्यात आली. पण ॲमेरी साहेबांना हे जर कळले; की या हिंदुमहासभेचा स्वतः अध्यक्ष हा एक मोठा सुधारक असून तो स्वतः जन्माने ब्राह्मण असून सुद्धा आपल्या वैयक्तिक दायित्वावर अस्पृश्य समाजाबरोबर मोकळेपणाने जेवतो; तर काय मौज होईल बरे? त्यांनी हिंदुसभेसंबंधाने जेव्हा दुसऱ्या वेळी या महिन्यात उल्लेख केला तेव्हा मात्र त्यांनी महासभेची बरोबर ओळख करून दिली. आपण कोण आहोत; आणि हिंदुमहासभेचे तत्वज्ञान नि तिचे खरे स्वरूप काय आहे याचा आपण ब्रिटिश लोकांना परिचय करून दिला पाहिजे; आणि त्यासाठी लंडन येथे हिंदु-प्रचाराचे एक कायमचे केंद्र उघडले पाहिजे. ब्रिटिश लोकांना आणि सरकारला आपण असे पटवून दिले पाहिजे; की, हिंदुमहासभा ही सनातनीही नाही; किंवा नास्तिकवादीही नाही. किंबहुना कोणत्याच विशिष्ट 'वादा'ची पुरस्कर्ती नाही. हिंदुमहासभा ही एखादी हिंदुधर्मसभा किंवा एखादी धर्मसंस्था नाही. हिंदुमहासभा ही हिंदू राष्ट्रसभा आहे. या संस्थेचे उद्दिष्ट अखिल हिंदुराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे हे आहे. आणि त्यात सनातन्यांपासून पाखंड्यापर्यंत सर्वांचा समावेश झाला आहे.

सरकारने हिंदुमहासभेला हिंदूंची प्रातिनिधिक संस्था म्हणून मान्यता दिली; नि तिच्या अध्यक्षांशी वेळोवेळी विचारविनिमय केला; या गोष्टीचा एकंदर हिंदू चळवळीवर फार दूरवर परिणाम होणार आहे. त्यामुळे एक गोष्ट सिद्ध झाली; ती म्हणजे हिंदूंचे हिंदू म्हणून प्रतिनिधित्व काँग्रेस करीत नसून मुसलमानांचे मत अजमावण्याकरिता जशी मुस्लिम लीग किंवा दुसरी एखादी काँग्रेस व्यतिरिक्त मुस्लिम संस्था त्याचप्रमाणे हिंदूंचे हितसंबंध पाहणारी हिंदूंची प्रातिनिधिक संस्था काँग्रेसव्यतिरिक्त असून ती महासभा आहे; हे सिद्ध नि मान्य झाले आहे. आता हे तत्व एकंदर समाजालाही मान्य झाले आहे; आणि हिंदूंची काँग्रेस ही एक केवळ जुनी संस्था आहे; ह्याच कारणाकरिता तिला मान देण्याचे सोडून देऊन आपली तिच्यापासून सुटका करून घेतली; म्हणजे हिंदूंचे राजकीय, सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक नि इतर हितसंबंध याकडे काँग्रेस किंवा दुसरे कोणी दुर्लक्ष करू शकणार नाही; आणि ज्या वेळी एखादी गोलमेज परिषद भरेल; किंवा सर्व पक्ष परिषद होईल किंवा घटनात्मक परिषद बोलाविली जाईल; जेव्हा हिंदुस्थानच्या राज्यघटनेच्या साकल्याने विचार-विनियम केला जाईल; त्या वेळी हिंदू महासभा ही एक अवश्य घटक म्हणून लीग आणि काँग्रेस यांच्या बरोबरीने तेथे उपस्थित राहील; आणि जोपर्यंत हिंदुसभेची त्यांना

मान्यता मिळणार नाही; तोपर्यंत अतरांनी केलेले कोणतेही ठराव किंवा योजना ही हिंदुसभेवर बंधनकारक मानली जाणार नाहीत. यापुढे कोणतीही काँग्रेस लीग तडजोड झाली तरी हिंदूंवर ती बंधनकारक राहणार नाही. हिंदुमहासभेच्या संमतीविना त्यांना हिंदूंच्या हितसंबंधाची विक्री करता येणार नाही. ते गहाण टाकता येणार नाहीत किंवा त्यांचा सौदाही करता येणार नाही.

## भारताचे अखंडत्व

आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, ती ही की, हिंदुस्थान सरकार नि ब्रिटिश सरकार या दोघांनीही हिंदूंच्या हितसंबंधांची प्रातिनिधिक संस्था काँग्रेस नसून ती हिंदुमहासभा आहे; हे जसे मान्य केले आहे, तसेच आणखीही एका गोष्टीस त्यांनी मान्यता दिली आहे. भारतमंत्र्यांनी नुकतेच या महिन्यात जे भाषण केले; त्यात हिंदुस्थानचे राजकीय आणि राष्ट्रीय अखंडत्व राहिले पाहिजे; हेही त्यांनी मान्य केले आहे. ह्या विषयात हिंदुमहासभा आणि शीखांची संस्था यांनी सरकारवर जे वजन आणले त्याचाच हा परिणाम होय. हिंदू देश, राष्ट्र किंवा राज्यघटना यांचे पाकिस्तानच्या योजनेनुसार तुकडे तुकडे करण्याची मुसलमानांची दुष्ट वासना ब्रिटिश सरकारने उचलून धरली नाही; आणि त्यांच्या पाकिस्तानच्या योजनेस, थारा दिला नाही; हा हिंदुमहासभेच्या चळवळीचा मोठा विजय आहे. मुस्लिम लीगवाल्यांनी पाकिस्तानची चळवळ उभारली होती. आणि काँग्रेस पुढाऱ्यांनी, त्यांच्या अनेक राजाजीनी आणि प्रधानजीनी असे जाहीर करून टाकले होते की, पाकिस्तानविषयी मुसलमानांचा आग्रहच असेल तर त्याविरुद्ध आपण काही आग्रह धरणार नाही. या पाकिस्तानच्या योजनेविषयी काँग्रेसवाल्या हिंदूंनी इतक्या घाईघाईने आणि बेछूटपणे आपली संमति दिली; की, खुद्द ब्रिटिश लोकांनी सुद्धा तिला एवढे उचलून धरले नव्हते. आरंभी आरंभी जरी त्यांनी पाकिस्तानच्या योजनेला स्पष्ट शब्दात नापसंती दर्शविली नव्हती; आणि भारतमंत्री ॲमेरी यांनी महिन्यापूर्वीच्या भाषणांत मुसलमानांना असंतुष्ट न करावे; म्हणून जरी हेतुतः विरोधी असे काहीही उद्‌गार काढले नव्हते; एवढेच नव्हे तर, हिंदुस्थान आणि मुस्लिम हिंदुस्थान असे तुकडे करण्याच्या त्यांच्या अनेक कल्पनांना जोर येईल अशीच मोघम भाषा त्यांनी वापरली होती. तरी पण थोड्याच दिवसात ते सर्व बदलले. आता हेच भारतमंत्री हिंदुस्थानचे प्रादेशिक अखंडत्व सर्वांच्याच हिताच्या दृष्टीने कायम राहिले पाहिजे. आणि याच मूलभूत पायावर हिंदुस्थानची भावी राज्यघटना झाली पाहिजे. असे बोलू लागले. याला कारण काय? याला कारण हिंदुमहासभा, शीखसंस्था, सनातनी मंडळे, थोडक्यात म्हणजे अखिल हिंदुसंघटनपक्षान, जी पाकिस्तान-विरोधी चळवळ केली; आणि त्या योजनेसंबंधांने तुमचे धोरण होय, नाही, काय ते स्पष्ट शब्दांत सांगा असा सरकारच्या मागे एकसारखा लकडा लावला. त्याचाच परिणाम म्हणजे भारतमंत्र्यांची ही घोषणा होय. या पाकिस्तानच्या योजनेसंबंधाने निषेधाचा एक शब्ददेखील

कॉंग्रेसच्या कोणत्याही ठरावात, परिषदेत किंवा भाषणात आपणास सापडणार नाही; पण हिंदुसभेने मात्र ह्या बाबतीत अत्यंत आग्रह धरला होता.

सरकारला जर युद्धसमित्यांतून नि युद्धकार्यात हिंदुसभेचे सहकार्य हवे असेल तर सरकारने अखिल हिंदुस्थानचे अखंडत्व नि प्रादेशिक अविभाज्यत्व या तत्वांना आधी मान्यता दिली पाहिजे; ही हिंदू महासभेने अट घातली होती. त्यामुळे गेल्या नोव्हेंबर महिन्यामध्ये पार्लमेंटात बोलताना भारतमंत्री ॲमेरी ह्यांनी जी दुटप्पी भाषा वापरली होती. ती त्यांना या महिन्यांतील भाषणाच्या वेळी बदलणे भाग पडले; आणि 'हिंदुस्थानचा प्रथम विचार' या नावाखाली त्यांनी जे प्रवचन झोडले. त्यात त्यांनी स्पष्ट शब्दात भारताच्या अखंडत्वास आपली संमती दिली. कारण काही असो, भारतमंत्री ॲमेरी यांनी भरताच्या अखंडत्वासंबंधी नि अविभाज्यतेसंबंधी जे स्पष्ट धोरण प्रकट केले याकरिता मी त्यांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे मुस्लिम लीगने व्हाईसरॉयकडे हिंदुविरोधी आणि आक्रमक स्वरूपाच्या ज्या अनेक योजना पुढे मांडल्या होत्या आणि युद्धसमित्या नि कार्यकारी मंडळाची वाढ यांच्या पकरणी ज्या अनन्वित अटी घातल्या होत्या, त्या सर्व व्हाईसरॉयनी निश्चयपूर्वक लाथाडून दिल्या. याकरिता मी त्यांचेही अभिनंदन करतो. हा जो फरक झाला तो विनाकारण झाला; असे का आपणास वाटते? तसे नाही. त्याच्याकरिता विचारांची पुष्कळ देवाणघेवाण करावी लागली आहे. हिंदुमहासभेने मुसलमानांच्या आक्रमक मागण्यांना जो संयुक्तिक विरोध दर्शविला; नि आपल्या योग्य मागण्या पुढे मांडल्या त्यामुळेच या गोष्टी घडून आल्या. यासंबंधी मुसलमानांच्या मागण्या फेटाळून लावण्यासाठी कॉंग्रेसने तोंडातून ब्रही काढला नाही. फार काय, जर हिंदुमहासभेचा विरोध नसता तर हजार हिश्शाने मुसलमान आज ज्या आक्रमक मागण्या मागत आहेत; त्या सर्व ते आतापर्यंत मिळवून बसले असते.

मतदानाचे वेळी कॉंग्रेसला मते देण्याच्या रोगांतून हिंदूंनी बरे व्हायलाच पाहिजे. स्वतःच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी हिंदूनी कॉंग्रेसला मतदान करण्याच्या साथीपासून रोगमुक्त झालेच पाहिजे.

तथापि तरीही, पुन्हा एकदा मी अगदी निक्षूनच सांगतो की यद्यपि, हिंदुमहासभेने ह्यावर्षी राजकीय मंच हस्तगत करण्यात यशस्वी होऊन, त्यावर अगदी कॉंग्रेस नि लीग यांच्याबरोबरीने पाय रोवून ती उभी आहे; तथापि, क्षुल्लक दोष काढणे किंवा कठोर टीका, ह्यांच्या पलीकडे जाऊन हिंदुमतदारसंघ, जेथवर नि जोपर्यंत हिंदु दर्शिकेवर निवडून आलेला बहुमतवाला पक्ष म्हणून विधानमंडळात कार्य करण्यासाठी शक्तिप्रदान करीत नाही तेथवर नि तोपर्यंत हिदुमहासभेला हिदूंच्या हितसंरक्षणाचे नि संवर्धनाचे कार्य परिपरिपूर्णतेने करता येणे शक्य नाही. जोपर्यंत केवळ सवय म्हणून सवयीचे दास बनून, हिंदुमतदारसंघ राजकीय उन्मादवेडाच्या भरात, कॉंग्रेसच्या दर्शिकेलाच मते देण्याचा हेकेखोरपणा चालूच ठेवतील; तोपर्यंत फार मोठ्या विस्तृत प्रमाणातील हिंदूंच्या मताचे प्रतिनिधित्व कॉंग्रेस करते हे मान्य करण्यावाचून शासन काही करू

शकत नाही. 'हिंदू' दर्शिकेशी प्रतिज्ञाबद्ध असलेले हिंदू प्रतिनिधि जसे आणि जितके धिटाईने अगदी अंतःकरणपूर्वक भावभक्तीने हिंदुहितकारणार्थ प्रतिनिधित्व करतील. तसे आणि तितके तर सोडाच पण निदान हिंदूंच्या वैधानिक हितसंबंधाचे सुद्धा प्रतिनिधित्व काँग्रेस तिची जी काही घटना आहे त्या स्थितीत राहून मुळीच आणि कधीच करू शकणार नाही. पण जर हिंदूंच्या हितकारणासाठी मतदानाच्या वेळी, 'हिंदुमतदारसंघ', हिंदुसंघटनवादी अच्छूकांना, प्रचंड मताधिक्याने प्रतिनिधि म्हणून, विधान मंडळामध्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून पाठवील तर हिंदूंचा एकमेव प्रतिनिधिपक्ष म्हणून हिंदुमहासभा किंवा एकसंघ हिंदु संघटनवादी पक्ष ह्यांना शासनाला आपली मान्यता द्यावीच लागेल; त्यासाठी निरंतरच्या आणखी युक्तिवादांची काही आवश्यकताच असणार नाही. हिंदूंच्या हितकारणाची वाऱ्यावर वरात काढून त्यायोगे हिंदूंच्या हितांची नासाडी करण्याचे किंबहुना हिंदूंच्या नावाने आणि वतीने हिंदू म्हणून बोलण्याचेही काँग्रेसचे अधिकार (जे आज ती सांगते आहे आणि बजावते आहे) नि सत्ता ही आपापतःच स्वयंचलित यंत्रवत साहजिकच हिरावले जातील. वस्तुतः जाति-तत्वाधिष्ठित गटांची जशी नि जोपर्यंत आहे तशी नि तोपर्यंत आणि जी किमान येती वीस वर्षे तरी आहे हीच व्यवस्था आवश्यक अपरिहार्यतेने निश्चितीनेच चालू राहणार असल्यामुळे कुठल्याही भागाचे।प्रभागाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी तिला क्वचितच मिळाली तर !

विशुद्ध मुस्लिम संघटनेशी प्रतिज्ञाबद्ध नसलेल्या कोणाही मुसलमानाला मुसलमान लोक कधीच निवडून देणार नाहीत आणि काँग्रेसच्या दर्शिकेवर उभ्या असणाऱ्या मुसलमानाला ते, हटकूनच, निश्चितपणेच नाकारतील. हिंदू दर्शिकेशी प्रतिज्ञाबद्ध हिंदूंनाच केवळ जर हिंदू लोक निवडून देतील तर काँग्रेसच्या दर्शिकेला मत देण्यासाठी नाममात्रही मतदार संघ असा उरणार नाही. इतकेच काय पण काँग्रेसची मंत्रीमंडळे आणि त्यांचे मताधिक्य केवळ हिंदु मतदारसंघाच्या खांद्यावरच काय ते टिकून आहे.

## पुष्कळ काँग्रेसवाल्या हिंदूंनाही हिंदुमहासभा ही प्रभावी राजकीय संस्था व्हावी, अशी मोठी तळमळ लागून राहिली आहे.

ह्या वर्षांत शतावधी काँग्रेसवाल्या सुप्रसिद्ध हिंदु पुढाऱ्यांनी हिंदुमहासभेचा अध्यक्ष म्हणून मजकडे स्वतः येऊन महासभेने चालविलेल्या कार्याविषयी माझे अभिनंदन केले. असे असूनही, जरी ह्या काँग्रेसवाल्या सद्गृहस्थांना हिंदुत्वनिष्ठ विचारसरणी पूर्णपणे पटते; काँग्रेसने हिंदुहिताचे धिंडवडे माजविले ह्याची जरी ज्यांना खंती वाटली; आणि म्हणून जे तिला मनांतून दोष देतात नि हिंदुमहासभेचे आभार मानतात; एवढेच नव्हे; तर काँग्रेसच्या दडपणाखालून बाहेर पडू शकत नाहीत! ते का? अजूनही ते सरळ सरळ हिंदुसभेला येऊन का मिळू शकत नाहीत? असा आपल्यापुढे प्रश्न उभा राहतो. त्यास उत्तर आहे. काँग्रेस सोडून हिंदुमहासभेला येऊन मिळण्याच्या

आड आज त्यांना एक अडचण वाटते. त्यांच्या आड एक भिंत उभी आहे. तिची उंची जरी एक अंचभरच असली तरी पण ती ओलांडून पलीकडे त्यांना येववत नाही, अशी त्यांची स्थिती आहे. ही अंचभर अंुचीची; पण अनुल्लंघ्य वाटणारी भिंत म्हणजे काँग्रेसचे तिकिट होय. त्यांना असे वाटते की या तिकिटावर आपण उभे राहिलो म्हणजे आपण नक्की निवडून येऊ शकू. स्थानिक स्वराज्य संस्थांतून किंवा विधिमंडळांतून निवडून येण्याला हे तिकिट हुकमी आहे अशी त्यांची समजूत आहे. आणि त्यायोगे त्यांच्या मानमान्यतेचा किंवा उत्कर्षाचा रस्ता मोकळा होतो. पण यावर एकच उपाय आहे. निवडणुकीत काँग्रेसला काही एक विचार न करता मत देण्याची घातकी खोड हिंदुमतदारसंघांने सोडली पाहिजे. आणि हिंदुहिताकरता हिंदुत्वनिष्ठ अच्छुकांनाच मत मिळू शकेल अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. एकदा सर्वांना अशी निश्चिती वाटू लागली म्हणजे हेच आजचे चाचपडणारे हिंदू बांधव जे आज काँग्रेसमध्ये आपणाला दिसत आहेत; त्या सर्वांना काँग्रेस सोडून देण्याचे धैर्य वाटेल; आणि ते उघड रीतीने महासभेला येऊन मिळतील.

आज काँग्रेसचे धोरण चुकत असल्यामुळे ती साेडून द्यावी असे त्यांना मनापासून वाटते. पण वैयक्तिक स्वार्थामुळे त्यांना तसे करण्यास धैर्य होत नाही. तरी पण मी या सहस्र हिंदू बांधवांना विनंती करतो की तुम्ही आपल्या मनोदेवतेशी प्रतारणा करू नका. तुम्ही आपले कर्तव्य करण्यास शिका. सत्ता लोकप्रियता असल्या क्षुद्र विचारांना थारा न देता हिंदू राष्ट्राच्या जातीच्या आणि धर्माच्या संरक्षणासाठी आपण आपले कर्तव्य करण्यास सिद्ध व्हा नि अतरांना तसे उदाहरण घालून द्या.

याप्रमाणे गेल्या वर्षात हिंदुसभेच्या अनेकविध चळवळींचे नि कार्याचे सिंहावलोकन केले असता आपणास असे दिसून येईल की, हिंदुनिष्ठ चळवळ जोराने वाढत चालली आहे. असे असले तरी आपले खरे सामर्थ्य कशांत आले? आपली प्रगती झाली ती कोठवर झाली? आपल्या चळवळीत वास्तविक दोष कोणते आहेत नि त्यांचे निराकरण आपण कसे केले पाहिजे? या गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे. पण असे आत्मसंशोधन जरी अवश्य असले; तरी मी आपल्यांतील दोषांचे आणि दुर्बळपणाचे प्रदर्शन करू इच्छित नाही. स्थिती अशी आहे की, ज्याने उठावे त्याने हिंदू कसे वाईट आहेत; हेच सांगत सुटावे. आमचे दोष आमच्या मित्रांनी आणि शत्रूंनी इतके फुगवून आमच्या कानीकपाळी सांगितले आहेत; की, त्यामुळे आमचे कान आता किटले असून आपण कमीच पडतो, अशा प्रकारचा एक न्यूनगंड हिंदूंमध्ये उत्पन्न झाला आहे. म्हणून सध्याच्या परिस्थितीत आपले हे बोधवाक्य अशा प्रकारचे असले पाहिजे की,

''आम्ही आपली प्रगति नि शक्ति ह्यांना कमी लेखू नये नि आपले दौर्बल्य फुगवून सांगू नये.''

आमच्या अडचणी संघटनात्मक त्रुटी स्वार्थपरायणता ऐक्याची निकड आणि आमच्या सामर्थ्यात नि योग्यतेत असणारी वैगुण्ये नि न्यूनता, ज्यांची आम्हाला ह्या आधीच तीव्रतेने

जाणीव झाली असून त्याविरुद्ध आम्ही उभे ठाकलो आहोत. आमच्याकडून प्रयत्नांची पराकाष्ठा करीत, आम्ही त्यांना धैर्याने तोंड देत त्यावर निश्चितच विजय मिळवू पण, त्यावर विजय मिळविण्यासाठीची तशी ती शक्ति, आपल्या सुदैवाने जी विपुल नि अनुकूल आहे; मात्र ज्यांमधील गळती थांबवली गेलेली नाही; आणि जिचे मूल्यमापन, -यथायोग्य अनुमानही अजून झालेले नाही. त्या आपल्याजवळ असलेल्या खऱ्या संपत्तीतून नि साधन सामग्रीतूनच काय ती येऊ शकते म्हणून ह्यासंबंधीचा सविस्तर विचार विशेषत्वाने करून नंतर तो आपल्यापुढे ठेवण्याचे धाष्टर्य दाखवीत आहे.

निखिल हिंदू चळवळीचे खरेखुरे हृद्‌गत मुळातून जाणण्यासाठी किमान पुढील पुस्तके तरी प्रत्येक हिंदूने अभ्यासलीच पाहिजेत.

गतवर्षीच्या वृत्तांताचा हा चालू प्रसंगोचित आढावा घेऊन झाल्यानंतर अन्य महत्वाच्या विषयांच्या चर्चेस प्रारंभ करण्यापूर्वी मला आपल्या सकल हिंदुबंधूंना सर्वसामान्यतः आणि मद्रास प्रांतातल्याच ह्या हिंदुबंधूंना विशेषतः अत्यंत कळकळीने आस्थेवाईक आग्रहाने जे मी माझे कर्तव्यच समजतो, सांगावयाचे आहे; ते हेच की त्यांनी निखिल (हिंदू) संघटन चळवळीच्या विषयात आपले काही एक मत बनविण्यापूर्वी पुढील पुस्तके अभ्यासावीत. सुदैवाने हिंदूसंघटनेची विचारप्रणाली महाराष्ट्र, बंगाल नि उत्तरेतील काही प्रांतांत आता मोठ्या प्रमाणावर विस्तृतपणे प्रचारिली जात आहे. माझ्या ह्या अभिभाषणाच्या आधीच्या भागात मी जे बोललो आहे ते तेथील हिंदूंना नीट समजण्यासाठी आणि त्यांचे अगदी यथार्थ मूल्यमापन करण्यासाठी समर्थ करीत आहे. पण हा मद्रास प्रांत, हा अगदी अलीकडे नुकताच काय तो संघटन चळवळींच्या संपर्कात आलेला आहे. ही चळवळ ज्या मूलभूत तत्वांवर नि विचारप्रणालीवर आधारित आहे त्यांचा अभ्यास, विशेषत्त्वे ह्या प्रांतातच राहणाऱ्या हिंदूंनी आणि ही चळवळ दक्षिणेकडे शक्यतो चांगली बळकट दृढमूल व्हावी असे ज्यांना वाटते त्या हिंदूनीही आणि जे अजून तिच्या बाजूने नाहीत किंवा तीत भरती झालेले नाहीत; पण तरीही, ती चळवळ राजकीय विचारप्रणाली ह्यांचा एक शक्तिशाली प्रवाह असून, कोणाला आवडो की न आवडो, हिंदुस्थानच्या भावी इतिहासावर परिणाम घडविण्याची तिची बांधिलकी आहे अतपत मूल्यांकन जे करू इच्छितात अशांनीही अभ्यासणे ही आता आज्ञार्थक (अत्यावश्यक) निकड आहे. हे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून आणि व्यक्तिशः उल्लेख करण्याने, स्वतःस संकटात टाकणारे साहस करीतही, सकल हिंदूंना प्रारंभ म्हणून अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी काही पुस्तकांची शिफारस मी इथे करत आहे.

१) हिंदुत्व- लेखक- श्री. वि. दा. सावरकर, २) हिंदू संघटन (विचार प्रणाली नि तात्कालिक कार्यक्रम) लेखक- श्री. ना. वि. दामले, ३)हिंदुमहासभेचा इतिहास- लेखक- श्री. अंद्रपकाश, ४) हिंदुपदपादशाही- लेखक- श्री. वि. दा. सावरकर, ५) हिस्टरी ऑफ दि भागानगर स्ट्रगल (निझाम सिव्हिल रेझिस्टन्स मूव्हमेंट) लेखक- श्री. शं. रा. दाते.

अन्य महत्वाच्या विषयांवरील वेगवेगळे प्रस्ताव ह्या अधिवेशनात संमतिण्यात येतील.

आमच्या बंगाली बंधूंच्या दुःखदुर्दशेची गाऱ्हाणी, पापस्तान (पाकिस्तान)ची योजना, जनगणना, इत्यादी निकडीचे प्रश्न गाळणे, स्थलकाला-भावी भाग पडत आहे. विशेषतः नि वस्तुतः त्या प्रश्नांची वेगळाले प्रस्ताव ह्या अधिवेशनात मांडून त्या प्रश्नांविषयी ज्यांना चांगली जाण आहे; ज्यांनी त्यांचा व्यासंगपूर्वक अभ्यास केला आहे; ज्यांचे त्यांच्याशी चांगले संबंध आहेत, अशी मंडळी त्यासंबंधात अधिक चांगल्या रीतीने, उहापोह करून चर्चा घडवून आणून निष्कर्षाप्रत येतील असाही हेतू त्यामागे आहे. आता मी पुढील इंग्रगण्य विषयांकडे वळतो. सध्याच्या युद्धकालीन परिस्थितीत आपण आपल्या दृष्टीने काय करावे या अतिशय महत्वाच्या प्रश्नाकडे मी वळतो. ज्या परिस्थितीत सध्या आपण आहोत, त्यात आपण तात्कालिक असे आपले कोणते धोरण ठेवावे आपला युद्धकालीन कार्यक्रम काय असावा? म्हणजे हिंदूंचे हितसंरक्षण होईल, आणि त्यांचे वर्धनही होऊ शकेल त्यासंबंधाने विचार करणे अवश्य आहे.

या पकरणी मी आरंभीच असे स्पष्ट करू इच्छितो की मी हे जे विचार आपणांपुढे मांडीत आहे ते जरी मी महासभेच्या अध्यक्षपदावरून मांडीत असलो तरी ते विचार व्यक्तिशः माझे आहेत; ते तसेच आहेत, एवढेच आपण समजून चालावे. या अधिवेशनाच्या प्रतिनिधीने माझी ही मते हिंदुमहासभेच्या अध्यक्षांकडून आलेला अनुरोध, अधिकृत घोषणा किंवा आज्ञा असे काही एक मानण्याचे कारण नाही. महासभेसारख्या संस्थेच्या अध्यक्षाने एखाद्या धोरणाचा अगर कार्यक्रमाचा अनुरोध करावा. हे जरी अष्ट असले किंवा प्रसंगविशेषी त्याने धोरण नि कार्यक्रम घालून देऊन तो पाळण्याची सर्वांना आज्ञा करावी; नि ज्या सभेचा तो अध्यक्ष त्या सभेचे नेतेपण पत्करावे; हे जरी खरे असले तरी अशा अध्यक्षांनी दुसरी काही वेगळी व्यवस्था नसेल तर अशा संस्थेचे प्रतिनिधी एकत्र जमून जो विचारविनिमय करतात नि त्यास अनुसरून ठराव करतात; ते कार्यवाहीत आणणारा एक सर्वांत मोठा कार्यकर्ता अधिकारी ह्या नात्याने काम करणे हेही एक महत्वाचे कर्तव्य असते. अध्यक्षांच्या या कर्तव्याच्या जाणिवेस अनुसरून आपण सर्वजण मिळून युद्धासंबंधाचे जे निश्चित असे धोरण ठरवाल ते माझ्या शक्यतेनुसार कृतीत आणण्याचे मी करीन. मग ते माझ्या व्यक्तिशः विचारांशी जुळो वा न जुळो. आपल्या नि माझ्या विचारात महदंतर पडले; तरी त्याविषयी काहीएक न कुरकुरता किंवा अध्यक्षपदाची पत त्याकरिता पणाला मुळीच न लावता आपण ठरवाल ते धोरण मी कार्यवाहीत आणीन. माझी आपणास एवढीच विनंती आहे की, माझे हे विचार सदस्यांपैकीच मी एक सदस्य या नात्याने आपण त्यांचा विचार करावा. ते विचार अध्यक्षांचे आहेत असे मानू नये.

सध्याच्या युद्धकाळात आपले तात्कालिक धोरण नि कार्यक्रम काय असावा?

या विषयात प्रत्यक्ष कार्यक्रम आखण्यापूर्वीच मी आपले लक्ष प्रमुख विचारात घेण्यायोग्य, मला दिसणाऱ्या काही गोष्टींकडे वेधू इच्छितो. आपला दृष्टिकोन स्पष्ट करण्याअतपत त्यांचे उत्तम निरूपण करून नि त्यास अनुसरून आपणास आपला कार्यक्रम आखता येईल नि कार्याची दिशा ठरविता येईलः-

(क) ह्या संबंधातील पहिले विधेय असे की, सध्याच्या जागतिक युद्धात जी राष्ट्रे आपआपसात लढत आहेत. त्यांच्यापैकी कोणालाही नैतिक दृष्ट्या सहाय्य करण्यास आपण बांधलेलो नाही. मग तो देश इंग्लंड असो वा जर्मनी असो; जपान असो किंवा रशिया असो; चीन असो किंवा दुसरा कोणता युद्धमान देश असो. ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका हे देश आपली बाजू उदात्त धोरणावर आखलेली आहे आणि म्हणून अतरांनी आम्हांस सहाय्य केले पाहिजे; असे म्हणत आहेत. तेचसे काय, येथील काही काँग्रेसवाले पुढारीसुद्धा आणि इतरही काही पक्षांतील पुढारी याच विचारसरणीचा अनुवाद करीत आहेत. या पकरणी हिंदुमहासभेने आपली भूमिका महायुद्ध सुरू होऊन एक महिना झाला नाही तोच ख्रि. १९३९ च्या सप्टेंबर महिन्यात भरलेल्या कार्यकारी समितीच्या सभेत एक ठराव सम्मत करून स्पष्ट केली होती.

काँग्रेसचे स्वयंभू कर्तुमकर्तुम् सर्वाधिकारी गांधीजी यांनी मात्र इंग्रजांची आर्जवे करण्यास सुरवात केली आणि असेही प्रतिपादन केले की, आता हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा विचारच नाही. आता आपल्या पुढील विचार एकच आणि तो म्हणजे इंग्लंड नि फ्रान्स यांचे संरक्षण कसे होईल हाच होय. जगातील लोकशाहीविरुद्ध उठलेले वादळ, शमविण्याकरिता आपण सरकारला विनाअट सहकार्य देण्यास सिद्ध आहो; असे त्यांनी आपण होऊन सुचविले; आणि तिकडे पं. नेहरू हेही ब्रिटिश आणि फ्रेंच लोकशाही राष्ट्रांना मदत करण्याला ‘‘भारतीयांनो तयार व्हा!‘‘ असा पुकारा करू लागले. कारण पोलंड आणि इतर स्वतंत्र राष्ट्रे यांच्याविरुद्ध साम्राज्यवादी जर्मनीन युद्ध पुकारल्यामुळे त्यांचा प्रतिकार करण्यासाठी ब्रिटिश आणि फ्रेंच लोकांना आपण मदत केली पाहिजे. असा त्यांचा आग्रह होता.

ह्या देशातील इतर पक्ष म्हणजे फॉरवर्ड ब्लॉक, कम्युनिस्ट, रॉयिस्ट इत्यादी हे सुद्धा पोलंड रशिया प्रभृति राष्ट्रांना यत्किंश्चितही राजकीय लोभ नाही. ती साम्राज्यवादी नाहीत; असेच सांगत सुटले होते. अशा वेळी हिंदुमहासभा हीच काय ती एकमेव संघटित आणि प्रमुख राजकीय संस्था होती; की जिने खरा दूरदर्शीपणा दाखविला. महासभेनेच देशाला आणि खुद्द काँग्रेसलाही बरोबर दिशा दाखविली. तिने, असे स्पष्टपणे घोषित केले की युरोपातील युद्धमान राष्ट्रे मग ती इंग्लंड जर्मनी पोलंड, रशिया इत्यादी कोणीही असोत; ती जी युद्धात पडली ती काही नैतिक कारणाकरिता लोकशाहीच्या प्रस्थापनेकरिता किंवा काही विशेष तत्वज्ञानाच्या प्रतिष्ठापनेकरिता पडलेली नाहीत. युद्ध करण्याचा त्यांचा हेतु केवळ स्वतःचा स्वार्थ आणि स्वतःचे मोठेपण प्रस्थापित करणे; एवढाच आहे. ह्याच्या उलट इंग्लंड या युद्धात जे पडले, ते इंग्लंड नि इतर राष्ट्रे यांच्याविरुद्ध चालू असलेल्या आक्रमणाचा केवळ प्रतिकार करण्याकरिता आणि लोकशाहीची उदात्त तत्त्वे रक्षण करण्याकरिता पडली असून ह्यात काही भौतिक लाभ मिळवावा अशी त्यांची बिलकूल इच्छा नाही. उलट जगातील आंतरराष्ट्रीय संबंधांची अधिक चांगल्या पायावर उभारणी व्हावी, नि जगात खरी आणि सतत टिकणारी, शांती नांदणे शक्य व्हावे, यासाठी लढत आहेत‘‘

असे व्हाअसरॉय भारतमंत्री यांनी आपल्या अनेक भाषणांतून आम्हाला पटविण्याचा वारंवार प्रयत्न केला. परंतु या सर्व घोषणा फोल होत्या. उदात्त तत्वाच्या प्रतिष्ठापनेकरिता ग्रेट ब्रिटन युद्धात पडलेला नाही; ही गोष्ट सिद्ध करण्यास उत्कृष्ट पुरावा म्हणजे जेव्हा चेंबर्लेनने हिटलरला पोलंड स्वतंत्र करण्यास सांगितले; त्या वेळी त्यास हिटलरने उत्तर दिले की, ''मी पोलंड खाली करतो पण आपण हिंदुस्थान मोकळा कराल काय? त्यात सर्व आले. चोरांच्या वाटा चोरच जाणतो'' ही म्हण सार्थ आहे.

(ख) याकरिता ग्रेट ब्रिटनने आपले युद्धहेतू प्रसिद्ध करावे अशी पंडित नेहरूंसारख्या काँग्रेस पुढाऱ्यांनी मागणी करावी; हे मला अगदीच खुळचटपणाचे वाटते. एकतर ब्रिटिश लोक आपल्या युद्धविषयक सर्वसामान्य उद्देशांचा पुनः पुनरुच्चार कान किटेपर्यंत करू लागले आहेत. आणि दुसरे असे की उदात्त तत्वांची त्यांची ही घोषणा एका कवडीमोलाची सुद्धा नाही. जर त्यांच्या या घोषणेत काही अर्थ असता तर त्यांनी त्याप्रमाणे तात्काळ कृति केली असती.

जर इंग्लंड जगातील लोकशाहीच्या प्रतिष्ठापनेकरिता लढत असेल तर त्यांनी आज हिंदुस्थान स्वतंत्र केला असता नि येथे लोकशाही पद्धतीची राज्यघटना आणली असती.

पण त्यांनी तसे काही एक केलेले नाही. या युद्धात पडलेल्या अकूण एक राष्ट्रांची ध्येये, किंबहुना आजच्या काळातील जगातील प्रत्येक राष्ट्राचे ध्येय स्वतःचा स्वार्थ साधणे, नि तो वाढविणे एवढेच असून जगात जेथे जेथे आपले वर्चस्व प्रस्थापित करता येईल तेथे तेथे ते करणे एवढ्याकरिता ती लढत आहेत. ही गोष्ट आरशासारखी स्वच्छ आहे. आज हिटलर आणि मुसोलिनी जे लढत आहेत ते पृथ्वीच्या पाठीवर आपल्या लोकांना अधिक जागा मिळावी आणि आपली सत्ता वाढावी; याच केवळ उद्देशाने होय. त्याचप्रमाणे चर्चिल, स्टॅलिन किंवा रूझवेल्ट हे जे लढत आहेत ते आपली आधीच प्रस्थापित झालेली साम्राज्ये चिरंतन टिकविण्याकरिता लढत आहेत.

या आपल्या खऱ्या हेतूला झाकून टाकण्याकरिता त्यांनी वेगवेगळी गोंडस नावे चिकटविली असली तरी त्यांच्या आड त्यांचा हेतु एकच आहे. कोणी त्यांना साम्राज्य असे म्हणतील; तर कोणी त्यांना लोकसत्ताक राज्ये हे नाव देतील; तर कोणी त्यांना सोव्हिएट लोकसत्ताक राज्य या नावाने संबोधितील, परंतु ही सर्व राष्ट्रे दुसऱ्या लोकांच्या प्रदेशांवर त्यांच्या अच्छेविरुद्ध स्वतःच्या तरवारीच्या सामर्थ्यावर आपल्या देशाचे प्रभुत्व लादण्याचा प्रयत्न करीत आहेत. फ्रान्स हे लोकसत्ताक राज्य आहे ना? पण ह्याच फ्रान्सने किती तरी देशांची स्वातंत्र्ये लुबाडली आहेत. आमच्या येथील पाँडिचरी आणि चंद्रनगर ही त्यांनी घेतली आहेत; आणि वसाहतींच्या पकरणी इंग्लंडच्या खालोखाल त्यांचा क्रमांक आहे.

रशिया हे नुसतेच लोकसत्ताक नव्हे; तर सोव्हिएट लोकसत्ताक राष्ट्र असले तरी, त्यांनेसुद्धा केवळ तरवारीच्या जोरावर केवढा तरी खंडमय प्रदेश, आपल्या हाताखाली घेतला आहे

आणि इतके असूनही जर्मन जसे आधाशी त्याप्रमाणे यांनीही पोलंड आणि इतर लहानलहान राष्ट्रे गिळण्यास कमी केले नाही.

(ग) याचप्रमाणे हे जे काही 'वाद' आहेत; उदाहरणार्थ लोकसत्तावाद, साम्राज्यवाद, इत्यादी इत्यादी, त्यांचे प्रतिपादक सर्व एकाच माळेचे मणी आहेत. त्यांना आपण नाव कोणतेही द्या. त्यांना बोल्शेव्हिझम म्हणा किंवा नाझीझम म्हणा; फॅसिस्टवाद म्हणा, किंवा लोकसत्तावाद म्हणा किंवा पार्लमेंटरी पद्धती म्हणा, काहीही म्हणा, त्या सर्वांनी आपल्या तरवारीच्या सामर्थ्याच्या जोरावर दुसऱ्या लोकांना जिंकले असून किंवा अद्याप जिंकले नसल्यास ते जिंकू इच्छित असून त्यांच्या सर्व 'वादा'चा तात्पर्यार्थ दंडुकेशाही एवढाच आहे. अशा परिस्थितीत वेगवेगळ्या नावांना किंवा घोषणांना भुलून न जाता त्यांची 'तत्त्वे नि धोरणे' खरोखरच काय आहेत हे न ओळखणे हा हिंदुस्थानचा आत्मघातकी मूर्खपणाच ठरेल; कारण त्यांना दिलेली 'नावे' किंवा त्यासंबंधीच्या 'घोषणा' यांचा हेतू, खरे उद्देश लपवून दिशाभूल करणे हाच काय तो आहे.

नाझी काय, बोल्शेव्हिझम काय किंवा लोकशाहीवादी काय त्यांच्या विचारप्रणाली काय आहेत किंवा त्यांच्या ग्रंथात काय म्हटलेय ह्या कारणासाठी यापैकी कोणावरच लोभ, प्रेम करता कामा नये किंवा त्यांचा राग वा द्वेषही करता कामा नये.

हिटलर हा नाझी आहे म्हणून तो मात्र राक्षस आणि चर्चिल हा लोकसत्तावाला म्हणवितो म्हणून तो मात्र देवदूत असे समजण्याचे काही एक कारण नाही. जर्मन देश ज्या परिस्थितीत सापडला होता तीतून त्याचा उद्धार करण्याकरिता जर्मनीला नाझीवादाचाच आश्रय करावा लागला; तर बोल्शेव्हिझम हा रशियाला उपकारक ठरला. इंग्लंडमध्ये लोकसत्ता जी नांदते आहे; तिच्यासाठी इंग्लंडला केवढी किंमत द्यावी लागली. याची आपणास चांगली कल्पना आहे.

खरे राजकीय धोरण व्यावहारिक कसे असावे?

राजनीतिशास्त्र आणि जगातील इतिहास ह्या दोन्हींवरून एक ठाम सिद्धांत प्रस्थापित झालेला आहे, तो असा की, जगतांत सर्व लोकांना नि सर्व काळी उपयोगी पडेल अशी कोणतीही घटना किंवा समाजरचनापद्धती शाश्वत स्वरूपाची सांगता येणार नाही. इंग्रज लोकांइतके वैयक्तिक स्वातंत्र्याचे आणि लोकशाहीचे भोक्ते जगाच्या पाठीवर दुसरे कोणीही नसतील पण युद्ध सुरू झाल्याबरोबर त्यांनी आपली ती लोकशाहीची कल्पना आणि घटना एका दिवसात फेकून दिली आणि शुद्ध एकतंत्री सत्ता आपल्या हातांनी प्रस्थापित केली नाही काय? आज हिटलरचा शब्द हा जसा जर्मनीत जवळ जवळ निर्बंध समजला जातो त्याचप्रमाणे इंग्लंडमध्ये चर्चिलची स्थिती आहे. इंग्लंडहून आलेल्या अगदी आत्ताच्या डाकेने एक प्रमुख वृत्तपत्र आणून दिले. त्यात एका कवीने गायिलेले स्वातंत्र्याचे शोकगीत आहे. त्यात पुढील स्वरविलाप आहेत-

**आहे आम्हांस ठावे। संग्राम घोर चालू।।**
**परि नित्य प्रत्यही ते। न्यायालयेहि चालू।।**
**करितसे आता तो काय। हेबिअस् कॉर्पस् ॲक्ट।।**
**वाचवू शके ना मुळि जो। व्यक्तींच्या स्वातंत्र्याला।।**
**वाचवू न शकली कोणी। ते स्वातंत्र्याचे बेट।।**
**मॅग्नाचार्टा'चा अंत। अरेरे! थडग्यात बिचारा शांत।।**

तेव्हा जर्मन लोक हे नाझी आहेत आणि साम्राज्यवादी आहेत; म्हणून त्यांच्याविरुद्ध लढणे हे भारतीयांचे कर्तव्य आहे; किंवा इंग्रज फ्रेंच किंवा अमेरिकन लोक हे लोकशाहीचे भोक्ते आहेत; म्हणून त्यांजवर आपण प्रेम करणे अवश्य आहे; या कोणत्याच बोलण्यात काही एक अर्थ नाही.
यापकरणी आपले खरे राजकीय व्यावहारिक धोरण असे असावे; की जो कोणी देश, मग तो कोणत्याही वादाचा पुरस्कर्ता असो; जो आमच्या देशाचे हित साधण्यास आम्हास उपयोगी पडेल; नि जेवढा काळपर्यंत उपयोगी पडेल, तोपर्यंत तेवढ्या काळपर्यंत तो आपला मित्र होय.

नाझी आणि बोल्शेव्हिक लोक तात्त्विक भूमिकेवरून एकमेकांचे अगदी कट्टे हाडवैरी होते ना! पण या युद्धाच्या वेळी पोलंडच्या प्रश्नावर आणि इतर स्वार्थ साधण्याच्या विषयात त्यांचे हितसंबंध एक झाले तेव्हा त्यांनी रातोरात आपल्यात सख्य घडवून आणले नि झटपट संधि करून टाकला. त्याच्या उलट समजा जर इंग्लंड आणि रशिया यांचे युद्ध जुंपते आणि हिटलर इंग्रजांच्या बाजूने लढता; तर याच इंग्रज लोकांनी याच नाझी जर्मनीचे मुक्तकंठाने पोवाडे गायिले नसते काय? पूर्वी फ्रान्समध्ये क्रांती होऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यापासून तिसऱ्या नेपोलियनचा पाडाव होईपर्यंतच्या काळात इंग्लंडमध्ये फ्रेंच लोकांशी शत्रुत्व होते. त्या वेळी, म्हणजे बिस्मार्कच्या काळात, जर्मनी जेव्हा साम्राज्यवादी म्हणून प्रसिद्ध होता; तेव्हा, त्याने फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारले असता याच इंग्रजांनी त्या जर्मनीची स्तुतिस्तोत्रे गायिली नाहीत काय? हेच अमेरिकन लोक, इंग्रजांचे भाईबंद होते. पण त्यांनी जेव्हा इंग्लंडविरुद्ध बंड करून आपल्या देशात लहानसहान राज्ये स्थापन केली आणि आपले स्वातंत्र्य घोषित केले; तेव्हा याच इंग्रज लोकांनी जगभर याच अमेरिकन लोकांची अत्यंत देशद्रोही नि मानव जातीतील दुष्टाव्याचे पुतळे म्हणून त्यांची निंदा केली नाही काय? पण आता पाहा! ह्या अमेरिकन लोकांशी ते केवळ सलगी करून आहेत. कारण या युद्धात इंग्लंडची पुरती फजिती होण्याचे टाळण्यास अमेरिकेच्या सहाय्याचा

आश्रय एवढाच काय तो त्यांना आधार दिसत आहे. त्यामुळे आता इंग्लंडला अमेरिकनांचा केवढा पुळका आला आहे! इंग्लंडचा जॉन बुल आणि अमेरिकेचा अंकल सॅम हे आता गळ्यात गळा घालू लागले आहेत. एवढेच कशाला ज्या बोल्शेव्हिक रशियाची या इंग्रज लोकांनी आजपर्यंत टवाळी केली नि त्यांना शिव्याशाप दिले; त्याच रशियाकडे सहाय्याच्या लोभी दृष्टीने आज इंग्लंड पहात आहे. अजूनही जर रशियाने इंग्लंडला हात देण्याचे ठरविले आणि जर्मनीशी केलेले सख्य तोडून टाकले, तर तेच इंग्लंड याच बोल्शेव्हिक सरकारला ''आमचा उमदा दोस्त म्हणून लगेच प्रशंसू लागेल.

(घ) ''पहा बोवा! नाही तर जर्मन लोक हिंदुस्थान जिंकतील!'' अशी भीती आजकाल इंग्रज लोक आम्हास दाखवीत आहेत. पण त्यांच्या या बागुलबोवाचे भय धरण्याचे आपणास काही एक कारण नाही. आपणास या युद्धकालीन परिस्थितीत आपले तात्कालिक धोरण ठरवितांना त्याचा विचार करण्याचे कारण नाही.

आजच्या परिस्थितीकडे पाहता इंग्लंडचा बहुतकरून पराभव होईल असे दिसत नाही. निदानपक्ष हिंदुस्थानचे साम्राज्य जसेच्या तसे जर्मनीच्या हवाली करावे लागेल; अतका दणदणीत पराभव इंग्लंडचा होईल; असे तर मुळीच दिसत नाही. असे म्हणतात, की जेव्हा कोलंबस पहिल्या प्रथम अमेरिकेच्या भूमीवर उतरू लागला; तेव्हा तेथील लोक त्यांच्याशी लढण्याकरिता धावून गेले. त्या सुमारास सूर्यग्रहण होते; हे कोलंबसाला माहीत होते. तेव्हा त्याने आपण देवाचे प्रतिनिधी आहोत; अशी बतावणी केली. आणि त्याच्याशी लढण्याकरिता आलेल्या लोकांना त्याने असे सांगितले; की ''जर तुम्ही माझे स्वागत न कराल आणि मला भूमीवर उतरण्यास उपयोगी न पडाल, तर याद राखा! मी आकाशातून सूर्यच पळवून नेईन आणि मग येथे नित्याचाच अंधार होऊन बसेल.'' कोलंबसच्या या म्हणण्याची प्रचीती लगोलग येऊ लागली. तेथील स्थानिक लोक जे, विरोध करण्यासाठी आले होते; ते सूर्याला ग्रहण लागताच आता हा सूर्य आकाशांतून जाणार आणि आता तेथे अंधारच अंधार होणार अशा भीतीने गडबडून गेले. त्यांनी ताबडतोब धावत जाऊन कोलंबसाकरिता फुले, फळे आणि इतर देणग्या किनाऱ्यावर आणल्या आणि त्याला भूमीवर उतरण्यास सहाय्य केले. हिंदुस्थानातील लोकांपुढे अशाच प्रकारची भीती इंग्रज लोक घालीत आहेत. ते म्हणतात, ''बघा बरे! आम्हाला सहाय्य करा; नाही तर हिटलर येईल!'' पण कोलंबसाने अमेरिकेतल्या लोकांना मला सहाय्य करा, नाही तर नित्याचा अंधःकार येऊन बसेल असे जे सांगितले तशासारखेच हे बोलणे निव्वळ खोटे, लबाडीचे आणि तिरस्कार्य आहे. ह्यांच्या उलट इंग्रज लोक जगात असे सांगत आहेत की या युद्धात आम्ही हिटलरला अखेरीस पराभूत करणार पण त्याचवेळी आम्हाला मात्र ते असे सांगतात की, ''आम्हाला सहाय्य करा नाही तर जर्मन लोक हिंदुस्थान जिंकल्यावाचून राहणार नाहीत. यातले खरे कोणते?

खरे असे आहे की, जर या इंग्रज लोकांना भारतीयांच्या सहाय्यावाचून हिंदुस्थान हातचे जाईल असे खरोखर वाटत असते; तर हेच इंग्रज लोक हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्यच काय; पण इतरही आणखी वसाहती जशा ते अमेरिकेस देऊ करीत आहेत, तशा ते स्वतःच्या साहाय्यासाठी देऊ करते.

बरे समजा, वादाकरिता आपण असे गृहीत धरले की, ह्या युद्धाला कलाटणी मिळाली, तरी जर्मन लोक हिंदुस्थानावर स्वारी करून येतीलच हा कदाचित होणारा संभव खरा ठरेलच; असे तरी आपण का गृहीत धरावे? नि इंग्रजांना घालवून जर्मनी हिंदुस्थान पादाक्रांत करील असे तरी का मानावे? या जगात जेव्हा जेव्हा राजकीय भूकंप होतात; तेव्हा साम्राज्याची साम्राज्ये तुकडे तुकडे होऊन कोलमडून पडतात; आणि इतिहास असे सांगतो की पुष्कळदा दास्यात खिचपत पडलेल्या राष्ट्रांना आपले स्वातंत्र्य मिळविण्यासाठी दोघा राष्ट्रांची प्रबळ लढत लढवीत ठेवणे, आणि त्यायोगे दोघांचीही आक्रमक सामर्थ्ये नाहीशी करून स्वतःचे स्वातंत्र्य प्रस्थापित करणे; पुष्कळदा शक्य असते. आणखी जर या युद्धात ब्रिटिशांना हिंदुस्थानातून काढता पाय घ्यावा लागला आणि जर्मनी किंवा दुसरा कोणी सामर्थ्यवान ह्या देशावर लगोलग चालून आला नाही; तर या देशात अंतर्गत अराजकता माजेल आणि त्यातून हिंदुमुसलमानांच्या यादवीचे युद्ध निर्माण होईल. कित्येक लोक या परिस्थितीत आम्हास भीती घालतात पण, अशी परिस्थिती निर्माण झालीच तर त्यातून आपण हिंदू लोकांना यशस्वी रीतीने बाहेर पडणे फार शक्य आहे; आणि तसे झाले तर आपण आपल्या घराचे निर्विवादपणे धनी सहज होऊन जाऊ.

तात्पर्य काय की, हे नैतिक किंवा तात्त्विक वाद किंवा असे झाले तर तसे होईल असल्या प्रकारच्या संभवात्मक गोष्टी या आपणास केवळ बिचकवण्याकरिता असून आपण ब्रिटिशांच्या युद्धकार्यास बिनशर्त आणि स्वेच्छेने मदत करावी; यासाठी ही सारी कारवाई आहे. या गोष्टीचा आपण विचार करू नये; असे नाही; पण आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीने व्यावहारिक दृष्टीने त्याकडे पाहूनच आपण आपली धोरणे बांधावी.

या युद्धकालात आपला कार्यक्रम ठरविताना आपल्याकडून होईल त्या आणि शक्य असेल त्या रीतीने या युद्धाचा लाभ आपल्या देशाचे हित साधण्याच्या कामी कसा कसा घेता येईल; आपण आपल्या उपयोगी कसे नि किती पडू, आपल्या हितसंबंधांचे रक्षण कसे करू आणि शक्य झाले तर हिंदुत्वाचे अभ्युत्थान आपणास कसे करता येईल याच दृष्टीने आपण विचार केला पाहिजे.

असे करताना आपण वायफळ, निरुपयोगी किंबहुना घातक असल्या शाब्दिक मायाजाळाला भुलता कामा नये. सध्याच्या परिस्थितीतील आपल्या दौर्बल्याची जाणीव ठेविली पाहिजे. त्याचप्रमाणे आपले जे काही थोडेफार आज सामर्थ्य आहे किंवा युद्धाच्या वाढत्या प्रसारामुळे जे आपणास उपलब्ध होणार आहे; त्याची किंमत कमी मानून, आहे तेही नाहीच; असे मानण्याचे वेडेपणही करता कामा नये. या मर्यादांच्या कक्षेत राहून आपल्याला विचारार्ह नि स्वीकारार्ह आढळतील अशा काही प्रमुख कार्यपथांची आपल्या किंवा प्रत्यक्षात सुचविल्या गेलेल्या

किंवा ज्यानुसार कार्यवाही झाली आहे; होत आहे; अशा अन्य निरनिराळ्या भारतातील राजकीय पक्षांच्याही कार्यपथांची आपण सुयोग्य पारख करू या.

सबंध राष्ट्रभर सशस्त्र बंड पुकारणे हा एक मार्ग आहे. दरम्यान पिचत पडलेल्या कोणत्याही राष्ट्राला स्वतःचे स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यास आपला शत्रु दुसऱ्या एखाद्या प्रबळ शत्रूशी युद्धात चांगलाच गुंतला आहे; अशी संधी पाहून त्यांच्याविरुद्ध सशस्त्र बंड करणे हा सहज सुचणारा नि विशेष परिणामकारक असा एक मार्ग आहे.

पण आपण निःशस्त्र केलेले, असंघटित असलेले आणि आपापसातील यादवीने गांजलेले लोक इंग्लंडविरुद्ध देशव्यापी स्वरूपाचे सशस्त्र बंड पुकारू शकणे आज शक्यतेच्या कोटीतील नाही. त्याविना आपली ही जी सभा आहे; अशा महासभेच्या, काँग्रेसच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही एखाद्या सभेच्या प्रकट अधिवेशनातून सशस्त्र बंडाचा विचार करणे हेही शक्य नाही. किंबहुना त्यांनी आपल्या कार्याच्या ज्या मर्यादा घालून घेतल्या आहेत; त्यांच्या दृष्टीनेही हे त्यांच्या कक्षेबाहेरचे आहे. हा मार्ग नैतिक दृष्ट्या वाईट आहे; म्हणून नव्हे; तर, केवळ व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीने हिंदुमहासभेच्या अशा अधिवेशनात नि सध्याच्या प्रकट प्रसंगी आपणास त्याचा विचार करण्याचे येथे सोडून देणे भाग आहे.

## संपूर्ण अहिंसावादावर आधारलेला गांधींचा सत्याग्रह

दुसरा मार्ग अत्यंतिक अहिंसावादावर उभारलेल्या नि वैयक्तिक खुळचटपणाच्या मायाजाळाचा होय. त्याचा फारसा विचारही करण्यात अर्थ नाही. देशव्यापी सशस्त्र बंडाचा पहिला मार्ग जो अव्यवहार्यतेच्या कारणाकरिता बाजूस सारला पाहिजे; त्याचप्रमाणे हा दुसरा टोकाचा आत्यांतिक अहिंसेवर उभारलेला नि सशस्त्र प्रतिकाराला त्याज्य ठरविणारा दुसरा मार्ग केवळ व्यावहारिक दृष्ट्याच नव्हे; तर नैतिक दृष्ट्याही त्याज्य म्हणून सोडून देणे आवश्यक आहे.

नैतिक कृत्य कशाला म्हणावे; यासंबंधाच्या उहापोहात स्थल नि काल यांच्या अभावास्तव मी खोल शिरू इच्छित नाही. नीतीचे शास्त्र, आत्मस्फूर्तीने साक्षात्काराने किंवा व्यवहाराच्या सोयीने कोणत्याही तत्वावर अधिष्ठित झालेले असो; तथापि त्याची जी व्यावहारिक बाजू जी सर्व नीतिशास्त्रवेत्ते एकमुखाने मान्य करतात; नि जिच्या योगाने नीति कोणती आणि अनीति कोणती; सद्गुण, दुर्गुणाहून वेगळा कसा किंवा चांगलेवाईट कोणते हे ठरविले जाते; ती कसोटी केवळ व्यावहारिक गोष्टीवर अधिष्ठित केलेली आहे. ती म्हणजे ही की मानवी जीवनाला जे जे विचार किंवा आचार उपकारक होतील त्या त्या सर्वांना नीति किंवा सद्गुण म्हणावे नि त्याच्या विरोधी जे जे असेल; त्याला अनीति किंवा दुर्गुण समजावे; हाच न्याय सर्व नीतिशास्त्रवेत्त्यांनी मान्य केलेला आहे. याचाच अर्थ नीतीची कल्पना मानवी जीवनावरच मुख्यतः अधिष्ठित आहे.

या अगदी व्यावहारिक आणि पुन्हा पूर्णपणे पायाशुद्ध कसोटीस अनुसरून पाहता ज्या आत्यंतिक अहिंसावादात अन्याय्य आक्रमणाविरुद्धही केला जाणारा सशस्त्र प्रतिकार, त्याज्य ठरविला जातो ते अहिंसेचे तत्वज्ञान अगदीच अव्यवहार्य मानवी जीवनाला घातक आणि म्हणून पूर्णपणे अनीतिमय असे मानिले पाहिजे. लहान मुले निजलेली असता त्यांच्यामध्ये एखादा साप शिरला; किंवा लोकांची जत्रा जमली असता त्यामध्ये एखादा पिसाळलेला कुत्रा एकदम घुसला तर तुम्ही त्याला मारू शकत असताही केवळ आत्यंतिक अहिंसेच्या तत्वज्ञानास अनुसरून तुम्ही त्यास ठार मारले नाही; तर तुम्ही प्राणघातक हिंसेलाच आपल्या कृत्याने प्रोत्साहन देता असे होते. कारण तुमच्या त्या कृत्याने तो साप किंवा पिसाळलेला कुत्रा माणसांना चावून ठार मारतो. त्यामुळे एका सापाचा किंवा कुत्र्याचा जीव वाचविण्याकरिता तुम्ही अनेक माणसांचे जीव वाचविण्याचे टाळता; आणि त्याला आपल्या सोयीप्रमाणे नि सवडीप्रमाणे अनेक माणसांचे जीव घेण्यास स्वतंत्र ठेवता. अशा रीतीने दुहेरी पापाचे तुम्ही धनी होता. याच्या उलट जर तुम्ही तो कुत्रा किंवा साप त्या क्षणी ठार मारला; तर कोणाही जीवाचा कोणत्याही कारणाकरिता केव्हाही वध करावयाचा नाही; या तुमच्या तत्वाच्या विरोधी वर्तन केल्याचे पाप तुम्हाला लागते. ह्या एकाच उदाहरणावरून अत्यंतिक अहिंसेचे तत्व हे केवळ अव्यवहार्य मानवी जीवनाला घातक आणि म्हणून पूर्णपणे अनीतिकारक आहे; असे सिद्ध होते. ही गोष्ट वैयक्तिक संबंधात लागू पडते; तीच राष्ट्राच्याही विषयात लागू पडते. हेही लक्षात ठेवावे; की जे धर्म अनत्याचार, अहिसा इत्यादीचा आत्यंतिक गुणगौरव करतात त्यांनासुद्धा या नियमांना अपवाद करावे लागले आहेत. कोणत्याही प्रकारच्या अन्याय्य आक्रमणाविरुद्ध केल्या जाणाऱ्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध ते करीत नाहीत; नि असा निषेध करणे हा खऱ्या अहिंसेचा गुणही होऊ शकत नाही.

## सापेक्षतः अहिसा हा सद्‌गुण;
## पण आत्यंतिक अहिंसा हा अपराधच

तथापि मर्यादित अहिंसा मात्र एकंदरीने मानवी जीवनाला अत्यंत उपकारक असल्यामुळे तो एक मोठा गुण असून आपले वैयक्तिक किंवा सामाजिक जीवन, किंबहुना आपल्या सर्व सामाजिक सुखसोयी त्यावरच आधारलेल्या आहेत. पण कोणत्याही काळी किंवा प्रसंगी पाळावयाची आत्यंतिक अहिंसा ही वैयक्तिक किंवा राष्ट्राच्या स्वरूपाच्या मानवी जीवनाला अत्यंत हानिकारक असून ती अनीतिकारकही आहे. नि म्हणून ती त्याज्य ठरविली पाहिजे. ज्या नीतिशास्त्रवेत्त्यांनी समर्याद अहिंसेला एक मोठा सद्‌गुण म्हणून मानले; त्यांनीच आत्यंतिक स्वरूपाच्या अहिंसेला त्याज्य समजून तिचा निषेध केला आहे.

## जैनबौद्धांची अहिंसा, गांधीप्रणीत अहिंसेच्या विरोधीच आहे

बौद्ध धर्माने किंवा जैन धर्माने जे अहिसाधर्माचे प्रतिपादन केले आहे; ते गांधीजीनी प्रतिपादिलेल्या सर्व प्रकारच्या परिस्थितीत सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणाऱ्या आत्यंतिक अहिंसा धर्माशी अगदी विरोधी आहे. ज्या जैन लोकांनी राज्ये स्थापन केली; वीर आणि वीरांगना निर्माण केल्या; जे समरभूमीवर शस्त्राने लढले आणि ज्या जैन सेनापतीनी जैन सैनिकांची सैन्ये लढविली; त्यांचा जैन आचार्यांनी कोठेही नि केव्हाही निषेध केला नाही; ही एकच गोष्ट त्यांची अहिंसा गांधीवादी घाणेरड्या अहिंसेहून उघडच वेगळी होती; असे दर्शविते. किंबहुना अन्याय्य आक्रमणांचा सशस्त्र प्रतिकार करणे नुसते न्याय्यच नव्हे तर आवश्यक आहे; असे जैनधर्मानेही उघडपणे प्रतिपादिले आहे. जर एखादा सशस्त्र नि आततायी मनुष्य एखाद्या साधूची हत्या करू लागला, तर त्या साधूचा जीव वाचविण्यासाठी अशा मनुष्यास ठार मारणे अवश्य असले तर खुशाल ठार मारावे; कारण अशा प्रकारची हिसा ही एक पकारे अहिंसाच होय! असे म्हणून जैन धर्मग्रंथ तिचे समर्थन करतात. मनुस्मृतिमध्ये म्हटल्याप्रमाणेच, जैन धर्मग्रंथानेही असेच म्हटले आहे की, ह्या ठिकाणी हत्येचे पाप जो मूळ हत्या करतो त्यास लागते. हत्या करणाऱ्यांचा वध करणारासच ते लागत नाही. ''मन्युस्तन्मन्युमर्हति।'' भगवान बुद्धाने सुद्धा अशाच प्रकारचा उपदेश केला आहे. एकदा एका टोळीचे पुढारी त्याजकडे गेले नि दुसऱ्या टोळीच्या लोकांनी आपणाविरुद्ध आक्रमण केल्यामुळे त्यांचा सशस्त्र प्रतिकार करण्यास अनुज्ञा मागू लागले. तेव्हा बुद्धाने त्यास सशस्त्र प्रतिकाराची आज्ञा दिली. भगवान बुद्ध म्हणाले, ''सशस्त्र आक्रमणाच्या प्रतिकारार्थ क्षत्रियांनी युद्ध करण्यास प्रत्यवाय नाही. जर ते सत्कार्याकरिता सशस्त्र होऊन लढतील तर त्यांस पाप लागणार नाही.''

## माणसाचा पहिला वहिला त्राता होतें संरक्षक खड्ग

आपण हा निसर्गाचा नियम म्हणा किंवा ईश्वराची इच्छा म्हणा; निसर्गात आत्यंतिक अहिसेला कोठेही स्थान नाही; ही गोष्ट अगदी सत्य आहे. नाही तर, मनुष्यप्राणी हा जिवंतच राहिला नसता; किंवा फार तर एखाद्या भित्र्याप्रमाणेच किंवा किड्याप्रमाणे कोठे तरी पृथ्वीच्या पाठीवर जीव धरून राहिला असता परंतु त्याने आपल्या मूळ सामर्थ्याच्या जोडीला कृत्रिम शस्त्राची जोड निर्माण केल्यामुळे त्याला आजची स्थिती प्राप्त झाली आहे. भौतिक शास्त्राप्रमाणे जेव्हा प्राण्याला मानवी जीवन प्राप्त झाले. तेव्हा सरपटणारे प्राणी जगभर पसरलेले होते. त्यांच्याशी तुलनेने पाहता केवळ व्यक्ति या नात्याने तो अत्यंत दुर्बळ प्राणी होता. ज्या वेळी तो प्रथम निर्माण झाला. तेव्हा त्याच्या भोवताली असणाऱ्या प्रचंड अरण्यात जगण्यासाठी धडपड करणाऱ्या सर्व प्राण्यांत शरीरतः मनुष्यप्राणी हा अत्यंत दुर्बळ होता. विषारी दात नव्हते; किंवा सोंड नव्हती; त्याला शिंगे नव्हती किंवा तीक्ष्ण नखेही नव्हती. आपण गायीला स्वभावतःच आणि शरीरानेही अत्यंत निरुपद्रवी आणि स्वसंरक्षणाला अत्यंत नालायक असा प्राणी समजतो. तथापि जर गाय आणि मनुष्य या दोघांची लढत जुंपली तर अशी गायसुद्धा माणसाच्या पोटात आपली श्ंगे खुपसून त्याला ठार मारील; पण मनुष्य काही करू शकणार नाही.

मनुष्याचे अस्तित्व जर कशाने शक्य असेल तर ते आपल्या शारीरिक अवयवांना सामर्थ्य प्राप्त करून देण्याकरिता जी कृत्रिम शस्त्रे निर्माण केली; त्यात आहे म्हणूनच तो सर्व प्रकारच्या पशूंवर मात करू शकला.

वाघ, सिंह, हत्ती, लांडगे, साप, सुसरी या सर्वांच्या वर मात करून, त्याने भूमी आणि पाणी ह्यावर आपले प्रभुत्व स्थापन केले. अगदी प्राचीन काळापासून लोहयुगापर्यंत सर्व काळात मनुष्य अतरांवर आपला दरारा ठेवू शकला; आपला विस्तार वाढवू शकला नि त्या पृथ्वीचा धनी बनू शकला तो केवळ शस्त्रांच्या सहाय्याने. खरोखर! स्वतःच्या संरक्षणाकरिता उत्पन्न केलेले खड्ग हीच माणसांची खरी संरक्षणकर्त्री देवता होय.

आत्यंतिक अहिंसावादावरील विश्वास नि त्यासाठी कोठल्याही प्रकारच्या उघड उघड विश्वसनीय आक्रमणाच्या सशस्त्र प्रतिकाराचा निषेध करणे त्यांची निर्भर्त्सना करणे, हे महात्मापदाचे किंवा साधुत्वाचे लक्षण नसून ते केवळ एककल्ली उन्माद रोगाचे आणि निर्बुद्धपणाचे लक्षण आहे.

जी गोष्ट पाशवी जगताशी संघर्ष करताना मनुष्याने अंमलात आणली; तीच गोष्ट मानवामानवा-तील संघर्ष करून जिवंत राहण्यास त्यास उपयोगी पडली. एका टोळीचा दुसऱ्या टोळीशी एका वंशाचा दुसऱ्या वंशाशी किंवा एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्रांशी होणारा संघर्ष आजपर्यंत हेच दाखवीत आहे. इतिहासाच्या प्रत्येक पानापानांतून अगदी अखेरच्या पानापर्यंत एकच गोष्ट सिद्ध झालेली दृष्टीस पडते ती ही की इतर गोष्टी सारख्या असल्या तर जी राष्ट्रे सैनिक दृष्ट्या

सामर्थ्यवान ठरतील तीच काय ती जगतील नि जी सैनिक दृष्ट्या कमकुवत ठरतील ती दास्यत्वात खिचपत पडतील; किंवा नामशेष होऊन जातील. आपण जगाच्या इतिहासात एक नवे तत्वज्ञान प्रसृत करणार आहोत असे म्हणणे भाकडपणाचे आहे. तुम्ही कदाचित इतिहासात नवीन भर घालू शकाल; पण निसर्गाचा जो नियम आहे; त्यात काडीमात्र फरक करू शकणार नाही. फार कशाला? जर आजही माणसाने वाघांना आणि कोल्ह्यांना आपण पूर्णपणे अहिंसावादी राहणार आहोत कोणत्याही जीवाची कधीही हिंसा करणार नाही; नि शस्त्र उचलणार नाही; असा कोरा चेक लिहून दिला; तर ते लांडगे आणि वाघसुद्धा, तुमची मंदिरे आणि मशिदी तुमची संस्कृति तुम्ही पिकविलेली शेते, तुम्ही बांधलेली घरे आणि आश्रम ही सारी पार उद्ध्वस्त करून टाकतील आणि बारा वर्षांच्या आत पापी माणसे आणि साधु या सर्वांना खाऊन फस्त करतील. निसर्गाचा नियम अशा प्रकारचा असल्यामुळे अशा प्रकारचे आत्यंतिक अहिंसेचे मानवी जीवनाला घातक असणारे नि ''आक्रमणाचाही सशस्त्र प्रतिकार करू नको''; म्हणून सांगणारे तत्वज्ञान हे किती अनीतीचे आणि पापकारक आहे हे काय, वेगळे सांगावयास पाहिजे?

तरीसुद्धा, आश्चर्य आहे ते हे की ज्यांना हे आत्यंतिक अहिंसेचे तत्वज्ञान अव्यवहार्य वाटते आणि म्हणून जे त्याचा निषेधही करतात तेच लोक बोलताना असे बोलतात की आम्हा व्यवहारी माणसांच्या पकरणी जरी ते तत्वज्ञान अव्यवहार्य असले तरी मुळात ते मोठे नीतीचे लक्षण असून जो कोणी त्या तत्वाचा अंगीकार करील तो खरोखर महात्मा! धन्य होय! त्यामध्ये मानवश्रेष्ठांचे सद्‌गुण भरलेले आहेत. ही, जी मनोवृत्ती आहे; ती तात्काळ बदलली पाहिजे. अशा प्रकारचे वेडगळ मत प्रतिपादन करणाऱ्या या प्रेषितांना सामान्य लोक देवदूत समजू लागतात; आणि मानवी जीवनाची उंची वाढविण्याकरिता त्यांनी काही नवे नीतिनियम शोधून काढले आहेत; असे मानू लागतात.ज्यांना त्यांचे हे धोरण आचरणात आणता येत नाही; ते लोक यांच्या वेडगळपणाला साधुत्वाचे लक्षण म्हणून समजतात; आणि तसे झाले म्हणजे ह्या लोकांनाही आपण कोणी तरी मोठे महात्मे आहोत, असे वाटू लागते. की जे खुशाल बेछूटपणे मोठ्या गंभीरपणाचा आव आणून भारतीय जनतेला ''हातात काठी घेणे हे सुद्धा पाप आहे.'' असे प्रतिपादन करू लागतात. एवढेच नव्हे तर पुढे स्वतंत्र झाल्यानंतरही हिंदुस्थानला एकही सैनिक शिपाई लागणार नाही; किंवा हिंदुस्थानची सागरी सीमा सांभाळण्याकरिता एकही लढाऊ नौयान आपणास ठेवावे लागणार नाही; असे खुशाल सांगत सुटतात! परदेशीयांच्या जोखडाखालून हिंदुस्थानचे स्वातंत्र्य मिळविण्याचा यांचा मार्ग म्हणजे सुताचा चरखा होय! आणि जर ह्या आत्यंतिक अहिंसेच्या कल्पनेवर हिंदुस्थानने विश्वास ठेवला आणि त्यास अनुसरून त्याने सैन्य आरमार किंवा वैमानिक दल ठेविले नाही; तर जगातील कोणतेही राष्ट्र हिंदुस्थानवर स्वारी करणार नाही किंवा जर कोणी केलीच तर त्याच्यासमोर गरगर फिरणाऱ्या चरख्याच्या आवाजावर गाणे गाणाऱ्या देशसेविकांचा ताफा उभा करून आपण त्यांना परतण्यास भाग पाडू अशी त्यांची विचारसरणी आहे.! जेव्हा गोष्टी अशा थराला जातात नि यांच्यासारखे भंगड लोक सर्व सामान्य भोळसट

माणसांचे विश्‍वस्त प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेसारख्या परिषदांना जातात; आणि परदेशातसुद्धा असली खुळचटपणाची हिंदुस्थानच्या नावाने मोठ्या गंभीरपणाने विधाने करू लागतात, तेव्हा परदेशातील राजकारणी लोक आणि युरोप अमेरिकेतील सर्वसामान्य जनता ही यांच्या या खुळचटपणाला हसतात; त्यामुळे या मतांचा गंभीरपणे समाचार घेण्याची वेळ आली आहे. ह्या मताच्या प्लेगला आता शक्य तितक्या लवकर गाडून टाकलेच पाहिजे. आपण या लोकांना क्षमायाचनेच्या भाषेत नव्हे; तर अगदी ठणठणीत शब्दांनी असे सुनावले पाहिजे की तुमचे हे आत्यंतिक अहिंसेचे खूळ केवळ अव्यवहार्य आणि अनैतिक तर आहेच आहे; पण त्याविना यात साधुत्वाची छटा कोठेच नसून त्यात सारा मूर्खपणा मात्र भरलेला आहे. जेव्हा जगातील सर्व माणसे आत्यंतिक अहिंसेचे पालन करतील तेव्हा जगात युद्धच होणार नाही आणि सशस्त्र सैनिकांचीही त्या वेळी गरज उरणार नाही; असे हे सांगतात पण हे तत्वज्ञान संगण्यास फारशी अक्कल लागत नाही. जर प्रत्येक माणसाने चिरंजीव व्हावयाचे ठरविले तर या जगात कधी कोणाला मरण येणारच नाही; असे म्हणण्यासारखे हे आहे. आम्ही जेव्हा तुमच्या आत्यंतिक अहिंसेच्या तत्वज्ञानाचा धिक्कार करतो; तेव्हा साधुत्वाच्या दृष्टीने तुमच्यापेक्षा आम्ही काही कमी  आहोत म्हणून नव्हे; तर तुमच्यापेक्षा आम्हास अधिक अक्कल आहे म्हणून होय. मर्यादित अहिसावाद हे आमचे ध्येय आहे आणि म्हणून माणसाचे संरक्षण करण्याचे पहिले साधन म्हणून संरक्षणासाठी आम्ही तरवारीची उपासना करतो. याच बुद्धीने हिंदू लोक शक्तिदेवता कालीमातेची खूण म्हणून शस्त्रांची पूजा करतात. गुरु गोविंदसिंगानी आपल्या खड्गाला उद्देशून केलेल्या काव्यात पुढीलप्रमाणे म्हटले आहे.

**सुखसंताकरणम् दुर्मतिहरणम्**
**खलदलदलनम् जयतेगम्।**

आणि आम्हीही या थोर गुरूंच्या गाण्यात आपला सूर मिसळून असे म्हणतो की, खड्गा तुझा विजय असो.

तेव्हा शस्त्रवादाच्या या विचारसरणीस अनुसरून सर्व हिंदूंनी फिरून, सचेतन प्रोत्साहित व्हावे आणि आपल्यातील वीरवृत्तीची जोपासना करावी. आपल्या नीतीचे नियम सांगणारे, भगवान मनु नि श्रीकृष्ण हे असून आपल्या सैन्याचे सेनापती श्रीराम हे आहेत. त्यांनी आपल्याला जे वीरत्वाचे धडे दिले ते आपण फिरून गिरवू या म्हणजे आपले हे हिंदुराष्ट्र पुन्हा एकदा विजिगीषु आणि अजिंक्य होऊन जाईल. ज्या वेळी ते आपले नायक होते, तेव्हा आपण एकदा ही गोष्ट सिद्ध केली आहे. आपले तत्वज्ञान हे की जे कोणी आपणाविरुद्ध आक्रमण करून येतील; त्यांना जिंकावयाचे आणि आपण मात्र जे कोणी आपल्या वाटेस जाणार नाहीत, त्यांच्या पकरणी

कोणत्याही प्रकारचे पापी हेतु न धरता भीतीमुळे नव्हे, तर उदार धोरणास अनुसरून मित्रत्वाने रहावयाचे.

हिंदुसंघटनवाद्यांची मूलभूत भूमिकाच अशा प्रकारची असल्यामुळे ते गांधीवादी सत्याग्रहाच्या चळवळीत कठेच सामील होऊ शकत नाहीत. गांधींच्या सत्याग्रहाचे मूलभूत तत्वज्ञान असे आहे; की परदेशी आक्रमण झाले तरी त्याच्याविरुद्ध कोणत्याही प्रकारचा सशस्त्र प्रतिकार बिलकूल करता कामा नये. आत्यंतिक अहिंसेचाच प्रचार करण्याची त्यांची मागणी आहे. पण हे तत्वशून्य तत्वज्ञानच मुळी पापमय असून आम्हा हिंदू लोकांच्या हितसंबंधाला अत्यंत नाशकारक आहे.सरकारच्या हितसंबंधाला ते कदाचित थोडेसे घातक असेल पण आम्हा हिंदू लोकांच्या हितसंबंधाला तर ते अत्यंत घातक आहे. ब्रिटिशांचे राजकारण लुच्चेगिरीचे असल्यामुळे ह्या देशातील कोणी एखादा जर हिंदू लोकांना असा उपदेश करू लागला की लढाऊ वृत्तीपेक्षा चरख्यावर सूत काढणे हे अधिक दैवी स्वरूपाचे आहे आणि आक्रमण करणाऱ्याला ठार मारण्यापेक्षा स्वतःच मरून जाण्याने मानवी जीवनाची परमकोटी विशेष रीतीने सिद्ध होते; तर असे प्रतिपादन इंग्रज लोकांना मनापासून आवडत असते. कारण त्यात त्यांचा पुष्कळसा लाभ आहे. जर गांधीनी ब्रिटिश सरकारला असे आश्वासन दिले; की आम्ही चालू युद्धाच्या संबंधात एक अवाक्षरही विरुद्ध बोलणार नाही. तर हे सरकार त्यांना आत्यंतिक स्वरूपाच्या तत्वज्ञानाचा प्रचार करण्यास खुशाल परवानगी देईल. किंबहुना स्वतः सरकारने अशा प्रकारची ही तडजोड सुचविली होती; आणि कदाचित सत्याग्रहाचा पहिला भर ओसरल्यानंतर सत्याग्रहाचा विजय दाखविण्याकरिता सरकारने सुचविलेली तीच गोष्ट आपल्या विजयाचे लक्षण म्हणून हे मान्यही करतील पण सरकारने शस्त्रवादाविरुद्ध प्रचार करण्यास या लोकांना परवानगी दिली; तर हिंदुसंघटनवाद्यांना स्वतःच्या हितरक्षणार्थ या घातुक तत्वज्ञानाला विरोध करण्यासाठी सर्व न्याय्य त्या मार्गांनी विरोध करावा लागेल. आपल्या हिंदुलोकांमध्ये सैनिकी मनोवृत्ती पुरेपूर वाढविली पाहिजे. आज कशाची गरज असेल तर ती याची आहे. हिंदुसघटनवाद्यांनी आपल्या व्यासपीठावर मुख्य काष्ठफलक प्रदर्शनार्थ-प्रचारार्थ अशा पकारेच लावावेतः-

**''हिंदूनो सैन्यात शिरा, सैनिकीकरण करा''**

युद्धकालीन परिस्थितीत हिंदूंचे सैनिकीकरण नि औद्योगिकीकरण ही आमच्या तात्कालिक उद्दिष्टात समाविष्ट असलीच पाहिजेत.

सध्याच्या परिस्थितीचा अनुकूल नि प्रतिकूल अशा सर्व बाजूंनी विचार करता; या युद्धाने जी नवी संधी चालून आली तिचा जास्तीत जास्त लाभ घेणे अवश्य आहे, असे मला वाटते नि त्या दृष्टीने आज सरकार स्वतःच्या संरक्षणासाटी ह्या देशात जे सैनिकीकरण नि औद्योगिकीकरण

करण्यात गुंतले आहे; त्याचा लाभ आपण घेतला पाहिजे. युद्धामुळे एका वर्षाच्या अवधीत आपणास किती तरी संधी आज प्राप्त झाली आहे. अशी संधी गेल्या पन्नास वर्षात कधी आली नव्हती; नि एरव्ही पुढील पन्नास वर्षांत ती आपल्या शाब्दिक मागण्यांनी नि निषेधांनी आपणास आणता आली नसती. केवळ, गांधीवादाच्या दडपणामुळे ह्या देशातील लोकांचे सामाजिक सामर्थ्य वाढविण्याच्या प्रश्नाकडे काँग्रेस दुर्लक्ष करीत आहे. इतके की, पूर्वी जेव्हा काँग्रेस प्रागतिकांच्या हातात होती, तेव्हा त्यांनी त्या सैनिकीकरणासंबंधी जे शाब्दिक ठराव केले होते, तसे सुद्धा करण्याची काँग्रेसची आज सिद्धता नाही. ते प्रागतिक, या पकरणी तरी गांधींच्या बिनबुडाच्या अहिंसक सेनेपेक्षा अधिक जहाल नि दूरदर्शी होते; असे म्हटले पाहिजे. त्यांनी शस्त्रबंदीचा निर्बंध काढून टाका; सैन्याचे हिंदीकरण करा; असा आग्रह धरला होता. पण, गांधी तेथे आल्यापासून त्यांनी काँग्रेसच्या द्वारा गेली वीस वर्षेपर्यंत शस्त्रवादाचा धिक्कारच केला आहे. जेव्हा काँग्रेसने प्रांताप्रांतातून आपली प्रधानमंडळे स्थापन केली होती; तेव्हा सुद्धा तिने लोकांचे सैनिकविषयक हितसंबंधाचे संरक्षण केले नाही. याच्या उलट मुसलमान पहा. गांधींच्या दडपणाखाली एकीकडे काँग्रेसवाले अहिंसा, अविरोध, असहकार, इत्यादी अजागळ-पणाच्या गोष्टी करण्यात दंग असता; मुसलमानांनी मात्र तिकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यांनी सैन्यात नि सशस्त्र पोलिसांत करता आली तितकी आपली भरती करून घेतली. काँग्रेसच्या या वेडाचारांना प्रतिबंध करण्यासाठी डॉ. मुंजे आणि भाई परमानंद यांच्यासारखे काही थोर हिंदुसभेचे पुढारी खटपट करीत होते. पण त्या गांधीवादाच्या एकंदर चळवळींचा परिणाम हिंदूंना अत्यंत घातक झाला. सैन्यात त्यांचे जे प्रमाण होते ते घटत गेले. एवढेच नव्हे; तर त्या सत्याग्रहाच्या गोंडस नावाखाली त्यांनी जी अनीतीची घातक शिकवण दिली, तिच्या योगाने हिंदू जातीची सैनिक मनोवृत्ती पुष्कळ अंशी मारली गेली आहे. या कारणाकरता हिंदुमहासभेचा अध्यक्ष म्हणून मी जेव्हा जेव्हा दौरे काढले; त्या त्या प्रत्येक वेळी कर्तव्य म्हणून या गोष्टीकडे मी हिंदूंचे लक्ष अवश्य वेधू लागलो. मी माझ्या व्याख्यानांतून पंजाबपासून मद्रासपर्यंत सहस्र हिंदूंना सैनिक मनोवृत्तीची जोपासना करण्याचा संदेश दिला नि त्याचा थोडाबहुत परिणामही झाला. त्या वेळी आमच्यापुढे असा प्रश्न होता की, आम्हा हिंदुसंघटन-वाद्यांना आजच्या आज आमच्या तरुण पिढीला अद्ययावत् सैनिक शिक्षणाची व्यावहारिक बाजू कशी शिकविता येईल नि त्यासाठी आपण काय काय करावे? या विचारात आम्ही गुंतलेले होतो. अशातच युद्ध सुरू झाले आणि ब्रिटिश सरकारला आपल्या स्वतःच्या गरजेसाठी या देशात मोठ्या प्रमाणांवर नवी सैनिक भरती करणे भाग पडले. तेव्हा हिंदुमहासभेला अपेक्षित असलेली संधी आयतीच मिळाली. हिंदुस्थानच्या संरक्षणासाठी ब्रिटिश सरकार ज्या ज्या गोष्टी करील त्या त्या सर्व कार्यात सहभागी होण्यास आम्ही एका पायावर सिद्ध आहोत; असे हिंदुसभेने आपल्या व्यावहारिक राजकारणास अनुसरून सरकारास कळविले. मी, निश्चितीने सांगू शकतो; की या आपल्या एका वर्षाच्या काळातील धोरणाचे फळ उत्साहदायक आहे.

## युद्धप्रयत्नात सहभागी होण्याची
## समाधानकारक फलनिष्पत्ती

या फलनिष्पत्तीचे परीक्षण करताना आपण ही गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की ब्रिटिश लोक या देशात जे औद्योगिकीकरण करीत आहेत नि सैन्ये वाढवीत आहेत ते काही हिंदी लोकांना सहाय्य करण्याच्या उदात्त धोरणास अनुसरून करीत नाहीत. युद्धामुळे ओढवलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी ते या गोष्टी करीत आहेत. आपणही सरकारला या युद्धात सहकार्य करीत आहो; निदानपक्ष विरोध करण्याचे टाळीत आहोत, ते काही ब्रिटिशांना सहाय्य व्हावे म्हणून नव्हे; तर त्यात आपला स्वार्थ आहे; म्हणून मी आपल्यापुढे सर्व परिस्थिती अगदी स्पष्ट शब्दांत मांडली आहे. त्याचा हेतू आपल्या मनातील कल्पना स्वच्छ असाव्यात एवढाच आहे. अलिकडे या देशातील लोकांना अशी एक प्रकारची घातुक सवय लागली आहे. की ज्या अर्थी हिंदुस्थानचे हितसंबंध हे सामान्यतः ब्रिटिशांच्या हितसंबंधांशी विरोधी आहेत.त्या अर्थी ब्रिटिशांशी सहकार्य करण्याच्या दृष्टीने आपण एकही गोष्ट केली, की लगेच ते कृत्य शरणागतीचे राष्ट्रद्रोहीपणाचे, सरकारजमा झाल्याचे असे समजले जाते. ब्रिटिश सरकारशी कोणत्याही परिस्थितीत केव्हा सहकार्य करणे, म्हणजे ते देशबुडवेपणाचे नि निषेधार्ह वर्तन होय. असे मानणे हा एक मूर्खपणाचा प्रकार आहे; आणि हा प्रकार विशेषतः सरकारच्या कुशीत शिरून ज्या काँग्रेसवाल्यांनी राजनिष्ठेच्या शपथा घेऊन नि ब्रिटिश साम्राज्यापुढे मान लववून त्यांची प्रधानपदे हाती घेऊन चालविली, तेच करीत आहेत. पण वेस्टमिन्स्टर ॲबेचा सत्यानाश होईल; म्हणून ज्यांनी रडारड केली; आणि मागच्या महायुद्धात ब्रिटिश सरकारच्याच सैन्यभरतीचे अधिकारी म्हणून ज्यांनी सेवा केली आणि आजही जे लोक जर ब्रिटिश सरकार एकोन्मत्त वेडाच्या लहरी विक्षिप्त मागण्या मान्य करून त्यांचे लाड पुरवील, तर पूर्ण सहकार्य करण्यास एका पायावर सिद्ध आहेत. जे ब्रिटिशांना कोणत्याही प्रकारच्या अडचणीत आणू इच्छित नाहीत; त्याच लोकांनी हे उद्गार काढावे; हे मोठे आश्चर्य आहे! पण हिंदुसंघटवादी पुढाऱ्यांनी मात्र काही झाले तरी निर्बुद्ध फुशारक्या नि निखळ पराक्रमी शौर्य ह्यातील अंतर ओळखलेच पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे व्यावहारिक राजकारणात कोणत्याही दोन पक्षात जे संधी होतात ते ज्या ज्या प्रश्नांवर ज्या वेळी त्यांचे ऐकमत्य होते, त्या त्या प्रश्नांपुरते नि तेवढ्या काळापुरतेच असतात. इतर हितसंबंधांत जरी त्यांच्यात विरोध असला तरी काही तात्पुरत्या प्रश्नापुरते त्यांच्यात सख्य होऊ शकते. हिटलर किंवा स्टॅलिन हे दोघेही शूरपणात काय कमी होते? मग त्यांच्यात पूर्वीचे हाडवैर असताना देखील ते या वेळी एकत्र का आले? त्यांच्या हितसंबंधात इतर अनेक गोष्टीत विरोध होता; तरी, या युद्धात त्यांना समान असणारे काही हितसंबंध निर्माण झाले; म्हणून ते एकत्र आले नाहीत काय? ज्या माणसाला नेहमीच अशी भीती वाटते की, दुसरा आपल्याला फसवीत तर नाही ना; असा मनुष्य बावळटच म्हटला पाहिजे. तो नेहमी सदा सर्वकाळ फसविलाच जाणार. हिंदुसंघटनवाद्यांना

आपल्या राजकीय शहाणपणाची इतकी निश्चिती आहे; आणि इंग्लंडसारख्या वस्ताद राजकारणी पुढाऱ्यांकडूनही आपण कसे फसविले जाणार नाही; ह्याचा त्यांना अंतर्यामी अतका पुरेपूर विश्वास आहे; की, ब्रिटिश लोकांच्या या युद्धकार्यात शक्य तितक्या, अधिक प्रमाणात भाग घेण्यात काही एक चूक नाही, असे ते निश्चितपणे म्हणू इच्छितात. जोपर्यंत या आणि अशा सहकार्यापासून आपला इतर दुसऱ्या कोणत्याही मार्गापेक्षा अधिक लाभ होण्यासारखा आहे; तोपर्यंत आपण हाच मार्ग अवलंबावा हे अष्ट आहे.

या दृष्टीने परीक्षण केल्यास हिंदुमहासभेच्या युद्धकार्यात सहकार्य करण्याच्या धोरणाचा परिणाम विशेषतः हिंदूंच्या सैनिकीकरणाच्या दृष्टीने चांगला झाला आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. गेल्या वर्षांत सरकारने एक लाख नवे सैन्य उभारले. पूर्वीच्या काळी सैन्याच्या निरनिराळ्या विभागांतून मुसलमानांची संख्या शेकडा ७५ पर्यंतसुद्धा गेली होती. पण आताच्या ह्या नव्या सैन्य भरतीत हिदूंची संख्या ६० सहस्रांवर असून मुसलमानांची संख्या केवळ ३० सहस्रच आहे. वैमानिक दलात शिरण्याची हिंदू लोकांत विशेष आवड नि गोडी उत्पन्न झाली असल्याचे दिसून येते. नि खूप मोठ्या संख्येने ते वैमानिक दलात आपली नावे नोंदवीत आहेत. त्यांच्यापैकी कित्येकजण आजही प्रत्यक्ष लढाईत भाग घेत असून कसलेल्या जर्मनांविरुद्ध हल्ले प्रतिहल्ले करण्यात भाग घेत आहेत. आरमार विभागाकडे हिंदूंनी आजपर्यंत लक्ष दिले नव्हते. या विभागात जे काही फारच थोडे लोक पूर्वी शिरले होते. त्यात शेकडा ७५ टक्के मुसलमानच होते. म्हणून या पकरणी हिंदुमहासभेने सरकारकडे या पक्षपाताविरुद्ध नेटाने प्रतिवाद केला. मागे मराठा साम्राज्याच्या काळात समुद्रावर खेळणाऱ्या धाडसी कोकणी हिंदूंनी मोठमोठे पराक्रम केले आहेत. आणि इंग्रजांच्या आरमाराशी टक्कर देऊन त्यांस पराभूत केले आहे. परंतु इंग्रजांनी या लोकांकडे आजपर्यंत दुर्लक्ष केले. कदाचित इंग्रजांशी त्यांचे जे पूर्वीचे हाडवैर होते, त्यामुळेही ते असेल. पण आता त्याही लोकांना आपला आळस झटकून आम्हांला नाविक दलात घ्या; अशी सरकारकडे मागणी करावयास हिंदू सभेने लावले आहे. कोकणपट्टीतील कोळी, भंडारी, आग्री इत्यादी सामुद्रिक कामात निष्णात असणाऱ्या लोकांत महासभेने शेकडो सभा भरवून प्रचार केला आणि ''आम्ही नाविक दलात यावयास सज्ज आहोत. आम्हांस त्यात घ्या'' अशा त्यांच्या सहस्रावधी स्वाक्षऱ्यांचे निवेदन सरकारकडे पाठविले. कोकण समुद्रावर जहाज बांधणे. डॉकयार्ड उभारणे, आरमारी तळ निर्माण करणे या गोष्टी सरकारने तत्काळ हाती घ्याव्या म्हणून सरकारकडे निकड लावली. महासभेने ह्या पकरणी सर्व हिंदुस्थानभर चळवळ केली. त्याचा परिणाम असा झाला की सरकारने कोणत्याही प्रकारचा जातीविषयक भेदभाव न करता हिंदूंना नाविक दलात घेण्याचे मान्य केले. नि याही विभागात हिंदू लोक बऱ्याच संख्येने येत असून त्यांचीही त्यांना आवड आहे, ही गोष्ट त्यांनी आता मान्य केली.

सैनिकी युद्धसामग्रीची येथे मोठ्या प्रमाणावर वाढ करण्याकरता नवी सैनिकी उद्योगालये, मोठ्या प्रमाणावर काढण्याचे सरकारने ठरविले; की रायफली नि रणागाडेही येथे तयार करण्याची

योजना करण्यात आली. ह्या कामासाठी तज्ज्ञ कामगार पाहिजेत; ते तेथे तयार नाहीत; म्हणून त्यांना त्या त्या विषयाचे शिक्षण देण्याचे सरकारने ठरविले नि पंधरा सहस्र लोकांना तत्काळ शिक्षण देण्याची व्यवस्था केली. या देशात अद्ययावत् प्रकारचे सरसाहित्य निर्माण करण्यासाठी जेथे जेथे यासंबंधी शिक्षण देण्यासारखे लोक होते; त्यांना सरकारने बोलावून घेतले. नि काही विलायतेतूनही हेतुतः आणण्यात आले. त्याचबरोबर येथील काही कारागिरांना नि तज्ज्ञ होणाऱ्यांना सरकार या विषयातील पुरेपूर नि अद्ययावत् ज्ञान मिळण्यासाठी विलायतेत पाठविणार असून तेथे त्यांचा खर्च ब्रिटिश सरकारच करणार आहे. त्यांना तेथील ब्रिटिश लोकांच्या बरोबरीनेच वागविण्यात येणार आहे. सरकारने या देशात जी पहिली एक लाखाची नवी लष्करी भरती करण्याचे योजिले होते. ती आता होत आली असून, तिचे सैनिकी शिक्षणही पुरे झाले आहे; म्हणून आता ही संख्या पाच लाखांपर्यंत वाढविण्याचे चालू आहे. याकरता आजच आणखी दोन लाख लोकांची भरती चालू असून जो जो लढाईचा ताण वाढेल तो तो सरकारला ही वाढ आणखी पाच लाख सैनिकांची भरती अल्पावधीतच करून नि लवकरच हिंदुस्थानातील सैन्य सर्व प्रकारचे सैनिक शिक्षण घेतलेले नि सुसज्ज असे दहा लक्षापर्यंत वाढत जाईल यातच पुन्हा लढाईच्या ताणामुळे येथील संस्थानिकांना आपापली सैन्ये वाढविण्यास सरकारने मुभा दिली असून त्यांनीही आपल्या सैन्यात पुष्कळ वाढ केली आहे. आजच सुमारे चाळीस पलटणी या युद्धात वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष भाग घेत असून अद्ययावत् युद्धकलेचे शिक्षण त्यास मिळत आहे. हिंदू संस्थानिकांची सैन्यासंबंधाची पूर्वीची जुनीपुराणी कल्पना बदलली असून तेही आता आपली सैन्ये अद्ययावत करू लागले आहेत.

सैन्याची वाढ दोन लाखांपासून दहा लाख सैनिक भरती होईपर्यंत कमिशन घेतलेल्या अधिकाऱ्यांची आवश्यकता आपोआपच वाढली. आता काही ठराविक तुकड्यांतील हिंदी सैन्याला हिंदी अधिकारी पुरवावयाचे हे पूर्वीचे धोरण नाहीसे होऊन हिंदी अधिकाऱ्यांची कोठल्याही विभागात नेमणूक करण्याचे धोरण ठरविण्यात आले. व्हाईसरॉय कमिशन घेतलेल्या अधिकाऱ्यांची पुन्हा नव्याने योजना करण्यात आली; आता सैन्यात ब्रिटिशांच्या बरोबरीने अधिकारी म्हणून काम करण्यास हिंदी लोकांना भरपूर वाव मिळाला आहे. अशा रीतीने प्रत्यक्ष सैन्यात अधिकारी नि सैनिक यांची मिळून सुमारे दहा लाखांपर्यंत वाढ होत असून याशिवाय इंडियन टेरिटोरिअल फोर्सची देखील अद्ययावत् पुनर्घटना होत आहे.

प्रशाळा आणि महाविद्यालये यातील विद्यार्थ्यांना सक्तीचे सैनिक शिक्षण देण्याच्या विषयात हिंदुस्थान सरकार अजून आडमुठे धोरण स्वीकारीत आहे. परंतु सर्व विद्यापीठांच्या समित्यांनी शाळा महाशाळांतून सक्तीचे सैनिकी शिक्षण द्या, अशी मागणी केली असून, ते सरकारच्या दारावर ठोठावीत आहेत. आणि युद्धाच्या कचाट्यात सापडलेल्या सरकारवर त्याचा ताणतणाव जसा वाढेल, त्याप्रमाणे ते देण्यासाठी ती दारे सरकार उघडीलही.

एका वर्षाच्याच पूर्वी हेच हिंदुस्थान सरकार म्हणत होते की, हिंदुस्थानातील लोकांची सैनिक मनोवृत्ती नाहीशी झाल्यामुळे हिंदी लोकांना इतक्या मोठ्या प्रमाणावर सैनिक-शिक्षित करण्यास पन्नास वर्षे लागतील. पण युद्ध सुरू झाल्याबरोबर त्यांना आपोआपच ते शक्य आहे, असे वाटू लागले. युरोपातील माणसांप्रमाणेच येथीलही लोकांतून काही थोड्या महिन्यांच्या अवधीत लक्षावधी सैनिक नि अधिकारी मिळू शकतात; नि त्यांना युरोपियनांच्या तोडीस तोड सामना देता येतो; ही गोष्ट सिद्ध आहे. खरेच आहे की, गरज लागली; म्हणजे सर्व काही सुचते नि शक्य होते; आणि युद्धाचा पेच जसजसा वाढत जाईल; नि आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थिती जो जो अधिकाधिक बिकट होत जाईल; तो तो ह्याच इंग्रजांना ही गोष्ट पटेल; की, हिंदुस्थानात दहा लाखच काय, पण दहा कोटी लोकसुद्धा उत्तम प्रकारचे सैनिक अधिकारी म्हणून दोन वर्षांत सिद्ध करता येणे अगदी शक्य आहे.

युद्धसामग्रीही या देशात आता खूप अवाढव्य प्रमाणावर होऊ लागली असून सहस्रावधी कारागीर नि तज्ज्ञ लोकांना यच्चयावत् रायफली, तोफा, रणगाडे, दारुगोळा आणि विविध प्रकारची यंत्रेही येथल्या येथेच तयार करता येणे शक्य झाले आहे.

युद्धविषयक उद्योगधंदे सोडून इतर व्यवसायाकडे पाहिले तरीसुद्धा आपणास हेच दिसून येते. या युद्धामुळे कित्येक रासायनिक उद्योग-व्यवसायांना कागदाच्या गिरण्यांना नि इतर अनेकांना उत्तेजन मिळाले असून एरव्ही बारा वर्षांत जी प्रगती झाली नसती ती या एका वर्षांत झाली आहे. आजपर्यंत हिंदुस्थान स्वयंपूर्ण करण्याच्या आड येथील सरकार येत असे; पण आता स्वतःच्या गरजेसाठी त्यास त्या उद्योगधंद्याना अवश्य उत्तेजन द्यावे लागत आहे. महायुद्धाच्या आपत्तीमुळे ब्रिटिश सरकारला हिंदुस्थान देश, सैनिकी नि औद्योगिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली असून, हिंदुस्थान हा एक मोठा सैनिक तळ करणे भाग पडले आहे. पाश्चिमेस ईजिप्त ते आग्नेयेस ऑस्ट्रेलिया येथपर्यंतच्या सर्व ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणार्थ युरोप खंडातील त्यांचे दळणवळण तुटले तरी येथील सर्व कारभार स्वतंत्रपणे चालू राहण्यासाठी म्हणून त्यांना हिंदुस्थान हा आपला तळ करावाच लागला आहे; नि त्यासाठी सर्व प्रकारच्या सामरिक कार्यशाळा नि इतरही उद्योगधंद्याची वाढ या देशात करावीच लागली नि आणखी करावी लागणार आहे. सर्व प्रकारचे नि अद्ययावत असे सेनाबलही फार मोठ्या प्रमाणात सुसज्ज ठेवावे लागणार आहे.

## गंभीर प्रश्न

आता मी आपणाला असे विचारतो की, आपल्याजवळ जी साधने आहेत; त्यांच्या सहाय्याने आपल्याला एका वर्षांच्या अवधीत अशा प्रकारची सैनिक नि औद्योगिक दृष्ट्या प्रगती करता आली असती काय? महासभेला काँग्रेसला किंवा दुसऱ्या कोणत्याही संस्थेला पाच लाख सैन्याची भरती करणे, त्याला सैनिक शिक्षण देणे हे सर्व शक्य होते किंवा आहे काय? आणि समजा तुम्ही तसे करण्याचे मनात आणले असते तरी ब्रिटिश सरकारने तुम्हांस तसे करू दिले असते काय? इतक्या मोठ्या प्रमाणावर, आपल्याला स्वतःच्या साधनांनी साधे लाठीसंघ सुद्धा चालविता आले नसते. गेल्या वर्षीसुद्धा आपण आपल्या लोकांना सैनिकी शिक्षण कसे देता येईल या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार केला नाही काय? आणि आपणाला गेल्या वर्षी सुद्धा सैनिकी शिक्षण देणाऱ्या सहा शाळा चालविता आल्या नाहीत नि हजार मुलांनासुद्धा आपण लष्करी शिक्षण देऊ शकलो नाही; हे खरे नाही काय? आणि आता जर या युद्धाने लाखो हिंदू तरुणांना सैन्यात आरमारात नि नाविक दलात शिरण्याची आणि तेथे जाऊन अद्ययावत् प्रकारचे सैनिक नि अधिकारी होण्याची सुसंधी प्राप्त झाली आहे; तर आपण ती धिक्कारणार काय? आज युद्धकालामुळे या देशात जहाजे बांधणे, विमाने बनविणे, कार्यशाळा उघडणे, बंदुका, तोफा, रणगाडे, दारुगोळा इत्यादींच्या कार्यशाळा निघत आहेत. नि त्यात हजारो हिंदू तरुणांना उत्तम कारागीर नि तज्ज्ञ बनण्याची आयती संधी चालून आली आहे; त्या सर्वांवर आपण पाणी सोडावे, असे आपले मत आहे काय? काय या सर्व सुसंधींचा आपण लाभ घेऊ नये? सैन्यात जाऊ नये? सैनिक कार्यशाळांवर बहिष्कार घालावा? का? तर कुणी काही मूर्ख लोक असे करण्याने सरकारशी सहकार्य होते; किंवा काही वेडेपिसे हे हिंसेचे कृत्य होते; असे म्हणतात म्हणून? आपण तसे करू तर आपणही त्या मूर्खांच्या नि बावळटांच्या पंक्तीत जाऊन बसू!

आणखीही एक गोष्ट आपण विचारात घ्या. युद्धामुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीच्या योगाने या देशातील लाखो लोकांना लष्करात नि उद्योग व्यवसायांच्या क्षेत्रात नोकऱ्या मिळत असून त्यायोगे त्यांना खायला अन्न नि अंगभर कपडा तरी मिळू लागला आहे. आज अर्धा कोट लोकांचे जीवन, त्यायोगे सुसह्य झाले आहे. ज्या वर्गातून हे लोक येतात त्या वर्गातील अठराविश्वे दारिद्र्य आणि बेकारी आपण लक्षात घ्या. त्यांना नोकऱ्या मिळाल्यामुळे आपल्या आधीच कंगाल झालेल्या शेतकऱ्यांवरील तितकाच भार कमी झाला नाही काय?

आपल्या सीमेच्याजवळ जपानचे आगमन होताच सातत्याने चढत्यावाढत्या प्रमाणात बहुतांश सैनिकी सहाय्यासाठी इंग्लंडला, हिंदुस्थानवर विसंबून राहणे भागच पडेल!

हिंदुस्थानच्या सीमेच्या जवळ जवळ जपान येऊ लागला की, त्याचा तत्काळ परिणाम येथे दिसू लागेल. त्या परिस्थितीत इंग्लंडला हिंदुस्थानवरच सैन्याकरता नि इतर साधनसामग्रीकरता अवलंबून राहावे लागेल, सर्वात महत्वाची गोष्ट जी आपण लक्षात घेतली पाहिजे; ती ही की,

ब्रिटिश सरकार आपल्या राष्ट्राचे सैनिकीकरण करण्यास गेल्या वर्षापर्यंत जे केवळ विरोधी होते; नि जे आज एकदम सिद्ध झाले ते काही आपल्या चांगल्याकरता नसून युरोपमधील सध्याच्या युद्धामुळे त्यांना हे नवे धोरण स्वीकारावे लागत आहे. जोपर्यंत हे महायुद्ध युरोप खंडापुरते मर्यादित होते; तोपर्यंत ब्रिटिश लोकांना हिंदुस्थानच्या सहाय्याची काही गरज नव्हती; नि त्यासाठी हिंदुस्थानावर ते अवलंबूनही राहिले नाहीत. गेल्या दोनशे वर्षांतील त्यांचे युरोप खंडातील लढायांसंबंधीचे धोरण अगदी साधे होते. युरोपखंडातील काही देशांना हाताशी धरावे नि त्यांची इतर देशांशी लढत लढवावी एवढेच ते करीत असत. त्यांनी ह्या युद्धासाठी हिंदुस्थानात सैन्ये उभारली असती नि रणसाहित्य निर्मिले असते तरी त्यांना तेथून ते  तिकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर हलविणे सोपे नव्हते; नि म्हणून ब्रिटिशांनी आजपर्यंत सैन्यात हिंदी लोकांची मोठ्या प्रमाणात भरती करण्याची जोखीम घेतली नाही. तसेच इतक्या मोठ्या प्रमाणावर नि खड्या स्वरूपाची सैन्ये येथे उभारून त्यावर आजच्याप्रमाणे विश्वास टाकण्याचीही त्यांची सिद्धता नव्हती. परंतु बुटक्या जपानी लोकांची लांबट सावली, आज बंगालच्या उपसागरावर पडू लागली असल्यामुळे हिंदुस्थानातील इंग्रजांच्या वर्चस्वाला हे एक नवेच संकट निर्माण झाले आहे आणि म्हणून आजपर्यंत या पकरणी इंग्लंडचे जे धोरण होते. त्याशी वर उल्लेखिलेल्याप्रमाणे काही गोष्टीत आशिया खंड युरोपियनांच्या वर्चस्वापासून मुक्त करण्याचे आपले धोरण घोषित केल्यामुळे इंग्लंडला आता असे कळून चुकले आहे; की, आज ना उद्या आपल्याला पूर्वेकडील आपले साम्राज्य रक्षिण्याकरिता जपानशी दोन हात करावे लागणार. ब्रिटिश लोक फार धोरणी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या हे चटकन ध्यानात आले; की, पुढेमागे जपानशी युद्धाचा प्रसंग ओढवला; म्हणजे त्या वेळी युद्धविषयक सर्व प्रकारच्या साधनसामग्रीचे केंद्रस्थान हिंदुस्थान हेच करावे लागणार आहे. ज्याप्रमाणे युरोपखंडातील युद्धांत हिंदुस्थानांतून मोठ्या प्रमाणावर सैन्ये नि युद्धसाहित्य नेणे अवघड होते. त्याप्रमाणे पूर्वेकडील युद्धांत युरोपांतून मोठ्या प्रमाणावर सैन्ये नि युद्धसाहित्य आणणे कठीण आहे.  नव्हे नव्हे! इंग्लंड तसे सद्यःस्थितीत करूच शकत नाही; कारण, तिकडे त्यांचे सन्मान्य शत्रू हिटलर मुसोलिनी किंवा स्टॅलिन, खुद्द इंग्लंडवर झडप टाकण्याची संधी शोधत असताना इंग्लंड अकडच्या भागाचे संरक्षण करण्यासाठी सैन्य नि रणसाहित्य वगैरे मोठ्या प्रमाणावर तिकडून पाठवू शकतच नाही. त्यामुळे  जपानला तोंड द्यावयाचे तर त्यासाठी दशलक्षांच्या घरात  जपानशी लढण्यासाठी सैन्यांची आवश्यकता भासेल. त्या सर्व सैन्याची उभारणी हिंदुस्थानातच केली पाहिजे. सैन्य येथले येथेच उभारले पाहिजे. ते रणसाहित्यही येथेच निर्माण केले पाहिजे. या नव्या पैलूमुळे इंग्लंडला हिंदुस्थानच्या सैन्यावर नि रणसाहित्यावर अधिकाधिक विसंबून राहणेच भाग आहे. आणि त्यातच आम्हाला प्रत्यही-प्रत्ययही मिळतो की, आमच्या राष्ट्रात सैनिकीकरण सतत होत राहील. या देशात जसजशी वर्षे जातील तसतशी फार मोठ्या प्रमाणावर सैनिक वाढ होत राहील. ही गोष्ट ठरून चुकली आहे. या वेळी आपण जर आपले सहकार्य दिले. तर इंग्लंड आपले सैनिक सामर्थ्य वाढविण्याला आपणास निश्चित सवलती

दिल्यावाचून राहणार नाही. वेळ अशी आली आहे; की, जो जो जपान आपल्या सीमेजवळ येत जाईल तो तो सरकारला तेथील सैन्ये वाढवीत न्यावी लागतील. नि लवकरच त्यांची संख्या वीस लाखापर्यंतही गेल्याशिवाय राहणार नाही. म्हणून, पुन्हा मी आपणास असे विचारतो; की, आपण आपल्यासाठी आपले लष्करी सामर्थ्य वाढविण्याची ही सोन्यासारखी चालून आलेली संधी व्यर्थ दवडावयाची की काय? आपल्या भावी उत्कर्षासाठी अशा लष्करीकरणाची अत्यंत आवश्यकता आहे; नि ते करणे आज ब्रिटिश सरकारला भाग पडते आहे.

तेव्हा काही दुधखुळे लोक यात सरकारशी सहकार्य होते; म्हणून किंवा काही मूर्ख लोक यात हिंसा होते म्हणून गप्प बसण्यास सांगतात तसे आपण गप्प बसणार की शहाणपणाचा मार्ग अवलंबून सैन्यात हिंदुसंघटनवाद्यांचा प्रवेश घडवून आपल्या हिंदुराष्ट्रांत पुन्हा वीरवृत्ती फैलावण्यास साहाय्य करणार नि आपले नाहीसे झालेले सैनिकी सामर्थ्य पुन्हा प्रस्थापित करणार?

आज आपणापुढे जे अनेक मार्ग आहेत; त्यापैकी आपण या मार्गाने चलावे असे मी आग्रहपूर्वक नि निश्चितपणे म्हणतो. आज या देशाचे सैनिकीकरण नि औद्योगिकीरण करण्याची सुवर्णसंधी आली आहे. तिचा हिंदुसंघटनवाद्यांनी अवश्य पुरेपूर लाभ घ्यावा. तशी संधी आपल्याला देणे ब्रिटिशांना स्वतःच्या हिताकरिता अवश्य झाले आहे आणि आपण हेही लक्षात ठेवा की जर आपण हे केले नाही, जर सैन्यात आरमारात, नाविकदलात हिंदू लोक शिरले नाहीत; तर त्यांच्या जागी मुसलमान जाऊन बसतील आणि ब्रिटिश सरकारला कमजोर करून स्वतः प्रबळ होण्याऐवजी आपण दुसऱ्या एका शत्रूला प्रबळ करून आपल्या देशात कायमचे दास होऊन बसू.

काँग्रेसचा तथाकथित सत्याग्रह निवडणुकी-साठीच काय ती उपयोगाची केवळ एक बल प्रदर्शनी टूम ! (stunt).

बरं हिंदूसभेने पुरस्कारिलेल्या ह्या कार्यक्रमाव्यतिरिक्त दुसरा तरी कोणता कार्यक्रम आहे? काही घोषणा उच्चारावयाच्या नि तुरुंगात जाऊन बसावयाचे? काँग्रेसमधील जे लोक या मार्गाने आज जात आहेत; त्यांच्या देशभक्तीने प्रेरित झालेल्या हेतूंबद्दल मी त्यांचे कौतुक करतो; नि ते हालअपेष्टा सोशीत आहेत त्याबद्दल मला सहानुभूतिही वाटते. पण मला हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, त्यांनी येथील सर्व राजकीय चळवळीचा चुथडा करून टाकला आहे. त्यांनी जी सत्याग्रहाची मोहीम सुरू केली आहे; तिचा या देशाला म्हणण्यासारखा काहीही लाभ होणार नाही. पुढच्या निवडणुकीकरिता एक हुल्लड म्हणून या चळवळीचा उपयोग होऊ शकेल; नि काही अंशी याकरिताही ती सुरू झाली असावी. पण अशा हुल्लडीला हुल्लड उठवून द्यावी; असे हिंदुसंघटनवाद्यांना वाटते काय? आपणही तसे करणे योग्य ठरले असते. पण हिंदुमहासभेला दोन्ही गोष्टी एकाच वेळी करता येणे शक्य नाही. या महायुद्धाच्या संधीचा लाभ घेऊन या देशाचे सैनिकीकरण नि औद्योगिकीकरण करणे; नि त्यापासून होणारा देशाचा फार मोठा लाभ साधण्यासाठी सरकारशी अवश्य तेथपर्यंत सहकार्य करणे हे आपले धोरण आहे. आता हे धोरणही

अंमलात आणावयाचे नि लगेच त्याला अगदी विरोधी नि घातक, अशा प्रकारची सरकारविरुद्ध निःशस्त्र प्रतिकाराची चळवळही करावयाची या दोन्ही गोष्टी एकदम साधणे शक्य नाही. आपणाला जर देशाच्या सैनिकीकरणापेक्षा आणि औद्योगिकीकरणा-पेक्षा निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीने देशाचे अधिक हित साधेल असे वाटले तर अर्थात आपण त्या मार्गाचा अवलंब करण्यास मोकळे आहात.

## हिदुमहासभावादी पूर्णपणे युयत्सु, संघर्षशील

हिंदुमहासभेच्या बहुतेक सर्व प्रमुख कार्यकर्त्यांशी आणि प्रतिनिधींशी त्या संबंधाने मी पुष्कळ चर्चा केली आहे; आणि हिंदुमहासभेने जोरदार नि प्रभावी कार्यक्रम आखावा अशी त्यांची नि विशेषतः तरुण कार्यकर्त्यांची फार फार इच्छा आहे. कारण काँग्रेसने सत्याग्रहाची चळवळ केल्यामुळे आपणही लढाऊपणात मागे नाही, असे सिद्ध करावेसे त्यास वाटते. त्यांना जी मुख्य काळजी वाटते; ती ही की, काँग्रेसने सत्याग्रह करून नि 'अ' 'ब' वर्गाचा तुरुंगवास पत्करून देशात जी हुल्लड माजवून दिली; तिचा पुढील निवडणुकीवर परिणाम होईल नि म्हणून त्याला तोडीस तोड म्हणून आपणही ही गोष्ट अवश्य करावी. पण हिंदुसभावाद्यांनी प्रथम असा विचार करावा; की, आपणाला निवडणुकी ज्या जिंकावयाच्या त्या तरी कशाकरिता? आपल्या देशाचे हित उत्तम रीतीने साधावे म्हणून ना? आता आपण हे मान्य कराल की निवडणुका जिंकण्याचे महत्व आपणा सर्वांपेक्षा मला अधिक महत्वाचे वाटते. पण आपण जर ह्या निवडणुकीच्या मागे लागून हिंदूंच्या हिताचा घात होऊ देऊ लागलो. तर त्या निवडणुकींकडे हिंदूंच्या हितासाठी दुर्लक्ष करणे हे आपले कर्तव्य नाही काय? जर आपण सरकारशी युद्धकार्यात सहकार्य करून देशाचे सैनिकीकरण नि औद्योगिकीकरण करण्याचा लाभ साधून न घेता ज्याच्यापासून आज विशेष काही लाभांश नाही अशा निःशस्त्र प्रतकिाराच्या चळवळीत पडलो. आणि जर निवडणुका जिंकण्याकरिता आपणाला देशाच्या मूर्खपणाला अंगार ठेवण्याची पाळी येत असली तर मतदारसंघाच्या मूर्खपणाला कौल लावून निवडणुकी जिंकण्यापेक्षा त्यांना रामराम ठोकून हिंदूंचे हित साधणे हे आपले स्पष्ट कर्तव्य आहे.

निजाम निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीने जाणत्या मतदारसंघाला अगदी भरपूर नि ताजा दाखला मिळालेला आहे; नि तुरुंगात जाणे हेच जर शौर्याचे नि देशभक्तीचे लक्षण असले; तर हिंदुमहासभावादी हे या पकरणी काँग्रेसवाल्यांपेक्षा अधिक शूर नि देशाभिमानी आहेत, ही गोष्ट या लढ्याने सिद्ध झाली आहे. सहस्रावधी हिंदुत्वनिष्ठांनी निजामी तुरुंगात मोठ्या निर्भयतेने लाठीमार सहन केले असून ते आता ब्रिटिशांच्या तुरुंगातील 'अ' 'ब' किंवा 'क' ही वर्गातून मिळणारा 'लड्डूमार' निश्चित सहन करू शकतील; नि काँग्रेसवाल्यांच्या बरोबर आपणही खांद्याला खांदा लावून तुरुंगवास सहन करू शकतो असे म्हणून दाखवितील जर हिंदुसंघटनवादी

लोकांना प्रधानमंडळे सत्ता इत्यादी आपल्या हाती यावी; यासाठीच केवळ निवडणुका जिंकावयाच्या असल्या, तर ती फार साधी गोष्ट आहे. डोक्यावरील टोपी बदलली म्हणजे झाले. पुष्कळांनी असेच केले आहे. पण आपण लोकप्रियता मिळो वा न मिळो किंवा सत्ता प्राप्त होवो वा न होवो हिंदुत्वहिताला बाधक काहीही करू नये. मग असे करण्याने पुढच्या निवडणुका आपणास जिंकता आल्या नाहीत; तरी त्याची मला फारशी चिंता नाही.

मतदारसंघाच्या मूर्खपणाला नि वेड्याविद्र्या कल्पनांना खुलविण्यापेक्षा त्याला योग्य दिशा दाखवून ताळ्यावर आणण्यासाठी सरळमार्गी बनविण्यासाठी निवडणुका हराव्या लागल्या, तर ते अधिक देशभक्तीचे लक्षण आहे असे मी समजतो.

मी आणखी एक पैलू स्पष्ट करू इच्छितो की हिंदुमहासभेने एक संघटित संस्था या नात्याने हाच कार्यक्रम कृतीत उतरवावा. परंतु जर काही हिंदुसंघटनवाद्यांना दुसरा एखादा लढाऊ कार्यक्रम सुरू करणे परिणामकारक नि अवश्य वाटले; तर त्यांनी तो केवळ आपल्या वैयक्तिक दायित्वावर सुखेनैव करावा; त्याविषयी मला आनंदच वाटेल. हिंदुमहासभा अशीच इच्छा करील; की, जुन्या पिढीपेक्षा नवी पिढी, अधिक पराक्रमी नि वीर्यशाली व्हावी; पण त्याचबरोबर ती अधिक सूज्ञही व्हावी.

मी आपणापुढे मान्यतेकरता जो कार्यक्रम स्वतःचा म्हणून मांडू इच्छितो तो अर्थातच लागलीच अंमलात आणावयाचा आहे.

अकस्मात उफाळलेल्या युद्धारंभी हिंदुमहासभेने सादर केलेल्या मागण्यांची पर्याप्त प्रमाणात सरकारने प्रत्यक्षात पूर्तता केलेली आहे.

येथेच मला हे स्पष्ट केलेच पाहिजे की, हिंदुमहासभेने अग्रेषित केलेल्या मागण्यांचा सरकारने अव्हेर केला नाही. त्यांना तुच्छ लेखलेले नाही. युद्धसमाप्तीनंतर एक वर्षाच्या कालावधीत वसाहतीचे स्वराज्य दिले जाईल; असे त्यांनी 'प्रकट निवेदन' करावे अशी आम्ही त्यांच्याकडे मागणी केली. युद्धानंतर शक्य तितक्या किमान मध्यंतर-कालात, ग्रेटब्रिटनच्या समकक्ष पायावर सामाईक राष्ट्रकुलाचे एक स्वायत्त शासकीय घटक राज्य म्हणून स्थान देऊन, उभारण्यात येईल; ज्याला ते 'ब्रिटिश' म्हणून संबोधतात; पण मी मात्र आग्रहपूर्वक 'हिंदू-ब्रिटिश असेच संबोधिले पाहिजे असा निश्चित अधिकार सांगतो- असे जितक्या स्पष्ट आणि निःसंदिग्ध शब्दात सांगता येणे शक्य आहे. तितके नि तसे भारतमंत्री आणि राज्याचे सचिव ह्या उभयतांनी स्पष्ट केलेले आहे. आम्ही त्यांच्याकडे 'शब्द' मागितला आणि त्यांनी आम्हाला आश्वासन दिलेले आहे. आम्हाला हेही ठाऊक आहे की, पुडिंग्जची चव ते चाखण्यातच असते! बोलाचीच कढी। बोलाचाच भात। जेवोनिया तृप्त कोण झाला? तर मग असा प्रश्न उद्भवू शकतोच, की या आश्वासनाचे कृतीत रूपांतर केव्हा होणार? दुसरे म्हणजे आम्ही अशीही मागणी केली की, हिंदवी राज्याची एकात्मता भंग पावेल अशा कोणत्याही (फूटपाड्या) योजनेला उत्तेजना किंवा प्रेरणा सरकार देणार नाही. अशा आशयाचे प्रकट निवेदन सरकारने करावे. मी वर दाखवून दिल्याप्रमाणे

केवळ हिंदुमहासभेच्या दबावामुळे मि. आमेरी ह्यांनी आपल्या हिंदुस्थान आधी (India First) ह्या भाषणात त्या प्रकारचे स्पष्ट, 'प्रकट निवेदन' केलेले आहे. जसा नि जिथवर आमच्या सैन्यविषयक मागण्यांचा संबंध येतो त्या संबंधातील आमच्या बहुतेक सर्व मागण्या फार मोठ्या विस्तृत प्रमाणात किमान आतापर्यंत कार्यान्वित झालेल्या आहेत. 'सेना सेवा' आता सर्वच जातीजमातींसाठी सारख्याच पकारे खुल्या झाल्या असून अन्य सवलतीही आपणांस आता मिळालेल्या आहेत; त्यांविषयीचा परामर्श प्रस्तुत अभिभाषणाच्या अन्य भागांमध्ये मी घेतलेला आहे. हिंदूंची इंग्रगण्य प्रातिनिधिक संस्था म्हणून हिंदुमहा-सभेला 'सरकारमान्य'ता ह्या आधीच मिळालेली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, घटना बनविण्याचे दायित्व हिंदी लोकांवर टाकून गाल फुगवीत नि नाकाने कांदे सोलीत एकाच विचाराचे तुणतुणे सतत एकसारखे वाजवीत खनपटीला बसल्यासारखा आग्रह धरीत, जी एकच एक भाषा ते बोलत राहतात ती म्हणजे जोपर्यंत हिंदुस्थानातले, तुमचे अल्पसंख्यांक, बहुसंख्याक ह्यांचे जे काही पक्ष आहेत, त्या सर्व पक्षांनी एकमताने सहमतीने संमतिलेला 'समझोता' ते सर्व पक्ष घडवून आणीत नाहीत; तोपर्यंत आम्ही बनविलेली कशाही चौकटीतली कोणतीही घटना आम्ही तुमच्यावर ढकलू शकत नाही.'' असे असले तरी पण योग्य वेळी ह्या अघळपघळ युक्तिवादाला आम्ही परामृष्ट पराभूत करू. त्याचा आम्ही चांगलाच समाचार घेऊ.

नव्हे नव्हे या विचाराच्या विषयातसुद्धा सरकारला हिंदुमहासभेच्या सर्वाधिक तारतम्ययुक्त तर्कशुद्ध मागण्या आमच्या पदरात टाकाव्या लागण्याचा सर्वसंभव आहे. थोडक्यात मोठ्या भरीव प्रमाणात हिंदु जनांचे सैनिकीकरण परिणामकारक-रीतीने करण्यासाठी म्हणून ज्या महत्वाच्या सवलती आम्ही मिळविलेल्या आहेत; त्यांचा आणि चालून आलेल्या संधीने जे सामर्थ्य आम्हाला प्रदान केले आहे त्याचाही त्याग करून, निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीचा आश्रय घेण्यास आम्हास भाग पडावे लागण्याअतपत तसेच महत्वाचे विशेषसे आम्हास काहीच आढळत नाही. किंवा त्यांत तसे विशेष तात्पर्यही दिसत नाही.

म्हणून मी ज्या एका कार्यक्रमाची अगदी स्पष्टपणे त्यावर भर देत प्रशस्ती करीत आहे, त्यापुढील कार्यक्रमावरच सर्व हिंदुसंघटनवाद्यांनी आपली शक्ती मनःपूर्वक केंद्रित केली पाहिजे. अर्थातच हे माझे व्यक्तिगत मत मी पुढे मांडीत आहे, आणि आपल्या निवडीनुसार कोणत्याही स्वतंत्र अशा सामुदायिक निर्णयाप्रत येण्याची आपल्याला मोकळीक आहे. आणि त्या निर्णयाचे आपला मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनुपालन करण्याचे कार्य मी उत्तम पकारे प्रयत्नपूर्वक करीत राहीन, मग भले तो निर्णय माझ्या कार्यक्रमा-बरोबर जुळो वा न जुळो. ह्या कार्यक्रमाला कार्य-कारिणीच्या समितीने गेल्या २१ नोव्हेंबरच्या बैठकीत ह्यापूर्वीच स्वीकृती दिलेली आहे; ह्याचा उल्लेख करण्याचे, मला प्रयोजन नाही.

मी हेसुद्धा स्पष्ट करीत आहे की, हिंदुमहासभेने एक संस्था ह्या नात्याने ह्या कार्यक्रमाला धरून रहावे; अशी माझी इच्छा आहे. तरीसुद्धा त्याला कार्यान्वित करण्यासाठी मार्गदर्शक रूपरेखा

म्हणून कोणा हिंदुसंघटनवाद्याला हिंदुहितकारणासाठी संघर्ष करण्याचा आपल्या परीने नि पद्धतीने अधिक परिणामकारक असा मार्ग आढळला तर माझ्या अतका प्रसन्न, आनंदित झालेला दुसरा कुणीच असणार नाही. चालू पिढीपेक्षा तरुण पिढीने अधिकच धैर्यशाली असल्याचे दाखवून द्यावे; ह्याहून वेगळी ती अपेक्षा हिंदुमहासभेचीही असू शकत नाही. पण ती पिढी अधिकतर, सुज्ञ समंजस नि शहाणी असल्याचा प्रत्ययही तिने आणून दिला पाहिजे.

अगदी वैयक्तिक अशा माझ्या अधिकारात नि नात्याने ह्या कार्यक्रमाचा अंगीकार आपण करावा, अशी जी प्रशस्ती मी करीत आहे, तो कार्यक्रम अर्थातच एक तात्कालिक कार्यक्रम आहे. ह्या हेतूनेच होय, आणि जर काही, तदंगभूत, तदनुषंगाने काही नवीन समस्या उद्भवली तर तिची दायित्वपूर्ण उकल करून तिचे निरसन करण्यासाठी आपल्याला सुद्धा तत्काळ तत्परतेने एक वेगळ्या प्रकारची कार्यदिशा ठरवून आखावी लागेल.

तात्कालिक निकडीचा कार्यक्रम

१) भूसेना, नौदल नि वायुदल ह्या सैन्याच्या तिन्ही दलात जितक्या हिंदूंची भरती करता येईल तितकी ती करणे

२) रणसहित्याच्या कार्यशाळांतून त्या विद्येत आपली जितकी माणसे आपणाला घालता येतील तितकी घालण्याकरिता प्राप्त झालेल्या सवलतींचा लाभ घेणे.

३) प्रथम शाळा महाशाळांतून सैनिक शिक्षण सक्तीचे करणे.

४) रामसेनेची संघटना जोरदार करणे नि वाढविणे.

५) नागरिक दलात प्रविष्ट होणे नि त्यायोगे आपल्या लोकांचे अंतर्गत यादवीपासून नि परचक्रापासून संरक्षण करणे; ह्या विषयात एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. ती ही की, हिंदुस्थानातील कोणतीही देशभक्तीप्रेरित राजकीय चळवळ मारण्याकरिता किंवा हिंदूंच्या न्याय्य हितसंबंधाविरुद्ध ह्य नागरिक दलाला भाग घ्यावा लागणार नाही; अशी आपण सावधानता घ्यावी.

६) नवे उद्योगधंदे व्यवसाय मोठ्या प्रमाणावर काढून आज जो माल परदेशातून येत नाही; त्याची जागा भरून काढणे.

७) परदेशी मालाची देशी वस्तूंना चढाओढ राहू नये; म्हणून, त्यावर बहिष्कार टाकणे.

८) येत्या जनगणनेत हिंदूंची लोकसंख्या सुयोग्य रीतीने नोंदविण्याकरिता हिंदुस्थानभर चळवळ करणे आणि संदल गोड भिल्ल यांच्यासारख्या मूळच्या हिंदू वन्य लोकांचा शिरगणतीत स्वतंत्र ॲनिमिस्ट किंवा डोंगरी टोळ्या असा उल्लेख होऊ देण्याऐवजी, हिंदू म्हणून समावेश करून घेणे नि ह्या सबंधीचा आपला मुख्य हेतू जेणेकरून साधेल त्या त्या सर्व गोष्टी करणे.

हिंदुसंघटनवाद्यांनी सर्व हिंदुस्थानभर यावरील प्रश्नांवर आपली सर्व शक्ती केंद्रित करावी; असे मला वाटते.

------------------------------

# अखिल भारतीय हिंदुमहासभा
## २३ वे वार्षिक अधिवेशन- भागलपूर
## अध्यक्षीय भाषण
## विक्रम संवत् १९९८ : सन १९४१

माझ्या हिंदुत्वनिष्ठ सहकारी सैनिक बंधूंनो,

आपण सर्वांनी मला अखंडपणे पाचव्या वेळेसही अ. भा. हिंदुमहासभेचे अध्यक्षपद देऊन जो गौरव करून माझेवर जो विश्वास पकटविलात; त्याविषयी मी आपला कृतज्ञ आहे. मी गेल्या वर्षीच माझ्या अध्यक्षपदाचे दोन वेळा त्यागपत्र दिले होते आणि माझी ढासळती प्रकृती नि हिंदुत्वनिष्ठ कार्याचा वाढता व्याप या दोन्ही गोष्टी लक्षात घेता मला विश्रांती देऊन हिंदू महासभेचे नेतृत्व योग्यतर नि अधिक कणखर व्यक्तीचे हाती द्यावे अशी विनंती केली होती. परंतु हिंदुस्थानभर पसरलेल्या कार्यकर्त्यांचा आग्रह नि अ. भा. हिंदुमहासभा समितीने व्यक्तविलेली इच्छा यास मान देऊन मी अध्यक्षपदाची धुरा पुढे रेटावयाचे ठरविले आणि हिंदुस्थानातीलच नव्हे तर परदेशातील हिंदू संघटकांनी जो नितांत विश्वास माझेवर ठेवला नि जे प्रेम व्यक्तविले त्याला पात्र ठरविण्यासाठी व्यक्तिशः सर्व प्रयत्न केले. या वर्षीही नूतन वर्षाच्या अध्यक्षाच्या निवडणुकीची वेळ येत चालली, त्या वेळी बहुतेक सर्व कार्यकर्ते नि अधिकारी यांना यंदाचे वर्षी तरी माझे नाव अध्यक्षीय टिपणीतून वगळा, अशी स्पष्टपणे लेखी विनंती केल्याचे सर्व जनतेला माहीतच आहे. निवडणुका झाल्यानंतरही मी त्यागपत्र द्यावयाचे निश्चित ठरविले होते. परंतु त्याच वेळी भागलपूर येथे भरणाऱ्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनावरील बंदी उठविण्याचे सरकारने निःसंदिग्धपणे नाकारले. या सरकारी बंदीमुळे अध्यक्षपदाचे त्यागपत्राचा विचार मला माझे डोक्यातून काढून टाकणे अपरिहार्य झाले.

ही बंदी म्हणजे हिंदुत्वाभिमान्यांवर पडलेला असह्य, अगांतुक नि अन्याय्य घाव असल्यामुळे ती काढून घेण्यासाठी आपल्याला शक्य असलेले सर्व वैध प्रयत्न करणे हे प्रत्येक हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यास अत्यावश्यक झाले; आणि अशा या भागलपूर अधिवेशनासाठी निवडलेला अध्यक्ष या नात्याने माझे कर्तव्यही स्पष्टच झाले; ते म्हणजे आपल्या जागी खंबीरपणे उभे राहणे हेच होय आणि म्हणून येत्या वर्षासाठी पाचव्या वेळी अ. भा. हिंदुमहासभेचे अध्यक्षपदाची धुरा नि नेतृत्वाचे दायित्व मी स्वेच्छेने मान्य केले आहे. मला पुनश्च एकदा हिंदू चळवळीचे नेतृत्व देऊन आपण माझा केलेला सन्मान आणि मजवर व्यक्तविलेला विश्वास यास मी पात्र ठरावे ह्यासाठी नि हिंदुहितकारणार्थ माझ्या हातून पुष्कळ सेवा समर्थ सक्षमपणे पार पडो.

## सरकारने घातलेल्या अन्याय्य अपमानकारक नि अनैर्बंधिक बंदीचे पकरण

ज्यावेळी मदुरेच्या हिंदुमहासभा अधिवेशनात पुढील अ. भा. अधिवेशन बिहार प्रांतात घ्यावे असे ठरले; नि स्वागत समितीने निरनिराळ्या ठिकाणांची पाहणी करून अधिवेशनासाठी भागलपूर निश्चित केले. त्यावेळी भागलपूर येथे वसती करून राहिलेल्या मूठभर मुसलमानांच्या बकरीद सणाचे वेळी तेथील जमातीमधील शांततेला बाध आणावा हा हेतू हिंदुमहासभेचे मनात येणेही असंभाव्य होते हे सरकारलाही मान्य करावे लागेल. सर्व हिंदुस्थानभर मुसलमान लोक बकरीद पाळतात; मग हिंदुस्थानातील इतर सर्व ठिकाणे सोडून भागलपूरच्यासारख्या यत्किंश्चित् गावात राहात असलेल्या मूठभर मुसलमानांविरुद्ध विशेष कटाक्षाने वागण्याचे काहीच कारण नव्हते. काही सरळ स्वाभाविक गोष्टी आणि भागलपूरमधील काही सोयी नि इतर काही गोष्टी यांचा साकल्याने विचार करून जेव्हा ते ठिकाण निश्चित केले. तेव्हा मात्र बिहार सरकार खाडकन् जागे झाले, आणि ह्या अधिवेशनावर बंदी घालणारा, आणि १ डिसेंबर १९४१ पासून १० जानेवारी १९४२ पर्यंत हे अधिवेशन बिहार प्रांतातील काही जिल्ह्यांत आणि भागलपूर नगरात भरविले जाऊ नये असा त्याने फतवा काढला.

बिहार सरकारने असे तर्कट लढविले की बकरीद नि अधिवेशन एकाच वेळी आल्यामुळे जर जातीय दंगे उफाळले तर पुराख्या (पोलिस) च्या पुरेशा संख्येचे अभावी शांतता नि सुव्यवस्था राखणे कठीण होईल.

दोन्हीही एकाच वेळी येताहेत ही जी भीती होती त्याविषयीच सांगावयाचे तर मुसलमानांतील आक्रमक गटाला देखील एखादे खरेपणाचा आभास निर्माण करणारे कारण सापडू नये म्हणून अ.भा. हिंदू महासभेच्या कार्यकारिणीने अत्यंत समजूतदारपणे, आपले अधिवेशन भागलपूर येथे बकरीद सर्वसाधारणपणी पाळली जात असे, त्यावेळी न भरविण्याचे ठरविले नि असा निर्णय घेतला की, हिंदुमहा-सभेच्या वहिवाटीप्रमाणे हे अधिवेशन नाताळचे सुटीत दि. २४ ते २७ डिसेंबरपर्यंत भरवावे. ह्या व्यवस्थेमुळे हिंदुमहासभेचे अधिवेशन बकरीदच्या आरंभाच्या आधी दोन दिवस संपणारे असल्यामुळे मुसलमानांना आपला उत्सव मन मानेल तसा साजरा करणे शक्य हते. परंतु एकत्र येणारे दिवस वगळून आधीच अधिवेशन भरविले तरीसुद्धा जातीय तेढ वाढण्याचा नि भावनांचा उद्रेक होण्याचा संभव आहे आणि बकरीदचा उत्सव शांतपणे पार पाडण्यात अडथळे निर्माण होतील, हे कारण सरकारने पुढे करून पूर्वी घातलेली बंदी उठविण्याचे नाकारले. अधिवेशनापूर्वी बकरीद होऊ दिली असता जातीय भावना अधिक चेतविल्या जातील की, जातीय दंगे आरंभ होण्याची शक्यता अधिकच आहे; आणि त्यामुळे हे अधिवेशन बकरीद नंतर लगोलग भरवू देण्यातच अधिक धोका आहे; ही गोष्ट सरकारच्या ध्यानातच आली नाही, नव्हे तिकडे त्यांनी जाणून बुजून कानाडोळा करण्याचे ठरविले. वस्तुतः जातीय खळबळ

माजविण्यासाठी नि मुसलमानांच्या धर्मांध फाजील उत्साहामुळे येणाऱ्या दंग्यांसाठी तर बकरीद ही अखिल हिंदुस्थानाभर कुप्रसिद्ध आहे. हे सत्य नाकारता येणारच नाही. उलटपक्षी हेही तितकेच प्रसिद्ध आहे की, हिंदुमहासभेची अधिवेशने शांततापूर्ण नि सुनियोजित व्यवस्थितपणेच संपन्न होतात.बिहार सरकारने अगदी अलीकडे एक अधिकृत पत्रक काढून त्यात दिनांक १० जानेवारी १९४२ चे ठायी दिनांक ३ जानेवारी १९४२ नंतर अधिवेशन भरवावे असा बंदी आज्ञेत फेरफार केला आहे. परंतु या पत्रकातसुद्धा असे निःसंदिग्धपणे प्रसिद्धिले नाही की, बकरीदचे वेळी केवळ हिंदुसभेच्या आगामी अधिवेशनांच्या मार्गात अडथळे निर्माण करण्यासाठीच जर जातीय खळबळ माजविली गेली; तरीही आपण पूर्ववत बंदी आज्ञा पुन्हा काढणार नाही. अर्थात अधिवेशन बकरीदचे आधी भरविले काय; किंवा नंतर भरविले काय; डेमॉक्लिसच्या तरवारीप्रमाणे हिंदुसभेच्या डोक्यावर लटकत ठेवलेल्या ह्या बंदी आज्ञेला तोंड देणे हे अपरिहार्यच आहे.

## पुरेसे पोलिसदल नसल्याचा सरकारचा असमर्थनीय कांगावा

आपल्या वागणुकीचे समर्थन करणारे बिहार सरकार, जवळ पुराख्या (पोलिस) च्या पुरेशा संख्येचा अभाव हे जे निमित्त दाखविते त्याविषयी एकच गोष्ट सांगितली की पुरेशी होईल. सरकारने अनेकवेळा असे ठासून सांगितले आहे की, बंदी हुकूम मोडून अधिवेशन भरविण्याचा प्रयत्न केला तर आपल्या हाताशी असलेल्या सर्व साधनांचा नि शक्तींचा उपयोग करून सरकार असा प्रयत्न निश्चित हाणून पाडील. आता सरकारने स्वतःच मान्यता दिल्याप्रमाणे ज्या अ. भा. हिंदुमहासभेच्या अधिवेशनास हिंदुस्थानच्या सर्व भागातील दशसहस्राहून अधिक हिंदू नि अत्यंत नामांकित प्रमुख पुढारी उपस्थित राहणार ते अधिवेशन दडपून टाकण्याचे सामर्थ्य जर एकट्या बिहार सरकारजवळ आहे; नि इतके सामर्थ्य त्यांचेजवळ आहे. ह्यात आम्हाला तरी शंकाच नाही; तर हिंदुमहासभेला आपले वार्षिक अधिवेशन भगलपूर येथे भरवून आपापसात मोकळेपणाने विचार विनिमय करण्याचा नैर्बंधिक नि न्याय्य अधिकार उपभोगण्यास संमती दिली असता आक्रमक मुसलमानांचे तसे कुणी असल्यास-पित्त भडकते इतकेच नव्हे; तर जे जातीय दंगे करण्याअतपत धमकीही देऊ शकतात; त्या भागलपूरच्या मूठभर माथेफिरू मुसलमानांना ताळ्यावर ठेवण्यासाटी त्यांच्याविरुद्ध हे सर्व सामर्थ्य उपयोजिले असता, अपुरे पडेल; हे मानणे, कधीतरी शक्य आहे काय? ह्याच वर्षी मद्रास येथे अ. भ. मुस्लिम लीगचे अधिवेशन भरले असता त्यात भडक आणि हिंदुविरोधी भाषणे नि ठराव करून संमतिले गेले तथापि हे लीगचे अधिवेशन शांतपणे पार पाडावे म्हणून हिंदूंनी सभा भरविण्यास प्राणघातक शस्त्रे बाळगण्यास किंवा पाचांपेक्षा अधिक संख्येने एकत्र हिंडण्यास १४४ व्या नियमान्वये तिकडे मद्रासला हिंदूंना मनाई केली. अन् इकडे? हिंदुमहासभेचे अखिल भारतीय वार्षिक अधिवेशन भगलपूर येथे असता,

सरकारने भागलपूरच्या मूठभर मुसलमानांनी शांतता नि शिस्त राखून नैर्बंधिक मर्यादेत वागावे; असे न सांगता हिंदुमहासभेच्या अधिवेशनावरच बंदी घातली आणि पर्यायाने असेच सिद्ध केले की, हिंदूनी आपल्या नागरिकत्वाच्या मूलभूत अधिकारांचा उपयोग करणे, हासुद्धा अपराध होय!
संबंध भारतवर्षात असलेच भेदनीतिदर्शक पक्षपाती नि हिंदुविरोधी धोरण सरकारने आजपर्यंत अवलंबिले आहे. आणि आक्रमक मुसलमान गटांच्या अतिरेकी धर्मांध गुंडगिरीला वाव मिळू नये, म्हणून हिंदूंच्या मिरवणुका मूर्तिविसर्जन नि परिषदा ह्यांच्याविरुद्ध बंदी आज्ञा काढण्यात येत आहेत. आणि ह्या हिंदुविरोधी धोरणासाठी एकच एक सर्वसाधारण कारण पुढे केले जाते. ते म्हणजे शांतता नि सुव्यवस्था राखण्याचे जे सरकारचे कर्तव्य आहे ते निर्बंधानुसार वागणाऱ्या जनतेला आपल्या सर्व न्याय्य अधिकारांचा उपयोग करता येईल अशाच पद्धतीने पार पडले पाहिजे. उलट पक्षी आक्रमक नि गुन्हेगार लोकांना संतोषविण्यासाठी निर्बंधाच्या मर्यादेत वागणाऱ्या जनतेसच आपले सर्व मूलभूत अधिकारही सोडायला लावून निर्माण केलेली शांतता नि सुव्यवस्था म्हणजेच खरी अशांतता नि अव्यवस्था होय.

हे असले पक्षपाती धोरण सरकार सर्व हिंदुस्थानभर स्वीकारते त्याच्या बुडाशी एकच कारण आहे; ते हे की, हेकेखोर अतिरेकी मुसलमानांपेक्षा हिंदू लोक हे सरसकट शांत नि निर्बंधशील लोक असल्यामुळे त्यांचेवर असल्या अपमानास्पद नि अन्याय्य अटी लादून त्यांचे पालन निमूटपणे करविणे हे अधिक सोपे आहे.

हिंदू, ख्रिस्ती नि पारशी लोकांचे सामाजिक नि धार्मिक उत्सव इतक्या शांतपणे पार पडतात की हिंदुस्थानातील सर्व जमातीच्या लोकांना आनंद वाटण्यासारखे नि उपभोगण्यासारखे कित्येक प्रसंग त्यात असतात. परंतु तेच बकरीद किंवा मोहरमसारखे मुसलमानांचे कुठलेही धार्मिक वा सामाजिक सण असोत त्यात हिंदूंचा रक्तपात आणि हिंदुविरोधी बंडाचा कळस असावयाचाच! केवळ हिंदूच नव्हेत तर मुसलमानेतर सर्व जमातीना मुसलमानांचे हे उत्सव म्हणजे, वित्त नि जीवित ह्यांचेवर आलेले एक अरिष्ट असेच सातत्याने वाटते. याचे दायित्व केवळ दंगेखोर मुसलमान गुंडावरच पडते, असे नाही; तर त्याला सरकारची मूर्खपणाची नि हिंदुविरोधी पक्षपाताची वागणूकसुद्धा उत्तरदायी आहे; कारण अशा प्रसंगी मुसलमानांच्या दंगेखोर प्रवृत्तींना शासन करून आळा घालण्याचे सोडून, हिंदूंनाच आपले नागरिकत्वाचे मूलभूत अधिकार सोडण्याची आज्ञा काढून पर्यायाने ह्या गुंडगिरीला एक प्रकारचे प्रशस्तीपत्र देण्याचे धोरणच सरकार स्वीकारीत असते!

हिदुमहासभेच्या भागलपूर येथील अधिवेशनाच्या बंदीचे समर्थन करताना सरकारने आणखी एक निर्लज्ज स्पष्टीकरण दिले आहे की, ही बंदी आज्ञा केवळ एकाकी अशा भागलपूर नगरांतील मूठभर मुसलमानांचा बकरीद सण शांतपणे पार पडावा ह्यांपरतें दुसरे तातडीचे किंवा न्याय्य कारणच नाही. अ. भा. हिंदुमहासभेचे अधिवेशन बकरीदचे पूर्वी भरू दिले असते आणि हिंदूंना हा न्याय्य अधिकार उपभोगू दिला असता मुसलमानांच्या जातीय भावना भडकतील अशी

शंका जर सरकारला होती तर इतर जमातीनी आपापले न्याय्य अधिकार उपभोगले असता ज्यांचे पित्त भडकते त्या आक्रमक नि असहिष्णु अशा गुंडांना शिक्षा करून गुंडगिरीचे दमन करणे हे सरकारचे कर्तव्य होय. याच दिवसांत ख्रिस्त्यांचे पित्त भडकल्याचे कुठे ऐकिवात नाही. इतकेच नव्हे; तर हिंदूंच्या सणावाराच्या सुट्यांप्रमाणे या ख्रिस्त्यांच्या सुटीमुळे अशा अखिल भारतीय परिषदा भरविण्यास विशेष सवलत मिळते. सरकारच्या या मुसलमान गुंडगिरीला हाताशी धरण्याच्या मूर्ख धोरणामुळेच मुसलमान लोक इतके असहिष्णु नि धर्मवेडे झाले आहेत. उदाहरणार्थ नेलोर येथील सरकारी न्यायालयानीच असे पकटपणे मान्य केले आहे; की, हिंदूंचे न्याय्य अधिकारांचे पकरणी नैर्बंधिक आज्ञांचेसुद्धा मुसलमानांकडून अनुपालन करविण्यास अधिकारी वर्ग असमर्थ ठरतो.

ज्या सरकारचे अधिकारी न्यायालयाने मुसलमानांच्या आगळिकीविरुद्ध दिलेले निर्णय प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याचे नाकारतात; आणि मुसलमानांच्या आक्रमणांना हाणून पाडून न्यायालयसंमत, अशा हिंदूंच्या नागरिक अधिकारांना संरक्षण देण्याचे नाकारतात; आणि असे न केले तर दंगे भडकतील असे आपल्या विचित्र वागणुकीचे लंगडे समर्थन करतात. अशा सरकारचा राज्य करण्याचा नैतिक अधिकार तरी पूर्णपणे संपला असे म्हणावे लागते.

या बंदीचे स्वरूप अन्याय्य तर आहेच; पण त्यातही तिची वैधता ही गंभीरपणेच संशयास्पद आहे.भारत संरक्षण निर्बंधान्वये प्रांतिक सरकारांनी जनतेत शांतता नि सुव्यवस्था राखण्यासाठी जे अधिकार वापरावयाचे असतात ते ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली असलेल्या हिंदुस्थानच्या संरक्षणाची निश्चिती करण्यासाठी आणि 'युद्ध प्रगतीसाठी' तसे करण्याची आवश्यकता भासल्यास वापरावयाचे असतात. कल्पना शक्तीला कितीही ताण देऊन विचार केला; तरी, सरकारला असे मुळीच म्हणता यावयाचे नाही; की, युद्धप्रगती नि ब्रिटिश हिंदुस्थानचे संरक्षण यांचे आड येईल; असे काही तरी हिंदुमहासभेच्या अधिवेशनामुळे होणारे होते! इतकेच काय, अखिल भारतीय अशा प्रमुख संस्थांपैकी केवळ एका हिंदुमहासभेनेच हिंदुस्थानच्या संरक्षणापुरते सरकारशी प्रतिसहकाराच्या धोरणाचा प्रचंड पुरस्कार केला आहे; हेही जमेस धरावे लागेल. हिंदुमहासभेचे जवळ जवळ सर्व प्रथम श्रेणीचे पुढारी सर्व देशभर दौरे काढून केवळ सद्यःपरिस्थितीत हिंदु-हितसंरक्षणासाठी हे सहकार्य आवश्यक आहे. याच कल्पनेने नव्हे; तर प्रतियोगी सहकारितेच्या खऱ्याखुऱ्या अच्छेमुळे सर्व हिंदूंना सैन्याच्या सर्व विभागात शिरण्याचा आदेश देत आहेत; नि सहस्रावधी सभासदांनी भूदल, नौदल नि वायुदल यामध्ये प्रवेश मिळविला आहे. म्हणून 'हिदुस्थानचे संरक्षण' किंवा 'युद्धप्रगती' ह्यांचे मार्गांत खीळ घालण्याचा किंवा याला विरोधण्याचा हिंदुमहासभेचा मानस असेल. असे मानण्याला तिळमात्र जागा नाही. सरकारनेही आपल्या बंदीआज्ञेमध्ये असल्या कारणांचा नामनिर्देशही केलेला नाही. यावरून ही बंदी भारतसंरक्षण निर्बंधाच्या कक्षेत येऊ शकत नाही.  आणि म्हणूनच या अधिवेशनावरील ही बंदी मूलतःच अनैर्बंधिक आहे. असा नैर्बंधिक दृष्टिकोन हिंदुस्थानातील मोठमोठ्या निर्बंध पंडितांचा

असून त्यावरून हेच सिद्ध होते की, बिहार सरकारने केवळ राजकीय नव्हे, तर नैर्बंधिक घोडचूक केली आहे.

यास्तव सर्वसाधारणपणे जनतेचे नि विशेषतः हिंदूंचे नागरिकत्वाचे मूलभूत अधिकारांविषयीचे ठाम मत प्रतिपादन करून ते प्रत्यक्षात आणण्यासाठी ही अन्याय्य अपमानास्पद नि अनैर्बंधिक बंदी-आज्ञा झुगारून आपले अधिवेशन भागलपूर येथेच तेही ठरलेल्या दिनांकालाच भरवायचे असा महासभेने निश्चय केला आहे. आम्ही भागपूरला जे जात आहोत; ते सरकारला नुसतेच आव्हान देण्यासाठी नसून; आमचे नैर्बंधिक अधिकारांचे ठाम प्रतिपादन करून ते प्रत्यक्ष बाणविण्यासाठीच होय.

हिंदूंच्या नागरिक नि धार्मिक अधिकारातील कसलेही आक्रमण निमूटपणे मानण्यास भाग पाडणे; त्याचप्रमाणे धर्मवेड्या मुसलमानांपेक्षा हिंदूंवर कसलाही अन्याय करणे हे अधिक सोपे आणि म्हणून तथाकथित शांतता नि सुव्यवस्था राखण्याचा हा एक सुकर मार्ग होय; अशी जी सरकारची भ्रामक समजूत आहे; तिला सुधारण्याची वेळ आता आली आहे. नागरिकत्वाचे मूलभूत नि नैर्बंधिक अधिकार उपभोगण्याच्या प्रयत्नांमध्ये जरी एखादे वेळी सरकार अत्यंत अन्यायाने नि अनैर्बंधिकपणे पुराख्या (पोलिस) ना हिंदूंचे अंगावर घालून भिवविते तरी आणि असल्या प्रकारच्या हिंदूंच्या स्वाभिमानावर आघात करणाऱ्या ज्या ज्या म्हणून घटना जेथे जेथे नि जेव्हा जेव्हा घडतील त्या त्या घटनांचा तेथे तेथे नि तेव्हा तेव्हा आपल्याला शक्य असलेल्या सर्व नैर्बंधिक मार्गांनी सरकारच्या किंवा इतर कुणाच्याही हिंदुविरोधी धोरणाविरुद्ध आता प्रतिकाराचे प्रात्यक्षिक हिंदूंनी दाखविलेच पाहिजे.

तरीसुद्धा मला एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली पाहिजे, ती ही की, हिंदुमहासभावादी लोक, सरकारने वेळेचे आत बंदी उठविली नाही तरी भागलपूर येथे हे अधिवेशन भरविण्यासाठी जे जात आहेत; ते काही सरकारला आव्हान देणे किंवा कुठल्याही अतिरेकी पद्धतीने न्याय्य अधिकाऱ्यांची कुचेष्टा करण्यासाठी नव्हे, तर सभासंहतीचा जो न्याय्य अधिकार The Right of Association तो प्रस्थापित करण्यासाठीच; आम्ही भागलपूर येथे उभारल्या जाणाऱ्या ह्या अखिल हिंदू ध्वजाखाली एकत्रित येऊ. जातीय भावना चेतविल्या जातील अशी कुठलीही आगळीक घडविण्याचा आमचा मानस नाही; किंवा नागरिक म्हणून आम्हाला असलेले अधिकार प्रस्थापिण्यापलीकडे आमचा हेतू नाही. इतकेच काय, पण शांतता नि सुव्यवस्था ह्यांचा निःपक्षपणे नि घटनात्मक दृष्ट्या अर्थ लावला तर ती राखण्यास सरकार इतकेच हिंदुमहासभावादीही उत्सुक असल्यामुळे इतर जमातीच्या न्याय्य अधिकारांवर आम्ही आक्रमण होऊ देणार नाही. अधिवेशनातील कामकाज चालविण्याचा जो नैर्बंधिक अधिकार तो प्रस्थापिण्यासाठी निःशस्त्र प्रतिकाराचे जे शस्त्र उपसले आहे; त्यापलीकडे आम्ही कुठल्याही शारीरिक विरोधांचे प्रदर्शन किंवा त्यांचा प्रत्यक्ष अवलंब न करता सरकारने जरी आमच्यावर बंदी घालून, आमच्याविरुद्ध पाशवी शक्तीचा उपयोग केला; तरी

तशा धरपकडीत नेले जाण्याचा किंवा त्यापलीकडे जे काही वाईट घडेल त्याला तोंड देण्याचा निश्चय केला आहे.

धर्मवेड्या गुंडांना हाताशी धरून केवळ हिंदूंतीलच नव्हे; तर ख्रिस्ती पारशी नि ज्यू देशबंधूंतीलही सत्यप्रिय नि निर्बंधशील नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली करण्याचे सरकारचे धोरण सर्व नागरिकांना सारखेच घातुक आहे, असे ज्यांना ज्यांना वाटते, ते ते सर्व हिंदवासीय आपली सहानुभूती नि सहकार्य देऊन ह्या चाललेल्या संघर्षात हिंदुसभानिष्ठांचे हात बळकट करतील अशी मी आशा करतो.

जर हिंदुस्थानच्या सर्व विभागातून हिंदुसंघटनवादी प्रचंडतम संख्येने भागलपूर येथे एकत्र येतील आणि हा सामाइक विरोधाचा लढा आधी म्हटल्याप्रमाणे नैर्बंधिक कक्षेत शूरत्वाच्या दृढनिश्चयाने आणि कारावास नि लाठी हल्ले यांची क्षिती न बाळगता आणि अखिल हिंदुध्वजाच्या मानरक्षणासाठी कुठलाही त्याग अधिक न मानता-निष्ठेने लढवतील आणि खरीखुरी शिस्त नि सन्माननीय शांतता यांचेवर आक्रमण घडेल; अशी कुठलीही अनैर्बंधिक आगळीक आपल्याकडून घडू न देतील तर, तर हिंदुमहासभेचे हे २३ वे अधिवेशन आजपर्यंत झालेल्या सर्व अधिवेशनांपेक्षा अधिक सरसतेने यशस्वी होईल यात मला तर मुळीच संदेह वाटत नाही.

हे भाषण भागलपूर येथील अधिकृत अधिवेशनात, अधिकृतरीत्या वाचले जाण्याचा संभव बव्हंशी कमी असल्याने-किंबहुना जवळ जवळ नसल्याने आणि आता ते विस्तृत लिहिण्यास अवधीही अपुरा असल्यामुळे निरनिराळ्या दिशांकडे जाणाऱ्या मार्गात मध्यभागी जसे मार्गदर्शक फलक असतात; तसे उद्याच्या भविष्यकाळात हिंदू चळवळीला मार्गदर्शक होतील; अशा अतिशय महत्वाच्या काही मोजक्या विधेयांचेच काय ते विवेचन मी आता येथे करणार आहे.

## नेपाळचे सम्राट अधिपतींना राजनिष्ठेचा प्रणाम

हिंदूंच्या वैभवशाली गतेतिहासाचे प्रतीक नि उद्याच्या अधिकतर वैभवाचे आशास्थान अशा हिंदूंच्या एकमेव स्वतंत्र हिंदुराज्याचे अधिपती नि हिंदुधर्म रक्षक; जे नेपाळचे महाराजाधिराज त्यांना मी अखिल हिदुमात्रांचेवतीने राजनिष्ठेचा प्रणाम करितो. ज्यांच्या कणखर हातात हिंदुहित रक्षण निश्चितपणे सुरक्षित राहील असे मार्गदर्शक हिंदूंच्या सुदैवाने आज नेपाळ सरकारचे अधिपती आहेत. महाराजा युद्ध समशेर जंगबहादुर आजचे नेपाळ सरकारचे मुख्य प्रधान हे इतर कुणाहीपेक्षा अधिक चांगल्या रीतीने जाणतात की, नेपाळच्या हिंदुराज्याचे उद्याचे भवितव्य हे हिंदुत्वाच्या भवितव्याशी एकजीवपणे निगडित झालेले आहे. वस्तुतः हिंदू हे ह्या देशाचे राष्ट्रीय घटक होत; नि त्यांचे भवितव्याला आज कोणतेही स्वरूप देणे हे आज नेपाळ सरकारचे हातात आहे. जरी हे युद्ध आपल्याभोवती सर्व बाजूंनी धोक्याचे ‘कडे‘ निर्माण करीत आहे; तरी त्याच युद्धाने पुष्कळ संधी निर्माण करून ठेविली आहे. हिंदूंचे पुनश्च संपूर्ण एकत्रीकरण हे

अंतिम उद्दिष्ट दृष्टिसमोर ठेवून नेपाळच्या हिंदुराज्याने चालू युद्धात ब्रिटिश सरकारशी स्नेह जोडण्याचे ठरविले आणि आपले शूर गुरखा सैन्य हिंदुस्थानच्या सरहद्दीचे संरक्षण नि इतर समरक्षेत्रात परकीय शत्रूंच्या चढाईचे निवारण करण्यासाठी पाठविले; ही गोष्ट राजनीतीला धरूनच आहे. कारण ते अंतिमतः हिंदू हितसंवर्धकच ठरेल. राजाधिराज नेपाळच्या सम्राटानी हे जे परिणामकारी सहाय्य केले त्यांचे पारितोषिक म्हणून नेपाळच्याच अधिराज्यात केवळ शंभर वर्षांपूर्वी असलेले नि कालांतराने ब्रिटिशांनी आपल्या राजवटीस जोडलेले पंजाब नि बंगाल प्रांतातील जिल्हे परत देऊन उपकाराची फेड करावी.

हेही उत्साहजनक आहे की, नेपाळचे भू-सैनिक युद्धोपयोगी गुणांमध्ये नि आत्यंतिक प्रतिकारक्षमतेमध्ये जगातील कुठल्याही राष्ट्रांशी बरोबरी करण्याअतपत सिद्ध नि अद्यावत आहेत. परंतु नेपाळचे वायु सैनिकसुद्धा केवळ स्वतःचेच नव्हे तर समस्त हिंदुराष्ट्राचे संरक्षण करण्याइतके सिद्ध अद्यावत नि बलशाली होण्याच्या दिवसाची आम्ही वाट पाहात आहो! हिंदुस्थानच्या पूर्व सीमेवरील कुठल्याही प्रांताइतकीच नेपाळला वायुमार्गे होणाऱ्या हल्ल्यापासून भीती आहे. हिंदुस्थानच्या अगदी किनाऱ्यालगत आधीच युद्ध येऊन ठेपल्याने एकदम एक भय नि संधी निर्माण झाली आहे आणि मला असा दृढ विश्वास आहे की, नेपाळचे सुज्ञ नि दूरदृष्टी मुख्य प्रधान ह्या चालून आलेल्या संधीचा सदुपयोग करून घेतील नि अगदी उद्याच्या भविष्यकाळात नेपाळमध्ये एक प्रबळ वायुदल सिद्ध करतील.

ज्या दुसऱ्या विधेयकाकडे मी नेपाळ सरकारचे लक्ष वेधू इच्छितो, ते विधेय तुलनात्मक दृष्ट्या कदाचित अगदी त्वर्य नसले, तरीसुद्धा दुर्लक्षणीय मात्र नाहीच नाही. काही साधारण विश्वसनीय गोटातून असे कळते की, मुसलमान लोक आपल्या नेहमीच्या चोरट्या नि घातुक मार्गाचा अवलंब करून नेपाळमध्ये आपले संख्याबळ वाढविण्याचा नि आपले अस्तित्व प्रबळपणे भासविण्याचा प्रयत्न करीत आहेत. नेपाळमध्ये मशिदींची संख्या द्रुतगतीने वाढत आहे आणि असावध किंवा अनाथ हिंदू मुली नि अर्भके फूस लावून आसपासच्या टोळ्या असलेल्या जिल्ह्यामध्ये पळविली जातात; नि शेवटी मुसलमान धर्मात बाटविली जातात. मुसलमानांचे संख्याबळ या हिंदुराज्यात नि त्यांचे अवती-भोवती वाढविण्याच्या अनेकविध नि पद्धतशीर योजना बऱ्याच कालावधीपासून चालू आहेत. मी नेपाळ शासनाला अशी विनंती करतो की, हिंदूंच्या स्थैर्याला नि संख्याबळाला असलेला हा धोका कमी लेखू नये; आणि या विषयांत सदैव सावधानता आणि दक्षता घ्यावी. मशिदी प्रथम प्रार्थनास्थळे म्हणून बांधल्या जातात. परंतु हिंदुस्थानात अन्यत्र कित्येक आलेल्या अनुभवांप्रमाणे त्यांचे रूपांतर हिंदुविरोधी धर्मांधता, धर्मवेड निर्माण करण्याच्या भट्ट्यात अनेक भागात अगदी त्वर्य होते. मुलांना पळवून नेणे नि स्त्रियांचे अपहरण करणे हा कार्यक्रम वरपांगी पाहू जाता वैयक्तिक गुन्ह्यांमध्ये मोडला जाईल. परंतु, आम्हा हिंदूंना इतिहासापासून जर काही बोध घ्यावयाचा असेल; तर इतिहास आम्हाला हेच शिकवितो; की उपरिनिर्दीष्ट मार्ग, प्रत्येकी वैयक्तिक किंवा दुर्लक्षणीय भासले; तरी याच मार्गाचा सांघिक अवलंब

मुसलमानांनी आपली संख्या वाढविण्यासाठी नि आपले वर्चस्व हिंदुस्थानात प्रस्थापित करण्यासाठी परिणामकारकपणे आजपर्यंत केला; नि आजही करीत आहेत. एखाद्या हिंदुराजाने मशीद बांधण्यास संमती दिली; की, 'सर्व धर्म निर्विशेष' म्हणून अमाप स्तुति केली जाई; परंतु, आता असले उदात्त प्रेम म्हणजे आत्मघातकी मूर्खपणा होय; हे ओळखून हिंदूंनी अशा वृत्तीचा द्वेष करायला शिकले पाहिजे; अशी वेळ आता येऊन ठेपली आहे. या उदात्ततेच्या रोगाने पछाडल्यामुळेच आपल्या पूर्वीच्या हिंदूराजांनी जगातल्या निरनिराळ्या विभागातील परकीयांना हिंदुस्थानात येऊ दिले, स्वतःच्या भाउबंदांप्रमाणे वागणूक दिली. आणि त्यांना संरक्षण देऊन आपल्या हिंदुबांधवांच्या बरोबरीची श्रेष्ठता दिली आणि आता त्याचे भयानक परिणाम आपणास भेडसावीत आहेत. तात्पुरते म्हणून आलेले पाहुणे आता घरधन्यालाच बाहेर हुसकण्याची तंबी देत आहेत; म्हणून नेपाळ सरकारने अशा सर्व लोकांना निःसंदिग्धपणे सांगावे की कुठलेही हिंदुविरोधी कृत्य वा चळवळ ह्यांची गय नेपाळमध्ये केली जाणार नाही; आणि अप्रतिमपणे डोळ्यात तेल घालून पहारा ठेवला पाहिजे की, नेपाळातील कुठलीही अहिंदु जमात नि त्यातही विशेषतः मुसलमान जमात लोकसंख्येमध्ये शंभर वर्षांपूर्वी जी नोंदली गेली; त्यापेक्षा अधिक वाढत नाही. वेगळ्या शब्दात ती जितकी उणावेल तितके चांगले!

## हिंदुमहासभेच्या उदंड चळवळीची सुसाट वेगाने प्रचंड प्रगती

गतवर्षातील घटनांचा आढावा घेता निर्विवादपणे, ठामपणे नि ठासून असे सांगता येऊ शकते की, महासभेच्या नेतृत्वाखाली चाललेली हिंदुत्वाची चळवळ ही वेगाने, सर्व हिंदुस्थानभर पसरत चालली आहे. शुद्धीचे कार्य; अस्पृश्यता निवारण्यासाठी केलेले परिणामकारक नि यशस्वी भगीरथ प्रयत्न अखिल हिंदुस्थानात सर्वदूरसर्वत्र नेटाने, तडीस नेलेला, जनगणनेचा कार्यक्रम, हिंदूंच्या नागरी नि धार्मिक अधिकारांचे शेकडो वस्त्यांमध्ये जाऊन केलेले संरक्षण, हिंदुस्थानातील प्रांतोप्रांती विस्तृत प्रदेशांत तथाकथित पाकिस्तानी दंग्यांचा भाग म्हणून मुस्लिमांच्या सशस्त्र आक्रमक मोहिमांना तोंड देऊन त्या आक्रमणांच्या लाटा उसळण्याआधीच फोडून काढून आणि दारूच्या धुंदीत अतिशय क्रूरपणे घातलेले गोंधळ आपले आपल्यालाच महाग पडले; आणि हिंदूंच्या चळवळीकडे वाकड्या दृष्टीने पाहण्यात यश येणे शक्य नसल्याची त्या हिंदुविरोधी पाशवी शक्तींना आणून दिलेली प्रचीती, नगरपालिका नि मंडळे यांच्या निवडणुकीत महाराष्ट्र, बंगाल, आसाम नि हिंदुस्थानातील इतर विभागात महासभानिष्ठांनी निवडणुकांत वीस वीस जागांवर मिळविलेले विजय, इतकेच काय, परंतु वऱ्हाडसारख्या ठिकाणी मिळाल्याप्रमाणे निवडणुकीतील एकदोन ठिकाणचे अपयशसुद्धा! ह्या सर्व घटनांचा साकल्याने विचार केला असता; असे निर्विवादपणे म्हणता येते की, आता हिंदुमहासभा ही ज्याच्याकडे विपक्षास गर्वाने फुगून जाऊन

www.savarkarsmarak.com

दुर्लक्षिता येणार नाही असे एक प्रचंड शक्तिकेंद्र, अत्यंत द्रुतगतीने होत आहे; आणि गेली पन्नास एक वर्षे तरी दंग्याचा धुमाकूळ घालीत हिंदुस्थानभर वाढत चाललेली अहिंदु पाशवी शक्तींना प्रतिकारण्याअतपत बलशाली आधीच झालेली आहे.

परंतु महासभेच्या यशोमंदिराचा कळस या प्रत्यक्ष दिसणाऱ्या नि स्फुटशः दिलेल्या घटनांत नसून तिचे विशुद्ध तत्वज्ञान नि प्रचारद्वारा, ज्याला 'मानसिक क्रांती' हेच नाव योग्य दिसेल; अतका आश्चर्यकारक  परिणाम हिंदूंचे मनावर अप्रत्यक्षपणे घडवून आणला; त्यांत आहे. हिंदुमहासभाध्यक्षांचे नि देशातील सर्व विभागांतून आलेल्या प्रथम श्रेणीच्या हिंदू पुढाऱ्यांचे स्वागत करताना आहेरे नि नाहीरे या उभय वर्गांतील अशा कोट्यवधी हिंदुजनतेने दाखविलेली अतुलनीय उत्सुकता, जी उत्सकता अत्यंत उत्कंठतेने लक्षावधी मुखांतून निघालेल्या ''हिंदु धर्म की जय'' ''हिंदुस्थान हिंदुओंका!!'' ह्या वातावरण भेदून टाकणाऱ्या अहोरात्र निंनादत राहणाऱ्या अतिशय योग्य अशा घोषणात दिसून आली; त्या उत्सुकतेने असे प्रत्यक्ष दाखविले की, हिंदूंनी आपणच आपल्या पायावर पाडून घेतलेल्या न्यूनगंडाचा धोंडा ढकलून दिला आहे आणि एक राष्ट्र या नात्याने नि हिंदू म्हणून आपल्या राष्ट्रीय जागृतीची जाणीव त्यांना पुन्हा झाली नाही. ह्या मानसिक संक्रांतीचे वैशिष्ट्यपूर्ण पकटीकरण 'हिंदुस्थान हिदुओंका' या घोषणेव्यतिरिक्त इतर कोणत्याही शब्दांनी करता आले नसते.

महासभेच्या चळवळीमुळे निर्माण झालेल्या या हिंदुत्वाच्या भावनेने काँग्रेसच्या तटबंदीत आतल्या बाजूने भगदाड पडत आहे. गांधीप्रणीत भ्रांत राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या अफीमबाज गुंगीत आपण हिंदू आहोत, ही गोष्टही जे संपूर्णपणे विसरून गेले हते, अशा सहस्रावधी काँग्रेसी हिंदूंनी आपल्या हृदयाची छाननी करण्यास आरंभ केला आहे. नि हिंदुत्वासाठी यशस्वी चळवळ केल्याविषयी ते अंतःकरणाच्या अगदी आतल्या गाभ्यात का होईना पण हिंदुमहासभेला धन्यवादच देत आहेत. इतकेच नव्हे तर, थोड्या फार दिवसांच्या आत स्वेच्छेने ते आमचे शिबिरात येऊन मिसळतील असे निश्चयाने म्हणता येते. हिंदुसभेच्या ह्या प्रचाराचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे जे काँग्रेसवाले हिंदुमहासभानिष्ठांना ''आपली मते हिंदुहितरक्षणाचे अभिवचन देणारांनाच द्या'', असे हिंदू मतदारांना सांगून निवडणुकांना जातीयतेचा वास लावल्याविषयी दोष देत त्यांचेवर हिंदू मतदारांना असे सांगण्याचा प्रसंग आला आहे, की ''जरी आम्ही काँग्रेसचे अनुज्ञापत्रकानुसार तिकिटावर निवडणुकीसाठी सर्व साधारण म्हणून उभे असलो तरी आम्ही हिंदूतील हिंदूच आहोत आणि हिंदुत्वनिष्ठेतही यत्किंचित्ही कमी नसून हिंदुहित रक्षणात आम्ही हिंदुमहासभेच्या अच्छुकालाही हार जाणार नाही!!'' जरी ही कळकळीची आर्जवे तात्पुरती नि हिंदूंची केवळ मते उपटण्यासाठीच केलेली असली; तरी काँग्रेसच्या अच्छुकांना अशी विनंती हिंदू मतदारांना करावी लागली; ह्यापरतें हिंदू चळवळीच्या सामर्थ्यांचे अधिक चांगले गमक दुसरे कोणते असू शकणार?

काँग्रेसला हिंदुमहासभेचे एक उपांग म्हणून आपले अस्तित्व ठेवावे लागले. किंवा हिंदूंच्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष प्रतिनिधित्वाच्या अधिकारावर पाणी सोडून सामुदायिक प्रतिनिधित्वाचा दावा सांगणारे आपले दुकान नित्याचे बंद करावे लागले!

''मुसलमानांनी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसारच मिळणाऱ्या प्रतिनिधित्वावर संतुष्ट राहिलंच पाहिजे''

हिंदुसभेने मिळविलेला तिसरा अतिशय महत्वाचा विजय म्हणजे हा की, सर्वसाधारणपणे मुसलमान नि विशेषत्वाने मुस्लिम लीग यांच्या अतिरेकी महत्वाकांक्षांना प्रतिस्पर्धी विरोधक म्हणून हिंदुसभेचे स्थान आज सर्वतोमुखी गाजत आहे!

कार्यकारी मंडळा Executive Council च्या विस्तृतीकरणाचा प्रश्न असो वा राष्ट्रीय संरक्षण मंडळ National Defence Council किंवा संरक्षण सल्लागार समिती Defence Advising Committee बनविण्याचा प्रश्न असो; मुस्लिम लीगवाल्यांनीच हे मान्य केले आहे; की, त्यांच्या अवास्तव मागण्या दुर्लक्षिल्या गेल्या, नि त्यांचे बेत हाणून पाडून त्यांची फसगत केली आहे. मि. ॲमेरी यांनी 'स्वायत्त पाकिस्तान योजना' डावलून न टाकण्याचे, सरकारी 'अभिवचन' मोडून आणि इतकेच नव्हे तर, 'प्रथम हिंदुस्थान'वर काही प्रवचने झोडून आपला विश्वासघात केला ह्याविषयी मि. जिना रागावताहेत. इकडे बंगालमध्ये हिंदूंना 'सतायेंगे'च्या वाघासारख्या डरकाळ्या गतवर्षी फोडणारा फझलुल हक्क आता मात्र अगदी मऊ होऊन नि शुद्धीवर येऊन मुस्लिम लीगकडून घटस्फोट मिळण्याची भीती असतानाही, ''हिंदुमहा-सभेशी सहकार्य करणे अधिक चांगले'' अशी भाषा बोलू लागला आहे. आसाममध्ये तर, सर सादुल्लाखानाची काहीच डाळ न शिजल्यामुळे त्याला रातोरात मुख्य प्रधानकीचे त्यागपत्र देऊन काळे करावे लागले. या प्रांतातील ही तथाकथित लीग मंत्रीमंडळे एखाद्या पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे निमिषार्धात कोसळून भुईसपाट झाल्याने मुस्लिम लीगला आपण आता अगदी अगतिक परिस्थितीत सापडलो आहोत; नि आपल्या साऱ्या भंगड महत्वाकांक्षा धुळीस मिळतात की काय असे वाटणे अगदी साहजीकच होय.

लीगची आज सर्व बाजूंनी निराश नि अगतिक परिस्थिती झाली; याला हिंदुमहासभानिष्ठांनी केलेला विरोध हे एक अतिप्रमुख कारण आहे; हे सत्य नाकारून चालणार नाही. सर्व हिंदू लोक दिवसानुदिवस हिंदू महासभेच्या तत्वप्रणालीकडे झुकू लागले आहेत. नि अर्थातच सर्व हिंदू विरोधी आक्रमणांना तोंड देण्यासाठी अधिक संघटित नि बलशाली होत आहेत. याचा विचार केला असता उद्याच्या भविष्यकालातील लीगसमोर आशादायी वातावरण मुळीच नाही.

हिंदुस्थानच्या इस्लामीकरणाच्या आशासुद्धा या युद्धाने निष्फळ ठरविल्या आहेत. नुकतेच गेल्या एप्रिलमध्ये मुस्लिम लीगचे अधिवेशन मद्रास येथे भरले असता मि. जिना यांनी सरकार नि हिंदू ह्यांना अशी गंभीर सूचना दिली की, जर मला जे पाहिजे आहे ते तुम्ही न कराल तर इतर लोक येऊन ते करतील नि हिंदुस्थानचे तुकडे तुकडे करून ढिगांनी पाकिस्ताने निर्माण करतील! या

धमकीचे पुष्ट्यर्थ इतर प्रमुख मुसलमान पुढाऱ्यांनीही हेच सांगितले की, ''हिंदुस्थानच्या सीमेपलीकडे' बलाढ्य मुसलमान राष्ट्रे आज अस्तित्वात आहेत आणि हिंदुस्थानातील हिंदूंच्या गांजणुकींतून आमची मुक्तता करणारे ते विधिनियत स्वातंत्र्यदाते होत; अशा दृष्टीकोनातून हिंदुस्थानातील मुसलमान त्यांचेकडे पहात असल्यामुळे त्यांच्याशी संधी करण्यास आम्ही मुळीच मागे पुढे पाहणार नाही.'' परंतु दुर्दैवाने हे 'इतर' किंवा 'हिंदुस्थानाच्या सीमेपलीकडील आमची बलाढ्य मुसलमान राष्ट्रे' यापैकी एकहीजण आपल्या ठिकाणी स्थिर असे उभे नाही. गेल्या महायुद्धात त्यावेळचा अमीर अमानुल्ला, हा हिंदुस्थाना-तील मुसलमानांचा स्वातंत्र्यदाता होऊ घातला होता; आणि गांधीजींच्या आत्मघातकी पाताळयंत्री आणि हिंदुद्वेषी खुळामुळे ह्या दोन 'राष्ट्रीय' नेत्यांनी- अलीबंधूंनी- त्याला दिल्लीला हिंदुस्थानचा भावी अनभिषिक्त सम्राट म्हणून आणण्याचा कट केला. परंतु बच्चाईसक्कूने एका पाणक्याच्या पोऱ्यानेच हिंदुस्थानचा सम्राट होऊ घातलेल्या, त्या वेळच्या अमीराला नाहीसे केले. त्यावेळी ज्याने नाझींशी सूत जमवले होते, तो अराणचा रेझा शहा, आता त्या 'अतरां'मध्ये जमा होत असेल आणि बहुसंख्य हिंदूंच्या जाचातून हिंदुस्थानातील मुसलमानांना मुक्त करण्यासाठी त्याच्याकडे हे 'दुसऱ्या क्रमांकाचा मुक्तिदाता' म्हणून डोळे लावून बसले असल्यास त्याचाही ठावठिकाणा आज कुणाला माहीत नाही आणि हिंदुस्थानकडे येण्याऐवजी त्याने मॉरिशसकडे जाणारी गाडी पकडली असावी, असे वाटते. हिंदुस्थानातील मुक्तिदाता होण्याचे ठायी, बापडा बिचारा रेझाशहा, आपल्याच मुक्ततेसाठी अगतिक होत्साता दुसऱ्याकडे डोळे लावून बसला आहे. तुर्की लोक बिचारे एकीकडे जर्मन तर दुसरीकडे ब्रिटिश सैन्याच्या कातरीत सापडले आहेत. त्यांना आपले उद्याचे भवितव्य काय ह्याचीसुद्धा कल्पना येऊ शकत नाही. आणि त्यांचे समोर 'हॉबसन चॉअस' प्रमाणे एकच मार्ग आहे; नि तो म्हणजे पुढे सरकत असलेल्या वरील दोन युरोपियन सैन्यापैकी एकाला शरण जाणे हा होय. हिंदूंनी जे नाकारले ते घडवून आणून हिंदुस्थानचे पाकिस्तान पद्धतीवर तुकडे करण्यास बाहेरून येण्याची कोणाही मुसलमानी राष्ट्रास अजूनही इच्छा नि धमक असेल तर त्याचे सांप्रतचे नांवगांव नि ठावठिकाणा लीगने सांगितल्यास आम्हास फार आनंद वाटेल! का, हिंदुस्थानच्या सिंहासनावर चढण्यासाठी अच्छुक म्हणून आमचे घरगुती हिज अक्झॉल्टेड हायनेस निजाम हेच उभे राहू म्हणताहेत? तसे असल्यास If these be thy Gods Oh Israel ! वा; अस्त्रायला हेच तुझे त्राते विधाते ठरतील! हेच काय ते आम्ही म्हणू शकतो.

सर्वसाधारणपणे असे म्हणावयास प्रत्यवाय नाही की, आमच्या मुसलमान देशबांधवानी असे हवेत पोकळ मनोरे बांधून स्वतःचे बालिश मनोरंजन करण्याचे सोडून स्वतःच्याच हितासाठी जे अपरिहार्य त्यास मान तुकविली पाहिजे. ही वस्तुस्थिती अढळ आणि अटळ आहे; की मुसलमान अल्पसंख्य आहेत नि असलेली हिंदूंची प्रचंड बहुसंख्या ह्या उपरही विशेषत्वाने कमी करण्याचा यत्किंचितही संभव आता तरी उरला नाही. शुद्धीची चळवळ नि हिंदूमध्ये झालेली प्रचंड जागृति ह्या दोन शक्तींनी बळाने वा धाकदपटशाने चाललेल्या इस्लामीकरणास नित्याचा पायबंद घातला

आहे. एखादा औरंगजेब किंवा अल्लाउद्दीन जरी वरून आज उतरून आला तरी त्याला आता बळाने किंवा धोक्याने मूठभर हिंदुसुद्धा नित्याचे नि वंशपरंपरा बाटगे ठेवता यावयाचे नाहीत. ढाक्का येथे ह्याच वर्षी झालेल्या दंग्यात बंगालमध्ये बळाने बाटविलेल्यांचेच उदाहरण घ्या. पुष्कळ खेड्यांमध्ये शेकडो हिंदू कुटुंबांचे बळाने इस्लामीकरण करण्यात आले; आणि त्या मुसलमान दंगेखोरांना असे वाटले- कारण केवळ, दोनशे वर्षापूर्वी तशी वस्तुस्थिती होती- की ती खेडी पाकिस्तानमध्ये नित्याची आली परंतु दंगे दडपले जाऊन सर्वत्र शांत होते न होते तोच त्या मुसलमान लोकांना निराश करणारे असे दृश्य 'त्याची देही त्याची डोळा' पहावे लागले; की ह्या सर्व बाटविलेल्यांची शुद्धी निमिषार्धात झाली आणि हे सर्व बाटगे, अधिक प्रखर हिंदुत्वनिष्ठ होऊन नि इस्लामी धर्मवेडाचे अधिक कडवे शत्रु होऊन आपल्या पवित्र हिंदुधर्मात पुन्हा गेले ही गोष्ट एकदा स्पष्टपणे नि निश्चितपणे समजल्यानंतर हे ओघानेच येते; की, हिंदुस्थानातील मुसलमान हे केव्हांही अल्पसंख्यच राहणार आणि म्हणून त्यानुसार आपले राजकीय कार्यक्रम त्यांनी आखले पाहिजेत. विधिमंडळात किंवा सहकारी समित्यांत त्यांनी आज अस्तित्वांत असलेल्या त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर एकही अधिक जागा मिळविण्याची अपेक्षाच धरू नये; आणि पंजाब नि इतर काही प्रांत हिंदुस्थानातून तोडून पाकिस्तानात घुसडण्याचा जो डाव आहे; त्या संबंधात तर इतकेच म्हटले असता पुरे की, हिंदूंनी अफगाणिस्थान गंधारदेश, परत हिंदुस्थानला जोडण्याचा; नि हिंदुराज्याची सीमा पार हिंदुकूशच्या पलीकडे नेण्याचा विचार जितका सूज्ञ किंवा असूज्ञ तितकाच हाही होय.

**आपला तात्कालिक कार्यक्रम**

अहिंदूंचे हिंदूकरण म्हणजे शुद्धी अस्पृश्यता निवारण, नगरानगरांतील नि ग्रामाग्रामांतील खेडो-पाड्यांतील स्थानिक निकडी, तक्रारी गाऱ्हाणी, धाकदपटशा, दाबादाबी, दडपशाही ह्यासारखी पकरणे, ह्यांचे निवारण कार्य, प्रचाराचे नित्यकार्य, सभा, दौरे, परिषदा आणि संघटनात्मक रचनात्मक व्यवस्थापन ह्या आणि अशा शंभर एक प्रकारच्या परिपाठातल्या कार्यांकडे न वळता, मला ह्या ठिकाणी केवळ दोनच, विशेष प्रमुख नि निकडीच्या विषयांवरच भर देऊन स्पष्टपणे नि निक्षून सांगावयाचे आहे; की पुढील काही वर्षांत ह्या विषयांवरच हिंदु संघटनवाद्यांनी आपले लक्ष नि शक्ती सर्व काही पराकाष्ठेने ह्या कार्यात एकाग्रतेने लावलीच पाहिजेत. अशा विषयांपैकी पहिला, हिंदुमहासभेच्या विचार व्यासपीठाची पहिली फळी-म्हणजे निवडणुकीसंबंधीचे कार्य आणि त्याच व्यासपीठाची दुसरी फळी म्हणजे एक सैनिकीकरणाचे कार्य; हा दुसरा महत्वाचा विषय.

जे हिंदू अच्छुक उघड उघड, हिंदूविजय-ध्वजाखाली हिंदुमहासभेच्या दर्शिकेवरच (खूण-तिकिट) उभे राहतील, हिंदू हितसंरक्षणाची प्रतिज्ञा करतील, अशाच अच्छुकांना मात्र, हिंदु मतदारांनी (मतदारसंघाने) आपली मते दिली पाहिजेत; तेणेकरून हिंदूंची इंग्रगण्य नि प्रथम

प्रातिनिधिक संस्था म्हणून, हिंदुमहासभेला निस्संशय नाकारता येणारच नाही असा दर्जा, अशी पत ते प्राप्त करून देतील, आणि त्यामुळे विधानमंडळात जे काही सत्ताधिकार आज उपलब्ध आहेत ते आणि भविष्यात जे आणखी मिळवावयाचे आहेत तेही हिंदूंना हिंदूंच्या संख्येला हस्तगत करता येतील. जसे नि जोपर्यंत विधानमंडळात प्रतिनिधित्व करण्याचा काँग्रेसचा अधिकार हिरावून घेतला जात नाही; तोपर्यंत हिंदूंचे विशिष्ट हितसंबंध भिंतीत चिणले जातील, दीर्घकालांतराने नि हिंदूही! ही काळ्या दगडावरची रेघ, हे पूर्णपणे निश्चित आहे!

**निवडणुकीच्या प्रत्येक चढाओढीत अखिल हिंदूंच्या हितसंबंधांचा प्रश्न गुंतलेला असतोच असतो !**

जोपर्यंत निवडणुकी जातीय पद्धतीवर घेतल्या जात आहेत; तोपर्यंत जे हिंदुत्वनिष्ठतेच्या प्रतिज्ञा-पत्रकावर स्वाक्षरी करून उभे राहिले आहेत आणि जे अखिल हिंदुत्वाच्या अधिकारांचे संरक्षण नि संवर्धन करण्याची शपथ न घेतलेल्या दुसऱ्या कुठल्याही संस्थेचे बंधन मानीत नाहीत; अशा हिंदु महासभेच्या अच्छुकांना निवडून दिले नाही; तर हिंदूंना आपले विशिष्ट अधिकार नि इच्छा विधिमंडळात पकटविताच येणार नाहीत. हिदुस्थानातील समस्त हिंदूंना तथाकथित राष्ट्रीय अधिकार नि हिंदूचे अधिकार ह्यात भेद करता येणार नाही. कारण हिंदुमहासभा जिचे प्रतिनिधित्व करते ती विचार प्रणाली तरी नेमकी काय नि कशी आहे?

हिंदुस्थानचे स्वातंत्र्य, हिंदुस्थानचे अखंडत्व, लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, सर्व नागरिकांच्या  पूजास्वातंत्र्य भाषास्वातंत्र्य, लिपीस्वातंत्र्य आदि मूलभूत अधिकारांची अभेद निश्चिती या सर्व गोष्टी हिंदू महासभा ज्या तत्वांवर अधिष्ठित झाली आहे त्यापैकी काही होत. ती हे जाणते की, हिंदूंच्या विशेषाधिकारांचे संरक्षणासाठीही या परिस्थितीत हिंदुस्थान राष्ट्राची नि हिंदुस्थानच्या राज्यशासनसंस्थेची उभारणी ह्या उपरिनिर्दिष्ट मूलभूत नि प्राथमिक पायावरच करणे आवश्यक आहे.

जे जातीय किंवा धार्मिक कल्पनांना अवास्तव महत्व देत नाहीत तशा कुठल्याही लोकांची राष्ट्रवादाची संकल्पना ह्यापलीकडे जाऊच शकत नाही आणि 'हिंदूंचे विशेषाधिकार नि हिंदुस्थान राष्ट्राचे विशेषाधिकार' यांत भेद असून शकत नाही असा हिदुमहासभेचा सिद्धांत आहे.
हिंदुस्थानातील अहिंदु अल्पसंख्य जमातीना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जे काही हिंदुमहासभा देऊ करते; त्यापेक्षा तसूभरही अधिक स्वतःसाठीच मागत नाही.

परंतु त्याचबरोबर खऱ्याखुऱ्या राष्ट्रीयत्वाच्या न्याय्य नि काटेकोर वैध संकल्पनांना हेही धरून नि अनुसरून होईल की, हिंदू महासभेने राष्ट्रीय ऐक्याचे नाममात्र निमित्त पुढे करून मुसलमान किंवा इतर कुणालाही केवळ ते हिंदू नाहीत यासाठी हिंदूंच्या न्याय्य अधिकारांना लुबाडून त्यातील एक तसूभरही अधिकार अर्पण करू नयेत. परंतु काँग्रेस फॉरवर्ड ब्लॉक नि अशाच अन्य संस्था या सर्वांनी भौगोलिक भोंगळ नि भ्रामक समजुतीमुळे या खऱ्या नि विशुद्ध

राष्ट्रीयत्वाचा त्याग करण्याचे पातक केले आहे. देशभक्तीच्या खोट्या आवरणाखाली हिंदूंच्या न्याय्य अधिकारांची पायमल्ली करणारे असे त्यांचे एक ठरीव धोरण नि तत्वज्ञान आहे. आपण जातीय वादाच्या पातळीपलीकडे आहोत; हे सिद्ध करण्याचे भानगडीत या संस्थांचे हिंदू नेते नि अनुयायी आपण हिंदू मतदारांचे प्रतिनिधी आहोत; असे ठासून सांगण्यालासुद्धा कांकू करतात.

परंतु त्याच जातीय भूमिकेवरून चाललेल्या निवडणुकांत भाग घेण्यास मात्र कांकू करत नाहीत. हे खरोखर विचित्र आहे. यामुळे ते राष्ट्रवादाचा नि ज्या हिंदूंनी आपल्या अधिकारांचे संरक्षण नि प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांना निवडून दिले; त्या हिंदू मतदारांचाही घात करतात.

जर काँग्रेस अथवा फॉरवर्ड ब्लॉक यांना स्वतःला केवळ हिंदूंचे प्रतिनिधी म्हणवून घ्यायचे नसेल; आणि अखिल हिंदी राष्ट्राचे आपण प्रतिनिधित्व करतो असेच म्हणवून घ्यायचे असेल; तर तर्कशुद्ध शहाणपणाचा नि सत्याचा प्रामाणिक मार्ग म्हणजे हिंदू मतदारांच्या शक्तीवर- ते आज केवळ याच मतांवर निवडून येतात- निवडणुकीस उभे न राहणे हा होय. जोपर्यंत निवडणुका जातीय पद्धतीवर विभागल्या गेल्या आहेत; तोपर्यंत या राष्ट्रीय म्हणविणाऱ्या संस्थांचे कर्तव्य हेच की, आज अस्तित्वात असलेल्या कुठल्याही जातीय मतदार संघाचे वतीने निवडणुकीसाठी उभे राहण्यास नाकारणे! जोपर्यंत खऱ्या अर्थाने राष्ट्रीय मतदार संघ अस्तित्वात येत नाहीत; तोपर्यंत त्यांनी वाट पहावी. परंतु काँग्रेस फॉरवर्ड ब्लॉक किंवा असल्याच इतर तथाकथित राष्ट्रीय संस्थांच्या दुतोंडी वागणुकीमुळे, नि चुकीच्या धोरणामुळे केवळ हिंदूंच्याच नव्हे तर, राष्ट्रीय अधिकारांची सुद्धा, अपरिमित हानी झाली आहे. काँग्रेसी हिंदू तिचे सर्व अंतर्गत पक्ष नि त्यांचे नेते यांच्या ह्या भ्रांत राष्ट्रवादाच्या चुकीच्या कल्पनांचा एक परिणाम मात्र निश्चित झाला की, ह्या काँग्रेसी हिंदूंनी त्यांच्या गटांनी नि गटप्रमुखांनी हिंदूंना पूर्णपणे हिंदूंचे म्हणून जे प्रतिनिधित्व असावयाचे त्यापासून वंचित केले आहे.

यांच्या अगदी उलट विधिमंडळे, समित्या किंवा गोलमेज परिषदा यांमध्ये मुसलमान प्रतिनिधी मात्र लीगच्या वतीने उभे असलेले किंवा जे अच्छुक आत्यंतिक आक्रमणाच्या पराकोटीला जाऊन मुसलमान समाजाच्या हितसंबंधाचे संरक्षण नि संवर्धन आम्ही करू; असे उघडपणे नि अंतःकरणापासून सांगतात नि करतात तेच निवडून येतात.

इकडे काँग्रेस फॉरवर्ड ब्लॉक किंवा अन्य पक्षांचे मिथ्या राष्ट्रवादाच्या विचाराने भारले गेलेले हिंदूंचे प्रतिनिधी म्हणून, हिंदू मतदारांच्या मतांवर निवडून येतात आणि विधिमंडळे किंवा गोलमेज परिषदांमध्ये किंवा दैनंदिन राजकारणामध्येसुद्धा ज्यावेळी हिंदू हितसंरक्षणाचा प्रश्न उद्भवतो त्यावेळी हिदूंची बाजू मांडण्याचे हे स्वच्छ नाकारतात इतकेच नव्हे; पण सरकारने जर त्यांना हिंदूंचे प्रतिनिधी मानले तर त्यांचा तो अपमान होय; असे ते मानतात.

सिंध, मुंबई अलाख्यातून अलग करणे, जातीय मतदारसंघ अथपासून तर या वर्षीच्या शिरगणतीपर्यंत ज्यावेळी श्री. कृपलानींनी असे प्रकट सांगितले; की, शिरगणती हा जातीय प्रश्न असल्यामुळे काँग्रेसचा त्याच्याशी काही एक संबंध नाही. अशा शेकडो पकरणी स्वतः हिंदूंचे

मतांवर निवडून आले असताही ह्या मिथ्या राष्ट्रवादी संस्थांनी हिंदुहिताचा घात केला. मला हे व्यक्तिशः माहीत आहे की नुकतेच गेल्या वर्षी त्याच फॉरवर्ड ब्लॉकचे प्रथम श्रेणीचे काही पुढारी काँग्रेसच्या अधिकृत अधिकाऱ्यांच्याही पलीकडे एक पाऊल टाकून केवळ सरकारसमोर हिंदू-मुसलमान एकीचा देखावा करण्यासाठी हिंदुहिताचा अधिक होम करून लीगला काखोटीस मारण्याचा प्रयत्न करीत होते. ह्या मिथ्या राष्ट्रवादी संस्थांच्या नेत्यांचे हेतु वैयक्तिक हितसंबंधाचे मुळीच नव्हते इतकेच नव्हे; तर ते देशभक्तीपूर्णही होते; परंतु आत्मघातकी धोरणाने देशभक्तांना सुद्धा मूर्ख बनविले जाते; किंवा त्यांचा विश्वासघात केला जाऊ शकतो. त्याचे तत्वज्ञान म्हणा धोरण म्हणा किंवा काहीही कारण असो; पण परिणाम मात्र हिंदूंच्या आधीच झालेल्या हानीत भर टाकण्याकडे होतो आणि तोपर्यंत अशा मिथ्या राष्ट्रवादी संस्थांची शिस्त नि तत्वप्रणाली यांच्याशीच प्रतिज्ञेने बांधलेल्या अच्छुकांना निवडून देण्याचा आत्मघातकी मूर्खपणा हिंदू मतदार सोडीत नाहीत, तोपर्यंत हे असेच चालायचे.

हिंदूंनी आपणास निवडून दिले असता आपण त्यांच्या हितसंबंधाचे संरक्षण करू असे अभिवचन एखाद्या काँग्रेस फॉरवर्ड ब्लॉकच्या वतीने उभा राहिलेल्या अच्छुकांने दिले तरी ते तोकडेच होय. कारण तो या संस्थांचे भ्रांत तत्वज्ञान शिस्त नि धोरण यांना जोपर्यंत बांधलेला तोपर्यंत त्याला स्वतःची इच्छा असली तरी आपले वचन पुरे करता यावयाचे नाही.

मी हे आश्वासनपूर्वक सांगतो की ज्या लोकांना आपल्याच पितृभू पुण्यभूमध्ये हिंदूंना स्वतंत्र, उन्नत नि बलशाली होण्याचा अधिकार आहे असे वाटते; त्या लोकांसाठी सद्यःस्थितीत सर्वांत सोपा उपाय म्हणजे हिंदुमहासभेच्या नेतृत्वाखाली हिंदू हितरक्षण नि संवर्धनास प्रतिज्ञेने बांधले गेले आहेत अशाच प्रतिनिधींना त्यांनी निवडून देणे हा होय.

वर दर्शविल्याप्रमाणे हिंदुमहासभेची तत्वप्रणाली नि धोरण यथातथ्य राष्ट्रीय आहेत. ह्यास्तव हिंदुमहासभेच्या दर्शिकेवर (तिकिटावर) उभ्या असलेल्या अच्छुकाला निवडून देण्याने, हिंदू मतदारसंघ राष्ट्रीय हितसंबंधांच्या सर्वसाधारणपणे आणि विशिष्ट हिंदुहितसंबंधीच्या विशेषेंकरून उपयोगी पडू शकेल आणि त्यांची जपणूक जोपासना करू शकेल. खरे तर, हिंदुमहासभेची तत्वप्रणाली अंगीकारलेल्या हिंदूसाठी विशिष्ट हिंदुहितसंबंध नि राष्ट्रीय हितसंबंध ह्यात कसल्याच पकारे भेद किंवा अंतर असूच शकत नाही.

पण काँग्रेस किंवा पुरोगामी गट (Forward Bloek) ह्यांसारख्या भ्रांत (मिथ्या) राष्ट्रवादी पक्षांच्या दर्शिकेची बांधिलकी स्वीकारणाऱ्या अच्छुकाला निवडून देण्याचे कळत नकळत हिंदुमतदारसंघ, निश्चितपणे हिंदूंच्या विशिष्ट हितसंबंधांचा ते शत्रूंच्या स्वाधीन करून विश्वासघात करण्याचा आणि यथोचित राष्ट्रीय हितसंबंधांनासुद्धा हानि पोचविण्याचा धोका मात्र पत्करतात; ओढवून घेतात.

म्हणून, मी हिंदुमतदारांना असा आदेश देतो; की, आपल्या हितसंबंधांचे संरक्षण परिणामकारकरीत्या करू शकतील असे म्हणजे हिदुमहासभेच्या अधिकृत किंवा तिने

पुरस्कारिलेल्या अच्छुकांना आपले प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याचे धोरण स्वीकारावे. कारण असे करण्यानेच सरकारला महासभा ही समस्त हिंदू लोकांची एकमेव प्रातिनिधिक संस्था मानणे भाग पडेल; नि काँग्रेसचा हिंदूंचे वतीने बोलण्याचा नैतिक वा नैर्बंधिक अधिकारच हिरावून घेतला जाईल.

मुसलमान मतदारसंघ काँग्रेसच्या अच्छुकाला कधीही मते न देता जो अच्छुक ह्या कोणत्याही मिथ्या राष्ट्रवादी संस्थांच्या कुठल्याही बंधनात सापडलेला नाही आणि जो मुसलमान हितसंरक्षणाचे वचन पकटपणे देतो त्यासच आपली मते न चुकता देतात. या एकाच निर्विवाद सत्यामुळेच सरकार आग्रहपूर्वक म्हणते की, काँग्रेस मुसलमानांचे प्रतिनिधित्व करूच शकत नाही. ह्यास्तव काँग्रेसच्या दर्शिकेवर किंवा पुरोगामी गटाच्या (तिकिटावर) दर्शिकेवर किंवा कोणत्याही मिथ्या राष्ट्रवादी (भ्रांत) संस्थेच्या दर्शिकेवर, निवडणुकीस उभ्या असलेल्या कोणाही अच्छुकाला मत म्हणून केव्हाही द्यावयाचे नाही. एवढी एक महत्वाची गोष्ट नेमकी नेमाने जर हिंदुमतदारसंघ निश्चितपणे करील; तर हिंदुहितसंबंधांचे योग्य, प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार जो हिंदुमहासभा सांगते; तो तिचा अधिकार विधितः नि न्यायतः प्रस्थापित होईल. ह्या निवडणुका म्हणजे सरकारने हिंदु मतदारसंघाला दिलेले आव्हान होय, त्यांनी हिंदुमहासभा हीच आपली प्रतिनिधी आहे. तेव्हा जातवार निवाडे, येऊ घातलेले भेडसावणारे पाकिस्तान ह्यांसारख्या हिंदूंना अपायकारक (हानिकारक) अशा प्रकारच्या कोणत्याही विषयात होणारी बोलणी, ठराव, संकेत किंवा करार ह्यांपैकी कशावरही काँग्रेस इतःपर स्वाक्षरी करू शकत नाही; हे सिद्ध करावे. हिंदुस्थानची भावी घटना बनविण्यासाठी लवकरच परिषदा बोलाविल्या जातील. अखिल हिंदुस्थानात मतदानाच्या वेळी हिंदूंनी हिंदुमहासभेच्या अच्छुकांना त्यांचे अधिकृत पसंतीचे प्रतिनिधी म्हणून निवडून देऊन, मतदानाच्या निर्णायक कसोटीवर हिंदुमहासभेला तरून नेल्यास ह्या परिषदांतून मुस्लिम लीगच्या तोडीस तोड, हिंदुमहासभेला मान्यता देऊन महत्वपूर्ण स्थान देणे सरकारला भागच पडेल. नि मग केवळ, काँग्रेसने स्वाक्षरी केला. एवढ्याच कारणासाठी म्हणून नसतील कोरे धनादेश! नसतील जातवार मतदारसंघ! नसेल ‘पाकिस्तान योजना, नसतील असल्या कसल्याच प्रकारची हिंदूंवर दडपणांची बंधने! (ह्यातले काहीही असणार नाही!) धार्मिक, राजकीय नि आर्थिक हितसंबंध संस्कृति, भाषा, लिपी, प्रतिष्ठा आणि हिंदू जातीचे आणि हिंदुराष्ट्राचे संपूर्ण भवितव्य हिंदुमहासभेच्या हाती पूर्ण सुरक्षित राहील; आणि कोणतीही घटना, विधिविधान किंवा समझोते ह्यांवर जोपर्यंत हिंदुमहासभा स्वाक्षरी करीत नाही तोपर्यंत हिंदूवर बंधनकारक होणार नाहीत.

पण जर हिंदुमतदारसंघ, हिंदुमहासभेच्याच प्रतिनिधींना मात्र, निवडून देईल नि विधानमंडळात पाठवील तर, उघड उघड हिंदुहितसंबंधांचे संरक्षण आणि वर्धन करण्यास प्रतिज्ञाबद्ध हिंदुसंघटनवाद्यांची मंत्रिमंडळे, बहुतेक हिंदुस्थानातल्या सर्व प्रांतातून बनतील, आणि अगदी हिंदु अल्पसंख्य असलेल्या प्रांतातील विधिमंडळातसुद्धा, केल्या जाणाऱ्या हिंदुविरोधी

आक्रमणांना परास्त करण्यासाठी नि मुस्लिम मंत्रिमंडळांना परिणामकारकपणे दाबात ठेवण्यासाठी प्रबल विरोधी पक्ष म्हणून हिंदुसंघटनवादी आपले स्थान राखतील. परिणामतः भावी काळातील निवडणूक प्रचार मोहिमांमधून ह्या निखिल हिंदुहित-संबंधांच्या दृष्टिकोनाचे अर्थपूर्ण महत्व हिंदूंनी स्पष्टपणे जाणून घ्यावे; ह्यासाठी मी अखिल हिंदुस्थानातील सर्व हिंदूंना आवाहन करीत आहे.

दुसरा अत्यंत महत्वाचा नि निकडीचा विषय म्हणजे 'हिंदूंचे' सैनिकीकरण. हिंदुस्थानातील सर्व हिंदुसंघटनवाद्यांनी आपल्या सर्व हालचाली नि शक्तिसर्वस्व ह्याच एका विषयावर वाकविले पाहिजे; पणास लावले पाहिजे. जवळ जवळ आपल्या सागरतीरांवर, आता येऊन ठेपलेले युद्ध हे एकाच वेळी एक संकट नि संधीही बनून आलेले आहे; आणि त्या दोन्हीनी जणू सैनिकीकरणाच्या चळवळीचे सामर्थ्य नि तीव्रता वाढविलीच पाहिजेत अशी निर्वाणीची हाक दिली आहे; आणि म्हणून नगरानगरातील नि ग्रामाग्रामातील हिंदु-महासभेच्या सर्व शाखोपाशाखांनी प्रत्येकी भूदल नौदल नि वायुदल ह्या तिन्ही सेनादलांमध्ये आणि विविध युद्धसामग्री साहित्याच्या शस्त्रास्त्रांच्या निर्मिती कार्यशाळांमध्ये भरती होण्यासाठी हिंदूंमध्ये जागृती घडवून आणण्याच्या कार्याला जुंपून घेतलेच पाहिजे.

ह्या निवडणुका म्हणजे सरकारने हिंदू मतदारसंघाला दिलेले आव्हान आहे की, त्यांनी हिंदू महासभा हीच आपली प्रतिनिधी आहे हे सिद्ध करावे.

ब्रिटन नि युनायटेड स्टेट्स यांचे विरुद्ध जपानने लढण्यास प्रारंभ केल्यामुळे हिंदुमहासभेने हिंदुस्थानच्या संरक्षण विषयक युद्धप्रयत्नांस सहाय्य देण्यासंबंधीच्या हिंदुमहासभेने घेतलेल्या भूमिकेत फेरफार करण्याचे काही एक कारण नाही. हिंदुमहा-सभेचा असा ठाम विश्वास आहे की, ज्याप्रमाणे ब्रिटन, जर्मनी, इटली, अमेरिका किंवा अगदी रशियासुद्धा निःस्वार्थ उद्दिष्टासाठी नव्हे; तर आपापल्या हितसंबंधांच्या अनुरोधाने युद्धावर गेले आहेत; नि त्याच हेतूंसाठी नि अनुरोधाने जपान युद्धात ढकलला गेला आहे, त्यामुळे तर तोही त्याला अपवाद नाही.

ज्यावेळी जगातील प्रत्येक राष्ट्र स्वहित संरक्षणाचे आणि संवर्धनशील आक्रमणाचे धोरण पुढे रेटीत आहे; अशा वेळी, हिंदुस्थानलासुद्धा आपल्या राष्ट्राच्या हितसंबंधाचे वर्तमान काळात आणि भविष्यकाळातही संरक्षण आणि संवर्धन करणाऱ्या धोरणांचाच स्वीकार करणे भागच आहे; त्या परिस्थितीत हिंदुस्थानच्या संरक्षणासाठी भू-नौ-वायुदलात, अधिकाधिक संख्येने शिरून नि युद्धसाहित्याच्या नि दारूगोळ्याच्या केंद्रात नि युद्धोपयोगी साहित्याच्या उद्योगालयात प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करून हिंदूंनी निशं:कपणे प्रतियोगी सहकारितेच्या धोरणानुसार हिंदुस्थान सरकारच्या युद्धप्रयत्नांत जोपर्यंत ते हिंदू हितरक्षणास सहाय्य होत आहेत तोपर्यंत सरकारास सहाय्य करण्यास कांकू करता कामा नये. मागे राहता कामा नये.

जर जागतिक परिस्थितीचा हिंदुहितरक्षणा-कडे शक्य तितक्या परिणामकारकपणे उपयोग करून घ्यावयाचा असेल तर आपल्या हिंदू राष्ट्राचे सैनिकीकरण नि औद्योगिकीरण

ह्याच दोन तात्कालिक निकडीच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करून, कमाल शक्तिसामर्थ्याच्या प्रभावाने ती पदरात पाडून घेतली पाहिजेत.

पुन्हा हे ध्यानात घेतले पाहिजे की, जपानच्या युद्धप्रवेशाने ब्रिटिशांचे शत्रूंकडून हिंदुस्थानवर स्वारी होण्याचे सरळ नि तात्काळ संकट आमच्यावर आणले आहे. आपल्याला आवडो किवा नावडो; ह्या युद्धामुळे, होणाऱ्या सर्वनाशातून आपली घरेदारे नि मातृभूमी ह्यांचे संरक्षण तर करायलाच हवे; आणि तसे ते केवळ, हिंदुस्थानच्या संरक्षणासंबंधी सरकारच्या युद्ध-प्रयत्नांची शक्ति नि तीव्रता वाढविण्यातच शक्य होणारे आहे. म्हणून हिंदुमहासभावाल्यांनी एक क्षणही वाया न घालवता हिंदूंनी सैन्यदलांत भरती व्हावे म्हणून, विशेषतः बंगाल नि आसाम प्रांतात शक्य तितक्या परिणामकारकपणे हिंदूंना जागृत करण्याचे काम केलेच पाहिजे.

हिंदूनो या सूचनांप्रमाणे वागू लागलात तर मी असे ठाम विश्वासाने सांगतो की, आपल्या ह्या हिंदु जातीचे धर्माचे नि राष्ट्राचे भवितव्य प्राचीन काळी होते त्यापेक्षा अधिक प्रभावशाली झाल्यावाचून राहणार नाही. मी आतापर्यंत भर दिलेल्या दोन पायऱ्या म्हणजे हिंदुत्वनिष्ठांनी आज राष्ट्रांत अस्तित्वात असलेली राजकीय सत्ता नि सरकारी राज्ययंत्र हस्तगत करणे; आणि ज्यांचे अंतःकरण मतदानाच्या वेळी, हिंदू दर्शिकेलाच मात्र मत देऊन काँग्रेसला एकही हिंदू मत न देता हिंदु संघटनवाद्यांशी तादात्म्य पावले आहे, असे लक्षावधी हिंदुयोद्धे भू-नौ-वायुदलांत भरती करणे; ह्या दोन पायऱ्या म्हणजे केवळ पहिल्याच दोन पायऱ्या होत. परंतु तरीही त्या लगेचच नि इतक्या उच्च स्थितीप्रत नेऊन पोहोचवतील; की पाचच वर्षांत संपूर्ण राजकीय वातावरण हिंदुत्वमय झालेले हिंदूच्या कणखर नेतृत्वाखाली चाललेले, नि कमी अधिक प्रमाणात हिंदूंच्या एकमेव अधिकाराखाली आलेले आढळून येईल.

या महायुद्धामुळे इतर सर्व प्रश्नांना गौण स्थान प्राप्त झालेले आहे नि ह्या जागतिक गोंधळातून कोण विजयी होईल हे निश्चितपणे कुणालाही सांगता येणार नाही. तरीसुद्धा बहुशः संभवनीय म्हणून एक गोष्ट सांगता येईल की, हिंदु जर ह्या युद्धपरिस्थितीचा पुरेपूर उपयोग करून घेतील नि हिंदु संघटनांचे ध्येय पूर्णतया दृष्टीसमोर ठेवून हिंदु जातीच्या सैनिकीकरणावर भर देतील नि ह्या उपनिर्दिष्ट कार्यक्रमाला चिकटून राहतील, तर हिंदुविरोधी अंतर्गत यादवी युद्ध किंवा घटनात्मक पेचप्रसंग किंवा सशस्त्र क्रांतीची उठावणी असो; यासारख्या कठीण समस्यांना तोंड देत आपले हिंदुराष्ट्र अपरिहार्यपणे अधिक शक्तिशाली, सुदृढ, अखंड, एकात्म झालेले आणि अतुलनीय लाभदायक परिस्थितीत असल्याचे आढळून येईल.

युद्धोत्तर काळात राष्ट्रांचे स्थान नि प्राक्तन काहीही कसेही असले, तरी आजच्या विद्यमान परिस्थितीत आज तरी एकंदरीने सर्व परिस्थितीचा साकल्याने सर्वांगीण विचार करता, हिंदुसंघटनवाद्यांना निःसंशय सहज करता येण्यासारखा नि उपकारक असा हाच काय तो दृष्टीकोन स्वीकारता येणे शक्य आहे की, हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या विषयापुरते परंतु,

हिंदुहितकारणाला घातक होणार नाही; अशा रीतीने जे काही नेहमी करता येणे शक्य आहे ते करून आपण ब्रिटिश शासनाशी क्रियाशील सख्यत्व जोडले पाहिजे.

सुसंघटित एकवटलेले कितीतरी अधिक शक्तीशाली नि अतुलनीय लाभदायक सुस्थित असे आपले हिंदुराष्ट्र उदयास आलेच पाहिजे.

जर, ''रात्रीच्या घनदाट अशा काळोख्या अंधःकारातून उषेची सोनेरी प्रभात जन्म घेते;'' हे म्हणणे सत्य असेल; तर तशी वेळ आज आलेली आहे. आपल्या राष्ट्राच्या पूर्व किनाऱ्यावर येऊन ठेपलेल्या नि कालांतराने पश्चिमेकडूनही येण्याची शक्यता असलेल्या या युद्धाने विस्तार, विध्वंस नि परिणाम यासंबंधांत अतुलनीय ठरणारा धोका निर्माण केला आहे. परंतु यातूनच या जगासाठी एक नवा दिवस उजाडणार आहे आणि केवळ नवतरच नव्हे, तर या जागतिक अनावस्थेतून एक अधिक चांगली सुव्यवस्था निर्माण होईल. ज्यांनी आपले सर्वस्व गमावले आहे त्यांना क्वचित पुष्कळसे चांगले मिळण्याचा संभव आहे. आपणसुद्धा आपल्या सुसंधीची वाट पाहू या; प्रार्थू या नि उत्तमोत्तम तेच व्हावे म्हणून कामाला लागू या !

------------------------------

# अखिल भारतीय हिंदुमहासभा
# २४ वे वार्षिक अधिवेशन - कानपूर
# अध्यक्षीय भाषण
# विक्रम संवत् १९९९ : सन १९४२

माननीय प्रतिनिधि आणि हिंदुमहासभेचे सभासद!

अखिल भारतीय हिंदू महासभेच्या अध्यक्षपदी पुनः सहाव्यांदा आपण माझी निवड केलीत; याविषयी मी आपला अतिशय आभारी आहे. माझी सेवा अत्यल्प असताही, आपणा हिंदूंच्याजवळ आजच्या क्षणी असणारा हा अत्युच्च मान, आपण मला दिलात नि माझ्या सेवेचा जो गौरव केलात; त्याविषयी मी कृतज्ञ आहे. आतापर्यंत मी अनेकदा माझ्या खालावणाऱ्या प्रकृतीच्या कारणास्तव जरी मला ह्या पदाच्या इतर दायित्वातून मुक्त करावे, यासाठी त्या पदाची अगदी स्वेच्छेन त्यागपत्रे दिली असताही आज मात्र माझे दायित्व न टाळता; मी या पदाचा स्वीकार करीत आहे; याला कारणेही तशीच आहेत. हिंदुमहासभेच्याबाहेर असणारी अनेक माणसे आज प्रथम हिंदुमहासभेला गोत्यात आणून नि चुकीच्या मार्गावर नेऊन नंतर आकस्मिकपणे निर्णायक ठोसा लगावून महासभा जिंकण्याची कारस्थाने रचीत आहेत. काहीजण धाक दाखवून तिला नमविण्याचा प्रयत्न करीत आहेत, तर काहीजण अधिक मायाळूपणे तिचा घात करण्याच्या विचारात आहेत; आज आपणा हिंदूंची पितृभू नि पुण्यभू जो हिंदुस्थान त्याचे स्वातंत्र्य आणि अखंडत्व, ह्या मूलभूत सिद्धांताचे हिंदू तत्वप्रणालीचे रक्षण करू पाहणारी हिंदुमहासभा हीच एकमेव संस्था आहे. काँग्रेसहून वेगळी नि हिंदूंची प्रतिनिधी असणारी निखिल हिंदु जगताची सनद हीच एकमेव स्वतंत्र संस्था आहे. त्या संस्थेचा आणि हिंदुत्वाच्या ध्येयवादाचा घात करण्यास मात्र, हे सर्व एकवटून पुढे आलेले आहेत. म्हणून, हिंदुजगताचे रक्षण करणारे हिंदुमहासभेचे हे जे पवित्र मंदिर आहे त्या मंदिराच्या प्रत्येक द्वारावर रक्षण करण्यासाठी प्रत्येक हिंदूने, नेमून दिलेल्या जागीच सदैव सिद्ध असले पाहिजे, अशी आजची परिस्थिती आहे. हिंदुत्वाचे रक्षण करण्याचे या पिढीतले दायित्व ज्यांच्या खांद्यावर आहे अशा आपणा सर्वांनी अचल, अविरत निष्ठेने आपापल्या जागी राहून हिंदुत्वाच्या या पवित्र मंदिराचे रक्षण केले पाहिजे. या संकटमय अनवस्थेच्या आव्हानामुळे आणि आपण केलेल्या आवाहनामुळे केवळ कर्तव्यबुद्धीने मी आज पुनः ही दायित्वाची जागा पत्करण्यास सिद्ध झालो आहे.

## भागलपूरचे असामान्य अधिवेशन

आजची आपली भूमिका काय आहे? आणि आगामी कालात आपला कार्यक्रम काय असावा? याची सम्यक कल्पना येण्यासाठी हिंदुमहासभेशी निगडित असणाऱ्या विविध घटनांचे, मी आरंभी थोडक्यात समीक्षण करणार आहे.

चालू वर्षाचा प्रारंभच भागलपूरच्या प्रतिकार मोहिमेने झाला. संघर्षाचा एक महत्वाचा घटक पैलू हाच की, अविरत शक्तिस्त्रोत नि आत्मविश्वास आपल्या लोकांच्या ठायी असणे आणि हीच वस्तुस्थिती आपण हिंदूंनी संयुक्त हिंदी आघाडी करून, 'क्षुल्लक दोष काढीत बसणे आणि विखारी टीका' यांवर, मात करून आणि निखिल हिंदुजगताच्या अजूनही संपादित होत असलेल्या सामाइक राष्ट्रजीवनाचे सम्यक दर्शन या मोहिमेने घडविले आहे. प्रसंग येताच हिंदुराष्ट्राच्या हितरक्षणार्थ जातगोत, पंथभेद वा उंचनीच असा कोणताही भेदभाव न बाळगता आपण आत्मविश्वासाने, निश्चयाने आणि एकजुटीने सिद्ध असतो. निखिल हिंदूंची चेतना, त्यांचा स्वाभिमान, त्यांची अस्मिता जागविण्यासाठी हिदुमहासभा आतापर्यंत सतत प्रयत्न करीत होती. ती जागृती आता आली असून; अहिंदूंना पूर्वी जो मनसोक्त धुमाकूळ घालता येत असे; ती परिस्थिती पालटलेली आहे. एवढेच नाही, तर अशा अहिंदु सामर्थ्यांना भेडसावण्याअतपत आपल्या संघटनेच्या बळावर नमविण्याचे सामर्थ्य हिंदूत आहे; याचीही प्रचीति आलेली आहे. भागलपूर येथे अखिल हिंदुध्वजाच्या मानरक्षणासाठी हिंदुस्थानच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांतून अनेक हिंदू पुढे सरसावले. या संग्रामात जसे आमचे माननीय पुढारी डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी हे सामील झाले; तद्वतच ज्यांची नावेही कोणास ठाऊक नाहीत अशा अप्रसिद्ध अज्ञात हिंदू वीरांनी, कीर्तीची अपेक्षा न बाळगता, आपले प्राण खर्ची घातले. रावापासून रंकापर्यंत धनिकांपासून श्रमिकांपर्यंत सर्व भूतपूर्वमंत्री नि विधानमंडळ सदस्य हिंदु, शीख, सनातनी, जैन, आर्य या संग्रामात समाविष्ट झाले होते. लढाही अंती केवळ भागलपूरपुरताच मर्यादित न राहता ज्या सहा जिल्ह्यांत निर्बंध होते; त्यातही झुंजला गेला. या संघर्षाचे पडसाद अखिल हिंदुस्थानभर उमटले. हिंदुत्वरक्षणाच्या जळजळीत प्रेमामुळे त्यांनी लाठीहल्ल्यांना तोंड दिले. तसेच सरकारी घोडेस्वारांच्या टापांनाही त्यांनी दाद दिली नाही. मिरवणुकीतील सहस्रावधि बायकामुलांवर निर्दयपणे घोडे घालण्यात आले. आणि नगरानगरांत गावगन्ना गोळीबार करण्यात आले; पण धैर्याने तोंड देत न हटता न डगमगता, निःशस्त्र हिंदु प्रतिकारकांनी ते सर्व काही सहन केले.
अभिनव हिंदुस्थानात काँग्रेससकट सर्व संघटनांची जी अधिवेशने आजपर्यंत झाली; त्या सर्वांत हिंदुमहासभेचे ते २३ वे अधिवेशन हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासात तरी, अपूर्व आणि अद्‌वितीय झाले; असे म्हणण्यात कोणतीच अतिशयोक्ती नाही.

या अपूर्व अधिवेशनात ज्या हिंदू वीरांनी प्राणार्पण केले किंवा ज्यांच्या अंगावर या धर्मयुद्धाचे व्रण अद्याप आहेत; त्यांच्याविषयी हिंदुमहासभेचा अध्यक्ष या नात्याने मी जर कृतज्ञता व्यक्त केली नाही; तर मी आपल्या कर्तव्याला चुकलो असे होईल.

या धर्मयुद्धात जे मृत झाले ते हुतात्मे झाले; आणि जे घायाळ झाले, त्यांचे घाव हीच त्यांची सन्मानपदके ठरली. महासभा आज यापेक्षा अधिक काही करून त्यांचा गौरव करण्यास समर्थ नाही; ही दुःखाची गोष्ट आहे; आणि म्हणूनच मी आपली मनःपूर्वक कृतज्ञता काय ती व्यक्त करीत आहे.

ह्या संग्रामाविषयी या ठिकाणी दुसरी एक गोष्ट ध्यानात ठेवावयास हवी; आणि ती ही की, तो संग्राम केवळ हिंदू अधिकार-रक्षणासाठी आणि हिंदूंच्या ध्वजाखालीच लढविला गेला. निजामीतील निःशस्त्र प्रतिकार आणि भागलपूरचा लढा ह्या संग्रामांत लक्षावधी हिंदू, हिंदूंच्या ध्वजाच्या मानखंडनेच्या निषेधार्थ उभे ठाकले आणि ह्या संग्रामांनी गेली ३ वर्षे हिंदूमनांवर अधिराज्य गाजविणाऱ्या मिथ्या राष्ट्रवादाचे मरण जवळ ओढवून आणले आहे. राष्ट्रवादाच्या ह्या भ्रांत कल्पनेने हिंदूंचे विशेष अधिकार उचलून धरणे हे राष्ट्रीय पातक ठरविले होते; नि हिंंदूंच्या गाऱ्हाण्यांची मुस्कटदाबी केली होती.तिने या देशातील हिंदूंवर पोरकी पोरे अशा स्वरूपाचे राजैनतिक जीवन कंठावयाला लावण्याचा प्रसंग आणला होता. आणि या भ्रांत राष्ट्रवादाचा मुखवटा या दोन संग्रामांनी फाडून टाकला आहे. निःशस्त्र प्रतिकाराच्या मोहिमा योग्य वेळी नि कशा पद्धतीने सुरू करावयाच्या आणि विजयप्राप्तीच्या दृष्टीने त्या कशा चालवायाच्या हे हिंदुसभा चांगले जाणते. याचाही प्रत्यय संबंधित लोकांना ह्या दोन संग्रामांनी आणून दिला आहे. हिंदूंच्या अधिकारांच्या रक्षणासाठी अखिल भारतीय स्वरूपाच्या सामुदायिक चळवळी महासभेलाही सुरू करता येतात. हेही त्या प्रसंगांनी चांगले सिद्ध झाले आहे.

भागलपूर अधिवेशनानंतर दोनच महिन्यांत लखनौ येथे तेथील मुसलमानांनी दंगल माजवून प्रतिकार केला असताही, हिंदु महासभेच्या अ. भा. समितीची बैठक शांतपणे पार पडली. ही गोष्ट गेल्या फेब्रुवारीत झाली.

मार्च अखेर क्रिप्स समिती येथे आली. आतापर्यंत अनेक वर्षे ''काँग्रेस ही हिंदूंची आणि लीग मुसलमानांची प्रतिनिधि'' असे ब्रिटिश सरकार म्हणत आले. या विचारसरणीच्या अनुषंगानेच हिंदुस्थानचे प्रतिनिधित्व म्हणजे काँग्रेस नि लीग असे संयुक्त स्वरूप हे समीकरण ठरले होते.

पण क्रिप्स समिताी येईपर्यंतच्या काळात हिंदु- महासभेने आपला प्रभाव पाडून महासभा ही या देशांतील तिसरा प्रबळ राजकीय पक्ष आहे; ही भूमिका ब्रिटिशांना मान्य करावयास लावली होती. प्रसंग पडला, तेव्हा हिंदू हितरक्षणासाठी काँग्रेसला किंवा लीगला आव्हान देऊन महासभेने हे स्थान निश्चित करून घेतले होते.

www.savarkarsmarak.com

हिंदुत्वाचे प्रतिनिधित्व हिंदुमहासभेकडेच आले आहे. काँग्रेससकट इतर अनेक पक्षांना क्रिप्स योजनेत विचारार्ह असे काही तरी सापडेल; या राजकीय सहारा वाळवंटात कोठे तरी ओलावा भेटेल; अशी आशा वाटत होती. पण क्रिप्समहाशय, हे अमेरिकन जनतेपुढे देखावा करण्यासाठीच हिंदी पुढाऱ्यांशी वाटाघाटी करून त्यांना आपणास हवे तसे नाचवू पहात आहेत; ही गोष्ट प्रथम दर्शनीच महासभेने ओळखली; आणि पकटपणे सांगितली. एवढेच नव्हे तर, वरून गोंडस दिसणाऱ्या त्या योजनेत कोणते कालकूट विष भरलेले आहे हे महासभेनेच प्रारंभी ओळखले.
'प्रांतांना, हिंदुस्थानांतून स्वतःच्या मता-धिक्याने फुटून निघण्याचा स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे; हे हिंदूंनी मान्य केले; तरच ब्रिटिश सरकार भारतीय स्वातंत्र्याची घोषणा करणार या छेदकांतच ते विष भरलेले होते.

हिंदुस्थान हे एक अखंड आणि अविभाज्य राष्ट्र आहे. ह्या मूळ कल्पनेच्या उरात खंजीर खुपसणारे असेच हे विधान होते. म्हणून महासभेने उगाच गाजावाजा न करता, ते साफ फेटाळून लावले; आणि त्याचबरोबर सबंध योजनेचा त्याग केला. पण काँग्रेससकट इतर पक्षांनी मात्र हे विष घशाखाली उतरू दिले; आणि मग कण्हत कुंथत ते या किंवा त्या खात्यासाठी वाटाघाटी करीत बसले! पण महासभेने दिलेल्या नकाराने खऱ्या महत्वाच्या प्रश्नावर नेमके बोट ठेवले; आणि ती योजना फेटाळून लावली. पोकळ आश्वासनांच्या ढगांत भारतीय स्वातंत्र्य एकीकडे तसेच लोंबकळत पडले असतांना दुसऱ्या बाजूला भारताच्या अखंडत्वाचे पाठीत सुरा खुपसण्याचीच सिद्धता होत होती. पण महासभेने या प्रश्नावर रोखठोक नकार देतांच वाटाघाटीत काही काळ घालवून; मग त्या देशांतील इतर सर्व पक्षांनी तेच केले.

याच वेळी भरलेल्या हिंदुमहासभेच्या कार्यकारिणी समितीने असा स्पष्ट प्रस्ताव संमत केला की, जगाच्या राजकीय परिस्थितीत द्रुत गतीने जो बदल होत आहे; त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याची विनाअट घोषणा तत्काळ करण्यात आली; तरच या देशातील मनुष्य आणि साहित्य यांच्या बळाचा स्वयंस्फूर्त असा उपयोग ह्या युद्धांत होऊ शकेल. कारण मग ब्रिटिशांना जितके हे युद्ध आपले असे वाटते; तितकेच ते भारयीयांनाही वाटेल.

पितृभूचे अखंडत्व आणि स्वातंत्र्य या दोन मूलभूत मुद्यांवरच महासभेने क्रिप्स योजना धिक्कारली.

ह्या दोन तत्वांना हिंदू संघटनवाद्यांचा सार्वत्रिक पाठिंबा आहे; हे प्रकट होण्याचे राहिले होते; आणि म्हणून १० मे १९४२ हा दिवस पाकिस्तानविरोधी दिन म्हणून सबंध हिंदुस्थानभर पाळला जावा; असे हिंदुमहासभेने ठरविले. १८५७ च्या राष्ट्रीय आंदोलनाचा स्मृतिदिन हाच स्वातंत्र्यदिन म्हणून महासभा आतापर्यंत साजरा करीत आली आहे; आणि म्हणून त्याच दिवशी ''पाकिस्तानविरोधी दिन'' साजरा करण्याचे हिंदु महासभेने ठरविले. हिंदुमहासभेच्या

नेतृत्वाखाली अखिल हिंदुस्थानांत हा दिन मोठ्या उत्साहाने पाळण्यात आला. जम्मू, पेशावर, पुणे, अमृतसर, लाहोर, दिल्ली, लखनौ, पाटणा, कलकत्ता, मुंबई, नागपूर, मद्रास इत्यादी सर्व राजधान्यांच्या ठिकाणी आणि इतरत्र अनेक नगरांत नि खेड्यात हा दिन अपूर्व उत्साहाने पाळण्यात आला. त्या दिवशी लक्षावधी हिंदूंनी हिंदुमहासभेच्या उपरिनिर्दिष्ट दोन्ही तत्वांना पाठिंबा दिला. एकीकडे मुसलमान आपला पाकिस्तानचा आग्रह मनसोक्तपणे प्रचारीत होते; आणि राजगोपाला-चारींकडूनही हिंदुस्थानच्या विच्छेदी-करणाचा मनसोक्त प्रचार करण्यांत येत होता. परंतु पाटणा, आरा नि इतर अनेक ठिकाणी फक्त पाकिस्तानविरोधी निदर्शनांवर मात्र, पक्षपाती बंदी घालण्यात आली. परंतु हिंदु-महासभेच्या अनुयायांनी ही अन्याय्य बंदी ठिकठिकाणी धाब्यावर बसविली; आणि आपल्या न्याय्य अधिकाराच्या रक्षणार्थ ठरीव कार्यक्रम पार पाडून तुरुंगवास पत्करला. या दिवशीच्या निदर्शनाने हिंदु जगताने पितृभूच्या विच्छेदीकरणाला असणारा आपला कडकडीत विरोध स्पष्ट केला. स्वयंनिर्णयाच्या नावाखाली हे कार्य साधणाऱ्या कोणत्याही योजनेला हिंदु जगताचा स्पष्ट विरोध आहे. हिंदू मनावर हिदुमहा-सभेच्या या आग्रहाचा पगडा किती आहे ही गोष्ट या दिनपालनाने सिद्ध झाली आहे. स्वतःला राष्ट्रीय म्हणविणाऱ्या काँग्रेसपेक्षा हिंदूंच्या प्रतिनिधित्वावर हिंदुमहासभेचाच अधिकार कसा अधिक पोचतो, हे त्या दिवशीच सिद्ध झाले.

मध्यंतरी, काँग्रेस ही मुसलमानांच्या दडपणामुळे नमून त्यांचा आग्रहच असेल तर, प्रांतांच्या स्वयंनिर्णयाच्या अधिकाराला विरोध न करण्याचे मान्य करून बसली. जणु काही तत्पूर्वी मुसलमानांनी असा आग्रह धरून काँग्रेसला धाक दाखविलाच नव्हता! राजगोपालाचारी तर, जणू काय पाकिस्तानी मनोवृत्तीने पछाडलेच गेले होते. आपल्या पाकिस्तानी वेडाच्या प्रचारासाठी सबंध हिंदुस्थानभर विजयी दौरा काढण्याची योजना त्यांनी आखली नि प्रारंभी स्वतःच्या प्रांताचीच निवड केली. परंतु सर्व ठिकाणचे हिंदुत्वनिष्ठ जागेच होते. मद्रासपासून मुंबईपर्यंत सर्वत्र त्यांचा पिच्छा पुरविण्यात आला. धर्मवीर डॉ. मुंजे, प्रा. देशपांडे की, जे हिंदुराष्ट्रवादाचे कडवे पुरस्कर्ते आहेत; त्यांना मद्रास अलाख्यात दौरा करण्यासाठी नियोजित करण्यात आले; नि श्री. वरदराजुलू नायडू ह्यांच्या चिकाटीचे सहकार्य त्यांना मिळून, त्या सर्वांनी प्रत्येक व्यासपीठावर राजाजींना पराभूत केले. त्यामुळे शेवटी राजाजींनी व्यासपीठ सोडून देऊन, आरामखुर्चीवरून केवळ, पत्रके काढण्याचे धोरण पत्करले. मुसलमानांची मागणी न्याय्य आहे. पाकिस्तान ही स्वराज्याची गुरुकिल्ली आहे; म्हणजे दोन अधिक दोन मिळून चार नव्हे तर पाच होतात असे हिंदूंना पटविण्यासाठी राजाजी पत्रकांमागून पत्रके प्रसवित आहेत!

याच वेळी काँग्रेसने नेहमीप्रमाणेच गांधीच्या अहिंसक अनियंत्रित एकतंत्री नेतृत्वाखाली कोणत्या तरी स्वरूपाची सविनय प्रतिकाराची चळवळ सुरू करण्याचा आपला संकल्प प्रकट केला. इंग्रजांना उघड उघड हिंदुस्थानातून त्वरीत निघून जाण्याची आज्ञा करणाऱ्या या काँग्रेसच्या चळवळीविषयी आपले धोरण काय असावे, याविषयी देशांतील सर्व हिंदुसभापक्षीयांत कुतूहल

निर्माण झाले होते. हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्य हे ज्या चळवळीचे ध्येय आहे; अशा चळवळीत सामील होणे; हे प्रत्येक हिंदी देशभक्ताचे नि त्यातही विशेषत्वे प्रत्येक हिंदुराष्ट्रभक्ताचे कर्तव्यच होते. परंतु, अशा चळवळीचा काळवेळ आणि तिची कार्यपद्धती हे प्रश्नही प्राधान्य करून तितकेच महत्वाचे होते. आणि लढावयाचे त्या साध्याचा प्रश्न तर सर्वांतच महत्वाचा होता. ज्या उद्दिष्टासाठी तुम्ही संघर्ष करणार ते उद्दिष्ट, संघर्षासाठी उद्यत होण्यापूर्वीच तुम्हांस माहीत असलेच पाहिजे. जरी हे बाजूस ठेवायचे झाले तरी कोणत्याही चळवळीचे उद्दिष्ट जे साध्य करावयाचे ते तरी प्रारंभीच निश्चित केले जाणे; हा सर्वात अहं प्रश्न होता. मुसलमानांच्या तुष्टीकरणा-साठी अविभाज्य एकसंघ हिंदुस्थानच्या संघराज्याचे विच्छेदन करण्यास त्यांनी आंदोलनात सहभागी व्हावे; म्हणून मान्यता देऊन त्यांची मनधरणी काँग्रेसने चालविली होती; हे सूर्यपकाशाइतके स्वच्छ नि स्पष्ट होते.

इतकेही करून काँग्रेसने आपली मागणी म्हणून काय केली? तर ब्रिटिशांनी निघून जावे; पण त्यांनी ब्रिटिश आणि अमेरिकन सैन्य मागे ठेवावे! आणि ते कशासाठी? तर या देशावर जर्मन-जपानच्या होऊ घातलेल्या स्वारीपासून रक्षण करण्यासाठी! थोडक्यात म्हणजे काँग्रेस चळवळीचा अत्यर्थ असा होता; की, इंग्रजांनी अँग्लो अमेरिकन सैन्य येथे ठेवावे; आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची घोषणा करावी, नि ह्या चळवळीच्या मोबदल्यात पदरात काय पडावयाचे तर, हिंदुस्थानची फाळणी! म्हणून स्वातंत्र्याच्या ध्येयाचा स्वतंत्रपणे पुरस्कार करणारी असतानाही, हिंदुमहासभेसारखी संस्था या चळवळीत सहभागी करण्यापूर्वी मूलभूत ध्येय अधिक स्पष्ट करणे अगत्याचे झाले. म्हणून २ ऑगस्टला पुणे येथे बाजीराव पटांगणांत केलेल्या प्रचंड सभेत, मी काही मागण्या केल्या. ऑ. अं. काँ. कमिटीची मुंबईला बैठक होण्यापूर्वी हिंदुस्थानातीलच नाही; तर परदेशी वृत्तपत्रांतून या मागण्या प्रसिद्ध झाल्या होत्या.

त्यापैकी प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या-

अ) सिंधुनदीपासून सिंधुसागरापर्यंतच्या हिंदुस्थानच्या अखंडत्वाची आणि अविभाज्यत्वाची काँग्रेसने हमी द्यावी, आ) म्हणून प्रांताना स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे हे म्हणणे काँग्रेसने उघडउघड नाकारावे, अ) विधिमडळांत नि लोकनियुक्त मंडळांत प्रतिनिधित्व लोकसंख्येच्या बहुसंख्यांक नि अल्पसंख्यांक यांच्या प्रमाणातच केवळ गुणवत्तेच्या प्रमाणात असावे, ई) नोकऱ्या केवळ गुणवत्तेनुसार दिल्या जाव्यात, उ) हिंदुमहासभा ही हिंदू जगताची प्रतिनिधी आहे हे मान्य करण्यात यावे; नि म्हणून हिंदूंच्या हिताचा संबंध जेथे जेथे असेल, तेथे तेथे तिच्या संमतीवाचून काहीही केले जाऊ नये. ऊ) प्रत्येक अल्पसंख्याकांना भाषा, धर्म, संस्कृति यांच्या रक्षणासाठी संरक्षक बंधने देण्यात यावीत; पण कोणाही अल्पसंख्यांकाना बहुसंख्याकांच्या अधिकारावर गदा

आणून; राष्ट्रांतर्गत दुसरे राष्ट्र निर्माण करण्याचा अधिकार दिला जाता कामा नये; ए) शेषाधिकार हे सर्व मध्यवर्ती सरकारच्याच हाती रहावेत.

या मागण्या काँग्रेसने मान्य केल्या असत्या तर मग काँग्रेसशी कोणत्या व्यवहारी भूमिकेवरून सहकार्य करता येईल; यांचा विचार हिंदुमहासभेला करता आला असता; या मागण्यांचे स्वरूप खरोखर इतके राष्ट्रीय आहे की, काँग्रेसनेच आपण होऊन त्यांची घोषणा आधी करावयास हवी होती. पण काँग्रेसने या मागण्यांकडे संपूर्ण कानाडोळा केला. इतकेच नव्हे तर ऑ. अं. काँ. कमिटीच्या मुंबईच्या सभेत, काँग्रेसने शेषाधिकार, हेही प्रांतांच्या स्वाधीन करण्यास संमती दिली. स्वयंनिर्णयाच्या नावावर पाकिस्तानला संमती देऊन; नंतर पाकिस्तानवाल्यांचे आणखी समाधान करण्यासाठी ही पुरवणी जोडण्यात आली; आणि यानंतर सगळ्यांवर कळस करण्यांत आला. काँग्रेसने गांधींना सर्वाधिकारी नेमल्यावर त्यांनी जिनांना जे पत्र धाडले. त्यात संस्थानांसकट सर्व हिंदुस्थानचे सरकार मुस्लिम लीगला अर्पण करण्याची सिद्धता दाखविली. येथे लागू असणारा, असा त्या पत्रांतील महत्वाचा उताराच मी देत आहे. मुस्लिम लीगला उद्देशून गांधीजी म्हणतात-

''पूर्ण कळकळीने नि आस्थेवाईकपणे प्रामाणिकपणे मी पुनः एकदा तुम्हाला सांगतो की, तत्काळ स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लीग काँग्रेसशी सहकार्य करण्यास सिद्ध असेल; तर ब्रिटिश सरकारने आपला सर्व कारभार सर्व हिंदुस्थानसाठी म्हणून, लीगच्या हाती दिला तरी, त्यास काँग्रेस मुळीच हरकत घेणार नाही. अर्थात जर्मनी-जपानपासून हिंदुस्थानचे रक्षण करून अशा पकारे चीनला नि रशियाला सहाय्य करण्यासाठी दोस्तांचे सैन्य येथे राहू देण्यास अनुमती हवी ही या व्यवहाराला अट आहे. संस्थानांसकट सर्व हिंदुस्थानचा कारभार लीगकडे सुपूर्द करण्यास काँग्रेस आडकाठी आणणार नाही. लोकांच्या वतीने लीग जे सरकार प्रस्थापित करील, त्याला काँग्रेस अडथळे तर आणणार नाहीच; अशा सरकारमध्ये काँग्रेस येईल. पूर्ण गंभीरपणे आणि प्रामाणिकपणे मी हे लिहित आहे.

मो. क. गांधी''

या पत्रावर वेगळ्या टीकेची, आवश्यकताच नाही. यापेक्षा हिंदुहिताचा किंवा खऱ्या राष्ट्रीयत्वाचा अधिक विश्वासघात तो कोणता असू शकेल? ही वेळ भर आणीबाणीची नसती; आणि स्वातंत्र्यासारख्या मूलग्राही प्रश्नावर लढत नसती; तर अशा पत्रामुळे प्रक्षुब्ध झालेल्या हिंदूंनी हजारो ठिकाणी अशा पत्रांच्या होळ्या केल्या असत्या! आपल्या मातृभूच्या आणि धर्मभूच्या विध्वंसनाचे ध्येय, ज्या चळवळीपुढे आहे; अशा चळवळीत हिंदुमहासभावादी जाणून बुजून जातील काय? यावाचून योग्य वेळ, चळवळीची पद्धत नि परिस्थिती; आणि विजयप्राप्तीच्या दृष्टीने करावयाच्या इतर युक्तियुक्त व्यूहांचा विचार, हिशेब ह्या काही कमी महत्वाच्या गोष्टी

www.savarkarsmarak.com

नव्हत्या; आणि म्हणूनच हिंदुमहासभानिष्ठांना त्या वेळी या चळवळीविषयी काँग्रेसशी पूर्णपणे तद्रूप होता येणे शक्य नव्हते.

पण प्रारंभापासूनच, स्वतः काँग्रेसवाल्यांनीच देशभर उफाळलेल्या जहाल निदर्शनांशी आपला काही संबंध नाही असे म्हणण्यास प्रारंभ केला. तेव्हा आपणही या चळवळीचे जनकत्व काँग्रेसवर लादण्याचे कारण नाही. अशा स्थितीत या चळवळीत जाण्याचा, किंवा न जाण्याचा प्रश्नच त्यामुळे महासभेपुढे उपस्थित होत नाही.

पुढे लगेच गांधीजींसकट शेकडो काँग्रेस पुढाऱ्यांची धरपकड झाली; नि नंतर असंतोषनिदर्शनाची जहाल लाट देशभर उसळली. त्या लाटेने आणि सरकारी दडपशाहीने देशांत एकच हलकल्लोळ झाला. आज काँग्रेसमध्ये असणारे आणि नसणारेही असे आमचे सहस्रावधी हिंदू बंधू स्थानबद्धतेपासून तो मृत्यूपर्यंतच्या, हालअपेष्टा सहन करीत आहेत. देशप्रेमाने प्रेरित होऊन, अथवा एका देशप्रेमी चळवळीत भाग घेतल्यामुळे आमच्या हाडामासांच्या या लोकांना जे हाल कंठावे लागत आहेत, त्याविषयी आम्हांस सहानुभूती नि वेदना वाटल्यावाचून कशा राहतील? अर्थातच अशा मोठाल्या आंदोलनांतून ओघानेच निर्माण होणाऱ्या गुंडगिरीला आमची सहानुभूती नाही; हे उघड आहे. परंतु हा संघर्ष मुख्यतः लोकांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी चालविला आहे; ही गोष्ट ब्रिटिश सरकार आणि जनता यांनाही मान्य करावी लागली आहे. मातृभूच्या स्वातंत्र्यासाठी झुंजणे; हा जर अपराध असेल, तर आम्ही सर्वचजण, अशा झुंजी झुंजत आलो आहोत; आणि ह्या अपराधाचा आम्हांला अभिमानही वाटतो.

परंतु शुद्ध राष्ट्रप्रेमानेच वाहून जाऊन आपण अविवेकी अविचाराच्या आहारी जाण्याची चूक करता कामा नये. आंधळेपणाने हिंदूराष्ट्राचाच घात होईल; अशा कोणत्याही चळवळीत उडी घेण्याची घोडचूक आपण करता कामा नये. राष्ट्रप्रेमाचेच हे कर्तव्य आहे. चुकीच्या प्रश्नावर एकजूट करणे आणि राष्ट्रीय संकट ओढवून घेणे हे काही देशभक्तीचे लक्षण नव्हे. राष्ट्रीय कर्तव्याचा घातच अशाने होत असतो. काँग्रेस ही राष्ट्रकार्य करीत आहे आणि एकी राखण्याच्या दृष्टीने हिंदुमहासभेने तिच्याशी सहकार्य केले पाहिजे. या एकाच विचाराने जे आक्षेपक चुकीने किंवा उद्दामपणाने हिंदुमहासभेला नावे ठेवतात त्यांनी साधा व्यवहार म्हणून तरी, ही गोष्ट ध्यानांत ठेवावी; की मनुष्याच्या हातून चूक होणे संभवनीय असते; या नियमाला राष्ट्रभक्त हा काही अपवाद आहे असे नाही. एखाद्याचा प्राप्त परिस्थितीत, एखाद्या मार्गावर वा कार्यपद्धतीवर, विश्वास नसला; आणि म्हणून तो आपल्याला योग्य वाटणाऱ्या कार्यपद्धतीने, मार्गक्रमण करून ध्येयाप्रत जाण्याचा प्रयत्न करीत असला; तर त्यासाठी त्याला दोष देणे, हे काही बरोबर नाही. ह्या साध्या विचाराकडे दुर्लक्ष करून, काँग्रेस पत्रे वेळी अवेळी, हिंदुमहासभेविषयी अप्रीति निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांची टीका ज्यावेळी तर्कनिष्ठ आणि न्याय्य असेल, त्यावेळी त्यांना वरीलप्रमाणे उत्तर देता येईल. परंतु बहुसंख्य काँग्रेस पत्रे आणि प्रचारक यांनी सभ्यता गुंडाळून ठेवली असून घालवेडा आणि घाणेरडा प्रचार करण्याचे धोरण त्यांनी पत्करले आहे.

हिंदुमहासभेच्या भूमिकेच्या न्याय्य रक्षणासाठी अशा टीकांना तसेच उत्तर दिले पाहिजे; आणि त्यांना निर्बंधित करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. ''सैन्य ठेवा आणि देश सोडा'' अशी आरोळी गांधींनी ठोकताच हिंदुमहासभेचे पुढारी तुरुंगातील भिंतीवरून उडी मारून लगेच आत जाऊन बसले नाहीत; या विचाराने हे टीकाकार चवताळून गेले असावेत असे दिसते. स्वातंत्र्याचे लक्षण म्हणून इंग्रजांना चालते होण्याविषयी सांगण्यापुरतेच पहावयाचे; तर असे म्हणता येईल की, आज हिंदुमहासभेत असणाऱ्या अनेक पुढाऱ्यांनी आणि सभासदांनी प्रथम पकटपणे स्वातंत्र्याचा ध्वज उभारून सशस्त्र बंडाची उभारणी केली त्या वेळी गांधीजी आणि आजचे काही काँग्रेसचे नेते ब्रिटिशांची कृपा व्हावी, म्हणून ब्रिटिश साम्राज्याची हाजी हाजी करणारी स्तुतिस्तोत्रे 'हालेलूया' गात होते आणि स्वतःला ब्रिटिश साम्राज्याचे एकनिष्ठ नागरिक म्हणवून घेण्यात भूषण मानीत होते. स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी लढणाऱ्या झुलू आणि बोअर लोकांविरुद्ध ते इंग्रजांची बाजू घेऊन त्याना सहाय्य करीत होते. त्यावेळी हे क्रांतिकारक स्वातंत्र्यपूजा करीत होते. यापैकी आज हिंदुमहासभेत असलेले अनेक क्रांतीकारक, त्या वेळी अंदमानच्या अंधार कोठडीत दशकेच्या दशके जन्मठेपींच्या शिक्षा भोगत होते. कित्येकांच्या मानेभोवती गळफासाच्या दोऱ्या पडल्या होत्या; अशा वेळी तुमच्या गांधीनी, ह्या क्रांतिकारकांशी एकजूट न करता, इंग्रजांशी सहकार्य करण्याचे धोरण आचरले! पण इतके दूर कशाला? भागानगरच्या हिंदूंच्या मूलभूत नागरिक अधिकार-रक्षणाच्या संघर्षाच्यावेळी हे काँग्रेसवाले निव्वळ दूर राहिले होते. एवढेच नाही तर, त्यांनी निजामाशी सहकार्य करून; त्याला त्रास न देण्याचे आश्वासन दिले होते. इकडे सहस्रावधी हिंदू आपल्या साध्या अधिकारासाठी अनेक हालअपेष्टा सहन करीत असता, अनेक काँग्रेस पुढारी आणि अनुयायी ब्रिटिश सरकारचे मंत्री म्हणून लठ्ठ लठ्ठ पगार खात होते. आणि तेव्हा आरामात चंगळ करीत लोळत होते. ही गोष्ट खरी नाही काय? बिहार सरकारने बंदी करून, आपल्या जवळ असणाऱ्या गोळीबार, लाठीमार, घोडदौड, फटके, इत्यादी साधनांचा उपयोग केला असताही, सहाही निर्बंधित जिल्ह्यात लक्षावधी हिंदुसंघटकांनी आपल्या न्याय्य मूलभूत अधिकारांसाठी; विदेशी सरकारशी झुंज घेतली. त्यावेळी कशाशीच आपला कसला काहीच संबंध नसल्याच्या आविर्भावात, काँग्रेसवाले सहानुभूतीचा नि ब्रिटिशांच्या त्या विदेशी सरकारच्या निषेधाचा एक चकार शब्दही न उच्चारता त्यापासून दूर राहिले नाहीत काय?

त्यांच्यात धैर्य नव्हते किंवा जनसेवेची भावना नव्हती,असे नाही तर, केवळ काँग्रेसचे हिंदु महासभेशी तत्त्वे आणि कार्यप्रणाली याबाबत जे मतभेद होते त्यामुळे काँग्रेसवाल्यांनी हे धोरण स्वीकारले होते; असे जर काँग्रेसवाल्यांना म्हणावयाचे असेल तर आणि एकजूट का झाली नाही? याचे समर्थन करावयाचे असेल; तर, हिंदु महासभेच्या आजच्या धोरणाविषयीही नेमके तेच समर्थन लागू पडते; हे समजण्याअतका शहाणपणा काँग्रेसवाल्यांनी दाखववावयास हवा. काँग्रेसचे नैतिक दास बनून तिच्या कसल्याही ठरावाची आज्ञापत्रे, नि तिच्या मागण्यांची आंदोलने यांच्याबरोबर आपली फरफट करून घेणे हिंदुमहासभेला कधीच आवडण्यासारखे नव्हते.

त्याचप्रमाणे, सत्तेतील अधिकार केंद्रे, तीही मार्यादित मिळविण्यासाठीच्या हिंदुमहासभेच्या धोरणासंबंधी; नि सद्यःस्थितीत हिंदुमहासभा लहानसहान अधिकारपदांना चिकटून राहते, म्हणून या काँग्रेसवाल्या आक्षेपकांकडे निंदा नालस्तीचा; नि हिंदुमहासभेवर गलिच्छ आरोप करण्यासाठीचा जो साठा आहे, त्यातील प्रत्येक हीन आक्षेप त्यांच्यावरच उलटतो, आणि त्यांच्यावरच बूमरँगप्रमाणे अधिक जोराने उसळी घेऊन प्रहार करतो. अलीकडे हिंदुमहासभेच्या वतीने निवडून आलेले किवा महासभेने पाठिंबा दिलेले प्रतिनिधी राजकीय परिषदा, समित्या, विधिमंडळे, मंत्रिमंडळे, नगरपालिका आणि अशाच राजकीय सत्ताकेंद्रामध्ये दायित्वपूर्ण पदे मिळवून विराजमान होऊ लागले असून, प्रायः, ह्या गोष्टीमुळेच राजकीय क्षेत्रात हिंदुमहासभेला महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे काही बेकार काँग्रेसवाल्यांना, मनुष्यस्वभावानुसारच राग येऊन ते हिंदुमहासभावाल्यांना नोकरीवाले म्हणण्यास प्रवृत्त झाले असणे शक्य आहे. या त्यांच्या प्रक्षोभाची आम्हांला कीव येते. पण म्हणून आम्ही त्यांना काही साधुत्वाची खोळ घालू देणार नाही. कारण हे साधूच वेळ आली, तेव्हा स्वतः याच नोकऱ्यांसाठी आणि अधिकारासाठी लाळ घोटीत होते हे आम्ही जाणतो.

थोड्याच दिवसांपूर्वी खुद्द काँग्रेसने, सबंध हिंदुस्थानभर तोच उद्योग केला नाही काय? राजा म्हणून नव्हे; तर प्रधान म्हणून, काम करण्यास ते मान्य झाले! आणि प्रधानच नव्हे, तर स्वतः ब्रिटिश राजाचे नोकर असणाऱ्या गव्हर्नरचे प्रधान म्हणून काँग्रेसवाले सिद्ध झाले होते! आज हिंदुमहासभेवर साम्राज्यशाहीशी सहकार्य करण्याचा छाप, जे मारीत आहेत, त्यांनीच त्या सम्राटाशी एकनिष्ठ राहण्याच्या शपथा घेऊन लठ्ठलठ्ठ पगार घेतले. नि आपापल्या अनुयायांच्या झुंडीच्या झुंडींना नोकऱ्या आणि अधिकार ते देत जात होते. ज्या घटनेवर त्यांनी लाथा झाडल्या; तीच घटना त्यानी अखेरीस राबविली; आणि ज्या वेळी एखाद्या मुद्यावर लोकांचे समाधान करणे; त्यांना शक्य झाले नाही. तेव्हा त्यांनीच आपल्या अधिकारांच्या मर्यादेकडे बोट दाखविले वा अवज्ञा करणाऱ्यांवर किंवा निरोधन करणाऱ्यांवर गोळीबार नि लाठीमार करण्याच्या आज्ञा दिल्या. त्यावेळी जेव्हा एखाद्याने निषेध म्हणून त्यांच्या द्वाराशी उपोषण केले. त्यावेळी हेच काँग्रेसमंत्री त्यांना रोखठोक असे म्हणाले की, ''मरेपर्यंत आपण या ठिकाणी सुखाने पडून रहा; मला माझ्या कार्यालयात जाऊन मी निवडलेल्या कर्तव्यानुसार माझी कामे केलीच पाहिजेत.'' सरकारचे पहिले कर्तव्य राज्य कारभार करणे हे आहे,'' असे त्या मंत्र्यांचे इंग्रणी असणाऱ्या राजाजींनी महात्म्याचे अनुकरण करीत काँग्रेसी सरकारांच्या समर्थनार्थ, कुणाचीही भीडभाड न ठेवता जगाला ऐकविले नव्हते काय?

या नोकऱ्यांची पारध करणाऱ्या, नि तीसाठी वाममार्गानेही घोडदौड करणाऱ्या काँग्रेसवाल्यांचा आपण निषेध करता काय? का हे सर्व देशभक्तीला धरूनच आहे; असे तुम्ही म्हणता? जे काही जनहित साधता येण्याजोगे आहे; ते साधण्यासाठी मर्यादित अधिकार-क्षेत्रांतील अधिकारांचा उपयोगही करावयास हवा; असा खुलासा काँग्रेसवाले करतात का? तसे असेल तर,

तुम्हीच हिंदुमहासभेच्या भूमिकेचे समर्थन करता आहात. मर्यादित का होईना, मिळेल तो अधिकार घेऊन त्या जागेवरून अधिक अधिकारप्राप्तीसाटी झगडावयाचे, या हिंदुमहासभेच्या धोरणाचे तुम्ही समर्थन करता, असाच याचा अर्थ आहे.

हिंदुमहासभेची भूमिका ही आहे; की व्यावहारिक राजकारणाचे मुख्य सूत्र, हे प्रतियोगी सहकाराचे आहे; आणि म्हणूनच विधिमंडळात समित्यांत किंवा मंत्रिमंडळात राहून जे हिंदू संघटनवादी आज अतरांच्या अधिकारांवर आक्रमण न करता हिंदूंच्या हिताचे आणि न्याय्य अधिकार संबंधाचे रक्षण करीत आहेत; ते राष्ट्राची सेवाच करीत आहेत, असा हिंदुसभेचा विश्वास आहे. मर्यादा काय आहेत याची जाणीव हिंदुमहासभेला आहे; आणि म्हणून तिची अशी अपेक्षा आहे; की, त्या मर्यादेत राहून करता येण्याजोगे अधिकांत अधिक कार्य, जर ते करतील; आणि तसे करण्यास ते चुकले नाहीत तर, त्यांनी आपले काम चोख केले आहे. म्हणून हिंदुमहासभा त्यांना धन्यवादच देईल. या मर्यादा हळूहळू*टप्प्याटप्प्याने स्वतःच मर्यादित होऊन; अंतिमतः निष्कासित व्हावयाच्या आहेत.

प्रतियोगी सहकारितेचे धोरण, काळाच्या निकडीपोटी, उपलब्ध असलेल्या आपल्या साधनसामग्रीच्या मानाने; आणि आपल्या राष्ट्रीय हिंतसंबंधांच्या अंतःप्रेरणेने आज्ञापिल्याप्रमाणे, साजेसे, अनुकूल करून घेऊनच काय ते देशभक्तिपूर्ण कार्यांना अगदी बिनशर्त सहकारापासून तो सरळसरळ प्रत्यक्ष प्रतिकारापर्यंत, किबहुना अगदी, सशस्त्र प्रतिकारासही पूर्ण आटोक्यातील म्हणून आश्रय देते.

यासंबंधात हे लक्षात ठेवलेच पाहिजे की, जर कोणी सेवेची पारध करणारे 'सेवा पारधी' असलेच तर, ते हेच भाडोत्री पोटभरू लेखक, जे दुय्यम प्रतीची बहुसंख्य काँग्रेसी 'लंगोटी पत्रे' (Sheets= single papers) जी समाजाच्या तळागाळातल्या बहुजनसमाजाच्या सहजी आवाक्यातील, असण्याच्या वास्तवतेमुळेच आपल्या अत्यंत हीन अभिरुचीचे हिडिस प्रदर्शन करीत, हिंदुमहासभेवर गलिच्छ टीका करीत असतात. त्यांच्यापैकी बहुतेक जणांनी- आपणा सगळ्यांनाच ठाऊक आहे; -स्वदेशभक्तीच्या कोणत्याही चळवळीत काहीच सोसलेले नाही. त्यांना कसलीच तोशीस लागलेली नाही, की यांच्या अंगावर साधा ओरखडाही उठलेला नाही. आणि जर कोणी त्यांना बरेच काही अधिक मूल्य देऊ केले तर, ते अशा दुसऱ्या कोणत्याही पक्षासाठीसुद्धा लिहू लागतील. त्यांच्यापैकी अनेक जणांची ही खरी ओळख, त्यांच्या अशा करण्यावागण्यामुळेच, खरोखर पटलेली आहे! आणि म्हणून हे अनिवार्य नि अपरिहार्यच ठरते की, हिंदूंच्या हितकारणासाठी त्यांची योग्य ती जागा, त्यांना वेळोवेळी दाखवून दिलीच गेली पाहिजे.

अशा काँग्रेसवाल्यांविरुद्ध माझी ही टीका लागू असली तरी, ती सर्वांना लागू नाही, हे मी स्पष्ट केले नाही तर, ते मी स्वतःवरच अन्याय केल्यासारखे होईल. मी केलेल्या माझ्या या टीकेचा अर्थ असा नाही की, काँग्रेसवाले सगळे सारखेच अविचारी आहेत. त्यात काही सुज्ञही आहेत; आणि बुद्धिपुरस्सर जितकी चांगली कामे करता येतील; तितकी ते करतातही. तेव्हा हिंदूंच्या हिताला आणि हिंदुत्वाच्या अभिमानाला धक्का पोचविण्याकडे त्यांचा कल नाही. कारण ते लोकही हिंदूच

आहेत. आणि म्हणून ते काँग्रेसवाले हिंदू, स्वतःच्याच हितसंबंधांना आणि सन्मानाला हानि पोचविणार नाहीत; हे मी जाणतो.

एवढेच नाही तर अशांपैकी कित्येकजण हिंदुमहासभेच्या गुणवत्तेची खरोखर प्रशंसा करतात. ज्या ज्या वेळी काँग्रेस ही हिंदूंच्या सांस्कृतिक अभिमानाला धक्का देणारे कृत्य करते किंवा स्वतःच्या न्याय्य अधिकारांसंबंधी हिंदूंना नादानपणे माघार घेण्याचा आदेश देते; त्यावेळी अशा काँग्रेसवाल्यांना अचंबाही वाटतो. आज हिंदुत्वाच्या ध्वजाभोवती गोळा झालेल्यांत, सहस्रावधी काँग्रेसचे अनुयायी आणि पुढारी आहेत, ही गोष्टही वरील विधानालाच पुष्टी देणारी आहे. काँग्रेसच्या शिबिरात असे लक्षावधी हिंदु असणे; नैसर्गिकच आहे. पण त्यांना काँग्रेसच्या छावणीतून उघडपणे बाहेर पडून हिंदुमहासभेत येण्याचे धैर्य होत नाही एवढेच!

पण आजपर्यंतच्या पूर्वानुभवामुळे मला असा विश्वास वाटू लागला आहे की, ऋषी, अवतार, मातृभूमी, संस्कृति या सर्वांविषयी स्वाभिमान वाटणारे असे जे सहस्रावधी हिंदू बंधु अद्याप काँग्रेसच्या गोटात आहेत. त्यांना तेथून लवकरच बाहेर पडावे लागेल; आणि नंतर अंतरींच्या तळमळीमुळे हिंदुत्व रक्षण करणाऱ्या हिंदुमहा-सभेच्या पवित्र मंदिराकडे त्यांची पावले वळल्यावाचून राहणार नाहीत. त्या मंदिराच्या रक्षणासाठी त्यांचे सहस्रावधी हात कार्यप्रवण झाल्याविना राहणार नाहीत.

सरकारने काँग्रेसवर बंदी घातल्यामुळे प्रकट राजकारणाच्या क्षेत्रांतून काँग्रेस दूर गेली; तेव्हा हिंदुस्थानातील राष्ट्रीय चळवळींपैकी जो काही भाग आपल्या कक्षेत येईल; तो चालू ठेवण्याचे दायित्व ओघानेच हिंदु महासभेवर येऊन पडले. तो भार मुस्लिम लीगवर टाकणे, म्हणजे त्या संस्थेचा अपमान होण्यासारखेच होते. काँग्रेसला हिंदूंची संस्था म्हणणे म्हणजे तिचा अपमान करणे, असे ज्याप्रमाणे मानले जाते, त्याचप्रमाणे हिंदुस्थानला जी केवळ एक उपखंडच मानते; राष्ट्र म्हणून मानीतच नाही. अशा मुस्लिम लीगला राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व करावयास सांगणे, म्हणजे आपला उपमर्दच होय, असे लीगने मानणे हेच न्यायतः बरोबर होते. पण हिंदुस्थानच्या अविभाज्य राष्ट्रवादावर स्वतःला राष्ट्रीय म्हणविणाऱ्या काँग्रेसची जी श्रद्धा आहे. त्यापेक्षाही हिंदु महासभेची अधिक बळकट श्रद्धा असल्याने ते कार्य हिंदू महासभेकडे ओघानेच आले. त्या वेळेचे पहिले कार्य ब्रिटिश प्रचाराचा प्रतिकार करणे हेच होते. क्रिप्स दौरा अयशस्वी झाला. त्याचे कारण ब्रिटिश सत्तादानालाच सिद्ध नव्हते हे नाही; तर हिंदुस्थानांतील अंतर्गत भांडणे हे त्याचे कारण आहे, असे जगाला नि विशेषतः अमेरिकेला भासविण्याचा प्रयत्न ब्रिटिश प्रचारखाते करीत होते.

जे काही देता येणे शक्य होते, ते सारे काही मूलभूत अधिकारांची खरीखुरी सनद हिंदुस्थानला अर्पण करून, लोकांना राजकीय दास्यातून मुक्त करण्यासाठी दिलेले आहे; अशा पकारे क्रिप्स योजनेचा जगाच्यासमोर अगदी दिपविणाऱ्या झगझगाटात डांगोरा पिटण्यात आला, आणि तिच्याकडे अंगुलीनिर्देश करून, ब्रिटिश वृत्तपत्रांनी नि ब्रिटिश प्रचारयंत्रणेने प्रचार करीत साऱ्या जगाला प्रत्यक्ष पाहण्याची विनंती केली की, इतक्या उच्च प्रतीच्या घटनांची खैरात ज्यांचा

राजकीय विकास पुरेसा झालेलाच नाही. त्यामुळे जे त्यासाठी पात्रच नाहीत. अशांवर- अशा लोकांवर- केल्याने, त्यांची स्थिती अधिकाधिक बिघडविण्यासच काय ती उपयोगी पडू शकते. एक श्रेष्ठ अत्युत्तम मॅग्नाचार्टा जो मूलभूत अधिकारांची ती सनद, हिंदुस्थानला अधिकार देऊ मागत होता; त्याला मात्र कलहकुचलियाचीच काय ती फळे आली; बेबनावाचेच काय ते सफरचंद लगडले. राजकीय सत्ता हिंदुस्थानला देऊ करतो न करतो तोच एक संयुक्त राष्ट्र म्हणून, ती न स्वीकारता परस्परांचे गळे पकडण्यासाठी उसळ्या मारणे सुरू झाले. जाती विरुद्ध जातीची पूर्वापारची हाडवैरे वैमनस्ये विसरून जाऊन, निकोप निरोगी होण्याच्या पक्षी ती भयंकर क्रूर अवस्थेला पोचली. एकमुखी मागणी नव्हतीच! आम्ही जर तो अत्यंत श्रेष्ठ मॅग्नाचार्टा मागे घेतला नसता तर, रक्तरंजित यादवी युद्धाने, थैमान घातले असते. अशापकारे कथोपकथन ब्रिटिशांनी स्पष्टीकरणार्थ हिंदुस्थानात नि जगाला विशद केले.

हिंदुस्थानात जातीय सलोखा नव्हता; आणि कधीच नव्हता हे नाकारण्यात अर्थ नाही. अगदी इंग्लंड अमेरिकांसहित प्रत्येक देशालाच अशा अवस्थेतून पार पडावे लागले होते. पण म्हणून ही वस्तुस्थिती हेच काय ते, क्रिप्स योजना मागे घेण्याचे खरे कारण हे मात्र खोटे! विरोधात तोही एक शेवटचा खिळा ठोकला जाणे आवश्यकच होते. कारण चीन आणि अमेरिका ह्यांना फसविण्यात; आणि हिंदुस्थानातीलही एका वर्गाला फसविण्यात, ब्रिटिश बव्हंशी यशस्वी झालेलेच होते. क्रिप्स मिशनपूर्वी अमेरिकन लोक नि वृत्तपत्रेही जी काही प्रमाणात सहानुभूतीशील होती; त्यांनीही आता आपला सूर पालटून मान्यच केले; की हिंदुस्थानला संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य देण्यासाठी, जे काही करता येणे शक्य होते; ते ते सर्व काही मनमोकळ्या प्रामाणिकपणाने इंग्लंडने केलेले आहे. आणि खरोखरच हिंदुस्थानातल्या लोकांच्या आपापसातील अंतर्गत कलहांमुळेच, क्रिप्स योजनेच्या अपयशाचे उत्तरदायित्व हिंदुस्थानातील लोकांचेच होय.

आपण जर एकमुखी राष्ट्रीय मागणी निर्माण केली तर ती धिक्कारणे इंग्रजांना अशक्य होईल असा ग्रह करून घेणारा एक मोठा गट कॉंग्रेसवाल्यांत आणि हिंदूंतही निर्माण झाला हे विशेष होय! ह्या विचारामुळेच कॉंग्रेसने अनेकदा मुस्लिम लीगपुढे गुडघे टेकत लोटांगण घातली. याच वृत्तीमुळे अनेक सर्वपक्षीय किंवा अपक्षीय परिषदांचा जन्म झाला; नि होत आहे. ही जी स्वतःची फसवणूक करण्याची वृत्ती हिंदुस्थानात बळावली होती. तिच्या कचाट्यातून हिंदूंची सुटका करण्यासाठी अखिल भारतीय स्तरावर एखादा व्यापक प्रयत्न करणे अगत्याचे झाले होते. त्याचप्रमाणे हिंदुस्थानांतील विविध पक्षांतील मतभेदांची मर्यादा काय आहे? आणि खरोखरच सर्वांना लागू असणाऱ्या महत्वाच्या एकदोन प्रश्नांविषयी सर्वांची भूमिका काय आहे? हे पडताळून पाहणेही उपकारक ठरले असते. आणि याच विचाराने हिंदुमहासभेने आधीच सिद्ध केलेल्या तीन प्रमुख मागण्याविषयी विविध पक्षांशी आणि व्यक्तींशी वाटाघाटी करण्याची योजना स्वीकारली. १) भारतीय स्वातंत्र्याची घोषणा तत्काळ होणे, २) प्रत्यक्ष रणक्षेत्रांतील हालचालींव्यतिरिक्त संबंधित असणारे खाते धरूनसुद्धा, सर्व खाती राष्ट्रीय सरकारच्या हाती देणे नि अशा राष्ट्रीय

सरकारची प्रस्थापना, ३) युद्ध संपल्यानंतर लगेच घटना समितीची स्थापना करणे. या त्या तीन प्रमुख मागण्या होत्या.

या वाटाघाटी करण्यासाठी अध्यक्ष डॉ. श्यामाप्रसाद मुखोपाध्याय, डॉ. मुंजे, श्री. निर्मलछंद चट्टोपाध्याय, राजा महेश्वर दयाळ शेठ, रावबहादूर मेहेरचंद खन्ना नि प्रा. देशपांडे यांची एक समिती नेमण्यात आली. अनेक पक्षांनी आणि व्यक्तींनी या योजनेविषयी जे स्वयंस्फूर्त सहकार्य दिले ते उत्साहजनक होते. या वाटाघाटीचा मुख्य भार हा डॉ. श्यामप्रसाद यांच्यावर होता. नि त्यांनी मोठ्या कौशल्याने ज्या वाटाघाटी केल्या त्यामुळे संबंध हिंदुस्थानचे लक्ष याच एका प्रश्नावर केंद्रीभूत झाले. इंग्रज अमेरिका आणि चिनी वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींनीही या वाटाघाटींच्या प्रयत्नांत बारकाईने लक्ष घालून महासभेच्या या प्रयत्नांना आपल्या देशांत बरीच प्रसिद्धी दिली.

हिंदुमहासभेच्या या प्रयत्नांना आलेले यश हे काही प्रयत्नांच्या मानाने असमाधानकारक नव्हते. विधायक प्रगतीच्या दृष्टीनेही या प्रयत्नांचे महत्व होते. कारण ज्या लोकांची मने खुली होती अशा सर्वांना ही गोष्ट पटली; की हिंदुस्थान हे एक अखंड राष्ट्र आहे. ही गोष्ट ब्रिटिश पार्लमेंटने तत्काळ मान्य करावी, ही हिंदुस्थानची एकमुखी मागणी आहे. राष्ट्राची ही एकमुखी मागणी प्रस्थापित करण्यांत या समितीला यश आले. हिंदुमहासभा ही त्या देशांतील दुसऱ्या क्रामांकाची प्रमुख संस्था आहे; हे उपभारतमंत्र्यांनी मान्य केले असून अशी संस्था नि शीख, मोमीन, प्रागतिक  ख्रिश्चन नॅशनल लीग इत्यादी संस्थांच्या सर्वमान्य पुढाऱ्यांनी या मागणीवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत; किंवा तिला पाठिंबा दिलेला आहे. सिंध - बंगालचे मंत्री, विधिमंडळाचे प्रमुख सभासद आणि शासनसंस्थेत कामे करणारी अनेक प्रमुख माणसे, या मागणीच्या पाठीशी आहेत; आणि म्हणूनच या मागणीचे स्वरूप एकमुखी राष्ट्रीय मागणीचे आहे. काँग्रेसचा ठरावही या मागणीतील प्रमुख तत्वांना पाठिंबा देतो; ही गोष्ट भरीला घातली म्हणजे त्या मागणीचे राष्ट्रीय स्वरूप अधिकच बळकट होते. केवळ, लीगने किंवा इतर कोणत्या गटाने पाठिंबा दिला नाही म्हणून या मागणीला राष्ट्रीय मागणी म्हणावयाचे नसेल तर कोणत्याही देशांत कोणत्याच काळी, तशी एकमुखी राष्ट्रीय मागणी निर्माण झालेली नाही. असे म्हणावे लागेल.

कॅनडा, आफ्रिका किंवा अमेरिकेतील फेडरेशन स्थापित करतांना जी मतनोंदणी झाली तिचा विचार केला, तर ती तरी एकमुखी कोठे होती? विरोधी नेते आणि पक्ष त्यात होतेच. वस्तुस्थिती अशी आहे की, राष्ट्रीय मागणी ठरवितांना त्या मागणीला देशांतील बऱ्याचशा बहुमताचा पाठिंबा आहे का नाही; हे पहावयाचे असते. मतभिन्नता असणाऱ्या, अल्पसंख्यांकांचा हिशोब त्यांत करावयाचा नसतो.

ही निश्चित मागणी प्रस्थापित करण्यांत जेव्हा महासभेला यश आले; तेव्हा त्याचा तत्काळ परिणाम होऊन चीन अमेरिका आणि हिंदुस्थानांतील लोकमतप्रवाह जागृत झाले. नि ब्रिटिशांचा डाव त्यांच्या ध्यानात आला. क्रिप्सयोजना परत घेतली; याचे कारण या देशातील

भांडणे हे नाही. तर ब्रिटिशांनाच आपल्या हातातील सत्ता खरोखर सोडावयाची नाही, हेच खरे कारण आहे, ही गोष्ट अनेकांच्या ध्यानी आली.

हिंदुमहासभेचा अध्यक्ष या नात्याने ही मागणी मी तारेने मि. विन्स्टन चर्चिल यांच्याकडे पाठवून दिली. या तारेचा स्वीकार करतांना मि. चर्चिल यांनी हिंदुमहासभेच्या ऐक्यसाधनाच्या प्रयत्नांविषयी समाधान व्यक्त केले आहे. पण मुख्य पक्षांचा पाठिंबा आहे; अशी एखादी निश्चित योजना पुढे मांडण्यात हिंदु महासभेला यश आले नाही, असे त्यांचे म्हणणे होते.

या उत्तरावर वेगळी टीका करण्याचे कारण नाही. या प्रश्नांचा वरती विस्तृत उहापोह झालाच आहे. मात्र एकाच गोष्टीचा या ठिकाणी निर्देश करावयाचा आहे. वरील मागणीला पाठिंबा न देणारा प्रमुख पक्ष म्हणजे मुस्लिम लीग- मुसलमान नव्हे, कारण आमच्या मागणीवर स्वाक्षऱ्या देणाऱ्यांत मोठमोठ्या मुसलमान संघटना होत्या. लीगसारख्या एका पक्षांने केवळ इतर सर्वांशी सहमत होण्याचे नाकारले, म्हणून जर या मागणीला राष्ट्रीय म्हणावयाचे नसेल, तर एकंदर राष्ट्राच्या अच्छेची मुस्कटदाबी करण्याचा अधिकारच अशा संस्थेच्या हाती दिल्यासारखे होते. लीगला इतके महत्व देतांना मि. चर्चिल यांची जीभ तोंडात घोटाळत असली पाहिजे हे लीगही जाणत असेल. ब्रिटिश हितसंबंधांना बाधा येईल, अशी काही मागणी लीग स्वतः करील, किंवा तशा मागणीला पाठिंबा देईल तर चर्चिल लीगलासुद्धा ''मुसलमानांच्या वतीने बोलण्याचा काय अधिकार आहे?'' असा प्रश्न टाकतील; हे लीगला सुद्धा समजले असेल.

या वाटाघाटीनी, हिंदुमहासभेवर काँग्रेस-वाल्यासकट इतर अनेक लोक जो एक आक्षेप घेत होते; त्या आक्षेपाला उत्तर मिळाले. हिंदुमहासभा ही जातीय संस्था असल्याने तिला राष्ट्रीय कार्यक्रम किंवा धोरण असणारच नाही; किंवा राष्ट्राचे नेतृत्व ती घेऊच शकत नाही; हा तो आक्षेप होय. या वाटाघाटींनी हे सिद्ध झाले; की हिंदुमहासभा ही नुसती राष्ट्रीय आहे, इतकेच नाही; तर काँग्रेससारख्या संस्थेप्रमाणे ती वेगवेगळ्या छंदांना बळी पडत नाही; किंवा लीगसारखी ती जातीय स्वार्थाच्याही आहारी जात नाही. व्यावहारिक राजकारणांत तर्कनिष्ठ तडजोडीच्या मार्गाने जावे लागते, हेही हिंदुमहासभा जाणते. सिंधमध्ये लीगबरोबर सहकार्य करून मंत्रिमंडळाचा भार पत्करण्यास हिंदुमहासभा सिद्ध झाली, यावरून हीच गोष्ट सिद्ध होते. बंगालमधील उदाहरण तर प्रसिद्ध आहे.काँग्रेसच्या शरणागतीने जे उद्दाम लीगवाले समाधान पावले नाहीत; ते हिंदुमहासभेशी तडजोड करण्यास आणि सामोपचाराने वागण्यास सिद्ध झाले; नि फजलूल हक्क यांच्या पंतप्रधानकीखाली आणि महासभेचे माननीय पुढारी डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली वर्षभर उभय जमाती गुण्यागोविंदाने एकत्र नांदत होत्या. आणखी हिंदुमहासभावाले हे केवळ लोकहिताच्या दृष्टीने सत्ताकेंद्रे हस्तगत करतात, नोकरीच्या आशेने नाही हेही पुढील घटनांवरून सिद्ध झाले आहे. लोकसेवा करता येणार नाही; आणि स्वाभिमानपूर्वक मंत्रिमंडळात राहता येणार नाही. असे वाटताच डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांनी अधिकारवस्त्रे फेकून देतांना-निर्भीडपणाने आणि धैर्याने जे पत्रक काढले त्यावर दृष्टिक्षेप टाका म्हणजे हे दिसेल.

राजकीय न्याय किंवा मानवजातीवरील प्रेम यामुळे अमेरिका, रशिया किंवा कोणतेही परके राष्ट्र हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठी, संघर्ष करण्यास किंवा हितसंबंध धोक्यात घालण्यास सिद्ध होईल, या वांझोट्या आशावादावर आमचा मुळीच विश्वास नाही. असे असले तरी अहिंदु संघटनांनी आणि पक्षांनी परदेशात प्रचार करून तेथे जे गैरसमज निर्माण करण्याचा उद्योग चालविला आहे; त्यांना प्रतिकारून देशांतील वस्तुस्थितीविषयी तेथे रास्त कल्पना निर्माण करणे, हे व्यावहारिक दृष्ट्या अत्यंत अगत्याचे आहे. जगातील प्रत्येक राष्ट्राचे आणि देशाचे हितसंबंध एकमेकांत इतके गुंतले आहेत, की त्यामुळे एकमेकांच्या हितसंबंधाविषयी नि राजकीय परिस्थितीविषयी सम्यक सत्यज्ञान आपणास व्हावे असे प्रत्येकाला वाटते. स्वतःच्या हित-संरक्षणासाठी हे ज्ञान त्यांना हवे असते. जगातील इतर देशांतील खऱ्या राजकीय परिस्थितीचे चांगले ज्ञान असेल, तर राष्ट्रीय हितसंबंधांवर दृष्टि ठेवून संधि किंवा विग्रह करून राष्ट्रीय गट बनविता येतात. हे युद्ध सुरू झाल्यापासून, इंग्लंडने जगभर असा प्रचार सुरू केला की, जगातील सर्व ठिकाणच्या लोकसत्तेसाठी आणि स्वातंत्र्यासाठी, आम्ही झुंजत आहो. हिंदुमहासभेचा या प्रचारावर मुळीच विश्वास नव्हता; आणि हिंदुमहासभेने एका ठरावांत तसे स्पष्टपणे म्हटलेही. तेव्हा इंग्लंडला अमेरिकेपुढे असे सिद्ध करण्याचा प्रसंग आला; की हिंदुस्थानला आताच्या आता स्वातंत्र्य देता येत नाही; याचा दोष हिंदुस्थानवर आहे. उलटपक्षी अमेरिकनांना असे वाटत होते की, जर हिंदुस्थानचे समाधान करता आले तर, युद्ध जिंकण्यासाठी सैन्य आणि साहित्य यांचा फार मोठा साठा आपल्याला मिळेल. अमेरिकन हितसंबंधांच्या दृष्टीने हिंदुस्थानचा संतोष हा अगत्याचा होता; म्हणून ते हिंदुस्थानांतील परिस्थिती समजावून घेण्यास, अधिक उत्सुक बनले. हिंदुस्थानांत काँग्रेस ही हिंदूंची आणि लीग ही मुसलमानांची संस्था आहे; नि त्या दोहांचे मत ते हिंदुस्थानचे मत अशी पुसट कल्पना युद्धारंभी अमेरिकेत होती.अधूनमधून त्यांना हिंदुमहासभेविषयी काही एकू येई. पण वरील परिस्थितीत हिंदुमहासभा कशी बसवावयाची, याचा उमग त्यांना पडत नसे. हिंदुस्थानच्या राजकारणात महासभेने एक प्रमुख स्थान मिळविले आहे. याची त्यांना कल्पना नव्हती.

पण मी प्रे. रुझवेल्ट यांना जी तार धाडली ती अमेरिकन वृत्तपत्रांत; आणि तद्वारा जगभरच्या इतर पत्रात पुष्कळच प्रसिद्ध झाली; नि त्यामुळे अमेरिकन वृत्तपत्रे आणि जनता यांचे लक्ष हिंदुमहासभेकडे अधिक बारकाईने वेधले गेले. हिंदु महासभेचा ध्येयवाद, धोरण आणि महत्व हे समजून घेण्याविषयी परदेशांतील उत्सुकता अधिक वाढली. अमेरिका ब्रिटन नि चीनमधून या देशात सर्वसामान्य परिस्थिती समजावून घेण्यासाठी जे पत्रपंडित किंवा इतर विद्वान प्रवासी आले, त्यांनी हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या; आणि नंतर त्यापैकी कित्येकांनी स्वदेशी बातमीपत्रे धाडून, मुस्लिम लीग ही जशी मुसलमानांची त्याचप्रमाणे हिंदुमहासभा ही हिंदूंची प्रतिनिधी आहे, असे कळविले; नि त्याप्रमाणे हिंदुमहासभेच्या ध्येयवादाचा नि धोरणाचा परिचय परदेशांना दिला. वेगवेगळ्या प्रसंगी हिंदुमहासभेच्या कार्यालयांतून आणि विविध केंद्रांतून ज्या

तारा धाडण्यात आल्या, त्यांना अमेरिकन वृत्तपत्रात भरपूर प्रसिद्धी मिळाली. अमेरिकन पत्रपंडितांनी दिलेल्या अश्वासनांप्रमाणेच ही गोष्ट झाली. हिंदुमहासभेचे कार्यालय आणि रोजचा कारभार यांची चित्रणेही अमेरिकन बोलपट प्रतिनिधींनी घेतली. नि सध्या ती अमेरिकेत दाखविली जात आहेत. असे मला कळते. वाटाघाटीच्या वेळीही परकीय पत्रपंडितांनी वाटाघाटीत फार बारकाईने लक्ष घातले होते. नि महासभेच्या प्रयत्नांना त्यांनी जगभर चांगली प्रसिद्धी मिळवून दिली. अशा पकारे चीन, अमेरिका आणि स्वतः ब्रिटन यामधील प्रमुख व्यक्तींशी जे संबंध निर्माण झाले; त्यामुळे आता त्यांना ही गोष्ट पटलेली आहे; की, काँग्रेसने जरी कोणताही करार केला तरी जोपर्यंत हिंदुमहासभेची त्याला संमती नाही; तोपर्यंत तो हिंदूंच्यावर बंधनकारक राहणार नाही किंवा केवळ काँग्रेस नि लीग यांच्याबरोबर झालेला करार, हा हिंदुस्थानशी झालेला करार असे मानता येणार नाही.

युद्ध संपल्यानंतर वेगवेगळ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी नवी घडी बसविण्यासाठी एकत्र बसले; नि त्यांत हिंदुस्थानच्या भवितव्याचा प्रश्न कार्यक्रम-पत्रिकेवर असला तर, वरील घटनांचा लाभ त्यावेळी हिंदुमहासभेला झाल्यावाचून राहणार नाही.

वर दिलेल्या कारणांसाठी आणि निदान चीन, इंग्लंड अमेरिका इत्यादी देशांत काही झाले तरी ब्रिटिश प्रचाराचा प्रतिकार करण्यासाठी तरी, निदान हिंदुमहासभेचे प्रतिनिधि धाडण्याची फार आवश्यकता होती. अमेरिकन जनतेला हिंदुमहासभेचा ध्येयवाद आणि धोरण यांचा परिचय करून देण्याच्या दृष्टीनेही हे आवश्यक होते. त्या त्या देशांत काँग्रेस नि लीग आणि इतर भारतीय प्रश्नांविषयी ज्यांना जिज्ञासा आहे; त्यांना हिंदुमहासभेविषयी माहिती देणे आवश्यक होते. म्हणून डॉ. मुंजे नि माननीय बाबाराव खापर्डे यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेला एक शिष्टमंडळ धाडण्याविषयी ठरविण्यात आले. राजाजी इंग्लंडला जाण्याचा प्रयत्न करीत होते; नि त्यांच्या कारवाईने काही उपसर्ग पोचू नये; म्हणून डॉ. वरदराजुलू नायडू यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडकडे शिष्टमंडळ धाडण्याचे ठरले. पण राजाजीनी सवलतीची मागणी केली नाही; किंवा त्यांना अनुज्ञा मिळाली नाही; नि म्हणून डॉ. नायडू यांच्या अनुज्ञा-पत्रासाठी आग्रह धरण्यात महत्व उरले नाही. बंगाल, पंजाब, संयुक्त प्रांत वगैरेतील पुढाऱ्यांशी त्याच विषयात विचारविनिमय करण्यात आला होता. पण प्रारंभी बाबाराव खापर्डे प्रभृतींना नकार आल्याने हा प्रश्न तेथेच सोडून देण्यात आला. सरकारने याविषयी विविध कारणे दिली. परंतु महासभेच्या या प्रयत्नांवर काँग्रेस पक्षाने नि सरकारसकट बाहेरच्या सर्वांनी जे आक्षेप घेतले. त्यातला सर्वांत मनोरंजन आक्षेप हा होता, की अशी शिष्टमंडळे बाहेर धाडण्याने ब्रिटिशांच्या परदेशांतील प्रचाराचेच समर्थन होणार आहे. हिंदुस्थानांत मतभेद आहेत. याचेच प्रदर्शन अशाने बाहेर होणार आहे. आपल्या सार्वजनिक जीवनांतील ही घाण बाहेर मांडण्यासारखेच होणार आहे; नि अशाने आपली पत कमी होईल. आपल्या घरांतील घाण चवाठ्यावर आणणे हे केव्हांही वाईटच. परंतु प्रथम हे कोणी केले? हा प्रश्न आहे. क्रिप्स योजना अयशस्वी होताच स्वतः ब्रिटिश वृत्तपत्रे आणि प्रचारखाते, यांनीच जगभर

जाऊन सहस्रावधी जिव्हांनी हिंदुस्थानात भयंकर जातीभेद आहेत, असा प्रचार केला नाही काय? शिवाय आज हिंदुस्थानांत असणारी सहस्रावधी चिनी आणि अमेरिकन माणसे ही स्वतःचे कान आणि डोळे स्वदेशी ठेवून आली आहेत; असे तुम्हास वाटते काय? आणि जर्मन किंवा जपानी काय करीत आहेत?

येथे जातीय भेद आहेत हे सबंध जगाला माहीत आहे, आणि सबंध जगाला हेही माहीत असावयास पाहिजे; नि असेलही, की प्रत्येक राष्ट्राला आपल्या इतिहासांत केव्हा ना केव्हा तरी जातीय मतभेदाच्या अवस्थेतून जावे लागलेले आहे; आणि त्या त्या राष्ट्रांत जातीसाठी वारसांसाठी लढायाही झाल्या.

मूळ प्रश्न आहे; तो असा की, हिंदुस्थानची इच्छा नसतांही मतभेद आहेत; या निमित्ताने जर इंग्लंडला हिंदुस्थानवर गुलामगिरीचा शाप लादता येतो; तर मग, मतभेद असले तरी, स्वातंत्र्याचा वर इंग्लंडने हिंदुस्थानला द्यावयाला हवा. हिंदुस्थानच्या गुलामगिरीचे रक्षण जर इंग्लंड बागनेटांच्या साहाय्याने करीत असेल; तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे रक्षणही इंग्लंडने तसे करावे. नाही तर निदान असे स्वच्छ तरी म्हणावे की, आमच्या मतभेदांमुळे नाही तर इंग्लंडच्या साम्राज्यवादी आकांक्षेसाठी हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याची ब्रिटनची इच्छा नाही. हिंदुमहासभेचे शिष्टमडळ अमेरिकेत गेले असते तर तेथे मतभेद आहेत; ही बातमी काही अमेरिकनांना नव्याने मिळाली नसती; तर हे मतभेद का नि कसे उपस्थित झाले? आणि त्यावर हिंदुमहा-सभेची उपाययोजना काय आहे? हे अमेरिकनांना समजले असते. काळी मेंढी कोणती? आणि तपकिरी लांडगा कोणता? हे त्यामुळे जगाला चांगले समजले असते, असो.

सीमा प्रांतिक हिंदुमहासभेचे अध्यक्ष रायबहादूर मेहरेचंद खन्ना, यांना पॅसिफिक रिलेशन्स कमिटीसाठी, जावयाच्या शिष्टमंडळात सरकारने समाविष्ट केले, हे ठीक झाले. भारतीय शिष्टमंडळ यापूर्वीच कॅनडांत पोचलेही असेल, नि रायबहादूर खन्ना यांना 'पाकिस्तान आणि हिंदूंचा दृषिकोण' या विषयांवर भरपूर प्रसिद्धी मिळालीही असेल.

इंग्लंडमध्ये आणि इतर परदेशांत हिंदुमहा-सभेने त्वरेने आपले स्थान प्रस्थापित केले असून, त्याचे प्रत्यंतर कूपलँड यांनी हिंदुस्थानांतील बारकाईच्या निरीक्षणानंतर प्रदर्शित केलेल्या अभिप्रायांत पहावयास मिळते. त्यांच्या पुस्तकांतील पुढील दोन उतारे पाहा.

१) -आणि त्याहीपेक्षा अधिक निश्चयाने सबंध हिंदुस्थान हिंदूंचा आहे; असे म्हणणारी हिंदुसभा ही हिंदूंची युयुत्सु संघटना आहे. ज्या अजातीयतेला काँग्रेस ही सद्‌गुण समजते; तिचा स्वाभिमानाने दुर्गुण म्हणून त्याग करण्याचे कार्य महासभेच्या पुढाऱ्यांनी अंगीकारले आहे. काँग्रेस ही हिंदूंचा विश्वासघात करणारी संस्था आहे. असे हिंदू पुढाऱ्यांचे म्हणणे आहे. हिंदुमहासभेचे सभासद आणि हिंदी राजकारणांतील तिचे प्रभुत्व, अलिकडे झपाट्याने वाढत आहे. यावरूनच हिंदुस्थानातील जातीयता किती प्रखर स्वरूप धारण करीत आहे हे दिसते.

''हिंदुमहासभेचे धोरण उघड उघड जातीय आहे. तिचे ज्वलज्जहाल अध्यक्ष श्री. सावरकर म्हणतात. ''आमच्या मुसलमान देशबांधवांनीही आपले निर्णय ठरवितांना अटळ अशा गोष्टी हिशोबांत घ्याव्यात असे माझे त्यांना सांगणे आहे... इत्यादी'' (पृष्ठ १६).

२) 'युयुत्सु हिंदुत्व' हे अधिक निर्भिड होते. हिंदुस्थान हे एकराष्ट्र असून अविभाज्य आहे. हे हिंदु-महासभेचे मूलभूत तत्व आहे नि त्यामुळे हिंदुस्थानच्या राजकीय फाळणीचा समावेश या ना त्या स्वरूपाने ज्या योजनेत आहे; अशी कोणतीही योजना तीत सहभागी होऊन किंवा न होऊनही ती संमत करणार नाही कारण असे करण्याने ती स्वतःशीच आणि हिंदुस्थानच्या सर्वोत्तम हितसंबंधाशीही प्रामाणिक राहू शकत नाही, असे महासभेच्या कार्यकारिणीचे मत आहे.''(पृष्ठ ३७).

उपभारतमंत्री ड्यूक ऑफ डेव्हनशायर यांनीही 'अखिल भारतीय स्वरूपाची हिंदूंची दुसरी संस्था' असा महासभेचा उल्लेख केला आहे. काँग्रेसवाल्यांना जर गव्हर्नरांची प्रशस्तिपत्रके दाखविण्यास प्रत्यवाय नसतो; तर मग जाता जाता प्रसंगोपात्त अतरांना आमच्या चळवळीविषयी काय वाटते हे उद्धृत करण्यास आम्हांस तरी कोणता प्रत्यवाय आहे?

दोन वर्षापूर्वीपर्यंत केवळ एकटे मुसलमानच पाकिस्तानचा आग्रह धरीत असत. नि त्यामुळे उत्तर देतांना आम्हाला मात्र त्यांनाच संबोधावे लागे. पण क्रिप्स दौऱ्यापासून, नि काँग्रेसने पाकिस्तानच्या मागणीपुढे शरणागतीचे धोरण पत्करल्यापासून, चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रत्यक्ष हिंदूंतच पाकिस्तानला अनुकूल असणाऱ्या, एका अतिशय वाईट स्वरूपाच्या गटाची निर्मिती झाली असून, कोणत्याही संसर्गजन्य रोगाअतक्या झपाट्याने हा गट हिंदु मनावर त्या विषाचा परिणाम करण्याचा प्रयत्न करीत आहे.

या काँग्रेसवाल्यापैकी काही हिंदू सत्प्रवृत्तीचे आहेत; परंतु त्यांच्यात फसवणुकीने असा समज निर्माण झाला आहे की, मुसलमान प्रांतांना सवता सुभा निर्माण करू देऊन अंतिम स्वरूपाची तडजोड करण्यातच हिंदूंचे हित आहे. याव्यतिरिक्त दुसऱ्या काही मोठ्या व्यक्ती अशा आहेत की, राजकीय मुत्सद्दी म्हणून ते स्वतःला कोणत्याच पक्षाचे मानीत नाहीत तरी पण, त्यांची मते मात्र हिंदूंची म्हणून मानली जातात. अशापैकी काही जणांनी प्रांतिक स्वयंनिर्णयाचे तत्व मान्य करून मोठ्या मुत्सद्दीपणानेच, पण हिंदुत्वाचा घात करण्यास प्रवृत्त व्हावे ही मोठी खेदाची गोष्ट आहे. ते राष्ट्रवादाचे एकनिष्ठ उपासक असताही, त्यांनी हा मार्ग पत्करावा, याचे वाईट वाटते. हे पाकिस्तानवादी हिंदू प्रसंगी सरकारचे दडपण आणूनही आपल्या बांधवांच्या गळ्याखाली पाकिस्तान उतरविण्याचा प्रयत्न कसा करीत आहेत. याचा उत्कृष्ट नमुना राजगोपालाचारींच्या अधिकृत हालचालीवरून दिसून येईल. इतिहासाला ज्ञात असलेल्या कोणत्याही खुळ्यामुलांपेक्षा अधिक प्रामाणिकपणे नि फाजील उत्साही वेडाच्या भरात हा आचार्य स्वतः परिश्रमपूर्वक कष्ट उपशीत आहे.

सद्यःस्थितीत हिंदुस्थानच्या अखंडत्वाला खरा धोका कुणापासून अधिक असेल; तर तो पाकिस्तानवादी मुसलमानांपेक्षा पाकिस्तानवादी हिंदूंकडूनच अधिक आहे. ज्यांचे हिंदुहृदय अद्यापि जागृत आहे; पण ज्यांच्या विचारांवर काँग्रेसची छाप आहे; अशांच्या मनांवर ज्या विचारांचा अधिक पगडा बसल्यासारखा दिसतो; त्यांची मला वैयक्तिक माहिती आहे. त्या विचारांचा परमार्श घेण्यासाठी अशा काही गोष्टींची बुद्धिपुरस्सर मी निवड करीत आहे.

अ) प्रांतिक फेररचना आणि फुटून निघण्याचा प्रांतांचा स्वयंनिर्णयाचा अधिकार यात मूलगामी भेद आहे; हे काळजीपूर्वक ध्यानात ठेवलेच पाहिजे. यापैकी दुसऱ्या घटनेचे स्वरूप काहीही असले तरी त्याची परिणती पाकिस्तानमध्येच होते. कोणत्याही न्याय्य भूमिकेवरून प्रांतांची पुनर्रचना करावयाची असेल; आणि अशा पुनर्रचनेच्या बुडाशी अहिंदूंना किंवा अराष्ट्रीयांना प्रबळ करण्याचा गुप्त हेतु नसेल; तर हिंदुमहासभेचा विरोध होणार नाही. अशी प्रांतरचना भाषावर असो; वा सैनिक वा आर्थिक कारणांसाठी असो; पण तिच्यात हिंदुस्थान दुर्बल करण्याचा हेतु असता उपयोगी नाही. मात्र प्रांतिक स्वयंनिर्णयाच्या नावाखाली प्रांतांना मध्यवर्ती सरकारातून फुटून निघण्याचे तत्व केव्हाही मान्य करता येणार नाही. कारण असे तत्व स्वीकारताच शतक संपण्यापूर्वीच हिंदुस्थान शतशः विदीर्ण झाल्यावाचून राहणार नाही.

आ) दुसरे असे की, असला प्रांतिक स्वयंनिर्णय हा पाकिस्तानच्या मागणीपेक्षाही अधिक घातक आहे. कारण पाकिस्तानमध्ये निदान मुसलमानी बहुमत असणाऱ्या निश्चित भागांनी फुटून निघण्याचीच मागणी आहे; पण वरील तत्वांत तसा निर्बंध नाही. पाकिस्तानी मागणीलासुद्धा आपल्याला शक्य तेवढ्या जोराने प्रतिकार केला पाहिजे. त्यात पुन्हा प्रांतिक स्वयंनिर्णय म्हणजे मध्यवर्ती सरकारवर नित्याची टांगती तलवार धरल्यासारखेच होईल; कोणत्याही प्रांताची लहर लागेल; तेव्हा तो चुटकीसारखा हिंदुस्थानसरकारला धुडकावून लावील. पाकिस्तानच्या मागणीला केवळ मुसलमानांचे बहुमत हीच भूमिका आहे. परंतु त्यासाठी स्वयंनिर्णयाचे तत्व पत्करले; तर कोणताही प्रांत केव्हांही आर्थिक राजकीय किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी मध्यवर्ती सरकारातून फुटून निघण्याची मागणी करील. ही गोष्ट आपण ध्यानात ठेवा की, मध्यवर्ती भारतीय सरकारचा पाया अद्याप, भरभक्कम व्हावयाचा आहे. मध्यवर्ती सरकार हे अद्याप ठिसूळ अशा मातीच्या ढिगाऱ्यावरच उभारलेले आहे.

मुसलमानांचे बहुमत नसले, तरी कोणत्याही प्रांतात केव्हाच कोणच्याही फुटीर प्रवृत्ती, वर डोके काढून मध्यवर्ती सरकारमधून फुटून निघण्याचा आग्रह धरणार नाहीत, अशी निश्चिती आपणास असू शकणार नाही. या पकरणी रशिया अमेरिका इत्यादी अनेक राष्ट्रांच्या इतिहासापासून आपण बोध घ्यावयास हवा. या राष्ट्रांनासुद्धा अशा अवस्थेतून जावे लागलेले आहे.

नि अशा फुटीर प्रवृत्तींचा पुरा नायनाट होण्याइतके, आपले सामर्थ्य मध्यवर्ती सरकारांनी कायम ठेविले तेव्हाच त्या त्या राष्ट्रांतील सध्याची मध्यवर्ती सरकारे नांदू शकली.

जे हिंदू लोक मुसलमानांना वायव्य हिंदुस्थानात स्वतःचे स्वतंत्र स्वायत्त सरकार स्थापू देण्याला सिद्ध होत आहेत. त्यांनी सैनिकीदृष्ट्या प्रस्तुतची शरणागती ही शेवटी आत्मनाश करणारी कशी होईल? याचा विचार करावा. आपल्यातून फुटून निघण्याची नि आपल्यावरच वंशपरंपरा प्रभुत्व गाजविण्याची वृत्ती ज्यांच्यात आहे. अशा लोकांच्या हाती आपल्या सुसंरक्षित अशा सरसीमा स्वेच्छेने दिल्याचे उदाहरण एकतरी जगाच्या इतिहासात आहे काय? आणखी पाकिस्तानच्या मागोमाग पठाणिस्तानाची पावले एकू येत आहेत; हेही ध्यानात ठेवा, जर का या सरसीमांवरील प्रांतांना मध्यवर्ती सरकारातून बाहेर पडू दिले तर थोड्याच अवकाशात टोळीवाल्यांशी एकमत करून हे लोक हिंदुकुशपासून ते थेट सतलजपर्यंत पाठणिस्तानाची स्थापना केल्यावाचून राहणार नाहीत. या सरसीमा म्हणजे, आपल्या पुरातन राष्ट्रीय सरसीमा असून जोपर्यंत आपण त्याच्यावर पाणी सोडणार नाही. तोपर्यंत हिंदुस्थानच्या भवितव्याला विघातक अशा या घटनांचे बीज मुळातच गाडले जाईल; आणि सरसीमांवर पाणी सोडण्याचा विचार तरी का करावयाचा? तर मुसलमान फुटू नयेत म्हणून? पण केवळ दान म्हणून आपण आपल्या सरसीमा मुसलमानांच्या स्वाधीन केल्याने त्यांच्या आकांक्षा लुप्तच होतील, आणखी वृद्धिंगत होणार नाहीत, याची तरी काय निश्चिती आहे? आज दुर्बल असतानासुद्धा जे यादवीचा धाक घालीत आहेत; ते उद्या सरकार म्हणून स्वतंत्र होऊन आपल्या सरसीमांवरील डोंगराळ मुलुखात पाय रोवून संघटित होऊन प्रबळ झाले म्हणजे सरसीमेपासून मागे येणारी आपलीच शक्ती प्रमाणतः कमी होते. म्हणून ज्या एकीने आपले राष्ट्र अधिक धोक्यात पडते, तसली एकी ही खुल्या शत्रुत्वापेक्षाही अधिक मारक असते.

आमचे काही विद्वान हिंदु पंडित सखोल विचारानंतर असे प्रतिपादतात, की मुसलमानांना फुटून निघून, वायव्य सरसीमा भागात आणि बंगाल्यातसुद्धा स्वतंत्र सरकार स्थापू द्या! कारण मागाहून त्यांची आर्थिक स्थिती फार वाईट होईल; नि मग ते आपण होऊन शरण येतील, नि पश्चाताप करतील. परंतु त्या अर्थपंडितांच्या अपेक्षेप्रमाणे आर्थिक दौर्बल्याने केवळ पश्चातापच जन्म पावेल असे नाही. मुसलमानांच्या असंतोषाला भिऊन दिखाऊ एकीच्या निमित्ताने आपण आपल्या मातृभूचे तुकडे होऊ देण्याइतके निर्बल जोपर्यंत आहोत; तोपर्यंत या दारिद्र्यामुळेच हे मुसलमान सरकार हिंदुस्थानवर आणखी आक्रमण करून आपली अडचण दूर करून घेण्यास प्रवृत्त होणार नाही काय? सरसीमेवरील टोळ्यांचा धर्मांधपणा जागृत करून पठाणिस्तानाच्या ध्येयवादाने प्रेरित होऊन हे संघटित सामर्थ्यच अमिराच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानवर स्वारी करण्याचा धाक घालील नि पंजाबपासून दिल्लीपर्यंतचा हिंदू प्रदेश मागेल! सरसीमांवरील टोळ्यांचे

उदाहरण तुमच्यापुढे आहेच; सध्याच ते दरवर्षी हिंदुस्थानात उतरून लुटमार करतात; नि खंडणीदाखल, सामान्यतः हिंदूनाच पळवून नेतात. हे लुटारू पठाण वस्तुतः मुसलमानी धर्मांधतेने ही कृत्ये करीत असताना आमचे काँग्रेसवाले त्यांच्यावर दारिद्र्य आणि वैषयिक उपासमारीचे आवरण घालण्याचा नादानपणा दाखवितात. कितीही लाजिरवाणे असले, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थितीचीच प्रभावी उदाहरणे मी देत आहे. कपोलकल्पित दंतकथांची नव्हेत. जर आज नसणारे असे सामर्थ्य संपादून उद्या हे पठाणिस्तानवाले हिंदू प्रांतावर चालून आले तर, वरील प्रभृतींचे भ्याड हिंदू पुढाऱ्यांचे पथक एकही गोळी न उडविता दिल्लीपर्यंतचा प्रांत त्यांच्या हवाली करून, हिंदू-मुसलमान एकीचा निर्लज्ज देखावा निर्माण करण्यास चुकेल काय? आजचीच सदैव शरणांगतीची नि वाटेल ते देऊन हिंदू मुसलमान एकी साधण्याचीच प्रवृती जोपर्यंत आहे; तोपर्यंत वरील प्रकार घडला नाही; तरच आश्चर्य म्हणावे लागेल! आजसुद्धा पूर्व बंगालमध्ये हे 'दरिद्री' मुसलमान संधी येताच दारिद्र्याचे निमित्त करून पुढे धर्मांधतेने हिंदूंना लुटल्यावाचून आणि सतावल्याविना रहात नाहीत. मग त्यांना एकदा तुम्ही स्वतंत्र राज्य प्रस्थापित करून संघटित होऊ दिलेत, तर उद्या हेच मुसलमान आपली उपासमार टाळण्यासाठी म्हणून पश्चिम बंगालवर स्वाऱ्या करतील. आणि मग तुम्हाला बंगालच्या सधन अशा एखाद्या तुकड्यावर उदक सोडून त्यांचे दारिद्र्य तरी नष्ट केले पाहिजे किंवा त्यांच्या सदैव वाढणाऱ्या भुकेचा प्रतिकार करण्यास तरी सिद्ध झाले पाहिजे. ३) माझे काही पाकिस्तानवादी मित्र हळूच माझ्या कानात असे म्हणतात; की केवळ डाव म्हणून आम्ही आज या मुसलमानांना दूर होऊ देत आहोत. एकदा का ब्रिटिश जाऊन आम्ही स्वतंत्र झालो; म्हणजे इतक्या झपाट्याने उरलेल्या हिंदूंचे संघटन करून सैनिक सामर्थ्य सिद्ध करू की, मुसलमान प्रांत नुसते आमच्या दृष्टीच्या धाकापुढे वचकतील. सध्याचा आमचा केवळ कावा आहे. अशा मित्रांनी मात्र स्वतःला एकच प्रश्न विचारावा की, काय हो, तुम्ही ब्रिटिशांना गणतीतच धरीत नाही की काय? त्यांनी तुम्हाला अशी काय निश्चिती दिली आहे, की तुम्ही पाकिस्तान मान्य करताच ते निघून जातील आणि तुम्हाला हवे तसे हिंदूंचे संघटन करू देतील! आणि घटकाभर तसे झाले; असे गृहित धरले, तरी जोपर्यंत सहस्रावधी हिंदूंवर काँग्रेसच्या मनोवृत्तीचीच छाप आहे. तोपर्यंत तसले प्रबळ हिंदुसंघटन घडवून आणणारी जादूची काडी कोठे आहे? सगळ्या हिंदूंपैकीच आपण एक हिंदू आहोत; असे लक्षात घेऊन एक प्रबळ हिंदू सैनिकी सत्ता निर्माण करण्याचे दृश्य तुम्ही पाहता याविषयी आम्ही तुमचे आभार मानतो.

पण मध्यंतरीच्या काळांत मुसलमान काय स्वस्थ बसतील असे तुम्हास वाटते? तेही आपली सत्ता वाढवून प्रबळ होतील आणि सरसीमेपलीकडील आपल्या जातभाईंशी धागेदोरे जमवून प्रबळ अशा पठाणिस्तानाची आणि पाकिस्तानची सिद्धी होईल.

आणखी एक गोष्ट विसरू नका. त्यांच्या पाकिस्तानात काँग्रेसवृत्तीचा एक माणूस उरणार नाही, मात्र तुमच्या हिंदुस्थानातील प्रत्येक प्रांतात 'मुसलमान अल्पसंख्य' म्हणून राहणार; नि काँग्रेसवाल्या हिंदूंवर सदैव दडपण आणून त्यांना पाकिस्तानवाल्यांपुढे प्रत्येक वेळी शरणागती

पत्करायला लावण्याचा प्रसंग आणणार! हिंदू-मुसलमान एकीच्या 'ढोंगी देशभक्ती'साठी आणि 'भ्रांत स्वातंत्र्या'साठी तुम्हाला हा त्याग करायची पाळी येणारच!

निष्ठावंत हिंदू म्हणून तुम्हाला केव्हा ना केव्हा तरी, मुसलमानांचा प्रतिकार करावाच लागणार आहे. यांची जाणीव असेल; तर मग आज मुसलमान कमी प्रबळ असतानाच त्यांच्या अपमानकारक मागण्या समूळ धुडकावून लावणे; हेच शहाणपणाचे नाही काय?
आज आपण त्या मानाने प्रमाणतः सबल आहोत; नि म्हणूनच शरणागतीची मनोवृत्ती बदलून जर आपण हिंदुसंघटनवादाच्या निश्चित ध्येयवादाचा स्वीकार करून आक्रमणशाली मुसलमानांना त्यांचे योग्य स्थान दाखवून दिले. नि यापेक्षा अधिक काही मिळणार नाही असे आज्ञापिले तर तेच दूरदर्शीपणाचे होणार नाही का?

पाकिस्तानचा प्रश्न म्हणजे आयर्लंडमधील अल्स्टरची अवस्था आहे; असे आमच्यापैकी काही पंडितांना वाटते. पण ह्या दोन घटनांची तुलना करण्यातच, त्यांची गंभीर स्वरूपाची चूक होत आहे. अल्स्टर म्हणून एक कोपरा बाजूला काढावयाचा एवढेच तेथील स्वरूप होते. उलट, पाकिस्तानच्या मागणीने, हिंदुस्थानात अनेक मुसलमानी सरकारे निर्माण करून मध्यवर्ती हिंदुस्थान सरकारच नष्ट करण्याचा व्यूह आहे की! प्रांतिक स्वयंनिर्णयाचा प्रश्न तर, आयरिश वाटाघाटीच्या वेळी मुळी निघालाच नव्हता! असले तत्व आयरिश लोकांनी मान्य केले असते; तर आजचे एकसंध आयर्लंड दिसलेच नसते. हे प्रांतिक स्वयंनिर्णयाचे तत्व जर हिंदू पत्करतील; तर राष्ट्रीय ऐक्य किंवा सुसंगतता यांच्या नरडीला नख लागलेच म्हणून समजा!'

ए) या पाकिस्तानवाल्या हिंदूंच्या विचारांची साखळी पुढीलप्रमाणे जुळलेली दिसते- ''आम्हाला स्वराज्य हवे आहे; हिंदू नि मुसलमान यांनी एकमुखाने घटना सिद्ध केल्यावाचून, नि त्यांची एकमुखी मागणी आल्याविना, इंग्लंड स्वराज्याचा वर देण्यास सिद्ध नाही. हिंदुस्थानचे अखंडत्व धुळीला मिळवून, पाकिस्तान सरकाराची प्रस्थापना करण्याचे मान्य केल्यावाचून मुसलमान एकमुखी मागणीचा विचार करण्यास सिद्ध नाहीत; असे त्यानी स्पष्टपणे सांगितले आहेच; म्हणून आपण मुसलमानांचे समाधान केले पाहिजे. त्यांच्या पाकिस्तानी मागणीपुढे नमले पाहिजे नि स्वराज्य मिळविले पाहिजे.

''या विचारसरणीतील प्रत्येक दुवा चुकीचा आहे नि ती सगळी विचारसरणी मूर्खपणाच्या आशेवर आधारलेली आहे. आपल्याला जरी स्वराज्य हवे आहे; तरी ते स्वराज्य हिंदुस्थानी स्वराज्य असावयास पाहिजे; म्हणजे त्यांच्यात हिंदू-मुसलमान आणि इतर सर्व नागरिकांना सारखेच उत्तरदायित्व, सारखीच कर्तव्ये आणि समान अधिकार असले पाहिजेत. असल्या स्वराज्यात कोणत्याही एखाद्या जातीने, धार्मिक कारणासाठी फुटून निघण्याचा विचार मांडला असता तर तो केव्हांही सहन केला गेला नसता नि असली आक्रमक मागणी करणे म्हणजे

विश्वासघात आहे; असे म्हणून ती मुळातच दडपून टाकली गेली असती. दुसरे हिंदुस्थानातून निघून जाण्यासाठी इंग्रज हे जणु काय अशा एकमुखी मागणीची वाटच पहात बसले आहेत; नि तो कागद त्यांच्या स्वाधीन करताच, ते एकदम निघून का जाणार आहेत? मी पुनः एकदा ठासून सांगतो की, कॉंग्रेस हिंदुसभा आणि लीग या सर्वांनी देशातील कोट्यवधी स्वाक्षऱ्या घेऊन, एकमुखी मागणी केली म्हणून काही केवळ ब्रिटन स्वातंत्र्य देणार नाही. कॉंग्रेस नि लीग यांनी एक होऊन जगातील कशाचीही मागणी केली; तरी मग ती पुरी झालीच पाहिजे. या भ्रांत समजुतीमुळेच लीगला अवास्तव भाव आलेला आहे.

हा भाव आता प्रमाणाबाहेर वाढलेला आहे. लीग कॉंग्रेसला मिळाली एवढेच नाही; तर सबंध हिंदुस्थान उठून इंग्लंडमध्ये जाऊन स्वातंत्र्याची एकमुखी मागणी करू लागला; तरी इंग्लंड म्हणेलः ''धन्य धन्य! बाळांनो! तुम्ही फार शहाणे आहात. हिंदु-मुसलमान सर्वांनी तुम्ही एकजुटीने स्वातंत्र्याची मागणी केलीत खरी! परंतु तुम्ही सगळेच अद्याप निराधार निशःस्त्र आणि आत्म-संरक्षणास, असमर्थ आहात; नि त्यामुळे परकीय आक्रमण नि अंतर्गत अराजकता यापासून तुमचे रक्षण करण्यासाठी ब्रिटनला तुमच्यावर राज्य केलेच पाहिजे.'' थोडक्यात म्हणजे जी गोष्ट तुम्हाला मिळावयाची नाही, हे उघड डोळ्यांनी दिसत असताही, तुम्ही त्या गोष्टीसाठी भयंकर मूल्य देऊन टाकण्याचा सौदा केलात आणि मूल्य कोणचे? तर मातृभू नि पुण्यभूचे विच्छेदन! आध्यात्मिक सांस्कृतिक नि सर्वतोपरी महत्वाचे म्हणजे राजकीय पुनरुत्थानावर पाणी सोडून पुनः समर्थ होण्याचा संभवही तुम्ही अशाने कमी करणार!

वादाकरिता म्हणून आणखी असेही धरून चालू की, अन्ततोगत्वा संस्कृति स्वाभिमान आणि भवितव्य यांचे इतके भयंकर मूल्य देऊन एखादे स्वराज्य तुमच्या पदरात पडलेच, तर ते मुसलमानांच्या अटींवर पडावयाचे; आणि मग त्याचे स्वरूप काय राहील? हिंदूंच्या हिंदुत्वाचे रक्षण ज्यात होणार नाही; असे मी वर दाखवून दिलेले आहे; त्या प्रकारचे ते स्वराज्य होईल. प्रांतिक स्वयंनिर्णयाच्या तत्वाला मान्यता देऊन मिळणारे कोणतेही स्वातंत्र्य हे ज्वालामुखीच्या तोंडावर बांधलेल्या घराअतपतच शाश्वत स्वरूपाचे राहील; हे सांगणे नलगे!

व्हाईसरॉयनी कलकत्ता येथील भाषणात हिंदुस्थानच्या भौगोलिक अखंडत्वावर जो भर दिला, नि व्यावहारिक राजकारणाच्या दृष्टीने राजकीय ऐक्य रक्षणाचा जो आग्रह प्रतिपादिला; त्याविषयी मला बरे वाटते. अल्पसंख्यांना योग्य ती संरक्षणे द्यावयास हवीत; नि राष्ट्रसंघाने एका सुप्रसिद्ध पत्रकात या बंधनाचे स्वरूप काय असावे; हे स्पष्टपणे सांगितले आहे. परंतु संरक्षक बंधनाविषयी, व्हाईसरॉयनी न कळत; एक चुकीचे विशेषण लावले आहे. न्याय्य अशी संरक्षक बंधने न म्हणता, अल्पसंख्याकांना पूर्ण समाधानकारक वाटतील; असे विशेषण त्यांनी लावले. रास्त अशी बंधनांची निश्चिती देण्यास हिंदुमहासभा केव्हाही सिद्ध आहे. नि पार्शी ज्यू ख्रिश्चन इत्यादी अल्पसंख्य ह्या न्याय्य संरक्षक बंधनांवर संतुष्ट आहेत. वास्तविक प्रश्न आहे; तो केवळ मुसलमान अल्पसंख्यांकांचा; आणि या मुसलमानांचेही 'संपूर्ण समाधान करणारी संरक्षक बंधने'

असा शब्दप्रयोग केल्याने व्हाईसरायच्या भाषणातील सर्व स्वारस्य गेले आहे. कारण मुसलमानांचे समाधान देशाच्या अखंडत्वावर कुऱ्हाड घातल्यावाचून होणार नाही; हे त्यांनी स्पष्ट केले आहे. आणि त्यांचे समाधान करून अखंडत्व टिकविण्याची भाषा करणे निरर्थकच आहे. अशा पकारे आपणास चक्रव्यूहात घातल्या-सारखेच आहे. आपल्या मुली मोठ्या होऊन नंतर त्यांनी आपल्या शीलाला कमीपणा आणू नये; म्हणून जन्मतः त्यांचा घात करण्याची रुढी कोण्याएका जातीत आहे. तद्वतच हिंदुस्थानचे राष्ट्रीयदृष्ट्या अखंडत्व टिकविण्यासाठी मुसलमानांचे समाधान करण्याकरिता हिंदुस्थानची फाळणी करण्याचा उपाय योजावयाचा असा हा प्रकार आहे.

म्हणून इतक्या विवेचनानंतर जे कोणी मोकळ्या मनाचे असतील त्यांच्या ही गोष्ट ध्यानात येईल की प्रांतिक स्वयंनिर्णय किंवा पाकिस्तान मान्य करण्यान हिंदु मुसलमान एकी तर होणार नाहीच; आणि हिंदूना मात्र अधिक संकटात टाकल्यासारखे होईल; ही अथवा ती सवलत दिली; म्हणजे नित्याची हिंदू-मुसलमान एकी होईल; ही नादानपणाची आशा आहे; नि जोपर्यंत तुमची शरणागतीची वृत्ती तशीच चालू आहे; तोपर्यंत हिंदुस्थानावरील आपली आक्रमण करण्याची आकांक्षा कमी करण्याइतके मुसलमान नक्की मूर्ख नाहीत. काफिरिस्थानवर आक्रमण करणे हा त्यांच्या अन्नाचा गुण आहे; नि पूर्वीच्या स्वाऱ्यांपासून किंवा आक्रमणापासून आपल्या प्रतिपक्षापेक्षा आपलीच हानि अधिक होईल, असे जोपर्यंत त्यांना वाटत नाही. तोपर्यंत त्यांच्या या वृत्तीला आळा बसणार नाही.

आपल्या पुढाऱ्यांच्या सभेत, आपणास भेट करण्यात आलेली तलवार फिरवीत जे बॅ. जीना हिंदूंना शिकंदरी थाटाच्या धमक्या देत असतात ते इंग्रजांना कधी सशस्त्र बंडाच्या धमकावण्या देत नाहीत; यातील गुपित हेच आहे. कारण त्याचे परिणाम तत्काळ फार भयंकर होतील हे ते जाणतात.

वस्तुतः इंग्रज आज मोंगलांच्या गादीवरच बसले असून त्यांनी सबंध हिंदुस्थानात मोंगली साम्राज्याचा एकही अवशेष राहू दिला नाही; असे असता बॅ जिना त्यांना धमकावीत नाहीत यातीलही अंगित तेच आहे.

हिंदुस्थानचे तुकडे पाडण्याच्या मुसलमानांच्या प्रयत्नांचे परिणाम फार भयंकर होतील; हे बजाविण्याचे साहस, कोणती संघटित संस्था करीत असेल, तर ती एक हिदुमहासभाच होय. हिंदूंच्या आशा आणि भवितव्य यांचे आश्रयस्थान म्हणजे आता हिंदू महासभा हीच उरली आहे. असंख्य अवसानघातकी हिंदूंच्या मेळाव्यात पवित्र हिंदुध्वजाच्या मानरक्षणाचा भार, हिंदुसभावाद्यांनो! नि हिंदुसंघटनवाद्यांनो! तुमच्या खांद्यावर आलेला आहे. चितोड येथे आणीबाणीच्या वेळी आपल्या पूर्वजांनी ज्या चिकाटीने आणि धैर्याने हिंदुध्वजाचे रक्षण केले, तेच कार्य करण्याचे उत्तरदायित्व हिंदुसभेच्या सैन्यावर आहे. तुम्ही हिंदु-संघटनवाद्यांनीही जर विश्वासघात केला नाहीत; तर हा विश्वास बाळगा; की, समीपच्या काळात चितोडच्या हौतात्म्याकडून आपण रायगडच्या विजयाकडे पोहोचू म्हणून हिंदुजगताच्या वतीने छातीठोकपणे

असे म्हणा, की- ''अमेरिका, जर्मनी, चीन किवा कोणत्याही राष्ट्रांतल्याप्रमाणेच हिंदुस्थानात हिंदु हेच राष्ट्र आहेत; आणि अतरांप्रमाणेच मुसलमान हे अल्पसंख्य आहेत. म्हणून ज्या संरक्षक बंधनांवर इतर अल्पसंख्यांकांचे समाधान आहे; तीच बंधने पत्करून राष्ट्रसंघाने दिलेल्या योजनेत सोयीप्रमाणे कमीजास्त करून दिलेली बंधने पत्करूनच मुसलमानांनी नांदले पाहिजे. मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारांत येण्यासाठीच कोणत्याही जमातीला हिंदुस्थानच्या अखंडत्वाला बाध आणणारी अट घालता येणार नाही. कोणत्याही प्रांताला स्वेच्छेने मध्यवर्ती हिंदुस्थान सरकारांतून फुटून निघण्याचा अधिकार नाही. हिंदुस्थानला राष्ट्र या नात्याने स्वयंनिर्णयाचा अधिकार आहे; पण एखाद्या प्रांताला जिल्हयाला किंवा तालुक्याला स्वयंनिर्णयावर बोट ठेवून फुटून निघण्याचा अधिकार नाही.

'माणशी मत' हे सर्वसामान्य तत्व हिंदुस्थानांतील प्रत्येक नागरिकाला लावता येईल आणि फार तर एक पाऊल पुढे जाऊन लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व इतकेच काय ते मुसलमानांची आवड म्हणून मान्य केले जाईल. आम्हांला ही गोष्ट ठाऊक आहे; की, पार्शी ख्रिश्चन किंवा इतर अल्पसंख्य जमातींचा एकात्मक अखंड आणि अविभाज्य हिंदुस्थान राष्ट्राला पाठिंबा असून रास्त संरक्षक बंधने घेऊन ते हिंदूंच्या खांद्याला खांदा लावून भारतीय स्वातंत्र्यासाठी, प्रयत्न करण्यास सिद्ध आहेत. मुसलमानांनी स्वतःच्या हिताच्या दृष्टीने हीच भूमिका पत्करावी. पण जर कॉंग्रेसची मिथ्या राष्ट्रवादाची भूमिका हीच सकल हिंदूंची भूमिका आहे; अशी समजूत करून घेऊन मुसलमान आपल्या पाकिस्तानच्या किंवा प्रांतिक स्वयंनिर्णयाच्या अपमानकारक नि विश्वासघातकी मागणीचा आग्रह चालू ठेवतील; तर तर तुम्ही हिंदुसंघटनवाद्यांनी हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर जाऊन आपली घोषणा गगनभेदी स्वरांत गर्जावीः-

**''याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्यावाचून आणि विरोधाल तर तुम्हाला न जुमानता, तुमची तमा न बाळगता; प्रतिकार करून आम्ही आमच्या पितृभूला हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठी आणि एकात्म अखंडत्व टिकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत संघर्ष करीत राहू.''**

निग्रोस्तानाची एखादी चळवळ ज्याप्रमाणे अमेरिका दडपून टाकील त्याचप्रमाणे हिंदुस्थानच्या फाळणीची कोणतीही चळवळ तशीच विश्वासघातकी म्हणून निष्ठुरपणे दडपली जाईल; नि सिंधूपासून सागरापर्यंत हिंदुस्थानचे अखंडत्व एकात्मता आणि तज्जन्य सामर्थ्य स्थिर राखले जाईल; असा निर्धार हिंदूंनी प्रकट केला पाहिजे.

सर्व सिद्धांत हे सर्वसामान्य निरीक्षणावरच आधारलेले असतात. हिंदूंच्या इतिहासाचा शतकानुशतकांचा अभ्यास केला; म्हणजे असेच प्रत्ययाला येते; की हिंदुराष्ट्रांत पुनरुज्जीवनाचे चमत्कृतिपूर्ण असे सामर्थ्य साठविलेले आहे. अहिंदूच्या प्रयत्नांची पराकाष्ठा होऊन हिंदुराष्ट्र नष्ट होण्याचा क्षण आला आहे; असा आभास जेव्हा जेव्हा होतो तेव्हा नेमका त्याच क्षणी प्रबळ अशा

हिंदुराष्ट्राचा पुनर्जन्म होतो. हिंदूंचे पुनरुत्थान होते. पुराणांतला आधार द्यावयाचा तर असा देता येईल; की अगदी अंधाऱ्या रात्री श्रीकृष्णाचा जन्म झाला अवतारच जन्मला; हेच सूत्र नेमके हिंदुराष्ट्राच्या जीवनांत दिसून येते. इतर राष्ट्रांपेक्षा हिंदू राष्ट्रांत विशेष काही असेल तर हेच आहे आणि याच अजिंक्य आत्मिक सामर्थ्यांच्या बळावर भोंवती, अहिंदु प्रवृत्तींचा जोर झाला असतांही हिंदुराष्ट्राने टिकाव धरला. मी काही केवळ निराधार गोष्टी सांगत नाही. पुराणेच काय पण हूण शकांचा काळ सोडून, आपण अगदी मुसलमानांच्या काळात आलो; तरी आपणास हेच सूत्र दिसेल; विश्वसनीय हिंदू इतिहासातून हाच निष्कर्ष निघेल.

मुसलमान विजेते म्हणून येथे आले; पण येथे फार काळ काढण्यापूर्वीच सहस्रावधी रणक्षेत्रात त्यांना हिंदूंनी धूळ चारली आणि मोंगल साम्राज्याचा दीपस्तंभ एखाद्या डोलाऱ्यासारखा कोलमडला. हिंदूंचे विजयी घोडे अटकेपासून रामेश्वरापर्यंत नि द्वारकेपासून जगन्नाथा-पर्यंत निर्वेधपणे चौखूर दौडत होते. हे ऐतिहासिक सत्य समजून घेण्यासाठी पुढील दोन चित्रे पहा.
सन १६०० चे हिंदुस्थानचे मानचित्र-नकाशा घ्या; सबंध हिंदुस्थानवर मुसलमान राज्य करीत होते, सबंध हिंदुस्थान नष्ट होऊन एखाद दुसऱ्याच नव्हे तर सगळ्याच प्रांतात पाकिस्तान प्रत्यक्षपणे स्थापित झाले होते.

नंतर आता १७०० ते १७९८ पर्यंतचे हिंदुस्थानचे मानचित्र पहा! आता तुम्हाला काय दिसेल? सर्व हिंदुस्थानभर हिंदू सैन्ये संचरत आहेत. मराठ्यांचा सेनानी सदाशिवरावभाऊ ह्याने त्या दिल्लीच्या तख्ताची हातोड्याने अक्षरशः शकले केलेली आहेत. शेवटी हिंदु-शीख भ्रातृभावाने पंजाबही मुसलमानांच्या कचाट्यातून सोडविला गेला; नि तिबेटपासून काबूलच्या तीरापर्यंत हिंदूंचे राज्य झाले. नेपाळात हिंदू गुरख्यांचे राज्य आहे. मराठ्यांनी दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत प्रत्येक राजधानीत विजयी हिंदू ध्वज रोविला. मुसलमानांनी प्रत्यक्षात प्रस्थापिलेले पाकिस्तान गाडले गेले, आणि हिंदुस्थानचा पुनर्जन्म झाला. हिंदूंचे पुनरुत्थान झाले. विजयी मुसलमानांनी या पुनरुत्थानाची इतकी हाय खाल्ली, की आजसुद्धा हिंदुस्थानांत बहुसंख्य असणाऱ्या हिंदूंची एकजूट झाली तर आपले कसे होईल त्याविषयी त्यांना कापरे भरते.

या ऐतिहासिक सत्याचे महत्व मुसलमान ध्यानात घेतील; तर ते त्यांनाच हितप्रद होईल. सबंध हिंदुस्थानचे जिवंत नि सशक्त अशा पाकिस्तानात रूपांतर केल्यानंतरसुद्धा, दुर्दैवाने त्यांना जे दिवस दाखविले; त्याची आठवण त्यांनी बुजू देऊ नये. आजच्या परिस्थितीत पाकिस्तानच्या स्वप्नासंबंधातील आग्रह ते बेताल, बेफाम, हिंसक बनून हेकेखोरपणे पुढे रेटू पाहतील तर, ते ऐतिहासिक सत्यच काय ते त्यांच्यापुढे वाढून ठेवलेले असेल; त्या भयावह दुःखद भवितव्या-संबंधी सूचीत करीत आहे. एक भग्न आशाच काय ती! हवेतील मनोरा!

हिंदुमहासभावाद्यांनी ही गोष्ट ध्यानात ठेवावी की, पाकिस्तानच्या सिद्धीसाठी मुसलमान ज्या बंडांचा धाक घालीत आहेत; त्या बंडाचा अर्थ काहीही असला तरी पाकिस्तानच्या

प्रस्थापनेच्या कोणत्याही प्रयत्नाला विरोधण्याचा नि प्रतिकाराचा सर्व भार आणि यशापयशाचे सर्व श्रेय हे त्यांना घ्यावे लागणार आहे.

काँग्रेसवाले - भ्रांत राष्ट्रवादाचे पाठीराखे हिंदू-हिंदू म्हणून मुसलमानांना शरण जातील नि नुसते तटस्थच राहणार नाहीत असे नाही; तर तुमच्याविरुद्ध झुंजतीलही, हे तुम्ही विसरता कामा नये. म्हणून हिंदुस्थानच्या अखंडत्वाची ही झुंज झुंजण्यासाठी तुम्ही हिंदुत्वनिष्ठांनी आपल्या सर्व सामर्थ्याचा संचय केला पाहिजे. तुम्ही आपल्यातील ती निष्ठा यत्किंचितही कमी होऊ देता उपयोगी नाही. हिंदुस्थानची फाळणी होऊन मिळणाऱ्या स्वराज्यांत काहीच अर्थ नाही.

ब्रिटिशांचे राज्य ज्याप्रमाणे आपणावर लादण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे हे फाळणीचे स्वराज्य  कदाचित आपणांवर लादण्यात येईल. पण लादलेले आहे; म्हणून काही इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न ज्याप्रमाणे आपणास सोडावा लागला नाही; त्याचप्रमाणे आपण होऊन जर अलीकडे पावसाळी छत्र्यांप्रमाणे उगवणाऱ्या विविध योजनांपैकी एखादीच्या आहारी गेलो नाही, तर पितृभूचे स्वातंत्र्य आणि अखंडत्व या दोन्ही मागण्यासाठी आपण झुंजू; इतकेच नाही; तर स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर आपण त्या सिद्धही करून घेऊ; असा विश्वास ठेवा.

अर्थात, या सर्व दुय्यम चळवळी जागतिक युद्धाच्या उपांगासारख्या आहेत, आणि त्या मुख्य प्रश्नाविषयी बोलावयाचे तर असे म्हणता येईल की मित्रराष्ट्रे किंवा संयुक्त राष्ट्रे यापैकी कोणाही एकाच्या पक्षाला निर्विवाद श्रेष्ठत्व अद्याप प्राप्त झालेले नाही. म्हणून आपल्या हिंदुराष्ट्रासारख्या परिस्थितीत जी जी राष्ट्रे आहेत त्यांचे धोरण असेच असले पाहिजे; की, डोळ्यात तेल घालून साकल्याने चांगली परिपूर्ण माहिती मिळवीत, सुसंघटित होऊन काठावर बसून रहावे नि लढाईचा निर्णय काय होतो, हे पहात जे काय होईल त्याचा जितका म्हणून अधिक लाभ आपल्या राष्ट्राला उठविता येईल; तितका तो उठविण्याच्या दृष्टीने व्यवहारचातुर्यानिशी आपण सिद्ध असावे.

युद्धाची परिस्थिती अशा पकारे अनिश्चित आहे. पाकिस्तानी चळवळीला एकट्याने प्रतिकार करण्याचा प्रसंग केव्हा ओढवेल; याचा नेम नाही. मी केवळ स्वतःच्या बळावर या जागतिक युद्धात प्रविष्ट होऊन स्वतःचे स्वातंत्र्य मिळविण्याची आपली शक्ती नाही. ही वस्तुस्थिती कितीही खेदजनक असली; तरी आहे; म्हणून अशा परिस्थितीत हिंदुसंघटनवाद्यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय न घेता पुढील धोरण ठेविले तर तेच दूरदर्शीपणाचे असे ठरेल.

हिंदूंचे सैनिकीकरण आणखी शतपट जोराने करावे. त्यासाठी, सैन्य, नौदल विमानदल, दारूगोळ्यांच्या कार्यशाळांची निर्मिती इत्यादींमध्ये हिंदू युवकांनी अधिकांत अधिक प्रमाणात प्रविष्ट व्हावे. ही चळवळ आता इतकी फलद्रूप झाली आहे, की तिच्या समर्थनार्थ नव्याने, आणखी काही म्हणणे हे अनावश्यक आहे. युद्ध चालू झाले; तेव्हा सैन्यात मुसलमानांचे प्रमाण शेकडा ६२ इतके घातुक पद्धतीने वाढले होते. गांधी शिकवणुकीचा हा सर्व परिणाम होता. सैनिक म्हणजे

सैतान आणि सूत काढणारा म्हणजे खरा आध्यात्मिक सैनिक नि तो आपल्या बळानेच सगळ्या हिटलर, स्टालिन, चर्चिल, टोजो यांचे मतपरिवर्तन करणार ही त्यांची शिकवण; पण युद्धाने सैन्य, आरमार, कारखाने इत्यादींची द्वारे खुली करणे इंग्रजांना भाग पाडले आहे; हे पाहताच हिंदुमहासभेने हिंदूंमधील सैनिक बाण्याला आवाहन दिले; नि सैन्याच्या विविध शाखांत सहस्रावधी हिंदूचा भरणा केला. याचा परिणाम अतका झाला; की मुसलमानांचे प्रमाण ६२ टक्क्यावरून ३२ टक्क्यावर गेले. हे प्रमाण २५ टक्क्यापर्यंत आणखी खाली जावयास हवे.

कारण हिंदुस्थानात मुसलमानांचे लोकसंख्येचे प्रमाणच तितके आहे. सर्व शूर आणि एकनिष्ठ हिंदूंना सैन्यात घाडण्यासाठी सर्व ठिकाणच्या हिंदुसभांनी सैनिकीकरण-समित्या स्थापन केल्या पाहिजेत. या पकरणी कोणास आदर्श पहावयाचा असेल तर त्यांनी पुण्यातील सैनिकीकरण समितीच्या कार्याचा अभ्यास करावा. त्या शाखेचे कार्य हिंदुमहासभावादी पुढारी माननीय ल. ब. भोपटकर यांच्या मार्गदर्शकत्वाखाली चालू आहे. या समितीतून शेकडो हिंदू तरुणांनी व्हाईसरॉय नि किंग्ज कमिशने मिळविली असून आज हे हिंदू युवक अनेक रणक्षेत्रांत ज्ञान संपादन करून यशस्वीपणे नेतृत्व करीत आहेत. विमानदलाच्या संबंधीही तसेच म्हणता येण्याजोगे आहे. युद्धानंतरही हिंदुत्वाला जर सगळ्यात जास्त उपयोग कोणाचा होणार असेल; तर त्या सैनिकीकरणाच्या चळवळीचा होणार आहे; ही खूणगाठ बांधून ठेवा आज सैन्यांत नौदलात किंवा विमानदलांत गेलेल्या प्रत्येक हिंदू सैनिक नि अधिकाऱ्यांना माझे असे आश्वासन आहे; की ते आज भागलपूरच्या कारागृहात जाणाऱ्यापेक्षा अधिक नसली; तरी निदान तितकी तरी देशभक्ती निश्चितच करीत आहेत. आणखी असे की, जोपर्यंत ब्रिटिश सैन्य हे समरांगणात टिकलेले आहे; तोपर्यंत स्वतःच्या घरादाराच्या रक्षणाचे दृष्टीने निदान त्यांच्याशी सहकार्य करणे आवश्यकच आहे.

स्थानिक स्वराज्य विधिमंडळे संरक्षण समित्या मंत्रिमंडळे किंवा शक्य ती ती सत्ताकेंद्रे हस्तगत करण्याचे कार्य हिंदूंनी पुढे चालू ठेवावे. सत्ताकेंद्रांवर असणारी माणसे, ही हिंदुमहासभेचे वतीने निवडून आलेली किंवा हिंदुमहासभेने पाठिंबा दिलेली स्वतंत्र अशी माणसे असली पाहिजेत; आणि काय वाटेत ते झाले तरी हिंदूंना आपले प्रतिनिधित्व मिथ्या राष्ट्रवादाच्या अनुयायी असणाऱ्या हिंदुहितघातकी हिंदूंच्या हाती जाऊ देऊ नये. कारण हा माणूस मुसलमानी अतिक्रमणापासून हिंदुहितांचे रक्षण करण्याऐवजी हिंदूंच्या अधिकारांचा विश्वासघात करण्यातच भूषण मानीत असतो.

उच्चरवाने घोषणा घुमविण्याच्या मागे लागून तुम्ही आपला उत्साह नि सामर्थ्य व्यर्थ घालवू नका; आणि हिंदुसंघटक दलांना कोणत्याही अवेळी केलल्या व्यवहारशून्य चळवळीत अडकवू नका. कारण अशा चळवळीतील उच्चरवात घुमविलेल्या घोषणांनी अंतिमतः लाभापेक्षा हानीच संभवते. लक्षात ठेवा, घोषणांना नव्हे, तर सामर्थ्याला महत्व असते. युद्धज्वरग्रस्ततेत,

मात्र, शस्त्रेच केवळ बोलतात; आणि आज्ञा देत असतात; तेथे कितीही उच्चस्वरात का होईना, घुमविलेल्या घोषणा नव्हेत!

जेव्हा जेव्हा हिंदूंच्या अस्मितेची सहेतुक बुद्धिपुरस्सर मानखंडना केली जाते किंवा स्थानिक अत्याचाऱ्यांकडून हिंसक आक्रमक हल्ले चढविले जातात; किंवा कोणत्याही न्यायोचित गाऱ्हाण्यांची न्याय मिळवून तड लावावयाची असते किंवा हिंदूविरोधी दंग्यांना धैर्याने तोंड द्यावयाचे असते; तेव्हा तेव्हा अशा प्रकारच्या व्यापक प्रश्नांवर हिंदूंच्या नागरी अधिकारांच्या रक्षणार्थ केवळ, आपणास झुंजच घेतली पाहिजे. कारण हे आपण करू शकतो. जसे आपण ह्या आधीही येणाऱ्या नि जाणाऱ्या प्रत्येक वर्षांत हे करीत आलेलेच आहोत. ज्या अखिल हिंदुस्थानव्यापी प्रश्नांवर आपल्यापेक्षा सापेक्षतः (संख्येने नि बलाने) कितीतरी मोठ्या प्रचंड शस्त्राचारी अत्याचारी शक्तींविरुद्ध झुंज घेऊन त्या प्रश्नांची तड, नेटाने प्रयत्नपूर्वक लावणे, हे आपल्या कुवतीच्या शक्तीसामर्थ्यांच्या पलीकडेच आहे; कारण, आपण जे काही जाणू शकतो; ते केवळ असंघटित आणि निःशस्त्र! तेव्हा, अगदी आत्ताच असे प्रश्न आपण घेऊ नयेत. काळवेळ आणि व्यूहरचना ह्यांच्या आवश्यकतेपोटी आपण बऱ्यापैकी सुस्थितीत येईपर्यंत ते प्रश्न सोडलेलेच बरे!

कोणत्याही कसल्याही निकडीच्या प्रसंगी आपली सेना उपयोगी पडावी; म्हणून नि ती त्यासाठी सज्ज ठेवता यावी; म्हणून मध्यंतरीच्या काळात आपली हिंदुमहासभेची संघटना, जितकी म्हणून सबळ नि सशक्त बनविता येणे शक्य आहे; तितकी तशी ती बनविण्यासाठी आपण विधायक कार्ये चालूच ठेवावयास हवीत; जे विधायक कार्यक्रम युद्धकाळातसुद्धा सहजी पार पाडता येऊ शकतात; अशा कार्यांचे अवमूल्यन करावयास लावणारे, कमी लेखावयास लावणारे, सर्व-साधारण सामान्य आणि आत्मघातकी आत्महितनाशक दोष आपण तत्काळ सुधारलेच पाहिजेत. आपण अगदी सर्वाधिक तीव्रतेने जितके म्हणून अधिक सभासद नोंदविता येतील; तितके ते नोंदविण्याकडे जितक्या म्हणून अधिक शाखा तालुक्यांपासून खाली ग्रामपातळीपर्यंत ठिकठिकाणी काढता येतील; तितक्या काढून त्या सुसंघटित नि क्रियाशील ठेवण्याकडे युद्धकाळाचासुद्धा विनियोग केलाच पाहिजे. नि हे हिंदुमहासभेचे कर्तव्यच आहे. अगदी आत्तासुद्धा ती शंभरपट गतीने नि चपळाईने ते करू शकते.

अस्पृश्यता निवारणाचे कार्य हे जितके सुलभ आहे, तितकेच ते हिंदुसंघटनेचे सामर्थ्य वाढविणारेही आहे हे विसरू नका. पाच वर्षांच्या अवधीत, जर आपण अस्पृश्यता साफ धुवून काढली. नि आर्थिक नि सामाजिक दृष्ट्या आपल्याच काही धर्मबंधूंना ज्या अडचणी सहन कराव्या लागतात; त्या नष्ट केल्या तर, रणक्षेत्रातील विजयाइतकीच ती गोष्ट महत्वाची आहे असा विश्वास ठेवा. वरवर अशक्य वाटणारी ही गोष्ट मनःप्रवृत्तीतील बदलाने सहजसाध्य होण्याजोगी आहे. जर प्रत्येक हिंदुसभावाला असे म्हणेल की माझ्या कोणत्याही धर्मबंधूला तो केवळ एका विशिष्ट जातीत जन्मला; म्हणून अस्पृश्य मानणार नाही. तर पैचाही व्यय न येता हा प्रश्न

सुटण्यासारखा आहे; नि अशाने आणखी तीन कोटी हिंदुबंधु हिंदु-ध्वजाच्या मानरक्षणासाठी आपल्या खांद्याला खांदा लावून लढतील.

जोपर्यंत चालू महायुद्धाने कोणतेही निर्णायक स्वरूप धारण केलेले नाही तोपर्यंत किंवा आपल्या पितृभूशी संबंधित अशी कोणतीही क्रांतीकारक यौद्धिक घटना घडून आलेली नाही. तोपर्यंतच सर्वाधिक लाभदायक नि व्यवहार-चातुर्याधिष्ठित कार्यक्रमाची आखणी हिदुमहासभावादी आणि हिंदुसंघटक करू शकतील ती त्यांनी अवश्य केलीच पाहिजे.

''सध्याच्या युद्धात ब्रिटन यशस्वी होऊन हिंदुस्थानचे सार्वभौमत्व त्यांच्याच हाती राहील. अशा भूमिकेवरच सध्याचे आपले सर्व कार्यक्रम आधारलेले आहेत; हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. या भूमिकेला धक्का देईल'', असे अद्याप काही घडलेले नाही. पण हिंदुस्थानच्या पूर्व सरसीमेवर, जपानी सैन्य अद्याप खडे आहे; नि जे अद्याप म्हणण्याइतके मागे सरकलेले नाही. शिवाय मित्र राष्ट्रांभोवती सध्या असंतुष्ट राष्ट्रांचा अतका मोठा जमाव आहे की, त्यामुळे कोणीही आशावादी मुत्सद्दी सेनानी किंवा सर्वाधिकारी लढाईचे निश्चित जातक आज वर्तवू शकत नाही. म्हणून अशा स्थितीत दोन्ही बाजूच्या युद्ध्यमान राष्ट्रापैकी, कोणाही एका प्रबळ गटाच्या भवितव्याशी निगडित आहे, अशा असहाय्य स्थितीत स्वतःच्या भवितव्याविषयी चिंतित असलेल्या; नि त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या अन्य राष्ट्रांप्रमाणेच हिंदुस्थानसारख्या निःशस्त्र केल्या गेलेल्या राष्ट्रानेसुद्धा संकट काळातून पार पडण्यासाठीच, योग्य सुसंधीची वाट पाहिलीच पाहिजे.

भवितव्याचे फासे भारून जगाच्या रणांगणांवर अविचाराने परिणामाची तमा न बाळगता टाकण्यात आलेले आहेत. सगळीच राष्ट्रे तप्त मुशीत टाकलेली आहेत. महासागर पेटले आहेत; आणि नभांगणातून सैन्याची शिबंदी ठाण मांडून, क्षेपणास्त्रांचा अहोरात्र वर्षाव करीत आहेत. या युद्धातून बाहेर पडलेले कोणतेही राष्ट्र पूर्ववत होणार नाही. अथवा राहणार नाही. वैभवाच्या शिखरावर असणारी अनेक राष्ट्रे धुळीला मिळतील तर, मातीत मिसळलेल्या अनेकांना अकस्मात आपले पूर्ववैभव पाहण्याची संधी येईल. काही झाले तरी पृथ्वीचा चेहरा मोहरा क्रांतीकारकरीत्या पालटेलच; आणि ती क्रांतिकारक उत्क्रांति, उन्नति सध्या तरी रणसंग्राम दैवतांच्याच अंकांवर पहुडली आहे.

यद्यपि सर्व काही अद्याप रणचंडीच्या हाती आहे. तथापि, जितपत हिंदुस्थानचा संबंध येतो, असे मात्र काहीशा ठामपणे सांगता येऊ शकते, की तोही ह्या परिस्थितीचा एक घटक असल्याने, हिंदुस्थानच्या भवितव्याची स्थिती गती आणि दिशा याचे स्वरूप अगदी नेमके सांगता येत नसले तरी, ते क्रांतिकारकपणे पालटल्यावाचून राहूच शकत नाही. ह्या क्रांतीच्या पोटी असणाऱ्या सर्व संभवाचा माणसाला करता येणे शक्य तो सर्व विचार केला गेला आहे, असा विश्वास बाळगा.

कोणत्याही क्रांतिकारक बदलाचा-मग तो आता होवो वा नंतर होवो-आपल्या दृष्टीने कसा लाभ घेता येईल, याचा विचार नि सिद्धता हिंदुमहासभेने केलेली आहे याची निश्चिती ठेवा.

आतापर्यंतच्या हिंदू इतिहासात आढळते त्याचप्रमाणे याही वेळी एखादा अवतार होऊन हिंदूंचे पुनरुत्थान करील नि सर्व अहिंदु सामर्थ्यांशी टक्कर देऊन हिंदू परत आपल्या पूर्ववैभवाची प्राप्ति करून घेतील, असा संभव फार आहे. अतिशय कसोटीच्या काळातच अवतार होत असतात. शक्यता किंवा संभव या बाबतीत शहाण्या माणसांनी केव्हाही अधिक निश्चितीने बोलू नये. त्यांनी आपल्या राष्ट्रांचे सामर्थ्य वाढवून साठवीत रहावे; नि त्यासाठी भरती-ओहोटीवर दृष्टी ठेवावी आणि संधी येईल तेव्हा ती साधण्यास सदैव सज्ज रहावे.

**काय वाटेल ते झाले तरी हिंदुसंघटनवादी तत्वप्रणाली हे महत्वाचे सूत्र ठेवा. भविष्यात तुमच्यापुढे वाढून ठेवलेल्या कोणत्याही प्रसंगात ते तुम्हाला उपयोगी पडेल. सकल राजनीतीचे हिंदुकरण करा नि हिंदूंचे सैनिकीकरण!**

**हिंदुधर्म की जय!**

**हिंदू राष्ट्रकी जय!**

--------------------

# परिशिष्ट
# अखिल भारतीय हिंदुमहासभा
# २५ वे वार्षिक अधिवेशन
# अमृतसर
# विक्रम संवत् २००० : सन १९४३

ओळीने सातवेळा अध्यक्ष म्हणून निवडून येऊनही, अधिकाअधिक बिघडत चाललेल्या प्रकृतीमुळे वीर सावरकरांना ह्या अधिवेशनालाही जाता आले नाही; आणि आपले भाषणही लिहिता आले नाही. अध्यक्षीय कार्याच्या वाढत्या व्यापातून आपणाला मुक्त करून, ती धुरा दुसऱ्या कोणा कर्त्या माणसाच्या समर्थ खांद्यावर द्यावी; अशी आग्रहाची विनंती त्यांनी आपल्या मतदारांना करून, १९४३ मध्येच आपल्या पदाचे त्यागपत्र त्यांनी पकटपणे दिले होते. तरीही जनतेने त्यांनाच पुन्हा निवडले. परंतु १९४४ मध्ये प्रकृति अतिशयच खालवल्यामुळे, त्यांनी पुढील अधिवेशनात डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी ह्यांनाच सर्वांनी अध्यक्ष म्हणून निवडून द्यावे; असे प्रकट विनंतीपत्र काढले. वीर सावरकरांच्या त्या त्यागपत्राविषयींची तीन वक्तव्ये आम्ही अशासाठी देत आहोत की, त्यांच्या अशेष अध्यक्षीय भाषणांच्या या संकलक ग्रंथांच्या यथासांग समारोपास तीच वक्तव्ये शोभून दिसणार आहेत.)

पत्र क्र. १

हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाचे सहावे वर्षही संपुष्टात आले असल्यामुळे, माझ्या अध्यक्षपदाचे त्यागपत्र देण्याचा निर्णय, प्रसिद्धिण्याची वेळ येऊन ठेपली आहे. असे मला वाटते; म्हणून पुढील वर्षांच्या अध्यक्षीय मतनोंदणीच्या पहिल्या फेरीतही माझे नाव न घालता या कार्यभागापासून माझी मुक्तता करावी; अशी महासभेच्या मतदारांना, आपला नेता निवडण्याच्या त्यांच्या अधिकारावर कुठलेही आक्रमण न करता माझी विनंती आहे.

सतत सहा वर्षे अध्यक्षपदाची धुरा वाहतांना, पडलेल्या कामाच्या ताणामुळे माझ्या प्रकृतीवर जो पुढे न झेपण्याअतका ताण पडलेला आहे आणि दुसरे म्हणजे माझ्या पूर्वीच्या त्यागपत्रांच्यावेळी काढलेल्या पत्रकावरून हे दिसून येईल; की आता मी स्वतःच पुढे येऊन आपल्या समर्थ सहकाऱ्यांपैकी, कोणासतरी पुढील वर्षासाठी हिंदुमहासभेचा अध्यक्ष म्हणून निवडण्यात मतदारांना साहाय्य करावे; असे मला वारंवार वाटत आले आहे.

जरी, हे त्यागपत्र निश्चितपणे शेवटचे ठरले पाहिजे, हे खरे असले तरी त्या संबंधात एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, मी आजच काही प्रथम त्यागपत्र देत नाही. ऑगस्ट १९४० मध्ये मी

जेव्हा अतिशय आजारी पडलो; आणि तरीसुद्धा मदुरेच्या अधिवेशनप्रसंगी अध्यक्षपदी माझी निवड करण्यात आली, तेव्हा मी पहिले त्यागपत्र दिले. परंतु अखिल हिंदुस्थानातील हिंदुसंघटनी लोकांच्या बलवत्तर आणि प्रेमळ आग्रहामुळे नि विशेषतः मदुरेच्या स्वागतसमितीने ''आपण त्यागपत्र मागे घेतले नाही. तर अधिवेशन यशस्वी होणे अशक्य आहे,'' असे आग्रहपूर्वक लिहिल्यामुळे मी चवथ्यावेळीही अध्यक्षपद मान्य केले; नि अक्षरशः खाटेवर घालूनच मला अधिवेशनास न्यावे, आणावे लागले. पुढील वर्षी ख्रि. १९४१ मध्ये मी पुन्हा दुसऱ्यांदा त्यागपत्र दिले; परंतु जवळ जवळ एकमताने मी पुन्हा पाचव्यांदा निवडला गेलो. याच वेळी भागलपूर पकरण उद्भवले, नि हिदुत्वाचे संरक्षण करण्यासाठी आपल्या ठिकाणी मी स्वतःच ठामपणे उभे राहणे, हेच माझे कर्तव्य आहे. असे वाटले म्हणून, भागलपूरच्या निःशस्त्रप्रतिकाराचा सर्वाधिकारी म्हणून माझी जेव्हा निवड झाली तेव्हा निश्चित विजय मिळेतो, त्या लढ्यात ज्या सहस्रावधी हिंदुसंघटक झुंजारांनी अहमहमिकेने भाग घेतला. त्यांचे नेतृत्व स्वीकारून कारावासही पत्करला. हे कठीण कार्य हातावेगळे होताच मी जुलै १९४२ मध्ये तिसरेवेळी माझे त्यागपत्र पुन्हा प्रविष्ट केले. परंतु कार्यकारिणीने ते मान्य करण्याचे नाकारले; इतकेच नव्हे; तर मी ते घेईपर्यंत काम पुढे चालू न करण्याचेही ठरविले.

ह्याच वेळी काँग्रेसची, 'सोडा हिंदुस्थान, पण ठेवा तुमचे सैन्य!' ची चळवळ आरंभिली गेली आणि पुढे तर माझ्या दृष्टोत्पत्तीस हेही आले; की काँग्रेसची बटीक म्हणून हिंदुमहासभेने काम करण्याचे नाकारल्याने, कारागृहाबाहेर असलेल्या कित्येक काँग्रेस पुढाऱ्यांनी, हिंदुमहासभाच आपल्या हातात घेण्याचा कट केला! त्यांची अशी स्पष्ट इच्छा होती की, हिंदुमहासभेने काँग्रेसप्रमाणेच आपलेही नाक कापून घ्यावे, नि पाकिस्तानला निदान तात्विक मान्यता तरी द्यावी. त्यावेळच्या माझ्या तर्कास त्यानंतर घडलेल्या घटनांवरून पुष्टीच मिळते. वेळीच ह्या धोक्यापासून हिंदुमहासभेस दूर ठेवण्यासाठी त्या भयसूचक घंटेचा निनाद भरतखंडात पसरविण्यासाठी नि ह्या कटाचा बीमोड करण्यासाठी तर मी नुसते त्यागपत्र न देण्याचा निर्णय घेतला; इतकेच नव्हे निवडणूक लढविण्याचेही ठरविले. गेल्या सहा सात वर्षांत मी निवडणूक प्रत्यक्ष अशी ह्याचवेळी नि प्रथमतः लढविली. हिंदुमहासभेच्या मतदारांच्या बुद्धिनिष्ठ नि असीम प्रेम निदर्शक पाठिंब्यामुळे मी परत जवळ जवळ एक मताने सहाव्या वेळी पुन्हा अध्यक्षपदी निवडला गेलो. कानपूर येथील अधिवेशनात केवळ पाकिस्तान योजनेच्याच विरुद्ध नव्हे; तर मध्यवर्ती सरकारापासून फुटून राहण्याच्या प्रांतिक स्वयंनिर्णयाधिकारालाही विरोध दर्शविणारा असा एक महत्वाचा ठराव अगदी निःसंदिग्ध शब्दात केला गेला. हिंदूंच्या सैनिकीकरणाच्या चळवळीला एक अपूर्व चालना मिळाली आणि हिंदुमहासभेचे 'काँग्रेसी-करण' करण्याच्या

कल्पनांना नि कटांना मूठमाती मिळाल्यामुळे, काँग्रेसमधील सी. राजगोपालचारी यांच्यासारख्या मोठमोठ्या आधारस्तंभांनासुद्धा आश्चर्याचा धक्का बसला. सी. राजगोपालचारी यांनी तर पकटपणे शोक केला की, ''हिंदू-मुसलमान ऐक्य साधण्याच्या माझ्या पाकिस्तानाला संमती देण्याच्या योजनेसंबंधी हाताचे बोटांवरही न मोजता येण्याइतके जे हिंदुमहासभेतील पुढारी सहानुभूतिपूर्वक पहात. ते सुद्धा कानपूर येथील अधिवेशनात जनकोलाहलाच्या (Crowd Psychology) विचार सरणीला बळी पडले.!''

उपरिनिर्दिष्ट निवेदनावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसून येईल, की दुसऱ्या छेदकांत सांगितलेल्या कारणासाठीच मी अध्यक्षपदाची धुरा उतरून ठेवण्याचे प्रयत्न पूर्वी वारंवार केले आहेत. आता मात्र त्यागपत्र देण्याचा अंतिम नि निश्चित निर्णय मी घेतला आहे. हे इतके स्पष्टीकरण देण्याचे कारण इतकेच, की या माझ्या त्यागपत्रामागे उपरिनिर्दिष्ट कारणांव्यतिरिक्त, आणखी काहीतरी विशेष कारण असावे; असा चुकीचा समज झाल्यास किंवा छद्मीपणाने कुणी बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केल्यास, त्याला वाव मिळू नये. माझे असे ठाम मत बनले आहे; की पूर्वी कधीही नव्हती इतकी आता आज हिंदुमहासभा ही संस्था प्रबळ नि एका विचारसरणीने अनुप्राणित झालेली आहे. आणि म्हणूनच यावेळी मी त्यागपत्र देण्याचे ठरविले आहे. अगदी पूर्वदूषित नि विरुद्ध दृष्टिकोनातून विचार करणारे प्रा. कूपलंड-क्रिप्स शिष्टमंडळातील एक सदस्य हेही आपल्या 'दि क्रिप्स मिशन' नावाच्या अगदी ताज्या पुस्तिकेत असे लिहितात की, 'हिंदुमहासभा ही एक झुंजार हिंदूंची कणखर संघटना आहे; आणि सदस्यसंख्या नि समाजातील प्रभाव या दोन्ही दृष्ट्या तिची झपाट्याने वाढ होत आहे.''

हे त्यागपत्र सादर करतेवेळी मला विशेष आनंद होत आहे. कारण सबंध हिंदुस्थानातील हिंदुसंघटक जगतात, माझेविषयी संपूर्ण विश्वास नि असीम प्रेमयुक्त आदर आहे. तोच हे त्यागपत्र देण्याचा सुयोग घडून येत आहे. गेल्याच महिन्यात माझ्या एकसष्ठाव्या वाढदिवसानिमित्त झालेल्या समारंभात, ज्या माझ्या लक्षावधी देशबांधवांनी नि धर्मबांधवांनी भाग घेतला, हिंदुस्थानभर नगरानगरातून नि खेड्याखेड्यांतून झालेल्या सहस्रावधी सभा, स्थानिक विधिमंडळे समित्या, नि वाङ्मयीन नि धार्मिक संस्था यांनी दिलेली मानपत्रे हिंदुमहासभेचे अधिकृत सभासद नसलेल्या नि असलेल्या अशा अनेक थोर थोर हिंदू पुढाऱ्यांचे शुभचिंतनपर संदेश, राष्ट्रांतील प्रमुख नियतकालिकांचे विशेषांक नि वृत्तपत्रांचे इंग्रलेख ह्या सर्वांचे द्वारा मी हिंदुत्वासाठी केलेल्या अल्पस्वल्प सेवेची प्रशंसा भावना उचंबळ-विणाऱ्या अशा

प्रेमळ शब्दांत व्यक्तविली आहे; आणि माझे ठायी नि मी सांगत असलेल्या हिंदू तत्वज्ञानाचे ठायी असीम विश्वास नि त्यांचे भविष्याविषयी दुर्दम्य आशा असल्याचे त्यांनी आश्वासन दिले आहे.

अखिल भारतातील हिंदुसंघटक जनतेने त्याचप्रमाणे माझे सहकारी नि मित्र ह्यांनी माझे ठायी जे असीम प्रेम ठेवले; जो नितांत आदर नि विश्वास व्यक्तविला; नि माझ्यात जे दोष आढळले असतील, त्याकडे दुर्लक्ष करून सहनशीलता दर्शविली; त्याविषयी त्या सर्वांचे मी विनम्रपणे आभार मानतो.

जरी, मी अध्यक्षपदाचे त्याग पत्र दिले; तरी हिंदुमहासभेच्या सर्वसाधारण सैनिकांमध्ये, एक पाईक म्हणून उभा राहून; हिंदुत्वाचे प्रगतीसाठी उभारलेल्या आंदोलनातून, मनःपूर्वक सेवा करीत राहीन; हे उच्चारून सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

**हिंदुमहासभा-चिरायु होवो !**

**हिंदुराष्ट्र-चिरायु होवो !**

- **वि. दा. सावरकर.**

**सावरकर सदन,**

**अध्यक्षीय कार्यालय,**

**मुंबई - २८.**

------------------------

दि. ३१ जुलै १८४३

पत्र क्र. २

''कार्यकारिणीसमोर माझे त्यागपत्र असतानासुद्धा महासभेच्या अध्यक्षपदी ओळीने, सातव्या वेळी माझी योजना करून, महासभेच्या मतदारांनी जे प्रेम, जो विश्वास नि केलेल्या कामाची कृतज्ञता प्रत्यक्ष स्वरूपात व्यक्तविली याविषयी मी आभारी आहे. परंतु मला जे भय वाटत होते, त्याप्रमाणे माझी प्रकृति क्रमशः अंथरुणाला खिळून आहे. वैद्यकीय मंडळाने मी कुठलाही लांबचा प्रवास-नि त्यातही ज्या भागात थंडी विशेष जाणवते अशा भागात अंगीकारावा या विरुद्ध आहे; तरी सर्व हिंदुसंघटकांनी मी हिंदुमहासभेच्या अमृतसर येथील रौप्य महोत्सवी अधिवेशन प्रसंगी उपस्थित राहू शकत नाही. या विषयी क्षमा करावी.

मी ही गोष्ट आधीच स्वागतसमिती नि सरकार्यवाह डॉ, बा. शि. मुंजे यांना कळविली आहे आणि धर्मवीर मुंजे यांस सरकार्यवाह या नात्याने आपल्या  घटनेप्रमाणे कार्यकारिणीची बैठक बोलावून या प्रश्नांचा उहापोह करावा नि आपल्यातील प्रथम श्रेणीच्या पुढाऱ्यांपैकी कोणातरी एकाची योजना अधिवेशनापुरती अध्यक्षपदी करावी, असेही सुचविले आहे. या संबंधात माझे वैयक्तिक मत असे आहे की, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांची माझे जागी कार्यकारी अध्यक्ष म्हणून एकमताने निवड केली जावी. विशेषतः माझी प्रकृति मूळपदावर येऊन, मी पूर्ववत सर्व कामे त्याच जोमाने करू लागेतो बराच अवधी लागेल, ही गोष्ट लक्षात घेता तर, मी सांगितल्याप्रमाणे करणे अधिकच उचित होय. तरीसुद्धा कार्यकारिणीचा निर्णय अंतिम समजण्यात यावा.

ज्याना म्हणून शक्य आहे; त्या सर्व हिंदू संघटकांनी, अमृतसर अधिवेशनास उपस्थित व्हावे, अशी माझी सूचना आहे. अमृतसर येथील स्वागतसमितीने हे रौप्यमहोत्सवी अधिवेशन यशस्वी करण्यासाठी, लागणाऱ्या अगदी बारीकसारीक गोष्टींपैकी एकही गोष्ट करावयाची बाकी ठेवली नाही. माझ्या प्रकृतीच्या अशा परिस्थितीत, या ठिकाणी या अधिवेशनाला विशेष असे महत्व का प्राप्त झाले आहे? आणि हिंदुराष्ट्राच्या मानसिक अवस्थेमध्ये झालेल्या, अपूर्व क्रांतीचे अपूर्व असे निदर्शन करण्यासाठी त्या रौप्यमहोत्सवाच्या अधिवेशनात अखिल हिंदुध्वजा-खाली अखिल हिंदुमात्रांनी एकत्रित येणे कसे आवश्यक आहे. त्याचे विस्तृत विवेचन करणे याहून शक्य नाही.

या अत्यंत त्रोटक पत्रकात मी एवढेच फारतर सांगू शकेन; की जर सगळ्या हिंदुमात्रांनी स्वतःशी प्रतारणा केली नाही; आणि पूर्वीच्या इतिहासात शेकडोवेळा घडले; त्याप्रमाणे प्राप्त परिस्थितीशी यशस्वीपणे तोंड द्यावयाला ते उभे ठाकले; तर-तर अवताराच्या जन्मदिवसाप्रमाणे हिंदुमहासभेचा जन्मदिवस हा सुद्धा हिंदूंच्या इतिहासात 'नवीन युगाचा'- 'हिंदू युगाचा' -प्रारंभ दिन म्हणून सुवर्णाक्षरात कोरून ठेवण्याचा सुयोग प्राप्त होईल.

- **वि. दा. सावरकर.**

**सावरकर सदन,**

**अध्यक्षीय कार्यालय,**

**मुंबई** - **२८.**

------------------------

www.savarkarsmarak.com

दि. १७ डिसेंबर १९४३.

पत्र क्र. ३

(डॉ. श्यामप्रसाद मुखर्जींच्या आगमनप्रसंगी पुण्याच्या सत्कारसमितीचे प्रमुख, धर्मवीर भोपटकर यांना दि. १ ऑगस्ट १९४४ या दिवशी, आपल्या मुंबई येथील अध्यक्षीय कार्यालयातून खालील विद्युत्संदेश वीर सावरकर यांनी धाडला.)

‘‘डॉ. मुखर्जी महाशयांच्या सत्कारात मी सहभागी आहे. त्यांनी केलेली असीम सेवा, मध्यवर्ती सरकारातून फुटून निघण्याच्या प्रांतिक स्वयंनिर्णयाचा त्यांनी आता केलेला तीव्र निषेध आणि हिंदुस्थानच्या विच्छेदीकरणाला विरोधण्याचा त्यांनी व्यक्तविलेला निश्चय याविषयी हिंदूमात्र कृतज्ञ आहे. आज हिंदुराष्ट्राच्या हाती सर्वोच्च सन्मानाचे जे एकच प्रतीक उरले आहे; असा हा हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाचा काटेरी मुकुट पुढील अधिवेशनात त्यांचे शिरावर ठेवला जावो; अशी माझी वैयक्तिक इच्छा आहे!‘‘

- **वि. दा. सावरकर**

**हिंदू धर्म की जय !**